म. ग्रं. सं. ठाणें
विषय कृ - प्रवास
स. नं.
९८३०

# विक्रमाच्या उज्जयिनींत !

डाक्टर ओक

आणि मंडळी—देवास

REFBK-0005213

किं. २-०-०

3

A4

ba

# विक्रमाच्या उज्जयिनींत!

( शारदोपासक मंडळ, देवास. पुस्तक ९ वें. )

दा. क्र. ५२९३

लेखक

**डॉ. शंकर रामचंद्र ओक**

एल्. एम्. ॲन्ड एस्.

सीताराम दवाखाना, उज्जयिनी व देवास.

सती कर्मदेवी व केवळ स्वदेशासाठीं ! या ग्रंथांचा कर्ता.

भूतपूर्व संपादक-मार्तंड, देवास.

[ सर्व [illegible] हेत. ]

REFBK-0005213

**ओक आणि मंडळी**

सीताराम दवाखाना-देवास.

सन १९३४

किंमत दोन रुपये

मुद्रक—
दामोदर रघुनाथ मित्र,
मनोरंजन प्रेस, सँडहर्स्ट रोड,
गिरगांव मुंबई. नं. ४.

---

## याच ग्रंथकाराचीं इतर पुस्तकें.

१ सती कर्मदेवी
(सध्या शिल्लक नाहीं.) किंमत ४ आणे

२ केवळ स्वदेशासाठीं !
(एक ऐतिहासिक कथानक) किंमत २ रुपये

ओक आणि मंडळी, देवास. २

---

प्रकाशक—
डॉ. शंकर रामचंद्र ओक,
एल्. एम्. ॲन्ड एस्.
जेल सुपरिंटेंडेंट, देवास. २.

# अर्पणपत्रिका

तीर्थरूप मातोश्री सीताबाई ओक, देवास.

चि. रा. माधव रामचंद्र ओक, एम्. ए.,

व्हाइस प्रिन्सिपॉल, महाराजा कॉलेज, जयपूर.

ती. रा. रा. विनायक कृष्ण सखदेव, मिरज.

केसरी–मराठा–संस्था, पुणें.

यांस सादर व सप्रेम

समर्पण.

# प्रस्तावना

देवासचे डॉक्टर रा. शंकर रामचंद्र ओक यांनीं हें पुस्तक बरेच वर्षांपासून लिहावयास घेतलें होतें. कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें त्यांचें लिखाण थांबलें, आणि आज शेवटीं तें कादंबरी रूपानें प्रसिद्ध होत आहे. या चिकाटी-बद्दल ग्रंथकर्त्यांचें अभिनंदन करणें अवश्य वाटतें. ही कादंबरी लिहिण्याचा उद्देश बव्हंशी उज्जयिनीचें यथार्थ महत्त्व पटविणें हाच असावासा वाटतो. आणि कित्येक वेळां हें कथानक मुख्य किंवा उज्जयिनीवर्णन मुख्य हा भ्रम पडावा अशा प्रकारची हातोटी संविधानकांत साधली आहे. ही गुंफण अशा कौशल्यानें केलेली आहे कीं, हा सत्याचा देखावा इतका परिणामकारक रीतीनें उत्पन्न केलेला मराठींत तरी सर्वस्वी नवीन वाटतो. अगदीं परिचयांतलीं स्थानें, रोजच्या गांठीभेटीची मंडळी, नेहमींच्या व्यवहारांतले प्रसंग या सर्व साधनांचा पूर्ण उप-योग लेखकानें करून घेतला आहे. यांच्या जोडीला सहजतेची मदत घेतल्यानें व कोणत्याहि प्रकारच्या अतिशयोक्तीचा अभाव असल्यानें कादंबरींत अस्वाभा-विकपणा कोठेंच दिसत नाहीं.

कादंबरी–लेखनांत हल्लीं जरी पुष्कळ नाविन्य येत असलें तरी त्यांच्या कथानकाचा एकमार्गीपणा आणि ठराविक चित्रण यांत मात्र बदल झाला नाहीं. प्रेम आणि तें देखील स्त्री–पुरुष विषयक प्रेम, याशिवाय इतर विषय साधा-रणतः संविधानकांत सांपडत नाहींत. जणूं काय कादंबरी–लेखकांच्या प्रतिभा फक्त प्रेम या विषयानेंच उज्वलित होतात. या आधुनिक लेखकांच्या कोत्या प्रतिभेला नवविचारांचें गालबोट लाविल्याबद्दल रा. ओकांचें कौतुक केलें पाहिजे.

ही कादंबरी भावांदोलनाच्या तत्त्वावर लिहिली गेली आहे. कमजास्त रसपोषाचीं प्रकरणें आलटून पालटून घातलीं आहेत. त्यामुळें शेवटपर्यंत ती मनोरंजक वाटते. निरनिराळ्या संस्कृत कवींचे मधूनमधून दिलेले उतारे आणि विपुल सुभाषितें यांचाहि या कामीं लेखकानें पूर्ण उपयोग करून घेतला आहे. अशा तऱ्हेनें कादंबरी सर्वस्वी नवीन धर्तीवर लिहिली आहे. तींत नेहमींच्या कादंबऱ्यांत आढळणारे किंवा तत्समान प्रसंग अथवा रसपरिपोष शोधूं गेल्यास सांपडणार नाहींत. कादंबरी कांहींअंशीं आत्मवृत्तपर असल्यानें, वाचक तिच्या वाचनांत चटकन् रंगून जातो.

या लिखाणांतील उतारे व सुभाषितें वरींच खर्ची करून, कथानक व उज्जयिनीवर्णन, अशीं दोन निरनिराळीं पुस्तकें लिहिलीं असतीं तर कथानकाची तार मधुनमधून तुटली नसती असें कांहीं वाचकांस वाटेल. परंतु डॉक्टरसाहेबांनीं या मिश्रणाचें जें हें प्रिस्क्रिपशन् वाचकांस पाजिलें आहे त्यामुळें पुराणप्रियतेचा पगडा कांहीं कमी होतो किंवा कसें हें पुस्तकप्रसिद्धी नंतर लवकरच अनुभवास येईल.

डॉ. ओक यांच्या या कृतीचें वाचकवर्ग चीज करतील अशी मला पूर्ण आशा आहे.

श्रीजिवाजी वेधशाला,<br>उज्जयिनी

गोविंद सदाशिव आपटे.

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| | उपोद्घात ... ... ... ... | ११ |
| प्रकरण | १ लें हरिः ॐ ... ... ... ... | १७ |
| ,, | २ रें प्रसिद्ध किल्ला चितोडगड ... ... ... | २५ |
| ,, | ३ रें महत्त्वाचे कागदपत्र ... ... ... | ३४ |
| ,, | ४ थें राजपुत्र भीमसिंग... ... ... ... | ४२ |
| ,, | ५ वें सांपडला कीं निसटला? ... ... ... | ५२ |
| ,, | ६ वें पूर्वसूत्र ... ... ... ... | ६० |
| ,, | ७ वें शोधाला सुरवात ... ... ... ... | ७२ |
| ,, | ८ वें विक्रमाच्या उज्जयिनींत! ... ... ... | ८० |
| ,, | ९ वें आशा ... ... ... ... ... | ९३ |
| ,, | १० वें कालिदासाच्या घरीं! ... ... ... | १०१ |
| ,, | ११ वें हातांवर तुरी! ... ... ... ... | ११९ |
| ,, | १२ वें याचा अर्थ काय?... ... ... ... | १२६ |
| ,, | १३ वें शिंक्याचें तुटलें!... ... ... ... | १३५ |
| ,, | १४ वें बोक्याचें पिकलें!... ... ... ... | १४० |
| ,, | १५ वें विक्रमाचें न्यायचातुर्य ... ... ... | १४७ |
| ,, | १६ वें अचानक भेट ... ... ... ... | १५९ |
| ,, | १७ वें पुढें ... ... ... ... ... | १७५ |
| ,, | १८ वें मंगलेश्वराचे रस्त्यावर! ... ... ... | १८६ |
| ,, | १९ वें आशेला जागा ... ... ... ... | १९५ |
| ,, | २० वें विष्णुपुराण ... ... ... ... | २०८ |
| ,, | २१ वें सांपडण्याच्या बेतांत आलें!... ... ... | २१७ |
| ,, | २२ वें अहम्, आवाम्, वयम् ... ... ... | २२३ |
| ,, | २३ वें अर्वाचीन शर्विलक ... ... ... | २३० |
| ,, | २४ वें खटाटोपो भयंकरः! ... ... ... | २३५ |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रकरण | २५ वें | एक अकल्पित शोध ... ... ... | २४१ |
| ,, | २६ वें | नवीन माहिती ... ... ... ... | २४८ |
| ,, | २७ वें | सीतावनवास ... ... ... ... | २५२ |
| ,, | २८ वें | कंसमामा ... ... ... ... | २६० |
| ,, | २९ वें | करावें तसें भरावें ... ... ... ... | २६८ |
| ,, | ३० वें | मागील आठवणी ... ... ... ... | २७४ |
| ,, | ३१ वें | दैवाची लीला ... ... ... ... | २८१ |
| ,, | ३२ वें | विनाशकाले विपरीतबुद्धिः । ... ... ... | २८८ |
| ,, | ३३ वें | दुःखाअंतीं सुख ... ... ... ... | २९४ |
| ,, | ३४ वें | प्रयत्नांतीं परमेश्वर ! ... ... ... | २९९ |
| ,, | ३५ वें | चिंतामण गणेशाचे मंदिराकडे ... ... | ३०६ |
| ,, | ३६ वें | पाषाणेश्वर ... ... ... ... | ३१० |
| ,, | ३७ वें | प्रियकारण्यांत ! ... ... ... ... | ३१६ |
| ,, | ३८ वें | हरिकीर्तन ... ... ... ... | ३२१ |
| ,, | ३९ वें | कांहीं संस्मरणीय गोष्टी ... ... ... | ३२७ |
| ,, | ४० वें | प्राचीन इतिहास ... ... ... ... | ३३३ |
| ,, | ४१ वें | साधूंचा उपदेश ... ... ... ... | ३४० |
| ,, | ४२ वें | राजधानी उज्जयिनी ... ... ... | ३४५ |
| ,, | ४३ वें | केवळ स्वदेशासाठीं ! ... ... ... | ३४८ |
| ,, | ४४ वें | उपसंहार ... ... ... ... | ३५३ |
| | | परिशिष्ट नं. १ ( ऱ्हाळकर ) ... ... | ३६१ |
| | | परिशिष्ट नं. २ ( खरे ) ... ... ... | ३६३ |
| | | परिशिष्ट नं. ३ ( डांगे ) ... ... ... | ३६७ |
| | | परिशिष्ट नं. ४ ( अजमेरी ) ... ... | ३६९ |
| | | परिशिष्ट नं. ५ ( आपटे )... ... ... | ३७० |
| | | परिशिष्ट नं ६ ... ... ... ... | ३७४ |

# चित्रांची अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | उज्जयिनीचा नकाशा–प्रारंभीं व प्रकरण ७ पहा ... | ७३ |
| २ | श्री. वा. कृ. भावे ... ... ... ... | १४ |
| ३ | कालियादेह महाल ... ... ... ... | १७ |
| ४ | सूर्याचीं किरणें मला उठविण्यासाठीं उभीं ! ... ... | २४ |
| ५ | राजपुत्र भीमसिंग ... ... ... ... | ४२ |
| ६ | चितोडगडावरील जयस्तंभ ... ... ... | ४३ |
| ७ | बडे गणेश ... ... ... ... ... | ५८ |
| ८ | पं० नारायणजी ज्योतिषी ... ... ... | ५९ |
| ९ | २४ खंबा दरवाजा ... ... ... ... | ७४ |
| १० | ,, ,, दुसरें दृश्य ... ... ... ... | ७५ |
| ११ | श्री. चिं. वि. वैद्य ... ... ... ... | ८३ |
| १२ | श्रीमहाकालेश्वर व कोटितीर्थ ... ... ... | ८५ |
| १३ | वेधशाळा ... ... ... ... ... | ८६ |
| १४ | वेधशाळा ... ... ... ... ... | ८७ |
| १५ | श्रीमनकामनेश्वर ... ... ... ... | ९८ |
| १६ | श्री. न. चिं. केळकर ... ... ... ... | ९९ |
| १७ | कै. लो. बा. गं. टिळक ... ... ... ... | १०६ |
| १८ | कै. श्री. प्रो. प. ना. पाटणकर ... ... ... | १२० |
| १९ | कै. श्री. डॉ. गोपाळ विष्णू ओक ( गोपाळदादा ) ... | १२५ |
| २० | श्री. पं० सूर्यनारायण व्यास ... ... ... | १३८ |
| २१ | श्री. पं० नारायणजी व्यास ... ... ... | १३९ |
| २२ | श्री. डॉ. तारानाथ जोशी... ... ... ... | १५९ |
| २३ | कै. माधवराव महाराज शिंदे ... ... ... | १५९ |
| २४ | श्रीमंत महाराज जिवाजीराव शिंदे ... ... ... | १५९ |
| २५ | रानांतून गाई व म्हशी परत येऊं लागल्या ... ... | १७४ |
| २६ | गोपाळमंदिर ... ... ... ... ... | १७५ |
| २७ | सिद्धवट ... ... ... ... ... | १८६ |
| २८ | सांदीपनींच्या आश्रमांतील गाई व रामकृष्ण ... ... | १८७ |
| २९ | बेगमसाहेबांची कबर ... ... ... ... | २२८ |

३० मंदिर महाकालेश्वर, ( उत्तर दृश्य ) ... ... ... २२९
३१ हरसिद्धी ... ... ... ... ... ३२३
३२ श्री. न. शं. रहाळकर ... ... ... ... ३६२
३३ कै. वासुदेवशास्त्री खरे ... ... ... ... ३६३
३४ शिप्रा नदीचे घाट ... ... ... ... ३६९
३५ श्री. प्रि. आपटे... ... ... ... ... ३७०

# आभारप्रदर्शन

या ग्रंथासाठीं अनेक सज्जनांनीं आम्हांस उपकृत करून ठेविलें आहे. ग्वाल्हेरचे श्री. केशव बळवंत डोंगरे, बी. ए., इन्स्पेक्टर जनरल ऑफ रेकॉर्डस् यांनीं नं. १, १४, २७ व ३१ हीं चित्रें दिलीं. केसरी–मराठा–संस्था, पुणें यांजकडून नं. २, ११, १६ व १७ हीं चित्रें मिळालीं. श्री. सूर्यनारायणजी व्यास, उज्जयिनी यांजकडून नं. ३, ७, ८, १३, २०, २१, २३, २४, २६ हीं चित्रें प्राप्त झालीं. नं. ४ चें चित्र श्री. शं. वा. किर्लोस्कर, किर्लोस्कर व स्त्री या सुप्रसिद्ध मासिकांचे संपादक यांनीं दिलें. नं. ५ चें चित्र राजपुत्र भीमसिंग यांचे वंशज श्रीअमरसिंहजी, मेवाडच्या राज्यांतील बनेडा संस्थानचे अधिपती, यांचे प्रायव्हेट सेक्रेटरी श्री. रविशंकर देराश्री, बी. ए., एल्एल्. बी. यांजकडून आलें. नं. ६ चें चित्र B. B. & C. I. Ry. कंपनीनें उपयोगासाठीं दिलें. नं. १०, १२, १३, २९, ३० हीं चित्रें श्री. व्यवस्थापक जयाजीप्रताप ग्वाल्हेर यांजकडून आलीं. नं. १८ व ३२ हीं चित्रें श्री. न. शं. रहाळकर बी. ए., इंदूर यांनीं पुरविलीं. नं. २२ चें चित्र डॉ. तारानाथ जोशी यांनीं दिलें. नं. २५, २८ हीं चित्रें श्री. ह. गो. फाळके, गोग्रास–कचेरी, मुंबई यांजकडून आलीं. नं. ३३ चें चित्र श्री. वि. कृ. सखदेव, मिरज यांनीं मोठ्या प्रयत्नानें मिळवून पाठविलें. श्री. सूर्यनारायणजी व्यास यांनीं कळविलें कीं पृ. १८६ वर लिहिलेली कथा "अंकपातके मंगलेश्वरके लिये नही है. जिस कथाका आपने उल्लेख किया है, वे मंगलनाथ हैं और सिंहपुरीसे कार्तिकचौक आनेके रास्तेपर हैं. अंकपातके मंगलेश्वरकी कथा अवंती–महात्म में है." मनोरंजनाचे संपादक श्री. दामोदर रघुनाथ मित्र यांनीं हें पुस्तक सर्वांगसुंदर केलें. प्रि. आपटे यांनीं प्रस्तावना लिहिली. या सर्व प्रकारच्या मदतीबद्दल लेखक वर उल्लेख केलेल्या सर्व सज्जनांचा फार आभारी आहे.

ग्रंथ क्र. ५२९३

# विक्रमाच्या उज्जयिनींत !

## उपोद्‌घात.

**पुरुषें आरंभावें कर्म, न पौरुष कदापि सोडावें.**

—मोरोपंत.

पुढें सांगितलेली गोष्ट प्रसिद्ध करावी असा माझा बऱ्याच दिवसांपासूनचा विचार होता. पण आज करूं, उद्यां करूं अशा चालढकलींतच पुष्कळ दिवस लोटले. उज्जयिनींत व त्याचप्रमाणें प्राचीन कालीं सुप्रसिद्ध असलेल्या अनेक नगरांमधून अनेक मौल्यवान् व ऐतिहासिक वस्तु मुबलक सांपडतात. परंतु त्यांना उजेडांत आणणें व त्यांपासून भारतवर्षाच्या आजच्या कालाला त्यांचा नीट उपयोग करून घेणें हें एक फार खटपटीचें, श्रमाचें व पुष्कळ वेळां पहिल्यानें निरुत्साहाचें काम आहे. पण तें आतां केलेंच पाहिजे, कारण त्यापासून सर्व तऱ्हेनें राष्ट्राचें पाऊल पुढें पडतें असा सर्व इतिहास-संशोधकांचा अनुभव आहे. पाटलीपुत्र, तक्षशिला, पहाडपुर, मोहेंजोदारो, हराप्पा वगैरे नगरांचें खोदकाम सुरू आहे त्यांमधून आतांपर्यंत प्राचीन इतिहासावर प्रकाश पाडणारे कितीतरी महत्त्वाचे शोध लागलेले आहेत. अयोध्या, काशी, भेलसा ( विदिशा ), उज्जयिनी, मांडवगड, विजयानगर वगैरे प्राचीन नगरें अद्याप कोणीहि हातीं घेतलेलीं नाहींत. तीं हातीं घेतल्यास सांपत्तिक दृष्ट्या कधींहि तोटा होणार नाहीं हेंहि राज्यकर्त्यांस कळतें. इटाली देशांत व्हेसूव्हियस या नांवाच्या ज्वालामुखी पर्वतानें हजारो वर्षांपूर्वीं बळी घेतलेलीं दोन शहरें हरक्युलेनियम आणि पॉम्पी हीं अलीकडे खोदतांना त्यांमधून इतालीच्या

सरकाराला यथेच्छ धनप्राप्ती झाली. लक्सार ( इजिप्त ) येथील प्राचीन टयुटेनखामेन राजाचें थडगें इंग्रजांस सांपडलें, त्यांतून अगणित धन त्यांनीं बाहेर काढलें. तक्षशिला नगरीचा शोध हिंदुस्थान सरकारास फायद्याचा झाला. पाटलीपुत्र नगरामधून ताता शेटजींना प्राचीन कालांतील सुवर्णभूमीची उत्कृष्ट कल्पना झाली. कार्थेज, रोम, बाबिलोन, निनव्हे इत्यादि प्राचीन परदेशी शहरें उकरतांना सांपडलेल्या वस्तूंमुळें प्राचीन कालांतील कला, इतिहास, भूगोल व वाङ्मय यासंबंधीं आपल्या माहितींत किती महत्वाची भर पडत चालली आहे हें सर्वांस ठाऊक आहेच. प्राचीन कालीं मुद्रणकलेचा शोध लागावयाचे पूर्वीं विद्येचें रक्षण करण्याची पद्धति खाल्डिया देशांत कशी असे हें अलीकडे खाल्डियन वेद कोरलेल्या ज्या विटा सांपडल्या आहेत त्यावरून चांगले लक्षांत येतें. मोहें जो दारो येथें खणीत असतांना प्राचीन कालीं शहराची रचना कशी असे, शहराबाहेर पाणी नेण्याची व सांडपाण्याची व्यवस्था कशी करीत तें पहावयास सांपडलें. मातीचीं चित्रें, दागिने, शस्त्रास्त्रें व कापड त्या कालीं कसें असे त्यासंबंधींही कल्पना आली. तुतानखामेनच्या थडग्याच्या भूयारांत शिरलेल्या संशोधकांस तर असें आढळून आलें कीं त्या राजाच्या कालांत देखील इजिप्त देश चांगला संपन्न व सुधारलेला असे. विटांवर कोरलेले बायबलचे कांहीं भागहि इजिप्तमध्यें सांपडले आहेत.

हिंदुस्थानांत आजमितीला प्राचीन इतिहास–संशोधनाचें महत्त्व फार आहे. ज्ञानाची वृद्धि होऊन भारतपुत्रांना आपल्या पूर्वजांसंबंधीं योग्य तो अभिमान तर उत्पन्न होईलच, पण केवळ आर्थिक दृष्टयाच विचार करण्याची ज्यांची प्रवृत्ति आहे त्यांना देखील या व्यापारांत कधींहि तोटा होणार नाहीं. पण लक्ष्यांत कोण घेतो ?


परंतु तें सर्व बाजूला ठेऊन आपण विक्रमाच्या उज्जयिनीचाच जरी विचार केला तरी उज्जयिनीच्या संशोधनांतहि पराकाष्ठेचा आनंद व्हावा असा तिचा इतिहास उज्वल आहे. "कालिदासाचा काळ ह्मणजे उज्जयिनी नगरीच्या ऐन भरभराटीचा काळ होय. त्या महाभाग्याचा परिमळ त्या थोर कवीच्या काव्यकुसुमांतून सर्वत्र दरवळला आहे. भाग्यशाली भरतखंड, अवंती नगरीचा पराक्रमी, दानशूर व रसिक राजा विक्रम व कालिदासासारखें देवी सरस्वतीचें दिव्य कंठाभरण, असा त्रिवेणी संगम जुळून आल्यावर वाग्विलासाला भर आल्यास व सर्व जगास दिपवून सोडणारी काव्यप्रभा फांकल्यास आश्चर्य तें काय? त्या वेळीं आपल्या आर्यभूस न्यूनता म्हणून कशाचीहि नव्हती. क्षात्रकर्म कुशल राजे, धाडसी व व्यवहारचतुर वणिज आणि स्वधर्मनिष्ठ, विद्यवान् व आचारसंपन्न ब्राह्मण हे एकदिलानें राहून तिच्या ऐश्वर्यांत एकसारखी भर घालीत होते. अशा काळांत व हिंदुस्थानचें उद्यान हें नांव ज्यास सार्थ शोभेल अशा मालव देशांत क्षिप्रा नदीचे कांठीं प्रस्तुत कवीचें वास्तव्य असल्यामुळें त्याच्या समग्र काव्यसृष्टींत एकंदरींत समाधान व संतोष नांदत आहे. जेथें सारसांचीं रोज सकाळीं मदकल कूजितें सुरू आहेत, जेथें कमलांतील सुगंधाशीं मैत्री केलेला क्षिप्रावात एखाद्या प्रियतमाप्रमाणें कामिनींशीं एकांतांत गोष्टी करीत आहे, जेथील बाजार रत्नांच्या राशींनीं इतके भरून गेले आहेत कीं, रत्नाकराजवळ उदकावांचून कांहींहि उरलेलें नाहीं व जें वैभवामुळें स्वर्गाचा एक कांतिमान् खंडच भासत आहे अशा उज्जयिनी नगरांत ज्यानें ऐन उमेदीचे दिवस घालविले व ज्याचा डोळ्यांस वैभवावांचून, कानांना कोमल व गोड शब्दांवांचून कांहीं माहीत नव्हतें अशा कवीच्या अंतःकरणास निराशेचे व उद्वेगाचे विचार कसे शिवणार?

वसंत ऋतूंत मनोहर व समृद्ध उद्यानांत इच्छेस येईल त्या फळाची रुचि चाखून तृप्त झालेला कोकिलपक्षी आम्रवृक्षाच्या झोके घेणाऱ्या खांदीवर बसून ज्या वृत्तीनें मधुर आलाप काढीत असतो, त्या वृत्तीची झांक कालिदासाच्या साऱ्या काव्यांत मारीत आहे.* त्या कवीचीं काव्यें व नाटकें फार थोडीं उपलब्ध आहेत. ऋतुसंहार, कुमारसंभव, मालविकाग्निमित्र श्रुतिकर्मवाद, सेतुबंध, रघुवंश, ज्योतिर्विदाभरण, मेघदूत, शाकुंतल, विक्रमोर्वशी वगैरे ग्रंथ लिहूनच हा महाकवी विराम पावता झाला, किंवा भास कवीचीं कांहीं नाटकें जशीं अगदीं अलीकडे सांपडलीं तशी कालिदासाचीहि कांहीं सांपडतील हे उज्जयिनीचें संशोधन पूर्णपणें केल्याखेरीज समजणें शक्य आहे काय? उज्जयिनी कांहीं शतकांपूर्वीं भूगर्भांत गडप झाली. त्यामुळें तिच्यामधील सर्व संपत्ती होती तेथेंच आजहि सांपडण्याचा पूर्ण संभव आहे. श्रीकृष्णाप्रमाणें ईश्वराचे अवतार; मच्छिन्द्रनाथ, भर्तृहरि यांच्याप्रमाणें योगी; विक्रमादित्य, भोज, यांच्यासारखे दानशूर नृपति, कालिदासासारखा महाकवि, वगैरे नवरत्नें ज्या उज्जयिनींत आपली आठवण कायमची ठेऊन गेली त्या अवंतिकेची पूर्वस्मृति किती हर्षदायी असावी! उज्जयिनी राजधानीचें महत्त्व किती मानीत असत, याबद्दलचे स्पष्ट उल्लेख प्राचीन वाङ्मयांत मधून मधून आढळतात. कालिदास हा तर उज्जयिनीमधील नगरवासी, तो आपल्या नगराची स्तुती करील यांत कांहीं नवल नाहीं पण शूद्रकराजकवीनें व भासकवीनें चारुदत्त व वसंतसेना यांची वर्णनें लिहितांना आपल्या गोष्टी उज्जयिनीस घडून आल्याचें लिहिलें आहे. संस्कृत भाषेंत गद्य रूपानें काव्य रचण्याचा नवा प्रकार ज्यानें निर्माण केला, जयदेव कवीनें ज्याला 'कविता वधूच्या हृदयांत वास करणारा पंचबाण

* कालिदासाची कविता—वा. कृ. भावे. (चित्रमय जगत् मार्च १९१९)



श्री. वासुदेव कृष्ण भावे, बी. ए.
केसरीचे संपादक, पुणें.



कालियादेह महाल—क्षिप्रा नदीच्या सहस्रधारा

( मदन ) च' असें ह्मटलें, धर्मदास कवीनें आपल्या ' विदग्धमुख-मंडन ' ग्रंथांतहि ज्याच्या वाणीची अशी खुबीदार स्तुती केली कीं

" रुचिरस्वरवर्ण–पदा रसभाववती जगन्मनो हरति ।
'तत्किं तरुणी ?' ' नहि नहि, वाणी बाणस्य मधुर शीलस्य" *

तो बाणकवी आपल्या ' कादंबरी ' मधील गंधर्व कुलोत्पन्न कादंबरीला उज्जयिनी नगरीच्या राजपुत्र चंद्रापीडाला देता झाला. कथा–सरित्सागरांत तर उज्जयिनी व तीमधील राजपुत्र व राजस्त्रिया यांचें पुष्कळच वर्णन आहे. असो.

तर, उज्जयिनीच्या विशाल क्षेत्रांत श्री व सरस्वती या दोघींचाहि वास आहे हें अगदीं उघडच आहे. पुढें लिहिलेली हकीकत वाचून संघशक्तीच्या जोरावर, मनःपूर्वक उद्योग आरंभिल्यास श्री महाकालेश्वराच्या कृपेनें, सिद्धी ही ठेवलेलीच आहे. लक्ष्मी आणि सरस्वती या दोन्ही देवता उज्जयिनीच्या भूगर्भांत फार वर्षें राहून कंटाळल्या आहेत. त्यांच्या मनांत पुनः पूर्वींप्रमाणें प्रगट व्हावें असें आहे. पण त्यांना रहाण्याला ही हल्लींची जागा योग्य आहे असें त्यांना वाटल्यास त्या राहतील. नाहींपेक्षां लक्ष्मी चंचल असल्यामुळें व सरस्वती तिची

---

* ही एक छेकापन्हुति ( श्लेषाचा एक प्रकार ) आहे. कोणी ह्मणतो " अहाहा ! तिच्या स्वराचें, वर्णाचें, व पदांचें सौंदर्य काय सांगावें ! रस व भाव हे तिच्या अंगीं खेळत असल्यामुळें ती सर्वांच्या मनांत अगदीं भरून जाते !" हें ऐकून दुसरा त्याला विचारतो. "कोणरे ही ? कोणी तरुणी काय ?' तो उत्तर करतो, " छे छे तरुणी नव्हे. हें वर्णन रसाळ जो बाणकवी त्याच्या वाणीचें मी केलें !" ' स्वर,' ' वर्ण,' ' पद,' ' रस,' ' भाव,' या पदांवर श्लेष आहे हें सांगणें नकोच. त्याचे दुहेरी अर्थहि उघडच आहेत.

**विष्णुशास्त्री चिपळुणकर.**

मैत्रीण असल्यामुळें दोघीहि पुनः गुप्त व्हावयाच्या. यासाठीं कनक-शृंगाच्या नागरिकांनों, विद्वान् व्हा. अवंतिकेच्या पौर जनांनों, स्वदेशाभिमानी व्हा. पद्मावतीच्या पुत्रांनों, धार्मिक व्हा. अमरावतीच्या रहिवाशांनों, तुमच्या नगरीचें नांव अमर ठेवा. कुशस्थलीनिवासी जनहो, कुशासनावर बसून निष्कामकर्मयोगी व्हा. उज्जयिनींत रहाणाऱ्यांनों, सदा विजय मिळवा. कुमुद्वती या नांवाचें सार्थक करून तुमची नगरी कमलांनीं व इतर फुलांनीं सुगंधित असो. विशाला हें नांव या नगरीचें होतें, त्याप्रमाणें पुढेंहि होईल अशी अविश्रांत खटपट करा. आणि इतकेंहि करून 'असो द्यावा धीर, सदा समाधान' ह्मणजे

'आहे नारायण, जवळीच.'

---

पुढें दिलेल्या कथानकांत पौराणिक, ऐतिहासिक, प्राचीन, अर्वाचीन, दंतकथात्मक व काल्पनिक अशा सर्व गोष्टींचा व स्थलांचा कथानकाच्या सोईसाठीं वाटेल तेथें व वाटेल तेवढा उपयोग करून घेतला आहे. शक्य तेथें आधार दिले आहेत. त्यांशिवाय कै. वुइलियम ली क्यू या ग्रंथकाराच्या 'टिकेनकोट ट्रेझर' या पुस्तकाचाही मनमुराद उपयोग करून घेतला आहे. गोष्टींतील सर्व पात्रें माझ्या कल्पनासृष्टींतील आहेत. त्यांपैकीं जी जी मंडळी कथानकांत उपयोगिली आहेत त्यांची शक्यतोंवर अगोदर परवानगी घेऊन मग त्यांचीं नांवें घातलीं आहेत, व त्यांपैकीं कांहीं सज्जन आजही उज्जयिनींत ईश्वराच्या कृपेनें विद्यमान आहेत. त्यांनीं आपल्या नांवांचा उपयोग करण्याची परवानगी दिली त्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

# विक्रमाच्या उज्जयिनींत !

## प्रकरण पहिलें

हरिः ॐ

**नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम् । ***
**देवीं सरस्वतीं व्यासं ततो जयमुदीरयेत् ॥**—महाभारत

उषःकाल झाला होता. क्षिप्रा नदीचें स्नान करून व नंतर श्री महाकालेश्वराचें दर्शन घेऊन, नारायणराव, गोपाळदादा व मी नदीच्या किनाऱ्यावरून कालिया देहाचा महाल पहाण्यासाठीं निघालों होतों. उज्जयिनी शहरापासून पायरस्त्यानें तो महाल पांच मैल आहे. तेथें जाऊन नऊ वाजावयाचे सुमारास आम्हांला शहरांत परत यावयाचें होतें. कारण नारायणरावांना रेलवेचें कांहीं जरूरीचें काम होतें व गोपाळ-दादांना व मला दवाखान्यांतलीं कामें होतीं. महालामधून क्षिप्रानदीचा सुंदर देखावा पाहून आम्हीं परत येत असतांना नारायणराव मला ह्मणाला कीं, "तात्या, बरी आठवण झाली. उदेपूरचा माझ्या ओळखीचा एक रजपूत जमीनदार हवा बदलण्याकरितां हल्लीं चितोडगडास येऊन राहिला आहे. त्याला मी तुझ्या संबंधानें कळविल्यावरून तूं एकदां त्याची प्रकृती पाहून औषध योजना करावी अशी त्याची इच्छा आहे. मला उद्यां कांहीं कामाकरितां अजमिरास जावयाचें आहे, तर तुम्हीं उद्यां तयारी करा म्हणजे आपण दोघेजण मिळून जाऊं." हा त्याचा

* नारायणाला, नरामध्यें उत्कृष्ट जो नर त्याला, सरस्वती देवीला आणि व्यासाला नमस्कार करून मग जय म्हणजे महाभारत म्हणण्यास सुरवात करावी. ( जय हें महाभारताचें प्राचीन नांव आहे. )

विचार आह्मांस पसंत पडला. गोपाळराव घरीं असल्यामुळें दवाखान्याची मला काळजी नव्हती, आणि अनायासानें प्रसिद्ध ऐतिहासिक किल्ला चितोडगड पाहण्याची संधी मिळाली, हा एक मला मोठा लाभच वाटला.

ठरल्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं नारायणराव व मी चितोडगडास जाण्यासाठीं निघालों. अमक्या वेळीं आह्मीं येतो अशी अगोदर तार दिली होती. ह्मणून स्टेशनावर आमच्यासाठीं जमीनदारांनीं गाडीची सोय करून ठेवली होती. योग्य वेळीं आम्हीं जमीनदार साहेबांच्या भेटीला गेलों. गडाच्या पायथ्याशीं असणाऱ्या चितोड गांवांत ते येऊन राहिले होते. हा गांव स्टेशनापासून दोन अडीच मैलांवर आहे तेथपर्यंत रस्ता साधारणच आहे. गांवाजवळच बेरच नदीवर एक फार जुना पूल आहे. स्वामिभक्तीकरितां जिनें आपला मुलगा, उदयसिंग राजपुत्राबद्दल बनबीराच्या तरवारीला बळी दिला, त्या पन्नादाईच्या सुप्रसिद्ध गोष्टींत याच नदीचा उल्लेख आहे. प्राचीन पद्धतीप्रमाणें गांवाला तट, वेशी वगैरे आहेत. परंतु हल्लीं त्यांचा उपयोग नसल्यामुळें त्या पडून झडून गेल्या आहेत. वेशींतून गांवांत शिरल्यावर तेथील देखावा पाहून प्राचीन काळच्या आमच्या पद्धतीचें दर्शन घडल्याप्रमाणें होऊन मला एकप्रकारचा आनंद झाला. बहुतेक प्रत्येक घरावर व दुकानावर रजपुतांनीं अलौकिक शौर्य गाजविलेल्या पूर्वकाळींच्या अनेक तुंबळ लढायांच्या प्रसंगांचीं चित्रें काढलेलीं दिसत होतीं. तीं पाहून राजस्थानाबद्दलचा माझा आदर जागृत झाला. जमीनदारसाहेबाचें घर गांवाच्या एका कडेला व किल्ल्याच्या मुख्य दरवाजाच्या पायथ्याशींच होतें. आमची गाडी थांबतांच दारावर असणाऱ्या चाकर माणसांनीं आंत जाऊन वर्दी दिली. आम्हीं खालीं उतरतांच तेथें दरवाजावर असलेल्या माणसांनीं आह्मांस ‘जयरामजी’ ह्मणून रामराम केला; बाहेर

आलेल्या गृहस्थानीं आह्मांस मोठ्या आदबीनें नमस्कार करून 'रावळजी' आमची आंत मार्गप्रतीक्षा करीत असल्याचें सांगितलें.

महाराष्ट्रांतल्या 'रावसाहेबां'प्रमाणें थोरामोठ्या गृहस्थांस 'रावळजी' 'रावतजी' वगैरे नांवानीं उल्लेख करण्याची चाल राजस्थानांत आहे. 'सज्जनसिंह' असें त्या जमीनदारांचें नांव असल्याबद्दल नारायणराव मजजवळ बोलले होते. त्यांची बैठकीची जागा घरांत ओटीवर होती, व समोरच देवघर होतें. देवघराचा रस्ता मोकळा ठेऊन बाकीच्या भागांत जाजम अंथरलेलें होतें व त्यावर गालीचे घातले होते. जागोजाग तक्के ठेविलेले होते. बैठकीच्या मुख्य ठिकाणीं गादी व लोढ होते. तक्के, गादी, लोढ, या सर्वांस पांढरे स्वच्छ अभ्रे घातलेले होते. खुंट्यावरून तलवारी, भाले, ढाली वगैरे आयुधें लटकत होतीं. कोनाड्यांतून कांहीं दप्तरें वगैरे होतीं. देवघराच्या दाराशीं दोन पाट होते. एकावर एक मोठें वाघाचें कातडें हांतरलेलें असून त्यावर एक ब्राह्मण उघडाच बसला होता. त्याच्या शेजारच्या पाटावर एक तुळसीदासकृत रामायणाची उघडी पोथी होती. आमच्या येण्यामुळें त्यानें आपलें पुराण थांबविल्यासारखें दिसत होतें. कारण वाऱ्यानें पोथीची पानें उडून जाऊं नयेत ह्मणून त्यानें आपल्या चष्म्याचें लांकडी घर त्यावर दडपण ठेविलें होतें. देवघरांत दोन समया होत्या. त्यामुळें स्वच्छ प्रकाश पडून देव्हाऱ्यांत राधाकृष्णाच्या सुंदर मूर्ति होत्या त्या फारच खुलून दिसत होत्या. ओटीचे भिंतीवर ऐतिहासिक व पौराणिक चित्रें काढलेलीं होतीं, व पटईस कांहीं हंड्या टांगलेल्या होत्या. भिंतीच्या वरच्या बाजूस पुष्कळ तसबिरा लावल्या होत्या, व त्या सर्व जुन्या पद्धतीच्या चित्रकारांनीं काढलेल्या ऐतिहासिक व पौराणिक कथाभागांच्या व स्त्रीपुरुषांच्या होत्या. राणा प्रतापसिंह, कुंभराणा, राणा राजसिंह व रूपमतीराणी, राणी मीराबाई वगैरे राजा-

राण्यांच्या तसबिरा तेथें मला पाहावयास सांपडल्या. तुळसीदास, रामवनवास, श्रीकृष्णयशोदा वगैरे चित्रेंहि लाविलीं होती.

नारायणराव व मी ओटीवर येण्यापूर्वींच सज्जनसिंह गादीवरून उठून आमचे स्वागत करण्याकरितां दारापर्यंत पुढें आले होते. आजकालचे रजपुत लोक व त्यांचे पेहेराव मी पुष्कळवेळां पाहिलेले आहेत त्यामुळें सज्जनसिंहांस पहाण्यापूर्वीं त्यांचेबद्दल माझे मनांत बहुमान वाटत नव्हता, पण त्यांस पहातांक्षणींच माझी पूर्वीची वृत्ती बदलली. त्यांनीं आह्मां उभयतांस नम्रपणें नमस्कार केला व मोठ्या सत्कारानें आम्हांस आंत नेऊन लोढाशीं बसविले व आपण खालीं गालिच्यावर बसले. त्यांचा पोषाख पांढरा शुभ्र होता, सदरा, पागोटें व नेसतें धोतर इतकेच कपडे त्या वेळीं त्यांचे अंगावर होते. त्यांचा बांधा उंच, शरीर तेजःपुंज व चेहरा भव्य होता. कपाळ प्रशस्त होतें. त्याचें वय ७०–७५ च्या घरांत होतें, केंस पांढरे झाले होते, तथापि दांत बहुतेक सर्व शाबूत असून आवाज खणखणीत होता. व अंगकाठी बिलकुल लवलेली नव्हती. नाहीं म्हणावयाला डोळ्याची चमक मात्र कमी पडलेली दिसत होती, कारण त्यांनीं चष्मा लावलेला होता. उदेपूरच्या दरबारांत त्यांनीं अधिकार चांगला गाजविला होता ही गोष्ट त्यांच्या मुद्रेवरून व बोलण्यावरून स्पष्ट दिसून येत होती. त्यांचे समोर आम्ही बसलों असतां त्यांविषयीं माझ्या मनांत एकदम पूज्यबुद्धि उत्पन्न झाली व नारायणरावांच्या ओळखीमुळें या गृहस्थाची व आपली भेट झाली याबद्दल मला मोठा आनंद झाला. आतां भाषणास सुरवात कशी करावी याचा मला मोठा विचार पडला. इतक्यांत रावळजीच नारायणरावाकडे पाहून ह्मणाले—" पंडितजी, तुमची आमची बरेच दिवसांनीं भेट झाली. डॉक्टरसाहेबांची व आमची ही पहिलीच भेट आहे.

यांना आपण येथें घेऊन आलां व हेही आमच्या विनंतीला मान देऊन इतक्या दूरवर आले याबद्दल मी आपणा उभयतांचा फार आभारी आहे."

याप्रमाणें गोड शब्दांनीं आमचें स्वागत झाल्यावर आह्मीं इकडच्या तिकडच्या कांहीं गोष्टी बोलत बसलों होतों. नंतर आम्ही स्नानभोजनादिक कर्में आटोपून पुन्हां रावळजींच्यापाशीं ओटीवर येऊन बसलों. त्यावेळीं सूर्य अस्ताला जाण्याच्या बेतांत होता. रावळजी नदीवर जाण्याच्या विचारांत होते व त्यांनीं आम्हांसहि 'येतां का?' ह्मणून विचारिलें. आह्मी 'हो' ह्मणून लागलीच त्यांचेबरोबर नदीवर गेलों. लहानपणीं मराठी चवथ्या पुस्तकांत वाचलेल्या गोष्टींतील ती नदी, आज प्रत्यक्ष आमच्या समोर होती. ती नदी, तो चितोडचा गांव व त्यापेक्षां वयानें व कीर्तीनें लक्षावधीपट प्रचंड असलेला तो चितोडगडचा किल्ला पाहून त्या पन्नादाईचीच गोष्ट मला आठवली असें नव्हे तर सबंध राजस्थानचा इतिहास माझ्या डोळ्यांपुढें उभा राहिला. क्षणमात्र मीं, नारायणराव, रावळजी व त्यांचे जे आश्रित बरोबर आले होते त्यांस विसरून चितोडगडच्या पूर्ववैभवाचा नायनाट झाल्याबद्दल दु:खाकुल झालों, व नंतर क्षणभरानें किल्ल्याकडे पाहून दीर्घ उसासा टाकून, कपडे काढून, हातपाय धुवून, संध्येला बसलों. पावसाळा नुकताच संपल्यामुळें नदीला पाणी पुष्कळ होतें. आम्ही दोघांनींहि संध्या, वंदन वगैरे केलें. अलीकडच्या चालीप्रमाणें इंग्रजी आचार प्रगट केले नाहींत याबद्दल सज्जनसिंहास मोठें समाधान वाटलें.


अंधार पडत चालला; चंद्र नुकताच उगवूं लागला होता; थंड वारें सुटलें होतें, अशा वेळीं आह्मी घरीं परत जावयास निघालों. आमच्यापुढें कंदील घेऊन एक शिपाई चालला होता. रावळजी, नारायणराव व मी त्याचेमागें होतों व आमच्या मागून रावळजीचे आश्रित

व इतर मंडळी होती. रावळजीबद्दल गांवांत पुष्कळच पूज्यभाव होता असें दिसलें. कारण ते समोर दिसतांच, दुकानांतले व रस्त्यावरचे लोक उभे राहून त्यांस 'जय रामजीकी' करीत असत. घराच्या रस्त्यावरील तीन देवळांत जाऊन रावळजींनीं व आम्ही देवांचें दर्शन घेतलें व नंतर आह्मीं घरीं आलों. रावळजी रात्रीं भोजन करीत नसत. रोज रात्रीं देवाजवळ बसून ते भजन करीत, व नंतर आराम करीत. त्यांना कुटुंबपाश मुळींच नव्हता ह्मटलें तरी चालेल. कुटुंब वारल्यास बरींच वर्षें झालीं होतीं. त्यांस फक्त दोन अपत्यें होतीं. एक मुलगी, ती उदेपुरास महाराण्याच्या एका नातलगास दिली असून चांगली ऐश्वर्यांत व सुखांत होती; व एक मुलगा, तरुण, धिप्पाड व खऱ्या क्षात्रवृत्तीचा असल्यामुळें युरोपखंडांतील महायुद्धांत रजपुतांच्या एका पलटणीवरचा अंमलदार ह्मणून गेला होता. युद्धावर जाण्याचे पूर्वीं दोन वर्षें त्याचें लग्न झालें असून त्याची पत्नी हल्लीं आपल्या माहेरीं असे. सज्जनसिंहास, लढाईवर गेल्यापासून मुलाचें फक्त एकच पत्र आलें होतें, पण त्यानंतर पत्रहि नाहीं व मुलाबद्दल कांहीं शुभाशुभ वार्ताहि त्यांस कळली नव्हती त्यामुळें त्यांची पूर्वींची आनंदीवृत्ति मावळली होती, चिंतेनें व काळजीनें डोळ्याची चमक कमी झाली होती, व ते प्रत्येक गोष्टीबद्दल उदासीन असत. रात्रीं हांतरुणावर पडल्यावर त्यांनीं आह्मांस या सर्व गोष्टी सांगितल्या. मेवाडच्या इतिहासांत, उदेपूरच्या राज्यासाठीं त्यांच्या पूर्वजांनीं आपले देह खर्चीं घातले त्याबद्दल त्यांस फार अभिमान वाटे आणि तो वंश, मुलाचें जर कांहीं बरेंवाईट झालें तर नामशेष होईल याबद्दल त्यांस फार खेद होई. त्यांच्या घराण्याचा एक विशेष असा होता कीं त्यांच्या घराण्याच्या पूर्वजांपासून सज्जनसिंहाच्या पुत्रापर्यंत—प्रतापसिंहापर्यंत—एकूणएक पुरुष औरस होते. दत्तक

कोणी ही नव्हता. आपल्या इतक्या उतार वयांत, आपला एकुलता एक जवान मुलगा, देशांतरावर, परक्याच्या लढाया लढण्यास जाणार व वेळ ही अशी कीं परत येण्याची त्याची आशा, आहे आहे आणि नाहीं नाहीं अशा प्रकारची ! पण सज्जनसिंहजींनीं त्याच्या जाण्यास मुळींच मोडता घातला नाहीं. रजपुतांचें अस्सल रक्त तें. लढाईच्या प्रसंगीं त्याला स्फुरण चढावयाचेंच. त्याची तरवार म्यानाच्या बाहेर पडावयाचीच !
"**तारा की जोतमें चंदर छुपे नहि, सूर्य छुपे नहिं बादल छायो, । रण चहड्यो रजपूत छुपे नहिं दाता छुप नहिं मंगण आयो**" ॥
असें गंग कवी ह्मणतो, तें यथार्थ आहे.

प्रतापसिंहाच्या विरहामुळें त्यांस चैन पडेना म्हणून ते मन रिझविण्यासाठीं तीर्थयात्रा करूं लागले. ते फिरतां फिरतां पुष्कर क्षेत्रास जाण्यासाठीं अजमिरास आले. तेथें कर्मधर्मसंयोगानें नारायणरावांची व त्यांची ओळख झाली व त्या ओळखीचें पुढें स्नेहांत रूपांतर झालें; आणि ह्मणून नारायणरावांनीं माझ्याबद्दल त्यांच्यापाशीं चर्चा करितांच त्यांनीं मला प्रकृति पहाण्याच्या निमित्तानें आमंत्रण केलें. चितोडगडावर झालेल्या अनेक लढायांत त्यांच्या पूर्वजांचा प्रत्यक्ष संबंध होता. उदेपूरच्या राजघराण्याशीं त्यांचें दूरचें नातें होतें व खास गडावर त्यांचा एक वाडा असे. त्यांच्या घराण्यांतल्या एका कन्येला राजपत्नी होण्याचा मान लाभला होता व ती नंतर राजमाताहि होणार होती, पण दुर्दैवाच्या पराकाष्ठेमुळें तिला व तिच्या एकुलत्या एका मुलाला वनवास भोगावा लागला व मुलाला तर देशत्याग करावा लागला. पुढें तो राजपुत्र उज्जयिनीस गेला. वाटेंत त्यास अनेक अडचणी आल्या पण ईश्वराच्या कृपेनें त्याच्या मनांतील सर्व कामना पूर्ण होऊन तो उज्जयिनीस सुखरूप पोंचला. त्या आनंदाच्या स्मरणार्थ त्यानें तेथें एक ‘ मनकामनेश्वराचें ’ मंदिर स्थापन करून त्याच्या नित्य पूजेअर्चे-

साठीं उत्कृष्ठ व्यवस्था करून ठेविली होती, व ती सर्व, तपशीलवार, कागदोपत्रीं लिहून ठेविली होती. त्या राजपुत्राचें देहावसान झाल्यावर त्याचें कांहीं सामानसुमान गडावर आलें होतें व तें योग्य रीतीनें ठेविलेलें होतें. परंतु मध्यंतरींच्या अंदाधुंदीच्या काळांत पेंढाऱ्यांनीं व इतर लुटारूंनीं चितोडगडावर हल्ला करून फार नासधूस केली. त्यामुळें अनेक महत्त्वाचे कागदपत्र व मौल्यवान पदार्थ लुटले व जळले गेले. त्या धांदलींत मनकामनेश्वराच्या व्यवस्थेचे कागदपत्र कोणीकडे नाहींसे झाले ते झाले. त्यांचा पुन्हां कांहींच पत्ता लागला नाहीं. सज्जनसिंहानीं ही सर्व हकीगत सांगून चितोडचा प्राचीन इतिहास आह्मांस सांगितला तो अत्यंत मनोवेधक व बोधप्रद आहे. तो ऐकून गड पहावयाची माझी इच्छा शतगुणित झाली. रावळजींनीं दुसरे दिवशीं सकाळीं आह्मांबरोबर येऊन गड दाखविण्याची आपली तयारी दर्शविली. त्या एकंदर आनंदाच्या विचारांत मला केव्हां झोंप लागली तें समजलें सुद्धां नाहीं. सकाळीं पहातों तो सूर्याची किरणें मला उठविण्यासाठीं, खिडकींतून येऊन माझ्या पलंगावर उभीं !



## प्रकरण दुसरें

# प्रसिद्ध किल्ला चितोडगड

**काळाच्या घोर फेरीं मवसुनि तुझि गे काय झाली दशा ही?**
**किंवा नाहीं दया ज्या असशिल असले देखिले भूप कांहीं।**
**प्रासादा भूषवूनी असशिल दिधली दिव्य शोभा तयाला।**
**हा हा! गेले तुझे ते सकल दिवस ही वैभवाचे लयाला॥**

सौ० इंदुमती राजवाडे.

हनुमान दरवाजावरील हनुमानाला नमस्कार करून जे आम्हीं गडावर जाण्याला निघालों ते सूर्य दरवाजापर्यंत आम्हांला सात दरवाजे ओलांडावे लागले. सज्जनसिंहांचा मूळ पुरुष सूर्यसिंह [ सूरजसिंह ] ह्मणून होता तो या दरवाजांत मारला गेला, तेव्हांपासून या दरवाजाला सूर्यदरवाजा असें नांव पडलें. दरवाजाच्या दोन्ही बाजूंच्या बुरुजांवर शेंकडों चित्रें—कोरलेल्या दगडांचीं आहेत, पण काय? सर्व अगदीं छिन्नविछिन्न. जो शत्रू गडावर येई त्याचें पहिलें काम म्हणजे विध्वंस करावयाचा. मंदिरें, राजवाडे, महाल, घरें, भूयारें, एकना, दोन! जितकें ह्मणून गडावर दृष्टीला बरेंसें दिसलें तितक्या सर्वांचें वाटोळें झालें ह्मणजेच खरा जय मिळाला, अशी भावनाच त्यांची! लाखा राण्याचा दरबारमहाल, राजमहाल, भीमसिंह आणि पद्मिनी यांचें महाल वगैरे सर्व महालांचें सौंदर्य आतां फक्त कल्पनेनेंच मनांत आणून आनंद मानावा. राणी—प्रसिद्ध साध्वी—**मीराबाई**—इनें बांधलेलें **श्रीकृष्णाचें मंदिर** मोठें भव्य व प्रशस्त आहे. मंदिरांत चित्रें कोरलेलीं आहेत, पण आतां तीं सगळीं छिन्नविछिन्न झालेलीं आहेत. श्रीकृष्णाचें दर्शन घेऊन आम्हीं कुंभ राण्याच्या विजयस्तंभाकडे गेलों. जमिनीपासून सुमारें दोन पुरुष उंच असा चहुथरा असून त्यावर दहा मजले उंच असा हा

प्रचंड स्तंभ आहे ! वर जाण्याला प्रशस्त नागमोडी रस्ता आहेत व चारी बाजूनीं खिडक्या आहेत. त्यामुळें जिन्यांत भरपूर उजेड असतो. नऊ मजलेपर्यंत प्रशस्त जिना असून दहावा मजला चढावयाला शिडी लावलेली आहे. नवव्या मजल्याला सज्जा आहे, तेथें संगमरवरी दगडांचे हत्ती कोरलेले खांब आहेत. दहावा मजला चारी बाजूंनीं अगदीं उघडा आहे. पश्चिमेकडच्या दोन खांबांना टेंकून दोन मोठे शिलालेख आहेत; त्यांवर संवत् १४९६ ( इ. स. १४४० ) मध्यें कुंभराण्यानें गुजराथ व माळवा येथील शत्रूंवर जो विजय मिळविला त्यासंबंधीं मेवाडी भाषेमध्यें कांहीं लिहिलें आहे. या मजल्यावरून चारी बाजूस लांबवर प्रदेश चांगला दिसतो व खालीं तळाकडे पाहिलें असतां डोळे अगदीं फिरून जातात !

आम्ही स्तंभावरून उतरून लाखाराण्यानें बांधलेल्या विश्वकर्म्याच्या मंदिराकडे वळलों. रस्ता अगदीं खडकाळ आहे व मंदिर बरेंच खोलांत आहे. देवळाच्या उत्तरेस दोन मोठमोठालीं कुंडें आहेत. या कुंडांस ( सासबऊ ) सास्वा सुनांचीं कुंडें ह्मणतात. पण या कोण होत्या कोण जाणे ! मंदिराच्या आसपास झाडी खूप दाट आहे. मोरांचा नाच आम्ही तेथें पाहिला. वानरांचे थव्यांच्या थवे या झाडावरून त्या झाडावर उड्या मारीत होते त्यांनीं आमची मोठी करमणूक केली. झाडींतून जात असतां हरएक प्रकारच्या हिंस्र व सौम्य पशूंची पावलें—जमीनीवर उमटलेलीं, व लेंड्या पडलेल्या आम्ही पाहिल्या. कित्येक ठिकाणीं गवत उंच वाढून माजलेलें होतें, त्यांतून रानडुकरांच्या टोळ्या व क्वचित् चित्ते, प्रवाशांच्या दृष्टीस वारंवार पडतात असें आह्मांस समजलें. पालवीनीं सर्व झाडें पूर्णपणें आच्छादिलेलीं होतीं, व सृष्टीसुंदरीचा हिरवागार पेहेराव मोठा नयनमनोहर होता.

मंदिरांत शिरतांच ब्रह्मदेवाची ध्यानस्थ मूर्ति दृष्टीस पडते तिचें दर्शन घेऊन नारायणराव व मीं बाहेरच्या कुंडांत यथेच्छ पोहलों. नंतर दर्यामहाल, नगरदेवीचें मंदिर, भीमसिंग आणि पद्मिनी यांचे महाल, रत्नमंदिर वगैरे पुष्कळ स्थळें आम्ही पाहिलीं. चितोडगडावरील जोहार ज्या ठिकाणीं झाले ती जागा पहावयाची आह्मांस फार उत्कंठा होती, ह्मणून, इतर अप्रसिद्ध व जीर्ण स्थळें आह्मी पहावयाच्या नादाला न लागतां त्या रस्त्याला लागलों. आह्मांला जिकडे पहावें तिकडे मोठ-मोठ्या भग्न झालेल्या इमारती, लहानमोठे पडलेले जयस्तंभ वगैरे दिसत होते. या इमारती बांधून किती काळ लोटला, कोणत्या जयांचे हे स्तंभ स्मारक होते वगैरे बातमी आतां त्या विस्मृती–देवीलाच ठाऊक! कवी माधवानुज ह्मणतात—

**मातें भव्य अशी इमारत पुढें विच्छिन्न झाली दिसे।**
**कोणाच्या करण्या चिरंतन यशा ही बांधियेली असे?।**
**'काला' प्रश्न विचारिला; मज परी देतां न तो उत्तरा।**
**गेला पंख उभारुनी उडुनिया व्योमीं करोनी त्वरा!॥ १ ॥**
**व्हावें स्मारक हें ह्मणोनि कवणें प्रासाद हा बांधिला?।**
**केला प्रश्न असा मियां फिरुनियां देखोनिया 'कीर्तिला'।**
**माझा प्रश्न तिनें जसा परिसिला, दुःखीं बुडाली सती,।**
**वेगें विश्वसुनी बघे, निजमनीं लाजूनि, ती, खालती॥ २ ॥**
**गेलों चालत मी तसाच पुढतीं, तों देखिली 'विस्मृती'।**
**प्रासादावर ती दिसे विहरतां स्वच्छंद गर्वांत ती;।**
**केला प्रश्न तिला परी मज करी ती सत्वरी उत्तरा।**
**'पूर्वीं बांधियला कुणास्तव असो–तो आज माझा खरा॥ ३ ॥**

उदेपुरच्या–किंबहुना हिंदुस्थानच्या–इतिहासांत सुप्रसिद्ध असा हा अजस्र व दुर्भेद्य किल्ला आहे ही गोष्ट इतिहासज्ञांस ठाऊकच आहे. पण

अशा ठिकाणीं प्रत्येक वेळेला शत्रूला जो जय मिळाला त्याचें कारण कित्येक वेळां रजपुतांकडील लोकांनीं, मानाच्या आणि धनाच्या लालुचीनें केलेला विश्वासघात होय. त्या ठिकाणचा देखावा हिंदुस्थानांतील पूर्वींचें वैभव, शौर्य, पराक्रम, क्षात्रतेज यांचें मूर्तिमंत चित्र डोळ्यांपुढें उभें करितो. पण तत्क्षणींच, असल्या बहुमोल सद्गुणांची विश्वासघात व कलह यांनीं कशी राखरांगोळी होते याचाहि प्रत्यय मनाला येतो.

सज्जनसिंहाबरोबर आम्हीं जोहाराच्या गुहेकडे जाण्यास निघालों. गडावर आतां वस्ती अशी फारच थोडी असून बहुतेक ठिकाणीं रान माजलेलें आहे. खैरांची झाडी अतोनात आहे. शिशवी, वड, पिंपळ, चिंच, आंबा, जांभूळ, वगैरे मोठमोठ्या गगनचुंबित वृक्षांची कित्येक ठिकाणीं गर्द झाडी आहे. दिवसा पक्ष्यांच्या मंजुळ किलबिलाटानें व वाऱ्याच्या नादानें व रात्रीं वन्य पशूंच्या किंकाळ्यांनीं चितोडगडावरचा तो निर्जन प्रदेश आतां अगदीं गजबजून जातो ! ठिकठिकाणीं जलसंचयांच्या जागीं नानाप्रकारचे चित्रविचित्र रंगांचे पक्षी पाण्यासाठीं आलेले आढळतात. पुष्कळ प्रकारचे पोपट आम्हीं तेथें पाहिले. कित्येकांचा रंग इंद्रधनुष्याप्रमाणें, कित्येक पांढरे, निळे, लाल, व कित्येक हिरवेगार दिसत होते. कित्येकांच्या चोंची आरक्तवर्ण तर कित्येकांच्या काळ्या व पिंवळ्या होत्या. जलविहार करणाऱ्या त्या स्वातंत्र्यभक्तांना पाहून आम्हांला मोठा आनंद होई. सर्व जलाशयांचें पाणी स्फटिकाप्रमाणें स्वच्छ व अमृताप्रमाणें मधुर असून थंडगार होतें. अशा त्या सुंदर वनश्रीकडे पहात पहात जात असतांना एकदांचे आम्हीं जोहारच्या त्या गुहेकडे आलों. रजपुतांनीं येथें तीन वेळां जोहार केल्याचें इतिहास सांगतो. जय मिळण्याची आशा नाहीं असें दिसल्यावर, आपल्या मागें आपलीं अनाथ वायकामुलें यांचीं शत्रूंनीं

विटंबना करूं नये ह्मणून त्यांस ते अग्निनारायणाचे स्वाधीन करीत असत व या विधीस 'जोहार' असें ह्मणत असत. पहिला जोहार इ. सन १२९० मध्यें झाला. या वर्षीं अल्लाउद्दीन खिलजी यानें चितोडावर स्वारी केली. त्याप्रसंगीं जिच्यामुळें हें अरिष्ट आलें ती सौंदर्यखाणी पद्मिनी १०००-१५०० इतर स्त्रियांसह दग्ध होऊन गेली! दुसरा जोहार इ. स. १५३५ मध्यें झाला. चितोडास त्यावेळीं विक्रमादित्य नांवाचा राणा होता. गुजराथच्या बादशहानें राण्याचा पराभव केला, त्यामुळें राजमाता राणी कर्णावती इनें १३००० इतर स्त्रियांबरोबर अग्निकाष्ठें भक्षण केलीं! तिसरा आणि शेवटचा जोहार इ. स. १५६८ ( विक्रम सं. १६२४ ) या वर्षीं झाला. अकबरानें चितोडावर स्वारी करून पन्नादाईनें वांचविलेल्या उदेसिंग राण्यास जिंकिलें व किल्ला आपल्या हस्तगत केला आणि म्हणून रजपुत स्त्रियांस जोहार करणें प्राप्त झालें. सज्जनसिंहाच्या पूर्वजांच्या मालकीचा चितोडगडावरचा वाडा याप्रसंगीं लुटला गेला, इतकेंच नव्हे तर अकबरानें किल्ल्यांत शिरल्यावर सुमारें ३०००० लोकांची कत्तल केली. त्यामध्यें सज्जनसिंहाचें पूर्वज कामास आले. अकबरानें बहुतेक सर्व महाल, वाडे, मंदिरें जमीनदोस्त करून तेथील बहुमोल सामानाची लूट केली. नगरदेवीच्या देवळांतील दागिने दरवाजे, नगारे, नौबदी, दिवे वगैरे सर्व आग्र्यास व अजमिरास नेले, आणि देवीच्या प्रतिमेचें चूर्ण केलें. गुहेच्या दाराशीं शेंदूर फांसलेले कांहीं दगड आहेत. त्यांपुढें एक ओटा असून त्यावर पुष्कळ बांगड्या व करवंट्या पडलेल्या असतात. सज्जनसिंहानीं आम्हांस असें सांगितलें कीं, पातिव्रत्य-रक्षणाच्या इच्छेनें केलेल्या या जोहारामुळें वीरमाता व वीरपत्नींच्या अस्थीनीं पवित्र झालेली ही गुहा नवसाला पावते असें मेवाडचे सर्व

लोक समजतात. गुहेंत काळोख असतो व पिशाच्चांची तेथें वस्ती आहे या समजुतीनें गुहेंत जाण्यास सहसा कोणी धजत नाहीं. गुहेच्या पुढल्या ओट्यावर बसून आम्हीं सज्जनसिंहाच्या त्या ऐतिहासिक कथा ऐकल्या. त्या गुहेचें तें चमत्कारिक वर्णन ऐकून गुहेंत जाऊन आतां आंत काय दिसतें तें पहावें अशी मला इच्छा झाली. पिशाच्चांची भीती काल्पनिकच होती. एखादा वन्यपशु अगर सर्प वगैरे असण्याचा संभव आहे असें मला वाटलें. पण गुहा पाहण्याची उत्कंठा जास्त असल्यानें मी त्या विचारांकडे कानाडोळा करून दंडधाऱ्याला आपला विचार कळविला. धाडसाच्या कामीं नारायणरावाचा पहिला पाय. तो लागलाच कबूल झाला, पण सज्जनसिंहास विचारतां त्यांचा या गोष्टीस रुकार पडेना. भूतपिशाच्चादिकांवर त्यांची श्रद्धा असे त्यामुळें त्यांना आमची ही कल्पना आवडली नाहीं असें दिसलें. नारायणरावहि त्यांना कशाला दुखवा असें ह्मणण्याच्या विचारांत दिसला, पण आजची ही अमूल्य संधी आणूं ह्मटलें तरी पुनः कधींहि येणार नाहीं असें जाणून 'मी एकटाच जाऊन आंत काय आहे तें पाहून येतो' असें जरा विनयानें पण स्पष्टच सज्जनसिंहास ह्मटलें. सज्जनसिंह खरोखरच सज्जनसिंह होते. त्यांनीं माझा हेतू ओळखला व आपली अनिच्छा बाजूस ठेवून केवळ माझ्यासाठीं आमच्याबरोबर येण्यास ते कबूल झाले ! त्यांचें तें थोर मन पाहून मीं क्षणभर ओशाळा झालों. त्यांनीं माझ्याबरोबर गुहेंत येऊन आपला जीव धोक्यांत घालावा अशी माझी बिलकुल इच्छा नव्हती. मी व नारायणरावानीं त्यांची नीटपणें समजूत घालून त्यांस गुहेबाहेरच्या ओट्यावर बसवून आम्हीं दोघे गुहेंत जाण्यास सिद्ध झालों.

ही गुहा पूर्वाभिमुख आहे. त्यामुळें दोन प्रहरापर्यंत सूर्याचा प्रकाश आंत बऱ्याच लांबपर्यंत जातो. मनाचा पूर्ण निश्चय करून

व ईश्वराचें स्मरण करून आम्हीं आंत तर घुसलों. गुहेंत जरी विशेष अंधेर नव्हता, तरी पाकोळ्यांच्या घाणीनें आणि कोंदट हवेनें आंत जाण्यास उत्साह वाटला नाहीं. हजारों स्त्रियांनीं एकेवेळीं जेथें अग्निप्रवेश केला ती गुहा आंतून खूपच प्रशस्त होती यांत आह्मांस मुळींच संशय वाटला नाहीं. तथापि आम्हीं ज्या ठिकाणाहून जात होतों ती जागा संकुचित होती. वाटेंत जेथें तेथें खडक, माती, जीर्ण व पिचलेल्या हाडकांचे तुकडे दिसत होते. नारायणराव आपली विडी फुंकत फुंकत हातांतली काठी हांपटत पुढें चालला होता व त्याचे मागोमाग मीं होतों. पुढें काय होतें तें त्यास दिसलें नाहीं ह्मणा अगर विडीच्या धांदलींत त्याचें लक्ष गेलें नाहीं ह्मणा; जातां-जातां रस्त्यावरच कशालासा पाय अडखडून दंडधारी पडले. मीं लागलीच त्यास हात दिला आणि पहातों तों रस्त्यावर जुन्या गंजलेल्या शस्त्रांचा ढीग पडलेला आढळला. शिरस्त्राणें, चिलखतें, भाल्यांचे फाळ, तरवारी, बरच्या वगैरे शस्त्रें गंज खाऊन निरुपयोगी होऊन पडलेलीं होतीं. त्यांचे पलीकडे कांहीं हाडांचे सांपळेहि पडलेले होते व एके ठिकाणीं डोक्याच्या कवटीपासून पायांच्या हाडापर्यंतचीं सर्व पिचून गेलेलीं हाडें होतीं!

येथपासून पुढें गुहा प्रशस्त दिसूं लागली. डोंगरांतून कांहीं ठिकाणीं झरोके व छिद्रें होतीं त्यांतून सूर्यकिरणांचा मंद प्रकाश आंत पडून चहूंकडे उदासीन व भयाण देखावा दिसत होता. मातीचे ढीग, अर्धवट माती झालेल्या अस्थींचे लहान मोठे तुकडे, जुनीं पुराणीं शस्त्रें, तांब्याचीं व चांदीचीं कांहीं मातींत मिसळून हिरवीगार झालेलीं नाणीं, चोहोंकडे आढळत असत. तो सर्व प्रकार पाहून मला आनंद झाला, दुःख झालें किंवा काय झालें तें नीट सांगतां येत नाहीं.

आरबी भाषेंतील सुरस व चमत्कारिक गोष्टी मीं वाचल्या होत्या त्यांतील प्रसंगांची मात्र मला त्या वेळीं आठवण झाली. आम्हीं तसेच पुढें चाललों. गुहा संपून आम्हीं आलों त्याच वाटेनें परतावयाचें किंवा दुसरी एखादी वाट पुढें आहे हें आह्मांस पहावयाचें होतें. राखेच्या मातीच्या ढिगांतून आम्हीं पुढें जातां जातां आह्मांस दोन वाटा फुटलेल्या आढळल्या. दोन्ही रस्त्यांकडे जाऊन पहावें असें ठरून आम्हीं एकीकडच्या वाटेनें निघालों; दहावीस पावलें आम्हीं गेलो न गेलों तोंच रस्त्यावर मजबूत दोन पेट्या एकावर एक ठेवलेल्या दिसल्या. 'खजीना रे खजीना' असें म्हणत नारायणराव पेट्यांकडे धांवत गेले, पण काय ! दोन्हीं पेट्यांना लोखंडी मजबूत जुन्या तऱ्हेचीं कुलुपें होतीं. पेट्या पाहून झालेला आमचा आनंद तीं कुलुपें पहातांच मावळला; तथापि आंतल्या मोहरांची आशा कशी सुटते ? आम्हीं धडपड करून वरची पेटी जमीनीवर तर पाडली. कुलुपाबरोबर पुष्कळ धडपड केली पण ऊं हुं: ! शेवटीं एक युक्ति सुचली. जुन्या गंजलेल्या तलवारी पहिल्यानें आह्मांस दिसल्या होत्या, त्यांपैकीं कांहीं आम्हीं आणल्या, व त्या पेटी व झांकण यांमध्यें घालून झांकण तोडण्यास आरंभ केला. आम्हीं दोघांनींहि जेव्हां आपली सर्व शक्ति खर्च केली तेव्हां एकदां तें झांकण मोडलें. आम्हीं मोठ्या उत्सुकतेनें पेटींत पाहिलें, तों काय ? कांहीं जुन्या पोथ्या बांधलेलें एक दप्तर व एक कागदांवर उठवावयाची शिक्क्याची मोहोर येवढें सामान आंतून निघालें. त्या मोहोरेवर मेवाडीभाषेंत कांहीं मजकूर होता.

त्या वस्तु इतक्या बंदोबस्तानें ठेविलेल्या होत्या त्या अर्थीं एका काळीं त्या कोणाच्या तरी महत्त्वाच्या जिनसा असाव्यात हें स्पष्टच होतें. परंतु आमच्या दृष्टीनें त्यांस कांहींच महत्त्व नव्हतें. ह्मणून त्या एकीकडे ठेवून आम्हीं दुसऱ्या पेटीचेंहि झांकण मोडलें आणि

पहातों तों एका जाड गझनीच्या रुमालांत कांहीं कागद बांधून ठेवलेले दिसले. ते पाहून आमची थोडी निराशा झाली. तथापि आह्मांस सांपडलेलें तें सर्व सामान बरोबर घेऊन आम्हीं निघालों व पेट्या ठेविल्या होत्या त्या जाग्याचे पलीकडे गेलों. तेथें अंधेर होता ह्मणून नारायणरावांनीं काड्या ओढून चोंहोकडे पाहिलें. पण तेथें आह्मांस कांहीं दिसलें नाहीं. तेथें तो रस्ता संपला होता ह्मणून आम्हीं पुन्हां जेथें दोन रस्ते फुटले होते त्या जागीं आलों व दुसऱ्या रस्त्याला लागलों.

तो रस्ता उतरणीचा होता. समोरून गार वाऱ्याची झुळुक येत होती. त्यामुळें गुहेला दुसरें एक द्वार असून तें आतां आम्हाला लवकरच सांपडेल असें वाटलें. सज्जनसिंहांची भेट होतांच त्यांस आपण आश्चर्यचकित करून सोडूं अशा तऱ्हेचें आमचें बोलणें चाललें होते, इतक्यांत एखाद्या दुःखी प्राण्यानें कण्हावें तशा प्रकारचा आवाज आमच्या कानीं आला. आणि आम्हीं भीतीनें व आश्चर्यानें जेथल्या तेथेंच थांबलो ! कोणी तरी हिंस्रपशु जवळपास कोठें तरी आहे व आतां आमचीं शंभर वर्षें खास भरलीं असें वाटून आमची अगदीं पांचावर धारण बसली. काय होईल तें होवो, आल्या वाटेनेंच, पावलें न वाजवितां परत फिरावें असें आम्हीं संकेतानें ठरविलें; इतक्यांत पुन्हां कण्हण्याचा ध्वनि ऐकूं आला, आणि ‘ अरे रामरे ’ असा स्पष्ट उच्चारहि ऐकूं आला. तेव्हां कोणी दुःखी मनुष्य आहे, पशू नव्हे, अशी आमची खात्री झाली. तथापि पुढें पाऊल टाकण्याचें ऐवजीं आम्हीं तेथेंच उभे राहून काय दिसेल तें पहावें असें ठरविलें.

---

## प्रकरण तिसरें

# महत्वाचे कागदपत्र

**विधिरहो बलवान् इति मे मतिः** * हितोपदेश

दुःखानें तळमळत व मधूनमधून 'अरे रामरे, अरे बापरे' असे केविलवाणे शब्द बडबडत एक मनुष्य तेथें पडला होता. त्याची ती करुणास्पद स्थिति पाहून नारायणराव व मी त्याच्याकडे गेलों. त्याचे डोळे तांबडेलाल झाले होते, हातापायांस ताठरपण येत चालला होता; आम्हीं त्यास कांहीं प्रश्न विचारले. पण त्यास नीट उत्तर देतां येईना; त्याची जीभ अडखळूं लागली असावी असें दिसलें व तोंडास फेंस येऊं लागला होता. दातखिळी बसत चालली होती, अंग खूप तापलें होतें व मुखचर्या अगदीं पालटून गेली होती. हा प्रकार पाहून व त्यास कदाचित् सर्पदंश झाला असेल असें वाटून मीं इकडे तिकडे बघून व कोठें सर्प वगैरे नाहीं असें पाहून त्याची प्रकृति पाहूं लागलों. त्याची नाडी जलद चालली होती. श्वासोच्छ्वास करतांना मध्येंच तो निश्चेष्ट पडे व कांहीं वेळानें नाकांतून जबर सुस्कारा टाकी. हीं लक्षणें वाईट होतीं, सबब अधिक विचार करित न बसतां त्याच्या अंगावरच्या धोतरांत, आम्हीं गुहेंतून आणलेले जिन्नस आंवळले आणि त्याचें एक गाठोडें करून तें खांद्यावर टाकून नारायणरावानें त्याचे दोन्ही पाय धरले व मीं त्याच्या मानेखालीं हात घातला. अशा प्रकारें त्यास उचलून आह्मीं आलेल्या मार्गानेंच पुन्हां गुहेच्या बाहेर आलों आणि सज्जनसिंह बसले होते त्यांजजवळ त्यास आणून ठेवलें- तो मनुष्य अगोदरच स्थूल असून पराकाष्ठेचा जड झाला होता त्यामुळें त्याचें तें धूड बाहेर आणतां आणतां आह्मीं घामाघूम झालों होतों. घाईघाईनें आह्मीं

---

* दैव हेंच बलवान आहे असें मला वाटतें.

सज्जनसिंहास त्या माणसाबद्दलची हकीगत कळविली. त्यांनीं ही त्याची नाडी पाहिली. आणि कांहीं पुटपुटून ते आह्मांस तेथें बसवून आपण आतां येतों असें सांगून निघून गेले.

तो मनुष्य तसा तेथें मृत्यूच्या द्वारीं पडला होता, आणि आंग्ल-वैद्यक शिकलेले धन्वंतरी आम्हीं, त्याच्या उशाशीं त्याच्याकडे पहात स्वस्थ बसलों होतों. आमच्या ज्ञानाचा तेथें कांहीं उपयोग नव्हता. स्वदेशांतल्या वनस्पती, त्यांचे गुणधर्म, उपयोग वगैरेंचे आमचें ज्ञान त्यावेळीं जवळजवळ शून्यच असल्यामुळें आम्हीं तेथें असून नसून सारखेच होतों. नारायणरावांनींहि या संधीचा फायदा घेऊन आमची यथेच्छ पूजा केली. ती कर्णकटु, पण यथार्थ होती, त्यामुळें मला गप्प बसावें लागलें. सज्जनसिंह लवकरच परत आले. त्यांनीं आपल्या बरोबर पुष्कळ वनस्पती आणल्या होत्या त्या लागलीच ठेंचून त्यांचा रस ओट्यावर पुष्कळ करवंट्या पडल्या होत्या त्यांतली एक घेऊन ती मध्यें भरला. नंतर त्या माणसाचें तोंड वांसून व एका ढलपीनें त्याची दांतखिळी उघडून तो सर्व रस त्यांनीं त्याच्या तोंडांत ओतला व चोथा त्याच्या अंगास चोळला. त्या वनस्पतींच्या गुणांचा चमत्कार काय सांगावा! आम्हीं किंचित्‌शा आशेनें व पुष्कळशा निराशेनें त्या माणसाकडे पहात होतो. तो आणल्यापासून निश्चेष्ट पडला होता, तो औषध पोटांत जाताच थोड्याच वेळानें अंगाला आळेपिळे देऊं लागला. त्याचा श्वासोच्छ्वास पुन्हा सुरूं झाला व त्यास एकसारख्या शिंकांवर शिंका येऊं लागल्या. सज्जनसिंहांच्या मुखावर आनंदाची छटा दिसूं लागली. त्यांनीं पुन्हां रस काढून त्यास पाजला व चोथा त्याच्या अंगास चोळला. थोड्या वेळानें त्या माणसानें आपले डोळे उघडून आह्माकडे पाहिलें. त्याची नाडी नीट चालूं लागली. शिंका मधूनमधून

येऊं लागल्या व तो नीट शुद्धीवर येईल अशी चिन्हें स्पष्ट दिसूं लागलीं. तेव्हां त्यास बरोबर घेऊनच गडावरून खालीं उतरण्याचें आम्हीं ठरविलें. सज्जनसिंहाजवळ तें सामानाचें गाठोडें दिलें, आणि ते पुढें, व त्या मनुष्यास घेऊन दोघेजण आम्हीं मागें, असे तेथून निघालो.

सूर्य अगदीं डोक्यावर आला होता. रानांतून वाहणारे उष्ण वारे अंगास ताप देत असून त्या लठ्ठ माणसास गडावरून खालीं नेतांना आम्हीं अगदीं मेटाकुटीस आलों होतों. तथापि पांच पन्नासदा, त्यास ठेवून शेवटीं सज्जनसिंहजींच्या घरीं ओट्यावर आणून त्यास आम्हीं अखेर टाकला. तेव्हां आमच्या जिवांत जीव आला. गडाच्या माथ्यावरून पायथ्यापर्यंत, भर दोनप्रहरीं बारा वाजतां तें जिवंत मढें कसें आणलें व त्यावेळीं आम्हीं कसे रडकुंडीला आलों तें आपआपल्या कल्पनेप्रमाणें वाचकांनीं खुशाल ठरवावें. सज्जनसिंहजीनीं वाटेंत ४–५ वेळां आह्मांस मदत करण्याचा यत्न केला पण आम्हीं त्यांस बिलकुल त्रास दिला नाहीं. घरीं येतांच रावळजीनीं एका नोकरास त्या माणसाची शुश्रूषा करण्यास सांगितलें. व रजपुतांच्या रिवाजाप्रमाणें न्हाव्यानीं आमचें सर्वांचें अंगमर्दन करून शीण घालविल्यावर हातपाय धुऊन नंतर आम्हीं आत्मारामाला नैवेद्य दाखविला. सकाळपासून झालेल्या श्रमामुळें जठराग्नीहि चांगलाच प्रज्वलित झाला होता व त्या दिवशीं आह्मांला जवळजवळ मेजवानीच असल्यामुळें दोन घांस जास्तच पोटांत गेले. भोजनोत्तर तर अशी सुरसुरी आली कीं, गडावरून आणलेले ते जीर्ण कागद पहाण्याची आमची उत्कंठा आम्हीं तशीच दाबून ठेवून सायंकाळपर्यंत निद्रादेवीची अनन्यभावानें आराधना केली. आदल्या दिवसाप्रमाणें सायंकाळ आनंदानें नदीच्या कांठावर घालविल्या-नंतर व रावळजींचे सर्व नित्य कृत्य आटोपल्यानंतर, रावळजींनीं

गडावरून आणलेले जिन्नस बांधलेलें तें गांठोडें आह्मांसमोर आणविलें. आमचा आनंद काय विचारावयाचा आहे ? नारायणरावांनीं तें गाठोडें उघडलें. एका जाड पण अगदीं जीर्ण झालेल्या खादीच्या फडक्यांत कांहीं हस्तलिखित पोथ्या व पुष्कळसे कागदपत्र बांधलेले होते ते आम्हीं मोठ्या व्यवस्थेनें आमच्या बैठकीवर पसरले. पोथ्या मोठ्या व्यवस्थेनें ठेवलेल्या होत्या. प्रत्येक पोथीच्या खालीं व वर सुंदर नक्षी कोरलेल्या जाड फळ्या असून त्यांस कळेनाकळे असा चंदनाचा वास येत होता. पहिली पोथी जी आम्हीं पाहिली ती 'सूर्य अथर्वशीर्ष' ही होय. कागद आतां अगदीं जीर्ण झाला होता, तथापि तो नवा असतांना फार गुळगुळीत, सफाईदार व घोंटीव असून त्यावर अक्षरहि मोठें व सुंदर काढलेलें होतें. पोथीच्या कागदाच्या चारी बाजूंना प्रशस्त असें मार्जिन सोडलेलें असून त्यांमध्यें बारीक व सुबक अशी वेलपत्ती काढलेली होती. ती पोथी बाजूस ठेवून आम्हीं दुसरी हातांत घेतली. तीहि पहिल्या पोथीप्रमाणेंच उत्कृष्ट होती. सूर्य अथर्वशीर्षापेक्षां हिचें अक्षर बरेंच बारीक होतें. ही पोथी 'राजविलास' नांवाची होती. तिसरी पोथी 'श्री पंचरत्नगीतेची' होती, चवथीमध्यें 'पृथ्वीराज रासा' या ग्रंथाचा कांहीं थोडासा भाग होता, व पांचव्या पोथीचें नांव 'मनकामनेश्वर स्तोत्र' असें होतें. तें नांव वाचतांच आह्मां त्रिवर्गांस कांहीं चमत्कारिक आनंद वाटला. रावळजींनीं आदल्या दिवशीं रात्रीं उज्जयनीच्या मनकामनेश्वराच्या मंदिराची हकीगत आह्मांस सांगितली होती, तेव्हां मनकामनेश्वराचें नांव उच्चारतांच आह्मांस आश्चर्य व आनंद वाटला यांत काय नवल? तें स्तोत्रहि पूर्वीं वर्णन केलेल्या पोथ्यांप्रमाणें फार सुवाच्य व सुंदर रीतीनें उत्तम मोहोरेदार कागदावर लिहिलेलें असून तें सचित्र होतें. प्रारंभीं **श्री मनकामनेश्वराचें** सुंदर ध्यान

काढलें होतें. श्री शंकराचें आसनावर बसलेलें तें चित्र असून त्याच्या चारी हातांत अनुक्रमें सर्प, शंख, त्रिशूळ, व डमरू काढलेले होते. मस्तकाच्या जटाजूटांवर एकटा नागच होता, गंगा काढलेली नव्हती व गळ्यांतहि नागच होता, रुंडमाळा नव्हत्या. तें मनकामनेश्वराचें स्तोत्र मोठें सुंदर आहे, पण हल्लीं जी शिवस्तोत्रें उपलब्ध आहेत त्यांमध्यें तें नाहीं, तेव्हां मनकामनेश्वराची उज्जयनीस स्थापना करण्याचे सुमारास कोण्या पंडितानें निरनिराळ्या ठिकाणचे श्लोक घेऊन व कांहीं नवीन रचून तें बनविलेलें आहे, असें ह्मणणें अधिक सयुक्तिक होय. असें ह्मणण्याचें दुसरें कारण असें कीं या स्तोत्रापैकीं एक श्लोक

**नमामि जगदुत्पत्तिस्थितिसंहारकारणम् ।**
**स्वर्गापवर्गयोर्द्वारं त्रैलोक्यशरणं शिवम् ॥**×

हा प्रसिद्ध वैद्यकग्रंथ "माधवनिदान" याच्या मंगलाचरणाचा आहे. या ग्रंथाचा कर्ता **माधव** विजयानगरच्या राजाचा प्रधान होता.

त्या पांच पोथ्या आम्हीं पाहून एकीकडे ठेवल्यानंतर, आम्हीं कागदांकडे वळलों. त्या कागदांपैकीं कांहींवर नानाप्रकारचीं चित्रें काढलेलीं होतीं. कांहीं ऐतिहासिक तर कांहीं पौराणिक होतीं. त्या चित्रांतील देखावे व पेहेराव अगदीं प्राचीन रजपूत पद्धतीचे होते. सज्जनसिंहजीनीं तीं चित्रें पाहून आह्मांस पुष्कळ माहिती सांगितली. त्यामुळें राजस्थानाचा इतिहास वाचून त्याचें मनन व अध्ययन करावें ह्मणजे प्राचीन राज्यपद्धतीची खरी कल्पना डोळ्यापुढें उभी राहील अशी आमची खात्री झाली. चित्रांच्या खेरीज कागदाच्या तीन गुंडाळ्या

× जगाची उत्पत्ति, स्थिति ( पालन ) व लय ह्यांना कारणीभूत, स्वर्ग ( सुख ) व अपवर्ग ( मोक्ष ) यांच्या प्राप्तीचें साधन, अशा तिन्हीं लोकांचें रक्षण करणारा जो शिव देव त्याला मी नमस्कार करितों. माधवनिदानांत 'नमामि' या ऐवजीं 'प्रणम्य' असा पाठ आहे.

होत्या, त्या कोणाच्या तरी पत्रिका असाव्यात असें वाटलें, पण त्या उलगडून पहातां आमचा तर्क चुकीचा ठरला. पहिल्या कागदावर आरंभीं 'श्री मनकामनेश्वराय नमः' असें लिहिलेलें असून त्याखालीं सुमारें तळहाताएवढ्या रुंदीचा काळ्या रंगाचा मोहोरेचा शिक्का मारला होता. पहिल्या पेटींत सांपडलेली शिक्याची मोहोर आह्मांपाशीं होती. ती पहातां दोन्ही शिक्के एकच दिसले. मोहोरेवर मध्यभागीं श्री शंकराची पिंडी काढलेली होती. ती राजस्थानची कुलदेवता **श्रीएकलिंगजी** यांची असावी असें वाटतें. मोहोरेवर मेवाडी लिपींत कांहीं मजकूर होता पण अक्षरें घासून घासून अगदींच अस्पष्ट झाल्यामुळें मोहोरेवरील व कागदांवरील अक्षरें अमुकच असावींत असें आह्मांस निश्चयात्मक अनुमान करितां आलें नाहीं. सज्जनसिंहजींनीं ती कागदाची गुंडाळी सबंध उघडून आंतील मजकूर वाचण्याची पुष्कळ खटपट केली, परंतु एकतर अक्षर जसें असावें तसें सुवाच्य नसून लिहिण्याची पद्धती ही प्राचीन होती. शिवाय त्यांचे डोळे किंचित् अधू झालेले असल्यामुळें समईच्या दिव्यावर चष्मा लावून वाचणें त्यांस त्रासदायक होऊं लागलें. शिवाय रात्र बरीच झाली होती ह्मणून त्यांनीं त्यामधील मजकूर वरवर पाहून आह्मास असें सांगितलें कीं मेवाडचा राणा राजसिंग याचा मुलगा भीमसिंग यानें उज्जयिनीस मनकामनेश्वराचें मंदिर बांधलें. त्यावेळीं मंदिराच्या पुजाऱ्याला कांहीं जमीनजुमला व द्रव्य दिलें त्याची ही सनद असून त्यावर राजपुत्र भीमसिंग याची सही व शिक्का आहे. इतकी माहिती मिळाल्यावर आम्हीं आपलें दप्तर गुंडाळलें व रात्र पुष्कळ झाली ह्मणून आंथरुणावर पडलों. आमच्या मनांत त्या सबंध दिवसांत ऐकिलेल्या व पाहिलेल्या गोष्टींची इतकी गर्दी उडाली कीं, त्यामुळें झोंप अगदीं उडून गेली. रावळजीहि आंथरुणावर स्वस्थ पडले

होते. एक संवाहक त्यांचें आंग रगडीत होता, आमच्या सेवेलाहि संवाहकांची योजना झाली होती, पण आम्हीं ती सेवा नको ह्मटली. रावळजींनीं आपल्या संवाहकास उद्देशून गडावरून आणलेल्या माणसाची चौकशी केली, तेव्हां असें कळलें कीं त्या माणसाची प्रकृति जरी आतां बरी आहे तरी त्याच्या तोंडांतून स्पष्ट शब्दोच्चार होत नाहीं त्यामुळें त्याला काय पाहिजे काय नको तें कांहीं समजत नाहीं. रात्रीं नंतर इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्या. प्रचलित राजकारणाची चर्चा झाली, तेव्हां चालू असलेल्या चळवळीपासून अगदीं अलिप्त असून देखील सज्जनसिंहजींचें अर्वाचीन राजनीतीचें ज्ञान व त्यापासून त्यांनीं काढलेले सिद्धांत आमच्या विचाराशीं अगदीं तंतोतंत जुळत असलेले पाहून आह्मांस मोठा आनंद झाला. दुसरे दिवशीं आम्हीं जाणार होतों ह्मणून असें ठरलें कीं गडावर सांपडलेल्या त्या मुक्या माणसास उपचारासाठीं मीं उज्जयिनीस घेऊन जावें. रावळजींचे पाय चेंपीत असलेला संवाहक ठाकुरसिंग यानेंच त्या मुक्याची शुश्रूषा केली होती व तोहि उज्जयिनी, ॐकारेश्वर वगैरे क्षेत्रांच्या यात्रेला जाणार होता. त्यानेंहि मजबरोबरच निघावें व उज्जयिनीस कांहीं दिवस राहून त्या मुक्याची प्रकृति चांगली झाल्यावर मग पुढें जावें. इतिहाससंशोधनाची माझी आवड पाहून गुहेंत सांपडलेले सर्व जिन्नस रावळजींनीं मोठ्या संतोषानें मला दिले. पहाटे पहाटे मग थोडा आमचा डोळा लागला, पण त्यांत देखील मला आतांपर्यंत पाहिलेल्या स्थलांचीं व गोष्टींचीं स्वप्नें पडलीं. दुसरे दिवशीं सकाळीं स्नानसंध्यादि नित्यकृत्यें आटोपल्यावर सज्जनसिंहजींची प्रकृति मी पाहिली व उज्जयिनीस गेल्यावर औषध पाठवून देतों असें सांगितलें. नंतर भोजन उरकून सामानाची आंवराआंवर करीपर्यंत दुपारचे बारा वाजले. नारायणराव

अजमिराकडे जाणार होते. पण त्यांच्या व आमच्या गाडीचा क्रॉस चितोडच्या स्टेशनावरच होणार होता. रावळजींच्या गाड्या जुंपून तयार झाल्यावर आम्हीं देवघरांत जाऊन देवदर्शन घेतलें. पाटावर कांहीं ठेवलें व पुजाऱ्यासहि कांहीं दक्षणा दिली. भटजींनींहि आह्मांस प्रसाद दिला. नंतर पुढच्या गाडींत सज्जनसिंहजी, दंडधारी व मी व मागच्या गाडींत गडावर सांपडलेला तो मुका मनुष्य, ठाकुरसिंग व दोन चपराशी व आमचें सर्व सामान अशी तयारी झाल्यावर आमच्या गाड्या चालूं लागल्या. गाडीच्या पुढें दोन चपराशी गळ्यांत पट्टे अडकवून व हातांतल्या काठ्या खांद्यावर धरून आमच्या गाडीपुढें पळत होते. बैलांच्या गळ्यांत घुंगुरमाळा होत्या त्या वाजत होत्या व त्या तालावर बैलहि मोठ्या मजेनें चालले होते. चितोडगांवापासून स्टेशनावर जाणारा रस्ता कांहीं अंतरापर्यंत फारच सुंदर आहे. पण आमच्या चित्तवृत्ति स्टेशनावर येणाऱ्या गाड्यांकडे लागलेल्या असल्यामुळें आमचें चित्त त्यामध्यें गुंतलें नाहीं. आम्हीं थोड्याच वेळांत स्टेशनावर येऊन पोचलों. चितोडगढ हें स्टेशन जंक्शन असून येथून, उदेपूर, अजमीर व खांडवा या शहरांना रेलवे गेली आहे. खुद्द स्टेशनावर आगगाड्या आल्या ह्मणजेच जीं काय माणसें चढतील व उतरतील तेवढी गर्दी, नाहींतर जवळजवळ शुकशुकाटच असतो. आम्हीं स्टेशनावर पोचलों व सामान वेटिंगरूममध्यें ठेवलें. तोंच अजमिराकडे जाणाऱ्या अप पॅसेंजर ट्रेनची मागल्या स्टेशनावरून सुटण्याची घंटा झाली. रावळजींनीं नंतर दोन सेकंड क्लासचीं व दोन थर्ड क्लासचीं तिकिटें काढून आह्मांजवळ दिलीं व पुन्हां पत्र लिहिलें ह्मणजे आपण यावें ह्मणजे मग उदेपूर शहर आपणांस दाखवूं असें प्रेमाचें आमंत्रण आह्मांस दिलें व वरचेवर पत्र पाठविण्या-

विषयीं सुचविलें. इतक्यांत अजमिराकडे जाणारी गाडी आली; नारायणराव गाडींत बसले. नंतर डाउन पॅसेंजर ट्रेन आली. गाडींत नीट प्रशस्त जागा पाहून ठाकुरसिंग व तो मुका यांस बसविल्यानंतर रावळजींचा मोठ्या प्रेमानें निरोप घेऊन मींहि आपल्या डब्यांत चढलों. अगोदर नारायणराव अजमिराकडे रवाना झाले व नंतर आमची गाडीहि त्या चितोडगडाकडे पहात पहात त्याच्या नष्ट साम्राज्यवैभवाची आठवण होऊन कीं काय, जड पावलांनीं, फस् फस्, फस्, फस्, असे दीर्घ निश्वास टाकीत उज्जयिनीच्या रस्त्याला लागली.

---

## प्रकरण चवथें

# राजपुत्र भीमसिंग

**क्षुत्क्षामोपि, जराकृशोपि, शिथिलप्रायोपि, कष्टां दशाम्—**
**आपन्नोपि, विपन्नदीधितिरपि, प्राणेषु गच्छत्स्वपि ॥**
**मत्तेभेंद्रविभिन्नकुम्भकवलग्रासैकबद्धस्पृहः**
**किं जीर्णं तृणमत्ति मानमहतां अग्रेसरः केसरी ? ॥ १ ॥**

भर्तृहरी * *

आगगाडी चालू होतांच मी त्या भव्य चितोडगडाकडे नजर फिरवून बसलों. स्टेशनावरून गडावर असलेला कुंभराण्याचा जयस्तंभ

---


१ * * खाण्याबांचुनि रोडला, जरि जरायोगें बहू वाळला,
रोगानें अति पीडिला, जरि मरायातेंहि कीं टेंकला; ।
उन्मत्तद्विपगंडभेदन करायाचीच इच्छा करी
मानी क्षुद्र जनावरांपरि तृणा स्पर्शेच ना केसरी ॥ १ ॥

कृष्णशास्त्री चिपळुणकर

२ झाला क्षीण बहू क्षुधेस्तव जरि, कीं व्यापिला वार्द्धकें,
आली कष्टदशा, घडो मरण ही, कीं तेज गेलें निकें ॥
ऐसाहि मृगराज जीर्ण तृण तो भक्षील कीं काय हा ?
शौर्यें भेदुनि हस्तिमस्तक शुभग्रासींच ज्याला स्पृहा ॥ २ ॥ वामन



चितोडचा राजपुत्र भीमसिंह



चितोडगडावरील कुंभ राण्याचा जयस्तंभ.

दिसत होता. काहीं पडून झडून गेलेल्या इमारतीहि दृष्टीआड होत होत्या. नंतर नुसता गडाचा कोट दिसला व शेवटीं गड वगैरे सर्व अस्पष्ट व अंधुक होऊन निळसर रंगाचा लांब अंतरावर गेलेला पहाड दिसला व शेवटी तर गाडी दुसरीकडे वळल्यामुळें तो देखावा नाहींसा होऊन दुसरा त्या जागीं आला. हिंदुस्थानच्या प्राचीन इतिहासाचें अध्ययन करणाऱ्याला या किल्ल्याचें फार महत्त्व वाटतें. सज्जनसिंहजीनीं आह्मांला तो किल्ला दाखवून, त्याचा पुष्कळसा इतिहास सांगून व त्या बरोबरच राजस्थानची कांहीं माहिती देऊन आमची जिज्ञासा चांगली जागृत केली, याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहें. चितोडगड दृष्टीआड झाल्यावर, रावळजीनीं बक्षीस दिलेलें, गडावर सांपडलेलें सर्व सामान मी पेटींत ठेविलें होतें तें बाहेर काढलें. बुद्धाचा दांत, शेक्सपिअरची खुर्ची, स्कॉटची लेखणी, महाभारतकालांतील नाणीं, शिवाजीचें हस्ताक्षर, यशवंतराव होळकर यांचा भाला, राणाप्रतापसिंहाचें चिलखत, भवानी तलवार व वाघनखें इत्यादि दुर्मिळ व लोकोत्तर ऐतिहासिक वस्तूंची आर्थिक किंमत ती किती असणार? पण तशा वस्तू जवळ असणें हें किती अभिमानाचें व महद्भाग्याचें आपण समजतों? चितोडगडावर जोहाराच्या गुहेंत सांपडलेल्या त्या वस्तु मजजवळ असल्याबद्दल मलाहि त्या वेळीं फार अभिमान वाटला. त्या पांच पोथ्या मीं पुन्हां मोठ्या काळजीपूर्वक पाहिल्या. नंतर आधल्या रात्रीं पाहिलेली कागदाची मोठी गुंडाळी वाचण्याचा मी मनःपूर्वक यत्न केला. मी दक्षिणी ब्राह्मण खरा, पण माझें बहुतेक आयुष्य माळव्यांत व उत्तर हिंदुस्थानांत गेल्यामुळें व राजपुतान्यांतील कांहीं गांवांत मीं कांहीं दिवस राहिलों असल्यामुळें हिंदी भाषेला व लिपीला मी अगदींच अनभ्यस्त नाहीं. त्यामुळें तो कागद वाचतांना

जरी मला पुष्कळ ठिकाणीं अडखळावें लागलें तरी तामील, तेलगु वगैरे लिपी पाहून मी जसा घाबरलों असतों, तसा मी या वेळीं डरलों नाहीं. शिवाय सज्जनसिंहजींनीं त्याचा सारांशहि मला सांगितला होता. त्याचाहि फार उपयोग झाला. तें पत्र ह्मणजे एक सनद असून तिची रूपरेषा मी खालीं देत आहे त्यावरून वाचकांस तिचें महत्त्व लक्षांत येईल.

" श्रीमनकामनेश्वराय नमः

शिक्का

मेवाडचा राजपुत्र कुमार भीमसिंग, हल्लीं मुक्काम उज्जयिनी याजकडून वेदशास्त्रसंपन्न **पंडित नीलकंठशास्त्री चितोडवाले** हल्लीं मुक्काम उज्जयिनी यास साष्टांग नमस्कार विज्ञापना, विशेष.

१ आमचे बावाजी, मेवाडचे राणे राजसिंगजी, यांच्या आज्ञेनें, उदेपूरच्या राज्याचा हक्क सोडून, आम्हीं चितोडगडावरून उज्जयिनीस आलों. आह्मांसमवेत, उदेपूर राज्यांतील सर्व मालमत्ता, स्थावर जंगम मिळकत सोडून मार्गांत भिल्ल, चोर, डाकू, लुटारू यांचे हल्ले सहन करून व अनेक अडचणी सोसून आपण व आमचे भाचे कुमार विजयसिंगजी येथें आलांत व आह्मांस संकटकाळीं साह्य केलेंत.

२ येथें आल्यावर **श्रीमहाकालेश्वराच्या** कृपेनें आमचा पुत्र कुमार मानसिंह याचा जन्म झाला, व आह्मांस पुन्हां सुखाचे दिवस प्राप्त झाले.

३ या आनंदाप्रीत्यर्थ व आमची मनकामना ईश्वरानें पूर्ण केली एतदर्थ आह्मीं **श्री महाकालेश्वराच्या** या प्राचीन अवंतिका नगरींत त्याच्याच कृपाप्रसादानें **श्रीमनकामनेश्वराची** स्थापना करून मंदिर बांधिलें आहे.

४ त्याची रोज शोडषोपचारें पूजाअर्चा व्हावी व सोमवार एकादशी, प्रदोष, शिवरात्र, वगैरे नैमित्तिक दिवशीं विशेष समारंभ करावा, गोरगरीबांना अन्नवस्त्रदान द्यावें व मंदिराची व्यवस्था, डागडुजी वगैरे चांगली होऊन तडी, तापडी, संन्यासी, बैरागी, गोसावी, यांचीहि चांगली सोय तेथें व्हावी अशी आमची इच्छा आहे.

५ आमचे भाचे कुमार विजयसिंगजी यांचाहि विचार याच नगरींत कायमचा रहाण्याचा दिसत आहे.

६ यासाठीं, कुमार विजयसिंगजी यानीं मनकामनेश्वराच्या मंदिराजवळ बांधलेल्या आमच्या वाड्यांत रहावें व मंदिराची व्यवस्था ठेवावी.

७ मनकामनेश्वराची पूजाअर्चा व इतर सर्व प्रकारचा बंदोबस्त आपण ठेवावा व मंदिराच्याच आवारांत आपणासाठीं जें घर बांधलें आहे त्यांत आपण पुत्र पौत्रादिकांसह आनंदानें रहावें. आपला योगक्षेम यथासांग व्हावा ह्मणून मंदिराच्या आवारांतील पन्नास बिघे जमीन आपणास वंश-परं-परा इनाम दिली आहे.

८ मनकामनेश्वराच्या कृपेनें, त्याच्या पूजाअर्चा खर्चाची व्यवस्था चांगली झाली आहे. चितोडाहून उज्जयिनीस येतांना, वाटेंत लुटारू लोकांच्या टोळ्यांनीं आह्मांवर हल्ला केला होता, त्यांतून ईश्वरकृपेनें आह्मीं बचावलों, इतकेंच नव्हे तर आह्मांस जय प्राप्त होऊन पुष्कळच द्रव्यप्राप्ती झाली. हें सर्व द्रव्य आम्हीं उज्जयिनीसच ठेवण्याची तजवीज केली आहे.

९ हें सर्व द्रव्य कोठें ठेविलें आहे व त्याची केव्हां, कोणी व कशी व्यवस्था लावावयाची हें सर्व आम्ही ठरविलेलें आहे. तें कागदोपत्रीं नीट लिहिलें आहे व त्या कागदांपैकीं एका कागदाची नक्कल आह्मीं आपल्या स्वाधीन केली आहे, तो कागद फार महत्त्वाचा आहे. या साठीं त्याची अफरातफर होऊं देऊं नये. तो नेहमीं घडी करून, डबींत ठेऊन, ती डबी नित्य देवपूजेंत ठेवावी. आपल्या घरच्या मंडळी-शिवाय तो कागद कोणासहि दाखवूं नये.

१० ही सनद कुमार विजयसिंगजी—आमचे भाचे, व रावत केसरीसिंगजी—आमचे कामदार, यांच्या देखतां उज्जयिनीस मनकाम-नेश्वराच्या मंदिराच्या आवारांत, चितोडवाले यांच्या वाड्याच्या सज्जांत कुमार सूरतसिंग यानें लिहिली व तीवर कुमार भीमसिंग, मेवाडचे राणे बावाजी* राजसिंग, यांचा पुत्र, यानें सही केली असे.

११ मुक्काम उज्जयिनी, आषाढ शुद्ध पौर्णिमा, गुरुवार, विक्रम संवत् १७३७."

या रूपरेषेवरून त्या कागदाचें महत्त्व वाचकांच्या सहज लक्षांत येईल. असो. ही सबंध सनद वाचावयाला मला पुष्कळच वेळ लागला व तोंपर्यंत अगदीं सायंकाळ होऊन सूर्याचा मागमूसहि दिसेनासा झाला. डब्यांत उभें राहून दिव्याच्या प्रकाशांत दुसरा कागद उलग-डावा कीं काय या विचारांत मी होतों, पण इतक्यांत **नीमच** स्टेश-नावर गाडी थांबली व एक गृहस्थ, आपली पत्नी व तीन मुलें यांसह माझ्या डब्यांत आले व त्यांनींच बहुतेक जागा अडविली, त्यामुळें मी आपलें बासन गुंडाळलें व स्वस्थ बसलों. गृहस्थ मद्रासी होते, परंतु

* बापाला सन्मानपूर्वक हांक मारण्याची किंवा त्याचेविषयीं बोलावयाचें ह्मणजे 'बावाजी' या बहुमानपूर्वक शब्दांनीं बोलण्याची रजपुतांची चाल आहे.

दक्षिणी गृहस्थांबरोबर मराठी बोलण्याची त्यांस फार हौस दिसली. आमची गाडी त्या स्टेशनावर बराच वेळ थांबणार होती. त्या कस्तूरीरंग आय्यंगारांच्या बरोबर लहान लहान तीन मुलें होतीं व त्यांस दुधाची फार जरूरी होती. त्यांना दूध कोठें मिळेल काय हें मला विचारावयाचें होतें. पण दूध शब्द तर आठवेना, व इंग्रेजींत तर बोलावयाचें नाहीं तेव्हां त्यांनीं तो शब्द आठवण्यास पुढील तोड काढली. स्टेशनाजवळ टांगे उभे होते तेथें कांहीं बैलगाड्याहि उभ्या होत्या, त्या मला दाखवून ते ह्मणतात "मिष्टर, ते गाडीला दोन जोडला आहे ते काय हो?"

**मी**—( हंसून ) बैल.

**कस्तूरीरंग आय्यंगार**—हं, बैल. ते बैलाचा बायको ह्मणतात ते काय हो?

**मी**—( अधिक हंसून ) गाय.

**कस्तूरीरंग०**—हं. हं. ते गायचा असा असा प्यायला काढतात ते काय?

**मी**—( खूपच हंसून ) दूध.

**कस्तूरीरंग आयंगार**—हं. हं, हं. तेच आमाला थोडा आणवा. पैसा देतों.

मी हंसत हंसत डब्याच्या बाहेर उतरलों ( त्या मुक्याची व ठाकुरसिंगाची चवकशी केली ) व नंतर दुधाचा शोध करून तें आमच्या पाहुण्यांना आणवून दिलें. ते गृहस्थ मोठे विनोदी होते. नीमच क्यांटोनमेंटमधील मिलिटरी अकाउंट्स ऑफिसमध्यें ते कामदार असून कुटुंबाचा प्रसूतिकाळ जवळ आला होता ह्मणून कुंभकोणम् येथें आपल्या श्वशुरगृहीं त्यांस पोंचविण्यास निघाले होते. गाडी स्टेशना-

वरून हलतांच गृहस्थानीं आपलें अग्निहोत्र पेटविलें व माझ्यापुढेंहि एक सिगारेट धरली. मी पीत नाहीं असें त्यास सांगितलें. तेव्हां ते आपणच ह्मणतात "हां, धुम्रपान हा मोठा दुर्व्यसन आहे. बालपणापासूनच मी त्याचा निषेध करते. गेल्या आठवड्यांत मी शीक असतांना, डॉक्टरनें जेव्हां तंबाखू प्याल्यानें रोग बळावेल असा मला सांगितला तेव्हांपासून मी तो सोडला.'' असें ते म्हणाले खरें, पण मी आणि ते जवळ जवळ ८ तास एकत्र होतो तोंपर्यंत त्यानीं २५ तरी विड्या ओढल्या असतील. मधूनमधून प्राण कासावीस होईपर्यंत खोकणें व पुनः विडी ओढणें हें त्यांचें टाइमटेबल अगदीं निर्वेध चालू होतें. त्यांच्या दुर्दैवानें रात्र पडली होती व स्टेशनांवरून "चहा, चहा" असा आवाज ऐकूं येत नव्हता. त्यामुळें चहा मात्र सकाळपर्यंत त्यांस मिळाला नाहीं. मी त्यांस चहाचे व विडीचे शरीरावर होणारे दुष्परिणाम व द्रव्यनाश यांजबद्दल समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण त्यांनीं तीं व्यसनें पुढें सोडलीं असतील याबद्दल मला खात्री वाटत नाहीं. नुसत्या कोरड्या उपदेशानें व्यसनी लोकांचीं हीं व्यसनें जात नाहींत असा आजपर्यंतचा अनुभव आहे. रतलाम स्टेशनावर मी त्या मद्रासी गृहस्थांचा निरोप घेतला, व ठाकुरसिंग व तो मुका यांसह उज्जयिनीच्या गाडींत बसून योग्य वेळीं उज्जयिनीस येऊन पोचलों.

घरीं आल्यावर ठाकुरसिंग व तो मुका यांची सोय मी आमच्याच वाड्यांत केली व त्या मुक्यावर औषधोपचार सुरू केला. ब्राम्ही या नांवाची एक विलक्षण गुणकारी वनस्पती आहे, तिचा रस ठाकुरसिंगानें काढावा व तो त्या मुक्यास द्यावा असा क्रम सुरू झाला.

उज्जयिनीस येतांच सज्जनसिंहजीस मी त्यांचें औषध पाठविलें व पुढें एक महिन्यानें त्यांना त्या औषधाचा चांगला गुणहि आल्याचें पत्र

आलें. मी आल्यानंतर पंधरा दिवस विशेष सांगण्याजोगें कांहीं घडून आलें नाहीं. मुक्याची प्रकृती बरी होत चालली होती, पण वाचा लवकर फुटेल अशीं चिन्हें दिसूं लागलीं नव्हतीं. कामामुळें चितोडगडाहून आणलेल्या कागदांच्या गुंडाळ्या वाचण्याइतकी मला फुरसतहि नव्हती, तथापि राजपुत्र भीमसिंग याबद्दल माहिती मिळविण्याच्या विचारांत मी होतों. असें होतां होतां एके दिवशीं लोकहितवादीकृत "राजस्थानचा इतिहास" या पुस्तकाकडे माझी दृष्टी गेली आणि त्यांत भीमसिंगाबद्दल पुढें लिहिलेला मजकूर मला आढळला.× "राणा राजसिंग मेल्यानंतर त्याचा मुलगा जयसिंग हा मेवाडचा राणा झाला. हें वर्ष वि. सं. १७३७ म्हणजे इ. स. १६८१ हें होतें. राणा जयसिंग याचे जन्मकाळीं एक चमत्कारिक गोष्ट घडली ती आम्हीं येथें सांगतों. त्या गोष्टीवरून रजपूतवंशांतील एका विशेष रीतीची किंवा आचाराची माहिती होईल. हा राणा ज्यावेळीं जन्मला त्याच वेळीं, परंतु थोडीशी अगोदर, त्याची दुसरी एक सावत्र आई प्रसूत होऊन तिलाहि एक मुलगा झाला. मेवाडच्या राजघराण्यांत अशी एक चाल आहे कीं, जो मुलगा पहिल्यानें जन्मतो त्याच्या दंडाला 'अमरदोब' नांवाची एक मुळी असते ती त्या मुलाच्या बापानें आपल्या हातें बांधावी व याप्रमाणें ती मुळी त्याच्या दंडाला बांधिली ह्मणजे तो मुलगा गादीचा मालक व्हावयाचा असें समजत. ती मुळी पौष्टिक असून, कशाहि उन्हाच्या तापानें ती सुकत नाहीं, अशी तिची ख्याति आहे. राणा जयसिंग याचा बाप राणा राजसिंग यानें ह्या सांगितलेल्या रीतीप्रमाणें, ती 'अमरदोब' मुळी पहिल्यानें, जयसिंगाच्याच दंडाला बांधली. परंतु तसें व्हावयाचें नव्हतें. कारण, वडीलपणाचें नातें भीम-

× लोकहितवादीकृत राजस्थानचा इतिहास पृ. २५०–५२.

सिंगाकडे असून, खरें ह्मटलें असतां 'अमरदोब' मुळी राणा राजसिंग यानें भीमाच्याच दंडाला बांधावयाची. ही चूक त्याचवेळीं तेथें असलेल्या लोकांच्या लक्षांत आली. परंतु भुलीनें राण्याकडून असें झालें असावें असें लोकांस वाटलें. पण ह्या कामांतील राण्याची ती भूल नव्हतीच. त्यानें तसें मुद्दाम केलें. राजसिंग राणा याची प्रीति भीमसिंगाच्या आईपेक्षां जयसिंगाच्या आईवर विशेष असून, तिला जें प्रिय तें करणें ह्याला इष्ट होतें; ह्मणून त्याप्रमाणें त्यानें करून, आपल्या पश्चात् जयसिंग हाच गादीचा मालक व राणा व्हावयाचा, असें वरील मूलबंधनानें दर्शित केलें. पुढें तीं मुलें मोठीं होऊन वयांत आलीं तेव्हां, राणा राजसिंग यास चिंता पडली कीं, न जाणो राज्यलोभानें व आपला हक्कसंबंध लक्ष्यांत आणून भीमसिंगाकडून आपला सावत्र भाऊ व गादीचा वारस होणारा जयसिंग याचे विरुद्ध कांहीं तरी कुरापत निघून त्याच्या नाशास तो प्रवृत्त होईल ! ह्यापुढें होणाऱ्या सर्व गोष्टी लक्ष्यांत आणून एके दिवशीं, राणा राजसिंग यानें आपली तलवार म्यानांतून काढून भीमसिंगाचे हातांत दिली; आणि त्याला सांगितलें कीं, पुढें तूं आपल्या सावत्र भावाबद्दल मनांत वैषम्य बाळगून त्याच्या नाशास आणि राज्यांतील अशांतीस कारण व्हावें त्यापेक्षां हीच तरवार घेऊन माझ्या देखत तूं आपल्या भावावर चालीव.' बापाचे हे शब्द ऐकतांच त्याचा उद्देश भीमसिंग समजला. परंतु तो मोठा उदार बुद्धीचा व थोर मनाचा असल्यामुळें त्यानें प्रिय पित्याची भीति घालविण्याकरितां त्याच्या गादीचीच आण घेऊन आपली निरपेक्षा प्रदर्शित केली; इतकेंच नव्हे, तर आपला भाऊ जयसिंग याला गादीवर बसविण्याची जी योजना केली आहे ती आपल्याला अगदीं संमत आहे, अशी बापाची खात्री करण्याकरितां त्यानें अशी प्रतिज्ञा केली कीं, 'यापुढें मी या दोबारीच्या आंत

पाणी पिईन तर आपल्या पोटचाच नव्हे!' आणि अशी प्रतिज्ञा करून लगेच तो आपले जे कोणी विश्वासाचे व अनुयायी लोक होते त्यांस बरोबर घेऊन, आपला जिकडे भाग्योदय होणें असेल तिकडे जाण्याकरितां उदेपुराहून निघाला. त्या दिवशीं ऊन फार लागत असून, त्याचा जीव त्या उन्हाळ्यानें अगदीं गदमदून गेला. ह्याप्रमाणें तो दोबारीपर्यंत गेल्यानंतर त्यानें तेथें एका उंच व दाट छायेच्या वटवृक्षाखालीं अंमळसा मुक्काम केला व आपल्या जन्मभूमीचें एकवार शेवटचें दर्शन घेऊन नंतर पुढें चालूं लागावें असा त्यानें बेत केला. इतक्यांत त्याच्या एका शागीर्दानें भीमसिंगाला ताज्या व गार पाण्याचा एक रुप्याचा प्याला भरून पिण्याकरितां आणून दिला व भीमसिंग अतिशय तृषाक्रांत झाला असल्यामुळें त्यानेंहि तहान भागविण्याकरितां तो प्याला घेऊन आपल्या ओंठाशीं लाविला. इतक्यांत त्याला स्मरण झालें कीं, 'मी या दोबारीच्या आंत असेपर्यंत जलप्राशन देखील करणार नाहीं अशी शपथ घेतली आहे; व मी तर अजून त्या बारीच्या आंतच आहें. तेव्हां माझें हें करणें आपल्या प्रतिज्ञेचा भंग करितें, हें चांगलें नव्हे,' असा विचार करून, त्यानें त्या प्याल्यांतलें पाणी ईश्वराच्या नांवानें जमिनीवर ओतलें; आणि तो प्याला ज्या झऱ्यांतून ते पाणी आणिलें होतें त्या झऱ्यांतल्या जलदेवतेला अर्पण करण्याकरितां ह्मणून त्यानें तो त्या झऱ्यांत फेंकून दिला. नंतर त्यानें आपल्या जन्मभूमीच्या बारीला नमस्कार करून तेथून पुढें प्रयाण केलें. पुढें तो बहादुरशहाकडे गेला; तेव्हां त्यानें त्याला आपल्याजवळ ठेवून घेऊन, त्यास साडेतीनहजार स्वारांच्या मुखत्यारीची मनसब करून दिली, व त्यांच्या तैनातीस ५२ गांवचा मुलूख दिला. परंतु पुढें त्याचा आणि बादशहाचे सेनापतीचा कांहीं बेबनाव होऊन, बादश-

हाकडून त्याची योजना सिंधुनदीच्या पश्चिमेकडील मुलखांत झाली, ह्मणून तो तिकडे गेला, व तिकडेच तो मृत्यु पावला.......तो मोठा शक्तिमान्, चपल, घोड्यावर बसणारा वस्ताद आणि साहसी असे."

'साहसे श्रीः प्रतिवसति' या वचनाचें भीमसिंग राजपुत्राचें हें उदाहरण पाहून मला मोठा आनंद वाटला.

---

## प्रकरण पांचवें

## सांपडला कीं निसटला ?

સોનાને શુભપાંજરે પકડિને રાખ્યો કદી કાગડો
સંભાળી શુભ ખાનપાન દઈને પ્રેમે પઢાવ્યો ઘણો ।
ક્યાંથી તે શુકના સમાન પદવી પામે અરે પાપિઓ ?
આવે દુર્જનમાં નહીં સુજનતા સિદ્ધાંત એવો થયો ×

केशव.

'काळोखाची रजनी होती.'* मध्यरात्रीची वेळ. जिकडे तिकडे सामसूम झालें होतें. मी गच्चीवर निजलों होतों. अर्धवट झोंप येण्याच्या बेतांत होती. पण रस्त्यावरून जाणाऱ्या एका गृहस्थाचें एक मधुर गाणें ऐकून माझी झोंप उडाली. तो गृहस्थ तें गाणें ह्मणतां ह्मणतां रस्त्यावरच एके ठिकाणीं बसला, त्यामुळें मला तें सबंध ऐकूं आलें, व कर्मधर्मसंयोगानें तें मला पुढें कांहीं दिवसांनीं एका पुस्तकांतहि

× याच अर्थाचा दुसरा श्लोक—

काकाची तनुयष्टि बा रचियली, जांबूनदें सर्व ती ।
चंचुप्रांतहि माणकें सजविला जीं देति शोभा अती ॥
रत्नें आणुनि भिन्न भिन्न जडिलीं एकेक पंखाप्रती ।
आहे काकच शेवटीं न कधिं ही तो होय पक्षीपती ॥ १ ॥

**सीताराम विष्णु सरवटे**

* केशवसुत कवी.

आढळलें. मला तें गाणें फार आवडलें, तसें तें वाचकांसहि आवडेल अशा समजुतीनें तें पुढें दिलें आहे.

* राग बागेश्री, ताल झपताल

" आतां राग देई मना शांततेला " या चालीवर

**" मोहन मदन गोपालकी बांसुरी ॥ धृ० ॥**
**माधुरी श्रवणपुट सुनत सुनि राधिके, ॥**
**करत रतिराजके ताप कौ नासुरी ॥ १ ॥**
**शरद राका रजनि, विपिन वृन्दा सजनि ॥**
**अनिल अति मंद सीतल सहित बांसुरी ॥ २ ॥**
**परम पावन पुलिन, भृंग सेवित सलिल ॥**
**कलपतरु तीरवलबीर कृत रासुरी ॥ ३ ॥**
**सकल मंडल भली, तुम जु हरिसौं मिली, ॥**
**बनी वरबनत उपमा कहौं कासुरी ॥ ४ ॥**
**तुम जो कंचन तनी, लाल मरकत मनी, ॥**
**उभय कलहंस हरिवंश बल दासुरी ॥ ५ ॥"**

पद साधें पण मोठें गोड व तें ह्मणणारा मनुष्य तें इतक्या मंजुळ आवाजानें ह्मणत होता कीं, गाण्याचे सूर कानीं पडतांच माझी झोंप उडाली व मीहि तें पद आपल्या मनाशींच गुणगुणूं लागलों. पद ह्मटल्यानंतर कांहीं वेळानें तो इसम आपल्या रस्त्याला लागला. पुन्हा चोहोंकडे शांतता झाली, तथापि माझी झोंप जी उडाली ती उडालीच. अंथरुणावर या कुशीवरचें त्या कुशीवर करितां करितांहि कंटाळा आला; तेव्हां घरांतून एकदां फिरून यावें, ह्मणजे आई जागी असल्यास तिच्या जवळच कांहीं वेळ बसूं, असा विचार करून मी उठलों व माडीवरून खालीं चौकांत आलों. चौकांतल्या ओसरीवर ठाकुरसिंग व तो मुका असे दोघेजण निजत असत. चौकांत दिवा

* बागेश्वरी हें सरस्वती देवीचें नांव आहे.

असावयाचा, पण ठाकुरसिंगाच्या उशाशीं तो दिवा लावलेला असून तेथें तो आंथरुणावर कांहीं तरी करीत असलेला मला दिसला, त्यांचें मला थोडें आश्चर्य वाटलें. माझ्याप्रमाणेंच त्याचीहि झोंप कांहीं कारणानें उडाली असेल व वेळ जावा ह्मणून तो **तुलसीरामायण** वगैरे कांहीं वाचीत असेल असें मला वाटलें. तेव्हां काय वाचीत आहे तेवढें पहावें व मग पुढें जावें, त्याच्या एकतानतेंत आपण बिघाड कशाला करावा, असा विचार करून मीं पावलें न वाजवितां त्याच्या मागें जाऊन उभा राहिलों. मी आल्याचें त्याच्या लक्ष्यांतहि आलें नाहीं, इतका तो आपल्या उद्योगांत गर्क झाला होता. चितोडगडांतील गुहेंत सांपडलेले सर्व जिन्नस एका रुमालांत वांधून मी ओसरीवरील कोनाड्यांत ठेवले होते. घरच्या सर्व मंडळींनीं ते पाहिलेले होते व जुन्या रद्दी कागदांपेक्षां त्यांचें कांहीं महत्व न वाटल्यामुळें तें दप्तर कोणी उघडून पहातहि नसे. तें दप्तर उघडून त्यांतील एक गुंडाळी उलगडून त्यामधून कांहीं मजकूर ठाकुरसिंग लिहून घेत होता. मी जी गुंडाळी वाचली होती ती ती नव्हती. ठाकुरसिंगासारख्या, जवळजवळ अशिक्षित समजल्या जाणाऱ्या माणसानें, सर्व माणसांची निजानीज झाल्यानंतर, मध्यरात्रीं, एका जुनाट, अप्रसिद्ध व कवडीमोल कागदावरून कांहीं लिहित बसावें हें मोठेंच चमत्कारिक होय. तेव्हां अर्थातच तो काय लिहित होता हें मी जास्त निरखून पाहूं लागलों. त्या कागदावरील मजकूर तो भराभर टिपून घेत होता त्यावरून ती लिपी त्यास चांगलीच समजत होती हें उघड होतें. मधूनमधून आपलें लिहिणें बंद करून तो आपल्याशींच तालानें डोकें हलवून कांहीं गुणगुणे, त्यावरून तो जें कांहीं लिहून घेत होता त्यापासून त्यास आनंद वाटत असावा असा मी तर्क केला. थोड्याच

१०८०७

वेळानें त्यानें त्या सबंध कागदाची नक्कल केली व पूर्ववत् गुंडाळी करून ती तो ठेवूं लागला.

नंतर त्यास मी विचारलें 'ठाकुरसिंग, इतक्या रात्रीं काय लिहित आहेस ?' ठाकुरसिंगाला मला त्यावेळीं त्या ठिकाणीं पाहून फार आश्चर्य वाटलें. तो किंचित् दचकला व घुटमळत घुटमळत मला ह्मणाला, "कांहीं नाहीं डॉक्टरसाहेब, आपण घेऊन आलेलें दप्तर पहात बसलों होतों, झोंप कांहीं येईना, ह्मणून कांहीं वाचीत होतों."

"होय, पण तूं कांहीं लिहूनहि घेत होतास. काय आहे त्या कागदांत ?" "आमच्या मेवाडी भाषेंतील कांहीं पदें वगैरे आहेत, तीं उतरून घेत होतों" असें तो म्हणाला खरें, पण त्याच्या उतरलेल्या चेहेऱ्यावरून व अडखळत येणाऱ्या आवाजावरून मला तें नीटसें पटलें नाहीं. पण नंतर त्यानें दिव्याची वात अगदीं बारीक केली, दप्तर गडबडीनें बांधून पुनः जागच्याजागीं ठेवलें व तो अंथरुणावर लवंडला त्यामुळें मीहि नंतर कांहीं बोललों नाहीं. परंतु मला त्याचें वर्तन कांहींसें चमत्कारिक वाटलें. आपण जें काय वाचलें व लिहून घेतलें तें हा सांगत नसून कांहींतरी सांगून हा वेळ मारून नेत आहे असें माझ्या मनानें घेतलें व त्याला पुनः तरी निदान मला न विचारतां माझ्या कागदपत्रांस हात लावण्याची संधी आपण देऊं नये अशा हेतूनें मी तें दप्तर कोनाड्यांतून काढून घेतलें व तेथून निघून गेलों. आईला गाढ झोंप लागली होती, मुलेंहि स्वस्थ निजली होतीं, म्हणून पुनः मी आपल्या अंथरुणावर येऊन आंग टाकलें.

त्या रात्रीं मग मला स्वस्थ झोंप आली नाहीं. त्या कागदांत काय लिहिलें असावें त्याचा विचार करितांकरितांच माझा डोळा लागला; तथापि रोजच्याप्रमाणें मी पहाटें उठलों, मुलांना उठविलें व समई

लावून मुलांना 'अभ्यासाला तुम्हीं बसा, मी येतों,' असें सांगितलें. आम्हीं पहाटें अभ्यासाला जेथें बसत असूं तेथेंच ठाकुरसिंग निजत असे. सकाळीं ६ वाजतां निजून उठल्यावर क्षिप्रानदीवर तो स्नानादि कृत्यें उरकण्यास जात असे. मनुष्य मोठा मिष्टभाषणी व मनमिळाऊ असे. साधारण मध्यम बांध्याचा व साधारण देखणा असा तो असून, रजपुती दाढीमुळें तो मोठा भव्य दिसे व कसरतीचें त्याचें शरीर असल्यामुळें तो ४० च्या घरांत असून देखील ३०–३२ वर्षांचा असावा असे दिसे. लहानपणीं कधीं त्यास देवी आल्या होत्या त्याच्या पुसट पुसट खुणा त्याच्या तोंडावर दिसत. असो. मी मुलांच्या जवळ येऊन बसलों, पण रोजच्याप्रमाणें ठाकुरसिंग तेथें निजलेला मला आढळला नाहीं, इतकेंच नव्हे पण त्याचें आंथरूण व खुंटीवर असलेलें सामानहि तेथें कोठें दिसेना ! तेव्हां मला त्याचा संशय आला; मुक्यास उठवून खुणेनें विचारतां त्यासहि कांहीं ठाऊक नाहीं असें कळलें, आईलाहि तो केव्हां गेला व कोठें गेला हें ठाऊक नव्हतें, तेव्हां हा कोणासहि न कळवितां व आपलें सर्व सामान घेऊन निघून गेला तें कां हें नीटपणें लक्ष्यांत येईना. कांहीं चोरी करून गेला कीं काय असा संशय घ्यावा तर आजपर्यंतचें त्याचें वर्तन सुव्यवस्थित होतें व घरांत चोहोंकडे हिंडून पहातां चोरी झाल्याचें कांहीं चिन्ह आढळेना. मग हा कां गेला ? रात्रीं तो जुने कागदपत्र वाचीत व लिहित असतांना मी त्याला पाहिला म्हणून तो ओशाळला व मग चालता झाला कीं काय ? कीं त्या कागदपत्रांत कांहीं त्याच्या नफ्याचा व मला न कळविण्यासारखा मजकूर त्याला आढळला म्हणून तो अदृश्य झाला व तसाच प्रकार असल्यास त्या कागदपत्रांत इतकें महत्त्वाचें काय असावें, असे व अशाच प्रकारचे अनेक विचार माझ्या डोक्यांत घोळूं

लागले. तथापि पहाट होती, अंधार होता व नुसते विचार करीत बसून त्यावेळीं कांहीं उपयोग नव्हता ह्मणून मी सर्व विचार व उद्योग बाजूला सारून, **'हरिः ॐ'** ह्मणून, मुलांच्या अभ्यासाला सुरवात केली.

सकाळ झाल्यावर ठाकुरसिंगाची आम्ही पुष्कळ चवकशी केली, पण त्याचा त्या दिवशी किंवा त्या दिवसानंतरहि कांहीं पत्ता लागला नाहीं. सुमारें ८ दिवसानंतर मी सज्जनसिंहर्जींना चितोडगडास पत्र पाठवून त्यांत ठाकुरसिंगाची सर्व हकीकत लिहिली. त्यांसही झालेल्या प्रकाराचें आश्चर्य वाटलें व शोध लागल्यास कळवितों असें त्यांचें मला उत्तर आलें. ठाकुरसिंग नाहींसा झाला खरा पण त्यामुळें मी आणलेलें दप्तर जवळ जवळ निरुपयोगी होतें असा जो माझा समज झाला होता, तो मात्र नाहींसा झाला व दप्तरांतले सर्व कागदपत्र मी अक्षरान् अक्षर वाचण्याचा व समजून घेण्याचा निश्चय केला. पहिली गुंडाळी मी वाचलीच होती. आतां फक्त दोनच गुंडाळ्या पहावयाच्या उरल्या होत्या. त्यांपैकीं एक मी एक दिवशीं उघडली. पहिल्या कागदाप्रमाणें यावरही **'श्रीमनकामनेश्वराय नमः'** असें लिहिलें असून, त्याखालीं पहिल्याप्रमाणेंच शिक्का उठविलेला असून, त्याखालीं केशरानें केलेली हस्तमुद्रा होती. फार मोठ्या महत्त्वाचे कामासंबंधी वचन, खत वगैरे लिहून द्यावयाचें असलें ह्मणजे हाताला केशर, चंदन किंवा शाई लावून तो हात कागदावर उठवावा, अशी पूर्वींपासून चाल हिंदुस्थानांत चालत आली आहे. मुसलमानी धर्मस्थापक महंमदपैगंबर यानें याप्रमाणें हात ( पंजे ) मारून पुष्कळ राजांशीं तहनामे केले आहेत. याचप्रमाणें, आलमगीर बादशहानें दक्षिणेंत माने व घाडगे यांस आपल्या पक्षाला मिळवून घेतेवेळीं असेच पंजे मारून त्यांस मनसबा, किताब व मरातब लिहून दिले आहेत. 'हात देणें' हें

कराराचें व स्नेहदर्शनाचें चिन्ह असल्याविषयीं सर्व राष्ट्रांची समजूत आहे. असो.

हा कागदहि पहिल्या कागदाप्रमाणें एक सनदच होती, पण तिचें अक्षर असलें विचित्र होतें कीं मला तें जवळजवळ मुळींच समजेना ह्मटलें तरी चालेल. श्रीः, श्रीः, श्रीः, भीमसिंग, विजयसिंग, नीलकंठशास्त्री व इतर कांहीं नांवें येवढीं अक्षरें मीं कशीकशी ओळखलीं, पण अक्षर कांहीं नीट लागेना व मजकूर कांहीं समजेना. तिसरा कागदहि दुसऱ्याप्रमाणेंच असून त्यांतला मजकूर तर कांहींच लक्ष्यांत येईना. पुष्कळ धडपड करून जेव्हां मी कंटाळलों तेव्हां सर्व कागदपत्र मुकाट्यानें गुंडाळून ठेवले व दप्तर माझ्या पेटींत कुलुपांत ठेऊन मी दुसऱ्या कामाकडे वळलों.

पण मनाची चुटपुट कांहीं जाईना. ते कागद फार महत्त्वाचे आहेत व आपणास तर त्यांतले कांहीं कळत नाहीं, आणि ठाकुरसिंगानें मात्र त्यांतील मजकूर भराभर वाचून त्याचा थोडा फार उताराहि करून घेतला हें मला चमत्कारिक वाटलें. अशी ही जुनी लिपी उज्जयिनींत कोणाला वाचतां येईल तर पहावें अशा विचारानें मी पुष्कळ खटपट केली. माधवकॉलेजांतील प्रसिद्ध इतिहाससंशोधक ठाकुर कन्हय्यालालजी या कामांत नांवाजलेले आहेत. पण ते त्यावेळीं लष्करास गेले होते. बसंतीलालजी, महाकाळाचे मंदिरांतील विश्वनाथजी, नव्यापुऱ्यांतील तिलोकचंदजी, अनूपचंदजी वगैरे कित्येक मारवाडी, व रजपूती भाषा जाणणाऱ्यांना मी मजजवळचे कागद दाखविले पण त्यापैकीं कोणासहि ते समाधानकारक रीतीनें वाचून दाखवितां येईनात. पुढें शोध करतां करतां महाकाळेश्वराच्या मंदिरानजीक रहाणारे नारायणजी ज्योतिषी यांस दाखविले तर कांहीं सांगूं शकतील असा शोध लागला.



बडे गणेश, रुद्रसागर, मीठी कुंडी

विक्रमाच्या उज्जयिनींत !



पंडित नारायणजी ज्योतिषी

महाकाळेश्वराच्या मंदिराच्या पश्चिमेस रुद्रसागर तलावाच्या कांठावर, मीठीकुंडी नांवाच्या प्रसिद्ध विहिरीजवळ एका लंबोदराचें मंदिर आहे. या लंबोदर महाकाय गणपतीच्या मंदिराच्या भिंतीवर '**श्री शंकरजीका बेटा, सबसे मोटा, पूजालेने आगू बैठा**' असें लिहिलेलें असून मंदिराच्या भिंतीवर, दारांवर व खिडक्यांवर कांहीं तरी चितारलेलें किंवा लिहिलेलें आहे. मंदिरांत पंडित नारायणजी ज्योतिषी यांचें वास्तव्य असून तेथेंच विद्यार्थ्यांचाहि मोठा समूह त्यांचेपासून विद्येची संथा घेत बसलेला असतो. लांब लांब पांढऱ्या शुभ्र जटा व पिंगट पांढरी मोठी व विस्तीर्ण दाढी व स्थूल शरीर व घोगराघोगरा आवाज, एवंगुण विशिष्ट हे पंडित एकदां पाहिले ह्मणजे सदैव आठवणींत रहाण्यासारखे आहेत. मी सूर्यास्ताचे सुमारास त्यांना जाऊन भेटलों, तेव्हां विद्यार्थ्यांच्या सुट्टीचीं वेळ होती. गुरूजींच्या नाकांवर एक जुना मोडकळीस आलेला चष्मा असून, हातांतल्या चरख्याकडे स्वारी निरखून पहात होती. आसनाच्या आसपास, लीलावती, सूर्यसिद्धांत, भारतीय ज्योतिःशास्त्र, इतर पुस्तकें व कुंडल्या, पत्रिका व इतर कागदपत्र पसरलेले होते. विद्यार्थ्यांनीं आपलीं दप्तरें बांधून ठेविलीं असून, गुरूजी जाण्यास केव्हां सांगतील याची ते वाट पहात होते; कांहीं विद्यार्थ्यांची आपआपसांत जरा मोठ्यानें कुजबूज चालू होती, हेतु हा कीं गुरूजींचें आपणाकडे लक्ष जावें व त्यांनीं शाळा बरखास्त करावी. मी तेथें जातांच सगळे विद्यार्थी उठले व त्यांनीं मला नमस्कार केला. तेव्हां गुरूजींचेंहि लक्ष मजकडे वेधलें व "शिष्टागमने अनाध्यायः" होऊन मुलांना सुट्टी मिळाली.

पहिल्यानें इकडच्या तिकडच्या चार गप्पागोष्टी झाल्यावर मी माझा त्यांना भेटण्याचा हेतू कळविला. ते कागदपत्र माझ्या हातीं कसे आले

हें कळतांच, त्यांनाहि ती गोष्ट ऐकून आश्चर्य वाटल्याचें दिसलें. त्यांनीं अथपासून इतिपर्यंत सर्व गोष्ट नीट ऐकिली, व पुढें मी आपलें दप्तर उघडून त्यांजपुढें सर्व सामान ठेविल्यानंतर ते त्यांतील प्रत्येक वस्तु उत्सुकतेनें निरखून पाहूं लागले.

दप्तरांतील पोथ्या एकामागून एक नीट पाहिल्यावर, त्यांनीं पहिली कागदाची गुंडाळी उघडून नीट निरखून पाहिली व मला ह्मणतात, 'हें मेवाडी अक्षर असून सनदेच्या नमुन्यावर कांहीं लेख दिसत आहेत, तथापि आतां अगदीं संध्याकाळ झाली आहे, माझी संध्येची व आरतीची वेळ झाली आहे यासाठीं आपण आपलें हें दप्तर मजजवळ ठेऊन गेलांत तर........आज गुरुवार आहे,....रविवारीं सायंकाळीं आपण यावें म्हणजे तोंपर्यंत मी थोडें बहुत पाहून ठेवीन.

गुरुजींच्या बरोबर बोलतां बोलतां व त्यांनीं पहिली गुंडाळी पाहून लागलीच ती मेवाडी भाषेंत लिहिलेली सनद असावी असें सांगितल्या-वर ते आपल्याला कांहीं सांगूं शकतील अशी माझी खात्री झाली, तेव्हां त्यांनीं सांगितल्याप्रमाणें माझें दप्तर मी त्यांच्या स्वाधीन केलें व रविवारीं संध्याकाळीं येण्याचें ठरवून मीहि क्षिप्रा नदीवर संध्येला गेलों.

---

## प्रकरण सहावें

## पूर्वसूत्र

**नाभिषेको न संस्कारः सिंहस्य क्रियते वने ।**
**विक्रमार्जितसत्वस्य स्वयमेव मृगेंद्रता ॥** हितोपदेश.*

ठरल्याप्रमाणें रविवारीं सायंकाळीं पांच वाजतां मी नारायणजी ज्योतिषी यांच्याकडे गेलों. तेहि माझी वाटच पहात होते. माझी व

---

* अरण्यामध्यें सिंहास कोणी अभिषेकहि करीत नाहीं किंवा संस्कारहि करीत नाहीं; तर तो आपल्या पराक्रमानेंच श्वापदांच्या राजाचें पद पावतो.

त्यांची दृष्टादृष्ट होतांच ते मला म्हणाले, 'डॉक्टरसाहेब, आपण आतां हरसिद्धीच्या रस्त्याला जाऊं म्हणजे दोन दिवसांत मी काय केलें तें, जातां जातां, आपणांस स्वस्थपणानें सांगतां येईल. येथेंच आपण बसलों तर, लोकांच्या येण्याजाण्यामुळें आपल्याला स्वस्थपणा मिळावयाचा नाहीं.'

जी सूचना खरोखर मी करावयाची, ती गुरुजीनींच केल्यावर मी फार आनंदलों, आणि गुरुजीनीं कागद बांधलेलें दप्तर बरोबर घेतल्यावर आह्मीं रुद्रसागर तलावाच्यामधून पाण्यांतून जो रस्ता हरसिद्धीकडे जातो त्या रस्त्याला लागलों.

हा रस्ता तलावाच्या मधून गेल्यामुळें दोन्हीं बाजूंना पाण्याची सुंदर शोभा दिसते. पाण्यांत कमळें, शिंगाडे व इतर नानातऱ्हेच्या वनस्पती असल्यानें देखावा मोठा नयनमनोहर दिसतो. त्या रस्त्यावर रहदारी जवळ जवळ नाहींच आणि ह्मणून गुरुजीनीं तो पसंत केला होता. गुरुजींच्या घरापासून बऱ्याच अंतरावर गेल्यावर हिरवळ उगवलेल्या एका उंचवट्यावर आह्मीं बसलों व तेथें गुरुजींनीं आपलें दप्तर उघडलें. रस्त्यांत इकडल्यातिकडल्या कांहीं गोष्टी निघाल्या होत्या त्या संपल्यावर गुरुजी ह्मणाले 'डॉक्टरसाहेब, मीं शुक्रवार व शनवार दोन दिवस तुमचे कागद थोडेथोडे चाळले त्यावरून व तुम्हीं सांगितलेल्या गोष्टीवरून एकंदर प्रकार तर मोठा चमत्कारिक व मनोवेधक दिसतो.'

मीं मोठ्या उत्सुकतेनें त्यांस प्रश्न केला, 'तो कसा काय ?'

"दप्तरांतील सगळीं पुस्तकें व कागदपत्र वाचावयाला मला कांहीं वेळ मिळाला नाहीं पण जेवढें मी चाळलें तेवढें तुह्माला सांगतों. तुम्हांला राजस्थानाचा, निदान मेवाडचा इतिहास थोडाबहुत ठाऊक आहे काय ?"

मी आपला ‘ ॐ हुं: ’ ह्मणून मोकळा झालों. हो, इंग्लंडचा, ग्रीसचा व रोमचा इतिहास आम्हांला कारणापुरता वाचावा लागल्यामुळें थोडाबहुत तरी लक्ष्यांत होता, पण राजस्थानचा इतिहास, आम्हांस पाठशाळेंतून शिकवणार कोण व आम्ही तो मनःपूर्वक वाचतों तरी कशाला ? इंग्रजी इतिहासकारांच्या दृष्टीनें हिंदुस्थानच्या इतिहासाचे तीनच भाग पडतात,—पौराणिक व मुसलमान पूर्व इतिहास, मुसलमानी रियासत व ब्रिटिश रियासत. त्यांतल्यात्यांत शेवटच्या भागावर ग्रंथकर्त्यांचा व परीक्षकांचा जोर फार, त्यामुळें हिंदुस्थानांतल्या आह्मांला राष्ट्रीय दृष्टया उपयुक्त असा क्षत्रिय व मराठे वीर यांचा साद्यंत व विश्वसनीय इतिहास शिकविणार कोण व कशाला ? राजस्थानाचा इतिहास मीं वरवर चाळला होता व त्यांतून भीमसिंगाचें पूर्ववृत्त मी चवथ्या प्रकरणांत सांगितलें आहे. तथापि नारायणजी आपणांस कांहीं अश्रुतपूर्व माहिती देतील या हेतूनें मी ॐ हूं म्हटलें. एखादा मनुष्य आपल्यास कांहीं गोष्ट सांगण्यास प्रवृत्त झाला असतां आपण जर ती गोष्ट ऐकण्याचें नाकारलें अगर आपणांस ती ठाऊक असल्याचें दर्शविलें तर तो गोष्ट सांगणारा मनुष्य कसा हिरमुसला होतो हें सर्वांस ठाऊकच आहे. मी ऊ हूं ह्मटल्यावर गुरुजींनीं थोडीशी अभिमानयुक्त मुद्रा धारण करून म्हटलें कीं, “राजस्थानाचा इतिहास जो थोडाबहुत मला ठाऊक आहे तो सांगतांना मला किती अभिमान वाटत आहे हें आपणांस सांगून समजावयाचें नाहीं. कारण मी स्वतः मेवाडचा रहिवासी आहे. राजस्थानचा इतिहास पाहिला तर क्षत्रियांच्या उत्पत्तीपासून नंदराजापर्यंत वेद व पुराणें यांजवरून माहिती मिळते. राजस्थानांत विवस्वान् ह्मणून एक राजा होऊन गेला. विवस्वान् ह्मणजे सूर्य व त्यावरून त्याचे वंशास सूर्यवंश ह्मणण्याची रूढी पडली. रामचंद्र व एकंदर रघुवंश

यांचे वंशज यांना सूर्यवंशज ह्मणतात व श्रीकृष्ण, पांडव व कुरुवंश यांच्या वंशजांना सोमवंशीय असें ह्मणतात. या सूर्यवंशाचे राजे व सोमवंशाचे राजे पूर्वी हस्तिनापुरास राज्य करीत असत. त्यांच्यापैकीं विक्रमादित्य नांवाच्या राजानें इंद्रप्रस्थ किंवा हस्तिनापुर येथील राजधानी मोडून अवंतीस–उज्जयिनीस आपलें सिंहासन आणलें. त्याचें राज्य येथें ८०० वर्षें अव्याहत चाललें होतें. विक्रमादित्य व त्याचा बंधू भर्तृहरि यांनीं उज्जयिनी ही राजधानी केल्यापासून ज्योतिःशास्त्रवेत्ते उज्जयिनी हीच ग्रहांचे वेध घेण्यास पृथ्वीचा मध्यबिंदु कल्पूं लागले. तो अद्यापि हिंदु ज्योतिषांत तसाच चालू आहे. हा विक्रमादित्य राजा रजपुतांच्या यदुवंशापैकीं परमार शाखेतील आहे. असो.

मेवाडची राजधानी पूर्वीची चितोड व हल्लींची उदेपुर आहे. तेथील राजास राणा ह्मणतात. हें राजघराणें सूर्यवंशांत वडील असून, क्षत्रियांचीं जीं ३६ कुळें आहेत त्यांत हें पहिलें आहे. या राण्याचा असा अभिमान आहे कीं, आम्हीं मानवी वंशापैकीं नसून, आमचा दैवीवंश–ह्मणजे सूर्यनारायणापासून–आहे. याच राजवंशांत बाप्पा रावळ या नांवाचा फार पराक्रमी राजा झाला. उदेपुरच्या राजांना पूर्वी 'रावळ' हें नांव होतें पण त्यांनीं पुढें मोठे पराक्रम केले व आपणांस 'राणा' हें पद घेतलें. उदेपुराजवळ पाराशर नांवाचें अरण्य आहे, त्यांत त्रिकुटाचल नांवाचा पर्वत असून त्याचे पायथ्याशीं नागेंद्र नांवाचें एक शहर असे. हल्लीं या शहराला 'नागदा' असें ह्मणतात. या नागेंद्र क्षेत्रांत एक महादेवाचें स्थान असून तें सर्व राजस्थानाचें मोठें पूज्य दैवत आहे. या महादेवाचें नांव 'एकलिंग' असें आहे. ह्यास सर्व सर्पाचेच अलंकार असल्यामुळें नागेंद्र हें जें त्या क्षेत्राचें नांव आहे तेंच त्यांस दिलें आहे. हें देवस्थान फार मोठें असून खुद्द उदेपुरचा राणा

हा आपल्यास त्या देवस्थानाचा दिवाण, असें म्हणवितो. बाप्पा रावळानें एकलिंगजीचें हें मंदिर बांधलें. हा राजा महापुण्यवान् होता. हा मेल्यावर त्याच्या शवाची कमलपुष्पें झालीं अशी दंतकथा आहे."

मी म्हटलें "अशा दंतकथा कशा प्रचलित होतात कोण जाणे? कबीर, एकनाथ वगैरे साधूंच्या शवांचीहि हीच स्थिति झाल्याबद्दल अनेक दंतकथा मी ऐकल्या आहेत. ज्या थोर पुरुषांच्या मृत्यूनंतर त्यांच्या शवांचे व्यवस्थेविषयीं तक्रारी पडतात त्या शवांचीं फुलें झाल्या-बद्दलच्याच दंतकथा नेहमीं ऐकूं येतात.

"काय असेल तें असो. या बाप्पा रावळ नंतर चितोडच्या गादीवर पुष्कळ राजे बसले, त्यांत लखमसी-(लक्ष्मणसिंह), समरसी (समर-सिंह), हमीर, लाखाराणा, कुंभोराणा, संगराणा-(संग्रामसिंह) प्रतापसिंह, राजासिंग, वगैरे राणे मोठे प्रसिद्धीस आले. हा शेवटचा प्रसिद्ध राणा राजसिंग याला भीमसिंग व जयसिंग असे दोन मुलगे होते.'

राजपुत्र भीमसिंग याचें नांव कानीं पडतांच, मी जास्त उत्सुकतेनें तो इतिहास ऐकूं लागलों. नारायणजी ज्योतिषी पुढें ह्मणाले--

"तुह्माला जे कागदपत्र व पोथ्या पुस्तकें मिळालीं आहेत, त्यांत राणा राजसिंग याची बरीच हकीगत असून, त्यांचा ज्येष्ठ पुत्र भीमसिंग हा उज्जयिनीस येऊन राहिला व त्यानें येथें एक शिवमंदिर बांधून त्याची चांगली व्यवस्था लाविली वगैरे हकीगत आहे."

आतां आपणांस पाहिजे असलेली माहिती मिळणार असें वाटून मला मोठा आनंद झाला. गुरूजींनीं दप्तरांतली एक पोथी उचलली व ते ह्मणाले "ही पोथी 'सूर्य अथर्वशीर्षाची' आहे, राजपुत्र भीमसिंग हा मोठा सद्गुणी व धार्मिक मनुष्य होता व तो सूर्योपासक असणारच तेव्हां ही

पोथी कदाचित् त्याच्या नित्यपाठांतली असेल. ही दुसरी पोथी 'पृथ्वीराज रासा' या ग्रंथाचा कांहीं भाग दिसत आहे. ही मी अद्याप उघडून पाहिली नाहीं. तिसरा ग्रंथ 'पंचरत्न गीता' हा आहे. चवथी पोथी 'राजविलास' नांवाची आहे. हें नांव मी पूर्वीं कधीं ऐकलें नव्हतें ह्मणून मी ती पोथी वाचून पाहिली. ही पोथी या दप्तरांतील एक महत्वाचा भाग आहे. त्यावरून राजपुत्र भीमसिंग हा बापाच्या मागें गादीचा वारस न होतां मेवाडचें राज्य सोडून उज्जयिनीकडे कां आला याचा उलगडा होतो. हा पद्यग्रंथ आहे. भाषा सोपी व फार मधुर आहे व राणा राजसिंग याच्या कारकीर्दीचें भाटानीं केलेलें हें वर्णन आहे. ग्रंथाची भाषा अस्सल जुनी मेवाडी व अक्षरहि थोडें बारीक आहे, तेव्हां या वेळेला मूळ ग्रंथ दाखवावयाच्या भानगडीला मी न पडतां त्यांतलें तात्पर्य तुह्मांला सांगतो.

मेवाडच्या या राणा राजसिंगाला पुष्कळ स्त्रिया होत्या. त्यांचे आपापसांत कलह चालत असत. राण्यानें पुष्कळ स्त्रिया केल्या परंतु त्यास बरेच दिवस संतान होईना, ह्मणून जोधबाई या नांवाच्या राजकन्येबरोबर त्यानें पुनः विवाह केला. अंतःपुरांतील कलहाला त्या योगानें जास्त उत्तेजन आलें. तें लग्न होण्याला आणि दुर्दैवानें मेवाड प्रांतावर दुष्काळाचें एक मोठें अरिष्ट येण्याला गांठ पडली. आलेल्या दुष्काळांतून आपली प्रजा कशी वाचेल व तिचा निर्वाह कसा चालेल याबद्दलची राणा राजसिंग यास मोठी चिंता पडली होती व त्यांत सवतीमत्सरानें ग्रस्त झालेल्या व नवपरिणीत राणीवर राजाचें प्रेम बसून आपणांकडे त्याचें दुर्लक्ष होईल या समजुतीनें इतर राण्यानीं राजसिंगाच्या मनांत असें भरवून दिलें कीं राणी जोधबाईच्या पायगुणामुळें तिच्या येण्याच्या पाठोपाठच भयंकर दुष्काळहि आला. राणा राजसिंग

हा आपल्यास त्या देवस्थानाचा दिवाण, असें म्हणवितो. बाप्पा रावळानें एकलिंगजीचें हें मंदिर बांधलें. हा राजा महापुण्यवान् होता. हा मेल्यावर त्याच्या शवाची कमलपुष्पें झालीं अशी दंतकथा आहे."

मी म्हटलें "अशा दंतकथा कशा प्रचलित होतात कोण जाणे? कबीर, एकनाथ वगैरे साधूंच्या शवांचीहि हीच स्थिति झाल्याबद्दल अनेक दंतकथा मी ऐकल्या आहेत. ज्या थोर पुरुषांच्या मृत्यूनंतर त्यांच्या शवांचे व्यवस्थेविषयीं तक्रारी पडतात त्या शवांचीं फुलें झाल्याबद्दलच्याच दंतकथा नेहमीं ऐकूं येतात.

" काय असेल तें असो. या बाप्पा रावळ नंतर चितोडच्या गादीवर पुष्कळ राजे बसले, त्यांत लखमसी-( लक्ष्मणसिंह ), समरसी ( समरसिंह ), हमीर, लाखाराणा, कुंभोराणा, संगराणा-( संग्रामसिंह ) प्रतापसिंह, राजसिंग, वगैरे राणे मोठे प्रसिद्धीस आले. हा शेवटचा प्रसिद्ध राणा राजसिंग याला भीमसिंग व जयसिंग असे दोन मुलगे होते.'

राजपुत्र भीमसिंग याचें नांव कानीं पडतांच, मी जास्त उत्सुकतेनें तो इतिहास ऐकूं लागलों. नारायणजी ज्योतिषी पुढें ह्मणाले--

"तुह्माला जे कागदपत्र व पोथ्या पुस्तकें मिळालीं आहेत, त्यांत राणा राजसिंग याची बरीच हकीगत असून, त्यांचा ज्येष्ठ पुत्र भीमसिंग हा उज्जयिनीस येऊन राहिला व त्यानें येथें एक शिवमंदिर बांधून त्याची चांगली व्यवस्था लाविली वगैरे हकीगत आहे."

आतां आपणांस पाहिजे असलेली माहिती मिळणार असें वाटून मला मोठा आनंद झाला. गुरूजींनीं दप्तरांतली एक पोथी उचलली व ते ह्मणाले "ही पोथी 'सूर्य अथर्वशीर्षाची' आहे, राजपुत्र भीमसिंग हा मोठा सद्गुणी व धार्मिक मनुष्य होता व तो सूर्योपासक असणारच तेव्हां ही

पोथी कदाचित् त्याच्या नित्यपाठांतली असेल. ही दुसरी पोथी 'पृथ्वीराज रासा' या ग्रंथाचा कांहीं भाग दिसत आहे. ही मी अद्याप उघडून पाहिली नाहीं. तिसरा ग्रंथ 'पंचरत्न गीता' हा आहे. चवथी पोथी 'राजविलास' नांवाची आहे. हें नांव मी पूर्वीं कधीं ऐकलें नव्हतें ह्मणून मी ती पोथी वाचून पाहिली. ही पोथी या दप्तरांतील एक महत्वाचा भाग आहे. त्यावरून राजपुत्र भीमसिंग हा बापाच्या मागें गादीचा वारस न होतां मेवाडचें राज्य सोडून उज्जयिनीकडे कां आला याचा उलगडा होतो. हा पद्यग्रंथ आहे. भाषा सोपी व फार मधुर आहे व राणा राजसिंग याच्या कारकीर्दीचें भाटानीं केलेलें हें वर्णन आहे. ग्रंथाची भाषा अस्सल जुनी मेवाडी व अक्षरहि थोडें बारीक आहे, तेव्हां या वेळेला मूळ ग्रंथ दाखवावयाच्या भानगडीला मी न पडतां त्यांतलें तात्पर्य तुह्मांला सांगतो.

मेवाडच्या या राणा राजसिंगाला पुष्कळ स्त्रिया होत्या. त्यांचे आपापसांत कलह चालत असत. राण्यानें पुष्कळ स्त्रिया केल्या परंतु त्यास बरेच दिवस संतान होईना, ह्मणून जोधबाई या नांवाच्या राजकन्येबरोबर त्यानें पुनः विवाह केला. अंतःपुरांतील कलहाला त्या योगानें जास्त उत्तेजन आलें. तें लग्न होण्याला आणि दुर्दैवानें मेवाड प्रांतावर दुष्काळाचें एक मोठें अरिष्ट येण्याला गांठ पडली. आलेल्या दुष्काळांतून आपली प्रजा कशी वाचेल व तिचा निर्वाह कसा चालेल याबद्दलची राणा राजसिंग यास मोठी चिंता पडली होती व त्यांत सवतीमत्सरानें ग्रस्त झालेल्या व नवपरिणीत राणीवर राजाचें प्रेम बसून आपणांकडे त्याचें दुर्लक्ष होईल या समजुतीनें इतर राण्यानीं राजसिंगाच्या मनांत असें भरवून दिलें कीं राणी जोधबाईच्या पायगुणामुळें तिच्या येण्याच्या पाठोपाठच भयंकर दुष्काळहि आला. राणा राजसिंग

मनाचा थोर, अंतःकरणाचा उदार, दयाशील पण भोळा होता. ज्योतिषावर त्याचा फार भरंवसा असे व त्याची स्वतःची वर्तणूक, आपल्याकडे सर्व अम्मल राखून सर्वांवर सारखा दरारा ठेवण्यासारखी नव्हती, त्यामुळें, इतर राण्यांनीं, ज्योतिषांचें मार्फत नव्या राणीच्या पायगुणाविषयीं इतका गवगवा केल्यावर व राण्यानेंहि, दुष्काळ निवारणार्थ, होमहवनें, बलिदान आणि दुसरीं शांतिस्वास्थ्य प्राप्त होण्याकरितां करावयाचीं जीं कर्में तीं करून, ब्राह्मणांचा व देवांचा आशिर्वाद घेतल्यावरहि दुष्काळाचें भयंकर स्वरूप जेव्हां कमी होईना, तेव्हां जोधबाईच्या पायगुणाबद्दल त्याचीहि मनोदेवता त्यास तसें सांगूं लागली. रूपनगरची राजकन्या रूपमती* ही एक राणी मात्र जोधबाईच्या पक्षाची असून तिनें राण्याचें मन जोधबाईसंबंधीं शुद्ध ठेवण्याचा मनःपूर्वक प्रयत्न केला व त्यामुळें राणा राजसिंग यानें तिला कोणत्याहि प्रकारें शारीरिक कष्ट होऊं दिले नाहींत. खुद्द राण्याला तर काय पण शकुनापशकुनावर विश्वास ठेवणाऱ्या सर्व लोकांना जोधबाईच्या अपशकुनी ह्मणून उठविलेल्या पायगुणांचा खरेपणा वाटूं लागला; कारण आषाढाचा महिना संपून गेला तरी पर्जन्याचा बिंदु पडला नाहीं व राणा राजसिंग व राणी जोधबाई यांचा विवाह वैशाखांत झालेला. त्याचप्रमाणें श्रावण व भाद्रपद हेंहि पावसाळ्यांतले मुख्य दोन महिने अगदीं कोरडे ठणठणीत गेले; तेव्हां सर्व जग जसें खायाला उठलें! हें महासंकट जाणून राणा राजसिंग यानें आपला कुलस्वामी जो एकलिंगजी त्याचें देवालयांत जाऊन प्रार्थना केली कीं, "हे ईश्वरा, सर्व

---

* रूपनगरची राजकन्या—लेखक कै. हरी नारायण आपटे. या पुस्तकांत राणा राजसिंग व रूपमती यांच्या संबंधीं उत्कृष्ट माहिती दिली आहे. कै. हरीभाऊंच्या उत्तम पुस्तकांपैकीं हें एक आहे.

जीवजंतूंची काळजी तुला आहे! त्यांचें रक्षण करणार तूंच समर्थ आहेस!" परंतु ईश्वरच कोपला; तेथें नुसत्या प्रार्थना काय करणार? अवघें जग क्षुधेनें पिडून, सर्व लोक अन्नान्नगत झाले! क्षुधेची शांति करण्याकरितां, कधीं कोणीं ज्यांच्याकडे ढुंकूनहि पाहिलें नाहींअसे पदार्थ लोकांनीं भक्षावें. आई, बाप, बहीण, भाऊ, नवराबायको वगैरे मनुष्यांचीं परस्पर नातीं हीं दरोबस्त एकीकडे राहून, कोणीच कोणाविषयीं परवा बाळगीनासें झालें. ज्याला त्याला आपलें पोट जड झालें; तेव्हां, इतरांची काळजी आणि मायाममता बाळगण्याचें कोणाला सुचणार? फार तर काय, पण आईबापांनीं आपलीं पोरें देखील विकलीं! जो जो दिवस उजाडावा तो तो अत्यंत भयंकर असा प्रत्येकास दिसावा! प्रतिदिवशीं दुष्काळाचें पाऊल आपलें पुढें! लहानसहान आणि बारीकसारीक असे एकंदर जीवजंतु देखील मृत्यु पावले? ते तरी वांचतात कशानें? त्यांना खायला काय होतें? सर्व वयाचे हजारों लोक क्षुधादेवतेला बळी पडले! एका भुकेला पुरेसें अन्न दोन दोन तीन तीन भुकांना पुरवून लोक खाऊं लागले; परंतु अशानें काय होणार? सर्वदा पश्चिमेकडचा उष्णवारा वाहून सर्व पृथ्वी अगदीं तप्त होऊन गेली! त्यामध्येंच पटकीसारखे भयंकर रोग उद्भवले! मग काय विचारावयाचें आहे? रात्रीं निरभ्र आकाशांत तारागण चकचकीत दिसावा! रात्रंदिवसाच्या कोणत्याहि काळांत आकाशामध्यें ढगाचा एक बिंदूहि दिसत नव्हता! मग विजेचें चमकणें आणि मेघगर्जना यांची कल्पना तरी कशाला? अशा वर्षर्तूमध्यें असे कोरडे दिवस, ह्मणजे जगाची काय स्थिति असावी? नद्या, तळीं, विहिरी वगैरे सर्व कोरडीं शुष्क होऊन पडलीं! मोठमोठ्या धनिकांची आणि अठराविश्वे दरिद्र असलेल्यांची एकच स्थिति होऊन गेली! ब्राह्मणांनीं आपलीं कर्में सोडलीं. चारहि एकंकार

होऊन, त्यांच्यामध्यें परस्पर जातिबंधारण मुळींच राहिलें नाहीं ! शूद्र कोणता व ब्राह्मण कोणता हें मुळींच ओळखूं येईनासें झालें ! 'सर्वा-रंभाः तंडुलाः प्रस्थमूलाः' हें जें तत्त्व, याजकडे सर्वांचें पहाणें ! मनुष्य-मात्राची शक्ति, विचार, शहाणपणा, कसब, युक्ति, धर्म, आचार, हीं सर्व एका बाजूला राहून, जो तो पोटाच्या विवंचनेंत अगदीं बुडून गेलेला दिसे ! कोणाच्या तोंडावर उत्साह किंवा कळा हीं दिसेनाशी होऊन, जिकडेतिकडे मूर्तिमंत बुभुक्षितत्व दृष्टीस पडूं लागलें ! जाति-वर्णविचार आणि तत्संबंधाचे अभिमान हे क्षुद्वेदनाग्नीमध्यें जळून, भाजून व करपून ठार झाले ! सर्व भूप्रदेशावर कोठेंहि ओलसर वृक्ष, पर्ण, पुष्प, लता, वल्ली, वगैरे दिसेनाशीं झालीं ! तीं गेली कोठें ? तीं सर्व मनुष्यांच्या भक्षस्थानीं पडलीं ! लोकांनीं झाडाच्या सालीदेखील सोलून खाल्ल्या ! मनुष्याला मनुष्यानें खाण्याचा प्रसंग आला ! सर्वत्र उदास आणि भणभण दिसूं लागलें ! शहरें व गावें सर्व उध्वस्त पडलीं ! जेथें कोठें कांहीं खाण्याचा सुगावा लागेल तिकडे लोक धांवूं लागले. ज्यांस अन्नानें ह्या संकटाचें निवारण करण्याचें सामर्थ्य राहिलें नाहीं त्यांनीं तर आत्महत्या करून घेतल्या ! मोठमोठीं घराणीं देशोधडीस लागलीं ! बहुत कुटुंबें तर निर्वंश झालीं ! जलचर, स्थलचर व व्योमचर असे मनुष्यावांचून प्राणी दृष्टीस पडेनासे झाले ! सर्व लोकांच्या आशा अगदीं नष्ट झाल्या ! सर्व पृथ्वी निःसत्व होऊन मृत्तिकावशिष्ट राहण्याची सर्व चिन्हें दिसूं लागलीं. * अशा वेळी राणी जोधबाईवर केलेला आरोप सर्वांस खरा वाटला यांत काय आश्चर्य आहे ? लग्न झाल्यानंतर एका वर्षाच्या आंतच जोधबाईच्या पोटीं कुमार भीमसिंग याचा जन्म झाला. दुष्काळाचा वणवा जर न पेटता तर ज्या कुमाराच्या जन्म-

---

* राजस्थानचा इतिहास.

प्रसंगीं मेवाडच्या राज्यांत आनंदी आनंद झाला असता व जोधबाई जवळजवळ पट्टराणीच्या पदाला पोचली असती, तो कुमार व त्याची आई यांना विनाकारण अज्ञातवासांत दिवस कंठावे लागले. राणी रूपमती इच्या पोटी त्याच सुमारास भीमसिंग राजपुत्राच्या जन्मानंतर सुमारें एका महिन्यानें, कुमार जयसिंग याचा जन्म झाला. वास्तविक पाहिलें तर राणा राजसिंग याचा उदार व निर्मत्सर स्वभाव लक्षांत घेतां त्याचें उभयतां राजपुत्रांवर सारखेंच प्रेम असावयास पाहिजे होतें, पण मेवाडावर संकट येण्यास जोधबाई कारण झाली अशा समजुतीनें त्याचें जोधबाईवरचें व त्यामुळें पर्यायानें कुमार भीमसिंगावरचें लक्ष व प्रेम कमी कमी होत गेलें. त्याचा परिणाम असा झाला कीं दोन्हीं मुलें मोठीं झाल्यावर एके दिवशीं दसऱ्याचे मुहूर्तावर राण्यानें अमरदोब नांवांची मुळी कुमार जयसिंग याचे हाताला बांधली, आणि पर्यायानें असें दर्शविलें कीं आपल्या पश्चात् कुमार जयसिंग यास राज्याभिषेक व्हावा. कुमार भीमसिंग हा वडील असल्यानें युवराजपद द्योतक ती मुळीं खरें पाहिलें तर त्याचे हातास बांधावयास पाहिजे होती, पण राण्यानें मुद्दामच तसें केलें नाहीं, आणि त्यामुळें राजसिंगाच्या मृत्यूनंतर कुमार जयसिंगास राज्यपद प्राप्त झालें. असें म्हणून गुरुजीनीं मी मागील प्रकरणांत राजस्थानाच्या इतिहासांतून उद्धृत करून लिहिलेलीच हकीगत जवळजवळ मला सांगितली.

गुरुजी पुढें म्हणाले—अशा प्रकारची सर्व हकीगत त्या राजविलास ग्रंथांत आहे. सबंध ग्रंथ मला वाचावयाला फुरसत मिळाली नाहीं, पण बहुतेक वर्णन राणा राजसिंग याच्या संबंधानेंच आहे व त्यावरूनच ग्रंथांस 'राजविलास' हें नांव दिलें आहे हें उघड आहे. असो. आतां उरलेली ही पोथी 'मनकामनेश्वर' स्तोत्राची असून

"कोण जाणे बोवा? मी हे सबंध कागदपत्र अजूनपर्यंत वाचून पाहिले नाहींत, पण ज्याअर्थी हे कागदपत्र कोणाच्याहि हातीं पडण्याचा पूर्ण संभव होता त्याअर्थी त्या दूरदर्शी भीमसिंगानें त्या गुप्तस्थानाचा उल्लेख अगदीं स्पष्ट स्पष्ट शब्दांत केलेला नसावा; कांहीं सांकेतिक शब्दयोजना केली असेल व असलीच सांकेतिक शब्दयोजना केलेला एक कागद त्यानें पूजाऱ्याच्या घरीं देवघरांत ठेवण्यासाठीं त्याच्या हवालीं केला असावा, म्हणजे जरी कदाचित तो कोणाच्या हातीं पडला तरी त्या योगानें कांहीं अर्थबोध होऊं नये. असो. ही तिसरी गुंडाळी काय असावी याची मलाहि अद्याप नीट अटकळ करितां येत नाहीं. कारण त्यांतल्या शब्दांचा अर्थच लागत नाहीं व काय लिहिलें आहे तें बरोबर कळत नाहीं, मग ती काय कांहीं सांकेतिक लिपी आहे कीं काय कोण जाणे. पण आतां आपण घरीं जाऊं. उद्यां सायंकाळीं पुन्हां आपण भेटलों म्हणजे पुन्हां या संबंधानें बोलूं. ती शिष्यमंडळी मजकडेसच येत आहेत. तर आतां जयरामजीकी."

मीहि त्यांना 'जयरामजी' केला.

---

## प्रकरण सातवें

# शोधाला सुरवात

शास्त्रें, विद्या, ललित, कविता, धर्मनिष्ठा, प्रताप, ।
होतीं जेव्हां करित वसती आर्यलोकीं अमूप, ॥
होता जेव्हां विलसत जगीं विक्रमादित्य राया ।
तेव्हां नांदे प्रथित भुवनीं ती पुरी ह्याच ठायां ॥ १ ॥

वासुदेव शास्त्री खरे.

"मी आज बरींच वर्षें उज्जयिनीस आहे, पण अद्यापपर्यंत भीमसिंहानें बांधलेल्या मनकामनेश्वराच्या मंदिरासंबंधानें बोलतांना कोणास

" कोण जाणे बोवा ? मी हे सबंध कागदपत्र अजूनपर्यंत वाचून पाहिले नाहींत, पण ज्याअर्थी हे कागदपत्र कोणाच्याहि हातीं पडण्याचा पूर्ण संभव होता त्याअर्थीं त्या दूरदर्शी भीमसिंगानें त्या गुप्तस्थानाचा उल्लेख अगदीं स्पष्ट स्पष्ट शब्दांत केलेला नसावा; कांहीं सांकेतिक शब्दयोजना केली असेल व असलीच सांकेतिक शब्दयोजना केलेला एक कागद त्यानें पूजाऱ्याच्या घरीं देवघरांत ठेवण्यासाठीं त्याच्या हवालीं केला असावा, म्हणजे जरी कदाचित तो कोणाच्या हातीं पडला तरी त्या योगानें कांहीं अर्थबोध होऊं नये. असो. ही तिसरी गुंडाळी काय असावी याची मलाहि अद्याप नीट अटकळ करितां येत नाहीं. कारण त्यांतल्या शब्दांचा अर्थच लागत नाहीं व काय लिहिलें आहे तें बरोबर कळत नाहीं, मग ती काय कांहीं सांकेतिक लिपी आहे कीं काय कोण जाणे. पण आतां आपण घरीं जाऊं. उद्यां सायंकाळीं पुन्हां आपण भेटलों म्हणजे पुन्हां या संबंधानें बोलूं. ती शिष्यमंडळी मजकडेसच येत आहेत. तर आतां जयरामजीकी."

मीहि त्यांना 'जयरामजी' केला.

---

## प्रकरण सातवें

# शोधाला सुरवात

शास्त्रें, विद्या, ललित, कविता, धर्मनिष्ठा, प्रताप, ।
होतीं जेव्हां करित वसती आर्यलोकीं अमूप, ॥
होता जेव्हां विलसत जगीं विक्रमादित्य राया ।
तेव्हां नांदे प्रथित भुवनीं ती पुरी ह्याच ठायां ॥ १ ॥

वासुदेव शास्त्री खरे.

"मी आज बरींच वर्षें उज्जयिनीस आहे, पण अद्यापपर्यंत भीमसिंहानें बांधलेल्या मनकामनेश्वराच्या मंदिरासंबंधानें बोलतांना कोणास

ऐकलें नाहीं. बहादरगंजांत एक मनकामनेश्वर आहे पण तो हा नव्हे; कारण हा अगदीं अलीकडे बांधला असावा असें दिसतें. आज सकाळीं जेव्हां मी आपलें दप्तर पुनः एकदां चाळून पाहिलें तेव्हां त्यांतसुद्धां मला जागेबद्दल कांहीं निश्चित बातमी मिळाली नाहीं. तथापि तर्कच लढवावयाचा असेल तर शोध करावयाला एक अंधुकसा मार्ग आहे, त्यावरून कांहीं पत्ता लागला तर पहा." असें ह्मणून गुरुजींनीं माझ्यासमोर "नकाशा उज्जयिनी शहराचा" ( भैरव गढसहित ) असें नांव असलेला नकाशा उघडला, व ते ह्मणाले कीं,

वायव्य उत्तर ईशान्य

कालियादेह

# उज्जयिनी

भैरवगढ

सिद्धवट

पश्चिम श्री महाकालेश्वराचें मंदिर पूर्व

चिंतामण गणेश भर्तृहरीची गुहा

जवाशिया कालिकामाता

अंकपात

आ ग गा डी चा रस्ता रेल्वे स्टे श न

जयसिंगाची वेधशाळा **त्रिवेणी** { सरस्वती, शिप्रा, ख्याता }

शि प्रा न दी


नैऋत्य दक्षिण आग्नेय

"हा नकाशा अर्वाचीन उज्जेन व आसपासच्या स्थलांचा आहे, प्राचीन उज्जयिनीचा नव्हे व तसा आतां उपलब्ध होणें शक्यहि नाहीं. कारण विक्रमराजानें उज्जयिनी नगरी पालथी घातल्यामुळें त्या कालचीं स्थळें आतां सर्व अदृश्य झालीं आहेत. शहराच्या उत्तरेस क्षिप्रा नदीच्या किनाऱ्याकिनाऱ्यानें जाऊं लागलें ह्मणजे भर्तृहरीच्या गुहेच्या आजूबाजूला पूर्वीं मनुष्यवस्ती तेथें असल्याचीं चिन्हें स्पष्ट दिसूं लागतात. एकाकाळीं प्रचंड झंझावात सुटून त्यायोगानें उत्पन्न झालेले धुळीचे ढीगच्या ढीग उज्जयिनी नगरीवर येऊन पडले व त्यायोगानें ती नष्ट झाली असावी असा कित्येकांचा तर्क आहे; तर कांहीं शोधकांचें असें मत आहे कीं, भूकंपाचे योगानें कांहीं शतकांपूर्वीं उज्जयिनी पृथ्वीचे पोटांत गडप्प झाली असून विक्रमानें ती पालथी घातली ही निवळ कविकल्पना होय. तें कसेंहि असो. आजकालचें हें उज्जेन शहर फार फार तर ४०० वर्षांचें जुनें असावें. सबंध शहरांत "चोवीस खांबाच्या" दरवाजाखेरीज प्राचीन अशी एकहि इमारत नाहीं. कुमार भीमसिंग येथें आल्याला फार तर २५० वर्षें झालीं; तो येथें घर बांधून राहिला, मंदिराची स्थापना केली व त्याबद्दलची सर्व व्यवस्था त्यानें लाविली, म्हणजे अर्थात हल्लींच्या शहराच्या आसपासच त्याचें ठिकाण कोठें तरी असलें पाहिजे. तो राजपुत्र होता व त्यानें आपणासाठीं चांगली मोकळी व विस्तीर्ण जागा पाहिली असेल अशी कल्पना केली तरी शहराच्या तटाबाहेरच ती कोठे जवळपास असली पाहिजे. आतां हा नकाशा पहा. चार इंच म्हणजे एक मैल असें याचें स्केल दिलें आहे. **कोट** या भागांत श्रीमहाकालेश्वराचें मंदिर आहे. श्रीमहाकालेश्वराचें मंदिर हा मध्यबिंदु आहे अशी कल्पना करून सात मैलांची त्रिज्या कल्पून जर आपण एक वर्तुळ काढलें तर उज्जेनच्या क्षेत्रांत



**२४ खंबा दरवाजा, उज्जयिनी. ( जुनें दृश्य )**

( उजयिनींतील हा एवढाच प्राचीन दरवाजा सध्यां शिल्लक आहे. पण हाहि अनेक मंदिरांचे अनेक दगड कसेबसे एके ठिकाणी करून उभा केला आहे. हा दरवाजा विक्रमाच्या वाड्याचा किंवा महाकालेश्वराच्या मंदिराचा असावा असा तर्क आहे. )



चोवीस खांबांचा दरवाजा

मोडणारीं बहुतेक स्थळें त्यांत येतात. श्रीमहाकालेश्वराच्या दक्षिणेस एका मैलावर असणारा जयसिंगपुरा पहा. यांत जयसिंगाची वेधशाळा आहे. इच्या नैऋत्येस चिंतामण गणेशाचें प्राचीन मंदिर आहे. या दोन स्थलांमधून क्षिप्रा नदी वहात आहे. दक्षिण व नैऋत्य या दिशांस हीं दोनच प्राचीन स्थानें आहेत. आग्नेयीस ही त्रिवेणी पहा. याठिकाणीं सरस्वती व दुसरी एक ख्याता नांवाची नदी क्षिप्रेला मिळत असून येथे शनिवारीं अमवास्या आली म्हणजे मेळा भरतो. पूर्वेला प्रसिद्ध असें कोणतेंहि स्थळ दिसत नाहीं. उत्तरेस भर्तृहरीची गुहा, कालिकामाता, भैरवगड, सिद्धवट, कालियादेह, मंगलेश्वर व अंकपात हीं स्थळें सुप्रसिद्ध आहेत. आतां या स्थलांचा आपण क्रमशः विचार करूं. वेधशाळा *क्षिप्रानदीच्या अगदीं किनाऱ्यावर आहे. पण तेथें आसपास जयसिंगपुऱ्याशिवाय वस्ती नाहीं व मला जयसिंगपुऱ्यांत किंवा त्या लगत मनकामनेश्वराचें मंदिर असल्याचें ठाऊक नाहीं, तथापि तेथें एकदां बारकाईनें शोध करावा. चिंतामण गणेश हा वस्तीपासून दूर असून अगदीं निर्जन अरण्यांत आहे. तेथून नदीहि लांब आहे व तेथें वस्ती वगैरे कांहीं नाहीं, तेव्हां तिकडे लक्ष देण्याची गरज नाहीं. त्रिवेणीची हकीकतहि त्याप्रमाणेंच समजावी. उरलेलीं सर्व ठिकाणें क्षिप्रा नदीच्या तीरावर किंवा किनाऱ्याच्या नजीकच असून तेथें लोकवस्तीचीं स्पष्ट अस्पष्ट चिन्हें दिसतात. इतकेंच नव्हें पण भैरवगडास व सिद्धवटास तर पुष्कळ वस्तीहि आहे. शिवाय हीं सर्व स्थळें तटाच्या बाहेर व शहराला लागून आहेत. त्यांपैकीं प्रत्येक ठिकाणीं जाऊन शोध केला पाहिजे. मनकामनेश्वराचें मंदिर चांगल्या अगर वाईट स्थितींत असणें शक्य आहे, पण तेथें पुजारी व कुमार विजयसिंग यांच्या वंशजांचा

* क्षिप्रा किंवा शिप्रा असेंहि म्हणतात.



चोवीस खांबांचा दरवाजा

मोडणारीं बहुतेक स्थळें त्यांत येतात. श्रीमहाकालेश्वराच्या दक्षिणेस एका मैलावर असणारा जयसिंगपुरा पहा. यांत जयसिंगाची वेधशाळा आहे. इच्या नैऋत्येस चिंतामण गणेशाचें प्राचीन मंदिर आहे. या दोन स्थलांमधून क्षिप्रा नदी वहात आहे. दक्षिण व नैऋत्य या दिशांस हीं दोनच प्राचीन स्थानें आहेत. आग्नेयीस ही त्रिवेणी पहा. याठिकाणीं सरस्वती व दुसरी एक ख्याता नांवाची नदी क्षिप्रेला मिळत असून येथे शनिवारीं अमवास्या आली म्हणजे मेळा भरतो. पूर्वेला प्रसिद्ध असें कोणतेंहि स्थळ दिसत नाहीं उत्तरेस भर्तृहरीची गुहा, कालिकामाता, भैरवगड, सिद्धवट, कालियादेह, मंगलेश्वर व अंकपात हीं स्थळें सुप्रसिद्ध आहेत. आतां या स्थलांचा आपण क्रमशः विचार करूं. वेधशाळा *क्षिप्रानदीच्या अगदीं किनाऱ्यावर आहे. पण तेथें आसपास जयसिंगपुऱ्याशिवाय वस्ती नाहीं व मला जयसिंगपुऱ्यांत किंवा त्या लगत मनकामनेश्वराचें मंदिर असल्याचें ठाऊक नाहीं, तथापि तेथें एकदां बारकाईनें शोध करावा. चिंतामण गणेश हा वस्तीपासून दूर असून अगदीं निर्जन अरण्यांत आहे. तेथून नदीहि लांब आहे व तेथें वस्ती वगैरे कांहीं नाहीं, तेव्हां तिकडे लक्ष देण्याची गरज नाहीं. त्रिवेणीची हकीकतहि त्याप्रमाणेंच समजावी. उरलेलीं सर्व ठिकाणें क्षिप्रा नदीच्या तीरावर किंवा किनाऱ्याच्या नजीकच असून तेथें लोकवस्तीचीं स्पष्ट अस्पष्ट चिन्हें दिसतात. इतकेंच नव्हें पण भैरवगडास व सिद्धवटास तर पुष्कळ वस्तीहि आहे. शिवाय हीं सर्व स्थळें तटाच्या बाहेर व शहराला लागून आहेत. त्यांपैकीं प्रत्येक ठिकाणीं जाऊन शोध केला पाहिजे. मनकामनेश्वराचें मंदिर चांगल्या अगर वाईट स्थितींत असणें शक्य आहे, पण तेथें पुजारी व कुमार विजयसिंग यांच्या वंशजांचा

* क्षिप्रा किंवा शिप्रा असेंहि म्हणतात.

शोध लावणें हें फार फार कठिण काम आहे, कारण थोडथोडकें, नव्हें, २००–२५० वर्षें जुनें झालेलें हें सर्व प्रकरण आहे.'

असें म्हणून गुरुजी मजकडे किंचित् विचारयुक्त व सचिंत मुद्रेनें पाहूं लागले. आणि होती खरी गोष्ट तशीच. तथापि मला ही एक कल्पना सुचली. मी ह्मणालों,

'मला एक कल्पना सुचते आहे. कसेंहि झालें तरी मेवाडच्या राजघराण्याचा मनकामनेश्वराच्या मंदिराशीं संबंध पोचतो, शिवाय एका सनदेमध्यें पूजाऱ्याचें नांव लिहून "चितोडवाले" असें त्यांस ह्मटलें आहे तेव्हां 'मनकामनेश्वराचें मंदिर, 'मेवाडवाल्यांची जागा,' 'उदेपूरकरांचा हत्ता,' 'चितोडवाल्यांचें ठिकाण.' 'राणाजीका मकान' वगैरे नावें उच्चारून कांहीं तपास लागला तर तसाहि करून पहावा. शिवाय असेंहि शक्य आहे कीं, आपणांस ठिकाणाचा पक्का शोध लागला तर तो धनसंग्रह त्या ठिकाणाच्या आसपास किंवा मंदिराच्या आवारांतच असेल असें धरून चालण्यास हरकत नाहीं, कारण आपल्या ताब्यांतली जागा सोडून मनुष्य भलत्याच ठिकाणीं एवढें द्रव्य ठेवील कशाला ?

'होय. तसेंहि असूं शकेल' असें गुरूजींनीं उत्तर दिलें.

'आहे खरी बोवा ही एक गंमत. त्यांतून या दिवसांत पुरून ठेवलेल्या द्रव्याचा पत्ता लागणें हें जवळजवळ अशक्यच. मग एखाद्या दिवशीं आपल्याला वेळ होईल मजबरोबर यायला ?"

"हें: हें: हें:" करून गुरुजीनीं नकारार्थी मान डोलावली. ते ह्मणाले, "असें डॉक्टरसाहेब, एकतर हें रिकामपणाचें काम आहे, नसता उद्योग आहे; खटपट, कटकट, श्रम, हिंडणें, फिरणें त्यांत फार,

इतकें सर्व माझ्या हातून व्हावयाचें नाहीं व शिवाय केलें तरी यश येईल अशी खात्रीहि नाहीं. कागदपत्रावरून सर्व ठीक जुळलें, पण त्या गोष्टीला शेंकडों वर्षें झालीं आहेत; शिवाय दुसरें असें कीं आपण ही खटपट अमक्या एका गोष्टीसाठीं करीत आहोंत हें तिसऱ्याला कळतां उपयोगी नाहीं, नाहींतर विनाकारण उपहास किंवा पोलिसांचा ससेमिरा मागें लागावयाचा. आणि असें पहा, इतकें सर्व लचांड उपस्थित करून, आपल्यास यश मिळालें व द्रव्य सांपडलें कीं पुढें काय होईल? सरसुभेसाहेब हुकूम सोडतील आणि सगळा खजीना ग्वाल्हेर दरबारांत रवाना होईल!"

'होय, पण, पूजाऱ्याचे वंशज व कुमार विजयसिंग याचे वंशज यांचा जर यदाकदाचित शोध लागला तर सरसुभेसाहेब नव्हे महा-सरसुभेसाहेब आले, त्यांचा त्यांत काय संबंध?'

'होय तें खरें, पण तें सर्व द्रव्य सांपडल्यानंतरचें आहे.'

'बरें पुस्तकांत या शिवाय आणखी कांहीं जास्त माहिती मिळ-ण्याचा संभव आहे काय?

'हो असेल कदाचित; मी सवडीनें सर्व पुस्तकें व कागद पुन्हां एकदां वाचून पाहीन व नंतर सांगेन. तुह्मीं अद्याप तरुण आहांत, तुमच्या मुद्रेवरून तुह्मांस अशा धाडसाच्या कामाची हौस दिसत आहे, तेव्हां तुम्हीं सवडी सवडीनें या गोष्टीचा तपास करा. पत्ता लागला तर उत्तमच, नाहीं लागला तरी इतिहाससंशोधनाच्या खट-पटीचें पुण्य तरी पदरांत पडेल, शिवाय चौकसबुद्धी वाढेल, सहज उज्जयिनीचें अवलोकन होईल, कदाचित चार माणसांचा परिचय होईल, कांहीं नक्कल विशेष दृष्टीस पडेल, निदान तोटा तरी कांहीं होणार नाहीं.'

मनकामनेश्वराच्या पुराणाची, गुरुजीनीं याप्रमाणें इतिश्री केल्यानंतर, माझें दप्तर त्यांस पहाण्याकरितां ठेवून, त्यांचा मी निरोप घेतला व संध्याकाळ झाली ह्मणून घरी गेलों; रस्त्यांत डॉक्टर नाव्रर साहेबांची गांठ पडली. मनुष्य मोठा प्रेमळ व सज्जन व पुष्कळ दिवसांच्या ओळखीचा, तेव्हां त्यांना घेऊन मी घरी गेलो. आम्हीं फार दिवसांनीं एकमेकांस भेटलों होतों त्यामुळें मी ते "घरीं जेवावयास येणार नाहींत. वाट पाहूं नका" असा त्यांचे घरीं निरोप पाठविला. जेवतांना घरीं असलेला मुका त्यांच्या दृष्टीस पडला, तेव्हां त्यांनीं तो कोण काय याची सहज चवकशी केली व जेव्हां मी त्यांना त्याचा सर्व इतिहास सांगितला तेव्हां त्यांनाहि त्याच्या मुकेपणाचें आश्चर्य वाटलें. भोजनोत्तर त्यांनीं त्याला नीट पाहिला व ते मग मला ह्मणाले कीं "तात्या, केस मोठी पिक्यूलियर आहे बोवा, आजपर्यंत मी एकच अशी केस ग्रँट मेडिकल कॉलेजांत मेडिकल वॉर्डमध्यें पाहिली. तुम्हीं ह्मणता कीं हा एकदां 'रामरे, रामरे,' असें ह्मणाला होता व त्याची जीभ, गळा, घसा, वगैरे मी आतां पाहिली त्यावरून मला असें वाटतें कीं याला पुनः वाचा फुटावी. तुम्हीं ह्मणतां तसा कांहीं दंश झाल्यानें ह्मणा किंवा कांहीं भयंकर प्रसंग गुदरल्यामुळें केव्हां केव्हां अशा रेअर सिम्टम्स् होतात. कोणी मुका होतो तर कोणाचे केंस पांढरे होतात. तुम्हीं मेरी कॉरेलीचें 'व्हेंडेंटा' हें पुस्तक वाचलें आहे काय ?"

"हो हो, वाचलें ह्मणजे काय ? त्याचा स्टडी केला आहे ह्मणाना ?"

"झालें तर, त्या फेबिओ रोमॅनीचे केस एकाएकीं कसे पांढरे शुभ्र झाले ? तसाच कांहीं प्रकार होऊन हा मुका झाला असेल. त्याच्या डोळ्याकडे पहा; पहा कसे तारवटल्यासारखे दिसतात ते. कांहीं

दिवसांनीं हा बरा होणार. याला आमच्या हॉस्पिटलांत घेऊन जाऊं का ? ह्मणजे मला केस वॉच करायला सांपडेल." मीहि त्यांच्या ह्मणण्याला रुकार दिला, आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या मुक्याला सरकारी दवाखान्यांत पाठवून दिलें. त्या मुक्याची अशा रीतीनें चांगली सोय लागल्यावर मनकामनेश्वराच्या मंदिराचा शोध करण्याची माझी इच्छा दिवसानुदिवस प्रबळ होत चालली, आणि त्याप्रमाणें मी जेव्हां त्या उद्योगाला लागलों, तेव्हां कितीकिती ह्मणून चित्रविचित्र प्रसंग आले, किती संकटें दत्त म्हणून उभी राहिलीं, किती अडचणी आल्या, किती त्रास पडला हें सगळें जेव्हां वाचकांना समजेल तेव्हां कुमार भीमसिंगानें किती चातुर्यानें व काळजीपूर्वक सर्व व्यवस्था केली होती, त्याची यथार्थ कल्पना होईल. असो.

मी विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर श्रीमनकामनेश्वराचें दर्शन घेण्यास बाहेर पडलो.

**अब्धिर्लंघित एव वानरभटैः किं त्वस्य गंभीरताम् ?।**
**आपातालनिमग्नपीवरतनुर्जानाति मंथाचलः ॥**

मुरारि*

---

* समुद्राची अगाध खोली विचारावयाची असल्यास ती कोणास विचारावी ? रामरावणांच्या युद्धप्रसंगीं मोठमोठे बहाद्दर व चपल वानर वीर पटापट समुद्र ओलांडून लंकेंत गेले खरे; पण समुद्राची गंभीर खोली त्या बिचाऱ्यांस कोठून माहीत असणार ? समुद्रमंथनाच्या वेळीं मंथा ह्मणजे रवी करून देवांनीं ज्या पर्वतास समुद्राच्या तळाशीं सोडिलें, त्या पाताळास जाऊन भिडलेल्या बऱ्या मंदराचलासच याबद्दल खरी माहिती असणें शक्य आहे.

**टिळक.**

मनकामनेश्वराच्या पुराणाची, गुरुजींनीं याप्रमाणें इतिश्री केल्या-नंतर, माझें दप्तर त्यांस पहाण्याकरितां ठेवून, त्यांचा मी निरोप घेतला व संध्याकाळ झाली ह्मणून घरीं गेलों; रस्त्यांत डॉक्टर नाब्रर साहेबांची गांठ पडली. मनुष्य मोठा प्रेमळ व सज्जन व पुष्कळ दिवसांच्या ओळखीचा, तेव्हां त्यांना घेऊन मी घरीं गेलो. आम्हीं फार दिवसांनीं एकमेकांस भेटलों होतों त्यामुळें मी ते " घरीं जेवावयास येणार नाहींत. वाट पाहूं नका " असा त्यांचे घरीं निरोप पाठविला. जेवतांना घरीं असलेला मुका त्यांच्या दृष्टीस पडला, तेव्हां त्यांनीं तो कोण काय याची सहज चवकशी केली व जेव्हां मी त्यांना त्याचा सर्व इतिहास सांगितला तेव्हां त्यांनाहि त्याच्या मुकेपणाचें आश्चर्य वाटलें. भोजनोत्तर त्यांनीं त्याला नीट पाहिला व ते मग मला ह्मणाले कीं " तात्या, केस मोठी पिक्यूलियर आहे बोवा, आजपर्यंत मी एकच अशी केस ग्रँट मेडिकल कॉलेजांत मेडिकल वॅार्डमध्यें पाहिली. तुम्हीं ह्मणता कीं हा एकदां 'रामरे, रामरे,' असें ह्मणाला होता व त्याची जीभ, गळा, घसा, वगैरे मी आतां पाहिली त्यावरून मला असें वाटतें कीं याला पुनः वाचा फुटावी. तुम्हीं ह्मणतां तसा कांहीं दंश झाल्यानें ह्मणा किंवा कांहीं भयंकर प्रसंग गुदरल्यामुळें केव्हां केव्हां अशा रेअर सिम्टम्स् होतात. कोणी मुका होतो तर कोणाचे केंस पांढरे होतात. तुम्हीं मेरी कॉरेलीचें 'व्हेंडेटा' हें पुस्तक वाचलें आहे काय ?"

"हो हो, वाचलें ह्मणजे काय ? त्याचा स्टडी केला आहे ह्मणाना ?"

"झालें तर, त्या फेबिओ रोमॅनीचे केस एकाएकीं कसे पांढरे शुभ्र झाले ? तसाच कांहीं प्रकार होऊन हा मुका झाला असेल. त्याच्या डोक्याकडे पहा; पहा कसे तारवटल्यासारखे दिसतात ते. कांहीं

दिवसांनीं हा बरा होणार. याला आमच्या हॉस्पिटलांत घेऊन जाऊं का ? ह्मणजे मला केस वॉच करायला सांपडेल." मीहि त्यांच्या ह्मणण्याला रुकार दिला, आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं त्या मुक्याला सरकारी दवाखान्यांत पाठवून दिलें. त्या मुक्याची अशा रीतीनें चांगली सोय लागल्यावर मनकामनेश्वराच्या मंदिराचा शोध करण्याची माझी इच्छा दिवसानुदिवस प्रबळ होत चालली, आणि त्याप्रमाणें मी जेव्हां त्या उद्योगाला लागलों, तेव्हां कितीकिती ह्मणून चित्रविचित्र प्रसंग आले, किती संकटें दत्त म्हणून उभी राहिलीं, किती अडचणी आल्या, किती त्रास पडला हें सगळें जेव्हां वाचकांना समजेल तेव्हां कुमार भीमसिंगानें किती चातुर्यानें व काळजीपूर्वक सर्व व्यवस्था केली होती, त्याची यथार्थ कल्पना होईल. असो.

मी विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर श्रीमनकामनेश्वराचें दर्शन घेण्यास बाहेर पडलो.

**अब्धिर्लंघित एव वानरभटैः किं त्वस्य गंभीरताम् ? ।**
**आपातालनिमग्नपीवरतनुर्जानाति मंथाचलः ॥**

मुरारि*

---

* समुद्राची अगाध खोली विचारावयाची असल्यास ती कोणास विचारावी ? रामरावणांच्या युद्धप्रसंगीं मोठमोठे बहाद्दर व चपल वानर वीर पटापट समुद्र ओलांडून लंकेंत गेले खरे; पण समुद्राची गंभीर खोली त्या बिचाऱ्यांस कोठून माहीत असणार ? समुद्रमंथनाच्या वेळीं मंथा ह्मणजे रवी करून देवांनीं ज्या पर्वतास समुद्राच्या तळाशीं सोडिलें, त्या पाताळास जाऊन भिडलेल्या बऱ्या मंदराचलासच याबद्दल खरी माहिती असणें शक्य आहे.

**टिळक.**

## प्रकरण आठवें

# विक्रमाच्या उज्जयिनींत !

**नर-रूप-रत्नोंसे सजीथी वीर विक्रम की सभा,**
**अबभी जगतमें जागती है जगमगी जिनकी प्रभा।**
**जाकर सुनो, उज्जैन मानो आजभी यह कह रही**
**मैं मिट गई, पर कीर्ति मेरी तब मिटेगी जब मही॥**

—मैथिलीशरण गुप्त.

**'कोठें उज्जयिनी पुराण नगरी संपन्न राजन्वती ?'**

आणि

**'कोठें उज्जयिनी नवी, जन जिथें दारिद्र्यचिंताकुल !'**

प्राचीन काळीं, विक्रमादित्याच्याहि पूर्वी

**'ज्ञानी, शूर, सुखी, स्वधर्मनिरता जेथें प्रजा नांदती !'**

अशी जिची कीर्ती, ती उज्जयिनी कोठें ? व हल्लींची उज्जयिनी कोठें ? चुन्याचें नांव 'सुधा' व अमृताचेंहि नांव 'सुधा,' पण कोठें अमृत व कोठें चुना ?

**"गेली उज्जयिनी ! ! ! तिच्या धरितसें नांवास जें लोकिं या**
**आहे सांप्रत उज्जनी नगर तें राज्यांत शिंद्यांचिया।**
**आहे गांव. परंतु वैभव दिसे कोठें न तें त्या परी—"**

उज्जयिनी नगरीला राजधानीचा मान कित्येक शतकें लाधलेला आहे. मृच्छकटिक नाटकांत, बाणभट्टाच्या कादंबरींत व सोमदेवभट्टांच्या कथासरित्सागरांत वर्णन केलेल्या उज्जयिनीचें सौंदर्य कोणीकडे व अलीकडे तिला प्राप्त झालेली दुर्दशा कोणीकडे ? मनुष्याप्रमाणेंच स्थलांच्याहि नीचोन्नतीचा कांहीं नियम नसतो. काळ आला ह्मणजे या सृष्टींत अनेक चमत्कार आणि फेरबदल होतात. राजा असतो तो प्रजास्थानी येतो व प्रजा असते ती राजस्थानीं होते. त्याचप्रमाणें, रावाचा रंक आणि रंकाचा राव. ह्याप्रमाणें संपत्तिजन्य अचिरस्थायिता,

आणि अधिकारजन्य क्षणभंगुरता, इतिहासांतील अनेक प्राचीन उदाहरणांनीं व महायुद्धामुळें युरोपखंडांत, जर्मनीचा केसर बादशहा, लॉइडजार्ज, रशियाचा झार वगैरे प्रसिद्ध उदाहरणांवरून व्यक्त होत आहे. जी स्थिति मनुष्यांची तीच स्थिती नगरांची ! कार्थेज, रोम, बाबिलोन, निनव्हे, इत्यादि परदेशी व उज्जयिनी,* धारानगरी, बळा, चंपावती, झिंझुवाडा, अयोध्या, कनोज, बेळापुर, ऐनापुर, चक्रपुर, मयूरध्वजनगरी, ताम्रध्वजनगरी, इत्यादि स्वदेशीय नगरांचें पूर्ववैभव आतां त्यांस पुनः कधींतरी प्राप्त होईल काय ? आणि या उपरिनिर्दिष्ट नगरांपैकीं कांहीं कांहीं पूर्ववैभवशून्य स्थितींत तरी अद्याप आढळतात व बाकीच्यांचा मुळीं पत्ताही राहिला नाहीं ! पौराणिक काळीं माळवा प्रांतावर राज्य करीत असलेले राजे सर्व भरतखंडांत नांवाजलेले होते. राजा विक्रमादित्य व राजा भोज हे त्यापैकींच होत. अवंती ऊर्फ उज्जयिनी ही त्या राजांची राजधानी होती. हिंदुस्थानच्या अत्यंत भरभराटीच्या काळांत उज्जयिनी शहरायेवढें विद्या व कला यांनीं सुसंपन्न असें दुसरें शहर नव्हतें. हिंदुधर्माचें पुनरुज्जीवन या माळवा प्रांतांत सुरू झालें. येथील राजांच्याच आश्रयाखालीं संस्कृत भाषेचा बहुतेक विस्तीर्ण ग्रंथसंग्रह तयार झाला. त्या वेळेच्या उज्जयिनीच्या सौंदर्याचें आतां नख देखील दृष्टीस पडणार नाहीं.

---

*कोठें धारा नगरिहि तशी उज्जनी विक्रमाची
इंद्रप्रस्थादिक पुरवरें रम्य जीं पांडवांची।
कोठें गेली धनिक नगरी श्री अयोध्याधिपाची ?
लज्जा दे जी सुरवरपुरा, द्वारका कृष्णजीची ॥

—विनायक कृष्ण मुळ्ये.

**'कोठें ते कांचनाचे कळस चमकती उंच देवालयांचे ?**
**हर्म्यप्रासाद कोठें असति, विलसलें थोर ऐश्वर्य ज्यांचें ?**
**कोठें त्या नाट्यशाला ? न दिसति नयना चंद्रशाला विशाला ?**
**रत्नांनीं पूर्ण गेले विपणि, तळ जणों अब्धिचे ते लयाला ?'**

हरहर, हल्लीचे घाणेरडे बोळ, अरुंद रस्ते,* आणि वांकड्या तिकड्या वाटा, गटारें, जागोजागीं असलेले उकिरडे हे उत्पन्न झाले केव्हां आणि

**प्रातःकाळीं नगरवनिता कुंकुमाच्या सड्यांनीं,**
**रांगोळ्यांनीं, अधिकच जयां देति शोभा झटोनी;**
**नाना यानीं बसुन गमना पौर जेथें करीत;**
**नाना वेषीं फुलतिच, कुठें जाति ते राजपंथ ?**

महाकवी कालिदासाच्या जगत्प्रसिद्ध मेघदूत काव्यांत उज्जयिनीचा उल्लेख आहे, व शूद्रक राजानें व भास कवीनें आपल्या चारुदत्त व वसंतसेना नाटकांत या शहराचा उल्लेख करून त्याचा बहुमान केला आहे. राजधानी असतांना, उज्जयिनी, क्षिप्रा नदीच्या दोन्ही तीरांवर वसलेली असे. नदीच्या किनाऱ्यावर असलेलीं रम्य उपवनें, 'पुष्पांनीं लवल्या

---

* उज्जनी क्षेत्रांत क्षेत्रचालीं प्रमाणें दाट वस्ती व अरुंद, दगडांनी माचून काढलेले रस्ते आहेत. हें शहर फार प्राचीन असून येथें मोठमोठाले इतिहास प्रसिद्ध विक्रमादि चक्रवर्ति राजे होऊन गेले. त्यांच्या अमानुष महत्त्वाची साक्ष देणारीं अशीं मोठमोठालीं दोन ताड उंचीची व १५।२० हात रुंदीचीं भिंताडें चुनेगच्ची बरींच दृष्टीस पडतात. असें ह्मणतात कीं, उज्जयिनी नगरी पालथी घातली आहे. तेथें विटा नवीन भाजण्याची जरूरी नाहीं. बहुतकरून भुईमध्यें जुन्या विटा सांपडतात. एखादे जमीनींत भिंताड लागलें ह्मणजे मोठ्या इमारतीचें काम होतें. येथें भर्तृहरी पूर्वीं राज्य करीत होता त्यास विषय संबंधें अति पश्चाताप होऊन सर्व राज्य सोडून विदेही होऊन तपश्चर्येस बसला, त्या गुहेस हल्लीं भर्तृहरीची गुंफा म्हणतात. तें ठिकाण भैरवगडावर असून फार रमणीय शांतरसानुकूल आहे.

"माझा प्रवास"—**विष्णुभट गोडसे.**

लता तरुवरा जेथें मिठी घालिती ' अशीं विस्तीर्ण उद्यानें, जेथें मोरांचा नाच चालला आहे, कोकिलांचा पंचम स्वर कानांवर येत आहे, चक्रवाक, हंस इत्यादि पक्षी जीर्णकरंडकासारख्या बागांतून जलविहार करीत आहेत असे मनोहर देखावे दिसत असत तेथें आतां ओसाड रान व्हावें काय? ' विद्या–धर्म–सुकर्म–तत्पर ' असे ब्राह्मण, मानधन व मरणास तृणवत् मानणारे क्षत्रिय, धनकनकसंपन्न वैश्य व सुखी शूद्र असे लक्षावधी लोक रहात असत ती उज्जयिनी आतां कालाच्या विशाल उदरांत गडप झाली असून त्या ठिकाणीं एक नामधारी दरिद्री व दुःखी गांव वसलें आहे. काव्याभिज्ञ व शूर असा विक्रमादित्य, योगींद्र भर्तृहरी, सरस्वतीकंठमणी कालिदास, धन्वंतरी, क्षपणक, अमरसिंह, शंकू, वेतालभट्ट, घटकर्पर, वराहमिहिर, वररुचि,* अशीं रत्नें ज्या राजधानींत एकावेळीं चमकत होतीं त्याठिकाणीं आज साधारण विद्वान सुद्धां हुडकण्याची पाळी यावी काय? मेघदूत, रघुवंश, शाकुंतल वगैरे ग्रंथ प्रत्यक्ष कालिदासाच्या मुखानें ऐकण्याचें भाग्य ज्या ठिकाणच्या लोकांनां एकेकाळीं मिळालें होतें × तसें दुर्लभ

---

* सुबाक, मणि, अंशुदत्त, जिष्णु, त्रिलोचन, हरि, श्रुतसेन, बादरायण, कुमारसिंह, सत्याचार्य.

× महाभारतकालीं म्हणजे इ. स. पू. ३०० च्या सुमारास...मोठमोठीं विद्यापीठें उत्तर हिंदुस्थानांत होतीं, व त्यांत तत्त्वज्ञानविषयक अनेक मतांचा अभ्यास होत असे. आर्यांचा प्रसार दक्षिणेकडे झाला तेव्हां अशीं विद्यापीठें या देशांतहि निर्माण झालीं. त्यांत उज्जयिनी हें अशा विद्वत्समूहाचें मोठें प्रख्यात केंद्र बनलें. वेदविद्या व धनुर्विद्या शिकण्याकरितां श्रीकृष्ण व बलराम मथुरेहून उज्जयिनीस आले ही पौराणिक कथा प्राचीनकाळीं उज्जयिनीच्या विद्यापीठाच्या ख्यातीची साक्ष देते. याच उज्जयिनींत महाकाळयात्राप्रसंगीं विद्वज्जनसमूहापुढें कवी आपलीं काव्यें व नाटकें रचून व करवून दाखवीत. याच उज्जयिनींत इ. सनाच्या आरंभीं व तत्पूर्वी ज्योतिषाचा अभ्यास उत्तम प्रकारें केला जाऊन ज्योतिषसिद्धांत ग्रंथ निर्माण झाले. —**कुलगुरु चिंतामण विनायक वैद्य.**

भाग्य या शहरास येणें आतां दुरापास्तच आहे. या शहराचें जें वर्णन अवंतिमहात्म्य, मृच्छकटिक, कादम्बरी, मेघदूत, वगैरे ग्रंथांतून आहे तें वाचून व नंतर मुसलमानी इतिहासकारांचीं वर्णनें ऐकून हें एकेकाळीं फार नामांकित व संपत्तिमान होतें, हें आजकालच्या मोडक्या तोडक्या स्थितींत ही स्पष्ट दिसतें. ई. स. १२२६ पर्यंत या शहराचें पूर्ववैभव चांगल्या स्थितींत होतें. गुलामवंशांतील सुलतान अल्तमश यानें या वर्षीं माळवाप्रांतावर हल्ला करून ही विक्रमादित्याची राजधानी लुटली व येथील सर्व देवळांचा विध्वंस केला. येथील महाकालेश्वराचें स्थान हें बारा ज्योतिर्लिंगापैकीं एक आहे. मुसलमानांचा ओघ भारतवर्षावर लोटण्यापूर्वीं येथें खरोखरच सोन्याचा धूर निघत असे. गजनीच्या महंमुदानें हीं शहरें लुटण्याचीं व हिंदूंचीं मंदिरें उध्वस्त करून नेण्याची सांथ उत्पन्न केली व त्याच्या नंतरच्या पुष्कळ लुटारूंनीं ती तशीच चालू ठेविली. त्यामुळें शिल्पकलेच्याच दृष्टीनें जरी पाहिलें तरी हिंदुस्थानचें अपरिमित व अगदीं कायमचें नुकसान झालें आहे.

**या राहुंद्या गतकथा स्मृतिबाह्य, आतां ।**
**ही कां बळें खरुज आजचि खाजवितां ॥"** ( कै. बर्वे )

असें कोणी कोणी ह्मणतात, पण हे खरजेचे फोड पाहिले ह्मणजे खाज सुटते खरी !

प्राचीन काळीं मध्यहिंदुस्थानांत श्रीमहाकालेश्वराच्या इतकें विख्यात् व श्रीमान् देवस्थान दुसरें कोणतेंहि नव्हतें.* दरसाल या अवंतिका-

---

* १ आकाशे तारकालिङ्गं पाताले हाटकेश्वरम् ।
मर्त्यलोके महाकालं दृष्ट्वा कामितमाप्नुयात् ॥ १ ॥


**—स्कन्द पुराण.**

२ मार्कंडेय मुनिवरी करुनि कृपा हाकिला जयें काळ ।
क्षिप्रातीरनिवासी उज्जयिनी क्षेत्रीं तो महाकाळ ॥ २ ॥

**—परशुराम नारायण बेहेरे.**



रा. ब. चिंतामण विनायक वैद्य, एम्. ए., एल्‌एल्. बी.
कुलगुरु, टिळकविद्यापीठ, पुणें.



श्री महाकालेश्वर व कोटितीर्थ

क्षेत्रीं असंख्य यात्रा जमे. श्रीमहाकालाच्या लिंगास भागीरथीचा अभिषेक होत असे. त्याच्या पूजेस एक हजार ब्राह्मण नेमिलेले होते. हें स्वयंभू व जागृत देवस्थान असल्यामुळें हें कोणालाही जिंकितां येणार नाहीं असा या देवालयाविषयीं लोकांचा ग्रह होता. सुलतान अलतमश हा संपत्तीचा व कीर्तीचा फार लोभी होता. सोरटी सोमनाथाचा विध्वंस करून गझनीच्या महंमुदानें अपार संपत्ति हरण केल्याची कीर्ति त्यानें ऐकलीच होती, तशा प्रकारची कीर्ति व संपत्ति उज्जयिनी शहर लुटून व महाकालेश्वराचा विध्वंस करून मिळविण्याची त्यास जबर इच्छा उत्पन्न झाली.

उज्जयिनी शहरासभोंवार भक्कम तट असून त्यावर मजबूत पहारा होता. अलतमशानें शहरावर हल्ला चढविला, आणि तीन दिवस निकराचें युद्ध झालें. इतक्या अवधींत आसपासचे राजे देवालयाचे संरक्षणास धांवत आले पण अलतमशापुढें त्यांचें कांहीं एक न चालून ते वाट फुटली तिकडे पळाले. अल्तमशास विजय प्राप्त झाला आणि द्रव्यलोभाची उत्कट इच्छा तृप्त करण्याची त्याला संधी मिळाली. हजारों लोकांची कत्तल करून त्यानें श्रीमहाकालेश्वराचे देवालयावर हल्ला केला. हें देवालय फार भव्य व सुंदर असून त्याचे शिखर फार अंतरावरून दिसे. मंदिराचा सभामंडप फारच प्रशस्त असून मंडपाच्या खांबावर पुराणांतील नाना प्रकारचे प्रसंग खोदलेले होते. सोन्याच्या सांखळ्यांनीं बांधलेल्या अनेक घंटा लोंबत होत्या. भिंती व फरशी सुंदर व गुळगुळीत संगमरवरी दगडांच्या केलेल्या होत्या. देवालयाच्या आवारांत 'कोटितीर्थ' या नावाचें एक मोठें प्रशस्त कुंड असून त्याला चारी बाजूनीं पायऱ्या होत्या व त्यांवर अनेक लहान लहान सुंदर सुंदर शिव-

मंदिरें होतीं. सभामंडपांत व देवाच्या गाभाऱ्यांत रत्नखचित झुंबरांचा लखलखाट रोज होत असे. मंडपाच्या एका कोपऱ्यांत राजा विक्रमादित्याची भरीव सोन्याची एक मूर्ति ठेविली होती. देवाच्या पूजेस मौल्यवान उपकरणें होतीं, शिवाय हजारो वर्षें भाविक लोकांनीं देवास अर्पिलेल्या नानाविध देणग्यांच्या योगानें मंदिरांत अपार संपत्तीचा संचय झाला होता. अल्तमश थेट गाभाऱ्यांत गेला. त्यानें शिवलिंग काढून फेकून देण्याचा हुकूम केला व मंदिर जमीनदोस्त करून तेथील अपार संपत्ति लुटून नीरो नांवाच्या दुष्ट रोमन बादशहाप्रमाणें, उज्जयिनीला जाळून पोळून, मनाला कृतकृत्यता वाटल्यावर तो शहर सोडून निघून गेला. हल्लींचें महाकालेश्वराचें देवालय, राणोजी शिंदे यांच्या कारकीर्दींतल्यांचे दिवाण रामचंद्रबाबा शेणवी यांनीं बांधिलें आहे. असो *

**" अवन्तिके ! वैभव तव पूर्वे सर्वे आज नष्ट जाहलें × "**


---

× **कवि**—नरहर शंकर रहाळकर.

* " अवंति or अवंतिका is now known as UJJAIN, and was once the Capital of माळवा, now part of GWALIOR STATE. It is so old that no one knows of its founding, and it claims to rival काशी itself in its sanctity. Here legend tells us, fell the arm from सती's sacred body, as शिव carried Her, grieving sorely for Her death, and so the place remains forever holy in deathless memory of Her devotion.

The अवंति kingdom was great in BUDDIST times, and one of the disciples of LORD बुद्ध, कशाण there took birth. अशोक was sent thither as VICEROY of the Western Provinces, ere he became Emperor, later there ruled the famous विक्रमाजित, in whose Court, shone the famous 'nine gems' of Indian literary genius.

It suffered in the many wars in which the रजपूत clans



वेधशाळा.



जंत्र महाल, उज्जयिनी ( जुनें दृश्य )

विजयादशमीच्या दिवशीं सायंकाळीं सर्व लोक सीमोल्लंघनाच्या मैदानाकडे जाण्यांत गुंतले असतां, अस्मादिकांनीं जयसिंग पुऱ्यांत प्रवेश केला. हा पुरा उज्जयिनीच्या दक्षिणेकडील शेवटचा भाग असून सवाई जयसिंग नांवाच्या जयपूरच्या राजानें येथें एक वेधशाळा बांधली* आहे, त्यावरून पुऱ्यास तें नांव पडलें आहे. क्षिप्रा नदीचा प्रवाह हल्लीं वेधशाळेच्या अगदींच जवळून वहात असल्यामुळें पुढेंमागें पूर येऊन वेधशाळा वाहून जाण्याची भीती उत्पन्न झाली आहे.× पूर्वीं प्रवाहापासून दूर अंतरावर दोन विहिरी होत्या. आतां प्रवाहाची दिशा बदलल्यामुळें, त्या दोन विहिरी नदीच्या मधोमध आल्या असून त्यांच्या आसपासची माती वाहून गेल्यामुळें नदींत दोन उंच खांब उभे केल्याप्रमाणें दिसतात व शेकडों वर्षें नदीच्या प्रवाहांत उभ्या असूनही पूर्वकालीन उत्कृष्ट बांधणीच्या योगानें त्या अद्याप चांगल्या स्थितींत

---

passed their spare time, when not fighting against a foreign foe, fell into the power of अकबर, and kept up its tradition of being sacked as late as 1799.

Famous for sanctity, famous for war, it is also famous as the place used in fixing the meridian of Indian Astronomy. It is said that there was a well at UJJAIN, in which the sun was reflected vertically upwards at a certain moment, and an old Indian text, mentioned by Mr. Watson gave UJJAIN, लंका, and third of which the name was lost, as being on the same meridian.

This seems to indicate that UJJAIN was a centre of Hindu Astronomical science."

—**Annie Besant.**

* ई. स. १७३३ चे सुमारास.

× पंडित रघुनाथशास्त्री वेलणकर यांच्या खटपटीनें वेधशाळेचा नुकताच जीर्णोद्धार झाला आहे.

आहेत. नदीला वेधशाळेजवळ ‘ गौघाट ’ या नांवाचा एक प्रशस्त पायऱ्यांचा घाट बांधला असून उज्जयिनीच्या शहराच्या तटाचा कांहीं अवशेष तेथें दृष्टीस पडतो. जयसिंग पुऱ्यांत शेतकरी लोकांची वस्ती आहे, व त्या बाजूला नांव घेण्यासारखीं अशीं दोनच मंदिरें असून तीं दोन्हीं ५।५० वर्षांच्या आंतलींच आहेत. जयसिंगपुऱ्याचा अगदीं काना कोंपरा मी त्या दिवशीं तपासून पाहिला. पुरुष मंडळी व मुलें दसऱ्याच्या निमित्तानें बाहेर गेलीं असून स्त्रिया व विशेषें करून म्हाताऱ्या बाया व आजारी मनुष्यें येवढींच घरीं होतीं. पण त्यांपैकीं एकालाहि मनकामनेश्वराचें नांव देखील ठाऊक नव्हतें.

जयसिंगपुऱ्यांत कांहीं पत्ता लागला नाहीं, तेव्हां मला किंचित् वाईट वाटलें. पण त्यामुळें माझी निराशा झाली नाहीं. चिंतामण गणेश, त्रिवेणी वगैरे एका दिशेचीं सर्व स्थळें नीट बारकाईनें तपासलीं. पण कांहीं पत्ता लागेना. येथें पत्ता बहुत करून लागावयाचा नाहीं, कारण हीं स्थळें शहरापासून बऱ्याच लांब अंतरावर आहेत असें मला वाटलेंच होतें, पण अमूक एक स्थळ बघावयाचें राहिलें असें वाटूं नये म्हणून मी त्या स्थळांकडेहि जाऊन आलों.

आतां फक्त उत्तरेकडील स्थानें पहावयाचीं होतीं. भर्तृहरीची गुहा हें ठिकाण मोठें रम्य असून तेथें आसपास सुंदर वनश्री आहे. गुहेच्या तोंडाशीं कांहीं महंत बसत असतात. त्यांची त्या ठिकाणीं शेंकडों वर्षांची वस्ती आहे, पण त्या ठिकाणींहि मला मनकामनेश्वराबद्दल कोणी माहिती सांगेना. कालिका मातेचें पुरातन मंदिर भर्तृहरीच्या गुहेपासून सुमारें पाव मैलावर पूर्वेकडे आहे. हें मंदिर प्राचीन उज्जयिनी शहराच्या मध्यभागीं होतें अशी दंतकथा आहे. कालिका मंदिराच्या आसपासच्या प्रदेशास ‘ गड ’ अशी संज्ञा असून त्याठिकाणीं पूर्वीं पुष्कळ

मनुष्यवस्ती होती अशीं स्पष्ट चिन्हें नेहमीं दिसतात. विटा, कौलें, चुनखडी, खांब, पाट, नक्षीकाम केलेले दगड, मातीचीं भांडीं, नाणीं, ताम्रपट*, किंवा नशीबानें एखाद्यास मौल्यवान धातूंच्या वस्तु, शिवलिंगें, नंदी वगैरे वगैरे पुष्कळ वस्तु नेहमीं दिसतात व सांपडतात. कालिका-मंदिराकडे हल्लीं वस्ती वगैरे नाहीं. पूजारी सकाळपासून संध्याकाळ-पर्यंत येथें असतात, तेथें विचारून पाहून मग घरीं जाऊं अशा विचारानें मी कालिकेच्या दर्शनाला गेलों.

ही गडावरची कालिका फार प्राचीन कालची असून श्रीमहाकाले-श्वराप्रमाणें उज्जयिनींतील लोकांचें तें एक मोठें पूज्य दैवत आहे. विक्रमाच्या अनेक गोष्टींतून या देवीचा उल्लेख केलेला असून, कालि-दासानें याच देवीला प्रसन्न करून घेतलें होतें, अशी दंतकथा आहे. या देवीपुढें लोकांचे अनेक नवस फिटत असतात. प्राचीनकाळीं या देवीला काळ्या पाषाणाचे फार सुंदर देवालय असून त्यावर नक्षीचीं वगैरे फार सुंदर कामें केलेलीं होतीं. परंतु मुसलमानांच्या कारकीर्दींत त्याच्यावर अनेक हल्ले होऊन त्याची पूर्वींची रचना हल्लीं छिन्नभिन्न झाली आहे, तथापि त्यावरून त्याच्या पूर्वींच्या वैभवाचें सहज अनुमान होतें. मी देवीच्या पुढें जाऊन साष्टांग नमस्कार घातला व उंबऱ्यावर यथाशक्ति कांहीं ठेवून सभामंडपांत देवीचा पूजारी कांहीं वाचीत बसला होता त्याच्याजवळ आंथरलेल्या बसकुरावर बसलो. उंबऱ्यावर ठेविलेलें द्रव्य हस्तगत करून पूजारीण बाईनीं मला थोडा अंगारा,

---

* अनेक ताम्रपट आजपर्यंत येथें सांपडले असून त्यांपैकीं कांहीं ग्वाल्हेर दरबारांत व कांहीं रॉयल एशियाटिक सोसायटीकडे संग्रहास आहेत असें समजतें. हे ताम्रपट म्हणजे प्राचीन काळच्या राजांनीं इनामें, वतनें वगैरे दिल्या-बद्दलच्या सनदा किंवा लेख होत.

प्रसादाची माळ व एक नारळ दिला. पूजारीबोवांचेंहि आम्हांकडे लक्ष्य होतें. त्यांनींहि मोठ्या प्रेमानें माझा 'या बसा' ह्मणून सत्कार केला.

'द्रव्येण सर्वे वशाः' ह्मणतात तें किती खरें आहे याचा अनुभव मला त्या मंदिरांत आला. पूजारीबोवांनीं मला पाहून आपली पोथी गुंडाळली. मला तें इष्टच होतें. पूजारी आणि त्याची बायको हीं दोन्हीं पोक्त होतीं, त्यांचें वय निदान साठाच्या जवळजवळ असावें असें दिसत होतें, तेव्हां त्यांना मनकामनेश्वरासंबंधानें एकदां विचारून पहावें असें वाटून मी त्यांच्याशीं हळुहळू इकडल्या तिकडल्या गोष्टी बोलूं लागलों. पीकपाणी, हवा, दुष्काळ, प्लेग इत्यादि रिकाम्या विषयांवरचें चऱ्हाट संपल्यावर प्राचीन उज्जयिनींतल्या गोष्टी निघाल्या. विक्रमादित्य व इतर प्राचीन राजे व अलीकडील राजे यांच्या तुलना झाल्या. प्राचीन उज्जयिनींत कायमचे रहाण्यासाठीं व या क्षेत्रांतच आपली अखेर व्हावी या इच्छेनें पूर्वीं कोणकोण प्रसिद्ध पुरुष येथें येऊन राहिले, त्यांची नावनिशी मला कळली. सुदैवानें तीं दोन्हीहि नवराबायको बोलकीं व मोठीं आनंदी होतीं व मला तीं जें कांहीं सांगत होतीं तें ऐकून समाधान वाटत आहे असें दिसतांच त्यांनींहि इकडच्या तिकडच्या पुष्कळ दंतकथा मला सांगितल्या. अशा रीतीनें तीं दोघें खुललेलीं पाहून मीहि मनकामनेश्वराची गोष्ट त्यांजपाशीं काढली. मनकामनेश्वर हें नांव त्यांस परिचित नव्हतें पण 'चितोडवाल्याचें मंदिर' त्यांस ठाऊक असून माझी गोष्ट ऐकतांच पूजारीणबाई मला ह्मणाली कीं, चितोडवाल्याचें मंदिर आतां उरलें आहे कुठें? ३० च्या* सालांत क्षिप्रेला जो मोठा पूर आला त्यांत तें सगळें

* ३० चें साल म्हणजे विक्रम संवत् १९३० हें होय. ह्मणजे इसवी सन १८७४,७५ चा सुमार येतो. या वर्षीं क्षिप्रा नदीला महापूर येऊन उज्जयिनीचें बरेंच नुकसान झालें.

वाहून जाऊन आतां मंदिराचा नुसता चौथरा व महादेव तेथें उरला आहे. ' मनकामनेश्वराबद्दलची माहिती अशा अनपेक्षित रीतीनें मिळाल्यावर मला किती आनंद वाटला असेल त्याची कल्पना वाचकांनींच करावी. तथापि मीं आपली उत्सुकता बिलकुल प्रगट केली नाहीं. इतर चार गोष्टी ऐकल्या तशीं हीहि ऐकली अशा सारखा आविर्भाव करून मी विचारलें कीं "बाई, आतां उरलेला तो चौथरा कोठें आहे हेंहि कोण लक्ष्यांत ठेवतो आणि त्याचें महत्त्वहि आतां काय उरलें आहे ?"

"होय हें तर खरेंच, आतां तर तेथें आसपास रात्रीं कोणीं रहातहि नाहीं. आमच्या लहानपणीं तेथला पुजारी कन्हय्यालाल तेथें रहात असे तेव्हां आह्मीं तेथें खेळायला जात होतों. पण त्याचें घर व जवळची हवेली ही आतां पडून झडून गेली व पहिल्या प्लेगच्या आमदानींत कन्हय्यालालच्या घरची कांहीं मंडळी तेथें मेलीं तेव्हांपासून कन्हय्यालालहि तेथून उठून दुसरीकडे गेला. अलीकडे आह्मीं कित्येक वर्षांत तिकडे गेलोंहि नाहीं."

आतां मात्र मला रहावेना. मी तिला प्रश्न केला कीं 'होतें कोठें तें मंदिर ?'

"रणजीत मारुती क्षिप्रानदीच्या पलीकडच्या तीरावर आहेना ? त्याच्या जवळपास तो मंदिराचा चौथरा तुम्हांला दिसेल. पण आता तेथें आहे काय पहाण्यासारखें उरलेलें ? हल्लीं त्या चौथऱ्याच्या आसपास झाडेंझुडपें उगवलेलीं असून तेथें कोणीं जातहि नाहीं. कन्हय्यालालचा बाप आमच्या लहानपणीं तेथें पूजेला जात असे, पण तो मेल्यानंतर त्याच्या घरची सगळीच मंडळी आतां भैरवगडास जाऊन राहिली. कन्हयालाल आतांशा सिद्धवटाच्या घांटावर संकल्प सांगतो व

प्रसादाची माळ व एक नारळ दिला. पूजारीबोवांचेंहि आम्हांकडे लक्ष्य होतें. त्यांनींहि मोठ्या प्रेमानें माझा 'या बसा' ह्मणून सत्कार केला.

'द्रव्येण सर्वे वशाः' ह्मणतात तें किती खरें आहे याचा अनुभव मला त्या मंदिरांत आला. पूजारीबोवांनीं मला पाहून आपली पोथी गुंडाळली. मला तें इष्टच होतें. पूजारी आणि त्याची बायको हीं दोन्हीं पोक्त होतीं, त्यांचें वय निदान साठाच्या जवळजवळ असावें असें दिसत होतें, तेंव्हां त्यांना मनकामनेश्वरासंबंधानें एकदां विचारून पहावें असें वाटून मी त्यांच्याशीं हळुहळू इकडल्या तिकडल्या गोष्टी बोलूं लागलों. पीकपाणी, हवा, दुष्काळ, प्लेग इत्यादि रिकाम्या विषयांवरचें चऱ्हाट संपल्यावर प्राचीन उज्जयिनींतल्या गोष्टी निघाल्या. विक्रमादित्य व इतर प्राचीन राजे व अलीकडील राजे यांच्या तुलना झाल्या. प्राचीन उज्जयिनींत कायमचे रहाण्यासाठीं व या क्षेत्रांतच आपली अखेर व्हावी या इच्छेनें पूर्वीं कोणकोण प्रसिद्ध पुरुष येथें येऊन राहिले, त्यांची नावनिशी मला कळली. सुदैवानें तीं दोन्हीहि नवराबायको बोलकीं व मोठीं आनंदी होतीं व मला तीं जें कांहीं सांगत होतीं तें ऐकून समाधान वाटत आहे असें दिसतांच त्यांनींहि इकडच्या तिकडच्या पुष्कळ दंतकथा मला सांगितल्या. अशा रीतीनें तीं दोघें खुललेलीं पाहून मीहि मनकामनेश्वराची गोष्ट त्यांजपाशीं काढली. मनकामनेश्वर हें नांव त्यांस परिचित नव्हतें पण 'चितोडवाल्याचें मंदिर' त्यांस ठाऊक असून माझी गोष्ट ऐकतांच पूजारीणबाई मला ह्मणाली कीं, चितोडवाल्याचें मंदिर आतां उरलें आहे कुठें? ३० च्या* सालांत क्षिप्रेला जो मोठा पूर आला त्यांत तें सगळें

* ३० चें साल म्हणजे विक्रम संवत् १९३० हें होय. ह्मणजे इसवी सन १८७४,७५ चा सुमार येतो. या वर्षीं क्षिप्रा नदीला महापूर येऊन उज्जयिनीचें बरेंच नुकसान झालें.

वाहून जाऊन आतां मंदिराचा नुसता चौथरा व महादेव तेथें उरला आहे.' मनकामनेश्वराबद्दलची माहिती अशा अनपेक्षित रीतीनें मिळाल्यावर मला किती आनंद वाटला असेल त्याची कल्पना वाचकांनींच करावी. तथापि मीं आपली उत्सुकता बिलकुल प्रगट केली नाहीं. इतर चार गोष्टी ऐकल्या तशीं हीहि ऐकली अशा सारखा आविर्भाव करून मी विचारलें कीं "बाई, आतां उरलेला तो चौथरा कोठें आहे हेंहि कोण लक्ष्यांत ठेवतो आणि त्याचें महत्त्वहि आतां काय उरलें आहे?"

"होय हें तर खरेंच, आतां तर तेथें आसपास रात्रीं कोणीं रहातहि नाहीं. आमच्या लहानपणीं तेथला पुजारी कन्हय्यालाल तेथें रहात असे तेव्हां आह्मीं तेथें खेळायला जात होतों. पण त्याचें घर व जवळची हवेलीं ही आतां पडून झडून गेली व पहिल्या प्लेगच्या आमदानींत कन्हय्यालालच्या घरची कांहीं मंडळी तेथें मेलीं तेव्हांपासून कन्हय्यालालहि तेथून उठून दुसरीकडे गेला. अलीकडे आह्मीं कित्येक वर्षांत तिकडे गेलोंहि नाहीं."

आतां मात्र मला रहावेना. मी तिला प्रश्न केला कीं 'होतें कोठें तें मंदिर?'

"रणजीत मारुती क्षिप्रानदीच्या पलीकडच्या तीरावर आहेना? त्याच्या जवळपास तो मंदिराचा चौथरा तुम्हांला दिसेल. पण आता तेथें आहे काय पहाण्यासारखें उरलेलें? हल्लीं त्या चौथऱ्याच्या आसपास झाडेंझुडपें उगवलेलीं असून तेथें कोणीं जातहि नाहीं. कन्हय्यालालचा बाप आमच्या लहानपणीं तेथें पूजेला जात असे, पण तो मेल्यानंतर त्याच्या घरची सगळीच मंडळी आतां भैरवगडास जाऊन राहिली. कन्हयालाल आतांशा सिद्धवटाच्या घांटावर संकल्प सांगतो व

भैरवनाथाची पूजा करतो, पण आतांशा पांचसहा महिने तो आम्हांला कोठें दिसला नाहीं, मग कोण जाणे तो येथें आहे कीं देशीं गेला तें ?"

माझ्या मनांत अगदीं गुदगुल्या होत होत्या. लागतो आहे पत्ता असें वाटून मी म्हटलें "गेला असला तर कोठें गेला असेल तो ?"

"गेला असेल मेवाडांत. त्याचा काय नियम ? भंगड आहे तो, जिकडे रमला तिकडेच रमला."

"होय, पण त्याचें तेथें घरदार, बायकामुलें कोणी असतीलना भैरवगडावर ?"

"होय. एकटी बायको घरीं आहे. पण तिला मूल ना बाळ. कांहीं जमिनीचें उत्पन्न, कांहीं घाटांवर मिळतें तें व भैरवनाथाच्या पूजेबद्दलचा पगार, वगैरे वगैरे मिळून उत्पन्न दोघांच्या पोटापुरतें आहे. पण भांग व मिठाई यांतून कांहीं वाचलें तर घरांत प्रपंच नीट चालावयाचा ना ? कांहीं कर्ज आहे तें लवकर फेडीत नाहीं म्हणून सावकारांचा तगादा असतोच मागें. ठीकच ठीक आहे."

अशा तऱ्हेची माहिती मिळाल्यावर माझ्या आशेला जास्तच बळकटी आली. मी त्या प्रेमळ दंपत्याचा निरोप घेऊन व पुन्हां केव्हांतरी भेटेन असें सांगून घराची वाट धरली.

---

## प्रकरण नववें.

# आशा.

"कालरंभार्थ जेव्हां गगनिं पसरले सर्व हे ब्रह्मगोल
आशे ! त्याच्याहि पूर्वी सुखदतर तुझा जन्म झाला अमोल।
मृत्यूचा दुःखदाता प्रखरतर तुझ्या पाश नाहींच मागें
नाहीं नाहींच लोकां विकल करि सदा तीहि तूतें जरा गे"

केरळकोकिळ

ही आशा खरोखर फार उत्तम आहे. या जगांत जेवढीं ह्मणून मोठीं मोठीं आधिभौतिक कार्ये झालीं आहेत, त्या सर्वांचा उगम या आशेंत आहे. अमेरिका खंडाचा शोध, सुवेझ व पनामा येथील कालवे, यांत्रिक सुधारणा इत्यादि गोष्टी मनुष्याचा आशेमुळें घडून आल्या आहेत. मग त्या आशेमध्यें स्वार्थ असो वा नसो. वास्तविक मनकामनेश्वराच्या मंदिराचा शोध लागून द्रव्यहि सांपडलें असतें तर त्यापासून मला काय लाभ होणार होता ? द्रव्य सांपडतांच कोणी वारसदार अगर निदान सरकार तरी तें घेण्यासाठीं उतावळे झाले असते, मग मला कोणी एवढी उठाठेव सांगितली होती ? पण नाहीं. माझा स्वार्थहि नव्हता, व परमार्थहि नव्हता, पण चितोडगडास गेल्यापासून कालिकामातेच्या देवालयांतून मनकामनेश्वराच्या मंदिराचा शोध लागेपर्यंतचा जो काल गेला, त्यामध्यें अशा कांहीं मजेदार गोष्टी घडल्या कीं त्या सर्व गोष्टींचे धागेदोरे कोठें आहेत हें हुडकीपर्यंत मला खरोखर चैनच पडेना. बरें माझ्या ऐवजीं दुसरा कोणी हें काम पत्करील असें वाटेना. नारायणजी दीक्षितांनीं खाका उंच केल्याच होत्या, आणि आमच्या दंडधाऱ्यांची दाढी जरी मी धरली असती तरी तो रिकामा सुतार 'वेळ नाहीं, वेळ नाहीं' ह्मणूनच कुंथत बसला असता. ह्मणून दवाखान्याचें काम आटोपल्या-

वर, जेवणखाण करून मी एके दिवशीं 'रणजीत मारुतीच्या' देवाळयाकडे निघालों. हा रणजीत क्षिप्रानदीच्या पैलतीरावर असून तेथें दरवर्षी हनुमानजयंतीला मोठा उत्सव होतो. याठिकाणीं क्षिप्रेचें पात्र खोल आहे, परंतु नावेचा नेहमीं बंदोबस्त नाहीं, म्हणून मारुतीच्या पूजाऱ्यानें चार मोठीं पिंपें एकत्र बांधून व त्यांवर फळ्या टाकून त्याची एक तरी ऊर्फ नांव केली असून, मारुतीच्या दर्शनास उज्जयिनीकडून जाणाऱ्या माणसांस तो नांव पैलतीरावर पाठवून आणवितो. मी मारुतीच्या दर्शनास गेलों तेव्हां दुपारचे दोन वाजले होते. पूजारी व त्याचे स्नेही इतकीच मंडळी मारुतीपाशीं होती. एका मोठ्या विस्तीर्ण वडाच्या झाडाखालीं तें मारुतीचें मंदिर बांधलेलें असून त्या मंदिराच्या पुढें चांगला प्रशस्त दगडी ओटा व विहीर आहे. ओट्यावर लहान लहान झाडें असलेल्या कुंड्या, एक धुणी, तिच्यांत राखेमध्यें पुरून ठेवलेल्या धुमसणाऱ्या गोंवऱ्या, दोन तीन चिलमी, अंगाऱ्यांत पुरून ठेवलेले चिमटे वगैरे देखावा चांगला दिसत होता. मारुतीचा आकार चांगला भव्य असून त्याला नुकताच शेंदूर फांसल्यामुळें तो तेजःपुंज दिसत होता. त्याच्या शेजारीं दोन्हीं बाजूला दोन शेंदूर फासलेले सोटे ठेविले होते. मारुतीच्या गळ्यांत झेंडूच्या फुलांच्या मोठमोठ्या माळा होत्या. देवाच्यापुढें एक पाट मांडला असून त्यावर कांहीं पैसे, नारळाचे तुकडे व थोडें धान्य ठेवलेलें दिसत होतें. त्या पाटावर मी कांहीं ठेवलें, व प्रदक्षिणा घालून ती मंडळी बसली होती तेथें येऊन बसलों. पूजाऱ्याचा एक स्नेही थंडाई वाटीत बसला होता, त्यानें मला ओळखलें. तो एकदां दवाखान्यांत आला होता व त्यामुळें मला पहातांच तो 'आईये डॉक्टर साहेब' असें ह्मणाला व मी बसल्यावर माझी त्यानें आपल्या दोन मित्रांबरोबर ओळख करून दिली. माझ्या कार्याला तो एक शुभशकुनच

झाला. ती सर्व मंडळी मोठी मनमिळाऊ होती. तो रणजीत मारुती किती वर्षांचा जुना आहे, त्याची स्थापना कोणी केली या बद्दलची माहिती व त्या मारुतीच्या आसपासची भूमी ह्मणजे एक रणक्षेत्र असून एका राजानें त्या रणांत आपल्या शत्रूवर जय मिळविल्यानंतर,—रणांत जीत झाली ह्मणून—त्या मारुतीची स्थापना करून त्यास " रणजीत " असें नांव ठेविलें, तो साद्यंत इतिहास मला त्या दिवशीं ऐकावयास मिळाला. शत्रूचा पराजय होऊन त्याचा अधिपति त्या लढाईंत मारला गेला, ह्मणून त्याच्या स्मारकार्थ एका दगडावर घोड्यावर हातांत भाला घेतला आहे असें त्याचें चित्र खोदून तें तेथें एका झाडाखालीं ठेवलेलें मी पाहिलें. ती ' युद्धस्य कथा रम्या ' आहे पण तें युद्ध किती दिवसांपूर्वीं झालें व कोणामध्यें झालें या संबंधीं निश्चयात्मक कोणास ठाऊक नसल्यामुळें इतिहास व दंतकथा या दोहोंच्या मधोमध ती कथा मोडते. रणजीत मारुती व त्याच्या आसपासचा प्रदेश याबद्दलची अशी गोष्ट निघाल्यानंतर मी ओघाओघानेंच मनकामनेश्वराच्या मंदिराचा प्रश्न काढला. रणजीत—मारुतीच्या पुजाऱ्यास त्या मंदिराची बरीच माहिती असावी असें दिसलें; कारण माझा प्रश्न ऐकून तो मला ह्मणाला कीं " डॉक्टर साहेब, काय दैवाचा खेळ आहे पहा, जुन्या लोकांनीं बांधलेलीं चारपांचशें नव्हे हजारों वर्षें जीव धरून राहिलेलीं घरें आपण पुष्कळ पहातों, पण आपण ह्मणतां तें मनकामनेश्वराचें मंदिर व त्याच्या जवळची चितोडवाल्यांची कोठी बांधून अजून दोन तीनशें वर्षें झालीं न झालीं तोंच मंदिर तर केव्हांच वाहून गेलें व ती कोठीहि जवळ जवळ मातीला मिळाली आहे. नाहीं ह्मणायला मंदिराचा चौथरा कायम आहे, पण तो कोठें आहे हें या गावांत कोणास ठाऊकहि नाहीं. देवाच्या पूजाऱ्याला मेवाडच्या राज्यांतून कांहीं उत्पन्न आहे, पण पूजा न करतां

सुद्धां जर तें पदरांत पडतें तर कोणाचें अडलें आहे रोज पूजेला यावयाचें?"


पूजाऱ्याचें हें भाषण ऐकून मी तें मंदिर व कोठी पाहण्याची आपली इच्छा दर्शविली. आतां त्या सगळ्या मंडळींचा व माझा चांगला परिचय झाला होता तेव्हां ती सर्व मंडळी मजबरोबर येण्यास सिद्ध झाली. जाण्याच्या पूर्वीं, ती तयार झालेली थंडाई सर्वांनीं घेतली व नंतर पाटा, लुडिया, थंडाई गाळण्याचें फडकें वगैरे स्वच्छ धुवून व बाकी सर्व सामान नीट व्यवस्थित रीतीनें ठेऊन आम्हीं सर्व जण देवळांतून बाहेर पडलों.

रणजीत–मारुतीच्या आसपास आतां सर्व जंगल असून आसपासची जमीन कांहीं ठिकाणीं पडित व कांहीं ठिकाणीं शेतीच्या उपयोगास आणलेली आहे. त्या प्रदेशांत कढीलिंबांचीं मनस्वी झाडें आहेत. रणजीत मारुतीपासून दोन फर्लांगावर ईशान्येस क्षिप्रा नदीच्या अगदीं किनाऱ्यावर सुमारे एक पुरुषभर उंचीचा मजबूत, दगडांनीं बांधलेला, पण आतां अगदीं मोडकळीस आलेला चौथरा असून त्यावर एक महादेव आहे. आजकाल त्या चौथऱ्यावर व त्याचे आसपास सीताफळी, बोरी, बाभळी व शिंदी यांचीं पुष्कळ झाडें उगवलीं असून नदीचें पात्रहि पूर्वीं होतें त्यापेक्षां पुष्कळ जवळ आलेलें आहे. असें लिहिण्याचें कारण हें कीं नदीच्या पलीकडच्या तीरावर पूर्वीं जो घाट बांधला होता, तो मातीनें बुजत चालला असून त्या घाटापासून बऱ्याच दूर अंतरावर हल्लींचा पाण्याचा प्रवाह वहात आहे, त्यामुळें ज्या काळीं तो चौथरा बांधला, त्या काळीं नदीचा प्रवाह त्या चौथऱ्यापासून बराच दूर असावा हें स्पष्ट दिसतें. त्या चौथऱ्यावर जो महादेव आहे तोच मनकामनेश्वर होय असें मला त्या पूजाऱ्यानें सांगि-

तलें, आणि तें मला अगदीं बरोबर पटलें; कारण चौथऱ्याच्या उत्तरेच्या कोपऱ्यावरील दगडावर, मी जें पूर्वीं मनकामनेश्वराच्या स्तोत्रांत चित्रित केलेल्या महादेवाचें वर्णन दिलें तसेंच अगदीं हुबेहुब चित्र त्यावर कोरलेलें आहे ! माझ्या बरोबरच्या मंडळींना अर्थात् मी कांहींच सांगितलें नाहीं, पण माझ्या मनांतली कामना पूर्ण होऊन मनकामनेश्वराचें मला त्या दिवशीं दर्शन घडलें या बद्दल मी ईश्वराला शतशः धन्यवाद दिले ! परंतु कालचक्राच्या अतर्क्य गतीबद्दल मला फार खेद झाला. कुमार भीमसिंग किती सज्जन पुरुष व त्यानें ईश्वराकारणें आपल्या आपल्या द्रव्याचा विनियोग करून ठेविला असतां, येवढेंच नव्हे तर तें द्रव्य पुष्कळ दिवस पुरावें व मनकामनेश्वराच्या सेवेंतच तें खर्च व्हावें असा सगळा बंदोबस्त करून ठेविलेला असतां, आज त्या मनकामनेश्वराच्या स्थानाची अशी शोचनीय दुर्दशा व्हावी काय ? तथापि असें कां झालें याचें कारण जर आपणास समजेल तर तें अवश्य समजून घ्यावें असें मला वाटलें. चौथऱ्यावर उभे राहून उत्तरेकडे बोट दाखवून त्या पूजाऱ्यानें मला एक अगदीं जुनाट, पडका, जीर्ण झालेला भाग दाखविला व असें सांगितलें कीं तो वाडा, त्याजजवळ कांहीं दिवसांपूर्वीं होतें तें घर व तो मनकामनेश्वराचा चौथरा हे सर्व एकाच हद्दींत असून त्यांजभोवतीं कोट बांधला होता. पण कालांतरानें तो कोट नाहींसा होऊन तें घर व चौथरा यांमधून कच्चा रस्ता झाला असून त्या रस्त्यानें आजूबाजूच्या खेड्यांतील गाड्या उज्जयिनीकडे जातात. मनकामनेश्वराचें मंदिर कोठें होतें हें याप्रमाणें नक्की समजल्यावर तीं पडकीं ओसाड दोन्हीं घरेंही पाहाणें जरूर होतें पण तीं पहाण्यास जाण्यापूर्वीं मी त्या चौथऱ्याला प्रदक्षिणा करून त्याचा प्रत्येक दगडन्‌दगड नीट न्याहाळून पाहिला. वास्तवीक त्या न्याहाळ-

ण्यापासून कांहीं उपयोग नव्हता हें मलाहि ठाऊक होतें. त्या चौथा-ऱ्यांतच एक जागा तयार करून भीमसिंग आपलें द्रव्य ठेवील हें संभवनीयच नव्हतें, पण...........!

मनकामनेश्वराला नमस्कार करून आम्हीं सर्व मंडळी त्या पडक्या घरांकडे निघालों. वाटेंत किती खाचखळगे पडले होते! किती जंगल माजलें होतें, पायवाटा पडल्या होत्या, रस्ता झाला होता; सारांश, मंदिर व घरें यांमध्यें कांहीं संबंध असेल अशी कल्पना देखील होणें शक्य नव्हतें. पहिल्यानें आह्मांस त्या लहान घराच्या खुणा दिसल्या. खुणा ह्मणजे काय? मातीचा ढीग व त्याखालीं कोठें कोठें दृष्टीस पडणारा दगडी पाया व लांकडांचे सडून, कुजून अर्धवट माती झालेले ओंडके यांवरून तेथें एकाकाळीं एक घर होतें येवढी कल्पना होत होती. बाकी कांहीं नव्हतें. त्याच्या शेजारीं दुसरें जें घर होतें तें मात्र कसेंबसें जीव धरून होतें. जिकडें तिकडें रान उगवलें होतें. पडक्या भिंती, छप्परें, कवलें, खिडक्या, दारें यां सर्वांवर लहान मोठीं गवतांपासून वडाच्या झाडापर्यंत झाडें उगवलीं होतीं; तथापि इतक्या विपन्नावस्थेंत असतांनाहि एकेकाळीं तो वाडा श्रीमान लोकांस रहाण्या योग्य असावा असें भिंतीवरून काढलेल्या चित्रांवरून व घराच्या उरलेल्या भागाच्या झोंकावरून नजरेस येत होतें. चित्रें आतां अगदीं निस्तेज दिसत होतीं. पण त्यांवर दिलेला रंग इतका पक्का होता कीं तो शेंकडों वर्षें वारा पाऊस खाऊनदेखील अद्याप आपलें अस्तित्व दर्शवीत होता. घराच्या पुढच्या बाजूला एक प्रशस्त ओटा व त्याच्या आजूबाजूला दोन्हीकडे दोन भव्य खांब असून त्यांवर दोन कुंडे ठेविलेले होते, त्यावरून वाड्यांत कोणी राहात असतांना तेथें चांगली बाग केलेली असावी असें दिसत होतें. त्या जुन्या वाड्यांत आम्ही शिरलों त्यावेळीं



श्री मनकामनेश्वर, उज्जयिनी.



श्री. नरसिंह चिंतामण केळकर.

( अध्यक्ष, कविसंमेलन, उज्जयिनी )

तेथें दोन साधू आपलें स्वयंपाक पाणी करीत असतांना दिसले. एक जण कणीक मळीत होता व दुसरा "फू फू" करून गोवऱ्यांचे झगरें पेटवीत होता. अगदीं एकांतांतील जागा, शेजारी असलेली प्रशस्त बावडी व रानशेणी, लांकडें, ढलप्या यांचें वैपुल्य, त्यामुळें साधू-बैरागी लोक तेथें कधींकधीं मुक्काम करतात असें ठिकठिकाणीं पड-लेल्या राखेच्या ढिगाऱ्यांवरून समजत होतें. तो जुनाट वाडा एकदां आंतून पहावा अशी इच्छा प्रगट करून, माझ्या मित्रांच्या संमती असं-मतीची वाट न पहातां मी तर आंत घुसलों, अर्थात् माझ्यामागून ती माझी स्नेहीमंडळीहि आली. तळमजला, त्यांतील खोल्या, पडवी, माड्या, खिडक्या, खांब अमुक ह्मणजे मी पाहिलें नाहीं असें नाहीं. माझ्या त्या विलक्षण चौकसपणाबद्दल ती माझी स्नेही मंडळी मला हंसलीहि असतील, पण मला त्यांची कोठें पर्वा होती ? अंदरकी बात त्यांना कोठें ठाऊक होती ? व त्यांना मी ती सांगतों कशाला ? मी तो सर्व जुनाट वाडा नीट पाहिला व त्यावरून मला जीं कांहीं अनुमानें काढा-वयाचीं होतीं तीं काढलीं व नंतर वाड्याच्या शेजारीं असलेली प्रशस्त बावडी पहावयास निघालों, तो योगायोग काय सांगावा ? वाड्याच्या बाहेरच्या बाजूला बरोबर मनकामनेश्वराच्या चौथऱ्या एवढा चौथरा असून, त्यावर महादेव होता व चौथऱ्याच्या एका कोपऱ्याच्या दगडावर तेंच मनकामनेश्वराचें चित्र कोरलेलें होतें ! माझ्या आश्च-र्याला व आनंदाला पारावार नाहींसा झाला. कालिकामंदिरांत मिळा-लेल्या माहितीनें अगोदरच आशा वाटत असलेली, त्यांत मनकामने-श्वराचें दर्शन घडल्यानें झालेला आनंद व त्यांतच केवळ अकल्पित रीतीनें दृष्टोत्पत्तीस आलेलें मनकामनेश्वराचें मंदिर व तो जुना वाडा यांचा दुवा निःसंदेह जोडणारें तें मनकामनेश्वराचें दोन्ही चौथऱ्यांवर

एकाच ठिकाणीं असणारें चित्र, इतक्या गोष्टी जमल्यानंतर माझ्या आनंदाला कांहीं न्यून होतें काय ?

होय. एक न्यून होतें. आतांपर्यंत मिळालेल्या माहितींत त्या वाड्याचा पूर्वींचा मालक जो विजयसिंग—भीमसिंगाचा भाचा, त्याचा किंवा त्याच्या वंशजांचा उल्लेख कोणी केलेला नव्हता. त्याचा वाडा तर मला दिसला, पण विजसिंगाबद्दलची माहिती कशी लागावी ? असा प्रश्न माझ्यापुढें उभा राहिला.

बावडी चांगली प्रशस्त होती. पूर्वीं तिच्यावर मोटा चालत असत त्यांच्यामुळें दोऱ्यांचे घट्टे दगडांवर पडून दगड झिजलेले होते. आतां मोटा वगैरे कांहीं नसून पाण्यांत केरकचरा व शेवाळ पुष्कळ झालें होतें.

याप्रमाणें भीमसिंगानें लिहिलेल्या सर्व गोष्टी तंतोतंत जुळल्या. मनकामनेश्वर, चितोडवाल्यांचा हत्ता, विजयसिंहाचा वाडा, पूजाऱ्याचें —आतां मातींत मिळालेलें—घर हीं तर प्रत्यक्ष पाहिलीं. भीमसिंगानें नेमलेला पूजारी नीलकंठ शास्त्री चितोडवाले यांचा वंशज जिवंत असून तो भैरवगडास बहुतकरून सांपडण्याचा संभव आहे हेंहि कळलें. आतां फक्त विजयसिंगाबद्दल शोध राहिला, परंतु आतां त्याच्यावांचून अडण्यासारखें कांहीं नव्हतें. बुद्धिबळाचा डाव मांडला होता. हत्ती, घोडे, प्यादीं वगैरे मोहरीं सरकविण्याला जागा झाली होती. उंटासारखें एखादें मोहरें अडकून पडलें होतें. तथापि पुढेंमागें त्यालाहि सरकविण्यास जागा सांपडेल अशी आशा वाटूं लागली, व त्या आशेच्या जोरावरच मी पुढें पाऊल टाकण्याचा संकल्प केला.

हे आशे ! तूं केवढी शक्तिमती आहेस !

**"होईना लेश सृष्टिप्रलय बघुनिही गे तुझा धैर्यनाश**
**पाहोनी त्या अनर्थां बसशिल करूनी हास्य तूं सावकाश ।**
**साऱ्या ब्रह्मांडमाळा मृतसम पडती तच्चितेच्या पुढें तूं**
**लावोनी दीप मोठा धरशिल सखये अंतरीं स्वीय हेतू ॥"**

५२०

# प्रकरण दहावें

## कालिदासाच्या घरीं

केला या परि पूर्ण नाशहि तरी वाचोनि शाकुंतल
जिज्ञासूजन धाउनि दुरुनियां येथें खला येतिल।
जी भूमी जनि जन्म दे कविगुरु श्रीकालिदासाप्रती
ती पाहूं जननी स्वकीय नयनीं आशा धरोनी अती॥

भास्कर रामचंद्र तांबे.

" प्रिये अवंतिके। नयन हृदयरंजिके॥ धृ०॥
तूं भूषण तूं जीवन। परमार्थाचें साधन॥
आहे मज तुजवांचुनि। सर्व जग फिकें॥ १॥"

असें " विनायक " कवीनें रचिलेलें मधुर पद्य गुणगुणत मी एके दिवशीं मनकामनेश्वराच्या पुजाऱ्याचा विद्यमान वंशज जो कन्हय्यालाल त्याचा तपास करण्यासाठीं भैरवगडाकडे जाण्यास निघालों. हल्लीं वसलेल्या शहरापासून ३–४ मैल अंतरावर नदीच्या पलीकडे हा गड असून तेथें सिद्धवट, भैरवनाथ व उज्जयिनीचा तुरुंग हीं प्राचीन स्थानें आहेत. उज्जयिनींतील ही तुरुंगाची जागा फार प्राचीन कालापासून ठरलेली आहे. उज्जयिनीचें अशोककालाचें वर्णन करितांना ह्युएनसंग हा चिनी प्रवासी ह्मणतो कीं, अशोकानें त्या नगरीबाहेर आपल्या तरुणपणीं, अपराध्यांना शिक्षा करण्याकरितां एक कारागृह बांधिलें होतें. तें बहुधा याच ठिकाणीं असावें. प्राचीन कालीं उज्जयिनी शहरांतच भैरवगडाचा अंतर्भाव होत असे. भर्तृहरी व कालिदास यांचीं मंदिरेंहि याच भागांत होतीं. अवंति या जनपदावर, व उज्जयिनी या नगरा-

वर व त्यांच्या आसमंतात् भागांतील सिंधु आणि क्षिप्रा, गंधवती आणि गंभीरा, या नद्यांवर महाकवी कालिदासाचें अत्यंत प्रेम असे. हें प्रेम जन्मभूमीच्या वात्सल्यामुळें असो किंवा चिरसहवासाच्या बंधनानें असो पण तें होतें खरें. सिंधु, गंधवती आणि गंभीरा ह्या नद्या निर्मनोविकार बुद्धीच्या तुम्हां आम्हां लोकांना कितीहि बारीकसारीक असोत परंतु कालिदासाला त्या फार महत्त्वाच्या वाटत असल्या पाहिजेत असें दिसतें. एरवीं मेघदूतांत त्याचें तो वर्णन करीत बसला नसता. भैरवगडाकडे जातांना पुरातन उज्जयिनीचे पुष्कळ अवशेष दृष्टीस पडूं लागतात. दिल्लीच्या आसपास इंद्रप्रस्थाचे किंवा पुराण्या दिल्लीचे जसे विपुल अवशेष आढळतात तितके जरी नाहींत तरी जे कांहीं थोडेबहुत अद्याप झाडाझुडुपांतून दिसतात तेवढ्यांवरूनहि या शहराच्या मोठेपणाची सहज कल्पना होते. पौराणिककाल, बौद्धधर्माच्या उत्कर्षाचा काल, जैनधर्माचा अभ्युदय, महंमदीधर्माचा प्रखर अंमल, मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष व हल्लींचा राज्य-कारभार हीं सर्व या नगरानें पाहिलेलीं आहेत. तसेंच अत्यंत सुख अनुभविलेलें आहे व अत्यंत दुःखहि पहात आहे. प्राचीनकालीं हें शहर अनेक मधुर नांवांनीं प्रसिद्ध असे. अमरावती, अवंति, कनकशृंग, कुमुद्वती, कुशस्थली, पद्मावती, प्रतकल्पा, शिवपुरी, विशाला वगैरे अनेक नांवें असून हें ९ कोस रुंद व १३ कोस लांब असे, ह्मणून 'नव तेरी' असेंहि हिला म्हणत. तीं कर्णमधुर व सार्थ नांवें सर्व नाहींशी होऊन हल्लींचें कर्णकटु व निरर्थक 'उज्जेन' हें नांव या दुर्दैवी गांवाला हल्लीं मिळालेलें आहे. प्राचीन उज्जयिनीचें आनंदकारक स्मरण व आतां डोळ्यांपुढें दिसत असलेले मातींत मिसळून जात असलेले अवशेष हीं माझ्या चित्तांत कालवा-

कालव करीत होतीं.* आज या ओसाड उज्जयिनीमध्यें मी फिरत आहे, पण एकेकाळीं याच निर्जनप्रदेशांत एक अत्यंत भरभराटींत असलेली व 'विशाला' या नांवाला सार्थ करणारी महापुरी येथें होती व तीमधून श्रीकृष्ण, सांदीपनी, भर्तृहरी, विक्रमादित्य, गोपीचंद, कालिदास, मच्छिंद्रनाथ यांच्यासारखीं नररत्नें हिंडत होतीं असें मनांत येऊन क्षणभर मी कोणत्या कामाला चाललों होतों तें विसरलों. मनांत अनेक प्रकारचे विचार येऊं लागून मी क्षिप्रा नदीच्या किनाऱ्यावर स्वस्थ बसलों. सिनेमाच्या चित्रपटाप्रमाणें प्राचीनकालचे अनेक काल्पनिक देखावे मजपुढें दिसूं लागले. अवंतिखंडांत वर्णिलेला गंधर्वसेन राजा, लंबकर्णाचे रूपानें एका कुंभाराच्या घरीं होता व त्याचें अवंतिराजाचे कन्येबरोबर झालेल्या विवाहाचें अंधुक अंधुक चित्र मला पहिल्यानें दिसलें. पौराणिककालांतील अनेक देखावे पाहतां पाहतां विक्रमाचे पाठीमागें साडेसात वर्षे लागलेल्या शनीमहाराजांचें दर्शन झालें. त्यानंतर श्रीकृष्ण, बलराम, व सुदाम, भगवान सांदीपनी ऋषींचे आश्रमांत विद्याभ्यास करीत असलेले पाहिले. त्यानंतर वत्स देशाचा राजा उदयन+ यानें उज्जयिनीचा राजा चंडमहासेन याची कन्या वासवदत्ता

* "तुह्मीं आह्मीं ह्मणतो इतकी प्राचीन जर आर्यसंस्कृति असेल तर तिच्या खुणा कोठें आहेत असें कोणी म्हणेल, तर त्याला उत्तर हें कीं प्राचीन शहराच्या आसपास हा सर्व पुरावा मिळेल, पण अद्यापि तो कदाचित् भूमिगतच असेल. संशोधनाच्या योग्य रीतीनें हे भूप्रदेश उकरून पाहिले तर हा पुरावा हवा तितका सांपडेल. पण श्री आणि सरस्वती ह्या दोन्ही एकत्र नांदत नाहींत हें तुह्मांस माहीत आहेच ह्मणून ही गोष्ट हुकमी करितां येत नाहीं."

न. चिं. केळकर.

\+ प्राप्यावन्तीन् उदयनथाकोविद ग्रामवृद्धान् ।
पूर्वोद्दिष्टां अनुसर पुरीं श्रीविशालाम् विशालाम् ॥

पूर्वमेघ श्लो. ३०.

जाऊनीयां पुढति जलदा ! तूं अवंती विशाला ।
पाहीं, जेथें उदयनकथा वृद्ध सांगे नव्याला ॥

कवि—डॉ. गंगाधर गोविंद दामले.

हिला हरण केली तो देखावा दिसूं लागला. तें दृश्य डोळ्यांपुढून जातांच मदनाचा धि:क्कार करीत करीत तपोवनाला जाणारा भर्तृहरी दिसला. तो दृष्टीआड होतांच राजकन्येनें मूर्ख म्हणून महालाबाहेर हांकून दिलेला व वेडसर दिसणारा एक तरुण कालिकादेवीच्या समोर तपश्चर्या करीत बसलेला दिसला. त्या तपानें कालिकादेवी प्रसन्न झाली व तिनें त्या तरुणाच्या जिव्हेवर वास केल्यामुळें त्याला कवित्व-स्फूर्ति उत्पन्न झाली व त्याचें कालिदास असें नांव पडलें, तो देखावा दिसला. नंतर कालिदास रघुवंशाची रचना करीत असलेला दिसूं लागला. त्या काव्याचा दररोज एक सर्ग रचून पुरा करावयाचा असा त्यानें संकल्प केला होता. त्या क्रमाप्रमाणें पहिले चार सर्ग पूर्ण होऊन पांचव्या दिवशीं पांचव्या सर्गाचे श्लोक रचण्याचें काम चाललें असतां रात्रीं कालिदासाला झोंप लागली. तेव्हां प्रत्यक्ष कालिमातेनें येऊन त्या सर्गांतील १४ श्लोक आपण स्वतः लिहून तो सर्ग पुरा केला, ती गंमत दृष्टी पडली. त्यानंतर अरण्यांत एक वधस्तंभ दिसूं लागला, व त्या भोंवतीं लोकांच्या झुंडीच्या झुंडी येऊं लागल्या. मी मोठ्या कुतुहलानें पाहूं लागलों. चारुदत्ताला सुळीं देण्यासाठीं नेत होते व त्या लोकप्रिय मनुष्याला शेवटचा एकदां तरी पाहून घ्यावा ह्मणून पौरजन एकवटत चालले होते. तशा धक्काबुकींत संवाहक भिक्षु वसंत-सेनेसाठीं वाट काढीत मोठ्या मुष्किलीनें चालला होता !

तो प्रसंग दृष्टीआड होतांच हिंदू व मुसलमान या दोघांनाहि सारखेंच पूज्य असलेले 'पीर मच्छिंदर'* यांचें स्मारक दिसूं लागलें. बंगालचा राजा गोपीचंद व त्याची आई मैनावती यांचे गुरू व नाथपंथाचे

---

* पूर्वी मत्स्येंद्रनाथाची समाधी असलेल्या जागीं मुसलमानी अमलांत त्यावर कबर बांधली गेली अशी दंतकथा आहे.

आद्यप्रवर्तक हे मत्स्येंद्रनाथ होत. महात्मा कबीर यांचेप्रमाणें हिंदू व मुसलमान या दोन्हीं जातींत यांचे लक्षावधि भक्त असत. हे समाधिस्त झाल्यावर क्षिप्रेच्या किनाऱ्यावर यांची समाधि स्थापन करण्यांत आली. मुसलमान लोक याला 'पीर मच्छिंदर' म्हणून हात जोडतात. हिंदुलोक मच्छिंदरनाथ म्हणून नमस्कार करतात.

मच्छिंदरनाथांची समाधि दिसेनाशी झाल्यावर पुनः अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची व द्वारावती यांच्या जोडीला बसलेली व मुमुक्षु-जनांना मोक्ष देणारी अवंतिकापुरी भर्तृहरी व कालिदास यांच्याकालीं जशी दिसे तशी दिसूं लागली. भर्तृहरी व कालिदास हे समकालीन होते. त्यांची भाषासरणी सारखीच सरळ, साधी व प्रासादिक असे व ते दोघेहि स्नेही असल्यामुळें आपले लेख लिहावयास एकदमच आपल्या क्षिप्रा नदीच्या तीरांवर असलेल्या मंदिरांत बसत असत. तेथेंच आपण आतां बसलों आहोंत अशी मी आपल्या मनाशीं कल्पना केली व त्या आनंदाचा अनुभव घेतला. भर्तृहरीच्या शतकांत व कालिदासाच्या शाकुंतलांत जर पुढें दिलेले एकच श्लोक सांपडतात तर अमक्यानें ते तमक्याचे जशाचे तसे घेतले असें मानण्यापेक्षां ते दोघेहि समकालीन होत हें मत मला विशेष ग्राह्य वाटलें.*

---

* कोणत्याहि दोन ग्रंथांतील सिद्धांत एकसारखे आहेत एवढ्याच गोष्टीवरून त्यांपैकीं पहिला कोणता व मागाहूनचा कोणता याचा निर्णय होऊं शकत नाहीं हें प्रथमतः लक्षांत ठेवलें पाहिजे. कारण, (१) या दोहोंपैकीं पहिल्या ग्रंथांतील विचार दुसऱ्यावरून, किंवा (२) दुसऱ्या ग्रंथांतील विचार पहिल्या वरून घेतले असतील, असे दोन्हीं पक्ष या ठिकाणीं संभवतात. म्हणून कोणत्याहि दोन ग्रंथाचें काल स्वतंत्ररीत्या प्रथम निश्चित केल्यावर मग विचार-सादृश्यावरून अमक्यानें अमक्यापासून अमुक विचार घेतले असतील असें ठरवावें लागतें. ( शिवाय एकमेकांसारखे विचार दोन देशांत दोन ग्रंथकारांस




**बाळ गंगाधर टिळक**

स्वतंत्रपणें एकाच कालीं किंवा भिन्नकालीं सुचणें अगदींच अशक्य नसल्यामुळें दोन ग्रंथांतील साम्य पाहतांना तें स्वतंत्ररीत्या उद्भवण्यासारखें आहे किंवा नाहीं, आणि ज्या दोन देशांत हे ग्रंथ झाले त्यामध्यें तत्कालीं कांहीं दळणवळण असून एका देशांतून हे विचार दुसऱ्या देशांत जाण्याचा संभव होता कीं नाहीं याचाहि विचार करावा लागतो. ) टिळक—**गीतारहस्य पृष्ठ ५८१**

ते श्लोक हेः—

**भवन्ति नम्रास्तरवः फलागमैः नवाम्बुभिर्दूरि विलंबिनो घनाः ।**
**अनुद्धताः सत्पुरुषाः समृद्धिभिः स्वभाव एवैष परोपकारिणाम् १॥**

अर्थः—

**वृक्ष फार लवती फलभारें । लोंबती जलद घेउनि नीरें ॥**
**थोर गर्व न धरी विभवाचा । हा स्वभाव उपकारपरांचा ॥ १ ॥**

—वामन.

**अनाघ्रातं पुष्पं किसलयमलूनं कररुहैः ॥**
**अनाविद्धं रत्नं मधुवनमनास्वादितरसम् ॥**

**अखण्डं पुण्यानां फलमिव भवद्रूपमनघम् ।**
**न जाने भोक्तारं कमिह समुपस्थास्यत इति ॥ २ ॥**

अर्थः—

**न हुंगिलें पुष्प न तोडिलें दळ ।**
**न विंधिलें रत्न न भक्षिलें फळ ॥**
**असें इचें रूप अभुक्त चांगलें ।**
**कोणा सभाग्यास मिळेल ना कळे ॥ २ ॥** —वामन.

नीतिशतक व शाकुंतल हे दोन ग्रंथ माझ्या मनश्चक्षूंपुढून निघून गेल्यानंतर “ मेघदूत ” मजपुढें आला. या मेघदूतामुळें कालिदासानें उज्जयिनीचें नांव चिरस्मरणीय केलें! कारण हिचें वर्णन मेघदूतांत जितकें दिलें आहे तितकें “अलके” शिवाय दुसऱ्या कोणत्याहि स्थलाचें नाहीं. तसेंच उज्जयिनीचें जें वर्णन मेघदूतांत दिलें आहे तें सहज ओघानें दिलें नसून मेघास मुद्दाम वांकडा मार्ग करून तिकडून जावयास यक्ष सांगत आहे. यक्ष ह्मणतो:—

**जातां उत्तरपथें वांकडी उज्जयिनी जरि आहे ।**
**तरी तयेचीं रम्यमंदिरें न पाहिल्याविण राहे ॥ १ ॥**[1]

* * *

**ख्याता जेथें उदयनकथा[2] गांठुनी तो अवंती[3]**
**पूर्वोक्ता जी बघशिल पुरी श्रीमंती[4] उज्जनी ती; ।**
**वाटे येतां सुकृत घटु[5]नी स्वर्गवासी जनांनीं**
**स्वर्गाचें हें शकल अणिलें शेष पुण्यें हरोनी[6] ॥ २ ॥**

---

१ कृष्णशास्त्री चिपळुणकर कृत. २ उदयन या नांवाचा राजा होता. याची राजधानी कौशांबी. हा पांडवांच्या वंशांतला असून अर्जुनापासून साहावा पुरुष होय. हस्तनापूर गंगेच्या पुरानें वाहून गेल्यामुळें हा कौशांबी नगरींत रहात असे. उदयनानें उज्जयिनीचा राजा चंडमहासेन याची कन्या वासवदत्ता हरण करून नेली, इत्यादि याच्या कथा संस्कृतांत कथासरित्सागर नांवाच्या ग्रथांत सविस्तर सांगितल्या आहेत. ३ मालवदेश. ४ संपन्न. ५ कमी होऊन. ६ रा. बाळकृष्ण लक्ष्मण अंतरकर कृत.

**पुष्पांचा ज्यामधिं मधुरसा दाटला फार वास ।**
**लाली आली ललितवनितापादरागें जयास ॥**
**ऐशा नामीं बसुनि भवनीं उज्जनीतें वघावें ।**
**आला मार्गक्रमण करितां शीण त्यातें हरावें ॥ ३॥**

* * *

**संध्याकालाविण जलधरा ! अन्यकालींहि जासीं ।**
**अस्ता जाई रवि तंव रहा या महाकालवासीं[2] ॥**
**पूजाकालीं स्तनितपटहें[3] शंकरातें उदंड[4] ।**
**सेवूनीयां सुफल मिळवी गर्जनेचें अखंड[5] ॥ ४ ॥**

कालिदासाच्या त्या मंदाक्रांता गुणगुणत असतांना माझ्या पुढून तो 'यक्षसंदेश' केव्हां निघून गेला व त्याच्या ठिकाणीं 'रघुवंश' केव्हां येऊन उभा ठाकला हें माझ्या लक्ष्यांतहि आलें नाहीं ! या रघुवंशांत उज्जयिनीचा पुन्हां एकवार उल्लेख करून, कालिदासानें तिचा केलेला बहुमान माझ्या दृष्टीपुढें आतां स्पष्ट दिसूं लागला ! अवंतिनाथाला रघुवंशाच्या सहाव्या सर्गांत सूर्याचीच उपमा दिलेली आहे. व त्याच्या अजिंक्य प्रतापाचें त्यामध्यें वर्णन केलें आहे. इंदुमती राजकन्येला तिची सखी सुनंदा ह्मणत्ये—

**'देखे सुंदरि हा अवंतिपति गे विस्तीर्ण वक्षस्थळ**
**याचें, बाहु सुदीर्घ, मध्य कृशही याचा असे वर्तुळ; ।**
**त्वष्ट्यानें[6] चरकीं धरोनि नव[7] कीं चंडांशु[8] जो संभ्रमें**
**केला स्त्रीस सुसह्य, तोच नृप हा, ऐसें मनाला गमे ॥'***

---

१ रा. लक्ष्मण गणेशशास्त्री लेले कृत. २ शंकराच्या स्थानीं—उज्जयिनीस. ३ गर्जनारूपीं नगाऱ्यानें. ४ पुष्कळ. ५ भालचंद्र शंकर देवस्थळी कृत. ६ देवांचा शिल्पकार—सुतार—जो त्वष्टा, त्याची कन्या संज्ञादेवी ही सूर्याला दिली होती. त्याचें तेज तिला सोसेना, ह्मणून त्यानें सूर्याला चाकावर लावून सुसह्य केलें, तोच हा राजा होय कीं काय, अशी उत्प्रेक्षा केली. सारांश हा राजा फार तेजस्वी होता असा या श्लोकाचा भावार्थ होय. ७ नूतन. ८ सूर्य.

* कै. गणेशशास्त्री लेले कृत.

**श्रीचंद्रमौलि[1] भगवान् शिव तत्समीप,**
**हा उज्जनींत वसतो सुकृती महीप ।**
**कांतासमेत सुख घे नृप चांदण्याचें,**
**हा कृष्णपक्षिंहि अवंतिपतीच साचें ॥***

* * *

**येतो क्षिप्रा[2] नदीला झगडुनि ह्मणुनि वायु जो शीत वाहे ।**
**तेणें उद्यानवृक्षावलि तटगत ती सर्वदा हालताहे ॥ ***

* * *

महाकवीच्या त्या काव्यांच्या आठवणींत मी किती वेळ तरी त्या नदीवर मोठ्या आनंदांत होतों. चोहोंकडे निसर्गाचा मनोहर देखावा दिसत होता. शेतें, टेकड्या, व जमीन हिरव्यागार पानांनीं व झाडांनीं सुंदर दिसत होतीं. त्या सर्व प्रदेशांत सुमारें दोन हजार वर्षांपूर्वीं अत्यंत गजबजलेलें महानगर होतें. श्रीधर स्वामीनीं शिवलीलामृताच्या ४ थ्या अध्यायांत उज्जयिनीला "महानगरी" असें ह्मटलें आहे.

( ओंवी २९ ).

**"अवंतीनगरीची रचना । पाहतां आश्चर्य वाटे मना ॥**
**सप्तपुरींत श्रेष्ठ जाणा । उज्जनी नाम तियेचें ॥ ८६ ॥**

या महानगरींत मी आणखीहि विचार करीत बसलों असतों, पण समोरच्या भैरवगडावरच्या घड्याळाचे चार ठोके ऐकल्याबरोबर मी चटदिशीं उठलों व भैरवनाथाच्या मंदिराकडे निघालों. हें भैरवनाथाचें मंदिर फार पुरातन असून तें क्षिप्रानदीच्या कांठावर आहे व तेथें भैरवगडाकडे जाण्यास नदीला एक पूल आहे. तो ओलांडून मी शेतांतून वाट काढीत काढीत त्या भैरवगडाच्या मंदिरांत गेलों.

---

१ उज्जयिनीस महाकाल ह्मणून शिवाचें स्थान आहे. त्या शिवमस्तकावर चंद्र असल्यानें उज्जयिनींत रात्रीचें सर्वदा चांदणें असतें, कधीं अंधार असत नाहीं, या गोष्टीकडे येथें लक्ष्य आहे. २ उज्जयिचीनी नदी, 'क्षिप्रा'

* कै० गणेश शास्त्री लेलेकृत.

अलीकडे शेकडों वर्षांत त्या मंदिराकडे कोणाचें लक्ष्य गेल्याचें दिसत नव्हतें. पूर्वीं कधीं कोणी भक्तिमान गृहस्थानें साधुसंतांच्या उपयोगासाठीं मंदिराच्या आसपास बांधलेल्या ओंवऱ्या पडून झडून गेल्या होत्या. त्यांच्या आसपास चोहोंकडे रानच रान माजलें होतें. त्या झाडाझुडपांतच दोनचार ठिकाणीं छिन्नविछिन्न झालेल्या कांहीं मूर्ती झाडांना टेकून ठेवलेल्या असून त्यापैकीं कांहींवर केव्हांतरी शेंदराचा संस्कार झाला असावा असें दिसत होतें. भैरवाच्या मंदिरांत एक म्हातारा गृहस्थ थंडाई वाटण्याच्या नादांत बसला होता. त्याचें वय जवळ जवळ ६० असावें असें दिसलें. शरीर कृश असून केंसही सर्व पिकलेले होतें. अंगावर नेसलेल्या फाटक्या पंचाखेरीज कांहीं नसून तो देखील नवा असतांना कोणत्या रंगाचा असेल कोण जाणे असें वाटत होतें. पंचा असा जर बेमालूम तर बिचाऱ्या जानव्यावरून कशाला कधीं हात फिरत असेल ? कालिकामंदिरांत मला मिळालेल्या माहितीवरून व समोर दिसणाऱ्या एकंदर प्रकारावरून तोच गृहस्थ कन्हयालाल असावा असें मी ताडलें व अशा माणसाला आपलासा करून घेऊन त्याच्यापासून सर्व गोष्टींचा शोध लावावयाचा आहे असा सर्व विचार करून मी जोडा काढून मंदिरांत शिरलों, देवाच्या समोरची घंटा वाजविली, साष्टांग नमस्कार घातला व नंतर देवाला प्रदक्षिणा करून मी जेथें कन्हयालाल आपल्या उद्योगांत होते तेथें आलों, व त्यांना नमस्कार करून विचारलें

"कन्हयालालजी पूजारी आपणच ना ?"

त्यानें उत्तर केलें, "होय महाराज, कां बरें ?"

मी म्हटलें, कांहीं नाहीं. गडावर कालिकामातेच्या मंदिरांत मला आपण येथें असता असें कळलें, तेव्हां आपणा जवळून कांहीं माहिती मिळविण्यासाठीं मी मुद्दाम आपणाकडे आलों.

हें ऐकतांच थंडाई घोटण्याचें काम बंद ठेवून तो गृहस्थ मजकडे थोड्या संशयित मुद्रेनें पाहूं लागला व मला ह्मणाला, " महाराज, माझ्या-पासून आपल्याला काय माहिती मिळणार ? आपण पुस्तके वकील साहेब आहांत हें मी ओळखलें, पण आपणास मी भैरवनाथाची शपथ वाहून सांगतों कीं जमनालालच्या घरीं मी आज वर्षाभरांत गेलों नाहीं व त्याच्या त्या मुकदम्यासंबंधानें मला कांहीं ठाऊकहि नाहीं.

तेव्हां मीं हंसून त्याला म्हणालों, " कन्हयालालजी, छे: छे: मीं पुस्तके वकील साहेब नाहीं व तुमच्या खटल्यासंबंधानें मला कांहीं कर्तव्यहि नाहीं. तुह्मी जाणें व तुमचा खटला जाणें. मला तुमच्या घराण्यासंबंधीं कांहीं माहिती हवी आहे ह्मणून मी तुमच्याकडे आलों. तुमचें मूळचें गांव कोणतें ? "

कन्हयालालाचा संशय याप्रमाणें घालविल्यावर, तो किंचित् हंसला, व मला ह्मणाला, " महाराज, आम्ही मूळचे मेवाडी ब्राह्मण. आमचा गांव मूळचा चितोड, पण आह्मांला येथें येऊनच पुष्कळ पिढ्या झाल्या तेव्हां आम्हीं आतां उज्जेनचेच ह्मणवितों. "

" तुम्हीं उज्जयिनीस आपलें घरदार सोडून कां आलांत, याबद्दल तुह्मांला कांहीं ठाऊक आहे ? "

होय. मागें पुष्कळ वर्षांपूर्वीं मेवाडच्या एका राजपुत्रानें उज्जयिनीस एक मंदिर बांधलें व त्याच्या पूजेअर्चेची व्यवस्था आमच्या घराण्याकडे सोंपविली, तेव्हांपासून आम्हीं जे.इकडे आहोंत ते आहोंत.

" तुमच्या घरांत आतां कोणकोण माणसें आहेत ? "

**कन्हय्यालाल**:—"कोणी नाहीं. आम्हीं आतां दोघेजणच उरलों आहोंत. ती नदीवर पाणी आणावयाला गेली आहे, ती आतां इतक्यांत

येईल. तीही गेल्या वर्षी मरतां मरतां वांचली. माझा वडील भाऊ होता तो पहिल्या प्लेगमध्यें मेला व त्याचा मुलगा होता तो नदींत पोहायला गेला होता तो नदींतच बुडून मेला. कोणी ह्मणतात पोहतां पोहतां धोतर पाण्यांत अडकून बुडाला व कोणी ह्मणतात मगरीनें ओढला. मेला खरा. कुणाला ठाऊक काय झालें. मी त्या दिवशीं येथें नव्हतों.

**मी:**—तुम्ही पहिल्या पासून येथेंच राहात आलांत कीं अलीकडे येथें राहूं लागलांत?

**कन्हय्या.**—अलीकडे अलीकडे ह्मटलें तरी पुष्कळ वर्षे झाली येथें राहायला लागून आम्हांला. आम्हीं आमच्या लहानपणीं रणजीत-हनुमानाच्या जवळ रहात होतों. पुढें माझा बाप मेला, घरहि नदीला पूर येऊन वाहून गेलें, व महादेवाचें मंदिरहि पडून गेलें. त्या पूजे-बद्दल आह्माला मेवाडांतून कांहीं उत्पन्न होतें व घरहि होतें.

**मी:**—कोणचा महादेव हा?

**कन्हय्या:**—त्याला मनकामनेश्वर महादेव ह्मणत असत. आतां तेथें आमचें घरदार वगैरे कांहीं नाहीं. जमीन सरकारांत गेली आहे. तेव्हां आतां आम्हीं तिकडे जातो कशाला? लहानपणापासून आम्हीं या देवाची पूजा करतों, व आपल्या सारखे यजमान आले ह्मणजे त्यांना सिद्धनाथाचें दर्शन करवितों. हें: हें:, आयुष्यमान् भव." मीं त्याच्या यजमान म्हणण्याचा व "आयुष्यमान् भव" याचा अर्थ समजलों व खिशांतून एक पावली काढून त्यास दिली. त्याबरोबर त्यानेंहि दोन-चार लांबलचक आशिर्वाद मला दिले.

मी नंतर ह्मणालों, "कन्हयालालजी, मनकामनेश्वराच्या मंदिरा-जवळच्या वाड्यांत फार दिवसांपूर्वीं विजयसिंगजी ह्मणून कोणी रहात असत काय?"

**कन्हय्या:**—विजयसिंगजी ? हें कसें काय ? हाच प्रश्न परवाचे दिवशीं मला दुसऱ्या एका गृहस्थानें विचारला होता, असें मला आठवतें.

" कोणत्या गृहस्थानें ? " मी त्याला विचारलें.

**कन्हय्या:**—सिद्धनाथाच्या घाटावर मला एक गृहस्थ परवां भेटला. घाटांवर तो स्नान करावयाला आला होता, त्याला मी संकल्प सांगितला व स्नानानंतर त्यानें मला महादेवावर अभिषेक करावयाला सांगून दक्षिणाहि दिली. मी कांहीं त्याला ओळखलें नाहीं, पण तो ह्मणत होता कीं त्यानें मला ओळखलें ह्मणून. आपण मला आतां विचारले तसे त्यानेंहि मला पुष्कळ प्रश्न विचारले. हे प्रश्न विचारण्याचा एकंदर उद्देश काय ?

**मी**—केवढा होता तो मनुष्य ? कांहीं त्याची माहिती तुह्मांला देतां येईल ?

**कन्हय्या:**—कोणी मारवाडी अगर मेवाडी असावा तो. तो बहुधां उज्जेन, ॐकारेश्वर वगैरे करावयाला इकडे आला असावा. तीन रात्रीं उज्जयिनींत—शिवपुरींत रहावयाला पाहिजे असें शास्त्र आहे ह्मणून राहिलों असें एकदां बोलला होता तो. आहे उंचा, पुरा तो. माझी व आमच्या घरादाराची त्याला बरीच माहिती होती असें दिसलें, पण मला कांहीं त्याला पाहिल्याचें कधीं आठवत नाहीं. वय जवळ जवळ पन्नास असावें व दिसायला साधारण कुरूप होता, दाढीबिढी नव्हती.

**मी:**—त्याचें नांव काय ?

**कन्हय्या:**—कोण जाणें काय तें. त्यानें कांहीं मला सांगितलें नाहीं.

हें काय लचांड उपस्थित झालें ? हा कोण गृहस्थ असावा ? मनकामनेश्वराच्या एकंदर गोष्टीसंबंधानें माहिती असणारा व माझ्या अगोदर येऊन माहिती मिळविणारा हा परगांवचा मनुष्य कोण ? नीलकंठशास्त्री चितोडवाला ह्मणजे मनकामनेश्वराचा पहिला पुजारी हाच कन्हय्यालालाचा पूर्वज हें तर आतां निःसंशय सिद्ध झालें होतें. कन्हय्यालालानें सांगितलेल्या हकीगतीवरून तो आपल्या मनकामनेश्वराचे मंदिराजवळ बांधून दिलेल्या जागींच लहानपणापर्यंत रहात होता; आणि ज्या अर्थी त्याच्या घराण्याला तेथेंच घर बांधून दिलें होतें त्या अर्थी मंदिर आणि जवळपास असलेलें भूमिगत द्रव्य या दोहोंवर नजर असावी या उद्देशानें राजपुत्र भीमसिंगानें तशी योजना केलेली असावी हें उघडच होतें त्याप्रमाणें कन्हयालालाच्या बापापर्यंत त्यांची त्या ठिकाणीं वस्तीहि होती; पुढें ते भैरवगडास जाऊन कां राहिले त्याचें कारण ही सयुक्तिक आहे, पण द्रव्य कोठें असावें याच्या संबंधानें कन्हय्यालालास कांहीं ठाऊक आहे कीं नाहीं हें समजत नाहीं, तेव्हां त्यासंबंधानें तो काय सांगतो तें ऐकावें असें वाटून मी त्याला विचारलें कीं, “ मला आतां तुम्हीं सर्व हकीगत सांगितलीत, तशीच्यातशीच त्या दुसऱ्या गृहस्थाला सांगितली कीं कांहीं कमीजास्त सांगितली ?”

‘ हो, अशीच्या अशीच जवळ जवळ सांगितली. तो मला आणखी पुष्कळ गोष्टी विचारीत होता. पण मला त्यांचें संबंधानें ठाऊक नसल्यामुळें कांहीं बरोबर सांगतां आलें नाहीं. माझा बाप नेहमीं ह्मणत असे कीं आमच्या पूर्वजांनीं पुष्कळ द्रव्य पुरून ठेविलें आहे व नशीबी असल्यास केव्हांना केव्हां तें सांपडेल. पण अद्यापपर्यंत तर तें कोठेंहि सांपडलें नाहीं व पुढें कधीं सांपडेल असा संभवहि नाहीं. परंतु तो परवाचा गृहस्थ व आपण दोघेहि आलांत, व मला

एकंदर तीच ती माहिती विचारलीत ह्मणून पुन्हां वाटतें कीं त्या सगळ्या खऱ्या गोष्टी आहेत कीं गप्पा ?

" हो, कुणाला ठाऊक काय खरें व काय खोटें तें. पुष्कळ ठिकाणीं आपण अशा दंतकथा ऐकतों पण किती ठिकाणीं त्या खऱ्या झाल्या आहेत ? "

" आहे खरें असें. या उज्जयिनींतल्या उज्जयिनींत मी आपल्याला अशी १०–२० घरें दाखवून देईन कीं ज्या ठिकाणीं द्रव्य आहे, असा लोकांचा समज आहे. पण अजूनपर्यंत तर तसें कुणाला सांपडलेलें नाहीं. माझा बापहि द्रव्य आहे या आशेवर शेवटपर्यंत विश्वास ठेवून होता, पण त्याच्या नशीबाचें पुजारीपण कांहीं शेवट-पर्यंत सुटलें नाहीं, "

" होय, पण तुमचे वडील त्या द्रव्यासंबंधानें एकंदर काय ह्मणत असत ? "

" त्याचें काय आतां सांगत बसायचें आहे ? त्यांचें वय पुष्कळ झालें होतें व एकदां भांग पिऊन घाटावर बसले ह्मणजे पुष्कळ जुन्या गोष्टी सांगत असत. भैरवगडाच्या बहुतेक सगळ्या ह्मताऱ्या कोताऱ्या माणसांना त्यांच्या गोष्टी आठवत असतील. ते ह्मणत असत कीं पुष्कळ वर्षांपूर्वीं, त्यावेळीं शिंदेसरकारचा अंमलहि उज्जयिनीवर नव्हता, त्यावेळीं आमच्या पूर्वजांनीं पुष्कळ द्रव्य संपादन केलें होतें व कोठल्या तरी सुरक्षित ठिकाणीं तें पुरून ठेवलेलें होतें. हो, त्या दिवसांत हल्लींच्या सारखे सावकार व पेढ्या चांगल्या नसतील. त्या द्रव्याची जागा अगदीं मरावयाच्या वेळीं बाप आपल्या मुलास सांगे व अशा रीतीनें घरांतील वडील मनुष्यालाच काय ती त्याजसंबंधी माहिती असे."

" मग तुह्मांलाहि कांहीं थोडीफार माहिती असेल ?"

" छे: हो, असती तर काय छान झालें असतें."

" किंवा तुमच्या पूर्वजांपैकीं अगर दुसऱ्या कोणी तरी तें काढून घेऊन त्याची विल्हेवाटहि लाविली असेल."

" छे: छे:, आमच्या बापदाद्यांनीं तें द्रव्य काढलें असतें तर आमच्या घरीं कांहीं तरी त्यांतलें अद्याप उरलें असतें. बहुत करून आतां तें नष्टच झालें असावें. तीन पिढ्या झाल्या ह्मणजे भूमिगत द्रव्य नाहींसें होतें असें ह्मणतात तसेंहि झालें असेल."

" बरें ते असो. तुम्ही लहान होतां तेव्हां मनकामनेश्वराच्या जवळच्या वाड्यांत कोण कोण रहात असत तें ध्यानांत आहे ?"

" हाच, अगदीं हाच प्रश्न परवांच्या त्या गृहस्थानें मला विचारलान्"

" मग तुम्हीं काय सांगितलेंत ?"

" मी काय सांगणार? माझ्या लहानपणापासून तर तेथें कोणी रहात असल्याचें मला ठाऊक नाहीं. वाडा अगदीं ओसाड पडला आहे. सिंहस्थाच्या मेळ्यांत व इतर अनेक प्रसंगीं, साधू, बैरागी वगैरे लोक मात्र तेथें उतरतात. आमचें घर अगदीं पडायला झालें होतें ह्मणून बाबा त्या वाड्यांत जाऊन राहणार होते, पण आईला त्या वाड्यांत भुतें आहेत ह्मणून कोणी सांगितलें ह्मणून बाबांनीं त्या घराचा नादच सोडला."

इतकें तो ह्मणतो आहे तोच त्याची बायको नदीवरून आपलीं वस्त्रें धुऊन व पाणी घेऊन आली. तिची हीं वस्त्रें मळकट होतीं, केंस बहुतेक पांढरे झाले होते व ती बरीच अशक्त दिसत होती. नदीवरून घाट चढून एक कळशीभर पाणी आणल्यामुळें ती अगदीं थकून गेली होती. तिनें ती घागर देवाजवळ नेऊन ठेवली, देवापुढें

मी ठेवलेलें द्रव्य उचललें व माझ्याकडे एकदां निरखून पाहून 'हुश्श्' करीत आमच्या पासून थोड्या अंतरावर ती बसली.

त्या नवख्या मनुष्याचा संबंध काय, त्याचें नांव काय हें आतां कळायचें तरी कसें असा मला मोठा विचार पडला. कन्हय्यालालानें जें वर्णन केलें त्या वरून तो ठाकुरसिंग असावा असें तर दिसत नव्हतें. ठाकुरसिंग मध्यम बांध्याचा, देखणा, दाढीवाला व सुमारें ३०–३२च्या घरांतला व हा पाहुणा तर उंचापुरा, कुरूप बिनदाढीचा व पन्नास वर्षांचा, तेव्हां हा उपटसुंभ कोण? तेव्हां कन्हय्यालालाच्या बायकोला तरी कांहीं माहिती असली तर पहावी असा विचार करून, तिला ऐकूं येईल अशा आवाजानें मी कन्हय्यालालाकडे तोंड करून ह्मटलें, कन्हय्यालालजी, मग त्या पाहुण्याच्या नांवागांवचा पत्ता आतां कसा मिळेल?"

तेव्हां कन्हय्यालालानें आपल्या बायकोला विचारलें कीं, "काय गे, परवां आपल्या घरीं जो पाहुणा आला होता त्याचें नांव तुला ठाऊक आहे?' त्याची बायको म्हणजे तांबडी मिरचीच होती. ती एकदम उसळून ह्मणाली, "तो परवां आलेला पाहुणा? त्याचें नांव हिरालाल. द्वाड मेला, रात्रभर त्याची बडबड बडबड चालली होती. किती प्रश्न विचारीत होता उगीच! याचें नांव काय, त्याचें नांव काय? त्याला काय करावयाचें होतें? आणि तुमचा तर त्या दिवशीं अगदीं वेडेपणा झाला. मला नाहीं आवडलें तें बिलकुल."

माझ्या सारख्या त्रयस्थाच्या देखत त्या शांताबाईनीं आपल्या पतिराजांवर झाडलेला ताशेरा मोठा पहाण्यासारखा होता. पण कन्हयालालास तें बरें वाटलें नाहीं. परक्याच्या देखत आणि तेंही विनाकारण आपल्या बायकोनें आपणास दोष द्यावा हें त्यास बिलकुल आवडलें नाहीं

आणि तिची फजिती करण्याच्या उद्देशानें तो विचारतो, ' हं, काय झालें त्या दिवशीं ? काय गे वेडेपणा केला मी !"

"'छे: छे:, वेडेपणा कसला, मोठा शहाणपणाच तो ! कशाला त्या दिवशीं त्याला तो कागद विकला ? ह्मणे तो वाचतां येत नाहीं. नाहीं तर नाहीं. कधीं उज्जयिनींत नेऊन कोणास दाखविला होता ? मी पुष्कळ वेळां तुह्मांला सांगत होतें, कीं तो कागद कुणाला देऊं नका बरें. तो मोठ्या महत्त्वाचा आहे ह्मणूनच आज पुष्कळ वर्षं मामांजींनीं मोठ्या प्रयत्नानें जपून ठेविला आहे.........."

हें तिचें वाक्य संपण्याचे अगोदरच मी एकदम दचकून तिला विचारलें कीं, "कसला कागद विकला यांनीं ? काय होतें त्यांत लिहिलेलें ?"

"चांगला एक जाड कागद असून त्यावर कांहीं शिक्का बिक्का उठविलेला होता, कांहीं लिहिलेलें होतें. आज कांहीं नाहीं तरी शेदोनशें वर्षं आमच्या घरीं तो कागद होता."

"हो; हो; दिला; देऊन टाकला; त्याचें काय आतां लोणचें घालावयाचें होतें ? पुष्कळ जुना झाला होता, घड्या करून तुकडे झाले होते; पुष्कळ लोकांना येथें मी तो दाखविला, पण कोणाला तो लागला नाहीं. शेवटच्या सह्या मात्र ज्याला त्याला वाचतां येत असत. पण बाकी कांहीं समजत नव्हतें."

"आणि ह्मणून तो तुम्ही विकून टाकला ? अरे, अरे !"

"अहो, करावयाचें काय होतें त्याला बाळगून ? तो वेडा त्या कागदाबद्दल एक रुपया द्यायला कबूल झाला. मग काय तो सवदा वाईट का झाला ? आतां आपणच सांगा, वेडा कोण, मी कीं ही ?"

## प्रकरण अकरावें.

# हातांवर तुरी !

**तमास पसरी निशा मग जगांत जातां रवी;**
**दिसे सकल शून्यसें, तम नव्हया तमा मात्र वी ! ।**
**विषण्ण हृदयीं तशी भयकरा निराशा जडे;**
**तमोमय रसा गिळी मन मनीं बिचारें रडे ॥**

—गोविंदाग्रज.

मला असा संताप आला कीं कांहीं पुसूं नये. दंडधारी जर माझ्या जागीं असता तर त्यानें त्या भटुरड्याला एक लाख शिव्या दिल्या असत्या ! बाकी संताप आला काय किंवा वाईट वाटलें काय, त्या हिरालालानें माझ्या हातांवर तुरी दिल्या येवढें मात्र अगदीं स्पष्ट होतें. त्यानें तो कागद लांबविला तो उगीच नव्हे; भीमसिंगानें तें द्रव्य कोठें पुरलेलें होतें त्याचा ठावठिकाण त्यांत लिहिला होता असें मला वाटलेंच होतें. आपण जसे हा शोध करावयाला उद्युक्त झालो आहोत, तसाच हा हिरालालहि कोणी गृहस्थ असून कन्हय्यालाल व त्याचे पूर्वज यांचे संबंधानें त्याला पुष्कळ माहिती होती हें तर आतां उघडच होतें, व त्यानें जलदी करून माझ्या आधीं या म्हाताऱ्याजवळून तो कागद उपटला, तेव्हां तो धूर्त होता यांत तर कांहींच शंका नव्हती.

ती तिखट म्हातारी अगोदरच रागावलेली व त्यांत कन्हय्यालालानें तिला आतां 'वेडी' असेंहि म्हटलें; मग काय ? 'आधींच तारें आन् त्यांत शिरलें वारें.' ती मजकडे पाहून म्हणते, "भय्यासाहेब, कशा उलटया बोंबा आहेत पहा ? कोण वेडें हें आतां आपणच सांगा. अहो, तो माणूस कोण, काय, कशाला आला हें ठाऊक सुद्धां नाहीं आम्हांला. तो आपला गप्पा सांगतो आहे कीं आमची व त्याची पुष्कळ

ओळख आहे ह्मणून आणि हे आपले त्याला ती सनद देऊन टाकताहेत ! सनद ह्मणजे का कागदाचा तुकडा कीं भांगेचा गोळा कीं जो भेटला त्याला देऊन टाकला ! अलीकडे भांग पिऊन पिऊन तर अगदींच ताळ सोडला आहे यानीं. कोण मेलें भांग पिणें तें ! जेव्हां पाहावें तेव्हां धुत्. ”

मीहि वाहत्या गंगेंत हात धुवून घेतले. मी ह्मणालों, ‘आजीबाई, यानीं ही अगदीं घोडचूक केली. त्यानीं तो कागद कुणाला तरी दाखवायचा, कुणाकडून तरी वाचवून घ्यायचा. अहो, मिरे किती सडले तरी जोंधळ्याला कांहीं हार जायचे नाहींत. उज्जयिनींतली सगळी जरी विद्या लोपली तथापि एखादा तरी मनुष्य तुमचा कागद वाचून देता.’

“ अहो मी तो एकदां पाटणकर साहेबांना* दाखविला होता. ते येथें एकदां सिद्धवटाला आले होते. त्यानीं पुष्कळ प्रयत्न केला व ते ह्मणाले कीं, त्या कागदांतला मजकूर कांहीं सांकेतिक भाषेंत लिहिलेला आहे व तिची मोडणी समजल्याखेरीज पुढें कांहीं करितां यावयाचें नाहीं.

“ असो, आतां काय त्याचें ? होता केवढा मोठा तो कागद ? ”

“ होता एक हातभर लांब आणि चार बोटें रुंद. जन्मपत्रिका जशी दिसते तशा तऱ्हेचा होता. आमचे सासरे जेव्हां वारले तेव्हां त्यानीं आमच्या वडील दिरांना बोलावून त्यांना तो जपून ठेवायला सांगितलें. ”

मीं म्हणालों, “मोठा घोंटाळा केला यानीं. तो कागद जर कुणाला वाचतां आला असता तर त्यामुळें तुम्हाला पुष्कळ द्रव्यप्राप्ती होण्याचा संभव होता. ”

---

* माधव कॉलेज, उज्जयिनी मधील मागचे एक प्रोफेसर परशराम नारायण पाटणकर. आतां कैलासवासी.



कै. परशुराम नारायण पाटणकर, एम्. ए. विद्यारत्न.

१८६०-१९२९

प्रोफेसर, माधव कॉलेज, उज्जयिनी



कै. डॉ. गोपाळ विष्णू ओक
( डॉक्टर गोपाळदादा )

'अहो, तर मग मी म्हणते आहे काय मघांपासून ? यांच्या घरीं असें द्रव्य आहे अशी कुणकुण पुष्कळ वर्षांपासून चालत आली आहे. बापही माझा वेडा. द्रव्य पुढें मागें सांपडेल व मुलीला सुख होईल या बुद्धीनें त्यानें मला यांच्या घरीं लोटली. द्रव्य तर बाजूलाच राहिलें, पण नुसतें सुख देखील यानीं मला कधीं दिलें नाहीं. गेल्या वर्षी आजारी पडले तेव्हांच मरून गेले असते म्हणजे सुटले असतें' असें म्हणतां म्हणतां म्हातारीच्या डोळ्यांना पाणी आलें! तेव्हां आतां त्या बाईला थोडें तरी समाधान व्हावें अशा बुद्धीनें मी कन्हय्यालालाला म्हटलें, 'कन्हय्यालालजी, आतां तो रुपया तरी बाईच्या जवळ देऊन ठेवा, म्हणजे पुढें मागें तुमच्याच उपयोगाला तो पडेल.'

कन्हय्यालाल म्हणाला, "आतां तो कुठें मजजवळ आहे? तो कालच मी खर्च करून टाकला."

तें ऐकून त्याची बायको रागानें अगदीं लाल झाली. "मेल्यानों, घरांत आटा नाहीं, डाळ नाहीं म्हणून मी कानींकपाळीं ओरडत असतें. अंगावर स्वच्छ कपडा नाहीं, गांठीला पैसा नाहीं, आणि तुम्हीं आपले चार गांवगुंड जमविता आणि भांग पितां, मिठाई खाता आणि हलवायाचें कर्ज करून ठेवतां. आतां मी करूं तरी काय?"

परंतु आतां तेथें बसण्यांत मौज नाहीं असें पाहून व आजीबाईचें तें बोलणें संपण्याचा अगोदरच, मी उठलों, पायांत जोडा घातला आणि त्यांचा उभाउभीं निरोप घेऊन मंदिरांतून बाहेर पाय काढला, व संध्याकाळ झाली होती ह्मणून घरीं जाण्यास निघालों. त्यावेळची माझी चित्तवृत्ति, व जेव्हां मी दुपारीं घरांतून बाहेर पडलों तेव्हांची स्थिती या फारच भिन्न होत्या. कन्हय्यालाल कोण हें समजलें; भीमसिंगाची आतांपर्यंत जी माहिती होती ती निवळ ऐकीव होती. ती

अगदीं खरी असून कन्हय्यालाल हा मनकामनेश्वराचा वंशपरंपरागत पूजारी आहे व त्याजपाशीं दोन दिवसांच्या अगोदरपर्यंत भीमसिंगानें दिलेला तो महत्वाचा कागदही होता हेंहि कळलें. पुरून ठेविलेल्या द्रव्याची गोष्ट आतां अगदीं खरी, अशी खात्री झाली. व त्यामुळें मनाला एक प्रकारचें समाधान झालें; तथापि हिरालालाच्या हातीं तो महत्त्वाचा कागद गेल्यामुळें पुन्हां मोठाच घोटाळा उत्पन्न झाला असून आतां पुढें काय ? हा प्रश्न मजपुढें उभा राहिला. तेव्हां पुढें कोणत्याही रीतीनें पाऊल टाकण्यास साधन काय याचा विचार पडला.

दुसरे दिवशीं सायंकाळीं मी नारायणजी ज्योतिषी यांना जाऊन भेटलों. नेहमींप्रमाणें विद्यार्थ्यांना शिकविण्यांत ते चूर झाले होते. तथापि मला पाहतांच मोठ्या आनंदानें माझें स्वागत करून त्यांनीं मुलांना सुट्टी दिली. मुलें सर्व निघून गेल्यानंतर, ते ह्मणाले कीं, " डॉक्टर साहेब, आपण फार दिवसांनीं भेटलांत ! मी उद्यां सकाळीं आपल्याला निरोप पाठविणारच होतों कीं एकदां येऊन जा ह्मणून. कांहीं उद्योगाला सुरवात केलीत काय ? "

मग मी गुरुजींनां दसऱ्यापासून आरंभ केलेल्या उद्योगाची हकीकत सांगून ह्मटलें कीं 'इतकी खटपट करून सुद्धां शेवटीं ॐ फस् झालें. माझ्या अगोदर दोनच दिवस येऊन हिरालाल नांवाच्या कोणी गृहस्थानें तो कागद कन्हय्यालालापासून उपटला.'

गुरूजी ह्मणाले, ' ठीक, ठीक. पुष्कळच उद्योग तुम्हीं केलांत. मीहि कांहीं अगदींच स्वस्थ बसलों नाहीं, तुम्ही मजजवळ ठेवून गेलेले सर्व कागदपत्र मी लक्षपूर्वक चाळले व तिसरी गुंडाळीहि पाहिली व त्यामुळें एका महत्त्वाच्या गोष्टीवर प्रकाश पडला.'

मी—अरे वा:, काय लिहिलें आहे त्यांत? द्रव्य कोठें ठेवलेलें आहे हें त्यांत लिहिलें आहे का?

'छेः छेः, तसें नव्हे,' गुरूजी आपल्या दाढीवरून हात फिरवीत फिरवीत, डोळ्यांवरचा चष्मा कपाळावर ठेवून मजकडे पाहून ह्मणाले, 'त्या कागदांत मिताक्षरी भाषेसारखी एक वर्णमाला दिलेली असून तिच्या वरून आपल्याला सनदेंतील सांकेतिक भाषा वाचतां येईल. या दप्तरांतलें एक पुस्तक 'पृथ्वीराज रासा' असें असावेंसें मला वाटत होतें, पण तसें तें नव्हतें. आरंभींचे दोन अध्याय मात्र त्या ग्रंथाचे आहेत. तिसऱ्या अध्यायापासून दुसऱ्या कोठल्या तरी पोथीचीं पानें आहेत. चवथ्या अध्यायांतले श्लोक फार महत्त्वाचे आहेत, ते आतां तुह्मांला वाचून दाखवून त्यांचा अर्थहि सांगतों,' असें ह्मणून गुरुजींनीं ते श्लोक ह्मटले. ते मेवाडी भाषेंतले जुन्या पद्धतीचें असल्यामुळें मला नीटसे समजले नाहींत, ह्मणून गुरुजींनीं मला त्यांचा भावार्थ सांगितला, त्याचा सारांश पुढें लिहिल्याप्रमाणें आहे.—

"मेवाडचे महाराणे सुप्रसिद्ध जगत्‌सिंगजी यांचा नातू, राणे राजसिंग यांचा पुत्र, कुमार भीमसिंग यानें माळवा देशांत, अवन्तिका क्षेत्रांत, उज्जयिनी नगरांत, मिती आषाढ शुद्ध पौर्णिमा, गुरूवार, विक्रम संवत् १७३७ रोजीं वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री पंडित नीलकंठ शास्त्री चितोडवाले यांस मनकामनेश्वराचे वंशपरंपरागत उपाध्याय मुक्रर केले आहेत; त्यांस घरदार जमीन जुमला वगैरे दिल्याबद्दल सनद करून दिली असून, त्यांचेजवळ गुप्तपणें जतन करून ठेवण्यासाठीं एक महत्त्वाचा कागद दिला आहे. त्या कागदांत मनकामनेश्वराच्या कृपेनें प्राप्त झालेलें द्रव्य कोठें ठेविलें आहे त्याचा उल्लेख असून तें किती आहे त्याचाहि तपशील दिला आहे. वे. शा. सं. नीलकंठशास्त्री चितोडवाले

यांनीं श्रीमनकामनेश्वरावरचें बिल्वपत्र उचलून अशी शपथ वाहिली आहे कीं कुमार भीमसिंगानें त्यांस दिलेली स्थावर व जंगम मिळकत त्यांस पूर्ण संतोषदायक व भरपूर आहे व त्यांज जवळ दिलेल्या कागदाचा ते कधींहि उपयोग न करितां मरते समयीं ते तो आपल्या वडील मुलाच्या स्वाधीन करतील व तसेंच प्रत्येकानें करण्यासाठीं आपल्या मुलांस सांगून ठेवितील. पुढच्या पिढ्यांमध्यें त्या द्रव्याची जरूरी लागल्यास काय व्यवस्था करावी तें ठरविलेलें असून त्याचा तपशीलही इतरत्र दिला आहे. त्या कागदांतील सर्व मजकूर सांकेतिक लिपीमध्यें लिहिलेला असून तो एकाएकीं कोणास वाचतां येणार नाहीं; तथापि त्याचा उलगडा होण्यासाठीं पुढें लिहिल्याप्रमाणें माहितीचा उपयोग करावा व तदनंतर तो कागद वाचल्यानंतर जें द्रव्य बाहेर काढलें जाईल त्यापैकीं एक हिस्सा वे. शा. सं. नीलकंठ शास्त्री चितोडवाले यांच्या वंशजानीं घेऊन बाकीचे दोन हिस्से कुमार विजयसिंगजी यांचे वंशजांस देण्यासंबंधीं केलेली व्यवस्था दुसऱ्या कागदोपत्रीं नमूद केली आहे. ”

हा मजकूर सांगून गुरूजी मला म्हणाले कीं, ‘ पहा , हीं अक्षरें पहा. यांतील प्रत्येक अक्षराबद्दल सांकेतिक अक्षर कोणतें तें यांत लिहिलें आहे. आतां कन्हयालालांच्या जवळचा कागद जर हातीं लागला असता तर तासा दोनतासांत आपल्याला तो वाचतां आला असता व पुढील सर्व मार्ग दिसूं लागला असता. पण आतां काय त्याचा उपयोग ? त्या कागदाचा पत्ता लागल्या शिवाय सर्व व्यर्थ आहे. ’

मी म्हटलें. “ होय तें तर खरेंच, पण त्या मनुष्याचा पत्ता तरी कसा लागणार ? आणि ही गंमत पहा त्यांतली कीं त्या मनुष्याला ही द्रव्याची बातमी लागते कशी व तो अचुक त्या कन्हय्यालालाकडे जाऊन तो कागद

मिळवितो कसा आणि तो सुद्धां अगदीं परवाच्या दिवशींच !" गुरूजीहि ही मोठ्या सचिंत मुद्रेनें मला ह्मणाले कीं, ' काय बोवा आपली अक्कल काम करीत नाहीं येथें. कन्हय्यालालानें तो कागद विकल्यामुळें तर एकंदर गोष्ट फारच घोटाळ्याची होऊन गेली आहे. परंतु एक खुबी आहे. ही सांकेतिक लिपीची मोडणी येथें आपल्या हातीं असल्यामुळें हिरालालला जरी तो कागद हातीं लागला तरी त्याचा उपयोग करितां येणार नाहीं. इतकें तरी समाधान सध्यां काय थोडें आहे !

मी-- होय, तें खरें. पण हा हिरालाल कोण, कोठें राहतो त्याचा पुरता शोध केला तरच तो कागद मिळण्याची कांहीं तरी आशा, नाहीं तर मग ' उत्पद्यन्ते विलीयन्ते दरिद्राणां मनोरथाः ' अशा सारखें होऊन इतकी सर्व खटपट अगदीं व्यर्थ गेल्यासारखीच झाली.

' पहा बोवा खटपट करून, कांहीं पत्ता लागला तर ' गुरूजी थोड्या जड आवाजानें मजकडे पाहून म्हणाले, " कसेंही करून आतां तो कागद हस्तगत केलाच पाहिजे, यांत तर कांहीं शंका नाहीं. पण.... एक ' पण ' आहेना मध्यें ! "

हें आमचें बोलणें झालें त्याच दिवशीं रात्रीं बेळगांवहून गोविंदराव दादांची तार आल्यावरून मी तिकडे निघून गेलों. माझ्या वहिनी सौ. राधाबाई या बऱ्याच महिन्यांपासून आजारी होत्या त्या मी बेळगांव येथें गेल्या नंतर सुमारें एक महिन्यानें वारल्या. माझ्या गैरहजीरींत उज्जयिनीचा दवाखाना माझे बंधू डॉ. गोपाळदादा हे चालवीत असत.

## प्रकरण बारावें.

# याचा अर्थ काय ?

**गडात् च सासवडं चैव सास्वडात् च गडं पुनः ।**
**गडसास्वडयोर्मध्ये द्राविडो लुडबुडाख्यहम् ॥**

रात्रीं ९ वाजण्याची वेळ होती. मी नुकताच बाहेरून जाऊन आलों होतों. आदल्यादिवशीं सायंकाळीं मी बेळगांवाहून परत आलों होतों. तेव्हां महिन्या दोन महिन्यांत उज्जयिनींतल्या मित्रमंडळींच्या गाठीं पडल्या नव्हत्या त्यामुळें गप्पा गोष्टी संपतां संपतां क्षिप्रानदीवरून नुसती संध्या करून येतां येतांच नवाचा सुमार झाला होता. डॉ. गोपाळ दादा मी आलो असें पाहून परगांवीं गेले होते. मुलें जेऊन खाऊन निजलीं होतीं. जानेवारी महिन्याचे अर्थात थंडीचे दिवस व त्यांतून कृष्णपक्ष, त्यामुळें स्वयंपाकाच्या आजीबाई मी जेवायला केव्हां येतो याची वाट पहात बसल्या होत्या. आईचें देवापुढचें नित्य कृत्य आटोपलें असून तिलाहि झोंप येऊं लागली होती. तेव्हां मी हातपाय धुवून पानांवर बसणार, इतक्यांत रस्त्यावरून 'डॉक्टरसाहेब, डॉक्टरसाहेब' असें कोणी हांका मारीत असलेलें मला ऐकूं आलें. तेव्हां कोण कशासाठीं आलें आहें तें पहावें व मग जेवायला बसावें असा विचार करून मी आजीबाईंना पान वाढायला सांगितलें व इकडे दार उघडावयाला गेलों. दार उघडल्यावर अंधेरांत उभा असलेला एक टांगा मला दिसला, व त्यांतला टांगेवाला मला ओळखून ह्मणाला कीं, 'डॉक्टरसाहेब, 'कोणी एक बाई आली आहे व ती आपल्याला घरीं घेऊन जाणार आहे.' मग मी परवानगी दिल्यावरून ती बाई घरांत आली. आंत येतांच तिनें मला नमस्कार केला आणि म्हणाली कीं,

डॉक्टरसाहेब, आपणांस तसदी दिल्याची माफी असावी. माझ्या भावाला १५ दिवसांपूर्वी दुखण्यांतून मरतां मरतां आपण वाचविलेंत असें मी ऐकिलें, ह्मणून पुन्हां मी बोलवावयास आलें आहे. त्याची प्रकृती पुन्हां बिघडली आहे, ताप फार आला आहे, आणि आपल्याला बोलवावें ह्मणून सांगतो आहे. तेंव्हां आत्तांच्या आत्तां त्याची कृपा करून नाडी पहावी आणि त्याला जीवदान द्यावें.' ती बाई चांगल्या पोक्त वयाची होती, तिची मला दया येऊन मी उत्तर केलें, 'बाई, तुम्हीं समजतां ते डाक्टर मी नव्हे. ते माझे बंधु आहेत, ते सध्यां गांवाला गेले आहेत, ४-५ दिवसांनीं येतील, तथापि तुह्मांला औषधाची कांहीं काळजी नको. मी तें देऊं का?'

पण तिच्या तोंडातून लवकर उत्तर निघेना. एखाद्या डॉक्टरावर रोग्याचा विश्वास बसलेला असला तर दुसऱ्या डॉक्टराची त्याच्याजवळ डाळ शिजणें कठिणच. विश्वास तो विश्वास!

"पण त्या दुसऱ्या डॉक्टर साहेबांनीं त्याला बरा केला आहे, तेंव्हां त्यांना त्याची प्रकृती व नाडी नीट कळली आहे, तेंव्हां आपण येऊन कसें होईल?"

आतां त्या बाईची समजूत कशी घालावी याचा मला मोठा विचार पडला. तथापि आतां तिला कांहीं औषध पाहिजे असल्यास तें द्यावें अशा हेतूनें मी तिला विचारलें, 'सकाळपासून त्यांनीं कांहीं औषध घेतलें आहे काय?"

"होय. आज तीन दिवस त्या इसामसीच्या * दवाखान्यांतला इलाज चालू आहे, पण कांहीं फरक अजून दिसत नाहीं. आतां ताप व बडबड फार आहे ह्मणून मी टांगा घेऊन आलें."

---

* मिशन हॉस्पिटल.

मी ह्मटलें, 'बाई, तुह्मांला वाटलें तर औषध घेऊन जा, वाटलें तर मी तुमच्याबरोबर येतों, तुह्मांला जसें बरें वाटेल तसें करा. तुम्हीं अगदीं गरीब दिसत आहांत म्हणून मी स्पष्टच सांगतों कीं माझी फी किंवा औषधाची किंमत हीं दोन्हीं मला नकोत, समजलांत.'

तथापि ती औषधहि घेईना आणि मला 'चला' असेंहि ह्मणेना! मी मोठ्या बुचकळ्यांत पडलों. गोपाळदादानीं तिच्या भावाची प्रकृती दुरुस्त केलेली व त्यांच्यावर त्या रोग्याचा विश्वास, ह्मणून आपल्या बहिणीला मुद्दाम रात्रींच्या वेळीं, गाडी घेऊन पाठविलेली; बाईच्या पोषाखावरून व टांगा व शामकर्ण यांच्या थाटावरून ती गरीब असावी असें स्पष्ट दिसत असलेलें; मी, त्या बाईला व तिच्या भावाला अगदीं नवखा; आणि ती भ्रमिष्टा सारखी आपली माझ्या तोंडाकडे पाहात उभी राहिलेली; आणि आजीबाईला वाढायला सांगून हा इतके वेळ बाहेर करतो आहे काय ह्मणून वाट पाहून थकल्यामुळें थोड्याशा रागानें व पुष्कळशा त्रासानें मला हांका मारीत आलेली आई व तिच्या मागोमाग डावा हात डोळ्यांवर धरून व उजव्या हातांत असलेला कंदील उंच करून पहाणाऱ्या स्वयंपाकाच्या आजीबाई–असा तो देखावा मोठा बघण्याजोगा होता. मी आपला तेथें नुसताच उभा आहे, औषध वगैरे कांहीं देत नाही असें पाहून आई मला म्हणाली, 'चल बाबा, तुला जर कोठें बाहेर जावयाचें असलें तर फराळ कर आन् चालायला लाग, आजीबाईला उगीच कशाला तिष्ठत बशिवतोस?"

तें ऐकून ती बाहेरून आलेली बाई मला म्हणाली' "बरें तर एकदा आपण पाहून घ्या डॉक्टरसाहेब. आम्हीं गरीब आहोंत, टांगा कांहीं केल्या मिळेना; आतां दहा वाजावयाची वेळ आली आहे आणि

हा टांगेवाला एक सारखी किर किर करतो आहे, तेव्हां आपण चलं-लांत तर फार उपकार होतील रामलालावर ”

आतां बाहेर जावें तर आई व आजीबाई तिष्ठत बसलेल्या, बरें न जावें तर ती गरीब बाई आपल्या आसन्नमरण भावाला काळोख्यारात्रीं एकटा टाकून, एका भांडखोर टांगेवाल्याला घेऊन गोपाळदादा अगदीं खास येतील अशा आशेनें आलेली. तथापि मी जायचें ठरविलें व मी आल्यावर जेवीन, आजीबाईना आपल्या घरीं जाऊंदे असें आईला सांगितलें, आणि जी कांहीं जरूरीचीं औषधें पाहिजे होती तीं बॅगमध्यें घालून त्या बाईनें आणलेल्या टांग्यांत जाऊन बसलों.

म्युनसिपालिटीनें पसंत केलेला तो टांगा, त्याचें काय वर्णन करावयाचें आहे? ‘तो श्यामकर्ण मग चालतसे पुढारा’ व त्याच्या मागून टांगा चालला होता येवढी गोष्ट अगदीं खरी होती. पण अंधेर असल्यामुळें घोडा टांग्याला ओढतो आहे की टांगा घोड्याला ढकलतो आहे हें मला नीट दिसेना. तथापि तो टांगेवाला तोंडानें ‘चक् चक्-चक् चक्’ करून घोड्याला चाबूक मारी त्यावरून घोडाच चालत असावा असें मी अनुमान केलें! टांगेवालेदादा मधून मधून विडी पिऊन त्याचा धूर सोडीत व विडी पिऊं नको म्हटलें तर ऐकलें न ऐकलेंसें करीत. टांगा चालत असतांना चाकें टांग्याला घांसून ‘कर्-कर्’ असा आवाज होई. रस्त्यावर पडलेल्या दगडांवरून जातांनाही ख् खर् असा शब्द होई तेव्हां घंटा लावण्याची टांग्याला जरूरीच नव्हती. एकीकडे कंदील अडकविण्याचें कांहीं साधनच नव्हतें व दुसरीकडचा कंदील होता पण त्याला एक कांच कमी असल्यानें, वाऱ्यानें दिवा विझतो ह्मणून दिवा लावलेला नव्हता! तथापि आमचें कांहीं अडत नव्हतें. कारण विडीचा झुरका ओढल्याबरोबर जो प्रकाश

पडे त्याच्यामुळें टांगेवाल्याचें सर्व काम भागत असे. लगाम रस्त्यांत तुटल्यामुळें, घोड्याला, टांग्याला व वाईट रस्त्याला टांगेवाला तर पुष्पांजली वाहातच होता, पण रस्त्यांत कशालाशी ठोंकर लागल्यामुळें घोडा अडखळला व नीट चालेनासा झाला त्या बद्दल त्या घोड्यालाहि यथेच्छ चोप मिळाला. गाडींतल्या फाटक्या व अपुऱ्या गाद्या आह्माला धड आंत बसूं देईनात व धड त्या स्वत: ही एकीकडे होईनात. म्युनसिपालिटीचे कंदील रस्त्यांत लागले होते पण ते आपल्या जागींच आहेत व जळत आहेत हें पहाण्यास त्यांच्या अगदीं जवळ आमचा टांगा गेला म्हणजे आम्हाला समजत असे. कोठें जायचें आहे असें बाईला विचारतां तिनें जेव्हां नीलगंगेचें नांव घेतलें तेव्हां तर मी चकितच झालों. कारण ज्या वायुवेगानें आमचा रथ चालला होता त्याचा विचार करतां तेथें जाण्यास दोन तास तरी पुरतात कीं नाहीं कोणजाणे, असें मला वाटलें.ती बाई कांहीं फारशी बोलकी दिसली नाहीं. मग ती जात्याच मुखदुर्बळ असो किंवा थंडीमुळें किंवा रात्र पडत चालल्यामुळें ती गाडींत झोंप घेत असो. पण लांबचा प्रवास, तांगेवाला आपल्या सारथ्यकर्मांत व उरलेल्या वेळांत विडी ओढण्यांत चूर झालेला व शिवाय आमचें व त्याचें गोत्र जमेल असेंहि मला दिसेना, तेव्हां मीच त्या बाईबरोबर इकडल्या तिकडल्या गोष्टी बोलाव्यात ह्मणजे वेळ तरी जाईल अशा विचारानें बोलूं लागलों. प्रवासांत मुखदुर्बळ माणसें काय कामाची? असलीं ‘ दुर्मुख नाम संवत्सरे ’ माणसें असलीं ह्मणजे प्रवास केव्हांही कंटाळवाणा भासतो. मी त्या बाईला विचारलें, ‘ झोंप येत आहे वाटतें तुम्हांला ? ’

“ होय, दोन तीन दिवस अगदीं जागरण झालें मला रामलालाच्या जवळ बसून,” तिनें उत्तर दिलें.

" कां ? घरीं आणखी कोणी नाहीं वाटतें ?"

**ती**—कोणी नाहीं; त्यालाहि कोणी नाहीं आणि मलाहि कोणी नाहीं. त्यांतून तो आहे थोडासा त्रासिक. थोडेंसें मनाविरुद्ध झालें कीं गेली तब्येत, त्यामुळें त्याच्या जवळच बसून रहावें लागतें. भावाची शुश्रूषा करण्यांत त्या बहिणीची तत्परता पाहून मला समाधान वाटलें. तिनें आपणांस नातलग कोणी नाहींत असें मला सांगितलें त्या अर्थीं तिचा नवराहि वारला असावा असें मी समजलों. रांगड्या लोकांत सौभाग्यवती बायका रोज कुंकू किंवा टिकली लावतातच असा नियम नसतो. कुंकू हें सौभाग्याचें विशेष चिन्ह आहे असें न मानतां तें सौंदर्यवर्धनाचें किंवा शोभेचें एक चिन्ह आहे असें समजतात. आणि मीहि विनाकारण उगीच खोल पाण्यांत कशाला शिरूं ?

आमच्या घरापासून नीलगंगा नांवाचें ठिकाण सुमारें दोन मैल तरी लांब होतें. कहारवाडी, पानदरीबा, चोवीसखंबा, तोफखाना वगैरे रस्त्यांतून जातांजातांच आह्मांला बराच वेळ लागला व शेवटीं आमचा टांगा, इंदूर दरवाज्याच्या रस्त्याला लागला. आतां नीलगंगा जवळ येत चालली, तेव्हां त्या बाईला मी सहज विचारलें कीं, बाई, घरां-तून तुम्हीं आमच्या घराकडे यावयाला केव्हांशी निघालांत ?

"तुमच्या घराकडे कोठें मी येणार होतें ?" ती बाई मला ह्मणाली, " डॉक्टरसाहेब सोराबजी इंजिनियर साहेबांच्या घरीं रोज संध्याकाळीं जातात असा मला शोध लागला ह्मणून मी दिवस मावळायच्या सुमारास त्यांच्या घरीं गेले; त्यांच्या घरी आज आले नाहींत, घरींच असतील असें कळल्यामुळें त्यांचें घर हुडकीत हुडकीत आपल्या घरीं आलें. रामलालाच्या मनांत त्या डाक्टर साहेबांचें औषध घ्यावयाचें आहे, आणि आतां मी आपल्याला घेऊन गेले ह्मणजे तो कदाचित् आप-

णाला हातहि दाखविणार नाहीं, व मला रागें भरेल तें वेगळेंच. आतां काय होईल तें होवो."

त्यावेळीं मला माझीच फार लाज वाटली. रोग्याला किंवा त्याच्या नातलगाला दुसऱ्या एका डॉक्टरची जरूरी आहे व तसे ती बाई स्पष्टपणें बोलून दाखवीत आहे आणि जणूं काय त्यांच्या पेक्षां मलाच जास्ती गरज अशा तऱ्हेनें लोचटपणा करून, आणि तेंहि अंधारांत, अपरात्रीं, पोटांत कावळे ओरडत असतांना मी त्या बाईबरोबर चाललों होतों, तो त्या बाईचे ते शब्द ऐकून अगदीं ओशाळा झालो व आतांच्या आतां उतरून चालायला लागावें आपल्या घरीं, झक मारतो तो रोगी व ती बाई, असाहि विचार माझ्या मनांत आला. पण इतक्यांत गोपाळ-दादांचेंहि स्मरण झालें. त्यांच्यावर विश्वास असलेल्या, प्रकृति फार बिघ-डली आहे ज्याची, अशा रोग्याला, आपण त्याच्या घराजवळ जवळ जाऊन न पाहतां जर परत फिरलों, तर तेंहि बरें नव्हें; बरें, आपण त्याला अगदीं फुकट मदत करीत आहोंत, कांहीं घेणं नास्ति, देणं नास्ति मग उगीच 'लोभ करावा हे विनंती' ह्मणण्यास हरकत कोणती ? नाहीं तरी या पुढें त्या रोग्याशीं व त्याच्या बहिणीशीं आपला संबंध थोडाच यायचा आहे ? असा पोक्त विचार मी केला आणि इतक्यांत आमचा टांगाहि थांबला. त्या ठिकाणी रेलवेचें फाटक आहे, तें त्या वेळीं, रात्रीं त्या रस्त्याला वरदळ बिलकुल नसते व आगगाड्या येतात, जातात, ह्मणून, बंद करून ठेवतात. आमच्या टांगेवाल्यानें फाटकावरील भय्याला दार उघडण्याविषयीं पुष्कळ हाका मारल्यावर घरांतून त्या भय्यानें 'रातको नहीं खोलते' असा सूका खरखरीत जबाब दिला. रात्र अंधारी आणि आम्हां कोणाजवळ दिवा ना बत्ती. गाडी पुढें जात नाहीं असें समजतांच मजबरोबर आलेली बाई टांग्याखालीं उतरली व मला

म्हणाली कीं, ' आपण येथेंच थांबा, मी घरीं जाते, भावाला सांगते आपल्याला आणलें आहे म्हणून आणि त्यानें सांगितलें तर कंदील घेऊन येते. ' असें म्हणून माझ्या उत्तराची वाट देखील न पहातां ती रेलवेच्या तारेच्या कुंपणांतून जी घुसली ती अंधेरांत दिसेनाशीहि झाली !

मी म्हटलें—भले शाबास. काय युक्तीनें मोट बांधली हिनें माझी ? ना ओळख ना देख आणि मी आपला खुळ्यासारखा त्या अंधेरांत व थंडींत कुडकुडत व टांगेवाल्याच्या शिव्या खात तासान् तास त्या टांग्याच्या पाशीं उभा. बसून बसून सुद्धां कंटाळा आला. तास दीड तास तर त्या टांगेवाल्यानें दम काढला पण जेव्हां ती बाईहि दिसेना व मीहि कांहीं बोलेना तेव्हां मग त्यानें आपल्या शेलक्या शिव्या उच्चारून त्या बाईचा उद्धार केला आणि मला म्हणाला कीं, ' महाराज, आपल्या करितां माझी फार खोटी झाली आहे. आणि त्या लबाड बाईनें आपल्याला व मला असें दोघांनाहि फसविलें आहे, तेव्हां मी तर आतां परत जाणारच. आपण जर दोन रुपये भाडें देत असाल तर आपल्या घरापावेतों मी आपल्याला पोंचवितों व देत नसाल तर गाडीतलें आपलें सामान काढून घ्यावें म्हणजे मी जातों. सकाळीं आज कुणाचें तोंड पाहिलें होतें कोण जाणें ?

टांगेवाल्याशीं हुज्जत घालणें व्यर्थच होतें. अपरात्र झाली होती. मी घड्याळ काढून पाहिलें तों साडेबारा वाजले होते. आतां हातांत औषधांची बॅग घेऊन दोन मैल रात्रीं तिरपटत घरीं चालत जाण्यापेक्षां दोन रुपये दंड पडला असें समजावें व एकदाचें घर गांठावें असा विचार करून मीं टांगेवाल्याला दोन रुपये देण्यास कबूल झालों व झाल्या गोष्टीचा विचार करीत, खजिल होऊन घराकडे येण्यास परतलों. ही बाई कोण व हिचा मला अशा प्रकारें फसविण्यांत हेतु काय हें माझें

लक्ष्यांत येईना. गाडीवाल्याला विचारतां त्यालाहि ही बाई कोण तें ठाऊक नव्हतें. गाडी ठरवायला आली त्या वेळीं तिच्या बरोबर दुसरी एक बाई होती तिनें हिला मैनाबाई असें ह्मटलें होतें येवढें मात्र त्याच्या ध्यानांत होतें. बरें बाई कोणी लफंगी होती असें ह्मणावें तर तिच्या वर्तनावरून ती अंधेरांत नाहींशी होईपर्यंत ती फार कष्टी, विनयशील व गरीब दिसली. मग तिच्या त्या चमत्कारिक वर्तनाचा मेळ कसा घालावा त्याचा मला मोठा विचारच पडला. बरें, मी तिच्या बरोबर इतक्या सरळ व मोकळेपणानें वागलों कीं तसा मी इतर प्रसंगीं वागलों असतों कीं नाहीं कोण जाणे ?

असो. या प्रमाणें फुकट भूर्दंड भरून, आह्मीं एकदाचे घरीं परत आलों व तसेंच उपाशीं पडलों, व नंतर आईला आमच्या प्रवासाचा सर्व वृत्तांत सांगितला.

डॉक्टरीच्या धंद्यांत पुष्कळ निरनिराळ्या तऱ्हेच्या माणसांबरोबर व्यवहार करण्याचा प्रसंग येतो. कांहीं दिसण्यांत प्रतिष्ठित तर व्यवहारांत लफंगे, कांहीं वागण्यांत सडेतोड पण मनानें निर्मळ; कांहीं नेहमीचे गुळमुळीत; कांहीं एरवी मिठ्ठ पण तत्वमसीचा प्रश्न आला कीं कान उंच करणारे; कांहीं केवळ फुकटे. असे नानाप्रकारचे लोक पहाण्यांत येतात पण त्या बाईचा प्रकार इतर सर्वांहून अगदींच भिन्न दिसला आणि या गोष्टीला सुमारें एक आठवडा झाल्यानंतर जेव्हां गोपाळदादा गांवाहून परत आले व त्यांना ही हकिकत मी कळविली तेव्हां तर त्यांना या सर्व गोष्टीचें मोठें आश्चर्य वाटून ते ह्मणाले कीं "मला कोणी रामलाल या नांवाचा मनुष्य ठाऊक नाहीं, मी त्याला कधीं औषध दिलें नाहीं व त्याच्या घरींहि कधीं गेलों नाहीं," तेव्हां तर त्या एकंदर "भ्रांतिकृत चमत्कारा" चें मला एक मोठें आश्चर्यच वाटलें.

**"विस्तीर्णा पृथिवी, जनोऽपि विविधाः किं किं न संभाव्यते ?"**

# प्रकरण तेरावें.

## शिंक्याचें तुटलें !

जाईल रात्र, मग होईल ती सकाळ ।
होऊन रव्युदय पंकजही फुलेल ;
ही आस भृंग धरि त्यांतचि कोंडलेला ।
हा ! हा ! तशांत उपडी गज पद्मिनीला !

हरि नारायण आपटे

" साष्टांग नमस्कार, विनंती विशेष. आपण अलीकडे क्लबमध्यें किंवा इतर कोठेंहि दिसला नाहींत, तरी, सवड करून एकदां मला येऊन भेटावें, म्हणजे आपला मुका रोगी कसा काय आहे हें पहावयास सांपडेल. त्याची प्रकृति पूर्वींपेक्षां आतां पुष्कळ बरी आहे. रोज सकाळ सायंकाळ तो माझ्या दृष्टीस पडतो. पहिल्या पहिल्यानें तो जरा लाजत असे पण अलीकडे ८–१५ दिवसांत तो पुष्कळ माणसाळला असून, दऊत लेखणी दिसली म्हणजे कागदावर कांहीं तरी खरडीत असतो. गेल्या गुरुवारीं इंदुराहून येथें कर्नल सर जेम्स राबर्टस् आले होते त्यांनीं त्या मुक्याला तपासून तो लवकरच बोलणार असे भविष्य वर्तविलें आहे. " इत्यादि मजकुराचें डॉक्टर नाबर यांचें पत्र आल्यावरून मी एके दिवशीं दवाखान्यांत जाऊन त्यांना भेटलों. मला पाहतांच डॉक्टर म्हणाले, ' या तात्या, या. तुमची मी वाटच पहात होतों. आज रात्रीं मी लष्कराला जाणार आहे, तेव्हां म्हटलें तुम्हीं भेटतां कां नाहीं. तो तुमचा मुका दिवसानुदिवस सुधारत चालला आहे बोवा, आणि ट्रीटमेंट म्हटली म्हणचे जवळ जवळ कांहीं सुद्धां नाहीं. '

मग मी त्यांच्या बरोबर मुक्याला जेथें ठेवलें होतें तेथें गेलो. त्याला वॉर्डमध्यें एक स्वतंत्र खोली दिली असून त्याच्या करमणुकीसाठीं त्याच्या उशाशीं कांहीं कागद, दऊत व लेखणी वगैरे जिन्नस एका टेबलावर ठेवलेले होते. आम्हीं गेलों त्या वेळीं त्याला झोंप लागली होती, ह्मणून त्याची झोंपमोड इतक्यांतच न व्हावी ह्मणून आम्हीं त्यानें काय काय खरडलें आहे तें पाहूं लागलों. परंतु लहान मुलें पाटीवर किंवा कागदावर कांहीं वांकड्या तिकडया रेघोट्या ओढतात तशा रेघोट्या खेरीज किंवा वांकड्या तिकडया अक्षरां खेरीज मला कांहीं पहिल्यानें दिसलें नाहीं. त्या मुक्याच्या पायगतीं एक मांजर बसलें होतें तें त्याच्या फार संवयीचें असावें असें दिसलें. कारण कोणीं विन ओळखीचा मनुष्य दिसतांच इतर मांजरें पळून जातांत त्या प्रमाणें त्यानें न करितां आपल्या धन्याचा कांहीं जिन्नस घेऊन जाणारे हे कोणी तरी आहेत असें वाटून त्यानें त्याच्या डोक्याजवळ टुण् दिशीं उडी मारली व म्यांव म्यांव करून ओरडूं लागलें, व त्याच्या डोक्याला चाटूं लागलें. थोड्याच वेळानें तो मुका जागा झाला व तें मांजर असें कां करितें ह्मणून त्याजकडे पाहूं लागला. तो जांगा झाला असें पाहतांच तें मांजर आह्मांकडे पाहून गुरगुरूं लागलें तेव्हां त्या मुक्याला त्याचें कारण कळून आलें. आह्मांला पहातांच तो मुका डोळे चोळीत चोळीत उठला, तेव्हां आपल्या श्रमाचें सार्थक झालें असें वाटून कीं काय, आपल्याला मोठा आनंद झाला आहे हें दाखविण्यासाठीं 'गुर्, गुर्' असा आवाज काढून मुक्याच्या शरीराला त्यानें आपलें अंग मोठ्या लडिवाळपणें घासलें !

तो मुका वयानें पोक्त असून दिसण्यांत मोठा सभ्य व गंभीर होता. त्याला मी खुणेनें त्याच्या प्रकृतीसंबंधानें विचारलें, तेव्हां त्यानें हातानें प्रकृति चांगली असल्याची खूण केली, व नंतर तुला कांहीं लिहितां येतें

का ' अशा अर्थाची जेव्हां खूण केली तेव्हां त्यानें आपल्या अंथरुणा-खालून कांहीं कागदांचे तुकडे काढून मजपुढें टाकले, ते पाहतां त्या मनुष्यास लिहितां येत असावें असें स्पष्ट दिसलें. मेंदूमध्यें कांहीं विकृति झाल्यास वाचाशक्ती प्रमाणें लेखनशक्ती ही कांहीं काल पर्यंत किंवा कायमची नाहींशी झाल्याची उदाहरणें मला ठाऊक होती तेव्हां त्याची लेखनशक्ति अगदींच गेली नाहीं, थोडी बहुत तरी शिल्लक आहे असें दृष्टीस पडतांच मला बरें वाटलें. अक्षरें फार ढोबळ, वांकडी तिकडी अशी असून तीं कांहीं ओळखण्यासारखीं तर कांहीं अगदीं बेढब दिसलीं. त्यावरून त्याचे ज्ञानतंतु अद्याप बरोबर काम देत नव्हते हें स्पष्ट कळत होतें. तथापि कांहीं कांहीं ठिकाणीं अक्षरें वाचण्याचा प्रयत्न केल्यावर एखादा दुसरा शब्दहि वाचतां येई. ' च. ता. ड, उ. ज. न, ठ.... क...स, भ....र....सि....ग, वगैरे अक्षरें एकापुढें एक बरेच वेळां दिसल्यामुळें अनुमानानें, ' चितोड, ' उज्जेन, ' ' ठाकुरसिंग, ' भैरवसिंग, किंवा भैरूसिंग ' वगैरे शब्द लिहिण्याचा त्याचा उद्देश असावा असें आह्मीं समजलों. एके ठिकाणीं ' भ. र. सि. ग. च. र. ' दुसऱ्या एके ठिकाणीं, भ....र....सिं....ग....चे....र, तर तिसऱ्या ठिकाणीं भे....रू....सिं....ग....चो....र....अशीं अक्षरें आह्मांस लिहिलेलीं दिसलीं, तेव्हां भैरूसिंग नांवाचा कोणी चोर असावा व त्याच्या बद्दल या मुक्याच्या मनांत कांहीं तरी लिहावयाचें असावें असें आम्हीं अनुमानिलें, पण भैरूसिंग हें नांव आह्मीं कधीं ऐकिलें नसल्यामुळें आम्हीं त्याच्या लिहिण्याकडे अगदीं दुर्लक्ष केलें. असो. तर या प्रमाणें त्याची लेखनपद्धती कांहीं थोडया बहुत प्रमाणानें कां होईना कायम असल्यामुळें मला तो बरा होईल अशी उमेद वाटली व नंतर त्याचा व डॉक्टर नाबर साहेबांचा निरोप घेऊन मी आपल्या कामाला निघून गेलों.

मग मी त्यांच्या बरोबर मुक्याला जेथें ठेवलें होतें तेथें गेलो. त्याला वॉर्डमध्यें एक स्वतंत्र खोली दिली असून त्याच्या करमणुकीसाठीं त्याच्या उशाशीं कांहीं कागद, दऊत व लेखणी वगैरे जिन्नस एका टेबलावर ठेवलेले होते. आम्हीं गेलों त्या वेळीं त्याला झोंप लागली होती, ह्मणून त्याची झोंपमोड इतक्यांतच न व्हावी ह्मणून आम्हीं त्यानें काय काय खरडलें आहे तें पाहूं लागलों. परंतु लहान मुलें पाटीवर किंवा कागदावर कांहीं वांकड्या तिकडया रेघोट्या ओढतात तशा रेघोट्या खेरीज किंवा वांकड्या तिकडया अक्षरां खेरीज मला कांहीं पहिल्यानें दिसलें नाहीं. त्या मुक्याच्या पायगतीं एक मांजर बसलें होतें तें त्याच्या फार संवयीचें असावें असें दिसलें. कारण कोणीं विन ओळखीचा मनुष्य दिसतांच इतर मांजरें पळून जातांत त्या प्रमाणें त्यानें न करितां आपल्या धन्याचा कांहीं जिन्नस घेऊन जाणारे हे कोणी तरी आहेत असें वाटून त्यानें त्याच्या डोक्याजवळ टुण् दिशीं उडी मारली व म्यांव म्यांव करून ओरडूं लागलें, व त्याच्या डोक्याला चाटूं लागलें. थोड्याच वेळानें तो मुका जागा झाला व तें मांजर असें कां करितें ह्मणून त्याजकडे पाहूं लागला. तो जागा झाला असें पाहतांच तें मांजर आह्मांकडे पाहून गुरगुरूं लागलें तेव्हां त्या मुक्याला त्याचें कारण कळून आलें. आह्मांला पहातांच तो मुका डोळे चोळीत चोळीत उठला, तेव्हां आपल्या श्रमाचें सार्थक झालें असें वाटून कीं काय, आपल्याला मोठा आनंद झाला आहे हें दाखविण्यासाठीं 'गुर्, गुर्' असा आवाज काढून मुक्याच्या शरीराला त्यानें आपलें अंग मोठ्या लडिवाळपणें घासलें !

तो मुका वयानें पोक्त असून दिसण्यांत मोठा सभ्य व गंभीर होता. त्याला मी खुणेनें त्याच्या प्रकृतीसंबंधानें विचारलें, तेव्हां त्यानें हातानें प्रकृति चांगली असल्याची खूण केली, व नंतर तुला कांहीं लिहितां येतें

का ' अशा अर्थाची जेव्हां खूण केली तेव्हां त्यानें आपल्या आंथरुणां-खालून कांहीं कागदांचे तुकडे काढून मजपुढें टाकले, ते पाहतां त्या मनुष्यास लिहितां येत असावें असें स्पष्ट दिसलें. मेंदूमध्यें कांहीं विकृति झाल्यास वाचाशक्ती प्रमाणें लेखनशक्ती ही कांहीं काल पर्यंत किंवा कायमची नाहींशी झाल्याची उदाहरणें मला ठाऊक होती तेव्हां त्याची लेखन-शक्ति अगदींच गेली नाहीं, थोडी बहुत तरी शिल्लक आहे असें दृष्टीस पडतांच मला बरें वाटलें. अक्षरें फार ढोबळ, वांकडी तिकडी अशी असून तीं कांहीं ओळखण्यासारखीं तर कांहीं अगदीं बेढब दिसलीं. त्यावरून त्याचे ज्ञानतंतु अद्याप बरोबर काम देत नव्हते हें स्पष्ट कळत होतें. तथापि कांहीं कांहीं ठिकाणीं अक्षरें वाचण्याचा प्रयत्न केल्यावर एखादा दुसरा शब्दहि वाचतां येई. ' च. ता. ड, उ. ज. न, ठ.... क...स, भ....र....सि....ग, वगैरे अक्षरें एकापुढें एक बरेच वेळां दिसल्यामुळें अनुमानानें, ' चितोड, ' उज्जेन, ' ' ठाकुरसिंग, ' भैरव-सिंग, किंवा भैरूसिंग ' वगैरे शब्द लिहिण्याचा त्याचा उद्देश असावा असें आह्मीं समजलों. एके ठिकाणीं ' भ. र. सि. ग. च. र. ' दुसऱ्या एके ठिकाणीं, भ....र....सिं....ग....चे....र, तर तिसऱ्या ठिकाणीं भे....रू....सिं....ग....चो....र....अशीं अक्षरें आह्मांस लिहिलेलीं दिसलीं, तेव्हां भैरूसिंग नांवाचा कोणी चोर असावा व त्याच्या बद्दल या मुक्याच्या मनांत कांहीं तरी लिहावयाचें असावें असें आम्हीं अनु-मानिलें, पण भैरूसिंग हें नांव आह्मीं कधीं ऐकिलें नसल्यामुळें आम्हीं त्याच्या लिहिण्याकडे अगदीं दुर्लक्ष केलें. असो. तर या प्रमाणें त्याची लेखनपद्धती कांहीं थोडया बहुत प्रमाणानें कां होईना कायम असल्यामुळें मला तो बरा होईल अशी उमेद वाटली व नंतर त्याचा व डॉक्टर नाबर साहेबांचा निरोप घेऊन मी आपल्या कामाला निघून गेलों.


कन्हय्यालालनें हिरालालला दिलेला कागद मला सांपडावा ह्मणून मी पुष्कळ प्रयत्न केला पण, ‘ दर्यामें खसखस ’ हुडकण्याचा तो प्रकार असल्यानें माझे श्रम मात्र व्यर्थ गेले.

एके दिवशीं सकाळीं मी स्नानसंध्या आटोपून दवाखान्यांत जाण्याच्या गडबडींत असतांना, नारायणजी ज्योतिषांचे चिरंजीव सूर्यनारायण गडबडीनें मजकडे आले, व वडिलांनीं दवाखान्यांत जाण्याचे अगोदर घराकडे येऊन जा असें सांगितलें आहे असें सांगून चालते झाले. तेव्हां प्रकृती बरी नसल्यामुळें औषध देण्यासाठीं वगैरे बोलाविलें असेल असें समजून मी दवाखान्याला उशीर होईल म्हणून पोटोबाला नैवेद्यहि न दाखवितां गुरुजींच्या आश्रमांत गेलों. पहातों तों गुरुजी आजारी बिजारी कांहीं नसून नेहमीं प्रमाणें ‘ तंदुरुस्त ’ होते, पण चिंताक्रांत दिसत असून, मियान् महंमद शफी, पोलीस इन्स्पेक्टर आला होता त्याजबरोबर कांहीं बोलत होते असें दिसलें.

खानबहादुर मियान् महंमद शफी यांचें तोंड सकाळीं उठून दृष्टीस पडतांच आतां हा दिवस कसा जातो अशी मला चिंता पडली ! पोलिसच्या कामांत त्यांच्या इतका प्रसिद्ध मनुष्य त्यावेळीं सबंध उज्जयिनींत तर काय पण माळव्यांत देखील नसेल ! तें वक्रतुंड, महाकाय दृष्टीस पडतांच गांवातल्या सर्व सावांची अगदीं त्रेधा उडे. गावांत कोठें चोरी झाली व खानबहादुर चौकशीला आले कीं, ज्याच्या घरीं चोरी झाली तो गृहस्थ निमुटपणें ‘ चोरी कांहीं फारशी झाली नाहीं ’ असें ह्मणून या खानबहादुरांची व पर्यायानें पोलिसांची व न्यायकोर्टाची ब्याद टाळीत असे. नाहींपेक्षां सगळा चौकशीचा फार्स होऊन चोरीचा पत्ता लागला नाहीं असें शेवटीं ठरेपर्यंत कायिक, वाचिक, मानसिक व द्रव्यैक दृष्टीनें तो बिचारा अगदीं रडकुंडीस येई व ‘ नको



पंडित सूर्यनारायण व्यास.



पंडित नारायणजी व्यास

ती चौकशी ' असें ह्मणे. काबूलचा अमीर ग्वाल्हेर शहरीं आला असतांना, त्याच्या संरक्षणासाठीं असलेल्या पोलिस कामगारांत शफीसाहेब होते, त्यावेळेच्या कामगिरीवर खुष होऊन सरकारनें त्यांना ' खानबहादुर ' ही पदवी खैरात केली होती !

एवंगुणविशिष्ट खानबहादुरांची व माझी दृष्टादृष्ट होतांच, शफी साहेब उठून उभे राहिले व हास्यवदनानें माझ्याशीं शेकहँड करून ह्मणाले " आईये डॉक्टरसाब, आदाब्अरज्, या पंडितजींच्या घरांत रात्री कांहीं चोरी झाली; पाहिलेंका भिंतीला हें खात दिलेलें आहे तें?" गुरुजीहि चोरांना थोडया बहुत शिव्या देत देत ह्मणाले, 'आंत मंदिरांत चला ह्मणजे पहा सगळें सामान कसें अस्ताव्यस्त फेंकून दिलें आहे तें.'

आम्हीं आंत जाऊन पहातों तों गुरुजींचीं सर्व दप्तरें व त्यांतील कागदपत्र, पुस्तकें, पोथ्या, यंत्रें, चित्रें, देवाचीं उपकरणीं वगैरे सर्व वस्तु अस्ताव्यस्त रीतीनें पडलेल्या आढळल्या. पाऊल ठेवावयाला सुद्धां जागा नव्हती. तेव्हां चोरीला तरी काय गेलें असें मी विचारतां गुरुजी ह्मणाले कीं ' डॉक्टर साहेब, तुह्मांला कदाचित् आश्चर्य वाटेल, पण ऐका. आपण जे दप्तर येथें ठेवून गेला होता त्यांतल्या दोन गुंडाळ्या मात्र चोरीला गेल्या, बाकी कांहीं गेलें नाहीं !

"आणि बाकीचे कागदपत्र, ती सांकेतिक अक्षरांची माहिती असलेले कागद वगैरे ? " मी मोठ्या घाबरेपणानें, त्रासानें व दुःखानें त्यांस प्रश्न केला.

गुरुजी—'बाकीचे कागदपत्र येथें नव्हते ह्मणून राहिले, मी माझ्या बरोबर ते घरीं घेऊन गेलों होतों, त्यामुळें त्यांना ते सांपडले नाहींत!"

' विलक्षण आहे बोवा, चोरी अशा प्रकारची ! ' असें खानबहादुर आपल्या दाढीला कुरवाळीत हंसत हंसत ह्मणाले खरे, पण मला मात्र अगदीं कसेंसेंच होऊन गेलें.

## प्रकरण चौदावें.

## घोक्याचें पिकलें !

आहे जें अपुलेंच तें विधिबलें व्हावें परासारखें।
लोकीं याहुन दुःख थोर दुसरें सांगा असें कोणतें ? ॥

—रेंदाळकर.

मला तर वाईट वाटलेंच, पण नारायण गुरुजी अगदीं त्रिरमल्यासारखे दिसले. चोरट्यांनीं येवढा सर्व खटाटोप केला व नेलें काय ? तर, दोन कागदांचे तुकडे ! पण ते किती महत्त्वाचे होते हें गुरुजींना ठाऊक असल्यामुळें माझ्यावर धर्म करीत असतां त्यांचें कर्म ओढवलें व त्यामुळें माझी किती निराशा झाली हें त्यांच्या लक्ष्यांत आल्यामुळें त्यांनांहि बरें वाटेना. पण करायचें काय ? माझ्या प्रमाणेंच मनकामनेश्वराच्या द्रव्याचा शोध करणारे कोणीतरी एक अगर अनेक लोक असून त्यांचाहि कसून प्रयत्न सुरू होता हें तर आतां सिद्ध झालेंच; पण हे आहेत तरी कोण ? हें कांहीं ध्यानांत येईना. ठाकुरसिंग ह्मणावा तर कन्हयालालानें ज्याचें वर्णन केलें तो हिरालाल व ठाकुरसिंग यांच्यांत कांहींच साम्य मला दिसेना व हिरालाल ह्मणावा तर तो कोण, कोठें राहतो व त्याला इतकी बित्त बातमी कशी लागली हें लक्ष्यांत येईना. एवंच काय, चक्रव्यूहांत सांपडलेल्या अभिमन्यूप्रमाणें आम्हीं अगदीं गोंधळून गेलों. बरें हें सगळें प्रकरण दुसऱ्या कोणाला सांगावें तर तो तरी आह्मांला काय साह्य करणार व त्यांतून मियान् महंमद शफी सारखे उल्लूके पट्ठे मिळाल्यावर तर काय विचारतां ? दुसरे ‘ शेरलॉक होल्म्स् ’ च ते ! नारायण गुरुजींना पहाऱ्यांत बसविण्यास देखील चुकायचे नाहींत असें मनांत येऊन मी डोळ्यांच्या खुणेनें त्याला कांहीं एक न सांगण्याबद्दल गुरुजींनां सुचविलें. गुरुजींना ही खानबहादुरांची

अकटश्च विकटो कीर्ति माहिती होती, त्यांनींहि त्याला वरच्यावर कांहीं तरी हकीगत सांगितली. खानबहादुरानीं आपल्या नोटबुकावर अलिफ् बे च्या भाषेंत पुष्कळसें भरकटून घेतलें, सर्व मंदिरभर फिरून, मोठी चौकशी केल्याचा फार्स केला, आणि खिशातल्या डबींतून ४।५ विडे काढून त्यांचा बकाणा भरून २।४ ठिकाणीं रस्त्यावरच थुंकून झाल्यावर, चोरांच्या आईबापांचा उद्धार करीत करीत निजधामाचा रस्ता धरला!

तो गेल्यावर गुरुजी मला ह्मणाले कीं, 'डॉक्टर साहेब, अशा प्रकारची चोरी होईल अशी मला कल्पना देखील नव्हती! आतां आपण असें करा, आपले जितके कागदपत्र आहेत तितके आपण आतांच घेऊन चला आणि आपल्याला योग्य वाटेल अशा ठिकाणीं सुरक्षित स्थळीं ठेवा. या चोरटयांचा आतां कांहीं भरंवसा नाहीं. पुन्हां सुद्धां माझ्या घरावर हल्ला करतील ते!

मी ह्मणालों—गुरुजी माझ्याकरितां आपलें असें नुकसान झाल्याबद्दल मला खरोखरच फार वाईट वाटत आहे, तथापि माझा तरी त्याला काय उपाय?

गुरुजी—कोण जे हे चोर आहेत त्यांना सगळी माहिती आहे असें दिसत असून सांकेतिक भाषेच्या त्या किल्ली शिवायच त्यांचें अडलेलें आहे. हिरालालच्या ताब्यांत जो कागद गेला आहे त्यांत आपल्याजवळ असलेल्या कागदांचा कांहीं उल्लेख ही असेल!

मी—हो. ठीक आहे, पण ते कागद आपल्या या मंदिरांतच आहेत हें त्या चोरांनां कसें कळलें?

गुरुजी—कसें कळलें ह्मणजे काय? तुमच्या प्रत्येक हालचालीवर त्यांचें लक्ष असलेंच पाहिजे. चोवीस तास तुमच्यावर त्यांचा खडा पाहरा असेल.

मी——मग मी आतां प्रसिद्ध पुरुषच झालों ह्मणावयाचा.

गुरुजी—प्रसिद्ध पुरुष होणें—थट्टा नाहीं आहे महाराज. असल्या उचापतीमुळें केव्हां तत्सत् ह्मणावयाची पाळी येईल हें कोणी सांगावें ?

मी——काय? जिवावर सुद्धां एखादे वेळीं बेतेल कीं काय ?

गुरुजी——होय, त्याचा काय नियम सांगावा ? तुह्मांला मात्र पूर्ण सावधगिरीनें या पुढें वागलें पाहिजे. तुमच्या सारखा दुसरा कोणी तरी एक, तुमच्याच दिशेनें जात आहे हें खास. कनक आणि कांता यांच्या संबंधांच्या झटापटींत अमूक एक गोष्ट व्हावयाची नाहीं असें कोण सांगूं शकेल ? आतांच पहाना माझें घर फोडायला त्यानीं कांहीं कमीं केलें कां ? आणि तसा कांहीं प्रसंग येता तर त्यांनीं डोक्यांत कुऱ्हाड घालायला कांहीं मागें पुढें पाहिलें असतें काय ?

इतकें बोलणें झाल्यानंतर गुरुजीनीं आपल्या घरांतून माझे सर्व कागदपत्र आणविले व माझ्या स्वाधीन करून ते ह्मणाले कीं 'डॉक्टर साहेब, कुमार भीमसिंग मोठ्या दूरदृष्टीचा होता यांत कांहीं संशय नाहीं. पहा. ही गुरुकिल्ली हातीं असल्याशिवाय निवळ कागदाचा त्या नीलकंठशास्त्री चितोडवाल्याला कांहीं उपयोग करून घेतां आला नसता. ह्मणून आतां तुम्हीं तरी हे कागदपत्र नीट जपून ठेवा, आणि केव्हां तरी एकदां भैरवगडास पुन्हां एकदां जाऊन, कन्हयालालला भेटून किंवा इतर कोणाला सांगून सवरून हिरालालनें जो कागद हस्तगत केला आहे तो मिळवितां आला तर मिळवा. कारण सध्यां आपली अवस्था अंधेरांत चांचपणाऱ्या माणसांसारखी आहे. त्या चोरट्यांची आपल्यावर पूर्ण नजर असून ते कोण व किती आहेत याबद्दल आपल्याला कांहीं सुद्धां ठाऊक नाहीं. निदान त्यांच्या बद्दलची जितकी माहिती आपल्याला मिळेल तितकी जरूर मिळविलीच पाहिजे. व

तिचा योग्य उपयोग करून घेतला पाहिजे. आतां जरी तुम्हीं कानांवर तुळशीपत्रें ठेवून बसलांत तरी त्याचा कांहीं उपयोग नाहीं. सापाच्या शेपटीवर पाय पडूं नये, पण तो पडला, आतां त्याला मारल्याशिवाय गत्यंतरच नाहीं, नाहींतर तो दंश करून तुमच्या प्राणांवर उलटल्या-खेरीज कधींहि रहावयाचा नाहीं, हें पक्कें लक्षांत असूं द्या. भीमसिं-गानें ठेवलेलें धन आतां सांपडो किंवा न सांपडो, हे चोर, तुमच्यावर डोळ्यांत तेल घालून, पहारा करीत आहेत, त्यांना तरी खड्या सारखे वेंचून काढले पाहिजेत; मग जें होईल तें होवो.' गुरुजींचें ह्मणणें खरोखरच विचार करण्यासारखें होतें. 'वृद्धस्य वचनं ग्राह्यं, आप-त्काले ह्युपस्थिते' अशी जी नीति आहे तिची सत्यता त्या वेळीं मला पटली. गुरुजींना मग मी विचारलें कीं 'गुरुजी, आतां कामाला सुर-वात कशी करावयाची तें आपण सांगा. भैरवगडाला मी जाऊन येतों, पण मनकामनेश्वराच्या मंदिराजवळ जें पडकें घर अद्याप दिसत आहे तें हस्तगत करितां आल्यास पाहूं का? कोणाच्या ताब्यांत तें हल्लीं आहे त्याचा शोध करून तें भाड्यानें मिळवितां आले तर मिळवावें आणि मग त्यांत खोदाखादी करून पहावें; असा विचार केला तर?

गुरुजी—हो. हो. त्याला काय हरकत आहे? तें ही चांगलेंच होईल. त्यामुळें त्या चोरट्यांना त्या जागेंतून तरी हुसकून लावतां येईल.

मी——तें खरें, पण ती जागा आतां अगदी ओसाड पडली आहे, शिवाय वस्ती पासून साधारण दूर आहे....मग?

गुरुजी——होय, आहे, पण पुढें काय? त्यामुळें पण कार्याला प्रारंभ करितां येणार आहे; उगीच भलत्याच ठिकाणीं, तुमचा ताबा असल्याशिवाय, तुह्मांला तेथें कोण खणूं देईल? तेव्हां आतां 'शुभस्य शीघ्रम्' ह्मणून जितकी लवकर ती जागा आपल्या ताब्यांत घेतां

येईल तितकी घ्या. भीमसिंगाचें द्रव्य सांपडेल किंवा नाहीं हा प्रश्न आतां महत्त्वाचा नाहीं. कारण सांपडलें तरी तें आपलें नव्हे व तें आपणांस नकोही. सांपडलें तर तें कन्हयालालाचें व विजयसिंगाच्या वंशाजाचें आहे, न सांपडलें तर त्यांत कांहीं आश्चर्यही नाहीं, कारण आतांपर्यंतच्या शेंकडो वर्षांच्या धामधुमींत तें कोणाच्या हातीं हीं लागलें असेल; तर आपला हा निष्कामकर्मयोग आहे. केवळ दैवयोगानें तुमच्या हातीं हें कार्य आलें आहे आणि हें आतां तुह्मांला सोडतां येणार नाहीं. कर्म तर सुटत नाहीं व त्याचें फल तुह्मांला नको आहे. दिसण्यांत हें मोठें चमत्कारिक दिसतें पण तें तसें नाहीं. कर्म ज्या अर्थीं चुकत नाहीं त्या अर्थीं तें केलेंच पाहिजे. पण स्वार्थ बुद्धि उरली नाहीं ह्मणूनच तें आतां निःस्वार्थ बुद्धीनें करा ह्मणजे झालें. आणि हाच उपदेश अर्जुनास

**तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर ।** + ( ३. १९. ).

अशा शब्दांनीं केला असून त्याच्या दृढीकरणार्थ, सर्वांत श्रेष्ठ व ज्ञानी जे भगवान् श्रीकृष्ण त्यांस कांहीं कर्तव्य राहिलें नसतांहि ते कर्मच करितात हा दृष्टांत

**न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ।**
**नानावाप्तमवाप्तव्यं वर्त एव च कर्मणि ॥** × ( ३. २२ ).

अशा शब्दांनीं भगवंतानीं सांगितला आहे. तर निराश होऊं नका. आपल्याला या कामांत यश मिळणार अशी माझी मनोदेवता मला

---

\+ तस्मात् ह्मणजे ज्ञानी पुरुष या प्रमाणें कसलीच अपेक्षा ठेवीत नसल्यामुळें तूंहि ( फलाचे ठायीं ) आसक्ति न ठेवतां ( आपलें ) कर्तव्यकर्म नेहमीं करीत जा. —गीता ३, १९.

× त्रैलोक्यांतहि पार्था ! मजला कर्तव्य हें न अणुमात्र ।
दुर्मिळ असें न कांहीं तरि करितों कर्म मी अहोरात्र ॥
कृ. ना. आठल्ये. —गीता. ३; २२.

सांगत आहे. आतां ज्या विषयाच्या विचारांत आज पुष्कळ दिवस आपण घालविले व ज्याच्या चिंतनानें मनाचें समाधान होऊन आनंद होत गेला, तो विषय, निदान त्या विषयाचे थोडे बहुत कागदपत्र आज हातानिराळे झाले—चोरांनीं नेले म्हणून वाईट वाटत असलें तरी त्याची फलसिद्धि प्राप्त झाल्यास परोपकाराचा महदानंद आपणांस प्राप्त होणारा असल्यामुळें **उत्तिष्ठत! जाग्रत! प्राप्यवरान् निबोधत!"** —उठा! जागे व्हा! आणि हे वर समजून घ्या! हा कठोपनिषदांतील* मंत्र तुह्मांस सांगतो. यांतच कर्माकर्माचें सर्व बीज आहे व परोपकारधर्माचेंस्वल्प आचरणहि मोठ्या संकटांतून सोडवितें, असें खुद्द भगवंताचेंच निश्चयपूर्वक आश्वासन आहे. यापेक्षां आणखी जास्त काय पाहिजे? "केल्यावीण कांहीं होत नाहीं" हा सृष्टीचा नियम लक्षांत आणून तुम्हीं मात्र निष्काम बुद्धीनें कर्ते व्हा ह्मणजे झालें"+

गुरुजींच्या भाषणानें मला मोठा उत्साह वाटला. गुरुजी नंतर मला ह्मणाले कीं, बोलून चालून एका धाडसाच्या कृत्यांत तुम्हीं आतां हात घालीत आहांत, हें लक्षांत ठेवून तुमचे हे अलीकडील कायदेकानू, पोलीस व न्यायकोर्टें यांची कांस कदापि धरूं नका. हल्लींची न्याय मिळविण्याची पद्धत पाहिली ह्मणजे 'चोराला सोडून संन्यासाला सूळ' असेंच वारंवार दृष्टीस पडतें. तुह्मांस शारीरिक, मानसिक वगैरे अनेक त्रास सहन करावे लागतील पण ते सर्व निमुटपणें सोसा व यथाशक्ति त्यांचा प्रतिकार स्वतःच करावयास शिका. **'अहिंसा परमो धर्मः'** हें तत्व आपल्या वैदिक धर्मांतच नव्हें, तर इतर सर्व धर्मांतहि मुख्य गणिलें आहे. पण आतां असें समजा कीं तुमचा जीव घेण्यास त्या

---

* कठ १, ३, १४.

+ गीतारहस्य.

चोरांपैकीं एखादा दुष्ट मनुष्य हातांत शस्त्र घेऊन सज्ज झाला व जवळ दुसरा कोणीहि त्राता नाहीं; तर असल्या 'आततायी' मनुष्याची तुम्हीं 'अहिंसा परमोधर्मः' म्हणून डोळे मिटून उपेक्षा करूं नका. कारण अशा वेळीं हत्येचें पाप हत्या करणारास लागत नसून, आततायी आपल्या अधर्मानेंच मारला जातो, असें शास्त्रकर्ते म्हणतात. आणि कदाचित् तुमचें हें कृत्य उघडकीस आलें तरी तुह्मांस त्याबद्दल शिक्षा होणार नाहीं. असा प्रसंग कधींहि न येवो पण जरी कदाचित् आला तरी देखील कोणत्याहि न्यायाधिशानें त्याबद्दलच्या शिक्षेचा विचार करतांना गुन्हेगाराच्या मानसिक स्थितीच्या उच्चनीचपणाबद्दल विचार केला पाहिजे. हा विचार केला असतां केव्हां केव्हां असें होतें कीं, कांहीं व्यक्ति एकच प्रकारच्या जरी गुन्ह्यांत सांपडल्या आहेत तरी त्यांना शिक्षा मात्र कमीअधिक निरनिराळ्या द्याव्या लागतात. वरवर पहाणारांस यांत पक्षपात केलासें दिसतें; पण वास्तविक पहातां तो पक्षपात होत नाहीं. एतद्विषयीं याच नगरींत घडलेली राजा विक्रमादित्याच्या कारकीर्दींतील एक आख्यायिका मला आठवली आहे, पण ती आतां सांगून मी तुह्माला उशीर करीत नाहीं. तुम्हीं आतां दवाखान्यांत जा. सायंकाळीं आपण भेटला म्हणजे ती गोष्ट मी तुह्मांला सांगेन. मात्र आजच्या आज या कागदपत्राची नीट व्यवस्था लावा. सध्यां तरी 'शिंक्याचें तुटलें आणि बोक्याचें पिकलें अशी गोष्ट झाली आहे. आपणाला बोक्याच्या तोंडांतले लाडू काढून घ्यावयाचे आहेत. तेव्हां आपणाला 'शठं प्रति शाठ्यम्' हेंच तत्व अंगिकारलें पाहिजे."

दवाखान्यांत जावयाला मला फारच उशीर झाला होता म्हणून विक्रमाची गोष्ट ऐकण्याचा मोह सोडून मी सायकलारोहण केलें व

दवाखान्यांत गेलों. पहातों तों तेथें लोकांची ही गर्दी! बिचारे मूळचंदजी व काशीराम दोघेहि कंपाउंडर, 'डॉक्टर साहेब अभी आते हैं' अशी त्यांची समजूत करतां करतां त्रासून गेले होते.

दवाखान्याचें काम संपल्यावर मी आपले कागदपत्र नीट व्यवस्थेनें एका खोक्यांत ठेवले व खिळे ठोकून, झांकण बसवून व त्यावर कापड शिवून त्यावर नांव घातलें व नंतर तो घेऊन मी स्वतः सराफ्यांत 'गणेशदास कृष्णाजी' या पेढीचे मालक श्रीमंत नानासाहेब किबे, इंदूरचे सरदार, यांजपाशीं नेऊन ठेविला. पण त्यांनीं त्याबद्दल कांहीं विचारपूस न केल्यामुळें मीहि त्यांस कांहीं सांगितलें नाहीं.

सायंकाळीं मी गुरुजींना भेटलों व सर्व हकीगत सांगितली. त्यांनीं आपलें समाधान व्यक्त केलें व मला सकाळीं आश्वासन दिल्याप्रमाणें विक्रमादित्याची गोष्ट सांगितली ती पुढें लिहिली आहे.

---

## प्रकरण पंधरावें

## विक्रमाचें न्यायचातुर्य

**सत्कृत्यांचीं पुष्पें, तोडीतची जावें,**
**सुवासा सोडावें, चोहींकडे ॥ १ ॥**
**आपण केलेल्या, परोपकारांचीं,**
**कृत्यें महत्त्वाचीं दयायुक्त ॥ २ ॥**
**हृदयस्थ भानु, मावळल्यावरी,**
**आठवोनी सारीं, मोठ्या प्रेमें ॥ ३ ॥**
**आपुलें वा नांव, लोकांनीं स्मरावें,**
**ऐसेंच वांचावें, जगामाजी ॥ ४ ॥**

महादेवशास्त्री कोल्हटकर.

गुरूजी म्हणाले—" या उज्जयिनी नगरींत एकदां विक्रमराजा दरबारांत बसला असतां त्याजपुढें इनसाफाकरितां एक चोरीचा खटला

आला. त्यांत चार असामी आरोपी होते. चौकशी करतांना त्या चौघांवर सदर्हू चोरीचा गुन्हा सारखाच लागू पडला; परंतु निकाल सांगतांना राजानें त्यांस ज्या शिक्षा दिल्या त्या अगदींच वेगवेगळ्या होत्या. त्या अशा. त्यांपैकीं एका आरोपीस राजानें जवळ बोलावून फक्त इतकेंच ह्मटले कीं, "तुजसारख्याकडून हें कृत्य घडलें हें फार लाजिरवाणें होय." तो गेल्यावर दुसऱ्या आरोपीस राजानें पुष्कळ प्रखर शब्दांनीं ताडन करून कचेरींतून घालवून दिलें. तिसऱ्यास फटक्यांची शिक्षा देऊन वाटेस लावलें. आणि चौथ्याची गाढवावर मिरवणूक काढून त्याची सर्व नगरींत विटंबना केली व त्याचे नाक कानहि कापले. विक्रमराजाची ही विचित्र न्यायपद्धति पाहून दरबारच्या मंडळीस फार विस्मय वाटला. धर्मन्यायशीलतेविषयीं राजाची प्रख्याति असल्यामुळें हा न्याय पक्षपाताचा आहे असें कोणालाहि म्हणतां येईना. तरी ते चकित मुद्रेनें एकमेकांकडे पाहूं लागले. इतक्यांत राजानें आपण होऊन झालेल्या न्यायाबद्दल त्यांच्या मनांतील भाव जाणण्याची इच्छा दर्शविली. तेव्हां त्यां पैकीं एकजण पुढें होऊन "एकाच गुन्ह्याबद्दल ही अशी कमी अधिक निरनिराळी शिक्षा कां?" अशी त्यानें नम्रपणानें आपली शंका निवेदन केली. यावर राजानें उत्तर न देतां फक्त इतकेंच सांगितलें कीं, "तुम्हीं या चौघांच्या मागें गुप्त हेर पाठवून त्यांची काय स्थिति झाली आहे त्याचा शोध आणवा, ह्मणजे मग मी तुमच्या शंकेचें समाधान करीन." दरबारांतल्या मंडळीनीं त्याप्रमाणें हेर पाठविले. तिसऱ्या दिवशीं सर्व हेर येऊन दरबारांत हजर झाल्यावर, राजानें आज्ञा केल्यावरून त्यांनीं चौघांच्या हकीगती सांगितल्या त्या येणें प्रमाणें: ते ह्मणाले, कीं, ज्याला 'तुजसारख्याकडून हें कृत्य घडलें हें फार लाजिरवाणें होय' असें ह्मणून महाराजांनीं फक्त लाजवू-

नच घालवून दिलें, त्या पहिल्या आरोपीनें येथून घरीं जातांच विष खाऊन आत्महत्या केली. ज्याला प्रखर शब्दांनीं ताडन केलें होतें तो दुसरा आरोपी देशत्याग करून चालता झाला. ज्याला येथें चौदावें रत्न मिळालें तो घराबाहेर तोंड काढीत नाहीं. आणि ज्याची गाढवावर धिंड निघाली, तो तर अगदीं निर्लज्ज असून मिरवणुकीच्या वेळींच वाटेंत भेटलेल्या आपल्या बायकोस जवळ बोलावून तिला सांगत होता कीं, " हें बघ, घरीं जा आणि लवकर ऊन पाणी ठेव; ह्मणजे या दुष्ट लोकांच्या हातून सुटलो ह्मणजे घरीं येऊन स्वच्छ आंघोळ करीन, व हे रक्ताचे ओघळ आणि हा सर्व रंगबिंग धुवून काढीन ! " हेरांच्या तोंडानें ही हकीगत ऐकतांच दरबारी मंडळींच्या शंकेचें समाधान झालें व एकाच गुन्ह्यांबद्दल चौघां आरोपींस वेगवेगळया शिक्षा कां द्याव्या लागल्या, याचें कारण त्यांच्या मानसिक योग्यतेचा विचार, असें त्यांना स्पष्ट करून सांगण्याचें राजास प्रयोजन राहिलें नाहीं." +

* * *

मनकामनेश्वराच्या मंदिरानजीकच्या भीमसिंग राजपुत्राच्या घरांत मीं गेलों तों माशा चावूं नयेत ह्मणून तोंडावर पांघरूण घेऊन कोणी एक बाई, बाहेरच ओसरीवर निजलेली मला दिसली. गरीबीच्यें संसाराला लागणाऱ्या बहुतेक सर्व आवश्यक वस्तु तिच्या आसपास पडल्या होत्या. एका खुंटीला भगव्या रंगाचे पुरुषाचे कपडे टांगले होते, त्यावरून तिच्या घरचा पुरुषमाणूस जवळपास कोठें तरी असावा असें मला वाटलें. त्या ठिकाणीं मी जेव्हां पूर्वीं आलो होतों त्या वेळीं तेथें दोन साधू-

+ " एकाच कलमाखालचा (मारामारीचा) आरोप अनेकांवर आला असला तरी त्या सर्वांना सारखी शिक्षा देणें योग्य नाहीं. ज्याची आगळीक किंवा गुन्ह्याची बुद्धी अधिक त्याला शिक्षाहि अधिक पाहिजे.--" बा. गं. टिळक.

लोक उतरले होते व घरांभोंवतीं राखेचे ढीग पडले होते, तसा प्रकार या वेळीं दिसत नव्हता. घर व त्याच्या आसपासची जी जागा वापरण्यांत आलेली दिसत होती ती पराकाष्ठेची निर्मळ व स्वच्छ असून घराच्या पुढें थोडीं फार फुलझाडें लाविलेलीं होतीं. त्यामुळें ती जागा मोठी रमणीय दिसे. मी साधू, बैरागी, फकीर वगैरे लोक रहातात अशा जागा उज्जयिनीस पुष्कळ पाहिल्या होत्या पण त्यांत एकीससुद्धां या जागेची सर नव्हती. मग कांहीं वेळ त्या शांत जागेची शोभा पाहून मी त्या घरासमोरच्याच एका आंब्याच्या झाडाखालीं ती बाई केव्हां उठेल याची वाट पहात बसलों.

कांहीं वेळानें त्या बाईनें आपल्या तोंडावरचें पांघरूण उचललें, डोळे चोळून दोन्हीं हात जोडून मग ‘ करदर्शनम् ’ केलें व मग ती उठून उभी राहिली, तो मी तिच्या दृष्टीस पडलों.

ती बाई पोक्त वयाची व मोठी शांत दिसत असून तिजकडे पाहून आदर वाटावा असा एकंदर तिचा पेहेराव होता. भगव्या रंगाचीच वस्त्रें ती नेसली असून गळ्यांत बारीक मण्यांच्या तुळशीच्या माळा होत्या. ती उठून उभी राहिल्यावर मीं उठून तिजकडे गेलों व नमस्कार करून तिला म्हणालों, ‘ माई, नमस्कार. ’

त्या बाईला माझी लीनता पाहून गोड वाटलें व ती मला म्हणाली, “ बेटा, तूं ब्राह्मण दिसतोस. तूं कोण ? आलास कोठून ? तुझें येथें काय काम आहे ?”

मी उत्तर केलें, ‘माई, मी नुकताच शहरांतून येथें आलों. येथें मी पूर्वीं एकदां आलों होतों त्यावेळीं आपण येथें रहात नव्हता. या जागीं आलें म्हणजे मला फार आनंद होतो म्हणून पुनः कांहीं वेळ या ठिकाणीं फिरावयासाठीं मी आतां आलो आहें, तर आपण मेहेरबानी करून

सर्व घरभर व अंगणभर फिरण्यास मला परवानगी द्याल तर फार उपकार होतील. इतकेंच मागणें आहे.

ती बाई ह्मणाली, "बेटा, उन्हांत या बागेंत बसणें ठीक नाहीं. तूं आंत ये व आनंदानें येथें वाटेल तें पहा. आम्हीं या जागेंत रहावयास येऊन जवळ जवळ चार महिने झाले. त्याच्या अगोदर तूं इकडे आला असशील. आणखी आठ दिवसांनीं आम्हीं येथून दुसऱ्या गांवीं जाऊं ह्मणतों."

"कोणीकडे जाणार ? व मग येथल्या जागेचें काय करणार ?" मी मोठ्या उत्सुकतेनें तिला प्रश्न केला.

ती ह्मणाली, 'आतां आम्हीं अयोध्या, मथुरा वगैरे क्षेत्रांकडे जाणार; आणि येथल्या जागेचें काय करावयाचें ? विकून टाकणार. आम्हीं या गांवीं आलों तेव्हां या गांवाचे महाराज येथें आले होते. देव त्यांचे कल्याण करो. त्यांनीं ही जागा आह्मांला देऊन टाकली.'

ती जागा विकण्याचा तिचा मनोदय आहे हें समजतांच मला मोठा आनंद झाला, व मी ती जागा विकत घेण्याची माझी इच्छा तिला दर्शविली. पण तें ऐकून ती मला ह्मणाली कीं, "बेटा, आम्हीं काय, कोणालाहि ही जागा देणारच. पण तूं येण्याच्या अगोदरच एक गृहस्थ येथें आला होता व त्यानें जागा विकत घेण्याचें ठरविलें असून 'माझ्याकडून नक्की जबाब आल्याखेरीज दुसऱ्या कोणाला जागा विकूं नका' असें त्यानें निक्षून सांगितलें आहे."

"कोण तो ? त्याचें नांव काय ?" मी तिला गडबडीनें विचारलें.

"कोण आहे, कोण जाणे. एका कागदावर तो आपलें नांव व पत्ता लिहून ठेवून गेला आहे; पहाते तो कागद सांपडतो आहे का" असें ह्मणून कागद हुडकण्यासाठीं ती पडवीतून आंत असलेल्या खोलींत गेली.

कसेंहि करून ती जागा ताब्यांत घेण्याचा तर मी निश्चयच केला. उगीच जी तोंडाला येईल ती किंमत त्या बाईनें सांगितली असती तर मजजवळ काय होतें ह्मणा द्यायला ? पण तरीसुद्धां जागा हातची सोडायची नाहीं हें तर मी ठरविलेंच.

कांहीं वेळानें चोळामोळा केलेला एक कागद घेऊन ती बाई बाहेर आली. तिच्या हातांतून तो कागद घेऊन मी वाचला तों त्यावर पेनसिलीनें "हीरालाल परदेशी, नाथुराम दरजी का घर, पिंजारवाडी, उज्जेन" असा पत्ता लिहिलेला होता.

माझ्या हृदयांत एकदम लक्खकन् प्रकाश पडला. "अरे लेका. आतां कोठें पळतोस ? कन्हय्यालालापासून कागद उपटलेला तूंच नव्हेस का ? कितीतरी दिवस तूं मला झुकिवलेंस ! आतां आलास माझ्या तडाक्यांत" असे विचार माझ्या मनांत आले. पण मी शक्य तेवढ्या उसन्या शांतपणानें माझे मनोविकार दडविण्याचा यत्न केला. हिरालालाचा असा पत्ता लागल्यावर त्याचेच साथीदार ह्मणजे नारायणजी ज्योतिषांच्या घरावर दरवडा घालणारे भामटे, हेहि आतां आज नाहीं उद्यां सांपडतील अशी आशा वाटून मला मोठें समाधान वाटलें. मग मी त्या बाईला विचारलें कीं, 'माई, हा मनुष्य तुमच्याकडे आल्याला किती दिवस झाले ?'

बाई—अगदीं पहिल्यानें आला त्याला झाले असतील दोन महिने. तोहि तुझ्यासारखाच हें घर आंतून बाहेरून पाहूं द्या असें ह्मणाला व मग घरांतून चोहोंकडे हिंडून आल्यावर त्या समोरच्या चौथऱ्याकडे गेला. त्या चौथऱ्याच्या कोंपऱ्यावर एका दगडांवर एक चित्र कोरलेलें आहे तेंच पहात बसला ! त्या चित्राचें त्याला मोठें नवल वाटलेसें दिसलें. त्यानें मला या जागेसंबंधानें पुष्कळ प्रश्न विचारले पण मी

काय सांगणार त्याला ? तो जो नंतर गेला तो, गेल्या शुक्रवारीं आठच दिवस झाले त्याला, पुनः एकदां येऊन जागा पाहून गेला व नंतर मला सांगून गेला कीं ही जागा त्याला विकत घ्यायची आहे व ती त्याच्याकडून निरोप आल्याखेरीज दुसऱ्या कोणाला देऊं नये."

हिरालालाचा पत्ता माझ्या नोटबुकावर उतरून घेऊन तो कागद मी त्या बाईला परत करून विचारलें कीं, "माई तुम्हीं किती रुपये किंमत सांगितली आहे या जागेची !"

"पन्नास रुपये." असें त्या बाईनें उत्तर दिलें.

"मग ? तो काय ह्मणाला ?"

"त्यानें नक्की जबाब कांहीं दिला नाहीं. विचार करून सांगतों तोपर्यंत थांबा, दुसऱ्या कोणाला देऊं नका—" एवढेंच तो ह्मणाला.

विचार करून काय सांगणार होता तो ? पन्नास रुपये त्याच्याजवळ नसतील हें कांहीं शक्य नव्हतें. मग ? इतके रुपये मोजून सुद्धां घरांत कांहीं द्रव्य सांपडेल अशी खात्री त्याला वाटत नसावी, असा तर्क मी त्याजवर बसविला. व बाईला ह्मणालों, "माई, मी आज पन्नास रुपयाला ही जागा घेतों; आपण आणखी आठ दिवसांनीं तीर्थयात्रेला जाणार म्हणतां, आणखी हा गृहस्थ घेणार कीं नाहीं ह्मणणार हें अद्यापपर्यंत समजतहि नाहीं, मग उगीच त्याची वाट पहाण्यांत अर्थ तो कोणता ?"

परंतु तिचा रुकार पडेना. आजच्या आज पन्नास रुपये हातीं पडत आहेत म्हणून ती बाई झटकन कबूल होईल असें मला वाटलें होतें, परंतु ती बाई आपल्या वचनाची धड दिसली. कारण माझें बोलणें ऐकून ती म्हणाली कीं, "हें पहा, मी त्याला थांबते म्हणून सांगितलें

आहे, तेव्हां त्याच्याकडून योग्य मुदतींत नकार मिळेपर्यंत मला हें घर दुसऱ्या कोणाला विकतां येत नाहीं."

"हो, तें खरें. पण कांहीं लिखापढी झाली आहे का, त्यासंबंधाची? घेतलें तर त्यानेंच घ्यावें, इतरांनीं नाहीं, असें का आहे कांहीं त्यांत?"

"छेः छेः, लिखा नाहीं आणि पढी नाहीं, पण कांहीं दिवस तरी त्याच्या उत्तराची वाट पहायला नको काय?"

"ठीक आहे. पण कांहीं दिवस ह्मणजे किती दिवस? तो वर्षभर-सुद्धां विचार करायला येईल! इतके दिवस वाट पहायला आपल्याला सवड आहे काय?" मी तिला जरा खोचून विचारलें.

बाई ह्मणाली—"नाहीं. पण त्याला आम्हीं निरोप पाठवूं किंवा चिठ्ठी पाठवून विचारूं."

पण तसें होणें मला इष्ट नव्हतें. दुसरा कोणी गिऱ्हाईक घरासाठीं आला आहे असें त्याला समजायालाच पाहिजे, कीं तो तस्सा धांवून येऊन घर बळकावील हें तर उघडच होतें. आणि माझ्या मनांत तर 'चोरावर मोर' करून तें घर हातचें जाऊं द्यावयाचें नव्हतें. कन्हय्या-लालाजवळचा कागद हस्तगत करून एकदां तर त्यानें मला चकविलें होतें, पण आतां हातची आलेली संधी घालविण्याइतका वेडा मी नव्हतों.

दहापांच रुपये जास्त देतों असें ह्मटलें तर ती बाई कबूल होईल कीं नाहीं असेंहि विचारून पहावेंसें वाटलें, पण इतक्यांत एक विचार माझ्या मनांत आला. या बाईचें बोलणें सवरणें सगळें ठीक झालें, पण किती झालें तरी ती बायकोमाणूस. शेवटीं देणें घेणें ह्मणजे तिचा नवरा ठरवील तसें होणार. आणि ही बाई तर अगदीं एकवचनी, तेव्हां एकदां नाहीं म्हणून बसली म्हणजे पंचाईतच तेव्हां तिच्या

नवऱ्याजवळ गोष्ट काढून त्याला दहापांच रुपये जास्त देतों असें ह्मटलें तर घर मिळण्याचा तितका जास्त संभव, असें वाटून मी ती गोष्ट तितकीच ठेवली व बाईला इकडच्या तिकडच्या गप्पागोष्टी विचारतां विचारतां तिचा नवरा बाहेरून केव्हां येईल तें विचारलें; तेव्हां असें कळलें कीं गांवाला जाण्याचे दिवस जवळ येत चालल्यामुळें कांहीं खरेदीविक्री करण्यासाठीं तो सकाळींच जेऊन-खाऊन शहरांत गेलेला असून आतां त्याची परत येण्याची वेळ झालेली होती. तेव्हां तो येई पर्यंत त्या बाईपाशीं बसून कांहीं उपयोग नव्हता ह्मणून तिचा नवरा बाहेरून येईपर्यंत मी इकडे तिकडे फिरून येतों असें सांगून मी त्या घराच्या आसपास चोहोंकडे हिंडलों.

पूर्वीं एकेवेळीं बागबगीचा असलेल्या त्या जागीं आतां जंगलच जंगल उगवलेलें होतें. मनकामनेश्वराचें चित्र कोरलेला चबूत्रा पूर्वींपेक्षां स्वच्छ दिसत असून त्यावर उगवलेलीं झाडेंझुडपें काढून तो नीटनेटका केलेला दिसत होता. शंकराची रोज पूजा होत असलेली दिसत होती. एकंदरींत साधुवृत्तीनें राहणाऱ्या त्या स्त्री--पुरुषांनीं ती जागा चांगल्या स्थितींत ठेविली होती. अशा रीतीनें, शिंदे सरकारांच्या मेहेरबानगीनें मिळालेली व अंगमेहेनत करून स्वच्छ राखलेली ती जागा अवध्या ५० रुपयांस देऊन टाकून ती संतुष्टचित्त स्त्री–पुरुषें प्रपंच करून परमार्थ मिळ-विण्याच्या इच्छेनें तीर्थयात्रेला जाणार तींच खरीं श्रीमान्, व ज्यांच्या हृदयीं सदा विशालतृष्णा वास्तव्य करते, मग त्यांच्यापाशीं कितीहि द्रव्य असो, ते दरिद्री, असें मला दिसून आलें. आणि खरोखरच "माझें, माझें" ह्मणण्याचें एकदां वेड लागलें ह्मणजे समाधान, आनंद व शांति यांचें बिऱ्हाड मनांतून कायमचें उठलेंच ह्मणून समजावें. त्या बाईला पहातांच तिच्या संबंधानें मला जो आदर उत्पन्न झाला तो तिच्या

चर्येवर जें समाधान दिसत होतें त्यामुळें होय. नाहीं तर जन्मभर संसार करून ह्मातारपणींहि ईश्वराची भक्ति न करितां पुन्हां मुलाबाळांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्या संसारांत नाक खुपसल्यानें कशी मानहानी होते, लेकी सुना तोंडावर निंदा करतात त्या कशा ऐकून घ्याव्या लागतात व शेवटीं घरांमध्यें नोकरचाकरांच्या हातचा अपमान सहन करून कुत्र्यांप्रमाणें कसा जन्म घालवावा लागतो, याचीं उदाहरणें घरोंघरीं अलीकडे दृष्टीस पडतात. त्यांतून मुलगा मिळविता, सून करतीसवरती, व आईबाप, चहा, विड्या वगैरे व्यसनांनीं व्याप्त असून आपल्या मुलींचा विशेष लळा असलेले व पूर्ववयांत संसारांत अपयश आल्यामुळें अगदीं निष्कांचन असावेत; वा:, मग त्यांचे हाल कुत्रा देखील खात नाहीं, अशी स्थितीहि कमी अधिकप्रमाणानें पुष्कळ ठिकाणीं माझ्या पाहण्यांत आली आहे. अशी आपल्या जिवाची कुत्तरओढ करून, अंधेरांत मुसमुसत बसून, "सूनबाई अश्शी आहे आणि मुलगी तश्शी आहे" असें बडबडत, डोळ्यांच्या पाण्याशीं, चाळलेले भाकरीचे तुकडे, दंताजींचे ठाणें उठलेल्या तोंडानें चघळत बसण्यापेक्षां, व "मरतहि नाहींत, मेलीं, ह्मातारडीं !" असें रात्रंदिवस ऐकण्यापेक्षां, मरेपर्यंत निव्वळ स्वार्थपरायण बुद्धीनें संसार करून थकल्याभागल्यावर देखील किंवा संसार सोडून देण्याची तयारी ह्मणूनहि अशी मंडळी वानप्रस्थाश्रम कां स्वीकारीत नाहींत ? याचें उत्तर एकच आहे, आणि तें ह्मणजे "**माझें माझें**" हें वेड त्यांस सोडवत नाहीं, हें होय.

**"मुक्त होता परी बळें झाला बद्ध ।**
**घेऊनियां छंद, "माझें माझें" ॥"**

असें जे तुकारामबोवा ह्मणतात तें किती यथार्थ आहे !

हें वेड आज आहे व काल नव्हतें असें मात्र नाहीं. एकदां एक गरीब बाई दुष्काळामध्यें मृत्यु पावली. चित्रगुप्तानें तिच्या मरणानंतर तिच्या पापपुण्याचा आढावा काढला. परंतु त्याला, एका उपासमार काढणाऱ्या भिकाऱ्याला तिनें एकदां एक गाजर दिलें होतें, या खेरीज तिचें कोणतेंहि पुण्यकर्म सांपडेना. चित्रगुप्ताच्या आज्ञेनें तें गाजर तेथें आणविलें. ह्या गाजरानें ती बाई स्वर्गास जावयाची होती. तिनें तें गाजर हातांत धरिलें व तें तिला घेऊन वरवर चाललें.

इतक्यांत तेथें तो भिकारी आला. त्यानें तिच्या फाटक्या लुगड्याचा पदर धरिला आणि तोहि तिच्याबरोबर वर जाऊं लागला. तिसरा एक स्वर्गकामी उमेदवार त्या भिकाऱ्याचा पाय धरून तसाच वर जाऊं लागला आणि अशा रीतीनें त्या एका गाजराच्या जोरावर मनुष्यांची एक लांबचीलांब माळ वर जाऊं लागली. आणि आश्चर्य हें कीं, आपल्याला लटकून असलेल्या या लोकांचें त्या बाईला कांहींच वजन वाटलें नाहीं.

अशा रीतीनें ते मुक्त झालेले लोक वर वर जात जात एकदाचे स्वर्गद्वारापर्यंत येऊन पोहोंचले. तेथें त्या बाईनें खालीं वळून पाहिलें आणि तिला काय वाटलें कोण जाणें, आपल्या मागून येणाऱ्या सर्व लोकांना ती ह्मणाली, "चालते व्हा मेल्यानों ! हें '**माझें**' गाजर आहे." आणि नकळत तिनें त्यांनां झिडकारण्याकरितां आपला हात हालविला. त्याबरोबर हातांतील गाजर सुटून त्या सर्व लोकांच्या मालिकेसकट ती बिचारी बाई खालीं पडली.

असे विचार करीत करीत मी हिंडत असतांना त्या बाईचा नवरा आपल्या घराकडे येत असलेला मला दिसला. तथापि त्याच्या पाठोपाठ जाऊन त्याच्याशीं बोलण्यापेक्षां त्याच्या बायकोनें तो विषय समजावून दिल्यानंतर आपण गेलेलें बरें अशा बुद्धीनें त्या उभयतांच्या नजरेस

पडेन अशा ठिकाणीं मी एका वडाच्या झाडाखालीं कांहीं वेळ घालविला व नंतर त्याच्याकडे गेलों.

माझ्या अटकळीप्रमाणें त्याला माझ्या येण्याचा हेतु कळलाच होता, तेव्हां मीं येऊन नमस्कार चमत्कार होतांच तो गृहस्थ मला ह्मणाला कीं, "नाहीं ह्मणजे कोणी विचारीत नाहीं आणि नाहीं तर गिऱ्हाईकावर गिऱ्हाईक येत असतें. आपण आज आलांत, पण आपल्यापूर्वी दुसरा एक गृहस्थ येथें आला होता व त्याला घर विकत देऊं असें हिनें सांगितलें आहे."

"होय मला तें सर्व आतां यानीं कळविलें आहे. आपण "देणा-रच नाहीं" असें ह्मणत असाल तर गोष्ट निराळी, पण योग्य किंमतींत, आज जर रक्कम आपल्याला मिळत असेल तर माझ्याकडून आपल्याला फायदाच होईल" असें मीं ह्मणालों.

"तो कसा ?"

**मी**—"तो जी काय किंमत आपणांस देऊं करीत असेल त्यापेक्षां दहा रुपये मी जास्त देतों ह्मणजे झालें ना ? आणखी सर्व रक्कम आजच्या आज आपल्या हातांत मिळेल."

नवराबायकोच्या नेत्रपल्लवीवरून तर मी जिंकणार असें दिसलें. मूळ ठरविलेली किंमत, शिवाय दहा रुपये व सर्व रक्कम आजच्या आज हातांत–असा सवदा नवऱ्याला जास्त सोईस्कर वाटला. व तो आपल्या बायकोला म्हणाला, कीं, "कायगे ? तुझें काय म्हणणें आहे ?"

**बाई**—माझें काय ह्मणणें असायचें आहे ? त्या दुसऱ्या गृहस्थाला आम्हीं "तुझ्या उत्तराची वाट पहातों" असें मी सांगितलें आहे.

**मी**—पण तो घेतो, अशी खात्री कोठें आहे ? आणि घेणार असेल तर हे ह्मणतात ती किंमत तो देतो आहे काय ?



कै. माधवराव महाराज शिंदे



श्रीमंत महाराज जिवाजीराव शिंदे

बोवाजी माझ्या ह्मणण्याला अनुकूल दिसले पण त्याची बायको आपला विचार बदलील असा रंग दिसेना, तेव्हां त्यांना जास्त मोकळेपणा मिळावा ह्मणून मी मुद्दाम त्यांच्यापासून बऱ्याच लांब अंतरावर जाऊन उभा राहिलों.

थोड्या वेळानें, सुदैवानें, नवऱ्यानें तिची नीट समजूत घातली, आणि संध्याकाळच्या आंत मी त्यांची सर्व रक्कम चुकती करून घर विकत घेतलें. अशा रीतीनें एका खड्यानें मी दोन कावळे मारले. हिरालालाचा डोळा असलेलें घरहि मिळविलें व त्यापेक्षांहि महत्वाचा, त्याचा पत्ताहि मिळविला.

---

## प्रकरण सोळावें.

## अचानक भेट.

**मी वीर, मातें अनुकंप्य सारे प्राणी परी हिंसक वध्य बारे!।**
**मी आज वाघास वधावयाला पाहे परी सूकर मार्गिं आला!॥**

—तारानाथ*

स्टेशनावर त्या दिवशीं रतलामकडे जाणाऱ्या गाडीला कोण गर्दी होती! आई व गोपाळदादा त्या गाडीनें दक्षिणेंत यात्रेला जाणार होते, पण गर्दी अतिशय, त्यामुळें नागदा जंक्शनपर्यंत सेकंड क्लासाचीं टिकिटें काढून गोपाळदादांनीं कशीबशी जागा मिळविली! गाडी सुटण्यास अद्यापि थोडा अवकाश होता, त्यामुळें मी प्लॅटफॉर्मवर उभा राहून आईचे व गोपाळदादांचे सर्व 'हुकूम' ऐकत होतों. त्यादिवशीं श्रीमंत सरकार माधवराव महाराज शिंदे आपले युवराज श्रीमंत जिवाजीराव शिंदे यांस बरोबर घेऊन उज्जयिनीवरून कांहीं कामानिमित्त मुंबईस

---

* डॉ. तारानाथ जोशी, उज्जयिनी—एक विद्वान् लेखक.

जात होते. तेव्हां त्यांना मुजरा करण्यासाठीं व त्यांचें दर्शन घेण्यासाठीं प्लॅटफॉर्मावर गर्दी अतोनात झाली होती. तीमध्यें सर्व प्रकारची व सर्व दर्जाची मंडळी होती. महाराजांच्या बरोबर प्रवास करणारे ग्वाल्हेरहून आलेले वडेबडे सरकारी कामगार, उज्जयिनीचे लहान मोठे सर्व अधिकारी, शाळांतील शेंकडो विद्यार्थी, शहरांतले ठळक ठळक लक्ष्मीपुत्र, बाहेरगांवचे जहागिरदार व सरदार वगैरे वगैरे मंडळी तर होतीच पण थर्डक्लासांत बसणारी मंडळीहि पुष्कळ होती. महाराजांचा सॅलून व इतर फर्स्ट व सेकंडक्लासचे डबे कोरे करकरीत दिसत असून त्यांनींच बहुतेक गाडी अडविली होती. थर्ड क्लासचे डबे थोडे असून त्यांत नेहमीप्रमाणें फार गर्दी होती. महाराजांच्या सॅलून मधील व इतर फर्स्ट व सेकंड क्लासच्या डब्यांतील विजेच्या रोषनाईचा चकचकाट, बसण्यासाठीं व लोळण्यासाठीं मऊ गाद्या व उशा, वेळ जाण्यासाठीं निरनिराळीं मासिक पुस्तकें, वर्तमानपत्रें व कादंबऱ्या, स्टेशन मास्तर व गार्ड वगैरे मंडळींची धांदल इत्यादि सारा प्रकार पाहून मला बरीच मौज वाटली. फर्स्ट क्लास, सेकंड क्लास यांतील मंडळींचा एकमेकांविषयींचा तुटकपणा व प्रत्येकाची आपआपल्या विषयीं आढ्यता, आणि थर्डक्लासांतील मंडळींचें आपआपसांत चाललेलें मोकळें भाषण तर क्वचित कोठें भांडण, कोठें 'हमरी तुमरी' तर कोठें आनंदीपणा ही तफावत पाहून

**क्वचित् वीणावाद्यं, क्वचिदपिच हा हे ति रुदितम्'।**

या श्लोकाची आठवण झाली व मौज वाटली.

इतक्यांत एक घंटा वाजून नाटकांतील स्टेजप्रमाणें सर्व देखावा एकदम बदलला. प्रवास करणारे लोक गाडींत भराभर घुसूं लागले. महाराजही आपल्या सॅलून मध्यें जाऊन बसले. महाराजांचा निरोप घेऊन त्यांस

नमस्कार करण्यासाठीं शेकडों लोक व्यवस्थेनें उभे राहिले होते. विशेष परिचित असलेल्या मंडळीशीं चार शब्द बोलून महाराजांनीं जमलेल्या सर्व मंडळीकडे हास्यवदनानें पाहिलें व सर्वांचा प्रणाम घेतला. व इतक्यांत शिटी होऊन गाडी हलली. मी आईला व गोपाळदादांना नमस्कार करून, व वरचेवर सविस्तर पत्रें पाठवा, प्रकृतीला जपा वगैरे बजाऊन घरीं परत जाण्याला निघालों.

स्टेशनांतून बाहेर पडायला आणि नारायणजी ज्योतिषी दिसायला एकच गांठ पडली. गुरूजीहि इतर चार मंडळीप्रमाणें राजदर्शनासाठीं आले होते असें वाटून मी गुरुजींना विचारलें कीं, 'गुरुजी, महाराजांची भेट झाली काय?'

"नाहीं हो. मी नीलगंगेकडे गेलों होतो, येतांना स्टेशनावर गंमत पहावी म्हणून सहज आलों होतों. तुमचे काम कोठपर्यंत आलें?

मी गुरुजीनां घडलेली सर्व हकीगत सांगितली.

टांग्यांत बसल्यावर गुरुजी म्हणतात, "डॉक्टरसाहेब, हें प्रकरण दिवसेंदिवस जास्त चमत्कारिक होत चाललें आहे, संभाळून पाऊल टाका.

**मी**—मग आतां तो साधू व त्याची बायको परगांवीं गेल्यावर आपल्याला तें घर खोदून पाहिलें पाहिजे, नाहींतर इतकी सगळी खटपट व्यर्थ जाऊन चोरानींच अगोदर सुरवात केली असें होईल.

**गुरुजी**—हो तें तर खरेंच. द्रव्य असलें तर तें घरांतच असण्याचा संभव विशेष आहे. तेव्हां आपणच जाऊन तें हुडकावयाला प्रारंभ केला पाहिजे; आणि तो सुद्धां जितका होईल तितका लवकर.

**मी**—आणखी एक गंमत झाली आहे. हिरालालाचा पत्ता अनायासें समजला आहे!

**गुरुजी**——पण पिंजारवाडी हा पत्ता चांगला नाहीं बोवा. तुम्हांला ठाऊक आहे का पिंजारवाडी कोठें आहे ती ?

**मी**——नाहीं. कां बरें ? फार लांब आहे कीं काय आमच्या घरापासून ?

गुरुजी माझा प्रश्न ऐकून हंसले, व म्हणाले " नाहीं. तुमच्या दवाखान्यापासून फार लांब नाहीं. तथापि उद्यां शोधाला तरी सुरवात करा."

गुरुजी कां हंसले हें तेव्हां कांहीं माझ्या लक्ष्यांत आलें नाहीं. पण दुसऱ्या दिवशीं मी जेव्हां दवाखान्यांतल्या एक प्रतिष्ठित गृहस्थाला " पिंजारवाडी कोठें आहे हो ? म्हणून प्रश्न केला, तेव्हां गुरुजींच्या हंसण्याचें कारण मी हेरलें. माझा प्रश्न ऐकून दवाखान्यांत, आलेला तो गृहस्थ क्षणभर हंसल्यासारखी मुद्रा करून मला म्हणाला ' कां बरें ? तेथें आपलें काय काम आहे ? '

मी माझें काम त्याला सांगितलें. त्यावर तो ह्मणाला, 'येथून उत्तरेकडे समोर गेल्यावर म्युनसिपालिटीचें ऑफिस आहे. तेथूनच पिंजारवाडीकडे रस्ता गेलेला आहे. येथून एक दहा मिनिटांचा रस्ता आहे. पण तेथें बहुत करून प्रतिष्ठित कुटुंबाची वस्ती नाहीं. अगदीं हलक्या धंद्याचे लोक, वारांगना वगैरे माणसें त्या बाजूला रहातात."

आपल्या सारख्या प्रतिष्ठित धंद्याच्या माणसाला आतां एका भामट्याचा शोध करावयासाठीं, नाटकशाळा, वारांगना व इतर हलके लोक रहातात अशा एका भिकार रस्त्यावर भटकण्याची पाळी आली याबद्दल मला फार उद्वेग वाटला. पण काय करूं ? " अगोदर गुंतूं नये, मग कुंथूं नये !"

* वसंतसेनेच्या काळीं उज्जयिनीसारखें सुंदर व विस्तीर्ण शहर भरतखंडांत दुसरें नसेल. हिला "विशाला" असें ह्मणत. सूर्यवंशी तृणबिंदु राजाचा पुत्र विशाल यानें वसविली ह्मणूनहि हिला "विशाला" अथवा "वैशाली" असें ह्मणत असत. ( भागवत. ९. २. ३३. पहा. ) हेमचंद्राच्या नाममालेंत

**"उज्जयिनीस्याद्विशालाऽवन्ती पुष्पकरंडिनी ।"**

असें ह्मटलें आहे.

मेघदूतामध्यें कालिदासानें उज्जयिनीच्या ऐश्वर्यातिशयाचें पुष्कळ वर्णन केलेलें आहे. उज्जयिनी कशी आहे तर स्वर्गास गेलेल्या लोकांनीं संचित पुण्य संपत आलें असतां पृथ्वीवर परत येतांना अवशिष्ट राहिलेल्या पुण्यानें मृत्युलोकीं आणलेला, व पूर्वीं उपभोग न घेतलेला असा, जणूं काय स्वर्गाचा एक देदिप्यमान प्रदेश होय, अशी उत्प्रेक्षा त्यानें केली आहे. ( ३१ ) ज्या नगरीमध्यें स्वच्छ असून ज्यांच्या मध्यभागीं महारत्नें गुंफलीं आहेत असे कोटिशः हार, कोट्यावधि शंख व शिंपा, तसेंच कोमल हिरव्या तृणाप्रमाणें श्यामवर्ण व ज्यांचे किरण चोहोंकडे फांकले आहेत असे कोटिशः पाचेचे मणी,

---

*The capital of Chashtana and his successors was Ujjain, one of the most ancient cities of India; the principal depot for the commerce between the ports of the West and the interior, famous as a seat of learning and civilisation, and also notable as the Indian Greenwich, from which longitudes were reckoned. The place, which is still a considerable town with many relics of its past greatness, retains its ancient name, and was for a time the capital of Maharaja Sindia:—Early History of India—by V. A. SMITH—p. p. 276—277.

आणि कोटिशः पोंवळीं हे पदार्थ विक्रीकरितां बाजारांत मांडलेले पाहून, सर्व रत्नांचा आगर जो समुद्र त्यांत केवळ उदक मात्र शिल्लक राहिलें असावें असें दिसतें ( ३३ ). यावरून भूलोकावर ज्या इतर मोठमोठ्या नगरी त्यावेळीं होत्या त्या सर्वांपेक्षां उज्जयिनीचें भाग्य अतिशय मोठें होतें असें व्यक्त होतें.

त्या उज्जयिनी शहरांतले रुंद रुंद रस्ते, मोठमोठाले चौक, उंची उंची मालानीं अगदीं गच्च भरून गेलेलीं दुकानें, दूरदूरच्या देशाच्या व्यापाऱ्यांच्या वखारी, *मोठ्या नामांकित हवेल्या, मंदिरें व उपवनें, विद्यापीठें, हीं सगळीं आतां गेलीं ! अदृश्य झालीं ! संपलीं ! मेलीं !+

---

* उत्तर हिंदुस्थानांतील लांबलांबच्या प्रदेशांतील सर्व माल उज्जयिनी येथें येऊन उतरत असे. कारण हें ठिकाण हिंदुस्थानच्या मध्यभागीं असून आसपासच्या सर्व भागांची मागणी येथून पुरविली जात असे. आणि ही मागणी पुरविल्यानंतर जो माल शिल्लक उरे व बाह्य देशास जाण्यासाठीं सांठविला जात असे त्याचें हें ठिकाण ह्मणजे वखारच होती व येथूनच परदेशी जाणारा मल भडोचकडे रवाना होत असे—भारतीय श्रेष्ठत्व.

+ही सुप्रसिद्ध नगरी—या नगरींत पाय ठेवल्यावर विद्वत्व किंवा कवित्व याविषयीं कोणाचा अहंकार समूळ नष्ट होणार नाहीं ? उलट मीं काळाला हेंच उत्तर देईन कीं, " हे विध्वंस—प्रिय दैत्या, तूं उज्जयिनी आपल्या " सर्वभक्षक " उदरांत गडप केलीस, तरी तिच्या वैभवाची माझी स्मृति नष्ट करण्याला तूं समर्थ झाला नाहींस.

आणि खरोखरच उज्जयिनी नगराचें जुनें " अवंति " हें नांव उच्चारतांच, अद्भुतरम्य अशा भावनांच्या गुंफेमध्यें किंवा भुलभुलाईमध्यें प्रवेश करणारें कोणाचेंहि मन तींतून बाहेर पडूं इच्छितच नाहीं. त्या गुंफेंतून वळणावळणांनीं हिंडून मनुष्य पुनः पूर्वपदावर आला तरी, त्याला त्याचा खेद न वाटतां, फिरून त्याच वळणांची दुसरी फेरी मारण्याचा मोह त्याला होतो. याचें कारण हेंच कीं या परिभ्रमणामध्यें त्याला जुन्या वैभवाचे अनेक उदात्त देखावे दिसतात. स्कंदपुराणांत या नगरीला " प्रतिकल्पा " हें नांव दिलें तें सार्थ आहे. कारण

आतां विद्यमान असलेल्या गांवाला साजण्यासारखीच एकंदर नगराची रचना असून, कावळ्याला दृष्ट लावणाऱ्या, कोकिळेला लाज-

---

[ मागील पानावरून चालू ]
ती प्रत्येक कल्पाच्या प्रारंभीं प्रादुर्भूत होते या अर्थानें काय, किंवा तिच्या-विषयींच्या वैभवाची करावी ती प्रत्येक कल्पना खरी ठरते या अर्थानें काय, अवंती ही "प्रतिकल्पाच" होय ! याच नगरींत श्रीकृष्णानें शिष्याची विनय-वृत्ति ठेऊन सांदीपनीच्या गुरुगृहीं विद्या संपादन केली, व गुरुपत्नीला तिच्या मृत पुत्रांची भेट करून देण्याची अलौकिक गुरुदक्षिणा दिली ! याच नगरींत प्रद्योत, शूद्रक, भर्तृहरि, विक्रमादित्य, भोज इत्यादि राजांनीं वैभवपूर्ण राज्यें उपभोगिलीं. यौगंधरायणासारखा महान कर्ता मुत्सद्दी येथेंच झाला. स्वप्नवा-सवदत्ता, प्रतिज्ञायौगंधरायण या भास कवीच्या नाटकांतील कथांचा संबंध अवंतीनगरींशींच जोडला जातो. वसंतसेनेसारखी निःस्वार्थी प्रेमळ गणिका, व चारुदत्तासारखा दानशूर व अभिजात संभावित प्रणयी ही जोडी याच नगरींत होऊन गेली ! गायनवादनकलेंत निष्णात असे राजे उदयन व बाज-बहादुर, आणि त्यांच्या गायन मोहित प्रियकरणी वासवदत्ता व रूपमती यांचा संबंध दुरून किंवा जवळून या नगरीशींच पोहोंचतो. प्राचीन कालिदासापासून आधुनिक वासुदेवशास्त्री खऱ्यांपर्यंत, दोन हजार वर्षांतील कवींना या नगरीच्या वैभवसौंदर्यानें जितकें मोहित केलें तितकें दुसऱ्या एखाद्या नगरानें क्वचितच केलें असेल. आधुनिक काळांत उंची प्रतीच्या व्यापारी वस्तूंची देवघेव व प्रसिद्धी परदेशापर्यंत याच नगरींतील शकवंशीय राजांच्या राज्यांत झाली. ज्योतिष शास्त्राच्या संशोधनाचें एक मोठें केंद्र याच नगरींत प्राचीन काळा-पासून असून, हल्लींच्या ग्रीनविचप्रमाणें रेखांशांचें उगमस्थान भरतखंडभर मानलें जाण्याचा मान याच नगरीला मिळाला. आणि बुद्धानंतरच्या काळांत आद्य श्रीशंकराचार्यांनीं याच नगरींत पाशुपत मतसांप्रदायी योध्यांशीं वाद करून, सभायुद्धांत विजय मिळवून, वैदिकधर्म प्रस्थापनेचें एक कार्य केलें. अलीकडील इतिहासांत अवंतीचें ह्मणजे उज्जयिनीचें कोणतें स्थान होतें किंवा आहे या रूक्ष विषयांत मी शिरत नाहीं. तथापि मराठ्यांनीं स्वातंत्र्य मिळ-विल्यानंतर जो उत्तरेकडे राज्यविस्तार केला त्याला माळवाप्रांत व उज्जयिनी शहर यांचें बरेंच साहाय्य झालेलें आहे. **नरसिंह चिंतामण केळकर.**

विणाऱ्या, सिंहकटीची फजिती उडविणाऱ्या, हरिणींना डोळे मिटावयास लावणाऱ्या कांहीं पिकदाण्या, पिंजारवाडीच्या त्या भिकार भागांत मुख्यत्वें करून रहातात. तेली, तांबोळी, पिंजारी, भटारे, शिंपी वगैरे धंद्याचे लोकहि त्या बाजूला पुष्कळ आहेत.

दुपारचीं एक दोन वाजण्याची वेळ होती. मीं पिंजारवाडीतून फिरावयास निघालों होतों. कोठेंहि न थांबतां, कोण कोठें रहातो व काय करतो हें पहात पहात हातांत सायकल धरून मी स्वस्थपणें पावलें टाकीत होतों. एक पिंजारी कापूस कातीत होता त्याला नाथूराम शिंपी कोठें राहतो ह्मणून मीं विचारलें परंतु त्यानें कांही उत्तरच दिलें नाहीं. मीं पुन्हां जास्त ओरडून तोच प्रश्न केला, तेव्हां स्वारीनें आपलें कातणें क्षणभर थांबवून, 'ठाऊक नाहीं' असें उत्तर दिलें. दुसरा एक मनुष्य आपल्या पडवींत दोऱ्या वळीत बसला होता तो माझ्या दृष्टीला पडला. त्याच्या आसपास काथ्या, चिंध्या व तसलेंच सामान पुष्कळ पडलेलें दिसत होतें त्यावरून तो पिढ्यान् पिढ्या ह्या दोऱ्या वळण्याच्या धंद्यावर पोट भरीत असावा असें दिसलें. अंगावर शंभर ठिकाणीं ठिगळें लावलेला एक कोट होता. घरादाराचा थाटहि मालकाप्रमाणेंच होता. त्याच्यापाशीं जाऊन पुन्हां मीं तोच प्रश्न केला. तेव्हां त्यानें मला त्या नाथूराम शिंप्याच्या घराची खूण सांगितली.

शिंपीदादांच्या घराचा पत्ता अशा प्रकारें मिळविल्यावर मी त्याजपाशीं आणखी माहिती विचारली, तेव्हां असें कळलें कीं त्या शिंप्याला आपल्या धंद्याखेरीज दुसऱ्या कोणत्याहि कामाची माहिती नव्हती. यास्तव तो फार दरिद्री होता. व आपल्या कामांत जें कांहीं थोडेंथोडकें मिळे, तेवढ्यावरच तो, त्याची बायको व एक मुलगी उदरनिर्वाह करून होतीं.

नाथूराम शिंप्याचें घर लहान, जुनें व अगदीं मोडकळीस आलेलें असून खालच्या मजल्यांत त्याचें दुकान व माडीवर त्याचें घर होतें. भिंती मातीनें सारवलेल्या असून त्यांतून चिरा गेल्या होत्या. दुकानाची जागा एका खणाची असून त्यांत एक तरट हांतरलेलें होतें. एक पेटी होती तींतच खेडवळ मुलांच्यासाठीं विक्रीच्या जिनसा—टोप्या, कुडतीं, अंगरखे वगैरे ठेविलेले असून रात्रीं निजतांना ती पेटी माडीवर नेण्यांत येत असे. शिवण्याच्या यंत्राचा तर अभावच होता. नवऱ्याला बायको मदत करी आणि मुलगी कापूस पिंजून कांहीं पैसा मिळवी. अशा रीतीचा "कुच रोटी, कुच लंगोटी" संसार त्या कुटुंबाचा होता.

तें घर चांगलें लक्षांत रहावें म्हणून मी त्या घरावरून पुष्कळ वेळां येरझारा केल्या, पण कोणतें कारण काढून त्या घरांत जाऊन चौकशी करावी हें समजेना. कारण खालीं दुकान जरी मांडलें होतें तरी दुकानांत कोणी बसलेलें नव्हतें, मग शोध करायचा कसा ?

कर्मधर्मसंयोगानें, मी त्या घराजवळ असायला, आणि तेथें एक पोस्टमन यायला गांठ पडली. "चिठ्ठी लेव चिठ्ठी" असें म्हणून तो थांबला, माडीवरून शिंप्याची मुलगी आली तिला एक पत्र त्यानें दिलें व आपण पुढें गेला; तो थोडा पुढें गेल्यावर मी त्याला गांठून थांबविला व खिशांतून एक रुपया काढून त्याजपुढें धरूनत्याला म्हटलें, "चार आण्याचीं कार्डें द्या बरें."

क्षणमात्र तो गोंधळल्यासारखा दिसला मग त्याला काय वाटलें कोण जाणे ? तो आपलें पाकीट उघडून कार्डें मोजीत असतां मी त्याला सहज विचारल्यासारखें करून म्हटलें, "तुम्हीं आतां पत्र दिलेंत तें कोणाचें घर ?"

" नाथूराम म्हणून एक शिंपी रहातो त्याचें. कां बरें ?"

" कांहीं नाहीं. माझ्या माहितीचा 'हिरालाल परदेशी' नांवाचा एक गृहस्थ त्या घरांत रहातो असें कळलें आहे, म्हणून चौकशी केली."

" हो. हो. असेल असेल. अलीकडेच रहायला आला असेल तो."

" तुमच्या माहितीचा आहे का तो ?"

" नाहीं बोवा. मीं त्याला अजून काळा कीं गोरा पाहिलासुद्धां नाहीं. अलीकडे कधीं कधीं त्याच्या नांवाचीं पत्रें येतात त्यावरून मला माहिती."

" अलीकडे म्हणजे किती दिवसांपासून हें तुमच्या ध्यानांत आहे ?"

" झाले असतील महिना पंधरा दिवस. पण आपल्याला जास्त माहिती पाहिजे असेल तर ती पहा त्या शिंप्याची मुलगी दुकानांत आहे तिला विचारा म्हणजे झालें."

त्या पोस्टमनाजवळून कार्डें व बारा आणे घेऊन मीं त्याला दोन आणे खुशाली दिली, तेव्हां तो प्रसन्न मुद्रेनें '**रामराम**' करून चालता झाला. मग मी शिंप्याच्या दुकानाकडे वळलों. शिंप्याच्या मुलीला मला बराच वेळ बोलण्यांत गुंतवावयाची होती, ह्मणून तिच्या दुकानांत दिसत असलेल्या लहान मुलांच्या टोप्या मला पाहिजेत अशा बहाण्यानें मीं तिला कांहीं चांगल्या टोप्या दाखविण्यास सांगितल्या. तशा प्रकारच्या टोप्या दक्षिणी ब्राह्मणांचीं मुलें सहसा घालीत नाहींत ह्मणून मला तशा प्रकारची खरेदी करतांना पाहून त्या मुलीला थोडें नवल वाटलें, पण खात्रीचें एक गिऱ्हाईक तरी मिळालें याचाहि तिला आनंद वाटला असावा.

ही टोपी लहान आहे, ती मोठी आहे, अमुक चांगली आहे, तमुक वाईट आहे, अशांत बराच वेळ घालविल्यावर मी तिला हिरालाल

परदेशी तिच्या घरांत रहातो का ह्मणून प्रश्न केला तेंव्हां तिच्याकडून असें समजलें कीं तो तिच्या घरीं रहात नाहीं, पण त्याच्या नांवाचीं पत्रें मात्र तिच्या घराच्या पत्त्यावर येत असून तिची आई त्याच्याकडे तीं पोचती करते. हिरालालाचें राहाण्याचें ठिकाण तिलाहि ठाऊक नव्हतें. तो कधीं कधीं त्यांच्या घरीं येतो व आठवड्यांतून २।४ पत्रें येतात तीं घेऊन जातो असेंहि तिनें सांगितलें. तथापि " तो कोठें रहातो तें अगदीं नेमकें ठिकाण तूं बरोबर सांगितलेंस तर तुला चांगलें बक्षीस देईन." असें मी तिला आश्वासन दिलें. पण तिच्या चर्येवर उत्साह दिसेना. तेंव्हां एक रुपया तिच्या पुढें टाकून मी एक बरीशी टोपी खरेदी केली व बाकीची किंमत तुजजवळच सध्यां असूंदे, हिरालालाचा नेमका पत्ता उद्यां मला सांगितलास तर ही तुजजवळ ठेवलेली रक्कम तुला बक्षिस देऊन शिवाय आणखी कांहीं देईन, पण ही गोष्ट कोणाजवळ बोलायची नाहीं असें तिला बजावलें. मृदंगाच्या तोंडावर अशा प्रकारचा कणकेचा गोळा ठेवल्यावर मग त्यांतून मधुर ध्वनि निघूं लागला. हिरालाला-बद्दलची जी माहिती तिच्याकडून नंतर मला समजली, ती वरून तो मनुष्य मोठा मिष्टभाषणी व मनमिळाऊ असून, साधारण मध्यम बांध्याचा व देखणा असावा व त्याच्या तोंडावर फुसट देवीचे वण असावेत, असें मी अनुमान केलें. तिच्या कडून आणखीहि कांहीं बातमी लागली असती पण इतक्यांत तिच्या आईनें माडीवरून तिला हांक मारली, त्यामुळें ती आईकडे गेली व मीहि माझ्या दवाखान्याकडे वळलों.

'पेला लागे ओंठा, पण दैव मारी सोटा' असें ह्मणतात तसें या खेपेला झालें. हिरालालाचा पत्ता समजल्याबरोबर, 'सांपडला हिरालाल,' अशा फुशारकींत मी होतों. पण तो माझ्या बारशाला जेवला होता! पत्ता समजला त्याचा, पण तो कसा चाणाक्ष! आपण रहातों ती जागा

लोकांना न कळवितां पत्रव्यवहार मात्र चालू ! आणि तो कोणामार्फत तर बायकांच्या! पुरुषांचे पत्रव्यहार बायकांच्या मार्फत चालू झाले म्हणजे कांहीं तरी घोटाळा आहे म्हणून समजावें ! दुसऱ्या दिवशीं मोठ्या आशेनें शिंप्याच्या मुलीला मी भेटलों. पण तिच्याकडून कांहीं बातमी मला कळली नाहीं. इतकेंचनवीन समजलें कीं नाथूराम शिंपी बऱ्याच दिवसांपासून परगांवीं गेला होता व शिंप्याची बायको हें दुसऱ्या लग्नाचें कुटुंब असून तिला मूलबाळ वगैरे कांहीं नव्हतें. शिंप्याची मुलगी जमनी—ही त्या बाईची सावत्र मुलगी.

तथापि हिरालालाची जी चेहेरेपट्टी मला समजली होती, तिजवरून तरी तो नाथूराम शिंप्याच्या घरीं कधीं पत्रें घ्यायला आला व मला दिसला तर आपण त्याला ओळखूं व मग त्याच्या मागोमाग जाऊन त्याच्या रहाण्याच्या ठिकाणाचा छडा लावूं अशा आशेवर समाधान मानून मी राहिलों. रोज सकाळीं, दुपारीं व सायंकाळीं शिंप्याच्या घराकडे पहात पहात मी अगदीं हळूं हळूं त्या रस्त्यावरून जात असें. त्याचा परिणाम एके दिवशीं असा झाला कीं शिंप्याच्या घरासमोर एक विडीवाल्याचें दुकान होतें त्यांत बसून माझ्या हालचालीवर रोज नजर ठेवणाऱ्या त्या चावट दुकानदारानें माझ्या हिंडण्याफिरण्याचा अगदीं विपरीत अर्थ घेतला आणि एकेदिवशीं मी नित्याप्रमाणें त्याच्या समोरून जात असतां फिदि फिदि हंसून, ‘ क्यौं महाराजजी, क्या काम है ?’ असें मला निर्लज्जपणें विचारलें. त्याच्या विचारण्याचा रोख ओळखून त्याच्या जवळ त्याचे दोन चावट सोबती बसले होते तेही हंसूं लागले. त्या वेळीं मला खरोखरच अगदीं अतिशय वाईट वाटलें. ताडीच्या झाडाखालीं बसून भांडें तोंडाला लावावें आणि दूध पितों असें शपथेवर सांगावें. खरें मानणार कोण ? तसा हा प्रकार होता. तथापि मी अमुक मनुष्य आहे

अगर अमुक धंद्याचा हें त्यांस ठाऊक नव्हतें यांतच समाधान मानून मी मला आलेला राग तसाच गिळला व विडीवाल्याला आपल्या मसलतींत घ्यायचा विचार करून त्याला खुणेनें मजजवळ बोलावून माझा त्या रस्त्यांतून फिरण्याचा उद्देश त्याला सांगितला व त्याच्याकडून मला योग्य साह्य मिळाल्यास त्याचे उपकार मी ठेवणार नाहीं असें त्यास आश्वासन दिलें, व त्यानें तसें करावें यासाठीं त्याला मी एक रुपया अगाऊ बक्षीस दिला !

त्या नंतर एक आठवडाभर अगदीं फुकट गेला. रोज रोज मी त्या पिंजारवाडीमधून जावें व विडीवाल्यानें मला, “ आज तो नहि आया,” असें सांगावें, असें चाललें होतें.

अगोदर ब्राह्मण, त्यांतून डॉक्टर; आणि मी आपला धंदा सोडून ज्याला मी कधींसुद्धां पाहिला नाहीं अशा एका भामट्याचा नुसत्या मिळालेल्या माहितीवरून शोध करायचा; आणि तो कोठें ? तर उच्च आचारविचारांचे लोक जेथून सहसा जावयाचे नाहींत अशा बाजारबसव्यांच्या भिकार मोहोल्यांतून ! हिरालालाच्या चेहेरेपट्टीचे पुष्कळ लोक रस्त्यावरून जातात पण त्यांतला अमुकच हिरालाल हा शोध करणें किती त्रासदायक होतें हें कोणाच्याहि सहज आतां लक्षांत येईल. तथापि **‘एक लज्जां परित्यज्य सर्वत्र विजयी भवेत् ।’** हा महामंत्र ध्यानांत धरून मी त्या पिंजारवाडीतून खुशाल हिंडत होतो ! हो, कर नाहीं त्याला डर कशाला ?

हिरालालाचा शोध करावयाचा मी जणूं विडाच उचलला होता. त्यानें असो अगर त्याच्या साथीदारानीं असो, नारायणजी व्यासांच्या घरांत शिरून माझे महत्त्वाचे कागद लांबविले होते, तेव्हां आतां

"शेंडी तुटो कीं पारंबी तुटो" त्याला हुडकून काढलाच पाहिजे असा मी निश्चय केला !

नाथूराम शिंप्याची मुलगी, जमनी ही चांगली मुलगी होती. मी तिला दिसलों कीं, "हिरालाल अद्याप आला नाहीं; आईच्यापाशीं त्याच्या नांवाचीं बरींच पत्रें येऊन पडलीं आहेत," असें ती सांगे. तिच्या एकंदर वर्तनावरून ती सुशील व सुस्वभावाची असून तिच्या सावत्र आईचें व तिचें नीट नसावें असें दिसे. तें ध्यानांत आणून मी एके दिवशीं तिला सुचविलें कीं हिरालाल बरेच दिवसांत न आल्यास, त्याच्या नावांवर आलेलीं पत्रें, ती शिंपीण त्याजकडे कोणत्या तऱ्हेनें पोचविते–कोणा माणसाबरोबर पाठविते कीं पोष्टांत टाकते–तें पहावें व पोष्टांत टाकीत असल्यास त्याचा पत्ताही लक्षांत ठेवावा.

एके दिवशीं सायंकाळीं मी दवाखान्यांत बसलों होतों. दोन तीन पेशंटस् आले होते. मूलचंदजी व काशीराम आपआपल्या कामांत निमग्न होते. इतक्यांत पिंजारवाडीतला विडीवाला मजकडे आला आणि त्यानें सांगितलें कीं 'उंच, गोरटेलासा एक मनुष्य नुकताच नाथूराम शिंप्याच्या घरांत शिरलेला पाहिला म्हणून मी आपल्याला सांगायला आलों आहे."

घेतलेल्या सोंगाची नीट बतावणी व्हावी व आपलें कार्यहि बिन-बोभाट व्हावें ह्मणून मी मोठ्या शांतपणाचा आविर्भाव आणून काशी-रामाला माझी बॅग त्या विडीवाल्याजवळ देण्यास सांगून, मूलचंदजी व काशीराम यांना "मला यायला उशीर लागेल. तुमची वेळ झाली ह्मणजे जा, माझी वाट पाहूं नका" असें सांगितलें आणि दवाखान्याच्या बाहेर पडलों.

हिरालालाचा शोध लागेल खरा, पण तो घराबहेर निघेपर्यंत आपण कोठें उभें रहावयाचें ? हा एक मोठा प्रश्न रस्त्यांत माझ्यापुढें आला.

पिंजारवाडींत, तेंहि कदाचित पुष्कळ वेळ एखाद्या घरासमोर उगीच उभें राहणें हें कृत्य मला अत्यंत कठीण वाटलें. आपण अगदीं चांगल्या शुद्ध हेतूनें तेथें उभें राहिलो तरी आपल्या ओळखीच्या एखाद्या माणसानें तशा ठिकाणीं मला पाहिलें तर तो मनांत काय म्हणेल ? असें वाटलें. एकी-कडे, हिरालाल—भामटा, चोर, ज्याचा पत्ता, इतके दिवस प्रयत्न करतां करतां आज लागला तो—अनायासें दृष्टीस पडणार आहे असें वाटे, तर दुसरीकडे, एखाद्या डिटेक्टिव्ह पोलिसाप्रमाणें, लाजलज्जा सगळी गुंडाळून ठेवून, प्रसंगीं लोकांच्या उपहासास देखील पात्र होऊन आपणास रहावें लागेल असें वाटे. आणि कालिदासानें

**" 'उपेक्षावें लज्जा त्यजुनि जननिंदेसचि अतां,'**
**त्यजावी वा भार्या वनि अगदिं निर्दोष असतां !**
**अशा चिंतेमाजी रघुपतिमनाची स्थिति तसी,**
**जहाली हींदोळ्यावरी बसुनि होते चल जसी.'** *

असें वर्णन केल्याप्रमाणें माझ्या मनाची अवस्था झाली !

तो विडीवाला मोठा बोलघेवडा व धूर्त होता. मी आपल्याच विचा-रांत आहे, बोलत नाहीं असें पाहून त्यानेंच बोलण्याचा उपक्रम केला. त्यानें मला विचारलें कीं " तो हिरालाल दिसल्यावर आपण त्याच्या पाठोपाठ जाणार कीं काय ?"

" हो, हो, तर ? त्याचें बिऱ्हाड कोठें आहे तें मी स्वत: पाहणार."

" पण तो तुम्हाला ओळखत असेल काय ?"

" तें काय सांगावें ? पण कदाचित ओळखीतहि असेल."

" तर मग त्याची वाट पहात रस्त्यावर उभें राहणें ठीक नाहीं. आपली कांहीं हरकत नसेल तर माझ्या दुकानांत आपण खुशाल बसावें. ह्मणजे सगळें ठीक जुळेल."

---

* कै. ग. स. लेले कृत मराठी-रघुवंशकाव्य. सर्ग १४, श्लोक ३४.

"शेंडी तुटो कीं पारंबी तुटो " त्याला हुडकून काढलाच पाहिजे असा मी निश्चय केला !

नाथूराम शिंप्याची मुलगी, जमनी ही चांगली मुलगी होती. मी तिला दिसलों कीं, "हिरालाल अद्याप आला नाहीं; आईच्यापाशीं त्याच्या नांवाचीं वरींच पत्रें येऊन पडलीं आहेत," असें ती सांगे. तिच्या एकंदर वर्तनावरून ती सुशील व सुस्वभावाची असून तिच्या सावत्र आईचें व तिचें नीट नसावें असें दिसे. तें ध्यानांत आणून मी एके दिवशीं तिला सुचविलें कीं हिरालाल बरेच दिवसांत न आल्यास, त्याच्या नावांवर आलेलीं पत्रें, ती शिंपीण त्याजकडे कोणत्या तऱ्हेनें पोचविते—कोणा माणसावरोबर पाठविते कीं पोष्टांत टाकते—तें पहावें व पोष्टांत टाकीत असल्यास त्याचा पत्ताही लक्षांत ठेवावा.

एके दिवशीं सायंकाळीं मी दवाखान्यांत बसलों होतों. दोन तीन पेशंटस् आले होते. मूलचंदजी व काशीराम आपआपल्या कामांत निमग्न होते. इतक्यांत पिंजारवाडीतला विडीवाला मजकडे आला आणि त्यानें सांगितलें कीं 'उंच, गोरटेलासा एक मनुष्य नुकताच नाथूराम शिंप्याच्या घरांत शिरलेला पाहिला म्हणून मी आपल्याला सांगायला आलों आहे."

घेतलेल्या सोंगाची नीट बतावणी व्हावी व आपलें कार्यहि बिन-बोभाट व्हावें म्हणून मी मोठ्या शांतपणाचा आविर्भाव आणून काशी-रामाला माझी बॅग त्या विडीवाल्याजवळ देण्यास सांगून, मूलचंदजी व काशीराम यांना "मला यायला उशीर लागेल. तुमची वेळ झाली म्हणजे जा, माझी वाट पाहूं नका" असें सांगितलें आणि दवाखान्याच्या बाहेर पडलों.

हिरालालाचा शोध लागेल खरा, पण तो घराबहेर निघेपर्यंत आपण कोठें उभें रहावयाचें ? हा एक मोठा प्रश्न रस्त्यांत माझ्यापुढें आला.

पिंजारवाडींत, तेंहि कदाचित पुष्कळ वेळ एखाद्या घरासमोर उगीच उभे राहणें हें कृत्य मला अत्यंत कठीण वाटलें. आपण अगदीं चांगल्या शुद्ध हेतूनें तेथें उभें राहिलो तरी आपल्या ओळखीच्या एखाद्या माणसानें तशा ठिकाणीं मला पाहिलें तर तो मनांत काय म्हणेल? असें वाटलें. एकीकडे, हिरालाल—भामटा, चोर, ज्याचा पत्ता, इतके दिवस प्रयत्न करतां करतां आज लागला तो—अनायासें दृष्टीस पडणार आहे असें वाटे, तर दुसरीकडे, एखाद्या डिटेक्टिव्ह पोलिसाप्रमाणें, लाजलज्जा सगळी गुंडाळून ठेवून, प्रसंगीं लोकांच्या उपहासास देखील पात्र होऊन आपणास रहावें लागेल असें वाटे. आणि कालिदासानें

> **" 'उपेक्षावें लज्जा त्यजुनि जननिंदेसचि अतां,'**
> **त्यजावी वा भार्या वनिं अगदिं निर्दोष असतां!**
> **अशा चिंतेमाजी रघुपतिमनाची स्थिति तसी,**
> **जहाली हिंदोळ्यावरी बसुनि होते चल जसी.'**"*

असें वर्णन केल्याप्रमाणें माझ्या मनाची अवस्था झाली!

तो विडीवाला मोठा बोलघेवडा व धूर्त होता. मी आपल्याच विचारांत आहे, बोलत नाहीं असें पाहून त्यानेंच बोलण्याचा उपक्रम केला. त्यानें मला विचारलें कीं "तो हिरालाल दिसल्यावर आपण त्याच्या पाठोपाठ जाणार कीं काय?"

"हो, हो, तर? त्याचें बिऱ्हाड कोठें आहे तें मी स्वतः पाहणार."

"पण तो तुम्हाला ओळखत असेल काय?"

"तें काय सांगावें? पण कदाचित ओळखीतहि असेल."

"तर मग त्याची वाट पहात रस्त्यावर उभें राहणें ठीक नाहीं. आपली कांहीं हरकत नसेल तर माझ्या दुकानांत आपण खुशाल बसावें. ह्मणजे सगळें ठीक जुळेल."

---

* कै. ग. स. लेले कृत मराठी-रघुवंशकाव्य. सर्ग १४, श्लोक ३४.

एखाद्या बुडल्या माणसाला कोणी हात द्यावा, किंवा घाबरलेल्याला धीर द्यावा तशासारखें त्यावेळीं त्याचें बोलणें मला वाटलें ! आणि त्याचें आमंत्रण मोठ्या आनंदानें स्वीकारून मी त्याच्या दुकानांत आंतल्या बाजूला, शिंप्याच्या दुकानाकडे टक लावून, हिरालाल केव्हां बाहेर पडतो त्याची वाट पहात बसलों.


तास झाला; दीड तास झाला. संध्याकाळचा समय होऊन सूर्यास्त होण्याची वेळ आली. रानांतून गाई व म्हशी परत येऊं लागल्या. तथापि शिंप्याच्या घरांतून कोणी बाहेर निघेना ! विडीवाला मधूनमधून आपलें दुकान सोडून दुसरीकडे कामाला जाई. त्याप्रमाणें अगदीं करकरीत तिनिसांजाचे सुमारास मला एकट्याला दुकानांत सोडून, दिवा वगैरे न लावितां, तो कोठें गेला होता. मला अगदीं चोरट्यासारखें झालें. दुकानाच्या आंतल्या बाजूला मी जेथें बसलों होतों तेथें ढेंकूण फार होते. त्यांनीं मला भंडावून सोडलें. त्यांचेच भाऊबंद डांस, मच्छर वगैरे प्राणी कानांपाशीं व डोळ्यापाशीं येऊन गुणगुणूं लागले ! सारांश, मी अगदीं त्रासून गेलों. इतक्या त्रासांत हाल भोगण्यापेक्षां बाहेर बसणें बरें असें ठरवून मी बाहेर येऊन बसलों. थोड्या वेळानें शिंप्याची मुलगी–जमनी कांहीं कामाकरितां आपल्या माडीवरच्या खिडकींत आली होती, तिनें मला पाहिलें व ती पुन्हां खिडकींतून दुसरीकडे गेली. तेव्हां मला कांहीं आशा वाटूं लागली.

तथापि आणखी अर्धातास असाच गेला. आठ वाजायला आले. या विडीवाल्यानें आपल्याला चांगलें चकविलें, आपण आतां मुकाट्यानें चालायला लागावें असासुद्धां विचार माझ्या मनांत आला. आणि अर्ध-वट रागानें व अर्धवट त्रासानें मी तें दुकान तसेंच टाकून उठणारहि होतों, इतक्यांत शिंप्याच्या माडीवरून हातांत एक मिणमिणीत जळ-



( पृष्ठ १७४ )

रानांतून गाई व म्हशी परत येऊं लागल्या.



गोपाळ मंदिर

( कै. बायजाबाई शिंदे यांनीं बांधलेल्या या मंदिरास द्वारकाधीशाचें मंदिर असेंहि म्हणतात. ) ( पृष्ठ १७५ )

णारी चिमणी घेऊन जमनी खालीं उतरली, आणि तिच्या पाठोपाठ एक बाई आली. माझी अगदीं पूर्ण निराशा झाली. जमनीचा त्या बाईनें निरोप घेतला त्यासरशी ती मुलगी पुन्हां माडीवर जाण्यास निघाली आणि तिनें जिन्याचें दार लावून घेतलें! ती बाई शिंप्याच्या घरांतून बाहेर पडली आणि तिनें तडक गोपाळमंदिराचा रस्ता धरला. हा प्रकार पहातांच मी दुकानांतून बॅग घेऊन टणकन् उडी मारली आणि रस्त्यांतून त्या बाईच्या पुढें जाऊन एका कंदिलापाशीं उभा राहिलों. कंदिलाचा उजेड त्या बाईच्या तोंडावर पडला आणि लगेच त्या बाईला मी ओळखली! कोण असेल बरें ती बाई? दुसरी कोण? मला अपरात्रीं बोलावून नेऊन फसविणारी मैनाबाई!

---

## प्रकरण सतरावें.

# पुढें.

**केव्हां सत्य वदे, वदे अनृतही, केव्हां वदे गोड ही।**
**केव्हां अप्रियही दयाळुहि असे केव्हां करी घातही॥**

—वामन.

"मैनाबाई? इकडे कोणीकडे तुम्हीं? मला ओळखलेंत काय?"

असे माझे शब्द ऐकून मैनाबाई एकदम चपापली आणि किंचित् मागें सरली! माझें बोलणें ऐकून काय उत्तर द्यावें याविषयीं ती विचारांत पडली असावी असें मला वाटलें; पण क्षणभरानें हंसल्यासारखें करून ती म्हणाली कीं, "हो, हो, आपण डॉक्टर साहेब आहांत! त्या दिवशीं आगगाडीच्या फाटकाजवळ आपल्याला पुष्कळ वेळ थांबावें लागलें असेल. पण आतां त्याबद्दल मला माफ करा."

मी—ठीक आहे. पण या वेळेला तुम्हीं इकडे कोणीकडे ! कोणी ओळखीबिळखीचें आहे कीं काय या बाजूला ?

तिनें 'होय' अशा अर्थाची मान हलविली, पण कांहीं बोलली नाहीं ! गोपाळदादांनीं तिचा भाऊ कोण तें आपल्याला ठाऊकसुद्धां नाहीं, असें सांगितलेलें माझ्या लक्ष्यांत होतें, तथापि मी तिला प्रश्न करून ती काय ह्मणते तें पहावें या हेतूनें विचारलें कीं, " आतां भाऊ कसा आहे ?"

" आतां पुष्कळ बरा आहे. आपण आला होतां त्याच्या दुसऱ्या दिवसांपासून त्याला बरें वाटूं लागलें, आणि आतांशा पुन्हां कामावर जाऊं लागला आहे."

ती माझ्याशीं बोलत होती, पण रांगड्या लोकांच्या चालीप्रमाणें तिनें आपल्या डोक्यावरचा पदर पुष्कळ खाली ओढला होता. त्यामुळें ती खरें बोलते कीं खोटें हें समजण्याला मला कांहींच साधन नव्हतें; तथापि दुधानें तोंड भाजलें होतें ह्मणून ताक फुंकून पिणेंच बरें असें मला वाटलें ! तिला जाण्याची फार उतावळी दिसली, कारण तिचें बोलणें संपतें न संपतें तों ती मला ह्मणाली " मला आतां फार उशीर झाला आहे, मी जातें."

तिच्या मागोमाग जाऊन ती कोठें जाते तें पहावें कीं काय असें एकदां वाटलें. पण हिरालालच्या शोधासाठीं आपण आलों तें काम अर्धवट टाकून हिच्यामागें जाण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें मनाशीं ठरवून मी तिला 'हूं' असें ह्मटलें. शिंप्याच्या घरांतून ती अशावेळीं बाहेर पडली तेंव्हां तिच्यासंबंधानें चौकशी करणें जरूर होतें, पण तिच्या पाठोपाठ जाऊन हातची शिकार घालवावी हें मला इष्ट वाटलें नाहीं.

तथापि आपल्याला फसविल्याबद्दल एकदां टोमणा तिला मारावा अशा हेतूनें मी तिला विचारलें "पुन्हां कधीं बोलवावयाला येण्याचा विचार आहे ?"

माझा प्रश्न ऐकून तिला वाईट वाटलेंसें दिसलें, कारण माझ्या प्रश्नाचें उत्तर देतांना करुण स्वरानें मला ती ह्मणाली, "डॉक्टरसाहेब, मीं काय सांगूं ? देवाला डोळे आहेत. ईश्वरानें करावें आणि आपल्याला मनापासून बोलवावें अशी माझी इच्छा आहे. पहावें केव्हां योग येतो तो !" इतकें बोलून ती दुःखाचा एक सुस्कारा टाकून माझ्या समोरून चालती झाली. तिच्या बोलण्याचा हेतु मला कळेना ! 'ईश्वरानें करावें आणि मी आपल्याला मनापासून बोलवावें' असें ती ह्मणाली त्याचा अर्थ काय ? 'देवाला डोळे आहेत' ह्मणजे काय ? पण नुसत्या विचारांचा तेथें कांहीं उपयोग नव्हता. ह्मणून ती निघून गेल्यावर मी खिशांतून घड्याळ काढून पाहिलें व नऊ वाजायला आले होते ह्मणून दवाखान्याच्या रस्त्याला लागलों, व दवाखान्यांत माझी बॅग ठेवून एक टांगा दिसला त्यांत बसून घरीं चालता झालों.

संध्याकाळपासून जवळ जवळ चार तास माझे अगदीं फुकट गेले होते. हिरालाल खरोखर शिंप्याच्या घरीं आला होता कीं विडीवाल्यानें एक थाप मारली कीं जमनीनें अगर तिच्या आईनें मला पाहून मागच्या रस्त्यानें हिरालालास वाटेला लावलें तें मला कळेना. जमनी व विडी-वाला यांना मी आपलेसे करून घेतले होते खरे पण 'अज्ञातकुलशील' माणसांच्या विषयीं किती खात्री समजावी ? मैनाबाईचा व शिंप्याच्या मंडळींचा काय लागाबांधा असावा तें माझ्या ध्यानांत येईना. आपण हिरा-लालाला पहावयाला आलों तो तर कोठें आढळलाच नाहीं आणि त्याच्या ऐवजीं मैनाबाई घरांतून बाहेर पडते यांतलें गूढ काय ? त्याचा निर्णय होईना. हिरालाल जर खरोखर आला असला व मी त्याच्या शोधार्थ

समोरच्या दुकानांत त्याची वाट पहात आहे हें त्याला कळलें असलें, तर तो महाधूर्त कोल्हा, शिंप्याच्या पत्त्यावर आपलीं पत्रें न मागवितां दुसरी कांहींतरी व्यवस्था करील आणि पिंजारवाडीच्या गल्लींत सध्यां पाऊलहि घालणार नाहीं. मग काय करावें ? ठकाला महाठक कसें व्हावें ? असे विचार रस्त्यानें जातांजातां माझ्या मनांत चालले होते. आपल्या हातून आज मोठा हलगर्जीपणा झाला. दुसरा एखादा जोडीदार जर आपल्या बरोबर असता तर त्याचा किती उपयोग झाला असता ! एक-जण हिरालालाच्या पाळतीवर राहिला असता व दुसरा मैनाबाईच्या मागोमाग गेला असता. तो नारायणराव सात्त्विक दंडधारी, त्याला मदतीला घेतला असता, तर तो कानपुरला जाऊन बसला आहे ! तर आतां दुसऱ्या कोणाला मदतीला घ्यावा ? हिरालालाच्या पाळतीवर यापुढें आपण बसलों तर तें अगदीं गैरशिस्त. विडीवाला आपलें दुकान बंद करून जाणार, पिंजारवाडींत रात्रीच्या वेळीं भर रस्त्यावर पुष्कळ वेळ तिष्ठत उभे रहाणें फारच अप्रशस्त व घरचीं माणसें—आई व गोपाळदादा हीं दोघेंहि यात्रेनिमित्त परगांवीं निघून गेल्यामुळें रात्रीच्या वेळीं बायका-मुलांच्या भरंवशावर घरदार टाकून आपण इकडे तिकडे भटकलों व नारायणजी ज्योतिषांच्यासारखा प्रसंग गुदरला तर आपली सर्वांच्या कडून शोभा होऊन शिवाय 'तेल गेलें, तूप गेलें, हातीं धुपाटणें आलें' अशी अवस्था होणार, तेव्हां हिरालालाचा नाद सोडून आपण घरीं चाललों आहोंत तेंच ठीक आहे असें मी ठरविलें.

दुसऱ्या दिवशीं नारायणजी ज्योतिषी यांना मी सर्व हकीकत जेव्हां कळविली तेव्हां त्यांनाहि माझी कल्पना पटली, आणि एखादा जोडीदार हुडकून मग पुन्हां कार्याला आरंभ करावा असें ठरलें.

*       *       *

महाराष्ट्रांत कृष्णानदीच्या कांठीं एक खेडेगांव आहे. तेथें श्रीगणपतीचें जागृतस्थान असून, वस्ती थोडी असली तरी आसपासच्या ५–५० मैलांत त्या गांवाची प्रसिद्धी आहे. तेथें गोविंदराव नांवाचे एक गृहस्थ रहात असत. घरचीं शेतें व इनाम जमिनी कांहीं असत. पण शेतांकडे स्वतः पहाण्यासारखी लहानपणापासून स्थिति नसल्यानें तीं कुळांकडे वहिवाटीला दिलीं असून कुळें जी रकम वर्षाअखेरीस देतील तेवढेंच त्यांचें खरें उत्पन्न होतें, ह्मणून घरची स्थिति गरीबीची होती. शेतांचें उत्पन्न संसारास पुरेना आणि बायको व लहान लहान चार मुलें घरांत. तेव्हां निरुपायानें गोपिकाकाकूंच्या अंगावर घरची सर्व जबाबदारी टाकून, गोविंदरावांना कांहीं वर्षें, नोकरीसाठीं एकटेंच हिंडावें लागत असे. त्यांच्या मुलाचा मुलगा विष्णू. हा लहानपणापासूनच उनाड असे, आणि नेहमीं स्वच्छंदानें वर्तूं दिल्यामुळें त्यास वाईट नाद लागले होते. त्यानें नेहमीं हट्ट करावे. नसत्या कलागती लावाव्या, व आईबाप सांगत तें कधींहि ऐकूं नये. त्याला कांहीं कळूं लागलें तेव्हांपासूनच तो नेहमीं घराबाहेर राहूं लागला. त्यानें सकाळीं उठून जें बाहेर पडावें तें दुपारीं जेवायचे वेळीं घरीं तोंड दाखवावें, व पुन्हां हातांवर पाणी पडलें कीं छूः! रस्तोरस्तीं आपल्या सारख्या उनाड पोरांबरोबर खेळत असावें. जेव्हां विष्णू अंमळ जाणत्या वयाचा झाला तेव्हां घरच्या मंडळींनीं त्याला शाळेंत घालून पाहिलें. पण त्याचें चित्त अभ्यासांत रमेना. मुलास घरचें बालबोध वळण लागावें व त्यानें अभ्यास करावा म्हणून आईबापांनीं पुष्कळ उपाय करून पाहिले. त्यास जवळ घेऊन कित्येक वेळां समजुतीच्या गोष्टी सांगितल्या, कित्येक वेळां अभ्यास न केल्याबद्दल धमकी दिली, पण कांहीं केल्यानें तो आपला उनाडपणा टाकीना. मार देऊनहि तो वठणीस येईना. शेवटीं

बाप अगदीं त्रासून गेला, व 'कारट्याच्या कपाळीं काय असेल तें होईल' असें ह्मणून त्यानें त्याची गोष्ट सोडून दिली. तरी आपल्या मुलाची अशी द्वाड वर्तणूक पाहून त्यास इतका त्रास होई कीं, त्यामुळें त्याच्या जिवास समाधान नाहींसें झालें व होतां होतां त्यास मोठें दुखणें होऊन तेणेंकरून तो मरण पावला.

नवऱ्याच्या मागें मुलाच्यानें उद्योग होणार नाहीं असें जाणून विष्णूच्या आईनें शेतें व चीजवस्त विकून पैसा केला. इनामजमिनी कुळांकडे ठेविल्या व मुलाला घेऊन एका मोठ्या गावांत जाऊन राहिली. पण तेथें जाऊन महिना पंधरा दिवस होतात न होतात तों महामारीच्या उपद्रवानें एके दिवशीं ती वारली.

आई मरतांच विष्णूला कोणाचाहि धाक नाहींसा झाला. आतां अगदीं स्वतंत्र झाल्यानें तो आपल्या सोबत्यांबरोबर हवे तसे छंद करूं लागला. याप्रमाणें चालत असतां त्याच्या वयास वीस वर्षें लोटलीं. पण इतक्या काळांत त्याच्या अंगांत कोणतेंहि कसब दृष्टीस पडलें नाहीं, व आपली पुढें अवस्था काय होईल ही गोष्ट तर त्याच्या मनांत कधींच आली नाहीं. असें असतां एके दिवशीं विष्णू पोरांबरोबर रस्त्यावर नेहमींप्रमाणें खेळत होता, तों एक फौजेतला अंमलदार त्या रस्त्यानें चालला असतां विष्णूस पाहून थांबला, व त्याकडे रेखून बघूं लागला.

युरोपखंडांतील महायुद्ध सुरू झालें होतें. हिंदुस्थानांतून जगाच्या निरनिराळ्या प्रदेशांत शिपाई—रिक्रुट्स्—पाठविण्याचा धडाका चालला होता. साधारण धट्टाकट्टा माणूस दिसला तर त्याला युक्तिप्रयुक्तीनें रणांगणावर पाठविण्याची धामधूम सुरू होती.

तो फौजेतला अंमलदार सैन्य भरती करण्याच्या खात्यांतला असून आपल्या कामांत मोठा निष्णात व प्रख्यात होता. तेव्हां विष्णूस पाहून हा मुलगा आपल्या कामाला फार चांगला उपयोगी पडेल असें जाणून त्यानें विष्णूला पहातांच तो कोण, कोठचा, वगैरे सगळा बारीकपणें शोध केला. मग सर्व हकीगत समजतांच तो त्याजवळ गेला, व त्याला अंमळ एकीकडे नेऊन त्यानें लढाईवर जाण्याची लालूच दाखविली. विष्णूनें संतोषानें लढाईवर जाण्याचें पतकरलें. लढाईवर असतांना हिंदुस्थानच्या बाहेर गेल्यावर इराण, अरबस्थान, सिरिया व मिश्र ऊर्फ इजिप्त देश हे प्रदेश त्यानें पाहिले व या सर्व देशांत जीं जीं नामांकित शहरें आहेत तीं सर्व पाहिलीं. शेवटीं त्याला हिंडण्याचा त्रास आला. मनुष्याचा स्वभाव असा आहे कीं, तो कितीही दूर देशास जावो, तरी ज्या ठिकाणीं त्याचें बालपण गेलेलें असतें व जेथें त्याचे इष्टमित्र असतात, त्या ठिकाणची आठवण त्याची कधींहि बुजत नाहीं. असेंच त्यालाही त्या वेळेस झालें. तथापि हिंदुस्थानांत येण्याची रजा मिळेना. तेव्हां अनेक लटपटी करून त्यानें आपल्या जागेचा राजीनामा परदेशांतच दिला. सरकारी पास व रेशन नसल्यामुळें व जवळची रक्कम सर्व संपत आल्यामुळें हिंदुस्थानांत येतांना त्याजवर मोठेमोठे प्रसंग येऊन गुदरले, व अगदीं थकून जाऊन दिवसही पुष्कळच लागले. तो मुंबईच्या बंदरांत उतरल्यावर प्रथमतः आपलें सामान सुरक्षित ठेवण्यास जागा कोणती पहावी याचा त्याला विचार पडला. परंतु सुदैवानें त्याची व (आतां कैलासवासी) खेमराज श्रीकृष्णदास, श्रीव्यंकटेश्वर छापखान्याचे मालक—यांची गांठ पडून त्यांनीं त्याला आपल्या पदरीं बाळगला. त्या शेटजींचा 'व्यंकटेश भवन' नांवाचा बंगला उज्जयिनीस नदीकांठीं आहे त्याच्या व्यवस्थेनिमित्त त्यांनीं विष्णूला

उज्जयिनीस पाठविलें. कर्मधर्मसंयोगानें नारायणजी ज्योतिषांची व त्याची ओळख होऊन कधीं कधीं भेटी होऊं लागल्या. मला एखाद्या जोडीदाराची जरूरी आहे असें त्यांना सांगितल्यावर त्यांनीं मला विष्णूचें नांव सुचविलें. पुढें विष्णूला पाहिल्यावर व त्याची हकीगत ऐकल्यावर तो आपला साथीदार म्हणून घेण्यास मी कबूल झालों. ‘ नंगा खुदासे जोरावर ’ अशी एक म्हण आहे, त्याप्रमाणें विष्णूला कांहीं आगापिछा नसल्यानें तो नंगाच होता. तेव्हां धाडसाच्या कामांत त्याचा पाय पहिला होता हें स्वाभाविकच होतें. गुरुजीनीं व मी त्याला मनकामनेश्वराची सबंध गोष्ट सांगतांच तोही मोठ्या आनंदानें आम्हांला येऊन मिळाला. वासुदेव, केशवभय्या व नाना या आमच्या घरांतल्या मुलांचा व विष्णूचा पुढें चांगला स्नेह झाला.

नंतर आतां पुढें आरंभ कसा करावयाचा या संबंधानें आमचा बराच वादविवाद झाला. त्यांत असें ठरलें कीं शत्रू आपल्या पाळतीवर ठेवून या पुढें कामाला लागणें अत्यंत धोक्याचें असल्यानें सगळ्या गोष्टी एकीकडे ठेवून आधीं हिरालालाचा तपास लावण्याच्या उद्योगास लागावयाचें आणि त्याचा पक्का शोध लागेपर्यंत त्याचा पिच्छा सोडावयाचा नाहीं.

एके दिवशीं विष्णूला घेऊन, मीं मनकामनेश्वराच्या स्थानाकडे गेलों. तो साधु व त्याची बायको अद्याप तीर्थयात्रेला गेलीं नव्हतीं. बाईची प्रकृति किंचित् अस्वस्थ झाली होती ह्मणून त्यांचा मुक्काम लांबला होता. हिरालालाकडून कांहीं निरोप किंवा चिठ्ठीचपाटी आलेली नव्हती. विष्णूची व त्या स्त्रीपुरुषांची ओळखदेख झाल्यावर, विष्णूनें त्यांच्यापाशीं—आतां आमच्या हक्काच्या जागेंत—रहावें असें ठरलें. विष्णूसारखा सशक्त व धीट तरुण मनुष्य आपल्या सोबतीला आला याबद्दल

त्यांनाहीं बरें वाटलें. हिरालालाच्या पत्त्यासंबंधानें सुगावा लागावा ह्मणून आम्हीं हिरालालाला पूर्वीच्या पत्त्यावर पत्र पाठविण्याचें ठरविलें आणि 'घर आपण विकत घेणार असल्यास कोणत्या तारखेस व किती किंमतीस तें पत्रदर्शनीं जरूर कळवावें' असें साधूच्या हातांनीं लिहवून तें पत्र मीं आपल्या हातानें पोष्टांत टाकलें. त्या पत्राचें उत्तर आल्यास हिरालालाचा पत्ता तरी समजेल किंवा तो तरी दृष्टीस पडेल, असा आमचा दुहेरी हेतु होता.

विष्णूचें बिऱ्हाड या प्रमाणें मनकामनेश्वराच्या जवळच्या घरांत ठेविल्यामुळें नेहमीं मी तेथें जात असे. साधू व त्याची बायको अद्याप पर्यंत तेथून निघालीं नव्हतीं, तथापि विष्णू बहुतकरून रोज सबंध घरभर व आवारांतही हिंडत असल्यामुळें त्यानें प्रत्येक कान्याकोपऱ्याची नीट पहाणी केली होती. एके दिवशीं त्यानें मला असें सांगितलें कीं घरांत द्रव्य आहे ही गोष्ट अगदीं खरी असून जिना चढून माडीवर गेल्यावर, डाव्या हातांला—पश्चिम दिशेला—जी खोली आहे. तिच्या पटावांत कांहीं तरी द्रव्य असावें! अमुक एक खूण आहे म्हणून मला असें वाटतें असें त्याला सांगतां येईना, पण 'आहे खास' असें म्हणून तो वारंवार अस्तन्या मात्र चढवी!

परंतु आम्हीं पूर्ण सावधगिरीनें वागत होतो. तीं नवराबायको तेथून गेल्यावर आम्हीं आमच्या कामाला सुरवात करणार होतों. पण आपण होऊन त्यांना 'तुम्हीं केव्हां जातां?' असें विचारावयाचें नाहीं असें ठरलें होतें. हिरालालाला पत्र पाठविल्याचें उत्तरही अद्याप आलें नव्हतें.

मनकानेश्वराच्या स्थानापासून भैरवगड फारसा दूर नाहीं. भैरवगडास गेलों म्हणजे तेथें कन्हय्यालाल व त्याची बायको यांनां आम्हीं कधींकधीं भेटत असूं.

आम्हीं लिहिल्यापासून सुमारें दहा दिवसांनीं हिरालालाचें उत्तर आलें. परंतु तें मोघमच होतें. 'अद्यापपर्यंत कांहीं निश्चित ठरविलें नाहीं. परंतु लवकरच कळवितों' असा मजकूर असून त्यानें आपला पत्ता 'लछमन मिस्त्री याच्या घराजवळ, वहादर गंज, उज्जेन' असा दिला होता.

आतां या पत्रामुळें त्याचा पत्ता नेमका आम्हाला कळला. विष्णूच्या मनांत हिरालालाच्या शोधासाठीं बहादरगंजपर्यंत जाऊन यायचें होतें परंतु हिरालालाच्या मागें धांवण्यापेक्षां त्याचा इतर रीतीनें कांहीं सुगावा लागतो कीं काय हें पहिल्यानें पहाणें बरें असें एकंदरींत ठरलें.

त्या सुशील दंपत्याच्या सहवासानें विष्णूचें कल्याण होत चाललें. 'पुष्पसंगें मातीस वास लागे' असें म्हणतात त्याप्रमाणें त्यांच्या उपदेशानें विष्णूचें चित्त दिवसानुदिवस शुद्ध होऊं लागलें. विधेकडे त्याची प्रवृत्ति होऊं लागली. तो पहांटे उठून, उषःपान करून, आपल्या गुरुकडून पाठ घेई, नंतर मुखमार्जनादि क्रिया उरकून, शिप्रेवर स्नानाला जाई; तेथें संध्यावंदनादि झाल्यावर, आश्रमांत येऊन व्यायाम करून सूर्याला नमस्कार घाली. नंतर दूध प्याल्यावर आपल्या कामाला जाई. सायंकाळीं परत आल्यावर यथाविधी सर्व कृत्यें आटोपून नंतर विश्रांति घेई. त्याच्या सान्निध्यानें तीं दोन्हीं म्हातारीं स्त्रीपुरुषें आनंदित होत असत. हळुहळू विष्णू त्यांच्या पूर्ण विश्वासास पात्र झाला. त्या नंतर आम्हीं त्यांस आम्हीं चालविलेल्या खटाटोपाची साग्र हकीगत सांगितली. ती ऐकून त्यांस आमचें कौतुक वाटलें. असो.

एके दिवशीं आम्हीं भैरवगडावर गेलों होतों. कन्हय्यालाल सिद्धवटावर भांग घोटीत बसला होता. त्याची आमची दृष्टादृष्ट झाल्यावर

नमस्कार चमत्कार झाले. मग इकडच्या तिकडच्या गोष्टी झाल्यावर मीं त्याला हिरालाल पुन्हां कधीं आला होता कीं काय असा प्रश्न केला.

**कन्हय्या०:**—होय. हिरालाल आला त्याला सुमारें १५–२० दिवस झाले. तास दोन तास बसला होता. आणखी कांहीं कागद विकावयाचे असतील तर ते दे असें म्हणत होता, परंतु नव्हतेच मजजवळ, मग देऊं कोठून ? त्याला मीं साफ साफ ह्मणालों कीं एकदां मी फसलो तो फसलों, पण तुला आतां म्हणून कांहीं विकत द्यायचें नाहीं. त्यावर तो मला आणखी फसवूं पहात होता, व विकत घेतलेल्या कागदाची कांहींच किंमत नाहीं असें भासवीत होता. पण जेव्हां मी त्याला तुम्हीं मला भेटल्याची गोष्ट सांगितली तेव्हां मग स्वारी जरा नरमली.

**मी:**—मग काय म्हणाला तो ?

**कन्हय्या:**—तो ह्मणाला कीं आहेत तुझे डॉक्टरसाहेब मला ठाऊक. महा बेवकूफ आहेत ते.

**मी:**—कन्हय्यालाल, मीं बेवकूफ असो अगर नसो निदान येवढया गोष्टीबद्दल तरी मी बेवकूफ नाहीं अशी माझी खात्री आहे. हिरालालानें तुह्मांला कागदाच्या बाबतींत खरोखर फसविलें आहे.

**कन्हय्या:**—मग खरोखरच का त्या कागदामध्यें आमचें द्रव्य कोठें पुरलें आहे तें लिहिलेलें असेल ?

**मी:**—हो, बहुतकरून असेल. मीं तो कागद प्रत्यक्ष पाहिला नाहीं तेव्हां त्यासंबंधीं जास्त काय सांगूं ?

**कन्हय्या:**—तो मनुष्य मोठा द्वाड दिसतो. आपल्याला तो नुसता बेवकूफ ह्मणून थांबला नाहीं. तुम्हींच मला त्या कागदासंबंधानें कांहीं

खोट्यानाट्या गप्पा सांगून फसवीत आहांत असा त्याच्या ह्मणण्याचा रोख होता.

मीं कन्हयालालाचें बोलणें हंसण्यावारी नेऊन म्हणालों 'कोण फसवितो आणि कोण नाहीं हें आतांच कसें समजेल ? तुम्हीं मात्र या पुढें त्याच्याशीं कांहीं व्यवहार करूं नका.'

**कन्हय्या:**--छे हो नांव सोडा त्याचें आतां.

---

### प्रकरण अठरावें.

## मंगलेश्वराचे रस्त्यावर !

**धरणीगर्भसंभूतं मंगलं प्रणमाम्यहम् ॥ +**


—मंगलस्तोत्रम् ।

भरतखंडाचे इतिहासांत माळव्याचें स्थान बरेंच महत्त्वाचें असून त्याची प्रसिद्धी फार प्राचीन काळापासून आहे. प्राचीन संस्कृत ग्रंथांतून या मालवदेशाविषयीं ठिकठिकाणीं महत्वसूचक उल्लेख आढळतात. कांहीं काळ पावेतों माळव्याची प्राचीन राजधानी उज्जयिनी ही तर भारत साम्राज्याची राजधानी समजली जात असे; व कित्येक वेळां ही मालवीय राजधानी हातीं आल्यावर येथील राजांनीं आपल्या नांवाचा शक चालविण्याचाहि प्रयत्न केला आहे. यावरून भरतखंडाचे इतिहासांत माळव्याचें महत्व चांगलें लक्षांत येईल.

या माळव्यांत, उज्जयिनी शहरापासून उत्तरेस तीन मैलांवर मंगळाचें स्थान आहे. त्या ठिकाणीं मंगळाचा जन्म झाला असें मानण्यांत येतें. तें ठिकाण क्षिप्रानदीच्या काठांवर अरण्यांत आहे. ज्ञानेश्वर महाराज


---

+ पृथ्वीच्या पोटांतून निघालेला कुमार मंगल यास मी नमस्कार करितों.



सिद्धवट.

( येथील क्षिप्रा नदीच्या घाटासह ).



उज्जयिनीच्या रानांत रामकृष्णांनीं गुरूंच्या गाई चरावयास न्याव्या.

तीर्थयात्रा करीत उज्जयिनीस आले. वीरमंगल नांवाचा प्रख्यात राजाश्रित ज्योतिषी सात वर्षे दुग्धप्राशन करून त्यांच्या आगमनाची वाट पहात राहिला होता त्याच्याच घरीं ते राहिले. तेव्हां त्यानें त्यांचा सत्कार करून त्यांच्या चरणीं गुरुभक्तीनें देह समर्पिला. महाराजानीं स्वहस्तानें त्याला समाधि दिली व त्यावर शिवलिंगाची स्थापना केली. तें स्थान मंगळेश्वर होय, अशी एक मनोरंजक आख्यायिकाहि प्रसिद्ध आहे. ह्या स्थानापासून सांदीपनी ऋषींचा आश्रम जवळच आहे. येथील वनश्री फार सुंदर आहे. **श्रीकृष्ण** व बलराम यांचे उपनयनसंस्कार झाल्यावर, ते दोघेजण वसुदेवाची आज्ञा घेऊन, गुरुगृहीं वास करण्यासाठीं उज्जयिनीस सांदीपनी काश्य नांवाच्या प्रसिद्ध गुरूजवळ गेले. तेथें यथाविधी आपलें गोत्र गुरूस निवेदन करून त्याचें शिष्यत्व संपादन केल्यावर गुरुगृहीं वेदविद्येचा व धनुर्विद्येचा त्यांनीं अभ्यास केला. त्यांची विलक्षण बुद्धिमत्ता पाहून सांदीपनी आश्चर्यचकित झाले व हे कोणी देवांशधारी पुरुष आहेत असें वाटून त्यांनीं त्यांस आदरानें आपली सर्व विद्या दिली. केवळ चौसष्ठ दिवसांतच त्यांनीं सर्व वेदांचे ग्रहण केलें आणि नंतर संग्रहसहित धनुर्वेद पठण केला. गुरुगृहीं असतां इतर सर्व शिष्याप्रमाणें **रामकृष्णांनीं** गुरुची सेवा करावी; त्याजकरितां रानांतून लाकडें, समिधा, कुश इत्यादि आणून द्यावे व सर्व प्रकारचीं शारीरिक मेहेनतीचीं गुरुचीं कामें आनंदानें करावीं. गाईचें दूध काढावें, गाई चरावयास न्याव्या, अशा प्रकाराची त्यांची निष्ठा व मेहनत पाहून गुरु त्यांजवर प्रसन्न झाले. श्रीरामकृष्णांच्या संचारानें पुनीत झालेल्या उज्जयिनी मधील जागा पाहून मनाला आनंद होतो. मंगलेश्वराचें दर्शन घेऊन एके दिवशीं सायंकाळीं मीं घरीं परत येत असतां वाटेंत सांदीपनी ऋषीचा आश्रम पहावयास गेलों. या प्रदेशास '**अंकपात**'

असें म्हणतात. श्रीकृष्ण व बलराम ज्या ठिकाणीं रहात असत त्या जागीं साध्वी अहिल्याबाईनें कृष्णमंदिर बांधलेलें आहे. त्या मंदिरांत स्वामी रामतीर्थ यांचे शिष्य एक साधुपुरुष उतरलेले होते. त्यांच्या भोंवतीं आसपासच्या ठिकाणचे पांचसहा भाविक लोक बसले होते. व साधूंचें त्यांस उद्देशून कांहीं प्रवचन चालू होतें. तेव्हां ते काय म्हणतात तें ऐकून मग घरीं जावें अशा विचारानें मीं त्यांजपाशीं जाऊन बसलों. संध्याकाळ झाली होती. सूर्यनारायण अस्ताला जाण्याच्या बेतांत होता, कृष्णपक्षाचे दिवस होते, शहरापासून आश्रम बराच दूर अरण्यांत होता, तथापि त्या साधु पुरुषाच्या वाणींत अशी कांहीं गोडी होती कीं मला त्यांचें प्रवचन संपल्याशिवाय उठावेसें वाटेना. **'यशःप्राप्तीची गुरुकिल्ली'** या विषयावर साधु महाराज बोलत होते. **'उद्योग'** हें यशःप्राप्तीचें **पहिलें साधन** होय.

**उत्तमाहूनि उत्तमतर । होत जावें निरंतर ।**
**पुढें जावें सुदूर । आपुल्याच ॥ १ ॥**

या तत्त्वानुसार वागावें. **दुसरें साधन स्वार्थत्याग**' हें होय. दान करणें हाच मिळविण्याचा मार्ग होय. 'दुणावे की देतां, किमपि न सरे लेशहि कदा' हें लक्ष्यांत असावें. **तिसरें साधन 'अहंपणाचा विसर**' हें आहे.

**बंधमुक्त मीं होईन केव्हां ? जेव्हां होई 'मीपण' नष्ट ॥**

'प्रेम' हें उत्कर्षाचें चवथें साधन आहे. प्रेमानें अष्टमहासिद्धीचा स्वामी अगदीं आपल्या हातांतला होतो. **'प्रेमसूत्रदोरी । नेतो तिकडे जातो हरी ॥**' हें तुकारामबोवांचें वचन सुप्रसिद्धच आहे.

'उल्हास' अगर 'प्रसन्नता' हें उत्कर्षाचें पांचवें साधन आहे. 'निर्भयता' हें सहावें साधन व 'स्वावलंबन' हें सातवें साधन होय.

संपूर्ण यशःप्राप्तीची गुरुकिल्ली ह्मणजे 'स्वावलंबन'—'स्वातंत्र्य'—हें होय. स्वतःस जाणा. आपण कोण हें ओळखा. 'आत्मानं विजानीयात्' असें उपनिषदांत सांगितलेलें आहे, तें ध्यानांत धरा ह्मणजे तुह्मांला अशक्य किंवा असाध्य असें कांहींच उरणार नाहीं. दोघे भाऊ होते व ते दोघेहि सारखेच श्रीमंत होते. परंतु कांहीं वर्षांनीं एक अगदीं भिकेस लागला, व दुसऱ्याची संपत्ति दसपट वाढली. लक्षाधीश झालेल्या भावाला 'हें असें कसें?' ह्मणून विचारतां तो म्हणाला, 'माझा भाऊ नेहमीं, 'जा, जा' असें ह्मणत असे व मी नेहमीं, 'या, या' असें ह्मणत असे, याचा अर्थ असा, कीं, तो आपल्या नोकरांस, 'जा, जा, अमूक कर, तमूक कर,' ह्मणून हुकूम सोडी व आपण स्वतां परांच्या बिछान्यावर लोळत पडे. आणि दुसरा नेहमीं उद्योगी असून स्वतः काम करी आणि, 'या, या, हें काम करूं,' म्हणून तो आपल्या नोकरांस मदतीस बोलावीत असे. एक स्वतःच्या कर्तबगारीवर अवलंबून होता. ह्मणून त्याचे सेवक व संपत्ति वाढली. दुसरा आपल्या नोकरांस, 'जा, जा' ह्मणून सांगे; तदनुसार त्याचे नोकर चाकर गेले आणि त्याच्या, 'जा, जा,' या प्रमाणें त्याची संपत्तीहि पण गेली आणि तो अकिंचन बनला. उत्कर्षाचें **आठवें साधन 'पावित्र्य अथवा सदाचार'** हें होय" असें व अशाच प्रकारचें 'यशःप्राप्तीची गुरुकिल्ली' या अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर साधूमहाराजांचें विवेचन चालूं असतां दोन तास कसे निघून गेले ते कळले देखील नाहींत. विवेचन संपल्यावर मीं घड्याळ काढून पहातो तों साडे आठ वाजले होते. तेव्हां गडबडीनें त्या साधुपुरुषाला अभिवादन करून मीं शहराकडे जाण्याला निघालो. मी त्या दिवशीं एकटाच होतों. विष्णु हिरालालावर पाळत

ठेवण्यासाठीं बहादरगंजाकडे गेला होता. वारंवार एकमेकांस भेटल्यानें आपल्या शत्रूंना विनाकारण संशय येईल, त्या साठीं हिरालालाच्या पाळतीवर राहून त्याच्याबद्दल जी कांहीं बातमी मिळेल ती होईल तितकी पत्रद्वारा कळवावी ह्मणजे जाण्यायेण्याचे श्रम व वेळ वांचून त्या भामट्यावरचा पहाराहि ढिला होणारा नाहीं, असें विष्णूनें ठरविलें होतें. त्याप्रमाणें तीन दिवस होऊन गेले होते. विष्णूकडून कांहीं समाचार कळलेला नव्हता, तेव्हां सांदीपनींच्या आश्रमांतून घराकडे येतांना त्याच्या संबंधानें माझे विचार चालू होते.

कृष्णपक्षाचे दिवस होते म्हणून वर सांगितलेंच आहे. रात्र पडत चालली होती. रस्त्यावर माझ्याखेरीज कोणी चिटपाखरूं देखील दिसत नव्हतें, आणि मीं निःशंकपणें व निर्भयतेनें अंधेरांतून रस्त्यावरून चाललों होतों. आश्रमापासून सुमारें पावमैलावर 'रामानुज कोट' म्हणून एक भव्य व जुनाट मंदिर व त्याचें आवार आहे, तेथपर्यंत मीं आलो. शहराचा कोट आतां अगदीं जवळ आला होता. बऱ्याच लांब अंतरांवर, शहराच्या बाजूला, एखादा दुसरा दिवा चमकल्या सारखा मधूनमधून दिसत होता. सांदीपनी ऋषींचा आश्रम व उज्जयिनी शहर यांच्या जवळजवळ मध्यावर मीं आलों होतों. इतक्यांत अंधेरांत माझ्या मागे कोणाचीं तरी पावलें वाजत आहेत असा मला भास झाला, आणि मीं आतां मागें वळून पहाणार, तोंच कोणी तरी माझी मानगुटी अशी गच्च धरली कीं मला आपलें डोकें बिलकुल फिरवितांच येईना. दुसरा एकजण आला, आणि त्यानें माझे दोन्ही हात अगदीं गच्च धरून ठेवले व तिसऱ्यानें माझे सर्व खिसे चाचपून माझ्या खिशांत जें जें ह्मणून सांपडलें तें तें सर्व काढून घेतलें. स्टेथॉस्कोप, थर्मामेटर, किल्ल्या, घड्याळ, नोटबुक, चाकू, व्हिजिटिंग कार्ड्स,

हातरुमाल, पेनसिल व पैशांचें पाकीट, काठी एकूण एक वस्तु–गेल्या. अशा प्रकारें माझी झडती घेतल्यावर, मला त्या चोरांनीं सोडून दिलें. हें सगळें वर्णन करण्याला जितका वेळ लागला तितकाहि वेळ बहुधा त्या चोरट्यांना लागला नसेल. मीं मोकळा होतांच थोडी आरडा-ओरड केली, पण तिकडे लक्ष न देतां, ते चोर अंधेरांत कोणीकडे अदृश्य झाले. मला बिलकुल इजा न करितां, माझें सर्व सामान घेऊन ते चोर पळाले याचें मला मोठें आश्चर्य वाटलें. चोरांची रीती अशी नसते. ते असे फुकटाफुकटी कोणाला लुबाडावयाचे नाहींत. अंधेरांत सांपडलेल्या वाटसराला पकडून त्याचें सर्वस्व हिरावून घेऊन व उलट त्यास थोडीबहुत हाणमार किंवा जखम करून अथवा प्रसंग विशेषीं त्याचा प्राण घेऊन जावें अशी त्यांची पद्धति असते. तेव्हां मीं असा सुदैवी कसा याचें मला क्षणमात्र आश्चर्यच वाटलें, तथापि आश्चर्यापेक्षां भीतीचा पगडा मनांवर अधिक बसून मीं रामरक्षेचा मंत्र मनांत ह्मणत फार झपाट्यानें शहराकडे जाण्यास निघालों. चोर पुन्हां येऊन एखादी श्रीमुखांत देतात कीं काय अशी क्षणोक्षणी भीती वाटत होती. तथापि ईश्वरकृपेनें तसा कांहीं प्रसंग न येतां मीं शहराच्या हद्दींत आलों. दुर्जनपुऱ्याच्या कोंपऱ्यावर वाण्याचें एक भिकार दुकान उघडें दिसत होतें. डाळ, तांदूळ, आटा, गूळ, मीठ, काड्याच्या पेट्या, वगैरे सटरफटर सामान थोडें थोडें दुकानांत मांडलें असून वाणीदादा अगदीं मंद जळणाऱ्या दिव्यापाशीं बसून जमाखर्च लिहीत बसले होते. तेथपर्यंत आल्यावर थोडी विश्रांति घेण्यासाठीं त्याच्या दुकानांवर थांबलों. जवळ जवळ पळत आल्यामुळें माझा श्वासोच्छ्वास जोरानें
ए सुरू होता. छाती धडधडत होती. माझी चाहूल ऐकतांच वाणीदादानें
व मजकडे पाहिलें आणि माझी विचारपूस केली. मीं त्याला सर्व हकीगत

सांगितल्यावर तो मला ह्मणाला, कीं, 'डॉक्टरसाहेब, अपरात्रीं अलीकडे अंकपाताकडे जाणें मोठें धोक्याचें झालें आहे. महागाई तर दिवसानुदिवस अशी वाढत चालली आहे कीं विचारूं नका आणि परगांवाहून येणाऱ्या धान्याच्या गाड्या व इतर सामान यांची भररस्त्यावर किंवा शहराच्या जवळपास जरी लूट झाली तरी त्यांची कोणी नीट वास्तपूस्तहि करीत नाहीं अशी स्थिति होत चालली आहे. पोलिसांचा कांहीं बंदोबस्त नाहीं. अलीकडे भैरूसिंग नांवाचा एक डाकू फार धीट झाला असून आपली टोळी घेऊन उज्जेनच्या आसपास लूटमार करीत असतो असें लोक बोलतात पण अजूनपर्यंत त्याला कोणी पकडला नाहीं."

भैरूसिंग हें नांव मीं कोठें तरी खास ऐकिलेलें आहे असें मला वाटलें. आणि जास्त विचार करतां, सरकारी दवाखान्यांत मीं जेव्हां त्या मुक्याची प्रकृति पहावयाला गेलों होतों, तेव्हां त्यानें गिजबिडलेल्या कागदांवर तें मला वाचलेलें आठवलें. 'भैरूसिंग चोर' असें त्या मुक्यानें लिहिलें होतें, तोच हा चोर असावा असें मीं अनुमान केलें.

वाणीदादाच्या दुकानापाशीं थोडावेळ विश्रांति घेऊन मीं नंतर घरीं जाऊन पोचलों. या चोरीची हकीगत पोलिसाकडे कळवावी किंवा नाहीं याबद्दल माझ्या मनांत विचार चालले होते, तथापि नारायणजी ज्योतिषी यांनीं मला न्यायकोर्टाची पायरी न चढण्याविषयीं बजावलें होतें. ती गोष्ट लक्षांत आणून पोलीस व न्यायकोर्ट यांना कोणत्याहि प्रकारें मी खबर दिली नाहीं.

"संन्याशाच्या लग्नाची शेंडीपासून तयारी" असें ह्मणतात त्याप्रमाणें माझी अवस्था झाली. माझ्या खिशांतलें सर्व सामान मला दुसऱ्या दिवशीं पुनः मिळवितांना थोडा त्रास पडला. दवाखान्याला

मिलरचें कुलूप होतें त्याची एक किल्ली मूलचंदजी कंपाउंडर यांजपाशीं होती व दुसरी मजजवळची चोरीला गेली होती, तेव्हां तिसरी किल्ली लवकर मिळेना. गोपाळदादांचा स्टेथॉस्कोप मजजवळ होता ह्मणून बरें झालें. नाहींतर मोठी अडचणच पडली होती. थर्मामेटर व इतर सामान पुनः खिशांत भरलें व पित्रे वॉचमेकर यांजकडून एक खिशांतलें घड्याळ विकत घेतलें. तेव्हां डॉक्टरांची स्वारी पुनः सज्ज झाली !

विष्णूला जाऊन एक आठवडा झाला तरी त्याचा कांहीं समाचार कळेना. मनकामनेश्वराच्या मंदिराकडे गेलों, तेथें पत्ता लागेना. तीं उभयतां स्त्रीपुरुषें विष्णूचा शोध लागेना म्हणून काळजींत होतीं. नदीवरच्या लच्छेगिरीच्या मठांत ( यासच आतां व्यंकटेशभवन असें ह्मणतात ) तपास केला, तेथेंहीं कांहीं कळेना. मला मोठा विचार पडला ! नारायणजी ज्योतिषांना किंचित् विपरीत शंका देखील आली. मुंबईस गेला नाहीं अशी आमची अगदीं खात्री होती तरी काळका-देवीच्या रस्त्यावर खेमराज श्रीकृष्णदास यांच्या व्यंकटेश्वर बुकडेपोमध्यें तारेनें त्याचा तपास केला, पण तिकडूनहि नकारार्थीच उत्तर आलें. बहादरगंजांत मी स्वतः गेलों. लक्ष्मण मिस्त्र्याला समक्ष भेटून विचार-पूस केली. विष्णूच्या ओळखीचीं जीं कांहीं ४।५ माणसें माझ्या माहितीचीं होतीं त्यांनाहि विचारलें, पण कोणाकडूनहि त्याचा शोध लागेना ! मग हा गेला तरी कोठें ?

नारायणजी ज्योतिषांचे चिरंजीव सूर्यनारायण हे त्या संधीला गांवाला गेले होते. ते परत आल्यावर सांगूं लागले कीं एके दिवशीं सायंकाळीं स्टेशनावर विष्णू त्यांना भेटला होता. हातांत त्याच्या एक लठ्ठ सोडगा होता. त्यांचें व विष्णूचें थोडावेळ बोलणें झालें होतें व त्यांनां विष्णूनें असें सांगितलें कीं हिरालालचा पत्ता लागून

त्याचें व विष्णूचें बोलणेंचालणेंसुद्धां झालें आहे परंतु अजून कांहीं फार महत्त्वाच्या बाबींचा शोध करावयाचा असल्यामुळें तो सध्या अज्ञातवासांतच कांहीं काळ रहाणार आहे. भैरूसिंगाबद्दल सर्व हकीगत विष्णूला समजली असून त्याच्याबद्दल सावध रहाण्याबद्दलचा इशाराहि त्यानें आह्मांला दिला होता ! असें हें 'विष्णुपुराण' झालें.

'**संकटिं दुसरें संकट येतें**' असें ह्मणतात तें कसें तें पहा. मंगलेश्वराच्या रस्त्यावर जो प्रसाद मला मिळाला त्याला चारच दिवस झाले होते. अंताजी दामोदरांच्या वाड्यांत विनायकबोवांची कथा होती आणि रामचंद्रभय्यांच्या निमंत्रणावरून आम्हीं सर्व मंडळी त्यांच्या मंदिरांत गेलों होतों. घरांत कोणी नव्हतें. कथा ऐकून आम्हीं मध्यरात्रीनंतर घरीं परत आलों. आम्हांला कडी उघडायला लेले मास्तरांच्या काकू माडीवरून आल्या आणि दार उघडून आह्मांला ह्मणाल्या 'तात्या, अहो तुम्हीं सगळी मंडळी घराबाहेर पडलांत आणि घरांत काय झालें तें पाहिलेंत का ?' मला त्यांच्या बोलण्याचा उमज पडेना, ह्मणून घरांत जाऊन पहातों तों काय ? माझ्या खोलींतले सर्व कागदपत्र व पुस्तकें सगळ्या घरभर पसरून टाकलेलीं. बरें तर बरें, स्वयंपाकघराला व देवघराला आम्हीं कुलुपें लावून गेलों होतों नाहींतर फजीतीला कांहीं पारावरच नव्हता ! सामान जरी अस्ताव्यस्त फेंकून दिलें होतें तरी आमची कांहीं ठळक अगर महत्त्वाची वस्तु गेलेली दिसली नाहीं. जे कोणी शर्विलक आलेले होते ते बहुधा त्या भीमसिंगाच्या कागदपत्रांसाठीं आलेले असावेत, पण ते कागदपत्र त्यांचे काका जरी आले असते तरी त्यांना आतां सांपडण्यासारखे नव्हते !

पण हिरालाल प्रभृति मंडळींच्या धाडसाची व उद्योगाची मात्र कल्पना त्यांच्या कृत्यांवरून स्पष्ट दिसूं लागली. शक्य असेल तोंपर्यंत

शरीराला अगर इतर मालमत्तेला त्यांनीं धक्का लावलेला नव्हता. ते महत्त्वाचे कागद हातीं पडावेत येवढा मात्र त्यांचा उद्देश ठळक दिसला होता. परंतु ते कागदपत्र मिळविण्याकरितां त्यांचे प्रयत्न कोठपर्यंत जातील हें कोणी सांगावें असें वाटून त्यांच्याबद्दल एक प्रकारची थोडी दहशत वाटूं लागली होती.

हिरालालनें आपला पत्ता बदलला होता. पिंजारवाडीचा पत्ता बदलून तो बहादरगंजांत लक्ष्मण मिरुयाच्या घराशेजारीं असा कळविला होता, तो तरी खरा कीं खोटा हें पहाण्याचे हेतूनें मी मंगळवारीं सकाळीं त्याच्या नव्या पत्त्यावर त्याला एक पत्र पाठविलें होतें. तें पत्र त्यास पोचल्यावर त्याचें उत्तर तो मनकामनेश्वराजवळ साधूकडे पाठवील असें मला वाटलें होतें. विष्णूनें जर त्याचा पत्ता लावला तर मला तरी तो पुढें मागें कां सांपडूं नये असें वाटलें होतें. ह्मणून मी तीन-चार वेळां बहादरगंजांतून लक्ष्मण मिरुयाच्या घरावरून गेलों पण मला तो कधींहि आढळला नाहीं.

---

## प्रकरण एकोणिसावें

# आशेला जागा

है सृष्टिकर्ता एकही तुमसे जुदा वह है नहीं।
फिर व्यर्थ श्रममें क्यों पडे? कहते नहीं दिखता कहीं॥
जड जीवमय संसारमें उसका निरंतर वास है।
सोचो, विचारो, ध्यान दो, ईश्वर तुम्हारे पास है॥

अद्वैतानंद.

गुरुवारीं रात्रीं दहा वाजतां प्रोफेसर राममूर्ति यांच्या खेळाच्या तंबूजवळ तर काय अगदीं तुसता तोबा उडून राहिला होता. माणसाला

जायला रीघ नाहींशी झाली. क्षेत्राचा गांव, सात आठ वाजेतों मंडळी आपआपल्या उद्योगांतच गुंतायची. कदाचित् लवकर खेळ पहावयाला यायची नाहीं, असा विचार करून राममूर्तींनीं प्रारंभ जरा उशीरा ठेविला होता. दरवाजे नऊ वाजतां उघडून खेळाला प्रारंभ दहा वाजतां व्हावयाचा होता, पण आमची उज्जयिनीची मंडळी ह्मणजे काय, आधींच विलक्षण नादी ! आणि त्यांतहि नाटक तमाशाच्या कामांत तर काय त्या नादीपणाला पारावारच नाहीं. कोणचाहि खेळ येवो, त्यांत कांहीं नवेपणा असला कीं धांवलेच ! जवळ पैसा नसला तर जवळचा जिन्नस गहाण ठेवतील, पण खेळ पहायला जातील ! त्यांतहि सुभेसाहेब, सरसुभेसाहेब, दगडसाहेब, मातीसाहेब हे खेळ पहायला जाणार आहेत हें समजल्यावर तर मग काय पाहिजे ? उद्यां दोन प्रहरची भ्रांत पडली तरी हरकत नाहीं, पण खेळ पहायला गेलें पाहिजे, असें साऱ्यांना होऊन जातें. त्यांतून त्या दिवशींच्या खेळाचें कांहीं उत्पन्न गावांतल्या कांहीं लब्धप्रतिष्ठित भिक्षुकांच्या कोणच्याशा फंडाला मिळावयाचें होतें, आणि त्यांच्या खटपटीमुळें टिकिटांची विक्री पुष्कळच जास्त झाल्यामुळें चांगली सोयीची जागा मिळावी ह्मणून लोक आठ वाजल्यापासूनच दाराशीं येऊन बसूं लागले होते. त्यामुळें खेळ सुरू होण्याच्या अगोदर जिकडे तिकडे एकच गोंधळ उडून गेला होता. इतर स्नेहीमंडळीच्या बरोबर मीहि त्या गर्दींतून घुसून आपली जागा हुडकण्याच्या विचारांत होतों. तंबूतली बहुतेक जागा भरून गेली होती. आठ आणे व बारा आणे या ठिकाणच्या जागा तर मुळींच शिल्लक नव्हत्या. रुपयावाल्या खुर्च्यांचीं आमचीं टिकिटें होतीं तेथें कांहीं खुर्च्या मात्र अजून शिल्लक होत्या, त्यांपैकीं आम्हीं मंडळींनीं जाऊन कांहीं अडविल्या.

आम्हीं बसलों होतों तेथून थोडेसें पलीकडे बायका बसण्याची सोय केली होती. बायका देखील त्या दिवशीं बऱ्याच आल्या होत्या.

खेळाला सुरवात बरोबर दहा वाजतां झाली. बॅन्ड वाजूं लागला. कसरतीचीं अवघड व आश्चर्यकारक कामें होऊं लागलीं व सर्व प्रेक्षकांचीं मनें तिकडे वेधलीं. पण बायकांच्या जागेंत कांहीं लहान मुलांनीं त्याचवेळीं रडायला आरंभ केला त्यामुळें मी जरा त्रासानें तिकडे पाहिलें तों मैनाबाई तेथें बसली असावी असें मला वाटलें.

कोणत्याहि सार्वजनिक ठिकाणीं, जेथें स्त्रीपुरुषांचा जमाव एकत्र झाला असेल, तेथें पुरुषांनीं स्त्रियांकडे पाहणें मोठें दोषास्पद होय हें मला कबूल आहे पण त्या दिवशीं तो नियम मला अगदीं गुंडाळून ठेवावा लागला, आणि समोर होत असलेला खेळ पहाण्याकडे लक्ष न देतां मी पुनः पुनः त्या मैनाबाईकडेच पाहूं लागलों. अनायासें आज मैनाबाई दृष्टीस पडत आहे तर त्या संधीचा पूर्ण फायदा घेतला पाहिजे असें मनांत ठरवून मी वरचेवर तिजकडे पहात राहून ती माझ्या दृष्टींतून निसटून जाऊं नये अशाविषयीं सावध राहिलों. रात्रीं एक वाजायच्या सुमाराला खेळ संपला आणि मंडळी गडबडीनें तंबूच्या बाहेर पडूं लागली. जो तो; लवकर बाहेर पडण्याविषयीं धडपडूं लागला. माझी फारच तारांबळ उडाली. माझे स्नेही आपल्याबरोबर चलण्याविषयीं मला आग्रह करूं लागले आणि मला त्यांचें समाधान बिलकुल करितां येईना. तंबूच्या बाहेर पडण्याचा बायकांचा दरवाजा वेगळा असल्यामुळें मैनाबाई त्या दरवाज्याकडे गेली आणि गर्दींत दिसेनाशीहि झाली. सांवज सांपडण्याच्या बेतांत आलें आणि नंतर निसटलें म्हणजे पारध्याला जसा राग येतो तसाच जवळ जवळ मला आला आणि आपला उद्देश साधण्याकरितां पुस्तके, पाध्ये, अत्रे वगैरे मित्रांना गुंगारा

देऊन मी निसटलों व बायकांच्या दरवाज्याजवळ बाहेरच्या बाजूला येऊन उभा राहिलों.

सुदैवानें त्या बायकांच्या घोळक्यांत मैनाबाई मला दृष्टीस पडली. रांगड्यांच्या बायका, वाण्यांच्या शेटाण्या, व उत्तरेकडच्या हिंदू किंवा मुसलमानांच्या स्त्रिया, महाराष्ट्रीय स्त्रियांच्या प्रमाणें समाजांतून वावरतांना चेहेरे मोकळे ठेवून सहसा जात नाहींत, पण मध्यरात्रीची वेळ होती, चांदणें पडलें होतें व समाज आठरापगड जातींचा व बिनओळखीचा होता ह्मणून बहुतेक स्त्रिया डोक्यावरून घुंगट न घेतांच चालत्या होत्या. मैनाबाई पहिल्यानें बहादरगंजांत गेली. तेथें लक्ष्मण मिरुयाच्या घराशेजारच्या घरांत जाऊन तिनें एक पत्र घेतलें आणि नंतर ती इतर बायकांच्या बरोबर बाहेर पडली ती दौलतगंजाच्या रस्त्यानें शहराकडे निघाली. आतां तिच्या पाठोपाठ जाऊन ती कोठें रहाते तें पहावें असें मी ठरविलें होतें ह्मणून तिच्या मागोमाग तिला दृष्टीस पडूं नये इतक्या अंतरावरून मीहि चालूं लागलों. मैनाबाईच्या बरोबर आणखीहि कांहीं बायका होत्या, त्या आपआपलीं घरें आल्यावर एकएक कमी होऊं लागल्या, आणि दौलतगंजांतून नळियाबाखळ, लोखंडीपूल व पटनीबाजार येई पावेतों तर बहुतेक निघूनहि गेल्या. एकच बाई आतां मैनाबाईबरोबर राहिली. सबजीमंडी संपून कालीदेहाचा दरवाजा आला तेव्हां तीही बाई जाऊन मैनाबाई एकटीच चालूं लागली. मी मोठ्या सावधगिरीनें तिच्या मागून चाललों होतों त्यामुळें मी तिच्यामागें आहें असा तिला कधीं संशयहि आला नाहीं. कालीदेह दरवाज्याच्या थोडेंसें पुढें जयाजीगंज लागण्याच्या जवळच ती एका लहानशा घराशीं थांबली आणि तिनें दाराची कडी वाजविली, आणि आंतून कोणी दार उघडल्यावर ती घरांत शिरली आणि तिनें पुनः कडी लावून घेतली.

थोड्या वेळानें मीं त्या दाराशीं जाऊन फटींतून कांहीं दिसलें तर पहावें असा यत्न केला, पण आंत अंधेर असल्यामुळें मला कांहीं दिसलें नाहीं.

तिच्या हातांत जें पत्र मीं पाहिलें तें बहुतकरून मीं हिरालालला पाठविलेलें असावें आणि ज्या अर्थी तिनें घरांत शिरल्यावर कडी लावून घेतली त्या अर्थी तें तिचें घर असावें किंवा हिरालालाचें असावें असा मीं तर्क केला. तें घर हिरालालाचें असल्यास त्याला तें पत्र देऊन तीं कदाचित् थोड्या वेळानें तरी बाहेर पडेल अशा आशेनें मीं रस्त्यावर सुमारें अर्धा तास इकडे तिकडे हिंडत राहिलों, पण त्यापासून कांहीं निष्पन्न न झाल्यामुळें कंटाळून पहाटें तीन वाजण्याच्या सुमारास घरीं येऊन पडलों.

प्रायव्हेट प्रॅक्टिस एका दृष्टीनें जितका चांगला तितकाच दुसऱ्या दृष्टीनें अगदीं वाईट आहे. 'स्वतंत्र धंदा, स्वतंत्र धंदा,' असें आपण ह्मणतो खरें, पण त्याच्यासारखा खरोखर परतंत्र धंदा दुसरा कोणताहि नसेल. तुमचें पोट दुखत असो, ताप येवो, खोकला येवो, तुह्मांला जागरण झालेलें असो किंवा आणखी कांहीं काम असो, सकाळची तरी दवाखान्याची हजिरी तुह्मांला साधलीच पाहिजे. एक दिवस गैरहजिरी कीं तीन दिवसांचा तोटा, असें समीकरण नेहमीं ठेवलेलें ! त्यांतून दवाखाना संभाळून, इतर उचापती रात्रंदिवस करणाऱ्याला तर विश्रांति किंवा स्वस्थता यांचें नांव देखील नको. नेहमीं घोड्यावर खोगीर आंवळलेलें ! आणि ह्मणायचें 'स्वतंत्र' ! पहाटें तीन वाजेपावेतों घराच्या बाहेरच होतो. घरीं आल्यावर चाराच्या सुमाराला माझा डोळा लागला असेल, पण सकाळीं ६ वाजतां नेहमींप्रमाणें उठून स्नानसंध्या करून दवाखान्यांत जावेंच लागलें. सकाळीं दवाखाना सुरू होण्याच्या

पूर्वी मैनाबाईच्या घरावरून एकदां फेरी मारून यावें असें वाटलें होतें पण निजून उठायला उशीर झाल्यामुळें तसें कांहीं साधलें नाहीं.

पण ईश्वराच्या घरचा नेमानेम कांहीं विलक्षण आहे.

**" अनुकूल काल होतो तेव्हां बळ, बुद्धि, तेज, यश देतो ॥**
**प्रतिकूळ तोचि होतां माघारें दत्त सर्वही घेतो ॥**

असें मोरोपंत ह्मणतात किंवा

**" त्याच्या इच्छामात्रें अघटित तें घटित सर्व होणार" ॥**

असें मी ह्मणतो तें किती सत्य आहे त्याचा अनुभव मला त्या दिवशीं आला आणि त्यामुळें मनाला फार समाधान झालें.

मला तो दिवस आज चांगला आठवतो आहे. शुक्रवार होता. सकाळीं दहा वाजायला वीस मिनिटें कमी होतीं. दवाखाना रोग्यांनीं भरून गेला होता. मीं कामांत अगदीं मग्न होतो. इतक्यांत दवाखान्याच्या दरवाजाशीं एक टांगा उभा राहिला आणि मैनाबाई खालीं उतरली. मीं त्यावेळीं रस्त्यावरच्या खिडकींत एका रोग्याला तपाशीत उभा होतों. मैनाबाईला दवाखान्यांत शिरतांना पाहून मला पराकाष्ठेचा विस्मय वाटला. मैनाबाई दवाखान्यांत शिरली आणि मीं होतों तेथें येऊन मला ह्मणाली, 'डॉक्टरसाहेब, आपल्यासाठीं टांगा आणला आहे तर आपण लवकर चलावें. अंकपाताच्या मंदिरांत एक साधु येऊन उतरला आहे. त्याला ताप आला आहे. तेव्हां त्याची प्रकृति पाहून त्याला औषध द्यावें.' हें ती इतकें मनःपूर्वक बोलली कीं मला ती पुनः मागें फसविल्याप्रमाणें करील अशी शंका घेणें बरें नव्हे असें वाटलें. मैनाबाईनें मला एकदां फसविलें होतें खरें; पण तिची मुद्रा, आविर्भाव व वागण्याची रीती हीं इतकीं चांगलीं होतीं कीं तिजबद्दल मनामध्यें एकप्रकारचा पूज्यभावच वाटावा. हिरालालाची व तिची ओळख

असावी याबद्दल तर मला संशय नव्हता, तथापि आपल्याला ती फसवील व हिरालालाच्या जाळयांत आपले पाय अडकवील असें माझें मन सांगेना. शिवाय दिवसाची वेळ होती, अंकपातामधील साधु कोण असावा हें ध्यानांत येऊन त्याला पहाण्याची मलाही इच्छा उत्पन्न झाली होती व सर्वांत जास्त महत्त्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे अनायासें मैनाबाईचा परिचय होणार होता ह्मणून मी तिजबरोबर जाण्याचें कबूल केलें आणि दवाखान्यांत आलेल्या सर्व रोग्यांना औषधें- दिल्यावर मैनाबाईसहवर्तमान मी अंकपाताकडे जाण्यासाठीं टांग्यांत बसलों.

वाटेंत तिच्या भावाच्या प्रकृतीसंबंधानें मी तिला विचारलें. 'आतां पुष्कळ बरा आहे' असें ती म्हणाली खरी, पण तिचें उत्तर मला थोडें उडवाउडवीचें दिसलें, कारण पुढें भावाच्या संबंधीं जास्त कांहीं हकीगत सांगण्याचें सोडून तिनें त्या साधूच्या प्रकृतीसंबंधानें मला कांहीं सांगितलें आणि नंतर अगदीं स्तब्ध राहिली. वाटेंत आदल्यारात्रीं ज्या घरांत ती शिरून निजली तें घर आह्मांला लागलें. पण मी, मला तें घर ठाऊक आहे असें बिलकूल न दाखवितां जेव्हां तिला 'तुम्हीं नीलगंगेवर रहातां काय' असें विचारलें तेव्हां तिनें मला उत्तर न देतां ऐकल्या न ऐकल्यासारखेंच केलें !

हिरालाल व त्याचे साथीदार कोठें रहातात तें समजलें तर तिच्या पासून काढून घ्यावें अशी माझी इच्छा, आणि तिची इच्छा माझ्या अगदीं बरोबर उलट ! पिंजारवाडींत आम्हीं भेटलों होतों ती आठवण मी काढली तेव्हां थोडेसें हंसल्यासारखें करून ती ह्मणाली कीं "डॉक्टर साहेब, त्या रात्रीं मी लवकर गेलें हें तुम्हांला आवडलें नसेल पण मला त्या दिवशीं कांहीं जरूरीचें काम होतें" असें सांगून पुनः ती आपली

गप्प राहिली. मला तिला पुष्कळ गोष्टी विचारावयाचा होत्या. नील-गंगेकडे त्या रात्रीं मला ती घेऊन गेली ते कां? हिरालाल हा कोण व त्याची व तिची ओळख कुठली व तो कोठें राहतो वगैरे प्रश्न तिला विचारावेसे मला वाटलें पण असे प्रश्न तिला एकदम कसे विचारावेत असा मला प्रश्न पडला. ती बऱ्याच पोक्त वयाची व फार अदबशीर दिसली, आपण होऊन कांहींच बोलेना तेंव्हां आतां आपण तरी काय विचारावें असें मला झालें. विष्णूनें हिरालालाला पाहिल्याचें आम्हांला कळविलें होतें, तेंव्हां कदाचित् विष्णूची व तिची दृष्टादृष्टही झाली असेल असें मला वाटलें, पण विष्णूची व माझी ओळखदेख आहे हें तिला कशाला समजून द्या, अशा समजुतीनें मी विष्णूबद्दल तिच्यापाशीं एक चकारशब्दहि काढला नाहीं.

तिची मुद्रा एकंदर मला उदास दिसली. ती मजपासून कांहीं लपवून ठेवीत असावी, खरें सांगत नसावी, असें मी ओळखलें खरें पण तिच्या वर्तनांत कपटापेक्षां दुःखाचा भागच मला ठळक दिसला. तिची ती खिन्न मुद्रा, मधून मधून मला ऐकूं येणारे उसासे, क्वचित् क्वचित् नजरेस पडणारे भरून आलेले डोळे व त्यामुळें गहिंवरून आलेला स्वर यांवरून ती दुःखी असावी असें समजून तिला कांहीं प्रश्न विचारून त्रास द्यावा असें माझें मन घेईना, पण तिला दुःख कसलें आहे तें समजून घ्यावें व शक्य असेल तर आपणांस जी मदत करितां येईल ती तिला करावी असें मला वाटलें. मनरूपी लांकडें तीन प्रकारच्या आगीनें जळत असतात. पहिला चिताग्नी—यानें मन व शरीरबळ दोन्ही नष्ट होतात. गोड्या तेलाच्या दिव्याप्रमाणें हा हृदयांत शांतपणें जळत असतो व मनाला व शरीराला शोषीत असतो. हा दिवा प्रकाश चांगला देत नाहीं, तरी डोळ्यांस दुःखद होत नाहीं;

तसाच तो ज्याच्या मनाला लागला त्यालाच कायतो त्रास. इतरांशीं त्याचा फारसा संबंध नसतो. दुसरा संशयाग्नि—हा ओल्या लांकडां-प्रमाणें, न पेटतां, धूर मात्र खूप धुमसत असावयाचा. ज्वाला मुळींच नाहीं. स्वयंपाक्याला व जेवणाऱ्यांनाहि नाक डोळे पुसायास लावून जसा तो बेदम करितो तसा हा संशयी व संशयविषय दोघांचें सौख्य नासतो. तिसरा क्रोधाग्नि—हा राकेलाप्रमाणें ठिणगी पडली कीं उडाला भडका. पण जितका जलद भडकतो, तितक्याच जलदीनें तो थंडहि होतो. ओल्या लांकडांवर राकेल घालून काडी लावल्यास भडका होतो पण टिकत नाहीं. तेल जळून जातें व लांकडें तशींच राहतात हा साधारण नियम. लांकडें वाळलेलीं असल्यास मात्र परिणाम निराळा होतो.

अशा प्रकारचे विचार माझ्या मनांत चालू असतांना शहराची हद्द संपून रामानुज कोटाच्या मंदिराजवळ आम्हीं आलों. त्या ठिकाणीं भैरूसिंगानें किंवा इतर कोणी भामट्यांनीं मला कसें लुबाडलें होतें त्याची मला आठवण झाली. आतां गांवची वस्ती संपून अंकपाताची जागा जवळ जवळ येऊं लागली. तेव्हां पुन्हां मैनाबाईची अशातऱ्हेनें गांठ पडणें फारसें शक्य नाहीं, जें काय विचारावयाचें तें आतांच विचारून घ्यावें अशा बुद्धीनें मीं तिला विचारलें; कीं, मैनाबाई तुम्हीं रहातां कोठें ?' परंतु तिनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. नुसता एक सुस्कारा टाकला. मीं अगदीं बुचकळ्यांत पडलों. ही बाई असें कां करते हें मला समजेना. बाई चांगली ह्मणावी तर जयाजीगंजांत ज्या ठिकाणीं तिला मीं जातांना प्रत्यक्ष पाहिलें त्या घराचा पत्ता ही कां सांगेना व लफंगी ह्मणावें तर दुसरी तरी एखादी लोणकढी थाप कां मारीना हें मला कळेना ! तेव्हां तोच प्रश्न मीं तिला पुन्हां केला. तेव्हां आतां उत्तर दिल्याशिवाय गत्यंतर नाहीं असें वाटून कीं काय,

ती मला ह्मणाली, कीं, डॉक्टर साहेब, नीलगंगेच्या रस्त्यावर मी तुह्मांला फसविलें ह्मणून मला तुम्हीं लबाड समजून हा प्रश्न करीत असाल, पण मी ईश्वरसाक्ष असें सांगते कीं, त्या दिवशीं तसें वागण्यांत माझा कांहीं दुष्ट हेतु नव्हता. तुमच्या साठींच मीं तसें वागले.

" ह्मणजे काय " ?

" ह्मणजे काय तें कांहीं आजच्च मला सांगतां येत नाहीं, पण मीं कांहीं तरी खोटेंनाटें बोलून वेळ मारून नेत नाहीं, हें मात्र खास.

**मी:**—तें सर्व खरें; पण तेवढ्यानें माझ्या मनाचें समाधान कसें होईल ?

**मैनाबाई:**—" होय. नाहीं होणार हें मला कबूल आहे, पण मीं तरी काय करूं ? सध्यां तरी मला जास्त कांहीं सांगतां येणार नाहीं. " असें बोलून ती गप्प राहिली. मला मोठें चमत्कारिक झालें. ती शत्रु कां मित्र तें कांहींच निश्चयात्मक कळेना. शत्रु ह्मणावी तर तसें दिसेना. मला मुद्दाम आज एका साधूची प्रकृति पहाण्यासाठीं ही घेऊन जात आहे; नीलगंगेचा घोटाळा माझ्या फायद्यासाठींच केला असें सांगत आहे; आणि मित्र म्हणावी तर मला जें पाहिजे आहे तेवढेंच लपवून ठेवीत आहे, मार्ग सुकर करण्याऐवजीं दुष्कर करीत आहे, तेव्हां हें कोडें कसें सुटावें ? तथापि तिच्या वागणुकीवरून तिच्या संबंधीं पूज्यभाव उत्पन्न होई तेव्हां ती शत्रु असेल असें वाटेना. तेव्हां मी तिला ह्मणालों कीं, " बाई, तुमच्या एकंदर वागणुकीवरून तुम्हीं फार चांगल्या बाई दिसता, म्हणून तुम्हांला जर कधीं भेटावेंसें वाटलें तर मीं कोठें भेटूं ? "

**मैना:**—काय करायचें आहे मला भेटून ? उलट त्यांत आपल्याला त्रास मात्र व्हावयाचा.

**मी:**— म्हणजे काय ?

**मैना:**— नाहीं तर काय ? आपल्या पासून मी जितकी दूर असेन तितकें बरें. आज सुद्धां मीं येणारच नव्हतें आपल्याला बोलवायला; पण तो साधु बिचारा तापानें पडला आहे आणि दुसरें कोणी आपल्याकडे जाण्याला दिसेना म्हणून मला यावें लागलें.

**मी:**—हो तें ठीक आहे. पण मला सुद्धां जर कधीं तुमच्या मदतीची जरूर लागली तर मीं तुमचा शोध कोठें करूं ? आपला पत्ता सांगण्यांत येवढीं काय अडचण आहे ?

आतां अगदीं उपाय नाहीं असें वाटून कीं काय तिनें पुष्कळ आढेवेढे घेऊन मला म्हटलें कीं, तुम्हाला तशीच कांहीं जरूर वाटली तर नदीच्या पलीकडे दत्ताच्या आखाड्यांत माझा शोध करा. पण पहा बरें, होतां होईल तों मला भेटूं नका. त्यांत आपला दोघांचाही तोटा आहे.

इतकें आम्हीं बोलत आहोंत तों आमचा टांगा अंकपाताच्या मंदिराजवळ थांबला. मैनाबाई व मी नंतर त्या साधूच्याकडे गेलों. त्या साधूचें मला पूर्वीं एकदां दर्शन घडलें होतें. भैरूसिंगाच्या मुलाखतीच्या दिवशीं सायंकाळीं सांदीपनीच्या आश्रमांत त्यांच्या प्रवचनाचा लाभ मला मिळाला होता. त्या साधूंची प्रकृति बरी नव्हती. तथापि ते आपल्या आसनावर बसले होते. आम्हीं तेथें जाऊन बसल्यावर व एकंदर प्रकृति वगैरे तपासल्यावर जेव्हां औषध योजनेच्या गोष्टी निघाल्या तेव्हां ते साधु मला ह्मणाले कीं, 'बेटा, तुझीं सर्व औषधें तुजजवळच असूंदेत. मनुष्यकृत औषधापेक्षां ईश्वरनिर्मित या शेंकडो वनस्पती ज्या आसमंतात पसरल्या आहेत त्यांचा उपयोग करणें बरें नव्हे काय ? एका एका वनस्पतीमध्यें अनेक गुण आहेत त्यांचा शोध करून ताज्या व शुद्ध वनस्पती

वापरण्याला शीक. हा समोर दिसणारा कडुनिंब पहा. आपल्या भरतखंडांतील पवित्र वृक्षांमध्यें कडुनिंबाची गणना केली आहे. कांहीं लोक असें ह्मणतात कीं, ह्याच्यामध्यें शीतलादेवी वास करिते. दुसरे कित्येक असें ह्मणतात कीं, सारेच देव देवता ह्याच्यामध्यें राहतात, पण ह्या लिंबाच्या वृक्षाच्या साऱ्या उपयोगाचें महत्व मनांत आणलें म्हणजे आपले लोक त्याबद्दल येवढी पूज्यता कां बाळगतात तें तुला समजेल. असें ह्मणून त्यांनीं त्या अमृतवल्लीच्या उपयोगापैकीं कांहीं उपयोग मला सांगितले ते खालीं दिले आहेत.

१ कडुनिंबाची अंतर्साल थंड पाण्यांत भिजत टाकून त्याचा काढा करून घेतला तर ताप नाहींसा होतो.

२ निंबाच्या वृक्षाच्या छायेंत निजलें तर कधीं ताप येत नाहीं.

३ याची पानें चावून खाल्लीं असतां रक्तशुद्धि होते.

४ तेल काढून लावलें तर जखमेची सूज उतरते.

५ डहाळ्याचें पोटीस करून तें जखमांवर व क्षतांवर बांधलें असतां तत्काळ गुण पडतो.

६ मुळ्या, साल, पानें, फळें व फुलें—पंचांग एकत्र कुटून त्यांची पूड वाळवून खाल्ली तर महारोग बरा होतो.

७ निंबाचा कोंवळा पाला कुटून त्यांत हिंग, जिरे, गूळ व मीठ घालून ती चटणी खाल्ली ह्मणजे कधींहि रोग होत नाहीं. ( ह्मणूनच पाडव्याच्या दिवशीं निंब खाण्याची चाल पडली आहे. )

८ निंबाच्या काड्यांनीं दांत घासले ह्मणजे मुखरोग जातात.

९ निंबाच्या टाळ्यांनीं वारा घालावा म्हणजे देवी बऱ्या होतात.

१० सर्पदंश झालेल्या मनुष्यास ताबडतोब कडुलिंबाचा रस पाजावा म्हणजे त्याचें विष उतरतें.

याप्रमाणें सांगून साधुमहाराजांनीं लिंबाचा एक गोळा माझ्यादेखत खाल्ला. माझ्यापासून कोणत्याहि मदतीची त्यांना अपेक्षा नव्हती. मैनाबाई त्यांच्या शेजारीं वसली होती. तेव्हां आतां निघतांना एखादा प्रश्न त्यांना विचारून मग जावें अशा विचारानें मी त्यांना हात जोडून विचारलें, कीं, "महाराज, 'यशःप्राप्तीचें साधन' या विषयावर आपलें प्रवचन मी त्या दिवशीं ऐकलें. आतां आनंद किंवा समाधान कसें मिळवावें तें ऐकण्याची माझी इच्छा आहे.

साधुमहाराज मजकडे पाहून हंसत हंसत ह्मणाले कीं, हा विषय मोठा गहन पण तितकाच चांगला आहे. त्याचें विवेचन जितकें लांबवावें तितकें लांबेल. पण सूर्य आतां मध्यान्हींवर आला आहे. तुला शहरांत परत जावयाचें आहे, तेव्हां थोडक्यांत तुला सांगतो. आयुष्यांत आनंद किंवा समाधान तुला प्राप्त करून घ्यावयाचें असेल तर आपल्या आयुष्यक्रमाचा कांहीं नियम ठरीव. चिकाटीनें उद्योग कर. प्रत्येक गोष्टींत मग ती गोष्ट मोठी असो अथवा लहान असो पूर्ण यश प्राप्त होईपर्यंत चिकाटीनें उद्योग कर. त्यांत मध्यंतरीं निराशेचे प्रसंग आले ह्मणून मध्येंच थांबतां उपयोगी नाहीं. नाहींपेक्षां मिळविलेलें सर्व यश तूं हारवून बसशील आणि मग पुनः त्या कार्यास आरंभ करावयास लागल्यावर तें पहिल्यापेक्षां अधिक दुर्घट आहे असें तुला आढळून येईल; आणि हें यश प्राप्त व्हावें ह्मणून भगवंताचें भजन कर. असें ह्मणून मोठ्या गोड सुरावर त्यानीं पुढील मधुर भजन ह्मटलें—

( राग बिहारी, ताल त्रिताल )

**"जय जगदीश हरे ! जय जगदीश हरे ! !**
**भगत जनन के संकट क्षणमें दूर करे ॥ धृ० ॥**
**जो ध्यावे फल पावे, दुःख बिनशे मनका ।**
**सुख सम्पति घर आवे, कष्ट मिटे तनका ॥ १ ॥**

**मात पिता तुम मेरे, शरण गहूं किसकी ।**
**तुम बिन और न दूजा आस करूं जिसकी ॥ २ ॥**
**तुम पूरन परमातम, तुम अन्तरयामी ।**
**परम ब्रह्म परमेश्वर, तुम सबके स्वामी ॥ ३ ॥**

---

## प्रकरण विसावें.

## विष्णुपुराण

**अग्रे व्याधः करधृतशरः पार्श्वतो जालमाला, ।**
**पृष्ठे वन्हिर्दहति नितरां, सन्निधौ सारमेयाः ॥**
**एणी गर्भादलसगमना, बालकैरुद्धपादा ।**
**चिंताविष्टा वदति हि मृगं, ' किं करोमि ! क, यामि?' ॥**

पहांटेचे पांच वाजले होते. लेले * मास्तर नित्याप्रमाणें लवकर स्नान करून संध्या करीत बसले होते. जयंताहि आज लवकर स्नान करून आजोबांना संध्या झाल्यावर पूजेला लागेल तें गंध रगडून उगाळीत बसला होता. आधले दिवशीं एकादशी, रात्रीं पोतेरें घालावयाचें नाहीं ह्मणून लेलीण काकू स्वयंपाक घरांत पोतेरें घालण्यांत व चूल वगैरे सारवण्यांत गुंतल्या होत्या. वारूताई नित्यकर्माला लागली होती. आमच्या घरच्या मुलांची आज सकाळची शाळा होती ह्मणून त्यांस आपला शाळेंतला अभ्यास करण्यास बसवून मीं माडीवर लेले मास्तरांजवळ येऊन बसलों होतों. माझेंहि स्नान झालें होतें व संध्येला मीं बसणार होतों इतक्यांत रस्त्यावरून, ' तात्या, तात्या,' अशा हांका मारलेल्या मला ऐकूं आल्या. आवाज तर खास विष्णूचा ऐकूं आला ह्मणून आनंदून मीं खिडकीशीं आलों आणि पहातो

---

* कृष्णाजी धोंडदेव लेले. ( आतां कैलासवासी )

खरोखरच विष्णू मला हांका मारीत होता ! मग मीं मुलांना सांगितल्या-वरून त्यांनीं दाराची कडी काढली आणि विष्णु आमच्या पुढें येऊन उभा राहिला. काय तो त्याचा अवतार ! कोट पाठीवर टरारला होता, हजामतही इतकी वाढली होती व तोंडांवर एक मोठा ओरखडा उठलेला दिसत होता.

विष्णूला पहातांच आपआपला अभ्यास सोडून सर्व मुलें त्याज-भोंवतीं जमलीं. स्वयंपाक घरांतलें काम तसेंच टाकून, हातांत अस-लेला दिवा तसाच घेऊन लेल्यांच्या काकू त्याच्या जवळ आल्या व मोठ्या आनंदानें व आश्चर्यानें त्याजकडे पाहून ह्मणाल्या, ‘ कोठें होता-सरे विष्णू इतके दिवस ? आन् तुझा कोट हा फाटला कशानें मागें ?’ विष्णू मोठा हजरजबाबी. त्यानें काकूंना कांहीं तरी सांगून त्यांची समजूत केली, आणि मुखमार्जनादि नित्यकृत्यें करण्यास्तव आपले कपडे काढण्यासाठीं तो माझ्या खोलीकडे गेला.

बऱ्याच दिवसानीं कां होईना, पण विष्णु एकदांचा परत आला त्यामुळें माझी एक मोठी काळजी दूर झाली. तो एकटा नाहींसा झाला होता खरा, पण इतर माणसांना त्याच्याबद्दल मोठी हुरहुर लागली होती. लेले मास्तरांच्या घरची मंडळी सगळींच मोठीं प्रेमळ, तेव्हां त्यांना सुद्धां तो एकाएकीं बिनपत्ता झाल्याचें समजून वाईट वाटत होतें. नारायणजी ज्योतिषांनीं तर बिचाऱ्यांनीं त्याचा पुष्कळ शोध चालविला होता. मनकामनेश्वराच्या मंदिरांतील तें साधूंचें जोडपें विष्णूसाठीं हळ-हळत होतें. व तो ज्या अर्थीं आतां लवकर सांपडत नाहीं त्या अर्थीं आतां विनाकारण उज्जयिनीस कशाला रहावें, त्यापेक्षां पूर्वीं ठरविल्या-प्रमाणें यात्रेला जावें असा बेत करून त्यांनीं आपला जाण्याचा दिवस मुक्रर ठरविला होता. प्रवासांत आवश्यक असणारें सामान घ्यावयाचें व

बाकी सर्व पसारा तेथेंच टाकून जावयाचें असें त्यांनीं योजिलें होतें. विष्णूनें हिरालालाला पाहिलें असल्याबद्दल मागें आम्हांस कळलें होतें तेव्हां आतां सविस्तर माहिती आपल्याला समजेल या विचारानें मला मोठा आनंद झाला. कन्हय्यालालनें हिरालालाला दिलेला कागद जर एक अर्धा तास आह्मांला मिळाला असता, तर हा हिरालाल व तो भैरूसिंग दोघेहि होळींत पडले असते तर माझी कांहीं हरकत नव्हती. पण–! तो 'पण' मध्यें आडवा येत होता ! हिरालाल आणि त्याचे साथीदार आमच्यापेक्षां जास्त माहितगार होते, तेव्हां ते तो कागद आमच्या स्वाधीन कसा करून देतील ? याचीहि आह्मांला पुरती जाणीव होती. असो.

सकाळीं विष्णू आपल्या उद्योगाला गेला व मीं दवाखान्यांत गेलों. दुपारीं भोजनोत्तर माझ्या खोलींत पसरल्यावर विष्णू मला ह्मणाला, 'तात्या, तुम्हीं नाद सोडा त्या मनकामनेश्वराच्या गोष्टीचा. आपल्याला त्यांत यश मिळणें आणि चंद्रलोकावरची सफर करणें हीं दोन्हीं सारखींच.'

**मी**–कारे असे कां ?

**विष्णु**–कां ह्मणजे काय ? अहो, त्या हिरालालाला त्याच्या संबंधानें अगदीं वित्तंबातमी लागलेली आहे, आणि त्यामानानें आपल्याला काय ठाऊक आहेत दगड आणि धोंडे ? अगदीं पहिल्यानें मीं जेव्हां तुमच्या या विस्तवाच्या खेळांत लक्ष घातलें तेव्हां हा खेळ इतका भयंकर असेल अशी कल्पनासुद्धां मला कधीं शिवली नाहीं. अहो, रामाचें नांव घ्या. ते लोक आपला प्राण घ्यायला सुद्धां चुकायचे नाहींत, त्याबद्दल अगोदर आपल्याला खबरदारी घेतली पाहिजे.

**मीः**—हो पण तूं इतके दिवस होतास कोठें व तूं काय काय पाहिलेंस तें सांगशील कीं नाहीं ?

**विष्णू**—होय सांगतोना. तुमच्या निरोप घेऊन मीं निघालों तो बहादरगंजांत जाऊन मुक्काम केला. लक्ष्मण मिस्त्र्याच्या घरासमोर एक शंकराचें+ मंदिर आहे. त्यांतच मीं जाऊन राहिलों. दोन दिवस माझे अगदीं फुकट गेले. नुस्त्या माशा मारीत बसण्याचा मला अगदीं कंटाळा आला. परंतु तिसऱ्या दिवशीं संध्याकाळीं माझ्या बसण्याचें सार्थक झालें. आणि तुम्हीं वर्णन केल्याप्रमाणें चांगला उंचापुरा एक मनुष्य लक्ष्मण मिस्त्र्याच्या शेजारच्या दक्षिणेकडेच्या पहिल्या घरांत कांहीं पत्रें असतील तर तीं घेण्यासाठीं आला. नंतर मी त्याला समजूं न देतां त्याच्या मागोमाग पाळतीवर राहून त्याच्या घरापर्यंत गेलों. नझरअलीच्या गिरणीच्या मागच्या बाजूला मजूरांच्या व तसल्या प्रकारच्या हलके धंदे करणाऱ्या लोकांची वस्ती आहे. त्या वस्तींतल्या एका घरांत तो राहतो. तेव्हां आतां त्या घरावर मी आपली नजर ठेवली. घरांत जाणारा किंवा घरांतून बाहेर पडणारा माझ्या नजरेखालून गेल्याखेरीज राहिलाच नाहीं. होतां होतां चवथ्या दिवशीं मला असें निश्चितपणें ठरवितां आलें कीं तो मनुष्य हिरालाल होय. आणि त्याच्याकडे वारंवार खेपा घालणारे पांचजण त्याचे साथीदार असून त्यांपैकीं एकाचें नांव भैरूसिंग असें आहे.

‘भैरूसिंग’ ? मी आश्चर्यानें त्याला विचारलें. ‘कोणता भैरूसिंग ? चोर कीं काय ?’

---

+ या महादेवाचें नांव ही ‘मनकामनेश्वर’ असें आहे; पण त्या नांवाचा प्रस्तुत कथानकाशीं कांहीं संबंध नाहीं.

**विष्णू**—कोणाला ठाऊक चोर कीं साव तें ? पण माझी अगदीं खात्री होऊन गेली कीं ते सगळे लोक महा डामरट असून प्रसंगीं सगळ्या उज्जयिनीला सुद्धां आग लावायला चुकायचे नाहींत ! जुगार खेळणारे सगळे अव्वल नंबराचे ! त्यांतल्या त्यांत तो हिरालाल व भैरूसिंग तर अगदीं पट्टीचे खेळणारे. हिरालालाची ओळख करायची असा तर निश्चय, ह्मणून मी एक युक्ती केली. तो राहातो त्याच्या शेजारींच थोड्या अंतरावरची एक जागा मी भाड्यानें घेतली व ते जुगार खेळूं लागले म्हणजे त्यांच्या जवळ उभा राहून त्याचा खेळ पाहूं लागलों.

एके दिवशीं सायंकाळीं हिरालाल एकटाच असतांना मी त्याज-जवळ गेलों व बोलतां बोलतां सहज जुगाराच्या गोष्टी काढल्या. त्या बरोबर जुगार खेळण्याचें ठरून आम्हीं फांसे टाकूं लागलों. जुगाराचा खेळ मला कांहीं नवा नाहीं. लहानपणीं मी एक पट्टीचा खेळणारा म्हणून प्रसिद्ध होतों. तेव्हां मला सुद्धां त्याच्याप्रमाणें किंबहुना त्याच्या-पेक्षां बरें खेळतां येतें याचें त्याला थोडें नवल वाटलें. बोलण्याचालण्या-वरून तो मनुष्य कांहीं गांवढळ किंवा विनशिकलेला असा दिसत नाहीं, पण कोणत्या तरी कारणानें तो हल्लीं खालावलेल्या स्थितींत आलेला आहे. खेळतां खेळतां मीं त्याचे दहा रुपये जिंकले; पण मला त्याची चांगली ओळख करून घ्यायची होती तेव्हां मी थोडेंसे चुकल्यासारखें खेळून पुन्हां डावांत हरलों व अशा रीतीनें त्याची सर्व रक्कम त्याला परत मिळाली.

आमचा डाव अगदीं रंगांत आला असतां भैरूसिंग एकदम तेथें आला व हिरालालाच्या कानांत कांहीं कुजबुजला; त्याबरोबर हिरा-लालानें डाव एकदम बंद केला आणि मला कांहींतरी थाप मारून तो

आपल्या घराला कुलूप घालून भैरूसिंगाबरोबर चालायला लागला! मला तेव्हांच त्यांचा संशय आला. भैरूसिंगानें एक टांगा आणून लांब उभा केला होता त्यांत बसून ते निघाले. मीं ही त्यांच्या मागोमाग त्यांना न दिसे अशा बेतानें पळत पळत चाललों. थोड्या अवकाशानें मला एक रिकामा टांगा रस्त्यावर उभा असलेला दिसला; तेव्हां त्यांत बसून मी त्यांच्या टांग्याच्या मागोमाग निघालों.

जवळ जवळ अर्धा पाउण तास टांग्यांत नी होतों. मला नाहीं ठाऊक कोणत्या रस्त्यानें टांगा जात होता तें, पण जातांना आम्हीं नवापुरा, उडदूपुरा, वगैरे भागांतून गेलो असें वाटतें. गांव संपल्यावर सुद्धां थोडा वेळ टांगे चाललेच होते. पुढें चालत असलेला टांगा थांबल्यासारखा वाटतांच मी आपला थांबविला. अगदीं करकरीत तिंनिसांजा झाल्या होत्या. दहा वीस हातांवरचें मनुष्य सुद्धां ओळखूं येत नव्हतें. आणि आमच्या टांग्यांना दिवे वगैरे कांहीं नव्हते! तथापि हिरालाल व भैरूसिंग दोघेही टांग्यांतून उतरले व जवळच्या एका पडक्या व ओसाड घरांत शिरले असावे असा मला कयास करितां आला. मीं नंतर टांग्यांतून उतरलो, टांगेवाल्यानें मागितले तितके पैसे त्याला दिले आणि रवाना केला. मग हिरालाल घुसलेल्या त्या घराची अंधेरांत जितकी करतां आली तितकी पाहणी केली. पांचसहा वेळां त्या घराच्या आजूबाजूला मी नुसताच हिंडलों. रस्त्यापासून तें अगदीं एका बाजूला असून त्याच्या आसपास अगदीं रान माजलें होतें. कोठें दिव्याचें नांव नाहीं. तेव्हां हे भामटे तेथें गेले कशाला व कोठें हें कांहींच लक्षांत येईना. तथापि माझ्या ही अंगांत वेताळ संचारला होता. तो मला स्वस्थ बसूं देतो? शेवटच्या फेरीला मीं प्रत्येक ठिकाणीं जाऊन कानोसा घेतला तेव्हां घराच्या मागच्या बाजूला माडीवर कोणी

तरी कुजबुजत असल्याचा शब्द मला ऐकूं आला. अंधारांत तेथेंच कांहीं वेळ थबकल्यावर माडीवर एखादी पंती किंवा मिणमिण करणारी एखादी चिमणी लावलेली असावी असा भास झाला.

आतां पुढें कसें करावयाचें! माडीवर काय चाललें आहे तें दिसायचें कसें? शेजारच्या मोडक्या छपरावर चढावें तर तें केव्हां 'राम' म्हणेल त्याचा नियम नव्हता; शिवाय कवलें वाजलीं, फुटलीं, व त्यांच्या आवाजानें कोणाला कांहीं संशय आला कीं आटपलाच ग्रंथ! पुन्हां कांहीं घरीं परत जायला नको असें होतें; घराला आंतून कड्या घातल्या होत्या. तेव्हां मला अगदीं चमत्कारिक होऊन गेलें. तथापि 'ईश्वराची करणी आणि नारळांत पाणी' म्हणतात तसें झालें. माडीवरच्या खिडकीसमोर एक उंच झाड होतें त्याच्याकडे माझी दृष्टी वळली. आणि मग काय? एका क्षणाचाही विलंब न करितां मीं चटकन् त्या झाडावर चढलों, आणि तेथून माडींत होणारा सर्व प्रकार मला दिसूं लागला.

मीं झाडावर चढून पहायला आणि त्या माडींतून एक बाई किंचाळायला अगदीं एकच गांठ पडली! माझ्या पोटांत अगदीं चर्र झालें काय तो भयंकर देखावा माझ्या दृष्टीस पडला! असा प्रकार आपल्याला कधीं दिसेल अशी मला कल्पनाहि नव्हती! त्या माडींत हिरालालाच्या घरीं येणारे आणखी दोघे असे चवघेजण उभे होते. त्यांपैकीं एकानें एका बाईचा रट्टा धरला होता आणि ती विचारी बाई डोळ्यांवर दोन्हीं हात झांकून ओक्साबोक्शीं रडत होती, कां तर तिच्या समोर एका पोराचा मुडदा होता तो तिला बघवत नव्हता ह्मणून."

मी पलंगावर पडलो होतो तो ताडकन् उठून बसून म्हणालों, 'कायरे, त्यानीं कांहीं कोणाचा खून बीन केला कीं काय?'

विष्णु म्हणाला, ‘ कोण जाणे बोवा, केलाहि असेल. मी काय सांगणार ? मी जसें पाहिलें तसें तुह्माला सांगितलें. तो मुडदा तसा जमीनीवर पडला होता आणि त्याचे हातपाय थोडे थोडे आंखडले होते. ज्या हलकटानें तिचा रट्टा धरला होता तो तिला जोरजोरानें दटावीत होता व गप्प बसायला सांगत होता आणि ती आपली रड-तच होती. तेव्हां भैरूसिंग तिच्या अंगावर खेंकसून व तिला अगदीं घाणेरड्या अचकट विचकट शिव्या देऊन ह्मणाला कीं ‘ पहा, आम्हीं म्हणत होतों तें तुला खोटें वाटत होतें आतापर्यंत. आतां तरी ऐक. आम्हीं ह्मणतो तसें कबूल कर, नाहींतर आतां तुझाहि जीव घेतों. आहेस कोणाच्या भरंवशावर तूं ? ”

परंतु त्या बाईची धन्य आहे. तिनें भीती वगैरे सगळी गुंडाळून ठेवली आणि त्यांना म्हणाली कीं “ मेल्यानों, तुम्हीं कसाई आहांत, एका गरीब मुलाचा तुम्हीं विनाकारण प्राण घेतलात; त्याचे पाप कोठें फेडाल ? ” तें ऐकून तो पाजी भैरूसिंग चवताळून तिच्या अंगावर धांवला आणि रागानें त्यानें तिच्या ओंठावर अशा जोरानें बुक्की मारली कीं त्यामुळें तिचा ओंठ दातांत घुसून तोंडांतून रक्त वाहूं लागलें. इतकें झालें तथापि त्यांपैकीं एकाहि चांडाळाला तिची करुणा आली नाहीं. उलट त्या दुष्ट हिरालालानें तें प्रेत लाथाडून दिलें. मग भैरूसिंगानें सांगितल्यावरून ज्या माणसानें तिचा रट्टा धरला होता तो तिला जिन्यावरून दरदरा ओढीत खालीं घेऊन गेला. ती गेल्यावर बाकीच्या तिघांनीं एका खोक्यांत तें प्रेत घातलें व खोका बंद केला. व तो दोऱ्या बांधून घट्ट आंवळला, व मग तो ढकलत ढकलत जिन्या-वरून खालीं नेला.

त्या खोक्याचें पुढें ते काय करतात हें पहाणें मला अगदीं जरूरीचें वाटलें ह्मणून त्यांच्या मागोमाग अंधेरांत जावें अशा विचारानें मी गडबडीनें झाडावरून उतरूं लागलों. पण दुर्दैवानें अंधेरांत माझा पाय धोतरांत अडकला आणि वरचे हात सुटून मीं झाडावरून धाडकन् खालीं पडलों.

पुढें काय झालें तें मला आठवत नाहीं. पण डोळे उघडून पहातों तों दवाखान्यांत मी पलंगावर पडलों असून माझ्या जवळच पोलिसाचा एक शिपाई पहाऱ्यासाठीं उभा होता मीं चोर असून, चोरी करावयाचा उद्देशानें घरांत शिरत असतांना पडलों असा आरोप माझ्यावर होता. दवाखान्यांत आल्यावर तीन दिवसानीं मला थोडें बरें वाटलेसें दिसतांच येथल्या न्यायमंदिरांत मला उभें केलें आणि मी कांहींहि सांगण्याचें नाकारल्यामुळें मला बदमाष व चोर समजून १४ दिवसांची शिक्षा मिळाली. खरी हकीगत कोर्टापुढें सांगितली तरी कांहीं पुरावा मजजवळ नसल्यानें त्याचा कांहीं उपयोग नव्हता ह्मणून मी ती शिक्षा निमुटपणें भोगली. काल सायंकाळीं १४ दिवस संपले. तेव्हां आज मी मोकळा झालों आहे."

विष्णूनें सांगितलेल्या पुराणानें आश्चर्यचकित होऊन मी त्याला विचारलें कीं, 'कायरे विष्णु, ती बाई कोण असावी? तिला तूं कधीं पूर्वीं पाहिली होतीस काय?

**विष्णू:**—हो. हो. बहादरगंजांत मीं पाळतीवर होतो तेव्हां एकदां ती पत्र घेण्यासाठीं लक्ष्मणमिस्त्र्याच्या घराशेजारीं आली होती.

**मी:**—पोक्त दिसते का ती? मैनाबाई म्हणतात का तिला?

**विष्णू:**—हो. हो. तीच ती. प्रौढ व पोक्त असून मोठी गरीब दिसते ती.

कांहीं एक चमत्कारिक विचार माझ्या मनांत येऊन कृतज्ञतेनें माझें हृदय भरून गेलें. तिचा भाऊ आजारी होता, व नीलगंगेच्या रस्त्याकडे मला मध्यरात्रीं नेऊन तिनें मला तसेंच परत जाण्याला भाग पाडलें, यांत तिनें माझा प्राण वांचवावयाचा प्रयत्न तर केला नसेलना ? असें मला वाटलें.

स्त्रियश्चरित्रं, पुरुषस्य भाग्यं, देवो न जानाति कुतो मनुष्यः ? ॥

---

## प्रकरण एकविसावें

## सांपडण्याच्या बेतांत आलें !

दैवं निहत्य कुरु पौरुषमात्मशक्त्या ।
यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः ॥

असें हें विष्णुपुराण मोठें चमत्कारिक होतें. बिचाऱ्या विष्णूला विनाकारण बदमाष लोकांच्या संगतींत तुरुंगांत रखडावें लागलें, त्याबद्दल मला वाईट वाटलें, पण त्याला कांहीं उपाय नव्हता !

" वाइटांतून कधीं कधीं चांगलें निघतें" त्याप्रमाणें यावेळीं झालें. विष्णूचे हाल झाले खरे, तथापि पुष्कळ नव्या गोष्टी आह्मांला समजल्या. विष्णूच्या दृष्टीस तो मुडदा पडला, मैनाबाईला त्या मुडद्यासंबंधीं कांहीं माहिती आहे हें निश्चित झालें, आणि मैनाबाईला गांठून विचारलें तर तिच्याकडून त्या दिवशींच्या गोष्टीवर पुष्कळ प्रकाश पडेल अशी उमेद वाटूं लागली. हिरालाल, भैरूसिंग आणि मंडळी ही सोनेरी टोळी किती भयंकर आहे व असल्या पाषाणहृदयी मानववेषधारी हिंस्रपशूंच्या बरोबर आपल्याला झगडा करावयाचा आहे याची जाणीव उत्पन्न झाली.

विष्णूला पोलिसांनीं कोठें पकडला हें पोलिसांच्या डायरीवरून कळणें शक्य आहे हें जरी आह्मांला ठाऊक होतें, तरी इतर पुराव्याच्या अभावीं आमची बाजू लंगडी होती. खून झाला असें आम्हीं जाहीर केलें असतें तर पोलिसांनीं आह्मांलाच सळों कां पळों करून सोडलें असतें हें एक व त्यामुळें आमच्या शत्रूंचें आयतेंच फावलें असतें हें दुसरें— यामुळें आम्हीं तोंड दाबून बुक्क्यांचा मार खात स्वस्थ बसलों.

मैनाबाई खिन्न कां असते याबद्दल मात्र त्यानंतर आम्हीं पुष्कळ विचार केला. खून झालेल्या मुलाचा व तिचा कांहीं संबंध असावा व तेवढ्या कारणानें तिच्या मनाला जास्त त्रास व्हावा ह्मणून त्या मुलाचें प्रेत त्या चांडाळांनीं तिच्या दृष्टीसमोर आणलें असावें असा आम्हीं तर्क बसविला.

मूलचंदजी व काशीराम यांना 'मीं आज दवाखान्यांत येणार नाहीं' असा निरोप पाठवून, विष्णूला घेऊन मीं संध्याकाळीं मनकामनेश्वराच्या मंदिराकडे गेलों. तेथें तीं स्त्रीपुरुषें आमची वाट पहात होतीं. विष्णूला पुष्कळ दिवसांनीं सुखरूप परत आलेला पाहून त्यांनां आनंद वाटला. त्याची सगळी हकीगत त्यांस समजल्यावर त्यांना फार वाईट वाटलें, तथापि विष्णूच्या धाडसाचें त्यांनां कौतुक वाटलें. अगोदर बरेच दिवस उज्जयिनींत राहून त्यांना कंटाळा आला होता व ह्मणून त्यांचा हेतु मथुरा, वृन्दावन, अयोध्या इत्यादि क्षेत्रांत जाण्याचा होता. विष्णूवर त्यांचा लोभ असे; त्याला भेटून मग जावें अशा विचारामुळें तीं दोघें आतांपर्यंत उज्जयिनींत राहिलीं होतीं, परंतु मध्यें विष्णू बेपत्ता झाल्यामुळें त्यांचा मोठा हिरमोड होऊन त्यांनीं निरुपायानें आपल्या जाण्याचा दिवस निश्चित केला होता. त्याच्या आधल्या दिवशीं विष्णूची अकस्मात भेट झाल्यानें त्यांना मोठा हर्ष झाला, आणि त्यांना आतां

तीर्थयात्रेला जाण्याला चांगला हुरूप आला. प्रवासांत अवश्य लागणाऱ्या वस्तु आपणांजवळ घेऊन बाकीच्या सर्व जिनसा त्यांनीं मोठ्या संतोषानें विष्णूला दिल्या, आणि विष्णू आल्याच्या तिसऱ्या दिवशीं शुभ दिवस पाहून गर्गाचार्यांच्या मुहूर्तानें उज्जयिनींतून कायमचें प्रयाण केलें.

संसारांत रोजच्यारोज लागणाऱ्या सर्व वस्तु घरांत असल्यामुळें विष्णूला त्या घरांत राहणें फार सोइस्कर झालें. नारायणजी ज्योतिषी त्या संधीला कोठें परगांवीं गेले असल्यामुळें, पुढें कसें करावयाचें याबद्दलचें खलबत विष्णू व मी मिळून केलें.

त्या घरांत द्रव्य कोठें ठेवलेलें असावें त्याचा विष्णूनें आपल्यापरी तर्क केला होता, तेव्हां त्या कार्याला आरंभ करावयाचा ह्मणून त्या दिवशीं रात्रीं त्या घरीं निजण्याचें ठरविलें, व आम्हीं दोघांनीं संध्याकाळीं आमच्या घरीं जेवण उरकलें व आपल्या कामाला लागलों. सर्व कामें रात्र पडल्यावर सुरू व्हावयाचीं होतीं. ह्मणून मनकामनेश्वराच्या आवारांत पोंचल्याबरोबर आह्मीं अगोदर कंदील पुसून, स्वच्छ करून तेलवात घालून तयार ठेवले. पाण्याच्या दोन बालड्या भरून ठेवल्या, व नंतर आगटी पेटवून शेकत बसलों. वेळ प्रसंग पडल्यास उपयोगी पडावेत ह्मणून दोन सोडगेहि तयार ठेवले होते. कुदळी, फावडे, पहारी, टोपल्या, खिळे, चिमटे वगैरे ज्या ज्या वस्तु आह्मांला लागतील असें आह्मांला वाटलें त्या त्या सर्व अगदीं तयार ठेवल्या होत्या.

रात्रीं दहा वाजतां हातांत कंदील व बडगे घेऊन कोठें कांहीं दगाफटका तर नाहींना हें पाहण्यासाठीं आम्हीं घरांसभोंवतीं हिंडलों, व चोहोकडे सामसूम आहे, कोणत्याहि तऱ्हेचा संशय येण्याजोगा प्रकार नाहीं अशी मनाची खात्री करून घेतल्यावर आम्हीं घरांत परत आलों व आंतून कड्या लावून घेतल्या.

घरांत द्रव्य आहे व तें जिना चढून माडीवर गेल्यावर, डाव्या हाताला–पश्चिम दिशेला–जी खोली आहे तिच्या पटावांत असण्याचा संभव आहे अशी विष्णूची कल्पना होती असें मागें सांगितलेंच आहे; त्याप्रमाणें आज तीच जागा पहावयाची, असा आम्हीं संकल्प केला. आम्हीं दोघांनीं एका हातांत कंदील व दुसऱ्या हातांत एक हातोडा घेतला आणि जिना चढून माडीवर गेलों. नंतर खोलींतल्या प्रत्येक भिंतीवर हातोडा मारून भिंतींतून कांहीं आवाज विवाज निघतो कीं काय तें पाहिलें. जी खोली आम्हीं आरंभीं तपासण्याचें ठरविलें होतें ती इतर सर्व खोल्यांपेक्षां जास्त प्रशस्त असून तिच्यांतील भिंतीवर शिंपांच्या चुन्याचा मुलामा केलेला होता. भिंती इतर खोल्यांच्या भिंतीं-पेक्षां जाड होत्या, व त्यांवर पुष्कळ चित्रें काढलेलीं होतीं. खोलीच्या पटावावर फार सुंदर कोरीव काम केलेलें असून वाड्यांत वस्ती असतांना वाड्यांतल्या मुख्य मुख्य खोल्यांपैकीं ती एक असावी असें वाटत होतें. खिडक्यांतून खालीं अंगणांत पाहिलें ह्मणजे मनकामनेश्वराचें चित्र कोरलेला दगडाचा चबूत्रा दिसे व त्यावर स्थापन केलेल्या महादेवाचें सहजगत्या दर्शन होत असे. त्या खोलींतल्या प्रत्येक भिंतीवर हातोडा मारून पहातां एका भिंतींतून चार फूट औरस चौरस जागेंतून लांक-डावर हातोडा मारल्यावर जसा ध्वनि निघावा तसा ध्वनि निघालेला आह्मांला ऐकूं आला. अर्थात भिंतींतली गुप्त जागा तेथें असावी असा तर्क करून आम्हीं आपल्या कामाला प्रारंभ केला. भिंत फोडावयाची ह्मणजे पर्यायानें त्या खोलीचा नाश करावयाचा हें उघडच होतें, पण घर विकत घेतांनाच आमचा तसा हेतु असल्यामुळें घराचा नाश कर-तांना आह्मांला यत्किंचितहि विचार पडला नाहीं. पहिल्यानें आम्हीं तळमजल्यावर गेलों व आह्मांस जरूर लागणारीं सर्व अवजारें व इतर

वस्तु घेऊन आलों. नंतर दोन्ही कंदील दोन खुंट्यांना लटकाऊन दिल्यावर पहिल्यानें हातोडे हातीं घेऊन आम्हीं जेथें आह्मांस संशय आला त्या जागेवर भिंत खोदण्यास सुरवात केली, व कुदळीनें खोदतां येईल येवढें भोंक पाडल्यावर कुदळीनें खोदून भिंतीला एक मोठें भगदाड पाडलें. त्या भगदाडाच्या आंत भिंतीमध्यें जाड फळी आमच्या दृष्टीस पडली तेव्हां आह्मांला जास्त हुरूप आला आणि पुन्हां जोरजोरानें घाव घालून जेव्हां आसपासची पुष्कळशी माती आम्हीं खालीं पाडली तेव्हां ती लांकडी फळी ह्मणजे एक भलें भक्कम दार असावें असें आह्मांला आढळून आलें. तें दार दृष्टीस पडल्यावर आह्मांला जो आनंद झाला तो काय विचारावयाचा आहे? त्या वेळीं इकडचा तिकडचा दुसरा कांहीं विचार आमच्या मनांत आलाच नाहीं! आह्मांला मोठा हर्ष झाला व मोठी उमेद आली. विष्णु तर आनंदानें उड्या मारूं लागला. आतां काय हत्ती गेला व शेंपूटच काय तें राहिलें असें त्याला वाटलें.

त्या दारावरची माती सर्व बाजूंनीं काढल्यावर आह्मीं तें उघडण्याचा पुष्कळ यत्न केला. पण तें कांहीं केल्या उघडेना. त्याला कडी किंवा कोयंडा कोठेंहि दिसेना, आणि त्याची उघडावयाची युक्ति तर ध्यानांत येईना. विष्णूनें दार उघडण्याची आपल्याकडून शिकस्त केली, पण आसपासची आणखी बरीच भिंत पाडल्याशिवाय तें दार निघेल असें कांहींच चिन्ह दिसेना, त्यामुळें विष्णु थोडासा चिरडीला देखील आला. भीमासिंग राजपुत्रानें ठेवलेलें द्रव्य व आह्मीं, यांच्या मध्यें फक्त ती लांकडाची फळीच काय ती आड होती. स्वर्ग आतां फक्त दीड बोटच उरला आहे अशी त्याची भावना होती.

त्याची तशी भावना होती आणि माझी नव्हती असें मात्र नाहीं. विष्णू प्रमाणें माझीहि अशी ठाम समजूत होती कीं भीमासिंगानें ठेवलेलें

द्रव्य जर आपल्याला सांपडलें तर तें १०० हिश्शानें आह्मीं हुडकत होतों त्या घरांतच सांपडेल. एरवीं अशा प्रकारची ठेव आपल्या हक्काच्या जागीं ठेवण्याची सोडून कोणी ही मनुष्य कोठल्या तरी इतर ठिकाणीं ती कशी ठेवील ?

आणि म्हणून हरप्रयत्नानें ती ठेव आतां हुडकून काढलीच पाहिजे होती. माती वरचेवर पडून पडून सगळ्या खोलीभर धुरळाच धुरळा उडालेला होता. आमच्या आंगांवर व नाकांतोंडांतून धुरळा जमलेला जमलेला होता, आणि खोदण्याच्या मेहनतीमुळें थोडा थोडा घाम येऊन आमचें सर्व अंग बरबटून गेलें होतें.

तें लांकडी दार इतकें मजबूत बसविलेलें होतें कीं तें आतां तोडून काढल्याशिवाय निघावयाचें नाहीं अशी आमची खात्री झाली. मोठे मोठे लोखंडी खिळे मारून तें पक्कें बसवून टाकिलें होतें कीं तें घट्ट बसावें ह्मणून कांहीं योजना केली होती हें पाहण्यासाठीं जेव्हां त्यावर कुदळीचे घाव मारूं लागलों तेव्हां लांकडाचें थोडे थोडे तुकडे निघूं लागले, व एक मोठासा तुकडा निघाल्यावर त्या दाराला आंतल्या बाजूनें लोखंडी पत्रा बसविलेला आह्मांला आढळून आला.

आतां तें दार तोडावयाचें तरी कसें ? लोखंडाचा पत्रा चांगला भरभक्कम जाडीचा होता आणि तो मोठ्या मजबुतीनें लांकडाशीं एकजीव केलेला होता. तें पाहून विष्णू ह्मणाला, ‘ तात्या, इतका बंदोबस्त केलेला आहे तेव्हां आंत खास कांहीं तरी असलें पाहिजे.’

**मी**—हो हो. परंतु आतां दार मोडण्याचा प्रयत्न करण्यापेक्षां दाराच्या जवळची ही भिंत आपण पाडूं ह्मणजे मग त्या भोकांतून दारावर पहारीचा जोर द्यायला आपल्याला सोईचें होईल, नाहीं बरें ?

विष्णूला माझा बेत पसंत पडला आणि आह्मीं दाराजवळची एकीकडची भिंत पाडूं लागलों. भिंतीचे वरचे चुन्याचे पापुद्रे लवकर लवकर निघाले पण नंतर जेव्हां चुन्यांत घट्ट बसलेल्या विटांची भिंत लागली तेव्हां आम्हांला जुनें काम कसें मजबूत असतें तें खरें खरें कळलें. दहा पांच कुदळी पडल्या ह्मणजे चुन्याचा अगर विटांचा लहानसा तुकडा निघे. पूर्वींचें चुना व विटा यांनीं बांधलेलें काम जितकें मजबूत आहे तितकें हल्लीचें दगड व चुना यांनीं बांधलेलें देखील काम नाहीं. मग काय पूर्वींच्या अज्ञानयुगांत इंजिनियरांना हल्लीच्या सारखें रिपेअर करण्याचें काम अगर विद्या ठाऊकच नव्हती कीं काय कोण जाणे ?

शेवटीं, सांगण्याचें तात्पर्य काय, तर पहाटें पांच वाजेपर्यंत आह्मीं दोघानीं जेव्हां एक सारखी मेहेनत केली, तेव्हां एकदांचें तें दार आह्मांला हलवून एकीकडे करून ठेवतां आलें. आणि तें दार एकीकडे ठेवून दिल्यानंतर आह्मीं पहातों तों तेथें एक अगदीं रिकामें फडताळ होतें !

---

## प्रकरण बाविसावें.

# अहम्, आवाम्, वयम् ॥

**मन मेला, तन उजला, बगला कपटी अंग ।**
**तातें तो कौआ भला, तन मन एकहि रंग ! ॥**

मी म्हणालों ' विष्णु, हें गड्या कांहीं ठीक झालें नाहीं. इतका खटाटोप करून शेवटीं ॐ फस् झालें तें वेगळेंच. आतां निदान पुन्हां दुसरीकडे आपण हुडकूं तेव्हां तरी तें सांपडो म्हणजे मिळविली.

**विष्णू:**—काय करावें ? कन्हय्यालालानें हिरालालाला दिलेला कागद एक तासभर जरी आपल्याला मिळाला तरी केवढें कार्य होईल !

**मी:**—अरे, मगरानें गिळलेल्या माणकाची गोष्ट काय कामाची ?

**विष्णू:**—पण, तात्या ? कायहो, आपण येथें रहातों हें त्या भामट्यांना कळलें असेल काय ?

**मी:**—हो. कळलेंही असेल. त्यांच्यापैकीं जर आपणावर कोणी पाळत ठेवली असली तर त्याचा काय नियम सांगावा ?

**विष्णू:**—मग आपल्याला आतां पुरतें संभाळूनच असलें पाहिजे. बापाला बाप ह्मणायचे नाहींत अशापैकीं लोक आहेत ते.

**मी:**—हो तें तर खरेंच. पण कायरे विष्णु, जो मुडदा तुझ्या दृष्टीस पडला तो कोणाचा येवढें जरी समजलें तरी तेवढ्यावरून आपल्याला त्या चोरांचा सुगावा लावतां येईल.

**विष्णू:**—होय, पण तो पत्ता लागायचा कसा ? त्या मैनाबाईला गांठून विचारलें तर खास कांहीं तरी पत्ता लागेल. तेव्हां तुम्हीं एकदां तिला विचारा. काय घाबरली होती त्या दिवशीं रात्रीं ती !

त्याची सूचना ठीक होती पण ती त्या प्रसंगीं अव्यवहार्य होती. हातचें सोडून पळत्याच्या पाठीस लागावें त्या प्रमाणें घर खोदून पहाण्याचें काम अर्धवट टाकून मैनाबाईच्या शोधाला हिंडावयाचें ह्मणजे एक तो खुळेपणाच झाला असता. बरें विष्णु जर त्या घरांत एकटा रहावयाला कबूल झाला असता तर मी कदाचित् गेलोंहि असतों. पण तो तेथें रहावयाला कबूल होईना, आणि मैनाबाईकडे तो गेला असता तर घर व दवाखाना सोडून मीं तेथें त्या घरीं रहाणार कसा ?

खोलीचा पटाव लक्ष्यपूर्वक पाहिला व तेथेंही निराशा झाल्यामुळें आम्हीं त्या वेळेला अगदीं कंटाळलों व सकाळची वेळ झाली होती म्हणून घराकडे जाण्यास निघालों. वाटेनें आमचें बोलणें चाललेंच

होतें. आतां ज्या अर्थी कामाला एकदा हात घातला आहे त्या अर्थी कितीही दिवस लागोत, किंवा कदाचित् सगळें घरच्या घर खणून काढण्याचा प्रसंग येवो, माघार म्हणून घ्यायची नाहीं असा आमचा निश्चय झाला. कागदपत्रांवरून, भीमसिंग राजपुत्रानें धन कोठें तरी खास ठेवलें आहे हें आतां अगदीं निश्चत झालें होतें; शिवाय तें चांगल्या सुरक्षित स्थळीं ठेवलेलें असून नीळकंठशास्त्री चितोडवाले व त्यांचे वंशज यांना त्याचें रक्षक ह्मणून ठेवलेले होते, येवढेंच नव्हे तर मनकामनेश्वराच्या आवारांत, वाड्याच्या जवळ त्यांना कायमचें घर बांधून दिलें होतें. तेव्हां आतां असा सिद्धांत साहजिकपणेंच निघत होता कीं तें द्रव्य त्या वाड्यांतच कोठें तरी ठेवलेलें असलें पाहिजे; तसें जर नसतें तर वाड्याला लागून नीळकंठशास्त्र्याला घर बांधून देण्याचा उद्देश काय असावा? अर्थातच नीलकंठशास्त्र्याला किंवा त्यांच्या मुलाबाळांना आपल्या घरांत बसून धनाचेंही रक्षण करितां यावें.

विष्णु थोडासा गिडग्याप्पाच होता. हुच्चच तो. तो काय म्हणाला, कीं हिरालालानें ज्या अर्थी नारायणजी ज्योतिषांच्या घरांवर रात्रीं हल्ला करून ते महत्त्वाचे कागद लांबविले त्या अर्थी आपणही तशीच कांहीं युक्ति काढून कन्हय्यालालानें हिरालालला दिलेला कागद उपटावा. एकानें गाय मारली म्हणून दुसऱ्यानें वासरूं मारलें, इतकाच शहाणपणा त्यांत होता. सावधगिरीनें पाऊल टाकलें तर हळुहळू केव्हां तरी आपल्याला चांगले दिवस येतील असें माझें मन सांगे! तथापि दिवस कठीण येत चालले होतें, तेव्हां आतां त्या जागेवर तरी हल्ला होऊं नये एतदर्थ आम्हांपैकीं कोणीना कोणी तरी एखादा तेथें हजर रहातच होता!

अशा रीतीनें पुष्कळ दिवस गेले. एकी मागून दुसरी या प्रमाणें क्रमाक्रमानें आम्हीं त्या घरांतल्या सर्व खोल्या व जागा उकरून पाहिल्या पण आम्हांला कोठें कांहीं आढळलें नाहीं.

त्या संधीला दंडधाऱ्याची बदली कानपुराहून उज्जयिनीस झाली होती. नारायणरावानें मला एक पत्र पाठवून आपली बदली झाल्याचें कळवून उज्जयिनीस पोचण्याची तारीख व वेळ कळविली होती, व त्या प्रमाणें ठरल्या तारखेला व ठरलेल्या वेळीं स्वारी एकदाची आगगाडींतून स्टेशनावर उतरली ! ‘ बोले तैसा चाले ’ हा प्रकार नारायणरावांना अगदींच नवीन असल्यानें कानपुराहून हा नवा गुण त्यांनीं आपल्या बरोबर आणल्याचें पाहून आम्हीं त्यांचें अभिनन्दन केलें. ते एकटेच आले होते. बाकीची मंडळी अद्यापि ब्रम्हावर्ताला असून मागून कांहीं दिवसांनीं येणार होती. तेव्हां नारायणरावांनीं आपले दण्डकमण्डलु आमच्या घरींच ठेवण्याचें ठरविलें.

मिया मूठभर पण दाढी हातभर ! गृहस्थ एकटा आला होता पण सामान बरोबर किती ! ब्रह्मावर्तास पेरू पुष्कळ व आगगाडीची नोकरी, असें असल्यामुळें भाड्यातोड्याचा कांहीं प्रश्नच नव्हता, तेव्हां पेरवांचें एक स्वतंत्र टोपलेंच त्यांनीं बरोबर आणलें होतें. शिवाय कानपूरच्या व ब्रह्मावर्ताच्या लोकांनीं उज्जयिनीच्या आपल्या इष्टमित्रांस देण्याकरितां ह्मणून दिलेलीं पत्रें होतीं. जणूं काय पोष्टाचा मार्ग अगदीं बंद पडला असून हाच काय तो अगदीं विश्वासुक असा पोष्टमन त्यांना मिळाला ! अगदीं ‘ जरूरीचे ’ निरोप तर त्यानीं कित्तीतरी बरोबर आणले होते. विष्णूची व त्यांची ओळख होतांच विष्णूनें तीं पत्रें व निरोप पोचविण्याचें आनंदानें कबूल केलें, व नारायणरावानीं प्रत्येक पत्ता त्याला नीट समजाऊन सांगितला व प्रत्येक पत्राबरोबरचा

जरूरीचा निरोपहि कळविला, आणि पत्रें त्याच्या स्वाधीन केलीं. त्या पत्रांवर 'उज्जयिनी' येवढाच काय तो एक शब्द सर्वांना लागू पडणारा होता. कारण एक पत्र शहरापासून ३ मैलांवर कोठीवर देण्याचें होतें व शिवाय जणूं काय पत्रांत लिहिलेलें पुरेसें न वाटल्यामुळें एक सव्वा हात निरोपही होता. दुसरें एक पत्र या भागांतलें व तिसरें त्या भागांतलें अशा रीतीनें देऊं गेल्यास चार दिवस सुद्धां पत्रें जिकडचीं तिकडे पोचविण्यास पुरले नसते. शिवाय ताजाकलम ह्मणून सांगितलेले निरोप मालक भेटेपर्यंत सांगावयाचे कुणाला? विष्णू मोठा धोरणी होता. त्या पत्रांचें महत्व खरोखर किती हें त्यानें जाणलें होतें. शिवाय जीं पत्रें पोष्टाचें एक तिकीट लावतांच मालकाला पोंचणार तीं स्वतः नेऊन पोचविण्यांत आपले हाल किती होतात हें नारायणरावाच्या जरी लक्ष्यांत आलें नसलें तरी विष्णूच्या लक्ष्यांत आलें होतें, तेव्हां त्यानें तीं सर्व पत्रें गोळा केलीं आणि मुकाट्यानें पोष्टाच्या पेटींत टाकून दिलीं. तीं आपआपल्या ठिकाणीं पोचलींच असतील, कारण त्या बद्दल नारायणरावाकडे कधींहि तक्रार आली नाहीं. रात्रीं आंथरुणावर पडल्यावर विष्णूनें जेव्हां आपण पत्रांचें काय केले तें सांगितलें तेव्हां दण्डधारी काय ते उमगले. पण त्यांनांहि एकंदरीत तें आवडलें असें दिसलें. असो.

नारायणराव फार दिवसांनीं भेटला होता. तो गेल्यापासून उज्जयिनीस काय काय घडामोडी झाल्या त्यांचा उहापोह झाला. महाकालेश्वराच्या मंदिरांतील अव्यवस्थेबद्दल खेदप्रदर्शन झालें. शेवटीं सज्जनसिंहाची व चितोडगडाची गोष्ट निघाली, आणि नंतर आह्मीं मनकामनेश्वराच्या प्रकरणासंबंधीं आजपर्यंत जें जें कांहीं केलें तेंहि त्याला इत्थंभूत सांगितलें. आम्हीं त्या कागदपत्रांवरून पत्ता लावीत लावीत मनकामनेश्वराच्या आवारांतील विजयसिंगाचा वाडा देखील उकरून पहाण्याच्या खटाटो-


पांत आहोंत हें समजल्यामुळें नारायणरावाला मोठें कौतुक वाटून त्यानें आह्मांला मनापासून शाबासकी दिली, व आपणहि आह्मांला पूर्ण साह्य करण्याचें अभिवचन दिलें.

दुसरे दिवशीं आह्मीं त्रिवर्ग मनकामनेश्वराकडे गेलों. तेथील एकंदर देखावा पाहून त्याला मोठी मौज वाटली. विजयसिंगाच्या वाड्यांतली आह्मीं केलेली पाडापाडी पाहून आह्मीं कसा उद्योग चालविला होता हें त्याला कळून आलें.


संध्याकाळीं आम्हीं अगोदर बेगमसाहेबांच्या कबरीकडे व नंतर श्री महाकालेश्वराच्या मंदिरांत गेलों. नारायणराव उज्जयिनीस फार दिवसांनीं आला होता, तेव्हां प्रत्येक ओळखीचा माणूस भेटला कीं त्याचा नमस्कार चमत्कार व्हायचाच. मंदिरांतल्या पटांगणांत तर ४।५ लोक त्याच्या ओळखीचे भेटले. तेव्हां त्याला त्यांच्याबरोबर तसाच बोलत राहूं देऊन विष्णू व मी ॐकारेश्वराच्या पटांगणांतून खालीं उतरलों व जोडे काढून ठेऊन कोटितीर्थांत हात पाय धुवावयाला गेलों.

**सात्विकच** तो. रमला तेथें रमला ! आम्हीं कोटितीर्थांवर त्याची वाट पाहिली आणि नंतर कंटाळून पायऱ्या चढून वर आलों, तो माझ्या ओळखीचे एक सद्गृहस्थ मला भेटले. त्यांच्याशीं दोन शब्द बोललों व ते गृहस्थ आपल्या कामाला निघून गेल्यावर आम्हीं नारायणरावांचा शोध करायला पायऱ्या चढून ॐकारेश्वराच्या पटांगणांत जाणार होतों तों नारायणराव पायऱ्या उतरून खालीं उतरत असलेले आम्हांला दिसले. आम्हांला पाहिल्यावर ते म्हणतात कीं

‘ तात्या, बोल, दे टाळी ! तुला अगदीं पाहिजे असा एक मनुष्य दाखविला तर काय देशील बोल ? ’



बेगमसाहेबांची कबर, उज्जयिनी.



**मन्दिर महाकालेश्वर, उज्जयिनी, ( उत्तर दृश्य )**

( या मंदिरांत वरच्या बाजूला श्रीॐकारेश्वराचें स्थान असून श्रीमहाकालेश्वराचें स्थान खालीं तळघरांत आहे. )

मी ह्मणालो कीं 'काय मागशील तें देईन. पण कोण तो ?'

दंडधारी—अरे भैरूसिंग ! पहायचा आहे का तुला तो ? चल वर ॐकारेश्वराच्या देवळांत बसला आहे, तोच आहे का पहा ?

विष्णू आणि मीं अगदीं आश्चर्यचकित झालों, आणि कांहीं न बोलतां नारायणरावाबरोबर पायऱ्या चढून वर ओंकारेश्वराच्या मंदिराकडे गेलों.

ॐकारेश्वराचें मंदिर वरच्या बाजूला असून त्याच्या खालच्या बाजूला तळघरांत श्रीमहाकालेश्वराची स्थापना झालेली आहे. प्राचीन-काळीं बहुधा अशी रचना नसावी. ॐकारेश्वराच्या मंदिरांतून महाकालेश्वराची शाळुंका दिसावी अशा प्रकारची व्यवस्था केलेली आहे. महाकालेश्वराच्या दर्शनासाठीं आम्हीं त्या मंदिरांत आलों होतों, पण भैरूसिंगाचें दर्शन घडावयाचें होतें ह्मणून 'शिष्टागमने अनाध्यायः' या न्यायानें महाकालेश्वराचें दर्शन आम्हीं त्याच्या गाभाऱ्यांत न जातां ॐकारेश्वराचे मंदिरांतूनच घेण्याचें ठरविलें आणि नारायण-रावाबरोबर ॐकारेश्वराचे मंदिरांत गेलों.

मंदिरांतल्या एका बाजूला दोन माणसें सभामंडपाच्या एका टोंकाला चिलीम ओढींत बसलीं होतीं. त्यांपैकीं एक मुलगेलासा होता व दुसरा प्रौढ वयाचा होता. त्यांनां पहातांच विष्णूनें मला किंचित दाबलें व मला तो म्हणाला कीं तात्या, तोच हो तो, मोठ्या मिशांचा माणूस. त्यानेंच त्या मैनाबाईच्या मुस्कटांत मारलीन् !' नारायणरावानेंहि मला तो भैरूसिंग असल्याचें सांगितलें. आम्हीं तिघे-जण त्याच्या जवळ जातांच त्यानें आम्हांकडे व विशेषतः नारायण-रावांकडे एकदां कठोर नजरेनें पाहिलें आणि हातांतल्या चिलिमीमधील राख झाडून टाकून चिलीम व फडकें खिशांत घातलें आणि त्याच्या-जवळ असलेल्या दुसऱ्या माणसाबरोबर तो मंदिराच्या बाहेर पडला.

## प्रकरण तेविसावें

# अर्वाचीन शर्विलक.

**साखर तजे न * गळपणू । सोमल तजे न झेर ॥**
**सज्जन तजे न सहनता । दुर्जन तजे न वेर ॥**

भैरूसिंग अशा आकस्मिक कारणानें आम्हांला दिसला. पण आमची व त्याची दृष्टादृष्ट होतांच तो निघून गेला तें पाहून नारायणराव ह्मणाला 'तात्या संभाळा बरें, आतां उपाय नाहीं हें तर खरेंच. पण भैरूसिंग तुमचा शत्रू आहे हें ध्यानांत ठेवून सावधगिरीनें वागा बरें ? तुला तर त्यानें एकदां आपला पराक्रम दाखविलाहि आहे.

मीं–होय बोवा. पण कायरे, त्या मुक्याला या भैरूसिंगाबद्दल माहिती असण्याचा काय संभव आहे ? आम्हीं दवाखान्यांत गेलो होतो तेव्हां त्या मुक्यानें 'भैरूसिंग चोर' असें एका कागदांत लिहिलें होतें वगैरे हकीगत मी तुम्हांला सांगितलीच आहे'

नारायणराव–काय संभव आहे कोणाला ठाऊक ? पण अशक्य त्यांत कांहीं एक नाहीं. भैरूसिंगाची गोष्ट पुष्कळांना ठाऊक असेल. मला सुद्धां पुष्कळ माहिती आहे त्याची.

विष्णू–काय काय ठाऊक आहे तुह्मांला तें सांगा.

**नारायणराव**–अहो, आज कांहीं नाहीं तरी पंधरा वर्षें तरी झालीं असतील, माझी व त्याची ओळख व्हायला. अजमिरास रेल्वे ऑफिसमध्यें मी कामाला लागलों तेव्हां तो आमच्या ऑफिस मधला चपराशी होता. त्यानें आमच्या मुख्य साहेबांची मर्जी संपादन केलेली असल्यामुळें तो आमच्या सारख्या 'बाबू लोकांनां' तुच्छ समजत असे. नेहमीं उशीरा यावें, काम ऐकलें न ऐकलें असें करावें, हेडक्लार्क

* गोडी, गूळपणा.

कांहीं बोलल्यास त्याच्यावरच गुरगुरून वेळीं अवेळीं त्याला दुरुत्तरें करावीं, ‘ साहेबके कामके वास्ते गयेथे ’ अशी ठरावीक सबब नेहमीं सांगावी व आफिस मधील सर्व लोकांजवळ कांहीं उसनी रकम मागत असावी, निदान विडी व काड्याची पेटी तरी त्यांनीं द्यावी अशी याचना त्यानें नेहमीं करावी, असें नेहमीं होत असे. आमचे हेड-क्लार्क बाबू अंबाप्रसाद भार्गव महाभित्रा मनुष्य होता. ‘ येस सर,’ ‘ युवर ऑनर, ’ ‘ रिस्पेक्टेड सर ’ या शद्बांनीं त्यानें नेहमीं साहेबा-शीं बोलण्याचा आरंभ करावा, तो झक् मारील तर भैरूसिंगाची कागाळी साहेबाजवळ करील आणि साहेब हेनरी ड्रेक ब्रॉकमन तर असा वाह्यात होता कीं त्यानें भैरूसिंगासमक्ष हेडक्लार्कापासून चपराशापर्यंत सर्वांची अप्रतिष्ठा करावी आणि नेहमीं तोंड लाल करून धुंदींत असावें. बरें, आमच्यासारख्यानें कोणी अशी तक्रार करावी तर, ‘ आधींच मर्कट, तशांतहि मद्य प्याला ’ अशा माणसाजवळ जाऊन शिव्या खाव्या व ‘ बाबूको कहो ’ असें उत्तर ऐकावें, असें झाल्यामुळें ऑफिसमधील मंडळी भैरूसिंगाचा उन्मत्तपणा मुकाट्यानें सहन करीत असत. भैरूसिंगानें नेहमीं मेमसाहेबांच्या पुढें पुढें करावें, ‘ छोटे साहेब, ’ ‘ बाबा लोग, ’ वगैरे पोरांना खेळवावें, त्यांना नानातऱ्हेच्या वस्तु आणून द्याव्या, त्यांना पांढऱ्या स्वच्छ गाढवांवर बसवून रोज फिरावयाला न्यावें, मेमसाहेबांना, नाताळ, बडा दिन, ईस्टर वगैरे सणांच्या दिवशीं डाली द्यावी, ऑफिसमधला कोणचा बाबू कसा आहे, कोणता चपराशी चांगला आहे, कोणता वाईट आहे हें सांगावें, साहेबांची स्तुति करून त्यास भोळा ह्मणावें, मेमसाहेबांच्या औदार्याची व गुणाची सर्वतोमुखी कशी प्रशंसा चालते त्याचें वर्णन करावें. या व इतर अनेक गुणांमुळें भैरूसिंगावर मेमसाहेबांचा परा-

कांचा विश्वास असे. अंडी व कोंबड्या आणण्यापासून तों सेव्हिंग बँकेमध्यें दर महिन्याच्या महिन्याला रुपये जमा करावयाचें काम देखील भैरूसिंगाकडे असे. साहेबाला, मेमसाहेबाला किंवा भैरूसिंगाला काय परीस सांपडला होता कोण जाणे ? साहेबाचा जेवढा पगार येई तो पैन्‌पै पोष्टांत जमा होऊन देखील घरचा सर्व खर्च महिन्यान् महिना मोठ्या थाटामाटानें चालत असे.

हळूहळू भैरूसिंगाची प्रतिष्ठा वाढूं लागली. पगार तितकाच पण पोषाखांत व थाटामाटांत त्यानें पुष्कळ खर्च करावा. मेमसाहेबांचें व त्याचें हितगुज होऊं लागलें, तो वेळीं अवेळीं साहेबाच्या बंगल्यावरच राहूं लागला. पुढें पुढें मेमसाहेबाचें सर्व काम सांभाळण्यास व मुलबाळांची जोपासना करण्यास भैरूसिंगाइतका प्रामाणिक व योग्य मनुष्य दुसरा नसल्यानें मेमसाहेब विलायतेला जायला निघाल्या तेव्हां भैरूसिंगासहि बरोबर नेण्याचें ठरलें. विलायतेला जाण्याच्या अगोदर बऱ्याच दिवसांपासून मेमसाहेब व साहेब यांचें पटेनासे झालें होतें. शुष्क कारणावरून साहेबानीं एके दिवशीं आपला रिव्हॉल्व्हरहि काढला होता. मग काय आत्महत्या करण्याचा विचार होता कीं मेमसाहेबांना खिस्तलोकाला धाडण्याचा इरादा होता देव जाणें. भैरूसिंगावर पूर्वीप्रमाणें साहेबाची मर्जी नव्हती, पण त्याला नोकरीवरून दूर करण्याचा त्यांना कंपनीनें अधिकार दिला नव्हता कीं आणखी कांहीं कारण होतें तें कोणाला ठाऊक ? साहेब नियमानें ऑफिस मध्यें येत नाहींत, नेहमीं मदिरा किंवा मृगया यांमध्यें गर्क असतात, हाताखालच्या लोकांना फार त्रास देतात, सगळाच्या सगळा पगार दर महिन्यांत बँकेत ठेवतात, अशा कागाळ्या अनेकवार ऐकल्यामुळें मुंबईच्या हेडआफिस मधून त्यांना एजंटास

घेऊन तावडतोब भेटा असा हुकूम आला होता व त्याच संधीला मेमसाहेब विलायतेला जायला निघणार होत्या. पण साहेब एकटेच मुंबईस गेले. व कोठें उतरले कोण जाणें. मेमसाहेब, त्यांचीं पोरें व भैरूसिंग त्यांच्या मागून मुंबईस जाऊन वॉटसन् हॉटेलांत उतरले. बोट निघायला दोन दिवस अवकाश होता म्हणून मेमसाहेब आपल्या इष्टमित्रांना भेटण्यासाठीं गेल्या आणि इकडे भैरूसिंग मेमसाहेबांचें सर्व सामान व सगळें द्रव्य घेऊन आपल्या इष्टमित्रांना भेटण्यासाठीं गेला! बाई सायंकाळीं परत आल्या पण भैरूसिंग कांहीं पुन्हां आला नाहीं. तारा, पत्रें, धावाधांवी, पोलिस, सर्व कांहीं झालें पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. हेनरी ड्रेक ब्रॉकमन याला नंतर मुंबईस सर्व हकीगत समजली, पण एक तर त्याच्यावरच वरिष्ठांकडून कांहीं ठपका आल्यामुळें तो फिकिरींत होता! शिवाय बायकोचा व त्याचा बारावा बृहस्पती! शेवटीं काय? साहेबाची बदली कमी पगारावर दुसरीकडे झाली, व घटस्फोट करून बाईसाहेबहि कोणीकडे काळें करून गेल्या.

भैरूसिंगाचा पुढें बरेच दिवस पत्ता नव्हता. अजमीर येथें ख्वाजा पिराची मोठी यात्रा भरते त्या संधीला मी नंतर त्याला एकदां पाहिला होता. नंतर तो चोऱ्या करून कधीं किसनगड, बियावर, नसीराबाद वगैरे गांवीं असतो असें कधीं कधीं ऐकूं येई. पण अजमीरच्या पोलिसांच्या तडाक्यांत एकदां तो सांपडला व त्याला तीन वर्षांची बिनभाड्याची जागा मिळाली. त्यानंतर त्याचें काय झालें तें समजलें नव्हतें, तों स्वारी आज अकस्मात् दृष्टीस पडली. आणि पहा बरें या तुमच्या कारवाईमध्यें त्याचा डोळा आहे तेव्हां संभाळून असा."

**विष्णू**–बरें तो आमचें करणार काय?

**नारायण**—करणार काय ? काय वाटेल तें करील. मनकामनेश्वराच्या द्रव्याची गोष्ट त्यालाहि माहीत आहे व तुमच्या प्रमाणें तें हस्तगत करण्याची त्याचीहि धडपड चालू आहे.

**विष्णू**—आतां काय, आपण एकमेकांना तिघेजण आहोंत, पहावें आतां तो काय करतो तें.

**नारायणराव**—माझा उपयोग तुह्मांला कितपत होईल तें कांहीं सांगतां येत नाहीं. भैरूसिंग मला चांगला ओळखतो व 'ओळखीचा चोर जीवें मारी ' असें म्हणतात त्या प्रमाणें माझी व त्याची गांठ पडल्यास तो प्रसंगीं माझ्या जिवावर उठायला देखील कमी करावयाचा नाहीं.

**विष्णू**—पण त्याच्यावर पाळत राखून पोलिसाला जर त्याची खबर दिली व तो पकडला गेला तर ?

**नारायण**—ओहोरे पोलीस ! हे येथले रडवे पोलीस त्याला पकडणार आणि त्याच्यावर खटला करणार ? आणि घटकाभर समजा कीं तो सांपडला व आमच्या योगानें पकडला गेला तर आह्मीं मनकामनेश्वराच्या संबंधानें जे उद्योग करीत आहोंत त्या संबंधानें कांहीं बनावट गोष्टी कोर्टांत सांगेल, आम्हांला द्रव्य सांपडलें असून आम्हीं तें लपवून ठेवलें आहे असें बडबडेल आणि मग ' तसें कांहीं नाहीं ' असें सिद्ध करतां करतां आपल्याला पुरेवाट होईल. म्हणून बाबांनों, सध्यां तोंडाला कुलूप लावा आणि ' तुका ह्मणें उगें रहावें, जें जें होईल तें तें पहावें ' असें करा. "

' बरें, हिरालालाचें नांव गांव तुमच्या कोठें ऐकण्यांत आहे ? '

' नाहीं. पण तो त्या चोरांच्या टोळीपैकींच एक असावा; त्या मुक्याला कांहीं माहिती असली तर कोणाला ठाऊक, पण असेलहि

कदाचित, नाहीं तर तो 'भैरूसिंग चोर' असें तरी लिहिता कशाला ?'

नारायणरावानें भैरूसिंगाचें हें चरित्र सांगितलें त्यावरून भैरूसिंग किती लफंगा मनुष्य असेल त्याची कल्पना मला आली खरी, पण भैरूसिंग काय किंवा हिरालाल काय, त्यांना मनकामनेश्वराच्या द्रव्याची हकीगत कळली कशी हें कांहीं माझ्या लक्ष्यांत येईना. मनकामनेश्वराच्या संबंधीं कांहीं हकीगत कोणाला ठाऊक असेल तर ती ठाकुरसिंगाला होती. त्यानें आमच्या घरीं मध्यरात्रीं माझ्या दप्तरांतले सर्व कागदपत्र भरकन् वाचले होते हें माझ्या ध्यानांत होतें व तो त्यानंतर पहाटे एकाएकीं पळून गेला हेंहि मीं विसरलों नव्हतों, पण आतांपर्यंतच्या संबंध कामांत त्याचें कांहींच अंग मला दिसून येत नव्हतें हें कसें ?

नारायणराव पुन्हां पुन्हां, भैरूसिंगाला संभाळा असें म्हणे, तेव्हां इतकें भिण्यासारखें त्याजजवळ काय आहे तें माझ्या नीटसें ध्यानांत येईना.

तथापि नंतर आम्हीं महाकालेश्वराचें दर्शन घेऊन घरोघर गेल्यामुळें, तो विषय तितकाच राहिला.

---

## प्रकरण चोविसावें

## खटाटोपो भयंकरः

**क्षुधातुराणां न रुचिर्न पक्वं ।**
**चिन्तातुराणां न सुखं न निद्रा ॥**

दुसऱ्या दिवसांपासून दंडधारीबोवानीं विष्णूला व मला नाना प्रकारानीं मदत केली आणि आम्हीं मनकामनेश्वराच्या आवारांतलें तें घर व आम्हांला ज्या ज्या ठिकाणीं संशय येई तीं तीं सर्व स्थळें मोठ्या काळजीपूर्वक व मेहेनतीनें उकरून पाहिलीं, पण कांहीं फायदा

झाला नाहीं. घराची आम्हीं अगदीं चाळणी केली पण ठिकठिकाणीं भिंतींत गुप्त कपाटें, मोठमोठे कोनाडे किंवा लहान कोनाडे यांखेरीज कोठें कांहीं आढळेना, तेव्हां आतां पुढें काय करावें या विचारानें आम्हीं किंचित् निरुत्साहानें एके दिवशीं रात्रीं मनकामनेश्वराच्या आवारांतील घरांतल्या खोलींत आंथरुणावर लवंडलों होतों. नारायण-रावांची मंडळी अद्याप आलेली नव्हती व तो एकटाच असल्यामुळें विष्णू व तो दोघेही मनकामनेश्वराच्या आवारांतच रात्रीं निजत असत व सवड झाली म्हणजे ठिकठिकाणीं उकरून पहात असत. आठवड्यां-तून एक दोन वेळां मींहि रात्रीं त्यांच्या बरोबर असे. आतां पर्यंत केलेल्या खटपटी जरी सर्व निष्फळ झाल्या होत्या तरी पुरून ठेवलेलें द्रव्य तेथेंच कोठें तरी आहे या बद्दल आम्हांला कोणालाहि शंका नव्हती. त्या मुळें वामन पंडितांनीं म्हटल्याप्रमाणें ‘ कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें ’ या न्यायानें आमची ईर्षा वाढतच जात होती. त्यांतून घरांत ठिकठिकाणीं असलेलीं गुप्त कपाटें, कोनाडे, भिंतींतलीं दारें आम्हीं पाहिल्यावर आमचा प्रयत्न तर जास्त जास्त जोरानें सुरू होता. त्या भैरवगडावरच्या उल्लू कन्हय्यालालानें हिरालालाला विकलेला कागद जर आमच्या दृष्टीस पडता तर इतका हा ‘खटाटोपो भयंकरः’ करण्याची कांहीं जरूरी नव्हती. पण तसा आमचा दैवयोगच नव्हता. त्यांतल्या त्यांत समाधान मानायला येवढी तरी आह्मांला जागा होती कीं सांकेतिक खुणांचा कागद आमच्या ताब्यांत असल्यामुळें हिरालाल प्रभृति मंडळींना देखील कन्हय्यालालापासून घेतलेल्या कागदाचा कांहींहि उपयोग होण्यासारखा नव्हता.

मी ज्या दिवसाची हकीगत आतां लिहिणार आहे तो दिवस आमचा फार उद्योगाचा गेला, पण शेवटीं कांहीं फलनिष्पत्ति न झाल्या-

मुळें आम्हीं निरुत्साहानें आंथरुणावर पडलों होतों हें वर सांगितलेंच आहे. चांदण्याचे दिवस होते. बहुधां त्रयोदशी किंवा चतुर्दशी असावी. आंथरुणावर पडल्यावर थोड्यांच वेळांत मला अगदीं गाढ झोंप लागली. झोंपेच्या बाबतींत कुंभकर्णाचा पट्टशिष्य मीं शोभेन. सुमारें मध्यरात्रीची वेळ असेल, नारायणरावानें मला हालवून हालवून जागें केलें व तो मला अगदीं हळूंच म्हणतो ' ताल्या, ए ताल्या, जागा झालास का ? घरांत कांहीं तरी खडबड चालली आहे असें वाटतें. पहा बरें !

मीं झटकन् झोंपेतून जागा होऊन उठून बसलों आणि पहातों तो विष्णू व नारायणराव हातांत काठ्या घेऊन अगदीं तयार बसलेले होते. तेव्हां त्यांना पाहून डोळे चोळीत चोळीत मीं ह्मटलें कीं ' काय त्रास देतांरे तुम्हीं, मला तर अगदीं झोंप येते आहे बोवा. ' पण नारायणराव लागलीच मला ह्मणतो–

' असें काय करतोस रे ताल्या ! ए ? निजूं नकोस. तुला कांहीं आवाज ऐकूं येतो का पहा. ऐक, ऐक. तें पहा काय वाजतें आहे तें. '

आवाज ऐकूं येत होता खराच कांहींतरी खडबड झाल्यासारखा. पण मीं अर्धवट पेंगतच होतों. मीं ह्मणालों ' अरे, उंदीर, घुशी कांहीं धडपडत असतील. कां त्रास देतां उगीच ? '

' नव्हे रे ! नारायणराव व विष्णू किंचित् त्रासानें मला ह्मणाले, तूं आतां उठतोस कीं नाहीं कीं पांघरूण फेकून देऊं ? झटकन उठून डोळ्यांना पाणी लाव. पहा, पहातरी तुला काय वाटतें तें. '

मीं मोठया कष्टानें उठलों व डोळ्यांना पाणी लावून नीट सावध झालों. तेव्हां नारायणरावानें मला एका दाराकडे बोट दाखवून म्हटलें

-कीं त्या दारापलीकडून कांहींतरी चमत्कारिक आवाज ऐकूं येतो आहे. मीं जेव्हां त्या दाराला कान लावून पाहिलें तेव्हां खरोखरीच दाराच्या पलीकडल्या दालनांतून माणसांच्या आवाजासारखा कांहीं अंधुक अंधुक ध्वनि माझ्या कानांवर आला. लांकूड करवतावें तसाहि कांहीं आवाज ऐकल्यासारखा भास झाला. आवाज फार अस्पष्ट जरी नव्हता तरी अगदीं स्पष्टहि नव्हता म्हणून जास्त स्पष्ट ऐकूं यावें ह्मणून नारायणरावांनीं तें दार हळूंच उघडलें व आह्मीं त्रिवर्ग त्या दारांतून पलीकडच्या दालनांत गेलों. आम्हीं गेल्यावर लांकूड करवतल्याप्रमाणें जो आवाज येत होता तो थांवला, पण आम्हीं उभे होतों त्या जमीनी-खालून कोणी तरी माणसें बोलत होतीं तें मात्र फुसट फुसट कानांवर पड़त होतें!

जमीनीच्या गर्भांतून मध्यरात्रींच्या वेळीं आवाज ऐकूं आला तेव्हां आम्हीं उभे होतों त्या जागेखालीं एक तळघर होतें व त्यांत आमचे वैरी बोलत होते हें तर स्पष्टपणें आमच्या लक्षांत आलें. आम्हीं जवळ जवळ सगळें घर पोखरलें होतें तथापि घराला तळघर असावें अशा बद्दलच्या कांहीं खाणाखुणा अद्याप आह्मांला लागल्या नव्हत्या तेव्हां तें नसावें असें आम्हीं धरून चाललों होतों. तथापि त्या दिवशीं अशा अचानक तऱ्हेनें त्या तळघराची माहिती आह्मांला लागली.

तळघरांत काय बोलणें चाललें होतें तें ऐकूं यावें म्हणून आम्हीं जमीनीवर पडून भुईला कान लावले पण स्पष्ट असें कांहीं ऐकूं येईना.

मधून मधून खणल्याचा आवाज ऐकूं येई, तेव्हां मला वाटे कीं त्या भामट्यानीं अखेर द्रव्याची जागा हुडकून काढली असून आतां ते तेथून द्रव्य काढून तर नेत नसतील ना?

केव्हां केव्हां खणण्याचा आवाज आम्हीं निजून होतों त्या जागे-खालीं होई तेव्हां ते जमीन उकरून वर येण्याच्या उद्योगांत असावेत असें वाटून आमची पांचावर धारण बसे, तथापि उंदीर धरावयास अंधेरांत बसलेल्या बोक्याप्रमाणें आम्हीं अगदीं टपून बसलों होतों. पहाटेंपर्यंत त्यांचें काम चाललें होतें व नंतर तें बंद पडलें. बराच वेळ जेव्हां आवाज वगैरे कांहीं ऐकूं येईना तेव्हां ते निघून गेले असावेत असा आम्हीं तर्क केला. पहांट होऊन उषःकाल झाला, पक्षी शब्द करूं लागले, अरुणोदयाची वेळ आली तेव्हां आतां ते खास निघून गेले असतील असा विचार करून आम्हीं त्याच वेळीं तळ-घर कोठें आहे तें पहावयासाठीं जमीन उकरण्यास प्रारंभ केला.

सुदैवानें आम्हांला फारसा त्रास पडला नाहीं. थोडी फार मेहेनत करितांच आम्हीं जमीनीवरच्या मातीचा बराचसा थर उखळून टाकला आणि पहातों तों एक दार असलेलें आमच्या दृष्टींस पडलें. आणि तें उघडून पहातां त्याखालीं सुमारें दोन तीन हात खोल अशी एक खळी दृष्टींस पडली. तिच्यांतून खालीं उतरण्यास पायऱ्या होत्या. त्या तळघरांतून ओलसर व उबट अशी हवा येत होती.

तें तळघर पाहून आम्हांला मोठा हर्ष झाला आणि मोठी उमेद आली. सकाळची वेळ होती, तथापि अनोळख्या स्थळीं व अंधेरांत उतरावयाचें होतें ह्मणून आह्मीं कंदील लावला. हातांत एक काठी घेतली व देवाचें नांव घेऊन प्रथम मी चटकन त्या भूयारांत उडी टाकली, व पायऱ्या उतरून आंत गेलों. पायऱ्या नेमक्या सात होत्या. पायऱ्या संपल्यावर दुसरें एक भक्कम कुलूप घातलेलें दार आमच्या दृष्टींस पडलें पण त्याला कुलूप जरी भक्कम होतें तरी एक दार कुऱ्हाडीनीं तोडून व करवतीनीं कानसून एकीकडे टाकून दिलेलें

दिसलें. तेव्हां त्या भामट्यानीं आम्हीं ज्या ठिकाणीं होतों तेथें येण्यासाठीं दरवाजा तोडून टाकला पण सकाळ झाल्यामुळें पुढें येण्याचा आपला बेत तहकूब ठेवला असें आमच्या लक्षांत आलें. माझ्या पाठोपाठ हातांत कंदील घेऊन विष्णू व त्याच्या मागोमाग एक दंड घेऊन सात्विक येत होते. आतां सकाळ झाली आहे, दवाखान्यांत वेळेवर गेलें पाहिजे, नाहींतर कामाचा घोटाळा होईल; तळघर आतां पाहून ठेवलेंच आहे, त्याचा जास्त शोध दवाखान्यांतून आपण परत आल्यावर करावा, असे विचार माझ्या मनांत येऊन मीं कांहीं बोलणार तोंच दंडधारी मला ह्मणाला, 'तात्या, आज दवाखान्याला दिला पाहिजे फांटा. तुला वाटलें तर संध्याकाळीं जा, पण आतां अनायासें या भूयाराचा शोध लागला आहे तर हें काम अगोदर शेवटास लावलें पाहिजे. कारण हें जर आपण उद्यांवर टाकलें तर आज रात्रीं हिरालाल आणि त्याची मंडळीं आपल्यावर चालून आलीच हें समज.'

विष्णूनें ही त्याच्या ह्मणण्याला दुजोरा दिल्यावर मीं 'ठीक आहे' असें ह्मटलें आणि पुढें चालूं लागलों. आमची वाट लांबलचक असून अगदीं अरुंद होती. ती अंधारी व भयाण जागा पाहून मला भर्तृहरीच्या गुहेची आठवण झाली, तथापि भर्तृहरीच्या गुहेंत आम्हीं अनेक वेळां गेलों होतों व गुहेंत असलेले सर्व रस्ते व स्थानें आमच्या माहितीची झाली होतीं व आज आम्हीं जात होतों त्या जागेसंबंधीं आम्हांला कांहींच माहिती नसून आम्हीं अगदीं साशंकवृत्तीनें चाललों होतों.

वाटेंतच एके ठिकाणीं आपलीं हत्यारें पात्यारें ठेवून हिरालाल आणि त्याची मंडळी निघून गेलीं होतीं. त्यावरून त्यांचा पुन्हां परत येण्याचा हेतु स्पष्ट दिसत होता. आम्हीं वाट चालतच होतों. पण किती लांब गेलें म्हणजे आपण बाहेर निघूं हें कांहींच लक्षांत येईना.

## प्रकरण पंचविसावें

# एक अकल्पित शोध

**सर्वेचि कारागिर देवाचे कालतटाभीतरीं ।**
**राबती आपआपुल्यापरी ॥**

—भालचंद्र.

आम्हीं तसेंच पुढें चाललों. कदाचित पाव मैल किंवा किंचित् जास्त लांब सुद्धां आम्हीं गेलों असूं, आणि चालतां चालतां पाय घसरून मी धाडकन् पडलों आणि हां हां ह्मणतां एका खळग्यांत जाऊन हापटलों. आतां लिहिणें अगदीं सोपें आहे पण त्या वेळीं मी पराकाष्ठेचा घाबरून गेलों, छाती धडधडूं लागली व सगळ्या आंगाला दरदरून घाम सुटला. कारण मी पडलों त्या ठिकाणीं ओला ओला चिखल असून त्यांत मी आपटल्यामुळें अगदीं गारठून गेलों होतों.

ज्या खळग्यांत मी पडलों तो अमुक पुरुष खोल आहे हें कांहीं ध्यानांत येईना, कारण जिकडे पहावें तिकडे अंधेरच अंधेर.

मी जो रपकन् पडलों तों त्या खळग्यांतल्या गाळांत गुडघाभर चिखलांत रुतून बसलों आणि भयानें ' आई ' असें ओरडलों.

मनुष्य लहान असो वा मोठा असो, त्यास आई असो वा नसो, अत्यंत संकटाच्या प्रसंगीं त्याला आईची आठवण आल्याखेरीज कधीं ही रहात नाहीं. आईसारखें दुसरें दैवत नाहीं; ' न मातुः परं दैवतम्' । असें ह्मणतात तें अगदीं अक्षरशः खरें आहे.

माझी ओरड ऐकून विष्णूनें मला जोरानें हांक मारली व आपल्या हातांतला कंदील खालीं त्या भगदाडांत घालून मी कोठें आहे तें पहाण्याचा यत्न केला. मी वर पाहिलें तों विष्णू आणि नारायणराव मजकडे पहात भगदाडाच्या तोंडाशीं उभे होते.

नारायणरावानें मला विचारलें कीं, 'तात्या अरे असा कसा पडलास ? लागलें बिगलें नाहींना फारसें ?'

मी--नाहीं, लागलें नसावें फारसें. पण मी अंधेरांत आणि चिखलांत पडलों आहें. पहिल्यानें मला काढण्याची कांहीं व्यवस्था करा.

नारायणरावाचें व विष्णूचें कांहीं बोलणें नंतर होऊन विष्णू दोरी आणण्यासाठीं अंधेरांतूनच मागें परतला व नारायणराव कंदील त्या भोकांत धरून मजबरोबर बोलत राहिला. कोणी अनोळखी मनुष्य मनकामनेश्वराच्या घरांत त्या तळघरच्या वाटेनें न यावा ह्मणून तळघर बांधणाऱ्यांनीं त्या खळग्याची योजना केलेली असावी असा आमचा तर्क झाला. तो खळगा सुमारें दोन पुरुष खोल होता व आंत चिखल होता त्यामुळें मला कांहीं धक्का लागला नाहीं, नाहींतर त्या दिवशीं आमची गच्छन्ति होण्याचाच योग होता. बाकी 'जया देव तारी तया कोण मारी ?' हें तर खरेंच.

हिरालाल वगैरे मंडळी त्याच रस्त्यावरून पार निघून गेली तेव्हां त्यांस त्या खळग्याची माहिती असून त्यांनीं त्या खळग्यावरून जाण्यासाठीं लांकडाची एखादी फळी घातली असावी व जातांनी काढून नेली असावी असा आमचा तर्क झाला.

विष्णू थोड्या वेळानें परत आला पण तोपर्यंत विंचू-कांट्यांच्या भीतीनें मी अगदीं घाबरलों असून चिखलांत पडून गारठून गेलों होतों. विष्णूनें आपल्या बरोबर एक लांबलचक दोरखंड आणलें होतें व एक कंदीलही आणिला होता. तें दोरखंड भलें लठ्ठ होतें. त्याचें एक टोंक मजकडे सोडून विष्णूनें व नारायणरावानें त्याचें दुसरें शेवट धरलें व त्या दोरखंडाच्या साह्यानें मला त्यांनीं वर काढलें. चिखलाच्या राडीनें माझें सगळें अंग घाण झालें होतें, कपडे सगळे खराब झाले होते. तो आमचा

अवतार पाहून नारायणराव मला हंसत हंसत म्हणाला, 'यावें नाथूराम-शेट, अगदीं थेट धुळवडीच्या दिवसासारखा तूं आतां दिसूं लागलास.'

मी—तुला काय लेका थट्टा करायला होतें ? बोकड गेला जिवानिशीं आणि खाणारा म्हणतो वातड, तशांतलें तुझें आहे. माझी काय घाबरगुंडी उडाली त्याची तुम्हांला कोणाला कल्पना तरी आहे ?

आम्हीं नंतर त्या दोन कंदिलांच्या साह्यानें आसपास चोहोंकडे निरखून पाहिलें तो त्या खळग्याच्या पलीकडल्या बाजूला थोड्याच अंतरावर लांबलचक एक लांकडाची फळी ठेवलेली आम्हांला दिसली. पण तिकडे जायचें कसें ? तेव्हां आम्हीं पुन्हां घराकडे परतलों. मी आपला सगळा पोषाख बदलला. आम्हीं आपलीं सर्व नित्यकृत्यें उरकलीं, कढत कढत दूध घेतलें व दोन लांबलचक लठ्ठ लठ्ठ फळ्या घेऊन पुन्हां त्या भूयारांत शिरलों. आतां तें भूयार कोठें संपतें तें पहाणें अगदीं आवश्यकच होतें.

भूयारांतून मार्ग काढतांना जेथें तें भगदाड आम्हांला पुन्हां लागलें त्यांवर आम्ही आणलेल्या त्या फळ्या घातल्या व तसा रस्ता तयार केल्यावर आम्हीं त्या खळग्यावरून पुढें गेलों. आमची वाट कित्येक ठिकाणीं सरळ तर कित्येक ठिकाणीं वांकडी, कोठें कोरडी तर कोठें ओलसर, थोडी स्वच्छ तर थोडी मळकट अशी होती. आमचा रस्ता संपला तेथें आम्हांला पुन्हां पायऱ्या लागल्या. त्या चढून आम्हीं वर गेलों तेव्हां एक लहानसें दार आम्हांला लागलें. पण तें नुसतेंच ओढून घेतलें असल्यामुळें आम्हांला चटकन् उघडतां आलें. दार उघडतांच एकदम पुष्कळ उजेड आम्हांला दिसला, तेव्हां सूर्य बराच वर आला असावा असें आम्हांला वाटलें. आम्हीं दारांतून बाहेर पडून पहातों तों एका शिवमंदिरांत आम्हीं उभे !

आश्चर्याची व आनंदाची गोष्ट ही कीं त्या शिवमंदिरांत मनकामनेश्वराच्या चौथऱ्यायेवढा चौथरा असून त्यावर महादेव होता व चौथऱ्याच्या एका कोंपऱ्याच्या दगडावर तेंच मनकामनेश्वराचें चित्र कोरलेलें होतें.

या सर्व खाणाखुणा जमलेल्या पाहून आम्हांला मोठी गंमत वाटली. 'प्रातःकाले शिवं दृष्ट्वा,' व नमस्कार करून व तो उत्कृष्ट शकुन समजून आम्हीं मंदिरांतून बाहेर पडलों. मंदिराच्या बाहेरच्या बाजूला पुष्कळशीं छोटी मोठीं झाडें लावलेलीं होतीं व त्यांच्या थोडें पलीकडे दोन लहान मुलें एका बोरीच्या झाडाखालीं बोरें वेचींत असून एक कुत्र्याचें पिलूं आपली शेपटी हालवीत त्यांचेकडे पहात होतें. त्यांच्या शिवाय आसपास कोणीहि दिसत नव्हतें.

आतां पुढें कसें करावयाचें याचा आम्हांला विचार पडला. हिरालाल व त्याचे साथीदार त्या मंदिरांतूनच भूयारांत शिरले हें तर स्पष्टच होतें, व त्या मंदिरांपासून फार तर दोन तीनशे पावलांवर एक खेडें दिसत होतें; तेव्हां त्या खेड्यांत त्यांचे संबंधीं कांहीं तपास लागला तर लागेल अशा विचारानें आम्हीं असें ठरविलें कीं विष्णूनें त्या खेड्यांत जाऊन जी मिळेल ती माहिती मिळवावी व नारायणराव व मीं अशा दोघांनीं, मंदिरापलीकडे एक विहीर होती तिच्या जवळच्या उंबराच्या झाडाखालीं त्याची मार्गप्रतीक्षा करीत बसावें.

सकाळची आठ वाजायची वेळ होती. रानांत चोहोंकडे ऊन पडूं लागलें होतें. पक्षी आपआपलें भक्ष्य शोधावयासाठीं दूर दूर निघून गेल्यामुळें चोहोंकडे शांतता दिसत होती. लांब अंतरांवर गुरांचे कळप व गुराख्यांचीं मुलें दृष्टीस पडत होतीं. एखादी दुसरी बाई

विहिरीवरच्या पाण्याला येऊं लागली होती. नारायणराव व मी विहिरीवरच्या पाण्याला येणाऱ्या जाणाऱ्या बायकांचें आपणाकडे लक्ष वेधूं नये म्हणून विहिरीपासून थोडें बाजूलाच इकडे तिकडे हिंडत होतों. नारायणराव मनकामनेश्वराच्या आतांपर्यंत घडून आलेल्या गोष्टीचें मजबरोबर सिंहावलोकन करीत होता, व त्याला आतांपर्यंत घडून आलेल्या गोष्टीवरून एकप्रकारची उमेद वाटूं लागली होती. जसें घडून यावयाचें असतें तशी बुद्धि होऊं लागते असें तो म्हणे. नाहींतर कोठें चितोडगड व कोठें उज्जयिनी! सज्जनसिंह, चितोडगड व गडावरची गुहा व तीमध्यें सांपडलेले ते महत्वाचे कागदपत्र व त्यांचा ठाकुरसिंगानें उपयोग करून घेतल्यामुळें आह्मांला त्यांचें कळलेलें महत्त्व, व त्यानंतर आतांपर्यंत एकामागून एक लागत असलेल्या अनेक गोष्टींचा तपास यांचा त्याला मोठा चमत्कार वाटे व हिरालालप्रभृति मंडळींनीं उत्पन्न केलेल्या घोंटाळ्यामुळें त्याला त्रास वाटण्याऐवजीं गंमतच वाटे. डोंगरावरून खालीं येत असलेल्या ओढ्याच्या मार्गांत जितके खडक व अडथळे जास्ती, तितकें खालीं येणारें पाणी स्वच्छ व शुद्ध होत जातें; त्याचप्रमाणें आमच्या मार्गामध्यें जितकीं विघ्नें जास्त येत जातील जितकी जयाची खात्री आपल्याला जास्त वाटली पाहिजे असें तो ह्मणे. आणि तें हीं एकप्रकारें खरेंच होतें. चितोडगडावरील कागदपत्र हस्तगत होऊन ते आह्मांस चटकन् वाचतां येऊन भीमसिंगानें ठेवलेल्या द्रव्याचा जर आह्मांला पटकन् शोध लागला असता तर आह्मांला जो आनंद झाला असता त्यापेक्षां किती तरी पटीनें जास्त आनंद अनेक आपत्तींतून पार पडून त्या द्रव्याचा शोध लागल्यास आपल्याला होईल असें त्याचें ह्मणणें असे. संकटें येत असतांना त्यांची भीति वाटत असते खरी, पण त्यांमधून

पार पडून गेल्यानंतरचा जो आनंद तोहि पण तितकाच मधुर असतो; पण त्यामुळें कोणताहि आनंद प्राप्त होण्याचे अगोदर संकटें यावींत असें कोण ह्मणेल ? कारण संकटांचें पर्यवसान नेहमीं आनंदांतच होणार असें कोण सांगूं शकेल ? किंवा मनुष्य एकदां आनंदांत असल्यावर त्याला पुनः दुःख केव्हां प्राप्त होईल हें तरी कोण सांगूं शकेल ? 'चक्रवत् परिवर्तंते दुःखानिच सुखानिच' असें ह्मणतात, पण ज्या मानानें हें चक्र लहान अगर मोठें असेल त्या मानानें हें सुखदुःखाचें रहाटगाडगें लवकर अगर उशीरा येतें. महाकवि भवभूतीनें उत्तररामचरितांत एक प्रसंग वर्णिला आहे. "अरण्यांत घडलेल्या अनेक प्रसंगांचीं चित्रें पहातां पहातां सीतेला झोंप लागली. रामचंद्रांना तिजकडे पाहून फार आनंद झाला, आणि ते म्हणाले कीं 'सुखामध्यें अथवा दुःखामध्यें ज्याला ढळ नाहीं, हरएक प्रसंगीं जो निर्वाणींचा साथीदार, जो हृदयाचें विश्रामस्थान, ज्याची बहार वार्धक्यामुळें अणुमात्रहि कमी होत नाहीं, क्रमाक्रमानें लज्जेचा पडदा दूर झाला म्हणजे ज्याचा परिपाक स्नेहसर्वस्वामध्यें होतो, असा तो दांपत्यप्रेमरूपीं परब्रह्मानंद, अनेक घाव सोसावेत तेव्हां, भाग्यवंतांनाच केवळ लाधतो.' श्रीरामांच्या आनंदाचा येथें अगदीं कळस झाला. क्षणार्धांत (दुर्मुखानें बातमी सांगितल्यामुळें) आपणांवर केवढें संकट ओढवणार आहे याची त्यांना कल्पनाहि नव्हती. पर्वताच्या कड्यावर बेगुमान खेळणाऱ्या अर्भकाप्रमाणें, संकट आ पसरून सज्ज असलें तरीहि, मनुष्यास सध्यांच्या आनंदापलीकडे कांहींहि दिसत नसतें. मालतीमाधव नाटकाच्या आठव्या अंकाच्या शेवटीं असाच प्रसंग भवभूतीनें आणला आहे. शेक्सपियरच्या हॅम्लेट नाटकांतील ऑफेलियाच्या मृत्यूचें वर्णन अनेक वाचकांस अवगत असेलच. असो."

विष्णूला जाऊन तासभर झाला होता. ऊन चांगलें चमकूं लागलें होतें; पाणी भरण्यासाठीं विहिरीवर कांहीं कांहीं बायका येऊं लागल्या होत्या. त्यांपैकीं बहुतेकांच्या घागरी मातीच्या होत्या. पण एक बाई पितळेच्या दोन घागरी घेऊन त्या खेड्यांतून येतांना पाहून दंडधाऱ्यानीं सहज तिजकडे पाहून मला म्हटलें कीं, 'तात्या, अरे ही एकटीच बाई यांच्यांत जास्त संपन्न दिसत आहे बरें का. हिचा लेहेंगा व ओढणीसुद्धां इतर बायांच्या मानानें बऱ्यांपैकीं दिसतात.''

मी तिच्याकडे पाहिलें तो ती मैनाबाई !

**मी:**—अरे ही तर ती मैनाबाई !

**नारायण:**—हां? रात्रीं त्या प्रेताजवळ बसून रडत होती ह्मणून विष्णूनें सांगितलें होतें—तीच का ही? मग ही येथें कशी आली?

**मी:**—कुणाला ठाऊक बोवा कशी आली !

**नारायण:**—मग पोहोंच तिच्यापाशीं तूं. अरे ही एकटी बाई आपल्याला कितीतरी माहिती देऊं शकेल, तिला वाटलें तर.

**मी:**—होय 'तिला वाटलें तर.' पण तिला वाटायचें नाहीं.

**नारायण:**—आतां कदाचित् वाटेलसुद्धां. तिच्या भावाचा त्या हलकटांनीं खून केल्यामुळें त्यांच्या संबंधाची माहिती गुप्त ठेवण्याचें आतां तिला काय महत्व वाटणार ?

**मी:**—होय, पण सध्यां कांहीं नियमहि नाहीं सांगवत. त्या खुनी माणसांचा पोलिसाला पत्ता लागला आणि त्यांनी जर आपल्याबरोबर त्या बाईलाहि ओढली तर त्या बिचारीला आपला निरपराधीपणा शाबीत करायला किती अडचण पडेल पहा बरें. ते भामटे तिच्यावर-सुद्धां खुनाचा आरोप घ्यायला चुकायचे नाहींत.

**नारायणः**--भैरूसिंग तितका लफंगा आहे खरा बोवा. इतक्या अनंत लटपटी करून जो आपला पुनः मोकळा तो मोकळा, तो कोणावर काय घोरपड आणील तें काय सांगावें ?

मैनाबाई बिचारी अगदीं खंगल्यासारखी दिसत होती. तिची ती केविलवाणी व खिन्न मुद्रा पाहून मला वाईट वाटलें. 'नीलगंगेवर चला' म्हणून मला बोलावण्यासाठीं आलेली ती ही मैनाबाई हें माझें मलाच खरें वाटेना. त्यावेळीं ती कशी मजबूत होती आणि आतां ती कशी अगदीं हाडकुळी दिसूं लागली तें माझ्याहि लक्ष्यांत आलें. तिनें अगदीं आयत्या वेळीं—माझे प्राण वांचविण्यासाठींच बहुत करून—नीलगंगेच्या अर्ध्या रस्त्यावरून मला घरीं परत जाऊं दिलें;—एका साधूला औषधपाणी मिळावें या सदिच्छेनें ती मला एके दिवशीं सांदीपनींच्या आश्रमांत घेऊन गेली—तिचा मजबरोबर झालेला अल्पपरिचय माझ्या डोळ्यापुढें उभा राहिला आणि मोठ्या आदरयुक्त अंतःकरणानें तिजकडे नजर लावून, दुःखाचा सुस्कारा टाकून, मी स्वस्थ बसलों.

---

## प्रकरण सव्विसावें
## नवीन माहिती.

**मारुति कर जोडुनियां सीतेसि म्हणे नको धरूं शंका।**
**मी रामदूत हनुमान् तुजसाठीं सर्व शोधिली लंका॥**

दुपारीं अकरा वाजायच्या सुमाराला विष्णू त्या खेड्यांतून परत आला. तो हंसत आला त्यावरून त्याला बरीच माहिती मिळाली असावी असें दिसलें. त्याच्या सांगण्यावरून आम्हांला समजलें कीं उज्जयिनीच्या पश्चिमेस नदीच्या पलीकडे, बडनगरच्या रस्त्यावर, गावांपासून सुमारें

दोन मैलांवर, मुल्लापुरा, रघुपुरा व मोहनपुरा अशीं तीन खेडीं अगदीं जवळ जवळ असून त्यापैकीं उज्जयिनीजवळचें सर्वांत अलीकडचें खेडें मुल्लापुरा–हें आम्हीं उभे होतों तें असून ज्या मंदिरांतून आम्हीं बाहेर पडलों तें मंदिर उज्जयिनीच्या हद्दींतील असून त्या महादेवाचें नांव ॐकारेश्वर असें आहे. त्या मंदिराचा पुजारी बिहारीलाल पंड्या नांवाचा एक म्हातारा मनुष्य असून त्याचे घरांत हल्लीं हिरालाल व त्याची भाची हीं अलीकडे रहावयास आलेलीं आहेत. त्या हिरालालकडे नेहमीं भेटायला येणारीं दोन माणसें असून त्यापैकीं एकजण भेरूसिंग असावा. हिरालाल मुल्लापुऱ्यास बिहारीलालाच्या बिऱ्हाडीं रहावयास लागून जरी जवळ जवळ एक महिना झाला होता तरी त्याची भाची नुकतीच आठ-पंधरा दिवसांत तेथें येऊन राहिली होती. बिहारीलालाच्या घरीं त्याची एक म्हातारी भावजय आहे तिच्याकडून सर्व बातमी मीं काढली असें विष्णूनें सांगितल्यामुळें आम्हांला अगदीं खरी बातमी ताबडतोब लागली. त्याचप्रमाणें त्याच्या सांगण्यावरून असेंहि आम्हांला समजलें कीं अलीकडे भैरवगडावरचा कन्हय्यालाल पुजारी ॐकारेश्वराच्या मंदिरांत कधीं कधीं येत असून हिरालालाची भाची त्याजबरोबर बराच वेळ बोलत बसत असते. विष्णूनें जी हकीगत सांगितली तिजवरून मुल्लापुऱ्यास हिरालाल वसती करण्यासाठीं आला याबद्दल त्या खेड्यांतल्या लोकांना विशेष कांहीं वाटलें नाहीं व त्यांना ॐकारेश्वराच्या मंदिरांतून मन-कामनेश्वराच्या आवारांत जाण्याला एखादा गुप्तमार्ग असेल अशी कल्प-नाहि नव्हती. ॐकारेश्वराचा पुजारी बिहारीलाल पंड्या याला त्या गुप्तमार्गाचें दार ठाऊक होतें पण तें फार लांब गेलें नसून अंधेरांत थोडें बहुत जाऊन थांबलें असेल व जुन्याकाळीं बांधलेलीं कांहीं गुहा वगैरे असेल अशा समजुतीनें त्यानें त्या मार्गाकडे आपलें लक्ष्य पोहों-

चविलें नाहीं. उलट त्या भुयारांत थोडा फार कडबा भरून ठेवला. आणि त्या कडब्याच्या पेंड्या एकीकडे करून हिरालाल प्रभृति मंडळीनें त्या मार्गाचा उपयोग करून घेतला होता यावरून त्यांना त्या मार्गा-बद्दलची माहिती असावी हेंहि आतां आम्हांला कळून आलें. हिरालाल मुल्लापुऱ्यास रहावयास आला त्या अर्थी त्याचे साथीदारहि असेच कोठेंतरी दूर रहावयास आले असतील असा विचार करून नंतर आम्हीं सर्वजण मनकामनेश्वराच्या देवळाकडे परत जाण्याला निघालों.

मनुष्य आपल्याच नादांत असला म्हणजे साध्या गोष्टींची देखील त्याला आठवण रहात नाहीं. आम्हीं बोलत बोलत, आधल्या रात्रीच्या व सकाळपासून घडलेल्या गोष्टींची चर्चा करीत मनकामनेश्वराच्या आवारांतल्या घराकडे आलों पण दारें व खिडक्या रात्रीं ज्या आंतून बंद करून घेतल्या होत्या त्या तशाच बंद आहेत येवढी साधी गोष्ट देखील आमच्या कोणाच्याहि लक्ष्यांत आली नाहीं. घरीं पोहोंचल्यावर जेव्हां सर्व दारें बंद दिसलीं तेव्हां आमचें आह्मांलाच हंसू आलें. दोनप्रहरचा अंमल झालेला, स्नानसंध्येचा पत्ता नाहीं आणि पोटांत अगदीं कावळे ओरडत होते. हातांत कंदील, दोरी, काठ्या इत्यादि सामान. तेव्हां सर्व सामान घरांत टाकल्याखेरीज आम्हांला आमच्या घरीं जातां येईना. तेव्हां अखेरीस विष्णूनें खटपट केली आणि मोठ्या शिकस्तीनें पुष्कळ वेळ धडपड केल्यावर एकदाचें एक दार उघडलें. घरांत सामान टाकून विष्णू व नारायणराव यांच्यासकट मी आमच्या घरीं आलों. 'छिद्रेष्वनर्था बहुली भवन्ति' असें म्हणतात तसें त्या दिवशीं झालें. गोपाळदादा दवाखाना संभाळायाला नव्हते. कोठें परगांवीं गेले होते. काशीराम कंपाउंडराचा पाय दुखावल्यामुळें त्याला चालवत नव्हतें तथापि तो तसाच दवाखान्यांत येऊन बसला होता. मूलचंदजीवर दवाखान्याचा

सर्व भार पडला होता, आणि एक नाहीं, दोन नाहीं, तीन व्हिजिट्स त्या दिवशीं आल्या होत्या. मी दवाखान्यांत कां आलों नाहीं हें दोघांहि कंपाउंडरांस ठाऊक नव्हतें. तथापि आतां येतील, मग येतील म्हणून त्यांनीं सकाळीं दहावाजे पावेतों रोग्यांना सांगितलें आणि टांगे घेऊन बोलावण्यास आलेल्या गृहस्थांना एका मागून एक आमच्या घरीं पाठवून दिलें. त्या दिवशीं आमचा गडीहि गैरहजर होता, आणि दवाखाना सोडून मूलचंदजींना घरीं येऊन माझी चौकशी करायला, रोगी पुष्कळ असल्यामुळें फुरसत नव्हती. बरें, मी जो आधल्या दिवशीं दुपारीं बाहेर पडलों होतों तो रात्रीं देखील घरीं गेलों नाहीं. दवाखान्याची वेळ सोडून मीं गेलों तरी कोठें व कां हें आईलाहि समजेना. लोक बिचारे टांगे घे घेऊन आले, आणि बराच वेळ थांबून, 'डॉक्टर साब कब आवेंगे!' असे प्रश्न घरांतल्या मंडळीनां विचारून निराशेनें परत गेले, तेव्हां आईला राग आलाच होता. त्यांतून मीं जेवायला तरी दुपारीं वेळेवर यायचें, पण आमची स्वारी त्या दिवशीं रोजच्यापेक्षां तास दीडतास उशीरा दाखल झाली आणि तेंहि अगोदर न सांगतां दोन पाहुण्यांना जेवायला घेऊन! त्याच दिवशीं श्रीमत् वासुदेवानंद सरस्वती स्वामीमहाराजांचे एक शिष्य स्वामी आमच्या घरीं पुढील येऊन, माझी वाट पहात तिष्ठत बसले होते. मग काय विचारतां? घरीं आल्यावर घड्याळांत दीड वाजलेला पाहिला व सर्व प्रकार माझ्या ध्यानांत आला. आईला, तिचा रागरंग कसा काय आहे तें पहाण्यासाठीं एकदोन प्रश्न विचारले, पण ती माझ्याशीं बोललीच नाहीं. मग मीं जणूं काय त्या गांवचाच नाहीं, असा बहाणा करून तडक् स्वयंपाकघरांत गेलों, आजीबाईनां दोन पानें जास्त मांडायला सांगितलीं, आणि आम्हीं त्रिवर्गांनीं स्नानें वगैरे करून सोंवळें नेसून

पानें गांठलीं. त्या दिवशीं आई माझ्यावर कशी रागावली, लेले मास्तरांनीं तिच्या क्रोधाग्नींत आपल्या चार समिधा कशा टाकल्या, मूलचंदजींनीं त्यावर तूप कसें ओतलें, इतरांनीं त्यांत तीळ तांदूळ वगैरे टाकून तो कसा प्रज्वलित केला व त्यांत मग माझी आहुति कशी पडली, हा सर्व प्रकार वाचकांनीं आपआपल्या अनुभवावरून खुशाल ठरवावा.

---

## प्रकरण सत्ताविसावें.

## सीतावनवास.

**जेव्हां जीव थकूनि पाहत तरी विश्रांति ही घ्यावया ॥**
**नाहीं झोप सुखें—अहो हरपली ती ईश्वराची दया ॥**

—गोविंदाग्रज.

हिरालाल वगैरे मंडळींना मनकामनेश्वराच्या घरांतल्या गुप्तमार्गाचा पत्ता लागला आणि त्यांनाहि त्या घरांतच कोठें तरी द्रव्य पुरून ठेविलें आहे हें समजलें आहे, हें समजल्यापासून आम्हीं थोडेसे चिंतातुर झालों, पण जास्त उत्साहानें कामाला लागलों.

भैरवगडास जाऊन मीं कन्हय्यालालाची गांठ घेतली. त्याचा आपला एक उद्योग. भांगेचा पाटा आणि वरवंटा ( लुडिया ). सौभाग्यवती कोठें बाहेर गेल्या होत्या, आणि यजमान भांगेचा अगदीं सूड उगवीत होते. माझी दृष्टादृष्ट झाल्यावर स्वारींनीं आनंदानें मला एक आशीर्वाद दिला. मी भैरवाच्या पुढें कांहीं दक्षिणा ठेवल्यावर तर, माझ्यासाठीं एक तरट आणून त्यानें मला ' या बसा ' म्हटलें.

मी बसल्यावर कन्हय्यालालाला म्हटलें, गुरुजी तुम्हांला एक गोष्ट विचारायला मी आलों आहे. आणि मला जर आपण सगळी हकीकत खरी सांगाल तर आपल्याला तकलीफ दिल्याबद्दल एक रुपया बक्षीस देईन. आहे का आपल्याला कबूल ?''

**कन्हय्याः**—हो. हो. महाराज आपल्याला नाहीं खरी हकीगत सांगायची, तर सांगायची कोणाला ? हें:, हें:, हें:, आयुष्यमान् भव. काय सांगू ?

**मीः**—बडनगरच्या रस्त्यावर मुल्लापुऱ्यास ॐकारेश्वराचे मंदिरांत विहारीलालच्या घरीं एक बाई राहते, तिला तुम्हीं ओळखतां ?

**कन्हय्याः**—हो. हो. मी अगदीं लहानपणापासून तिला ओळखतों.

**मीः**—मग बोला तिच्यासंबंधीं तुह्मांला काय ठाऊक आहे तें.

**कन्हय्याः**—अगदीं लहानपणाची हकीगत कांहीं मला विशेषशी ठाऊक नाहीं. पण माझ्या मावसबहिणीची ती मानलेली मुलगी आहे. तिचे आईबाप चांगले सुखवस्तु रजपूत घराण्यांतले होते असें ऐकिवांत आहे, पण मी कधींहि त्यांना पाहिलेलें नाहीं. आतां माझ्या मावसबहिणीनें तिला आपली मुलगी कां मानली ती गोष्ट मात्र मोठी चमत्कारिक आहे. ती ऐका.

देवासच्या सडकेवर येथून सहा कोसांवर नरवर ह्मणून एक गांव आहे. तेथली मालकी एका भिल्ल संस्थानिकाची आहे. तेथल्या एका प्रतिष्ठित गृहस्थाच्या मुलाशीं सीताबाईचा विवाह अगदीं लहानपणीं झाला. सीताबाईच्या घरीं माणसें अवघीं तीन. सासरा, सासू व पंधरा वर्षें वयाचा नवरा. सासरा घरचा चांगला होता तेव्हां त्यानें ही सुरेखशी मुलगी पाहून तिजबरोबर आपल्या मुलाचें मोठ्या हौसेनें लग्न केलें व तिचे आंगावर सुमारें हजार बाराशेचे दागिनेहि घातले. सून लहानच असल्यामुळें व उज्जयिनीहून नरवर जवळच असल्याकारणानें मुलगी कधीं माहेरीं कधीं सासरीं अशी राहात असे. याप्रमाणें ती एकदां आपल्या माहेरीं सुमारें दोन महिने राहिल्यावेळीं एके दिवशीं अकस्मात् तिची सासू उज्जयिनीस आली. मुलीच्या आईनें तिचा योग्य आदर

सत्कार करून, " मधेंच कां आला? ह्मणून विचारलें. " मुलगी बरेच दिवस माहेरी राहिली, सबब तिला घेऊन जायला आलें" असें बाईनें सांगितलें. सुनेबद्दल सासूचें इतकें प्रेम पाहून आईस संतोष वाटला व तिनें आपल्या विहिणीस मोठ्या थाटाची मेजवानी दिली, व दोन दिवस आग्रहपूर्वक राहून घेऊन, तिसरे दिवशीं आपल्या मुलीस न्हाऊं-माखूं घालून, तिची सासूबरोबर रवानगी करून दिली. मुलगी न्हालेली असल्याकारणानें तिचे अंगावरचे मुख्य सर्व दागिने एका डब्यांत घालून, ते सासूचे स्वाधीन केले होते. शहराच्या वेशीपर्यंत–देवास-दरवाजापर्यंत आई पोंचवायास आली व तेथून ती परतली. पुढें सासू व मागें सून याप्रमाणें गांवापासून सुमारें २।३ मैल दोघी जणी निमूटपणें गेल्या. नंतर सासू एकाएकीं वाटेंत थबकली, व मागें सुनेकडे एकदम वळून ओरडून ह्मणाली, " अवदसे, कशाला माझ्या मागून येतीस? तुझें व माझें दोघींचें कपाळ फुटलें. एकेच दिवशीं तुझा नवरा आणि सासरा वारला त्याला आजचा पंधरावा दिवस! जा आतां हें काळें तोंड घेऊन आपल्या माहेरीं परत जा! माझ्या घरीं तुझ्याकरितां कोणी वाढून ठेविलें नाहीं!" हे सासूच्या तोंडचे काळजाला घरे पाडणारे शब्द, एकाएकीं, त्या ठिकाणीं, व त्या तशा स्थितींत, ध्यानीं मनीं नसतांहि, ऐकतांच, त्या गरीब गाईची काय स्थिति झाली असेल, याची, महाराज, आपणच कल्पना करा. तिला सासू बोलते आहे हें खरें कीं खोटें हेंच प्रथम समजेना. पण सासूचा स्वभाव तिला पूर्वी थोडा बहुत माहीत होता, व असली खोटीच बातमी सहसा कोणी सांगावयाचें नाहीं, व ती सांगण्यांत सासूचा कांहीं मतलब असणेंहि शक्य नाहीं, हा विचार तिच्या मनांत येऊन, ती एकसारखी धाय मोकलून रडूं लागली. तिला आकाश फाटल्याप्रमाणें झालें. तेथें तिला

आपला वाली कोणीच दिसेना. सासूबाईनीं तर पौबाराच केला. ती रानांत एकटी राहिली. ऐन मध्यान्हीची वेळ असल्यामुळें रस्त्यानें दुसरा वाटसरूहि कोणी जात येत नव्हता. तेव्हां करते काय बिचारी! याप्रमाणें तिला सासर पारखें झाल्यामुळें तिनें परत माहेराकडे पाय वळविले. माझ्या मावसबहिणीनें तिला अगदीं लहानपणापासून प्रत्यक्ष मुलीप्रमाणें पाळली होती, तिच्या घरीं ही बातमी समजतांच जो आकांत झाला आहे, तो सांगतां पुरवत नाहीं. त्या कृत्या सासूचें हें अमानुष आचरण ऐकून सर्व थक्कच झाले. पुढें माझ्या बहिणीनें सासूचा बराच शोध केला. तिचा नवरा व मुलगा महामारीच्या उपद्रवानें एके दिवशीं वारल्याचें समजलें. पण सासूचा कोठें थांग लागेना. तिनें समजून उमजूनच अज्ञातवास पत्करला होता. पुढें बरेच दिवसांनीं, सर्व दागिन्यांची योग्य व्यवस्था लागल्यानंतर, सासूबाई एके दिवशीं प्रगट झाल्या. त्या वेळीं तिला विचारपूस करण्यांत कांहीं अर्थच नव्हता, सबब तिचा सर्वांनीं नादच सोडला. अलीकडे कांहीं वर्षांपूर्वीं ती सासू मेली असें ऐकण्यांत आलें, व तिनें विश्वासानें म्हणून, आपल्या सुनेच्या अंगावरचे दागिने, येथल्या एका सावकाराकडे ठेविले होते, त्या बेट्यास ते परत करण्याची गरज उरली नाहीं! एकूण ते दागिने जसे आले तसेच गेले. ईश्वरी न्याय कांहीं विलक्षण आहे! लहानपणापासून बिचारीला आईबापांचें सुख नाहीं तें नाहींच, आणि सासरची ही अशी तऱ्हा! तिच्या खर्चासाठीं माझ्या बहिणीकडे कोणी कांहीं रक्कम नियमितपणें पाठवीत असे, असें मला ठाऊक आहे. अलीकडे तर सीताबाईला पाहून मला ७–८ वर्षें होत आलीं होतीं. ती परवां एकदां येथें आम्हांला भेटायला आली तेव्हां तिनें मला ओळखलेंसुद्धां नाहीं. ती पाठमोरी उभी होती, तेव्हां मला वाटलें

कीं कोणी पोक्त बाई माझ्या बायकोला भेटायला आली आहे! पोर मोठी चांगली बरें! माझ्या बहिणीबरोबर तिनें लहानपणीं कधीं कधीं आमच्या घरीं यावें तेव्हां माझ्या बायकोनें तिला अगदीं जीव कीं प्राण असें करावें.

**मी:**—पण तिची आई, तिचा बाप—तुम्हांला कांहीं ठाऊक नाहीं त्यांच्यासंबंधानें?

**कन्हय्या:**—नाहीं महाराज, कांहीं माहिती नाहीं.

**मी:**—बरें, तें असो. तुमच्या घरीं ती भेटायला आली ती एरवींच आली, कीं कांहीं उद्देशानें आली?

**कन्हय्या:**—एरवींच आली असेल. फार दिवस झाले होते भेटून, त्यामुळें ही लहानपणची सीता आहे असें मला वाटलें सुद्धां नाहीं.

**मी:**—मघापासून दोनदां तुम्हीं 'सीता,' 'सीता,' म्हणालात, ती सीता कोणती? मी मैनाबाईसंबंधानें तुम्हांला विचारलें.

**कन्हय्या:**—मुल्लापुऱ्यास बिहारीलालांच्या घरीं राहते ती बाई आपण म्हणतांना?

**मी:**—होय मोठी पोक्त, गंभीर व दिसायला नीट नेटकी आहे ती?

**कन्हय्या:**—होय मग तीच सीताबाई, अलीकडे ती आपल्या मामाच्या घरीं असते.

**मी:**— कोण मामा हा?

**कन्हय्या:**—कोण कुणाला ठाऊक. माझी बहिण वारली तेव्हां तिच्या घराशेजारीं तो पुष्कळ वर्षांपासून रहात असे. तेव्हां तिनें मरतांना या सीतेला त्याच्या हवालीं केली, तेव्हांपासून तो झाला मामा. सीता कधीं मजजवळ त्या मामाबद्दल कांहीं म्हणाली नाहीं आणि मी अजूनपर्यंत त्याला काळा कीं गोरा पाहिलाहि नाहीं.

**मी:**—नाहीं कसा? अहो तो हिरालाल. ज्याला तुम्हीं तो महत्त्वाचा कागद विकलात, तोच तो बरें.

**कन्हय्या:**—[ आश्चर्यानें ] आँ? तो हिरालाल हिचा मामा? ठीक. ठीक हां, आतां जुळलें सगळें!

**मी:**—काय जुळलें?

**कन्हय्या:**—तिनें मला एक प्रश्न विचारला होता, तो कशासाठीं त्याचें मर्म आतां ध्यानांत येत चाललें. मनकामनेश्वराच्या आवारांत एक जुना वाडा आहे त्यांतून ॐकारेश्वराच्या मंदिरापर्यंत एक गुप्तमार्ग गेलेला आहे. तो कोठें तरी आहे येवढें माझा बाप नेहमीं म्हणे, पण त्याला किंवा मला तो नेमका अमक्या ठिकाणीं आहे हें ठाऊक नव्हतें, कारण त्या जुन्या वाड्यांत त्याच्या खुणा कोठेंहि दिसत नसत.

**मी:**—मग काय ती सीताबाई त्या गुप्त मार्गाची चौकशी करण्यासाठीं तुमच्याकडे आली होती कीं काय?

**कन्हय्या:**—ती लहानपणीं आमच्या घरीं येई तेव्हां तिच्या कानावरूनहि त्या गुप्त मार्गाची गोष्ट गेलेली होती, पण कांहीं जास्त बातमी लागली आहे कीं काय म्हणून विचारावयाला सहजी आली असेल.

**मी:**—किंवा हिरालालानेंहि तिला जास्त माहिती मिळविण्यासाठीं पाठविली असेल. तुम्हीं जो कागद त्याला विकलात, त्यांत कदाचित् त्या गुप्तमार्गाचा उल्लेख केलेला असेल, आणि त्यासंबंधीं अर्थात् जितकी माहिती त्याला मिळेल तितकी हवीच आहे. पण काय हो, नेहमीं रात्रीच्या वेळीं तुम्हीं सीताबाईला जाऊन भेटतां ना?

कन्हय्यालाल आश्चर्यानें मजकडे पाहून विचारतो, "कोण ह्मणतो!"

मी लागलीच त्याला ह्मणालों, "कोण म्हणतो ह्मणजे काय? मुल्लापुऱ्यांतले सगळे लोक म्हणतात."

"वाहवा, वाहवा!" कन्हय्यालाल हांसत हांसत म्हणाला, "लोक काय वाटेल तें बडबडतात. मीच तिचा बाप आहें आणि मीं मुद्दामच तिला आजपर्यंत भेटलों नाहीं असेंहि लोक ह्मणतील."

**मी:**—तुम्हीं काय माझी थट्टा करतां? तुम्हीं भेटतां येवढेंच नव्हे तर पुष्कळ रात्र पडेपर्यंत तुमच्या कानगोष्टी होत असतात. होय ना?

**कन्हय्या:**—हो कधीं कधीं भेटतों मी. सीताबाईला आपल्या आईबापाविषयीं कांहींच हकीकत ठाऊक नाहीं. तेव्हां ते कोण होते, कोठें होते, आपल्या लहानपणीं आपण आईबापाला कां अंतरलों वगैरे हकीकत कळावी अशा उत्कंठेनें ती मला नाना प्रकारचे प्रश्न विचारीत असते.

**मी:**—पण ती हिरालालच्या घरीं कां राहते?

**कन्हय्या:**—मी तें अजून तिला विचारलेंच नाहीं, पण खरें सांगायचें ह्मणजे मला तो हिरालाल बिलकुल आवडत नाहीं. काय सगळें चुकलें पहा, तो कागद त्याला न विकतां तुह्मांला दिला असता तर?

**मी:**—आतां हातचा बाण घालविल्यावर नुसतें रडून उपयोग काय? पण सीताबाईच्याविषयीं आणखी कांहीं तुह्माला ठाऊक आहे काय?

**कन्हय्या:**—आणखी काय सांगूं? लहानपणापासून तिला आमच्या बायकोचा फार लळा. फारच गरीब आणि लाघवी पोर बरें.

**मी:**—आहे खरी ती तशी. पण रात्रीं अपरात्रीं तुम्हीं भेटतां तें कां?

**कन्हय्या:**—दिवसा भेटलें तर हिरालालाला कळेल आणि तिच्या मनांत तर त्याला कांहीं कळूं द्यायचें नाहीं आहे. तिनें आपली कहाणी

मला सांगितली तेव्हां मला असें वाईट वाटलें कीं कांहीं विचारूं नका. इतकी गरीब सालस व शहाणी मुलगी, पण दैव विचारीच्या अगदीं हात धुवून पाठीस लागलें आहे! लहानपणच्या एकेक गोष्टी मीं सांगूं लागलों ह्मणजे बिचारी आनंदानें ऐकत बसते.

**मी:**—मग तुमच्या पूर्वजांच्या आणि तुमच्या नशीबीं जें द्रव्य लिहिलें होतें त्याच्या गोष्टीहि तुम्हीं तिला सांगितल्या असतील?

**कन्हय्या:**—हो, हो; अहो त्या गोष्टी, तिनेंहि लहानपणापासून पुष्कळदां ऐकल्या आहेत. परवां रात्रीचीच गोष्ट. त्या ॐकारेश्वराच्या मंदिरांत एक लहानसें दार आहे व त्यांतून मनकामनेश्वराच्या मंदिराकडे जाण्याचा रस्ता असावा अशाबद्दल आमच्या गोष्टी चालल्या होत्या. पण तिला कोण उत्सुकता म्हणतां? तिनें तितक्या रात्रीं दिवा हातांत घेतला आणि मला आग्रह करून ती मला त्या भूयारांत घेऊन गेली. आंत गवत, कडबा व घाण पुष्कळशी असल्यामुळें व मुख्यतः रात्रीची वेळ असल्यानें आम्हीं लांबवर आंत घुसलों नाहीं. पण बहुधा तोच गुप्तमार्ग असावा असें वाटतें.

**मी:**—बरें, कन्हय्यालालजी, माझें एक काम तुह्मांला केलेंच पाहिजे, आणि तें जर तुम्हीं चोख बजावलेंत तर तुह्मांला कबूल केल्यापेक्षांहि आठ आणे मी जास्त देईन. मी एक पत्र लिहून देतों तें आजच्या आज सीताबाईला नेऊन देऊन तिचें कांहीं तरी, 'हो, नाहीं,' असें उत्तर घेऊन या. पत्र सीताबाई खेरीज दुसऱ्या कोणाच्याहि हातीं पडतां उपयोगी नाहीं. तिला थोडें बहुत तरी लिहिता वाचतां येत असेलच!

**कन्हय्या:**—वा:, आमच्या बहिणीनें तिला पुष्कळ शिकविलें आहे. ठीक आहे. आपण पत्र द्या व तें मी तिला नेऊन देऊन उत्तर आणतों. आतांच्या आतां जातों.

त्याची अशी तयारी दिसल्यावर, मी माझ्या नोटबुकांतून एक पान फाडलें आणि त्यावर पुढील मजकूर लिहिला.

“ आपल्याला भेटावयाची इच्छा आहे. मुल्लामदारीबागेच्या दरवाज्यापाशीं आपण आलांत तरी चालेल; नाहीं तर मीं कोठें व केव्हां येऊं तें उत्तरीं कळवावें.”

हिरालालास किंवा कोणासहि पत्र दाखवूं नकोस नाहींतर मोठा त्रास होईल असें पुन्हां पुन्हां बजावून कन्हय्यालालाला मीं रवाना केला आणि उत्तराची वाट पहात मीं भैरवगडावर इकडें तिकडे फिरत राहिलों.

सुमारें दोन अडीच तासांनीं कन्हय्यालाल परतला. माझें पत्र पाहून तिला मोठा विचार पडला पण शेवटीं मी ठरविलेल्या जागीं सायंकाळीं अस्तमानानंतर येण्याचें तिनें कबूल केलें, असें कन्हय्यालालनें मला सांगितलें.

मग, कबूल केल्याप्रमाणें कन्हय्यालालाला दीड रुपया देऊन व ही सर्व गोष्ट गुप्त ठेवण्याविषयीं त्याला बजावून मीं मनकामनेश्वराचे घरांत विष्णू व नारायणराव बसले होते त्यांचेकडे गेलों.

---

## प्रकरण अठ्ठाविसावें

## कंसमामा

**“ये ! ये ! लक्ष्मण ! धर्मशील बगळा पंपातटीं तो पहा !**
**हत्यापापभयें हळूं क्षितितलीं पादाग्र टेकी अहा !”**
**तेव्हां मत्स्य म्हणे, “प्रतीति न तुला, रामा ! नव्हे हा भला;**
**मिथ्या वर्णिसि यास कां ? बध ययें निर्वंशि केलें मला.”**

—विश्वनाथ नारायण रेडे.

भगवान् मरीचिमाली अगदीं अस्ताला जाण्याच्या बेतांत होता. सर्व दिवसभर आपल्या पिलांकरितां भक्ष्य शोधून आपआपल्या घरट्यांत

परत आलेले पक्षी किल्बिल् किल्बिल करीत होते. मुल्लामदारीचा बाग ह्मणजे गांवाच्या बाहेरचा नदीच्या पलीकडचा प्रदेश, अर्थात् सायंकाळची रहदारी नाहीं अशा सडकेवरील जागा, व बागेंत व बागेच्या आसपास झाडांची दाटी फार; त्यामुळें सूर्य जरी पूर्ण मावळला नव्हता तरी देखील त्या अरण्यांत–अरण्यच ह्मणायचें तें–चहूंकडे साधारण अंधकार पडला होता. आणि ससे, कोल्हे वगैरे श्वापदें हिंडतांना क्वचित् क्वचित् दिसूं लागलीं होतीं. पौर्णिमेचा दिवस होता व लवकरच स्वच्छ चांदणें पडून दिशा प्रसन्न दिसूं लागतील असें वाटून मी बागेच्या दारांत बसून सीताबाईची मार्गप्रतीक्षा करीत होतों. दत्ताच्या आखाड्यांत व इतर मंदिरांतून संध्याकाळच्या देवांच्या आरत्या होत होत्या. त्यांच्या झांजा, ढोल, नगारे, शंख वगैरे वाद्यांचे आवाज ऐकूं येत होते. अशा वेळीं मुल्लापुऱ्याकडून एक स्त्री उज्जयिनीकडे येत असलेली दुरून मला दिसली. ती दुसरी कोण असणार ? सीताबाईच ती होती. संध्याकाळची वेळ होती व तिला सोबतही दुसरें कोणी नव्हतें, तथापि ती धीटपणें हळुहळूं चालत येत होती. ती मला नीट दिसूं लागल्यावर मी आपल्या जागेवरून उठून तिच्याकडे जाऊं लागलों. आम्हीं एकमेकांच्या अगदीं जवळ आल्यावर मी तिला ह्मटलें, 'सीताबाई, कन्हय्यालालानें माझा निरोप तुह्मांला सांगितला का ?''

मैनाबाई किंचित् चपापल्यासारखी दिसली. आपलें 'सीताबाई' हें नांव मला ठाऊक असेल अशी तिची कल्पना नव्हती. तथापि ती धूर्त होती. आपली वृत्ती सांवरून तिनें मला उत्तर केलें कीं, 'होय. पण मीं मुल्लापुऱ्यास आहें हें आपल्याला समजलें कसें ?' मीं तिला सर्व झालेली हकीकत कळविली, आणि ह्मणालों कीं, 'तुम्हीं मुल्ला-

पुन्यास असाल अशी मला कल्पनासुद्धां नव्हती. पण कन्हय्यालालानें मला सर्व गोष्टी सांगितल्या तेव्हां आतां मला त्यांत कांहीं आश्चर्य वाटत नाहीं.'

आम्हीं नंतर हळुहळू पुनः मुल्लापुन्याच्या रस्त्याकडे चाललों आणि रस्त्यावरच एक फार विस्तीर्ण चिंचेचें बन आहे तेथें जाऊन बसलों. त्याला हनुमानबाग असें ह्मणतात. तेथें बसून रस्त्यावरून कोणी आला गेला तर तो आह्मांस दिसावा पण त्याच्या दृष्टीस आह्मीं पडूं नये असा आमचा हेतु होता.

तेथें बसल्यावर सीताबाई मला ह्मणाली कीं, 'डॉक्टरसाहेब, इतक्या करकरीत तिन्हीसांजेच्या वेळीं मी कां आलें हें तुमच्या लक्षांत आलें कां ?'

**मी:**—होय. मीं तुह्मांला मुद्दाम निरोप पाठविला होता 'या' ह्मणून.

**सीताबाई:**—हो. तें तर खरेंच. पण तो आला नसता तरी मी तुह्मांला भेटायला येणारच होतें आणि 'सावध असा' असें कळविणार होतें.

**मी:**—भैरूसिंग व हिरालाल यांच्यापासूनच ना ? ते हिरालाल तुमचे मामा आहेत असें मी ऐकतो तें खरें का ?

सीताबाईनें एक लांबलचक सुस्कारा टाकून 'होय' ह्मटलें. तेव्हां मी विचारलें कीं, 'बाई, सावधगिरी आम्हीं कशाबद्दल ठेवायची ?'

**सीताबाई:**—मला तुमच्या हल्लींच्या उद्योगासंबंधीं यच्चयावत् माहिती आहे. मनकामनेश्वराच्या आवारांतल्या घरांत द्रव्य सांपडेल या आशेवर तुमचे जोराचे प्रयत्न सुरू असून अद्याप तुह्मांला त्यांत यश आलेलें नाहीं; कन्हय्यालालानें जो कागद हिरालालाला दिला तो

सांकेतिक लिपींत लिहिलेला असून त्या लिपीची गुरुकिल्ली तुमच्या ताब्यांत आहे आणि हिरालालाजवळ असलेला कागद तुमच्या हातीं लागल्यास तुह्मांला चटकन् तें द्रव्य कोठें पुरून ठेवलेलें आहे, त्याचा पत्ता लागेल अशी खात्री वाटत आहे ही गोष्टहि मला ठाऊक आहे. कन्हय्यालालाच्या हांतून तो कागद निसटल्यावर तुम्हीं भैरवगडास जाऊन पुष्कळ चौकशी केली व त्यामुळें कन्हय्यालालाचें व त्याच्या बायकोचें भांडण झालें हेंहि मला समजलें आहे.

**मीः**--तें असो. पण अमूक जागीं द्रव्य असावें असें हिरालालला तरी वाटत आहे काय ?

**सीताबाईः**--मनकामनेश्वराच्या आवारांतल्या घरांत तें असावें असें त्यालाहि वाटतें ह्मणूनच तर त्यानें नाना खटपटी करून ॐकारेश्वराचे मंदिरांतून मनकामनेश्वराकडे जाणारा गुप्तमार्ग शोध शोधून काढला. शिवाय त्याच्या जोडीला तो महाघातकी भैरूसिंग आहे....

**मीः**--हो, हो. महा चोर आहे तो. मला त्याची कीर्ति ऐकून ठाऊक आहे.

**सीताबाईः**--ह्मणूनच तुह्मांला मी बजावायला आलें कीं, संभाळून असा. या द्रव्याच्या पायीं ते तुमचा खून करायला देखील चुकायचे नाहींत, मग इतर गोष्टी कशाला पाहिजेत ?

विष्णूनें त्या रात्रीं पाहिलेल्या भयंकर गोष्टीचा उल्लेख करावयाचें माझ्या अगदीं ओठांवर आलें होतें, पण तिला न जाणो वाईट वाटेल व ती कदाचित् रडूं लागली तर? असें वाटून मी तो विषयच टाळला व तिला ह्मणालों कीं, 'बाई, तुमच्या आईबापांची तुह्मांला कांहीं आठवण नाहीं ?

सीताबाईनें एक सुस्कारा टाकून ह्मटलें कीं, 'नाहीं हो, तीं उभयतां वारलीं तेव्हां मीं अगदींच लहान होतें. पुढें अवंतिकाबाईनें माझा प्रतिपाल करून चांगलें स्थळ पाहून दिलें, पण देवाला तें आवडलें नाहीं. मी अशी अनाथ होऊन अवन्तिकाबाईहि वारल्यानंतर हिरालालाच्या देखरेखीखालीं मी राहूं लागल्यें.

**मीः**—"हा हिरालाल मूळचा कोण? तुम्हीं अगदीं बेधक् मला सांगा." तिच्या डोळ्यांना पाणी आलेलें पाहून मी ह्मणालों कीं, "तुम्हीं दुःखी आहांत हें मला पुष्कळ दिवसांपासून ठाऊक होतें. पण मला काय ठाऊक तुमच्या दुःखाचें कारण? तुह्मांला हा हिरालाल चांगल्या रीतीनें वागवीत नाहीं हें खरें ना?

"हो........य." सीताबाई अडखळत अडखळत म्हणाली, "या हिरालालची व आमची लहानपणीं ओळखसुद्धां नव्हती आणि अवन्तिकाबाईनीं जरी मला त्याच्या स्वाधीन केली तरी मी आपल्याच घरीं रहात असे, त्याच्या घरीं रहावयास गेलेंच नाहीं, परंतु मुह्रापुऱ्यास मात्र बिहारीलालच्या घरीं आम्हीं हल्लीं दोघेहि रहातों. मला नाहीं हिरालालांचा स्वभाव बिलकुल आवडत, पण उपाय नाहीं. तुम्हीं मात्र अगदीं सावध असा. तुमच्या प्रत्येक हालचालीवर त्याचें लक्ष आहे. चितोडगडच्या किल्ल्यावर तुह्मांस मनकामनेश्वराच्या संबंधाचे कागदपत्र सांपडले तेव्हां पासूनची तुमच्यासंबंधाची प्रत्येक गोष्ट त्यांना समजलेली आहे. त्या कागदांत काय काय मजकूर आहे तो त्यांना ठाऊक आहे इतकेंच नव्हे तर तुमच्या कागदांतला एक कागद त्यांच्या हातीं लागला आहे.'

**मीः**—होय, मला ठाऊक आहे. नारायणजी ज्योतिषी यांच्या मंदिरांत चोरी करून त्यांनीं तो मिळविला नव्हे का?

**सीताः**--होय, पण त्या कागदाची नक्कल हिरालालच्या जवळ पूर्वीं देखील होती. तुमच्या वाड्यांत चितोडगडाहून ठाकुरसिंग या नांवाचा एक मनुष्य त्या मुक्या माणसाच्या शुश्रूषेसाठीं राहिला होता त्यानें तुमच्या दप्तरांतल्या बहुतेक कागदांची नक्कल केली आणि कोणा-लाशी ती विकली. हा ठाकुरसिंग कांहीं दिवसांपूर्वीं उदेपुरास शाळेंत मास्तर असे. ठाकुरसिंगानें ज्याला ती नक्कल विकली त्यानें ती हिरा-लालांला विकत दिली, आणि तदनंतर हिरालालानें तिचा योग्य उप-योग करून कन्हय्यालालापासून तो कागद विकत घेतला आणि तुमच्या हातावर तुरी दिल्या.

**मीः**—ठाकुरसिंगाची व हिरालालाची कांहीं ओळख होती काय?

**सीताः**--बहुतकरून असावी. पण हिरालालाला प्रत्यक्ष त्याचेकडून कागद मिळालेला नाहीं. दुसऱ्या कोणामार्फत त्याच्या हातीं तो लागला.

**मीः**--बरें, मनकामनेश्वराच्या आवारांत द्रव्य सांपडेल अशी त्यांची अगदीं खात्री आहे काय?

**सीताः**--हो, अगदीं खात्री आहे. पण इतका खात्रीलायक काय पुरावा त्यांना सांपडला आहे तें कांहीं मला ठाऊक नाहीं. ते अगदीं प्रत्येक कानान् कोपरा खोदून पहाणार आहेत. आज रात्रीं देखील ते कदाचित् चवघेजण येतील. म्हणून ह्मणतें, 'संभाळा.'

**मीः**—सीताबाई, हे सगळे लोक असे उलट्या काळजाचे आहेत हें ठाऊक असतांना देखील तुम्हीं हिरालालाच्या घरीं कां रहातां?

ती कांहीं वेळ कांहींच बोलेना, पण शेवटीं एक सुस्कारा टाकून मजकडे पाहून ह्मणाली, "दुर्दैव माझें, दुसरें काय?"

**मीः**--आणि हिरालालाला तुम्हीं आपला मामा असें म्हटलें तरी त्याच्या कृष्णकारस्थानांत तुमचा हात कशाला? हिरालाल एक चोर तर भैरूसिंग सात चोर!

सीताबाई मजकडे पाहून ह्मणाली, "डॉक्टरसाहेब, काय सांगत बसूं सगळें तुह्मांला? आपली मांडी उघडी करून फजिती कशाला करून घ्यावी! झांकली मूठ सवा लाखाची.' पण तिच्या झाकलेल्या मुठींत काय काय होतें तें मला ठाऊक होतें. विष्णूनें मला जी खून झालेली गोष्ट सांगितली होती त्या खुनाच्या संबंधानें घडलेला सर्व प्रकार तिला ठाऊक होता. तेव्हां न जाणों हिरालाल व भैरूसिंग यांचीं सगळीं कृष्णकारस्थानें जगापुढें मांडलीं तर त्यांत आपलेंहि नांव पुढें येईल त्यापेक्षां 'आलीया भोगासी असावें सादर' असें ह्मणत देवावर भार घालून ती स्वस्थ राहिली होती हें माझ्या लक्ष्यांत आल्याखेरीज राहिलें नाहीं. तथापि आपण होऊन जोंपर्यंत ती आपल्या भावासंबंधीं कांहीं खुलासा करीत नाहीं, तोंपर्यंत आपणहि तिला कांहीं न विचारणें बरें, असें मी ठरविलें.

शत्रूच्या छावणींत आपले हेर ठेवून आर्यचाणक्यानें आपल्या कारस्थानाला त्यांचा किती उपयोग करून घेतला हें मला ठाऊक होतें. मैनाबाई ऊर्फ सीताबाई हा आमचा गुप्त हेरच होता.

चंद्र आतां बराच वर आला होता त्यामुळें आसपासचा सर्व वनप्रदेश स्वच्छ दिसूं लागला होता. रात्र पडत चालल्याचें पाहून सीताबाई उठली व मला ह्मणाली, "मी आतां जातें, तुम्हीं मात्र सावधगिरीनें वागा." ती निघाली असें पाहून मी तिला पुन्हां केव्हां भेटणार असें विचारलें, त्यावर ती ह्मणाली, "डॉक्टरसाहेब, पुन्हां आपल्या भेटीचें नांवसुद्धां काढूं नका; मी तुह्मांला भेटलें हें त्यांना कळून देखील कामाचें नाहीं. अगदीं पहिल्यानें नीलगंगेवर नेण्यासाठीं मी तुह्मांकडे आलें तेव्हां त्यांनीं मला तुमच्याकडे बोलवावयाला पाठविलें होतें. माझ्या भावाचा आजार त्यांच्या चांगल्या पथ्यावर पडला. त्यांच्या

मनांत तुम्हांला बोलावून ते कागदपत्र हस्तगत करावयाचे व तुम्हांला लुटायचें होतें, पण त्यांचा कावा ऐनवेळीं माझ्या लक्ष्यांत आला व मी तुह्मांला रस्त्यांत सोडून गेले. तथापि त्यांच्या सांगण्यामुळें मला त्या दिवशीं आपणाकडे यावें लागलें. तुम्हीं मला भेटलांत हें त्यांना कळलें तर मला विनाकारण त्रास होईल. यासाठीं आतां भेटूं नये हेंच चांगलें. त्यांतून कधीं भेट झाली तर झाली," असें ह्मणून ती निघाली आणि जिकडून आली होती त्या दिशेला जाऊं लागली. हिरालाल सकाळपासून उज्जयिनीला गेला होता व तो सायंकाळनंतर परत मुल्लापुऱ्यास जावयाचा होता, तो परत जाण्याच्या अगोदर आपल्या घरीं परत जाणें तिला जरूर होतें.

ती गेल्यावर मी लागलींच परत फिरलों नाहीं. कारण कदाचित् तिला कांहीं सांगावयाचें असून ती परत फिरली तर तिची निराशा होईल असें मला वाटलें. ह्मणून ती अगदीं लांब जाऊन दिसेनाशी झाल्यावर मी गांवांत येण्यासाठीं निघालों. नदीच्या किनाऱ्याजवळ आलों तों एक मनुष्य, उंचसा, रोडकासा, मुल्लापुऱ्याकडे जात असलेला मला आढळला. मी त्याला पाहिला तेव्हां तो झाडांच्या सांवलींत होता त्यामुळें त्याचा चेहेरा मला दिसला नाहीं, तथापि एकंदर प्रकारावरून तो हिरालालच असावा व उज्जयिनींतील आपलें काम आटोपून सीताबाईंचा मानलेला तो मामा, पण कृतीनें कंसमामा, घरीं जाण्यासाठीं चालला आहे हें मी ओळखलें.

## प्रकरण एकोणतिसावें

# करावें तसें भरावें !

**ईशकृपेचें कवच तदंगीं सत्यनीतितें जो वरितो;**
**कलि-मलिन-मती दुःखीं बुडती, त्यजिति न कुमती जोंवरि तों॥**

—किरात.

रामघाटावर नारायणराव व विष्णू माझी मार्गप्रतीक्षा करीत सायंसंध्या करीत बसले होते. मी त्यांच्या दृष्टीस पडतांच ते मला ह्मणाले कीं 'तात्या, सरसुभेसाहेबांच्या कुटुंबाची प्रकृति बरी नाहीं ह्मणून तुझ्याकडे घरीं दोन वेळां बोलावणें येऊन गेलें आहे तर तूं तावडतोब अगोदर तिकडे जा.'

त्याच रात्रीं कदाचित् हिरालाल प्रभृति चवघेजण मनकामनेश्वराचे आवारांत येतील, असें सीताबाई मजजवळ बोलली होती हें मीं त्यांना सांगितलें. तेव्हां, 'त्याबद्दल आम्हीं काय तो विचार करतों, तूं सरसुभेसाहेबांचे घरून लवकर मोकळा झालास तर विष्णूच्या घरीं ये, तेथें तुझ्यासाठीं एक पत्र लिहून ठेऊं' असें त्यांनीं मला सांगितलें, ह्मणून मी प्रथम घरीं गेलों व नंतर सुरसुभेसाहेबांच्या बंगल्यावर गेलों.

तेथून परत फिरावयास मला सुमारें रात्रीं साडेअकरांचा सुमार झाला. तथापि परत येतांना सरसुभेसाहेबांची बग्गी असल्यामुळें मी थोड्याच वेळांत विष्णूच्या बिऱ्हाडीं येऊन पोचलों. दारांतच माझा पत्ता लिहिलेलें एक पत्र पडलें होतें त्यांत 'हें पत्र साडेबाराच्या आंत तुझ्या हातीं लागेल तर ये, नांव तयार आहे' एवढींच अक्षरें लिहिलेलीं होतीं. तेव्हां माझें सर्व सामान विष्णूच्या घरीं ठेवून मी पुनः बग्गींत बसलों व कोचमनाला 'अनंतपेठमे चलो' असें सांगितलें. मध्यरात्रीची वेळ होत आल्याकारणानें तो विचारा कोचमन घरीं

जाण्याला मोठा उत्सुक झालेला दिसला, व आतां एकदां लवकर अनंतपेठेंत मला सोडून देऊन नंतर आपल्या घरीं जावें, या उद्देशानें त्यानें घोड्यांना दोनचार चावूक सडकून, कार्तिक चौकावरून अनंत पेठेकडे जाण्यासाठीं बग्गी वळविली व झपाट्यानें हांकून ती अनंत-नारायणाचे मंदिरापाशीं नेऊन उभी केली. बग्गी उभी राहण्याबरोबर आंतून मी उतरलों. आणि कोचमनाचे हातांवर कांहीं ठेऊन त्याला रजा दिली. रात्रीच्या बारा वाजतां अनंतपेठेंत चोहोंकडे अगदीं सामसूम असतें. तथापि, पिठासारखें स्वच्छ पौर्णिमेचें चांदणें पडलें होतें ह्मणून मी तसाच पायऱ्या उतरून नदीच्या किनाऱ्यावर येऊन पोंचलों व स्मशानाच्या रस्त्यानें रणजीतमारुतीच्या मंदिराकडे चालूं लागलों. स्मशानांत दोन प्रेतें जळत होतीं व चितेंतून निघालेला एकप्रकारचा दुर्गंध चोहोंकडे पसरलेला होता. स्मशान ओलांडून पलीकडे गेल्यावर रणजीतमारुतीच्या समोरच्या बाजूला नदीच्या किनाऱ्यावर मी होतों त्या बाजूला एक नांव उभी असलेली मला दिसली. नदीच्या पात्रांत त्या नावेंत बसून नावाडी तंबाखू ओढीत होता. मी किनाऱ्याजवळ जातांच त्यानें मला 'कोण?' ह्मणून प्रश्न केला, पण मी त्याच्या प्रश्नाचें उत्तर न देतां 'इदर आव' असें ह्मटलें व तो त्याप्रमाणें आल्यावर मी झटकन् नावेंत जाऊन बसलों, आणि 'चलो' ह्मणून सांगितलें. नावाड्यानें पुढें कांहीं न बोलतां नांव चालू केली आणि रणजीतमारुतीच्या किनाऱ्यावर ती आणून लाविली. मी झटकन् किनाऱ्यावर उतरलो आणि तडक विष्णू व नारायणराव होते तिकडे गेलों.

ते दोघे माझी मार्गप्रतीक्षाच करीत होते. मी त्यांना भेटतांच त्यांनीं घराला आंतून कड्या लावून घेतल्या व विष्णू बसत असे त्या खोलींत आह्मीं जाऊन बसलों.

मध्यरात्र उलटून गेली होती व मी दिवसभर इकडे तिकडे हिंडून हिंडून थकलों होतों तेव्हां मी त्यांच्याबरोबर बोलतां बोलतांच पेंगूं लागलों. पण मी फार थोडा वेळ निजलो असेन, कारण नारायणराव मला हलवून ह्मणाला 'तात्या, अरे पेंगतोस काय, सावध हो. ते आले पहा !'

मी चटकन् उठून बसलों. तळघरांतल्या जागेंत कांहींतरी आवाज ऐकूं येत होता, तो ऐकून आम्ही उठलों व दिवा मालवून विष्णूनें सूचना दिल्याबरोबर त्याच्या मागोमाग जाऊन एका फडताळांत लपलों. तें फडताळ मोठें प्रशस्त असून दुपारीं विष्णूनें त्याच्या आंतल्या बाजूनें कडी अडकवून ठेवली होती. फडताळाचें दार आंतून लावून घेतल्यावर जी बारीक फट राहिली होती ती मधून पुढच्या दालनांत प्रकाश असल्यास आह्मांस सर्व दिसावें पण बाहेरल्या कोणासहि आम्हीं आंत असल्याची शंका न यावी अशा युक्तीनें कडी लावलेली होती. शिवाय दारांना तीन बारीक छिद्रेंहि पाडून ठेवलेलीं होती.

थोड्या वेळानें भूयाराच्या मार्गानें हातांत कंदील घेऊन भैरूसिंग प्रथम वर आला, आणि त्याच्या मागोमाग हिरालाल व इतर दोन साथीदार आले. त्यांनीं कंदील वर खालीं करून चोहोंकडे पाहिलें व कांहीं दगाफटका नाहीं अशी आपली खातरी करून घेतली. त्यांच्या हातांत कुदळी, फावडीं, खोरीं व इतर जरूरीचें सर्व सामान होतें. आम्हीं होतों त्या फडताळांच्या समोरच्या दालनांतून ते सर्वजण पलीकडे निघून गेले. कंदिलाचा उजेड दिसेनासा झाला. त्यांचा आवाज कानांवर येईनासा झाला. तेव्हां विष्णूनें हळूच फडताळाची कडी उघडली आणि तो ह्मणाला, पहारे बोवा, आतां आपल्याला अत्यंत हुषारीनें व सावधगिरीनें राहिलें पाहिजे. आपणां-

पैकीं येथें कोणी आहे असा संशय देखील त्यांना येतां उपयोगाचा नाहीं. मी थोडासा येथून जातों. तोंपर्यंत तुम्हीं येथें असल्याचा सुगावा लागूं न देतां शक्य तर त्यांच्या हालचालीवर नजर ठेवा." असें ह्मणून तो आमच्या उत्तराची वाट न पहातां आह्मांपुढून निघून गेला. तो कोठें व कां गेला हें आमच्या लक्षांत येईना, कारण तसें तो करील अशाबद्दल आमचा कांहींच संकेत झालेला नव्हता.

आमच्या नकळत घरांत मध्यरात्रीं अंधेरांत चोर शिरले असते तर आम्हीं अगदीं घाबरलों असतों, पण त्यावेळीं जरी ते चोर मध्यरात्रीं घरांत घुसले होते तरी तो प्रसंग येणार हें आम्हांस अगोदरच ठाऊक असल्यामुळें आमचीं मनें त्या प्रसंगाला अगदीं तयार होतीं व शिवाय विष्णू जरी नाहींसा झाला होता तथापि दंडधारी व मी असे एक-मेकांच्या सोबतीला होतों, त्यामुळें आह्मांला भीति वाटली नाहीं. बाकी तो प्रसंग मोठा चमत्कारिक तर खराच ! आज त्या प्रसंगाचें वर्णन करतांना जरी मौज वाटत असली तरी तो प्रसंग अनुभवित असतांना तर मौज खचित वाटत नव्हती ! विष्णू निघून गेल्यानंतर दंडधारी व मी यांनीं त्या भामट्यांच्या हालचालीवर पाळत राखण्याचें ठरविलें. प्रसंग भयंकर तर खराच, पण ईश्वरकृपेनें तो निर्विघ्नपणें पार पडला. आम्हीं फडताळाचे बाहेर पडून पहातों तों हिरालाल प्रभृति मंडळी आंगणांत व घराच्या बाहेरच्या अंगाला प्रत्येक ठिकाणीं नीट निरखून तपास करीत होती. तेथें कांहीं लभ्यांश न झाल्यामुळें ती सर्व मंडळी त्यानंतर पुन्हां घरांत शिरली. घरांत आल्यावर पुढें काय करावयाचें त्याचा संकेत करून मंडळी कामाला लागली. आरंभीं चिलमीचा एक एक झुरका मारल्यावर भैरूसिंग इतरांना उद्देशून ह्मणाला, कीं, 'भाईहो याच खोलींत आपण खोदूं ह्मणजे आपलें काम होईल. बसंतीलाल

ज्योतिषानें आपल्याला सांगितलें आहे कीं पाण्याच्या बाजूला जी जागा असेल तेथें तीन त्रीक नऊ हात खोदलें पाहिजे, त्याप्रमाणें पाण्याची ह्मणजे नदीकडील बाजूची ही खोली आहे.''

वसंतीलाल ज्योतिषी ह्मणजे एक नांवाजलेला ज्योतिषी होता. गडाच्या कालिकादेवीपुढें सप्तशतीचा पाठ नित्य नियमानें करण्याचा त्याचा प्रघात असून अनेक वाणी उदमी व इतर लोक सट्टयाचे सवदे व इतर गोष्टी करितांना त्याचा अभिप्राय घेत असत. अर्थात् वसंतीलालानें भविष्य सांगितलें त्या ठिकाणीं खोदणें सुरू करणें सर्वांनां मान्य होऊन काम सुरू झालें. कुदळी, फावडे, पहारी यांचे आवाज होऊं लागले. अशा स्थितींत जवळ जवळ तासभर तरी गेला असेल. विष्णू गेला तरी कोठें व येणार केव्हां या विचारांत मी व दंडधारी अंधेरांत बसून दाराच्या फटींतून भामट्यांचा उद्योग पहात होतों, तों विष्णू परत आला व त्यानें आह्मांला अगदीं हळूच प्रश्न केला कीं "सावध आहांत ना ?''

आम्हीं उभयतांनीं 'हो' कारार्थीं मान हालविली.

त्या फटींतून पहातां भैरूसिंग व हिरालाल कोणते ते विष्णूनें व दंडधारी यांनीं ओळखले व बाकीच्या दोहोंपैकीं एक ठाकुरसिंग होता असें माझ्या लक्षांत आलें. फडताळांत आम्हीं असतांना तें माझ्या ध्यानांत आलें नव्हतें. त्याचें कारण हें कीं ठाकुरसिंग आमच्या घरीं असतांना त्याला काळी कुळकुळीत भव्य दाढी होती ती यावेळीं त्यानें सर्व काढून टाकलेली होती. तथापि मी त्याजकडे जेव्हां नीट निरखून पाहिलें तेव्हां त्याची ओळख मला पटली.

पहाट होईपर्यंत त्यांच्या खोदाखोदीचा झपाटा सुरू होता, पण जेव्हां सर्वांची निराशा होऊं लागली तेव्हां कंटाळून त्यांचा परत

फिरण्याचा विचार दिसूं लागला. तेव्हां आम्हीं त्रिवर्ग झटकन् आपल्या पूर्वींच्या जागीं जाऊन लपलों.

ते चवघे चोर चांगले जवान, बळकट व धिप्पाड असून त्यांजपाशीं असलेलीं खोदण्याचीं हत्यारेंहि अगदीं नवीं होतीं. ते वर सांगितल्याप्रमाणें कंटाळून आपलें काम संपवून खोलीच्या बाहेर आले आणि आमच्या समोरून एकामागून एक जाऊन त्या भूयारांत शिरले; आणि सर्वजण भुयारांत उतरल्यावर त्यांनीं भुयाराचें दार बंद केलें त्याचा आवाजहि आह्मांला ऐकूं आला.

ते भामटे गेले असें समजतांच विष्णूनें फडताळाचें दार उघडलें व तो बाहेर पडला. आणि आह्मांला उद्देशून गडबडीनें ह्मणाला कीं ‘ अरे, पहातां काय, हे आसपास पडलेले सगळे दगड उचला आणि भूयाराच्या दारावर टाका. पुनः त्यांना हें भूयाराचें झांकण उघडतां येऊं नये असें केलें पाहिजे.’ असें ह्मणून आमच्या मदतीची वाट न पहातां त्यानें हातांत सांपडतील ते दगड उचलून भूयाराच्या दाराकडे फेंकण्यास प्रारंभ केला. आम्हींहि त्यावेळीं जास्त विचारपूस करावयाच्या भानगडींत न पडतां त्याच्या मदतीला धांवलों व थोड्याच वेळांत भूयाराच्या दारावर दगडाची एक भली मोठी रासच रास ठेवून दिली.

याप्रमाणें पक्का बंदोबस्त झाला. भूयारांतून कितीहि प्रयत्न केला तरी दार उघडून वर येणें शक्य नाहीं अशी खात्री होतांच विष्णू आनंदानें नाचूं लागला, आणि ह्मणाला, ‘आतां बसूंदेत खुशाल बोंबलत ते चोर! मी मघाशीं तुह्मांला सोडून एकटाच निघून गेलों तो त्या भूयारांत शिरलों, आणि थेट त्या खोल खळग्यापर्यंत पोंचलों आणि पहातों तो खड्डयावर फळ्या टाकून पूल केलेला होता. मग त्या

फळ्या हालवून मी दूर सरकाविल्या तों त्या खळग्यांत पडल्या. आतां बसा स्वस्थ किंवा खुशाल शंख करा !

अशा रीतीनें भामट्यांच्या उपद्रवापासून आम्हीं तात्पुरते तरी मुक्त झाल्यामुळें आह्मांला फार आनंद झाला आणि आम्हीं सर्वांनीं ईश्वराची मनोभावानें स्तुती केली.

---

## प्रकरण तिसावें

# मागील आठवणी

**अंतरीं निर्मळ वाचेचा रसाळ ।**
**त्याचे गळां माळ असो नसो ॥ १ ॥**
**आत्मा अनुभवीं चोखाळिल्या वाटा ।**
**त्याच्या माथां जटा असो नसो ॥ २ ॥**
**परद्रव्या अंध निंदेसी जो मुका ।**
**तोचि संत देखा तुका ह्मणे ॥ ३ ॥**

उषःकाल होऊन गेला होता. तेव्हां आतां पुन्हां निजण्याच्या भानगडींत न पडतां आम्हीं सर्वजण नित्यकर्मांना लागलों आणि सूर्योदयाच्या सुमारास क्षिप्रा नदींत स्नान करून व श्रीमनकामनेश्वराचें दर्शन घेऊन संध्या नमस्कार झाल्यावर शहराकडे जाण्यास निघालों. रात्रीं झालेल्या प्रकाराबद्दल रस्त्यांत आमचें बोलणें चाललें होतें, व विष्णूनें मोठ्या शिताफीनें त्या चोरट्यांना कोंडून टाकल्याबद्दल दंडधारी आपली पसंती दर्शवीत होते. परंतु खरें सांगावयाचें ह्मणजे मला कसेसेंच वाटत होतें. चार जिवंत माणसांना आपण आज कोंडून टाकलें आहे हें चांगलें केलें कीं वाईट याचा मनाशीं निर्णय होईना. ‘ आपला जीव घेण्यास, अथवा आपल्या घराला आग लावण्यास, अगर आपली सर्व दौलत व स्थिरस्थावर हरण करण्यास एखादा दुष्ट

मनुष्य हातांत शस्त्र घेऊन सज्ज झाला व जवळ दुसरा कोणीहि त्राता नाहीं; तर असला आततायी ह्मणजे दुष्ट मनुष्य बेशक ठार करावा' असें मनुस्मृतींत * वाचल्याचें मला आठवत होतें व नारायणजी गुरुजीनींहि तसेंच सांगितलें होतें हें खरें, पण तशी गोष्ट प्रत्यक्ष घडून आल्यावर मन किंचित् उद्विग्न झालें. तथापि झालें तें होऊन गेलें असें मनाशीं समाधान करून मी घरीं गेलों व नंतर दवाखान्यांत जाण्याच्या उद्योगाला लागलों. दवाखान्यांत त्या दिवशीं बरेंच काम होतें, तें सगळें संपवून घरीं येण्याला सुमारें दीड वाजला. मग जेवण करून आदल्या रात्रीची उरलेली झोंप ताणली. सायंकाळीं पुन्हा दवाखान्यांत गेलों तों भैरवगडावरचा कन्हैय्यालाल माझी वाट पहात बसलेला दिसला. मीं भेटतांच नमस्कार चमत्कार होऊन त्यानें माझ्या हातीं एक पत्र दिलें, तें मीं उघडलें तों त्यांत पुढील मजकूर होता—

'मुल्लापुऱ्याहून निघून मीं पुन्हा दत्ताच्या अखाड्यांत रहावयास आलें आहे. तुम्हीं सावधगिरीनें वागावें. हिरालाल काल रात्रीं जो घराबाहेर पडला आहे तो अद्याप पर्यंत घरीं परत आला नाहीं.'

तें पत्र वाचून मीं मनांतल्या मनांत हंसून म्हटलें, 'येतो आहे कशाला आतां हिरालाल परत ?' सगळे हिरालाल आणि मोतीलाल आतां जामदारखान्यांत पडले आहेत.

कन्हय्यालाल निघून गेल्यावर मीं दवाखान्याचें काम आटोपून नदीकडे फिरावयाला गेलों. लच्छेगिरीच्या मठांत विष्णू भेटला तोहि मजबरोबर फिरावयाला आला. त्याच्या सांगण्यावरून असें समजलें

---

* गुरुं वा बालवृद्धौ वा ब्राह्मणं वा बहुश्रुतम् ।
आततायिनमायान्तं हन्यादेवाविचारयन् ॥

मनु ८. ३५०.

कीं, रेल्वेच्या कांहीं कामासाठीं नारायणराव रतलाम येथें गेला असून २–३ दिवस तो परत येणार नव्हता. आम्ही दोघेजण फिरावयाला निघालों. सीताबाई नदीच्या पलीकडील देवळांत रहावयास आली होती तेव्हां तिची व विष्णूची ओळख करून द्यावी या इच्छेनें आम्हीं दत्ताच्या अखाड्याकडे जाण्याला निघालों.

उज्जयिनीची पुण्यसलिला क्षिप्रा नदी इतिहासप्रसिद्ध आहे. तिच्या किनाऱ्यावरील प्रदेश अत्यंत रम्य व सुंदर असून तेथें उभें राहणाराच्या अंतःकरणांत क्षणभर गत ऐतिहासिक कालाची स्मृति जागृत झाल्याविना रहात नाहीं. समृद्ध अवंति देशावर आजपर्यंत ज्या अनेक स्वाऱ्या झाल्या त्यांच्या युद्धांच्या व्यूहरचना या नदीच्या किनाऱ्यावर झालेल्या आहेत. पूर्वींच्या त्या विशाला अवंतिका नगरीचें स्मरण करावें व आज या हल्लीं दिसत असलेल्या नगराकडे पहावें म्हणजे अंतःकरण भडभडून येतें. असो.

संध्याकाळीं नदीच्या पलीकडल्या दत्ताच्या अखाड्यांत आम्हीं पोंचलों तेव्हां तेथें जवळ जवळ सामसूमच होतें. त्या मंदिरांत रहाणारे अनेक साधूसंत महंत वगैरे लोक कामानिमित्त कोठें बाहेर गेले होते. मंदिराच्या भोंवतीं एक प्रशस्त कोट असून त्यांतल्या विस्तीर्ण पटांगणांत एक भव्य वटवृक्ष आहे. त्यांच्या भोंवतीं घातलेल्या कट्ट्यावर सीताबाई सचिंत बसलेली होती. तिचा चेहेरा अगदीं काळजीयुक्त दिसत होता. कपाळावरून हात फिरवीत शून्य दृष्टीनें ती खालीं मान घालून बसलेली होती. आम्हीं आलों हें तिनें पाहिलें नव्हतें. तिला अशी खिन्न पाहून आम्हांला तशा वेळीं तिला भेटावयाला कोठून आलों असें झालें. पण त्या वेळीं परत जाणेंहि योग्य नव्हतें. कारण आमच्या मनांत असा विचार येतो न येतो तोंच सीताबाईची दृष्टी आमच्याकडे गेली.

आम्हीं नंतर तिच्या जवळ जाऊन बसलों. आम्हांला पहातांच तिला जास्त गंहिवर आला; आणि तिचा केवळ निरुपाय होऊन आतांपर्यंत मोठ्या कष्टानें दाबून ठेवलेला शोक अश्रुरूपानें बाहेर पडूं लागला.

आम्हीं अगदीं स्वस्थ बसलों होतों. एक तर ती कां रडत होती हें आम्हाला ठाऊक नव्हतें व ठाऊक असतें तरी आम्हीं तिला चार समजुतीच्या गोष्टी सांगून तिचें समाधान झालें नसतें. मनुष्याला कांहीं कारणानें जर फार दुःख झालेलें असलें तर त्या दुःखाचें परिमार्जन मुक्तकंठ अश्रुमोचनानें जसें होतें तसें कोरड्या सांत्वनानें होत नाहीं, यासाठीं त्याला मनमोकळेपणानें अश्रु गाळूं द्यावेत हेंच उचित होय.

सीताबाई मोठी विचारी स्त्री होती. मी जरी तिच्या माहितीचा होतों तरी विष्णू तिला नवखाच होता, त्यामुळें मोठ्या विवेकानें तिनें आपला शोक लवकरच आवरला, आणि आम्हांला तेथें बसवून आपण तेथून उठून घरांत जाऊन डोळ्यांना पाणी वगैरे लावून नंतर ती आह्मांजवळ येऊन बसली. ती आल्यावर तिच्या दुःखाचें कारण तिला न विचारतां मी विष्णूची ओळख करून दिली. तेव्हां ती म्हणाली—"मला यांची चांगली माहिती आहे. ते दुसरे नारायणराव आज कोठें आले नाहींत तुमच्याबरोबर ?

तिच्या माहितीचें मला मोठें आश्चर्य वाटलें. मी विचारलें, "सीताबाई, या दोघांची माहिती तुह्मांला कोठली ?"

**सीता**—हिरालाल, भैरूसिंग वगैरे मंडळी बोलत असतांना मी पुष्कळ वेळां त्यांचीं नांवें ऐकलीं आहेत. यांना तर मी एकदां पाहिलेंहि आहे.

**विष्णू**—मला कोठें पाहिलें आहे ?

**सीता**—एके दिवशीं रात्रीं तुम्हीं झाडावरून पाय घसरून पडलांत व बेशुद्ध झालांत, त्यावेळीं तुम्हांला पाहिलें होतें. तुम्हींच होतांना ते ?

**विष्णू**—होय. आतां ओघालाच आलें आहे ह्मणून विचारतों कीं, त्या दिवशीं रात्रीं त्या चोरांनीं एका मुलाचा मुडदा पाडला तो मुलगा कोण होता ?

सीताबाईनें एक दीर्घ उसासा टाकून ह्मटलें कीं, "काय सांगूं ? दुर्दैवानें माझा अगदीं पिच्छा पुरविला आहे. लहानपणीं आईबाप सोडून गेले, नंतर सासरच्या सर्व मंडळींचें वाटोळें झालें; आईप्रमाणें जिनें माझा सांभाळ केला ती मला कायमची अंतरली व एका महादुष्ट माणसाच्या स्वाधीन करून गेली. एक लहान मुलगा बाळगला होता, त्याला मोठा करून चार अक्षरें शिकवीन व त्याच्याकडे पाहून आयुष्याचे दिवस कंठीन असा विचार केला होता पण देवाच्या मनांत तसें नव्हतें. आज तुम्हीं येण्याच्या वेळेला त्याच मुलाची आठवण येऊन मला वाईट वाटत होतें."

मीं विचारिलें, 'कोण रामलाल कीं काय ?'

सीताबाईनें 'होय' असें उत्तर दिल्यावर मीं ह्मणालों, 'अगदीं पहिल्या दिवशीं रात्रीं तुम्हीं आमच्या घरीं आलां होतांत व रामलाल, तुमचा भाऊ—आजारी होता ह्मणून मला नीलगंगेपर्यंत घेऊन गेला होतांत; त्यानंतर मीं माझ्या बंधूंना सगळी हकीगत कळविली, पण ते ह्मणाले कीं रामलाल कोण तेंहि त्यांना ठाऊक नाहीं व त्यांनीं त्याला कधीं पाहिलाहि नाहीं, तें कसें काय ?'

**सीताबाई**—होय. तुमच्या बंधूनीं रामलालला प्रत्यक्ष कधीं पाहिला नाहीं हें खरें व रामलालासाठीं तुमच्या दवाखान्यांतून औषध

मिळालें आणि त्याची प्रकृति बरी झाली हेंहि खरें; मग काय राम-लालच्या नांवाऐवजीं त्याचें दुसरें नांव त्याच्या मित्रांनीं सांगितलें कीं काय कोण जाणे ? मीं त्याला अगदीं भावाप्रमाणें सांभाळला होता व अनेक नांवानीं त्याला हांका मारीत असे, ह्मणून त्याचे मित्रहि त्याला अनेक नांवांनीं हांका मारीत. पोर मोठा चांगला पण फार तापट असे. तो आजारी पडण्याचे संधीलाच मीं हिरालालकडे त्याला ठेवून गांवाला गेलें होते. मीं बोलवायाला आलें त्यावेळीं तो बराच आजारी होता पण आपण आलांत तर माझ्या घरीं त्यावेळीं हिरालाल बसला होता तो आपल्याला त्रास देईल अशी कल्पना माझ्या मनांत आली आणि ह्मणून मला तसें चमत्कारिक तऱ्हेनें वागावें लागलें.

**विष्णू**—हा मुलगा तुम्हांला हातीं कसा लागला ?

**सीता**—गेल्या सिंहस्थांतील गोष्ट आहे. मुलगा होता ब्राह्मणाचा. पण मुलगा व बाप या दोघांना सिंहस्थाच्या यात्रेंत महामारीचा उपद्रव झाला. बाप मेला व मुलगा जगला. घरीं आणखी कोणीहि नव्हतें. ते आजारी असतांना दैवयोगानें त्यांची शुश्रूषा करण्याची संधी मला मिळाली, आणि नंतर तो जो मजजवळ राहिला तो राहिला. त्याच्या अनेक गोष्टी आठवून मनाला फार खेद वाटतो. एके दिवशीं आह्मीं दोघेहि फिरत फिरत चिंतामण गणेशाला गेलो होतों; वाटेंत रस्त्या-वरच एक फाटकासा जोडा ठेवलेला आह्मांला आढळला, तेव्हां तो कोणाचा असावा याविषयीं बरीच वाटाघाट झाली. अखेर त्या वाटेपासून थोड्या अंतरावर एक शेत असून त्यांत एक गरीब मनुष्य काम करीत होता, त्याचा असावा असें आम्हीं अनुमान केलें. तोहि आपलें काम संपवून गवताचा भारा वगैरे बांधून निघण्याच्याच तयारींत होता; तेव्हां रामलाल मला म्हणाला कीं “ आतां आपण त्या माणसाची जराशी मजा करूं

या. मी हा जोडा आतां दडवून ठेवतों आणि आपण त्या पलीकडच्या झाडींत लपून बसूं आणि आपला जोडा ठेवलेला नाहींसा पाहून तो कसा कावराबावरा होईल आणि वेड्यासारखा इकडे तिकडे पाहूं लागेल तें बघूं या." त्याची ती पोरबुद्धि आणि विनोदी स्वभाव या वेळीं मला चांगला लक्षांत आहे. मी ह्मणालें, बाळ, दुसऱ्याची वस्तु घेऊन कधींहि मजा पाहूं नये, देऊन पहावी. तर असें कर कीं, हे चार आणे घे व त्यांतील दोन दोन आणे एका एका जोड्यांत ठेवून दे. आणि मग आपण जाऊन त्या झाडींत लपून बसून त्याला जोड्यांतलें द्रव्य अकस्मात् पाहून किती आनंद होतो तो पाहूं या" रामलालाला ती गोष्ट मान्य झाली. लागलीच त्यानें मी सांगितल्याप्रमाणें केलें आणि आम्हीं जवळच्याच एका झाडीत जाऊन लपून उभें राहिलों.

थोड्याच वेळांत त्या शेतांतील माणसाचें काम आटोपलें. तेव्हां तो त्या रस्त्यावर जेथें आपलें घोंगडें व जोडा ठेविला होता तेथें आला. त्यानें आपलें घोंगडें खांद्यावर टाकतां टाकतांच एका जोड्यांत चटकन पाय घातला. तों त्यांत कांहीं कठिणसें पायाला लागलें. तें काय आहे ह्मणून पाहण्यासाठीं तो वांकला, आणि पहातों तों चवली! तिजकडे पाहून तो अगदीं गोंधळांत पडला, व आश्चर्यचकित झाला, तो त्या चवलीकडे पाही, पुन्हां आपल्या सभोंवार इकडे तिकडे चारहि बाजूंस पाही, पण आसपास कोणी कोठेंच मनुष्य दिसेना. तेव्हां ती चवली त्यानें आपल्या लंगोटीच्या पदरांत बांधली, आणि दुसरा पाय दुसऱ्या जोड्यांत घातला, तों दुसऱ्यांत दुसरी चवली! तेव्हां तर तो फारच चकित झाला! त्याच्या हृदयांत जें आनंदाचें भरतें आलें तें त्यास आवरेना. त्यानें त्या आनंदांत ईश्वराचें स्मरण करून व हात जोडून तो मोठ्यानें ह्मणाला, देवा! तूं मजवर आज केवढे बरें उप-

कार केलेस ? आज साऱ्या दिवसांत मला कांहींएक मिळालें नव्हतें व हें द्रव्य जर आज मिळालें नसतें तर आज मला फार त्रास झाला असता !" हे त्याचे दीनवाणे शब्द ऐकून, रामलालाच्या डोळ्यांतून खळखळ अश्रु वाहूं लागले. असा तो बिचारा मायाळू होता." असें सांगत असतां रामलालाचें स्मरण होऊन सीताबाईचा कंठ गहिंवरून आला.

दत्ताच्या आखाड्यांत रहात असलेले साधू हळुहळू येऊं लागले होतें. संध्याकाळच्या आरतीची तयारी चालू होती, तेव्हां सीताबाईला तशा वेळीं बोलण्यांत गुंतविणें आम्हाला प्रशस्त वाटलें नाहीं. सीता-बाईनें आह्मांस आरतीला चलण्याची सूचना केली व आम्हीं ती मोठ्या आनंदानें मान्य केली. आरती होत असतांना आम्हीं सीताबाईकडे पाहिलें तों ती भक्तिरसाची प्रत्यक्ष मूर्तीच आह्मांला भासली. तिची मुद्रा आतां प्रसन्न दिसत होती. आणि प्रत्यक्ष राणी मीराबाई तिच्या हृदयांत संचार करून पुढील पद ह्मणत असावी असा तिच्याकडे पाहून आम्हांला भास झाला.

**हरिगुण गावत नाचूंगी ॥ ध्रु० ॥**
**आपने मंदिरमो बैठबैठकर । गीता भागवत बाचूंगी ॥ १ ॥**
**ध्यानदानकी गठडि बांधकर । हरिहर पांवमे लागूंगी ॥ २ ॥**
**मीराके प्रभु गिरिधर नागर । सदा प्रेमरस चाखूंगी ॥ ३ ॥**

---

## प्रकरण एकतिसावें

# दैवाची लीला !

**अपमान होय, तेथें योग्य न वास्तव्य; हें मनीं आणा ।**
**प्राण प्रिय सकलांना; प्राणापेक्षां हि मान सुजनांना ॥**

—चिंतामण माधव पिंपळसकर.

राजपुत्र भीमसिंगानें ठेवलेलें द्रव्य मृगजलाप्रमाणें लांब लांब जात होतें आणि तें प्राप्त होण्याबद्दलची खटपट कर करून आम्हीं त्रिवर्ग व

आमचे प्रतिपक्षी हताश झालों होतों. दंडधाऱ्यानीं तर त्याचा विचारच करण्याचें सोडून देऊन रेलवेच्या कामानिमित्त उज्जयिनींतून परगांवीं प्रयाण केलें. पंडित विष्णूशर्मा यांनीं जवळजवळ त्यांचेंच अनुकरण करावयाचें योजिलेलें होतें. हिरालाल प्रभृति खटपटाचार्य कोठेंहि दिसत नव्हतें. त्यांना भूयारांत कोंडून टाकून आम्हीं स्वस्थ बसलों होतों खरें, पण भैरूसिंगासारखा चाणाक्ष मनुष्य त्याजमध्यें असतां ते निव्वळ टांचा घांसून त्या भूयारांत प्राण सोडतील असें माझें मन मला केव्हांच सांगत नव्हतें. विष्णूला मात्र ते आतां पुन: केव्हांहि दिसणार नाहींत असें वाटत होतें. सीताबाईच्या भेटीला जवळ जवळ एक महिना झाला होता व आम्हीं ही पूर्ववत् आपआपल्या कामधंद्यांत निमग्न झालों होतों. मुक्याची हालहवाल पुष्कळ दिवसांत समजली नव्हती ह्मणून त्याच्या कडे एकदां खेप टाकावी असें पुष्कळ वेळां वाटे पण कामामुळें बरेंच दिवस त्याच्याकडे जातां आलें नाहीं. एके दिवशीं डॉक्टर नाबरसाहेब रस्त्यांत भेटले. ते मला ह्मणाले कीं, "त्या मुक्याची प्रकृति आतां चांगली सुधारली असून तो आतां नीट बोलूं लागला आहे." हें आनंदाचें वर्तमान ऐकून मला संतोष वाटला आणि दुसऱ्या दिवशीं मीं नाबर साहेबांच्या घरीं दवाखान्यांत गेलों व त्या मुक्या माणसाला आम्हीं बसलों होतों तेथें बोलावुन आणलें. तो मुका आतां चांगला निरोगी दिसत होता. त्यानें मला चटकन् ओळखून नमस्कार केला व तो मोठ्या अदबीनें उभा राहिला. त्याला नंतर मी बसावयाला सांगून त्याची प्रकृति नीट होऊन त्याला बोलतां येऊं लागल्याबद्दल आनंद प्रदर्शित केला व त्याला आपला वृत्तांत कळविण्यास सांगितलें. त्यानें आह्मां उभयतांकडे वळून ह्मटलें, "महाराज, आपण मला जीवदान दिलें आहे, तेव्हां आपले माझ्यावर

अनंत उपकार आहेत. माझा वृत्तांत ऐकावा अशी आपली इच्छा आहे तर मीहि अगदीं मोकळ्या मनानें सांगतों.

" राजपुतान्यांत कोटा नावांचें एक संस्थान असून त्याची राजधानी कोटा हें शहर चंबळा नदीच्या काठीं आहे, तें माझें जन्मस्थान होय. माझा बाप पूजारी असून त्यानें आपल्या हयातींत देवपूजा व भिक्षुकी मिळून पुष्कळ पैसा ठेवला होता. पुराण सांगणें व ज्योतिष सांगणें यांमध्यें त्याची विशेष ख्याती असल्यामुळें आमच्या घरीं नानाप्रकारच्या धंद्याचे लोक आपल्या पत्रिका, कुंडल्या वगैरे घेऊन येत असत. माझा बाप मोठा पापभीरु, गरीब व मितभाषी असल्यामुळें कोणाचीहि गुप्त गोष्ट तो दुसऱ्याजवळ उच्चारून दाखवीत नसे. बापानें मला लहानपणीं आपली सर्व विद्या शिकविण्याचा प्रयत्न केला त्यामुळें मलाहि गांवांत थोडाबहुत मान मिळूं लागला. पण उथळ पाण्याला खळखळ फार या न्यायानें मला विद्येचा गर्व उत्पन्न झाला आणि पुढें अध्ययन करून बापाला संतोष द्यावा तें न करितां मी आपल्या चार इष्टमित्रांबरोबर ख्याली खुशालींत काळ घालवूं लागलों. माझें विद्येवर लक्ष नाहीं असें पाहून व माझें मनोगत ओळखून माझ्या बापानें कोट्याच्या राजापाशीं मजबद्दल गोष्ट काढली व त्यानेंहि मला माझ्या इच्छेवरून पोलिसांत नोकरी दिली.

पोलिस खात्यांत माझी चांगली बढती झाली. नोकरीला लागल्यापासून चार वर्षांच्या आंत मी शहराचा कोतवाल झालों. कोट्याच्या राजाची मजवर चांगली मर्जी असे व मीहि आपलें काम अगदीं मनोभावानें करीत असे. शहरांत चांगला बंदोबस्त रहावा, चोरांचा उपद्रव होऊं नये, लोक सुखी असावेत अशा इच्छेनें शहरांतील निरनिराळ्या भागांत गुप्तपणें हिंडून लोकस्थितीचें अवलोकन करण्याचा मी परिपाठ

ठेविला होता. एके दिवशीं रात्रीं स्वतः व्यापाऱ्याचा वेष घेऊन मी हाताखालच्या कामगारास बरोबर घेऊन, कोणासहि कळूं न देतां, शहरांत फिरत होतों. परंतु चंबळनदीच्या काठावर येऊन पोहोंचे-तोंपर्यंत एकहि विशेष गोष्ट माझे दृष्टीस पडली नाहीं. चंबळ नदीचें पात्र फार विस्तीर्ण आहे. शहराकडच्या तिच्या कांठावर अत्यंत अरुंद व भिकार अशा गल्ल्यांमधून मी चाललों होतों, त्यांत एक लहान सराई होती. तींत मुख्यत्वें करून नदीवर होड्यांमधून काम करणारे खलाशी लोक उतरत असत. मी व माझा कामदार मध्यरात्रीच्या सुमारास या दाराजवळ आलों, तेव्हां समोरच्या बाजूनें येणारीं कांहीं माणसें आम्हीं पाहिलीं. तीं माणसें भरलेलीं पोतीं वाहून नेत होतीं. तीं पोतीं जड असल्या कारणानें एकएक पोतें दोन दोन माणसांनीं धरलें होतें. नंतर ते ओझेकरी सराईंत शिरले. पुष्कळ वेळ चालत असल्याकारणानें मी दमलों होतों, म्हणून विसावा घेण्यासाठीं व त्या माणसांनीं आणलेल्या पोत्यांत काय असावें, हेंहि पहावयास मिळावें म्हणून, मी माझ्या कामदारासह त्या सराईंत गेलों. सराईंत दोन पंत्या मिणमिण करीत जळत होत्या, पण सराईच्या जागेच्या मानानें त्यांचा प्रकाश फार थोडा असल्यामुळें आंत काळोखच होता असें ह्मटलें तरी चालेल.

मी व माझा कामदार कोणासहि कळूं न देतां आंत गेलेले होतों. सराईंत शिरल्यानंतर थोड्या वेळानें आह्मांला तेथील पदार्थ दिसूं लागले. ते ओझेकरी आंत शिरले व त्यांनीं आपलीं ओझीं जमीनीवर ठेवलीं. सराईंत एकजण बसला होता त्यानें त्या हेलकऱ्यांस विचारलें कीं 'पोत्यांत काय आहे !' तेव्हां 'मोहनलालाचें सामान' असें त्यांनीं त्यास सांगितलें. मोहनलाल हा राजवाड्यांतला एक कामदार होता. अलीकडे सरकार वाड्यांतल्या पुष्कळ मोलवान जिनसा नाहीशा

झालेल्या होत्या व त्यांचा पत्ता मला लागत नव्हता म्हणून महाराजांची मजवर इतराजीहि झालेली होती. आणि ज्या दिवसाची गोष्ट मी सांगत आहें त्याच्या आदल्या दिवशीं राजवाड्यांतलें कांहीं सामान नाहींसें झालें व मला त्याचा पत्ता लागला नाहीं तेव्हां राजा मला कांहीं अपमानकारक शब्द बोलला होता. तेव्हां ज्या ठिकाणीं आपला अपमान विनाकारण झाला त्या ठिकाणीं अत:पर रहाण्यापेक्षां दुसरीकडे आपल्या नशिबाची परीक्षा पहावी असें माझ्या मनानें घेतलें व तसें मी आपल्या बापाला जाऊन सांगितलें. बापानें मला मुळींच मोडता घातला नाहीं, तथापि त्याचें मत असें पडलें कीं, राजवाड्यांतल्या चोऱ्यांचा पत्ता लावून देऊन मग मी खुशाल निघून जावें, तेणेंकरून दरबारचा कोणताहि ठपका आपल्यावर न येतां आपण आपलें कर्तव्य बजावून जात आहोंत असें आपणांस वाटेल. तें वडिलांचें सांगणें मान्य करून, मी आपल्या उद्योगाला लागलों. मोहनलालाचा मलाहि संशय होता, पण त्याच्यासंबंधानें प्रत्यक्ष पुरावा कांहीं नसल्यानें मला आतांपर्यंत कांहीं करितां आलें नव्हतें.

मोहनलालाचें नांव ऐकतांच त्यानें राजवाड्यांतलें सामान तर यांजबरोबर पाठविलें नसेलना? असें मला वाटलें व त्याजविषयीं जास्त माहिती मिळविण्याविषयीं मला उत्कंठा लागली.

त्या लोकांनीं आंत आणलेल्या पोत्यांत सरकार वाड्यांतील चोरीस गेलेल्या सर्व प्रकारच्या जिनसा असाव्यात व त्या जिनसा त्या चोरांना दगलबाज मोहनलाल यानेंच दिल्या असाव्यात असें वाटून मला राग आला, तथापि पुढें काय होतें तें पहावयाचें होतें त्यामुळें राग गिळून मी स्वस्थ बसलों. पोतीं आणणाऱ्या लोकांस सराईत बसलेल्या इसमानें त्यांची मजूरी दिली व 'आजच रात्रीं नांवा चालणार आहेत ह्मणून

सर्वांनीं ती पोतीं नांवांत ठेऊन द्यावींत' असा त्यानें हुकूम फर्माविला. तो हुकूम ऐकतांच मी माझ्या कामदाराच्या कानांत हलकेंच सांगितलें कीं 'या मजुरांपैकीं आतां कांहीं सराईच्या बाहेर जातील त्यांच्या बरोबर तूंहि बाहेर जा व जवळच्या चौकींतून शिपाई लोकांची एक टोळी घेऊन ये आणि सराईला गराडा घालून आंतील सर्व माणसांस कैद कर.

माझ्या हुकमाप्रमाणें करावयास माझा कामदार निघून गेला.' परंतु सराईत बसलेला मनुष्य आपल्या टोळींतील इतर माणसांपेक्षां जास्त धूर्त व काकदृष्टी असल्यानें, आम्हीं सराईंत घुसलों, एकमेकांच्या कानांशीं लागून पुटपुटलों आणि नंतर आम्हांपैकीं एकजण बाहेर गेला, वगैरे गोष्टी त्याच्या लक्ष्यांत आल्या. आपलें गुप्त कृत्य प्रगट झालें असून एकजण हें सर्व वर्तमान अधिकाऱ्यांच्या कानांवर घालण्याकरितां गेला आहे हें त्या माणसानें तात्काळ ताडलें, व जवळ बसलेल्या एका माणसाचे कानांत कांहीं सांगितलें. त्याबरोबर टोळींतील कांहीं माणसें एकदम मजवर तुटून पडलीं व माझ्या तोंडांत बोळा कोंबून त्यांनीं मला जखडून टाकलें. हें सर्व त्यांनीं इतक्या त्वरेनें व एकदम उरकलें कीं कोणताहि प्रतिकार करण्यास मला अवसरच मिळाला नाहीं. मग माझ्या भोंवतीं गराडा घालून ते मला चंबळ नदीवरील एका नांवेंत घेऊन गेले. ते लोक सशस्त्र व धाडसी असून रात्र काळोखी असल्यानें प्रयत्न करून देखील त्यांना सहज पकडतां आलें नसतें. नावेंत मला नेऊन बसविल्यावर लागलींच नाव चालू झाली.

दुसऱ्या दिवशीं एका नावाड्यानें मला एक भाकरीचा तुकडा खावयास दिला.

मी त्या चोरट्यांच्या नावेंत दुसऱ्या दिवशीं रात्रीपर्यंत होतों. दोनतीन घटका रात्र होईपर्यंत नाव चालली होती. नंतर एका डोंगराच्या पायथ्याशीं असलेलें एक खेडें आमच्या दृष्टीस पडलें. तेथें आमची नांव थांबली व नावेंतील सर्व मंडळी उतरल्यावर आम्हीं त्या खेड्यांत गेलों.

त्या दिवशीं त्या खेड्यांतील पाटलाच्या घरीं त्याच्या मुलीचें लग्न झालें होतें ह्मणून गांवकरी मंडळी मशाली लावून खाण्यापिण्यांत व नाचरंग करण्यांत दंग झाली होती. नांवेंतल्या माणसांची व गांवकऱ्यांची चांगली ओळख दिसली. कारण आम्हीं गांवांत जातांच आमच्या मंडळींचें चांगलें स्वागत झालें. नावेंत असतांनाच मीं मोकळा बसलों होतों. रात्रभरच कायतें मला चतुर्भुज करण्यांत आलें होतें, पण दुसऱ्या दिवशीं सकाळीं सुदैवानें मला कोणत्याहि तऱ्हेनें वाईट वागविलें गेलें नाहीं.

अगदीं अनोळखी प्रदेशांत रात्रीच्या वेळीं मला नेण्यांत आलें होतें, व माझ्या त्या दिवसाच्या एकंदर वर्तनावरून व बोलण्याचालण्यावरून मीं त्यांना कोणताहि उपद्रव करणार नाहीं असें वाटल्यावरून त्या नावेवरच्या लोकांनीं मला पूर्ण स्वातंत्र्य दिलें, व मलाहि भूक लागली होती व मीं सबंध दिवस ऊन खाऊन कंटाळलों होतों ह्मणून कांहीं गडबड न करितां त्यांच्यातच पूर्णपणें मिसळलों, व लग्नघरीं जें आवडलें तें खाऊन सुखानें निद्रावश झालों.

---

## प्रकरण बत्तिसावें

# विनाशकाले विपरीत बुद्धिः ।

**न भूतपूर्वं न कदापि वार्ता । हेम्नः कुरंगो न कदापि दृष्टः ।**
**तथापि तृष्णा रघुनंदनस्य । विनाशकाले विपरीत बुद्धिः ॥**

असें ह्मणतात तें खरें आहे. 'समानशीलव्यसनेषुसख्यं' ज्या पाटलाच्या घरीं आम्हीं उतरलों होतों तो त्यावेळीं जरी वयानें वृद्ध दिसत असला तरी मनानें व कृतीनें तरुणांस आदर्शभूतच होता. त्याचा बहुतेक जन्म सांसी, कंजर, भिल्ल वगैरे शूर, क्रूर व रानटी लोकांच्या सहवासांत गेलेला असून त्यानें आपल्या ऐन उमेदीच्या दिवसांत पुष्कळ लुटालूट केलेली होती. त्याला लिहितां वाचतां येत नसे. तथापि त्याची धर्मावर श्रद्धा असून ब्राह्मणांचा मान ठेवणें व कोणालाहि जीवें न मारणें या गोष्टीबद्दल त्याची त्या प्रांतांत प्रख्याति असे. ज्योतिषाचा त्याला फार नाद असे. वाटमारी, लुटालूट इत्यादि कामांत पहिल्यानें शुभमुहूर्त पाहिल्याखेरीज तो कधींहि पडत नसे. त्याची व माझी गांठ पडल्यावर आह्मांला एकमेकांचे स्वभाव आवडले व नुसत्या ओळखीचें मैत्रींत रूपांतर झालें. मला कोटा शहरास पुनः परत जावयाचें नव्हतें, व मी कोटा शहर सोडणार असें समजल्यावर माझ्या बापानें काशीयात्रेला जाण्याचा विचार केला होता. त्यामुळें मी त्या पाटलाच्या आग्रहामुळें त्याच्याच गांवीं कांहीं काल रहाण्याचें निश्चित केलें.

**रतनसिंग**—रत्नसिंह—पाटील जातीनें रजपूत होता. तो लहान असतांना त्याचे आईबाप निवर्तले, तेव्हां वीरनगरच्या पाटलानें त्याचें संरक्षण करून आपल्या घरीं ठेविलें. रतनसिंगाच्या सुस्वभावामुळें त्याच्यावर त्या पाटलाची मर्जी इतकी बसली कीं, तो त्याजबरोबर संपूर्ण

विश्वासानें व स्नेहानें वागूं लागला. प्रामाणिकपणा व धाडस या गुणांनीं वीरनगरामध्यें तो अत्यंत श्रेष्ठता पावला. अखेरीस तो पाटील निपुत्रिक असल्यानें आपली सर्व स्थावरजंगम मालमत्ता त्यानें रतनसिंगाला दिली. वीरनगरच्या पाटलाचा मुख्य धंदा वाटमारीचा असे. पाऊणशें वर्षांपूर्वीं ज्यावेळीं आगगाड्या, तारायंत्रें, पोष्टआफिसें वगैरे आधुनिक सुधारणांचा सुळसुळाट नव्हता, व इंग्रजी सत्तेची मगरमिठी आजच्याइतकी भयंकर नव्हती, त्यावेळीं राजस्थानांत वाटमाऱ्या व लुटालुटी आजच्यापेक्षां जास्त प्रमाणांत होत असत. त्यांतून निरनिराळ्या राजघराण्यांतील परस्पर वैमनस्यें, राष्ट्रद्रोही लोकांचा सुळसुळाट, संस्थानिकांच्या फौजेची अव्यवस्थित रचना, चोराचिलटांचा बंदोबस्त करण्यांत होत असलेली हयगय, इत्यादि कारणामुळें वाटमारे, चोरटे, भामटे, पेंढारी, ठक वगैरे दुष्ट लोकांचें चांगलें फावे. रतनसिंग लहान होता तेव्हांपासून आपल्या पालकाबरोबर चोहोंकडे लुटालुटीसाठीं फिरे. त्यामुळें त्यास राजस्थानांतल्या बहुतेक प्रदेशांची चांगली माहिती झाली होती. वीरनगरच्या आसपासच्या प्रदेशांत त्यानें कधींही धुमाकुळ घातला नाहीं. तो दूर कोठें तरी लूट करी आणि वीरनगरास ती मिळकत आणून ठेवी. आठ महिने या प्रमाणें काम करून चार महिने तो निवळ क्षेत्रस्थानें पहाण्यांत व प्रवासांत घालवी. त्याच्या संगतीपासून मला पुष्कळ लाभ झाला. धनलाभ तर झालाच, पण त्याजबरोबर नानाप्रकारचे लोक, प्रान्त व प्रसंग हे मी पाहिले, ज्योतिष विद्येंत गति करून घेतली, प्राचीन कालच्या ऋषीमुनींनीं लोकोपकारार्थ तयार केलेलीं शास्त्रें वाचलीं. त्यामुळें जुन्या तऱ्हेच्या पुष्कळ लिपी मला वाचता येऊं लागल्या. 'पुष्पसंगें मातीस वास लागे!' चार महिन्यांत अनेक तीर्थस्थानें पाहिलीं व साधुसंतांच्या गांठी पडल्या त्या योगानें रतन-

सिंगाचें मन जास्त जास्त सात्विक होत गेलें; त्यानें आपला वाटमारीचा धंदा बंद केला व मजजवळ तो इतक्या उतार वयांत लिहावयास वाचावयाला शिकून तुलसीदास, कबीर, नानक, मीराबाई वगैरे साधुसंतांचे ग्रंथ वाचून आपला काळ घालवूं लागला.

भैरूसिंग या नांवाचा एक इसम रतनसिंगाच्या पदरीं येऊन राहिला होता. तो नोकरीवर आला त्यावेळीं अगदीं कृश व अशक्त झाला होता व कसेंही करून मला नोकरीवर ठेवा असें म्हणाला म्हणून रतनसिंगानें त्याला आपल्या पदरीं बाळगिलें होतें. तो आपलें काम नियमानें करी, कधीं चुकारपणा करीत नसे व नेहमीं नम्रतेनें वागे त्यामुळें रतनसिंग त्यावर थोडाबहुत विश्वास ठेवीत असे. रतनसिंगाचा बहुतेक जन्म लुटारूपणांत गेला होता व मी ही पोलिसखात्यांत बरींच वर्षें घालविलीं आहेत त्यामुळें भैरूसिंगाचें वर्तन आम्हीं नीट निरखून पाहिलें व तो दिसतो तितका संभावित नाहीं असें आमच्या उभयतांच्याही लक्ष्यांत आल्यावाचून राहिलें नाहीं. तथापि भैरूसिंगाच्या वर्तणुकींत आम्हांला कांहीं दोष दाखवितां येईना. तो मोठा अघळपघळ गोष्टी सांगणारा होता. त्यानें थोड्याच दिवसांत रतनसिंगाचा लोभ व विश्वास संपादला. रतनसिंगाला एकुलती एक मुलगी होती. दिवाळीच्या सणा-निमित्त तिला माहेरीं चार दिवस रहावयाला बोलवावी असा त्याचा हेतु होता म्हणून त्याच्या इच्छेवरून मी त्याच्या मुलीला घेऊन येण्या-साठीं निघालों. मुलीच्या सासूसासऱ्याला, नवऱ्याला व इतर मंडळींना देण्यासाठीं रतनसिंगानें मजजवळ सुमारें दोन हजार रुपयांचा विषय दिला होता. मुलीचा गांव चितोडपासून उदेपुराकडे जाणाऱ्या रस्त्या-वर गोसुंदा म्हणून गांव आहे त्याच्या जवळचें एक खेडें आहे. मी गांवाला जाण्यास निघेपर्यंत भैरूसिंग मजबरोबर येणार असें बोलला

देखील नव्हता. पण मी सर्व सामानसुमान घेऊन गाडींत बसलों तेव्हां रतनसिंगापासून परवानगी घेऊन तो मजबरोबर जाण्याला निघाला. दूर अंतरावर जावयाचें आहे, बरोबर बरीच जोखीम आहे, चोरांची भीति फार; एकसे दो भले, असें कांहीं तरी कारण सांगून मजबरोबर येण्यासाठीं रतनसिंगाची मान्यता त्यानें मिळविली. मला जरी तो मनुष्य आवडत नव्हता, तरी आतां त्याला नको म्हणणेंही चांगलें दिसत नव्हतें. तेव्हां त्याच्या येण्यानें मलाही आनंद वाटत आहे असें वरकांती दर्शवून आम्हीं दोघे मार्गक्रमण करूं लागलों. चितोडास आल्यावर तेथील किल्ला एकदां पहावा व मग पुढें जावें असें ठरलें.

दैवाची गति विचित्र आहे. विपत्तिकाल समीप आला म्हणजे शहाण्यांना देखील वेड्यासारखें करावयाची बुद्धि होते. भैरूसिंग मनुष्य चांगला नाहीं, त्याची संगति धरणें बरें नव्हे हें मला पक्कें ठाऊक होतें. तशांतून परक्याचें धन घेऊन आपण जात असतां, भैरूसिंगासारखा मनुष्य आपल्या जोडीला नेणें बरें नव्हे, असें मला वाटत होतें, पण होणार तशी बुद्धि होते म्हणतात तें खरें. हरिश्चंद्र घ्या, नल घ्या, युधिष्ठिर घ्या, तसेंच श्री रामचंद्र घ्या हे सर्वजण मोठे नीतिमान, सत्यपरायण, विद्वान, कार्याकार्य जाणणारे, पण दैवगतीनें सर्वांना हात दाखविला. श्रीरामचंद्राच्या विषयीं तर असें म्हटलें आहे कीं

**असंभवं हेममृगस्य जन्म तथापि रामो लुलुभे मृगाय।**
**प्रायः समापन्नविपत्तिकाले धियोऽपि पुंसां मलिना भवन्ति ॥+**

---

+ पौलस्त्यः कथमन्यदारहरणे दोषं न विज्ञातवान् ?
अक्षैश्चापि युधिष्ठिरेण रमता ज्ञातो नु दोषो न किम् ?।
रामेणापि वने न हेमहरिणस्यासंभवो लक्षितः ?
प्रत्यासन्नविपत्तिमूढमनसां प्रायो मतिः क्षीयते ॥ १ ॥

मग मी तर काय साधारण मनुष्य होतों.

चितोडास आल्यावर भैरूसिंगाच्या ओळखीचा कोणी एक गृहस्थ तेथें होता त्यास भेटून येतों असें म्हणून भैरूसिंग निघून गेला व मी चितोडच्या गावांत व आसपास इकडे तिकडे फिरलों. रतनसिंगानें आपल्या मुलीसाठीं दिलेलें कापडचोपड एका गांठोड्यांत बांधून, बाकीचे दागदागिने व द्रव्य मी स्वत: नेहमीं आंगावर बाळगीत असे.

मी गावांतून इकडे तिकडे फिरून घरीं येतों तों भैरूसिंग आपल्या तीन ओळखीच्या माणसांना घेऊन घरीं येऊन बसला होता. चिलमीचे झुरक्यावर झुरके निघत होते. मग मला पहातांच 'आइये, बैठिये' वगैरे प्रकारांनीं माझें स्वागत केल्यावर ती सर्व मंडळी सुमारें तासभर बसली होती. आमच्या बोलण्यांत नंतर असें ठरलें कीं, दुसऱ्या दिवशीं सकाळीं गडावर जावें, व गड पाहून झाल्यावर तेथेंच भोजन उरकून संध्याकाळीं गडाखालीं उतरावें.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं आम्हीं सर्वजण गड पहावयास निघालों भैरूसिंगाचे मित्र त्या गडावरचे माहितगार होते त्यांनीं आम्हाला बहुतेक सगळा गड दाखविला. एक जुनी मोठी गुहा पहावयाची राहिली होती, ती जेवण झाल्यानंतर पहावयाचें ठरविल्यामुळें आम्हीं एका तलावाच्या कांठीं झाडाखालीं स्वयंपाक करावयास लागलों.

सूर्य डोक्यावर आला होता. सकाळपासून खूप भटकल्यामुळें मीं अगदीं दमून गेलों होतों व हातातोंडाची गांठ आतां केव्हां पडते

---

× अन्यस्त्रीहरणीं कसा दशमुख स्वान्याय ना जाणिला ?
हेमाचा मृगही तरी रघुवरें कैसा खरा मानिला ?
द्यूतानें जगतीं अनर्थ घडती हें का न धर्मा कळे ?
होतां विन्मुख दैव साच बहुधा बुद्धी नराची चळे ! ॥ १ ॥

—सीताराम विष्णु सरवटे.

असें झालें होतें, त्यामुळें स्वयंपाक तयार होतांच मीं त्या दिवशीं यथेच्छ ताव मारला. पण जेवण संपतें न संपतें तोंपर्यंत कांहीं मादक पदार्थ खाऊन झिंगल्यासारखें मला होऊं लागलें. डोळे मिटूं लागले. डोळ्यांवर झडप येऊं लागली, नाक व तोंड सुकल्यासारखें वाटूं लागलें, जांभया येऊं लागल्या, हातपाय लटपटूं लागले, जीभ आंत ओढूं लागली, तोंडांतून शब्द नीट येईनासा झाला, व अगदीं घाबरल्या-सारखें होऊन मला कांहीं सुचेनासें झालें. असें कां होतें तें मला कळेना, व अमूक होतें आहे असें सांगतां येईना. डोळे ताठरल्या-सारखे झाले, हातपाय ताठूं लागले, जीभ अडखळूं लागली, दांतखिळी बसूं लागली आणि मी निश्चेष्ट पडलों.

त्या स्थितींत मीं किती वेळ होतों कोण जाणे. पण ज्यावेळीं मीं शुद्धीवर आलों त्यावेळीं मीं एका घरांतल्या खोलींत निजलेला असून एक मनुष्य वारा घालीत बसला होता असें मला दिसलें. मी शुद्धीवर आल्यावर मला मजजवळ बसलेल्या माणसांनीं कांहीं प्रश्न केले, पण मला बोलतां येईना. माझी वाचा बंद पडली होती. पुढें आपल्या कृपेनें मीं उज्जयिनीस येऊन बरा झालों व मला पुन्हां बोलतां येऊं लागलें, या आपल्या उपकारांबद्दल मीं आपला जन्माचा ऋणी आहें.

माझी अशी खात्री आहे कीं भैरूसिंगानें व त्याच्या साथीदारांनीं माझ्यापाशीं असलेलें व रतनसिंगानें मजबरोबर दिलेलें सर्व द्रव्य लांब-विण्यासाठीं मला विषप्रयोग केला व मीं बेशुद्ध झाल्यावर आपल कार्यभाग साधला.

दवाखान्यांत येऊन कांहीं दिवस राहिल्यावर एके दिवशीं मला माझ्या खोलीसमोर एका झाडाखालीं भैरूसिंग व ठाकुरसिंग उभे होते ते दिसले मीं त्यांना खुणेनें मजकडे बोलाविलें पण त्यांपैकीं कोणीहि

मजकडे आला नाहीं. तेव्हां मी होऊनच त्यांच्याकडे गेलों, आणि भैरूसिंगास खुणेनें माझें द्रव्य कोठें आहे तें विचारलें. माझा प्रश्न ऐकून ते उभयतां हंसले व मला कांहीं उत्तर न देतां शिव्या देत देत चालते झाले.

तो बिचारा रतनसिंग माझ्या वर्तनासंबंधानें काय म्हणत असेल ? मोठ्या भरंवशानें पुष्कळ द्रव्य हवालीं करून त्यानें मला आपल्या मुलीच्या घरीं पाठविलें आणि मी तें सर्व गमावून लांब अंतरावर येऊन पडलों.

माझा कांहींच ठावठिकाण नाहीं ह्मणून माझा बाप किती चिंतातुर झाला असेल ! 'पुरुषोत्तम, पुरुषोत्तम' ह्मणून रात्रंदिवस स्मरण करीत असेल !

डॉक्टरसाहेब, मी आपली कंटाळवाणी गोष्ट सांगून तुह्मांला आतां त्रास देत नाहीं. माझ्यावर आपले फार उपकार आहेतच आणखी एक उपकार मजवर करा. मला आतां येथून जाण्याला परवानगी द्या, म्हणजे रतनसिंग व माझा बाप यांस मीं जाऊन अगोदर भेटतों.

---

## प्रकरण तेहतिसावें

## दुःखाअंतीं सुख.

देवास काय करुणा अगदींच नाहीं ?
दुःखासवें सुखहि पूर्ण भरून राही ।
होणें निराश म्हणुनी मुळि योग्य नाहीं.
केलास यत्न तरि सौख्य मिळे तुलाही ॥

—किर्लोस्कर.

पुरुषोत्तमानें सांगितलेली गोष्ट ऐकून आम्हांला आनंद वाटला. त्याचें आम्ही यथामति सांत्वन केलें व कांहीं दिवस विश्रांति घेतल्या-

नंतर मग तूं जा असें त्यास सांगितलें व त्याचा रुकार पडल्यावर मी त्याला घेऊन दवाखान्याबाहेर पडलों व नारायणराव सात्विक यांच्या घरीं गेलों, व त्यांना घेऊन आमच्या घरीं आलों. विष्णूला बोलावणें केल्यावर तोही आला. त्या दिवशीं सायंकाळीं, चांदण्यांत आमच्या वाड्याच्या गच्चीवर पुरुषोत्तमास आम्हीं मेजवानी केली. नाबर साहेबही आमचे मामा डॉ. दत्तोपंत जोशी यांसह आले होते.

दुसऱ्या दिवशीं मीं पुरुषोत्तमाला घेऊन सीताबाईकडे गेलों. पुरुषोत्तमाची व तिची ओळखदेख झाल्यावर त्याची हकिगत मी तिला थोडक्यांत कळविली. सरकारी दवाखान्यांत ठाकूरसिंग व भैरूसिंग त्याला भेटले होते असें ऐकतांच ती म्हणाली कीं, हिरालाल काल संध्याकाळीं मला भेटला व त्यानें तुम्हीं त्याला व त्याच्या साथीदारांना कसें कोंडलें होतें तें सर्व सांगितलें. तें ऐकून मीं मोठ्या उत्कंठेनें विचारलें 'पण ते बाहेर पडले कसे?

सीताबाई—ती सर्व मंडळी भूयारांत गेली व तेथून ती मुल्लापुऱ्यास ॐकारेश्वराचे मंदिरांत जाणार होती. पण वाटेंत खळग्यावर असलेल्या लाकडाच्या फळ्या त्यावर नव्हत्या त्यामुळें तो खळगा त्यांस ओलांडतां येईना. त्यानंतर ती सर्व मंडळी पुन्हां परतली, पण पहातात तो मन-कामनेश्वराच्या आवारांतला रस्ताही तुम्हीं अगदीं बंद करून टाकलेला!

'मग?'

'पुढें काय करावें हा त्यांच्यापुढें एक मोठा प्रश्नच उभा राहिला. पण भैरूसिंग अशा अनेक संकटांतून पार पडलेला; त्यानें एक युक्ति शोधून काढिली. तळघराच्या वरच्या बाजूला माथ्यावर भोंक पाडावें म्हणजे लवकरच भगदाड पाडतां येईल व मग त्यांतून बाहेर पडूं असा त्याचा अभिप्राय पडला. आणि तशी एकदोन तास धडपड केल्यावर

त्यांनीं सर्वांनीं मिळून एक भोंक पाडलें आणि नंतर ते बाहेर पडून पहातात तों एका शेतांत ते बाहेर निघाल्याचें त्यांस आढळलें.'

'अशा रीतीनें त्यांनीं आपली सुटका करून घेतली म्हणायची? हिरालाल आणखी काय म्हणत होता?'

**सीता**—काय म्हणतो? तुमच्याप्रमाणें तो व त्याचे साथीदारही आतांपर्यंत खटपट करून भागले व आतां तो नाद टाकून देऊन ते आतां आपापल्या कामाला निघून जातील असें दिसतें.

**मी**—हो असें तर खरेंच. आम्हीं सुद्धां आतां अगदीं निराश झालों आहोंत. इतके दिवस आमची खटपट चालली आहे पण कांहीं उपयोग नाहीं. जसा कांहीं अगदीं पहिला दिवस आहे."

अशा तऱ्हेचें बोलणें चालणें झाल्यावर सीताबाईचा आम्ही निरोप घेतला व घरीं आलों. वाटेंत पुरुषोत्तमाच्या व माझ्या अनेक गोष्टी झाल्या त्यावरून तो पुष्कळ बहुश्रुत होता असें मला कळून आलें. चितोडगडावर आम्हीं गेलों, तेथें असलेल्या गुहेंत मनकामनेश्वराच्या संबंधानें माहिती देणारे महत्वाचे कागदपत्र आम्हांला कसे सांपडले व नंतर त्या गुहेंत पुढें जातां जातां पुरुषोत्तमाची व आमची कशी भेट झाली, त्याला गडावरून खालीं आणावयाच्या अगोदर सज्जनसिंहजींनीं त्याला वनस्पतीचा रस पाजून शुद्धीवर कसा आणला व नंतर त्याला नारायणरावानीं व मी पायथ्यापर्यंत कसा नेला वगैरे सर्व साद्यंत हकिगत त्यानें पुन्हां पुन्हां विचारावी व मीं सांगावी असें चाललें होतें. नंतर मनकामनेश्वराच्या गोष्टी निघाल्या. चितोडास सज्जनसिंहानीं आम्हाला प्रथम मनकामनेश्वराचें मंदिर उज्जयिनीस असल्याचें सांगितल्यावर, कर्मधर्मसंयोगानें गडावर गुहेंत सांपडलेल्या कागदपत्रांत मनकामनेश्वराच्या संबंधानें माहिती देणारे लेख कसे सांपडले व

त्यांवरून नारायणजी ज्योतिषी यांच्या साह्यानें आम्हांला आतांपर्यंत कायकाय माहिती गोळा करितां आली त्याची माहिती मी त्याला सांगितली. राजपुत्र भीमसिंगानें तयार केलेल्या दोन कागदांचा आम्हांला आतांपर्यंत कांहीं उपयोग करून घेतां आला नाहीं—सांकेतिक भाषेंत लिहिलेली व आमच्या दप्तरांत पडून असलेली कागदाची एक गुंडाळी व कन्हैयालालानें हिरालालला विकलेला तो कागद—हें ऐकल्यावर पुरुषोत्तमानें मजजवळ असलेले सर्व कागदपत्र पाहण्याची आपली इच्छा दर्शविली. हिरालालाजवळ असलेले कागद तर आम्हाला मिळतील असें दिसतच नव्हतें तेव्हां त्यांची आशा सोडून देऊन बाकी उरलेल्या कागदांवरून कांहीं मार्ग निघतो कीं नाहीं तें पहावयाचें असें पुरुषोत्तमानें ठरविलें. नारायणजी ज्योतिषांनीं आतांपर्यंत बहुतेक कागदपत्र आपल्या दृष्टीखालून नेले होतेच व त्यांत एकच कागद विशेषेंकरून त्यांस वाचतां येत नव्हता. तो जर पुरुषोत्तमास वाचतां आला तर कांहीं तरी उपयोग, नाहींतर नाहीं असें मला वाटत होतें; आणि पुरुषोत्तम तो कागद वाचील असें मन सांगेना. आतांपर्यंत मोठे रथी महारथी येऊन त्यांनीं हात टेकले, तेथें हे आमचे पुरुषोत्तमभैया काय दिवे लावणार असें मला वाटलें. मन हें स्वभावतःच शंकेखोर आहे. कोणतीही मनांत आलेली गोष्ट पार पडेल असें मानण्याची जी मनाची प्रवृत्ती तिच्यापेक्षां 'ती फसेल कीं काय?' अशी शंका मनांत जास्त टिकाव धरते, असा एकंदरींत जगाचा अनुभव आहे. त्याचा अर्थ, मनुष्य हा प्रत्येक गोष्टीच्या भवितव्यतेबद्दल निराशावादी किंवा सदैव वाईट अर्थ घेणारा असतो असा नव्हे, तर जगांत जें कांहीं घडतें तें आपल्या कल्याणासाठींच घडतें असें त्यास बुद्धिपूर्वक जरी वाटत असलें तरी निदान थोडावेळ पावेतों तरी बुद्धीवर साशंक मनाचा पगडा बसत असतो. असो.

मनकामनेश्वराचें दर्शन घेऊन आम्हीं घरीं परत आल्यानंतर मी नानासाहेब किबे यांचे घरून मनकामनेश्वराचे कागदपत्र घालून ठेवलेला खोका आणविला व त्यांतलें दप्तर पुरुषोत्तमाच्या स्वाधीन केलें.

सायंकाळीं मीं दवाखान्यांतून घरीं आलों. पुरुषोत्तम ते कागदपत्र वाचण्यांत अगदीं गढून गेला होता. 'सूर्य अथर्वशीर्ष,' 'पृथ्वीराज रासा,' 'मनकामनेश्वर स्तोत्र,' 'राजविलास' व 'पंचरत्नगीता' यांच्या पोथ्या अगदीं पृथक् पृथक् मांडल्या होत्या. चित्रें, कागदांवर उठवावयाची मोहोर, सांकेतिक चिन्हांची गुंडाळी व इतर सामान हें एकमेकांपासून अगदीं लांब लांब ठेवलें होतें व हातांत पाटी व पेनसिल घेऊन त्याचें कांहीं लिहिणें पुसणें चाललें होतें. तो सर्व प्रकार पाहून मला मोठी उमेद वाटली. पुरुषोत्तम मध्येंच आपली पाटी व पेनसिल खालीं ठेवी व त्या सांकेतिक चिन्हांच्या तिसऱ्या गुंडाळींतून कांहीं वाची व पुन्हां तें पाटीवर मांडून घेई. एकदां राजविलास ग्रंथ उघडून त्यांतून कांहीं वाची. त्याच्या मुद्रेवरून व तो ज्या उत्सुकतेनें आपलें काम करीत होता त्यावरून तो कांहींतरी पत्ता लावणार, थोडातरी आपला मार्ग पुढें काढणार असें वाटून मला मोठा हुरूप आला, तथापि त्याचें चित्त व्यग्र न व्हावें येवढ्यासाठीं मी आपली उत्कंठा प्रगट न करितां त्याच्याजवळून उठून आपल्या कामाला गेलों.

संध्याकाळीं फराळ करतांना पुरुषोत्तम म्हणाला कीं 'दप्तरांत सांपडलेला प्रत्येक कागद मी वाचला आहे, व त्यांवरून आपल्याला जरूर असलेली सर्व माहिती मिळण्याजोगी आहे. जे दोन कागद नारायणजी ज्योतिषांच्या घरून हिरालाल किंवा त्याचे साथीदार यांनीं लांबविले त्यांच्यावांचून आपलें कांहीं अडत नाहीं. सांकेतिक भाषेंत लिहिलेली ती कागदांची गुंडाळी आपल्याला वाचतां आली

म्हणजे आपला मार्ग अगदीं सोपा झाला. ती सांकेतिक लिपी आतां-पर्यंत वाचतां आली नाहीं, याचें कारण नारायणजी दीक्षितांना आतां-पर्यंत राजविलास ग्रंथ वाचावयाला फावलें नाहीं हें होय. कारण, त्या ग्रंथांतच ती सांकेतिक भाषा कशी वाचावी याची गुरुकिल्ली दिलेली आहे. ”

फराळ आटोपून शतपावली केल्यानंतर आम्हीं माडीवर गेलों व नंतर पुरुषोत्तमानें आपलें दप्तर उघडलें.

---

## प्रकरण चवतिसावें

# प्रयत्नांतीं परमेश्वर!

**कारज धीरे होत है, काहे होत अधीर? ॥**
**समय पाय तरुवर फरैं, केतक सिंचौ नीर ॥ १ ॥**

तुलसीदास

पुरुषोत्तम नंतर मला म्हणाला, ‘पहा, आपण आतां लक्षपूर्वक एका एका पोथीकडे पाहूं; व त्यावरून आपल्याला कांहीं अनुमान काढतां येतें कीं काय तें ठरवूं. ही पहिली पोथी ‘सूर्य अथर्वशीर्षाची’ आहे. प्रारंभीं इजवर कोणचें चिन्ह काढलेलें आहे?

**मी**—बेलपत्राचें. एक त्रिदळी सुंदर बिल्वपत्र काढलेलें आहे.

**पुरुषोत्तम**—ठीक आहे. आतां ही दुसरी पोथी पहा. इजवर काय लिहिलेलें आहे?

**मी**—त्रिविक्रमाय नमः । अथ पृथ्वीराज रासा........

**पुरुषोत्तम**—पुरे, पुरे. तिसरी पोथी हातांत घेऊन वाचा.

**मी**—हें मनकामनेश्वर स्तोत्र आहे. आरंभीं दिलेला संबंध श्लोक वाचूं का?

**पुरुषोत्तम**—हो हो तर, आणि श्लोकाकडे पाहून कांहीं सांगावेसें वाटल्यास सांगा.

**मी**—अथ श्रीमनकामनेश्वर स्तोत्रं प्रारभ्यते ।

**करालभालपट्टिका धगत् धगत् धगत् ज्वलत्**
**धनंजयाधरीकृतप्रचंडपञ्चसायके ।**
**धराधरेंद्रनन्दिनीकुचाग्रचित्रपत्रक-**
**प्रकल्पनैकशिल्पिनित्रिलोचने मतिर्मम ॥ १ ॥**

**अर्थ**—" ज्यानें आपल्या भयानक अशा विशाल भालप्रदेशावर भडकलेल्या अग्नीच्या योगानें दांडग्या मदनाचा निःपात केला आहे, व जो गिरिराज हिमालयाची कन्या पार्वती हिच्या आंगावर पानांचीं चित्रें काढण्यामध्यें परम कुशल आहे, अशा त्रिनेत्र शंकराचे ठिकाणीं माझें प्रेम आहे."

याप्रमाणें मुखपृष्ठावर लिहिलेलें असून '**त्रि**लोचन' शब्दांतील पहिलें अक्षर 'त्रि' इतर अक्षरांच्या मानानें पुष्कळ मोठें काढलेलें आहे.

**पुरुषोत्तम**—अगदीं बरोबर आहे. पुढची पोथी घ्या व पहा.

**मी**—अथ राजविलासः । त्रिपुरभैरवाय नमः । अस्य.......

**पुरुषोत्तम**—( मध्येंच ) पुरे. इतकेंच पुरे. आतां उरलेली पोथी हातांत घ्या आणि वाचा. "

**मी**—अथ श्री पंचरत्नगीता । ॐ

**त्रिगुणं च त्रितत्वं च त्रयो देवास्त्रयोऽग्नयः ।**
**त्रयाणां च त्रिमूर्तिस्त्वं तूरीयस्त्वं नमोऽस्तुते ॥**

**पुरुषोत्तम**—आतांपर्यंत जें तुम्हीं पाहिलें व वाचलें त्यावरून तुमच्या मनांत एखादी कल्पना चटकन येऊं शकते काय?

**मी**—होय. 'त्रि' या अक्षरावर लेखकांचें प्रामुख्यानें लक्ष आहे.

**पुरुषोत्तम**—अर्थात्. म्हणजे तीन या संख्येचें लेखकांनीं कांहीं तरी महत्व वाढविलें हें उघडच झालें.

आतां ही सांकेतिक चिन्हें असलेली गुंडाळी उघडून तिजवरून कांहीं अनुमानें निघतात कीं काय तें पाहूं. पण 'मिताक्षरी' भाषेच्या संबंधानें तुम्हांला काय काय ठाऊक आहे तें मला अगोदर सांगा पाहूं.

**मी**—वर्णोच्चारांची पालट करणें ह्यालाच 'मिताक्षरी' म्हणतात. ह्या भाषेमध्यें फक्त अमुक वर्णाच्या जागीं अमुक वर्ण योजावयाचा—वेलांट्या, काना, मात्रा, वगैरे स्वर तसेच ठेवावयाचे असें ठरविलेलें आहे. भाषेंतील वर्णाची अदलाबदल कशी करावी, ह्याबद्दल एक संस्कृत श्लोक आहे तो असा—

**अकौ खगौ घङश्चैव चटौ तपौ परस्परं ।**
**यशौ रषौ लसश्चैव हवाळाक्ष मिताक्षरी ॥ १ ॥**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| याचा अर्थ | अ | च्या | ठिकाणीं | क |
| व | क | च्या | ठिकाणीं | अ |
| | ख | ,, | ,, | ग |
| | ग | ,, | ,, | ख |
| | घ | ,, | ,, | ङ |
| | ङ | ,, | ,, | घ |

तसेंच च वर्गाच्या ठिकाणीं ट वर्ग

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| व | ट | ,, | ,, | च | ,, | |
| | त | ,, | ,, | प | ,, | व |
| | प | ,, | ,, | त | ,, | |
| | य | च्या | ,, | श | ,, | क |
| | श | ,, | ,, | य | ,, | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| र | च्या | ठिकाणीं | ष | व |
| ष | ,, | ,, | र | ,, |
| ल | ,, | ,, | स | ,, |
| स | ,, | ,, | ल | ,, |
| ह | ,, | ,, | व | ,, |
| व | ,, | ,, | ह | ,, |
| ळ | ,, | ,, | क्ष | ,, |
| क्ष | ,, | ,, | ळ | ,, |

ज्ञ हें जोडाक्षर द् + न् मिळून झालें अशी कल्पना केली तर द च्या ऐवजीं ब व न बद्दल म, मिळून ज्ञ = ब्म असें म्हणावें.

या नियमांप्रमाणें सर्व वर्गांची अदलाबदल येणेंप्रमाणें होते, असें म्हणून मी कागदावर पुढील कोष्टकें मांडिलीं.

क=अ च=ट झ=ढ थ=फ न=म ल=स

ख=ग छ=ठ ञ=ण द=ब य=श व=ह

घ=ङ ज=ड त=प ध=भ र=ष ळ=क्ष

आंबा=कांदा; बाबा=दादा; पापा=ताता;

आई=काकी; इत्यादि.

**पुरुषोत्तम**—बहोत अच्छा! आतां पुढचा रस्ता खडकाळ असला तरी आपली गाडी त्यांतून सुरक्षितपणें जाईल. हा तो सांकेतिक चिन्हांचा कागद पहा. यांतील पहिलें अक्षर काय लिहिलें आहे ते पहा.

**मी**—'य्षी: ।' हो हो. मी सांगतो. य म्हणजे श व ष म्हणजे र; ओळखलें ओळखलें, य्षी: म्हणजे श्री: ॥

**पुरुषोत्तम**—अगदीं बरोबर आहे. पुन्हां पहा. हा मधला शब्द वाचा आणि त्याचा अर्थ करा.

**मी**—'कुड्डशिमी,' असा शब्द वाचून कांहीं वेळानें कोष्टकें पाहून 'उज्जयिनी' असें लिहिलें.

**पुरुषोत्तम**—ठीक आहे. म्हणजे यांत मिताक्षरी भाषा वापरली आहे असें उघड दिसतें. आणखी तीन शब्द घेऊन आपण पाहूं. हे शब्द वांचा.

**मी**—टिपोज, धीनलिंख, व नमआनमेय्हष. हे पहा टिपोज म्हणजे चितोड; धीनलिंख=भीमसिंग व नमआनमेय्हष म्हणजे मन-कामनेश्वर. होय ना?

**पुरुषोत्तम**—होय. आतांपर्यंत समुद्र सपाटीपासून आपण बरेच उंच आलों खरे, पण खडापहाड चढायला आतां कोठें सुरवात आहे. या कागदांत मिताक्षरी भाषेची मोडणी फार तुरळकपणें दिली आहे. त्यावरून असें उघड अनुमान काढावें कीं मिताक्षरी भाषेचें ज्याला चांगलें ज्ञान आहे, त्यालाच या कागदाचें महत्व समजावें, इतरांस समजूं नये असाच लेखकाचा उद्देश असावा.

आतां ही गम्मत पहा. आतांपर्यंतच्या या चार ओळी शुद्ध मिताक्षरी भाषेंत लिहिलेल्या आहेत हें त्या प्रत्येक ओळींतला एक एक वेगळा वेगळा शब्द घेऊन आपण पाहिलें. हा येथें नवा मजकूर सुरू झाला. प्रारंभीं हें त्रिदळी बिल्वपत्राचें चिन्ह काढलेलें आहे, हेंही आपल्याला लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. हा आतां पहिला शब्द वाचा. आणि तो लिहिण्याची तऱ्हा पहा. केवढा लांब लचक शब्द झाला आहे पहा!—

**मी**—कु. य्यीषान. ड्ड. य्यीअृरञ. शि. यंअष. मी. आसिआ..... अबबबब्! एवढा का एक शब्द आहे हा! बरें हा मिताक्षरी पद्धतीनें सोडवून पाहतो हां' असें म्हणून मी पुढील अक्षरें कागदावर मांडली.

उ. श्रीराम. ज्ज. श्रीकृष्ण. यि. शंकर. नी. कालिका,—ओहोहो. आलें ध्यानांत. ऐकलें का! अहो, उज्जयिनी हा शब्द लिहिला आहे, पण प्रत्येक अक्षरामध्यें, तीन तीन अक्षरी एक एक देव वाचक शब्द घालून दिला आहे. बोला होय कीं नाहीं?

**पुरुषोत्तम**—होय. तुमच्या तें आतां चांगलें लक्ष्यांत आलें. त्याचप्रमाणें या पुढील ओळी लक्ष्यपूर्वक पाहिल्यावर तुमच्या असें ध्यानांत येईल कीं प्रत्येक अक्षरां अक्षरांच्या मध्यें सार्थ अगर निरर्थक तीन तीन अक्षरांचे शब्द घातलेले असून तेवढें वगळून वाचल्यास शुद्ध मिताक्षरी भाषेंत आलेला मजकूर लिहिलेला आहे. पहिल्यानें तीन पानांचें बिल्वपत्रसूचक चिन्ह काढलेलें आहे. प्रत्येक पोथीवर 'त्रि' असें अक्षर ठळक लिहिलेलें आहे व 'त्रि' या अक्षरानें सुरवात होणारी अशीं देवतांचीं नावें हुडकून त्यांस नमन केलें आहे. अर्थात् 'त्रि' म्हणजे 'तीन' ही संख्या हे कागदपत्र वाचतांना आपुल्यापुढें वारंवार येऊन ती आपल्या लक्ष्यांत राहिली म्हणजे सांकेतिक भाषा वाचतांना तीन तीन अक्षरांचे शब्द वाक्यांतून जे घातले आहेत त्यांचें वैयर्थ्य आपल्या लक्षांत येतें. हें तीन या शब्दाचें कूट एकदां ध्यानांत घेतलें म्हणजे आपल्या पुष्कळशा अडचणी कमी होतील. हेंच कूट व हीच लिहिण्याची पद्धती कन्हय्यालालानें हिरालालाला विकलेल्या कागदांत स्वीकारली असावी व ती तुम्हीं त्या दिवशीं सांगितल्याप्रमाणें बसंतीलालानें भैरूसिंग, हिरालाल प्रभृति मंडळींना सांगितली असावी म्हणूनच ती मंडळी मनकामनेश्वराजवळील घरांत पाण्याच्या बाजूला तीन त्रीक नऊ हात खोदून पहाणार होती असें मला दिसतें. तें कसेंही असो. आपणांस ही सांकेतिक लिपींत लिहिलेली गुंडाळी सबंध वाचतां येईल इतकी सामुग्री आपणांजवळ जमली आहे.

आम्हीं आतां थोड्याच वेळांत तो सर्व कागद वाचून काढूं, या विचारानें मला मोठा आनंद झाला. 'नापास होणार,' 'नापास होणार' अशी धाकधुक वाटत असतांना 'पास होऊन पहिला नंबर आला' अशी तार येऊन धडकावी म्हणजे एखाद्याला कसा आनंद होतो तसा आनंद मला झाला म्हटलें तरी चालेल. रात्रीं दोन वाजे-पर्यंत आमचें काम चाललें होतें. एक एक शब्द कागदावर लिहाव-याचा, त्यांतून निरुपयोगी तीन अक्षरांचा शब्द खोडावयाचा, असें करितां करितां एखादी दुसरी चुकी करावयाची, पुन्हां ती दुरुस्त करावयाची, असें होऊन रात्रीं एक वाजल्यावर आम्हीं त्या कागदांतला सबंध मजकूर वाचला. नंतर दुसऱ्या एका कागदावर त्यांतून जरूर तेवढा मजकूर लिहून काढला, आणि तेवढाच खरा मजकूर त्या सांके-तिक लिपीच्या कागदावर होता.

तो मजकूर वाचल्यावर राजपुत्र भीमसिंगाच्या चातुर्याबद्दल आम्हाला विशेषच अभिमान वाटला.

* * * *

तुळशीदास कवीनीं असें म्हटलें आहे कीं—

'काम धीरे होत असतें. उतावीळ कां होतोस? हवें तेवढें पाणी शिंपडा, परंतु झाड योग्य वेळींच फळास येतें.'

## प्रकरण पसतिसावें

# चिंतामण गणेशाचे मंदिराकडे !

**उमा देवी यस्य माता, पिता यस्य च शंकरः ॥**
**मूषको वाहनं यस्य स मां पातु विनायकः ॥ १ ॥**

**श्री**

श्री गणेशाय नमः ॥ श्री सरस्वत्यै नमः ॥ श्री महाकालेश्वराय नमः ॥ श्री मनकामनेश्वराय नमः ॥ मातापितृभ्यां नमः ॥ सर्वेभ्यो ब्राह्मणेभ्यो नमो नमः ॥ कुल देवतायै नमः । अवन्तिकायै नमः ॥ श्री चिंतामणि गणेशाय नमः ॥ श्रियै नमः ॥

१ आमचे बावाजी, मेवाडचे राणे राजसिंगजी, यांच्या आज्ञेनें, उदेपूरच्या राज्याचा हक्क सोडून, आम्हीं चितोडगडाहून उज्जयिनीस आलों. आम्हांसमवेत कै. पंडित नीलकंठशास्त्री चितोडवाले पुरोहित, आमचे भाचे कुमार विजयसिंहजी, आमचे कामदार रावत केसरीसिंगजी व कारकून कुमार सूरतसिंग ही मंडळी आली.

२ आमच्या जवळ जें द्रव्य होतें त्यापैकीं जरूर तेवढें बाहेर ठेऊन बाकी उरलेलें द्रव्य मशारनिल्हे निलकंठशास्त्री, विजयसिंहजी व सूरतसिंगजी यांचे देखत नीट व्यवस्थेनें गुप्तस्थळीं ठेविलें व त्या द्रव्याची केव्हां, कोणी व कशी व्यवस्था लावावयाची हें ठरविलें व कागदांवर लिहून ठेविलें व त्या कागदांपैकीं एक कागद पंडित नीलकंठशास्त्री याचे संग्रहीं ठेवण्यासाठीं त्यांचे हवालीं केला.

३ परंतु कांहीं दिवसांनीं आमची अशी खात्री झाली कीं मनकामनेश्वराच्या मंदिरांतील आवारांत, विजयसिंहाच्या घरांतल्या भिंतींत पुरून ठेवलेल्या द्रव्याची बातमी गुप्त राहिली नाहीं.

४ श्री मनकामनेश्वराच्या खर्चाप्रीत्यर्थ अगर विजयसिंह व नीलकंठ-शास्त्री यांच्या पुढील पिढ्यांतील वंशजांच्या उपयोगाप्रीत्यर्थ ठेविलेलें द्रव्य नाहीसें होईल, अशी दृढ शंका आल्यामुळें, आम्हीं तें द्रव्य श्रीमनकामनेश्वराच्या आवारांतून गुप्तपणें काढलें व दुसरीकडे नेऊन ठेविलें.

५ कै. पंडित नीलकंठशास्त्री यांचा पुत्र दामोदरशास्त्री व आमचा कारकून सूरतसिंग यांचे त्या पुरून ठेवलेल्या द्रव्यासंबंधीं कांहीं संभाषण झालेलें आमच्या कानीं आलें, यासाठीं आतां पुरून ठेविलेल्या द्रव्याची जागा कुमार विजयसिंगजी, कामदार केसरीसिंगजी व आम्हीं अशा आम्हां तिघांनाच ठाऊक आहे. इतरांना नाहीं. त्यामुळें पंडित नीलकंठशास्त्री यांचे संग्रहीं असलेल्या कागदाचें अतःपर कांहीं महत्व उरलेलें नाहीं.

६ उज्जयिनी नगरींत, श्रीमन्महाकालेश्वर मंदिराचे दक्षिणेस, शिप्रा नदीच्या पलीकडे सुमारें एका कोशावर श्री चिंतामणी गणेशाचें प्राचीन मंदिर आहे. श्री चिंतामणि गणेशाचे सन्निध पूर्वेकडे तोंड करून उभें रहावें व तीनशें, अधिक तीनशें, अधिक तीनशें म्हणजे तीनशें त्रीक नऊशें पावलांवर एक चबूतरा बांधलेला आढळेल. त्या चबूतऱ्यावर शेंदूर फांसून तीन दगड खुणेसाठीं ठेविलेले आहेत. त्या देवतांच्या मूर्ती नव्हेत. त्यांची प्राणप्रतिष्ठा केलेली नाहीं. सबब त्या जरूरीच्या वेळीं काढून टाकण्यास हरकत नाहीं.

७ हा चबूतरा तीन हात लांब तीन हात रुंद व तीन हात उंच असा आहे. तो काढून टाकून त्याचे खालीं तीन हात खणावें म्हणजे तीन पेट्या सांपडतील.

८ पंडित नीलकंठशास्त्री यांच्या वंशजांचे—दामोदरशास्त्र्याचे—व कुमार विजयसिंगाचें अगर त्याच्या वंशजांचें सख्य रहावें, वैमनस्य होऊं नये यासाठीं कुमार विजयसिंग हे मनकामनेश्वराच्या आवारांतून आपलें बिऱ्हाड कायमचें उठवून चिंतामणगणेश मंदिराच्या नजीक असलेल्या जवाशिया गांवीं रहावयास जात आहेत व ही त्यांची योजना आम्हाला पसंत आहे.

९ हें पुरून ठेविलेलें द्रव्य श्रीमनकामनेश्वराप्रीत्यर्थ खर्च व्हावें अशी आमची इच्छा आहे. परंतु ज्याला तें सांपडेल त्यानें तें आमच्या इच्छेप्रमाणें उपयोगांत आणिलेंच पाहिजे असा आमचा दुराग्रह नाहीं. मुके, आंधळे, पांगळे, थोटे, दुबळे, अशांच्या किंवा इतर लोकांच्या कल्याणासाठीं जरी त्याचा विनियोग केला तरी अशा प्रकारचा त्याचा व्यय म्हणजे सद्व्ययच होय.

१० हा लेख अवंतिका क्षेत्रांत, भाद्रपद शुद्ध—गणेश—चतुर्थीला मंगळवारीं, विक्रम संवत् १७३८ रोजीं लिहिलेला आहे.

कुमार भीमसिंग.

||श्रीः|| श्रीमनकामनेश्वराय नमः ||श्रीः|| श्रीचिन्तामणिगणेशाय नमः

असा वर लिहिलेला मजकूर त्या सांकेतिक भाषेंत लिहिलेला होता.

अशा प्रकारें राजपुत्र भीमसिंगानें ठेवलेल्या धनाचा आह्मांला पुरता पत्ता लागला. मनकामनेश्वराच्या आवारांत तें द्रव्य आतां नव्हतें व कन्हय्यालालानें हिरालालाला दिलेला कागदहि आतां कांहीं कामाचा उरला नव्हता हेंहि आम्हांला कळून आलें.

रात्रीचे दोन वाजून गेले होते म्हणून नंतर आम्हीं दिवा मालविला व आंथरुणांवर पडलों. डोक्यावरचें एक मोठें ओझें उतरल्याप्रमाणें

होऊन मला फार गंमत वाटली व हत्ती गेला, आतां फक्त शेंपूट उरलें असें वाटून मला मोठा उत्साह वाटला.

दुसऱ्या दिवशीं विष्णूला आम्हीं सर्व हकीगत कळविली, तेव्हां त्यालाहि मोठा आनंद झाला, व तो म्हणाला कीं 'आतां आपल्याला मोठ्या उत्साहानें पुन्हां कामाला लागलें पाहिजे. पण त्या पूर्वीं तुम्हांला एका गोष्टीची आठवण देणें जरूर आहे, ती ही कीं भैरूसिंग हिरालाल वगैरे मंडळींचा आपल्या हालचालीवर अद्याप डोळा आहे, ही होय. सापाच्या शेपटीवर आपण पाय दिला आहे व तो साप आपल्या मागोमाग आहे असें आपणांस समजलें पाहिजे. त्या दिवशीं रात्रीं सीताबाईचा रट्टा ज्यानें घट्ट धरला होता व जो तिला वारंवार दटावीत होता तो मनुष्य माझ्या मागें असलेला मला बरेच वेळां आढळला आहे. तसाच एखादा तुमच्या हालचालीवर देखील लक्ष ठेवीत असेल. आपण जोपर्यंत या द्रव्याच्या खटपटींत आहोंत तोंपर्यंत आपल्या मागचा ससेमिरा चुकायचा नाहीं !'

नंतर बरीच वाटाघाट होऊन, भीमसिंगानें दिलेल्या वर्णनाप्रमाणें चिंतामण गणेशाचे मंदिरासमोर तो चौथरा व त्यावरचे शेंदूर फासलेले तीन दगड तेथें आहेत किंवा नाहींत ते अगोदर पहावेत व मग पुढचा कार्यक्रम ठरवावा असें ठरलें. ज्या वेळीं तेथें जावयाचें ती वेळ पहाटेची अगर शुक्ल पक्षाच्या रात्रीची असावी म्हणजे आपल्या मागें असणाऱ्यांना आपला सुगावा लागण्याचा संभव तितका कमी असें ठरलें.

उज्जयिनींतून चिंतामणगणेशाचे मंदिराकडे जाण्याला दोन मार्ग आहेत. एक बैलगाडीचा कच्चा रस्ता व दुसरा आगगाडीचा. राजपुताना माळवा रेलवेचा एक फांटा उज्जयिनीहून शिप्रानदीच्या पुलावरून फतेहआबाद कडे जातो. उज्जयिनीची प्रत्येक गाडी जातांना

व येतांना शिप्रेच्या पुलावर थांबते व तेथून लाईन क्लिअर मिळाल्यावर मग पुढें जाते. उज्जयिनीच्या स्टेशनापासून शिप्राब्रिज फ्लॅग स्टेशन एक मैल व तेथून चिंतामण गणेशाचें मंदिर एक मैल आहे. व तें रेलवे लाइनीपासून अगदीं जवळ असल्यामुळें आगगाडींतून जातांना स्पष्ट दिसतें.

---

## प्रकरण छत्तिसावें

# पाषाणेश्वर

**तुझ्या रे दिव्यरूपाचा । मनाला लागला ध्यास ।**
**किती मी आळवूं तूंतें । स्वभक्ता भेट देण्याला ॥**

—वि. ज. कामत

पुरुषोत्तम, विष्णुशर्मा व मी एके दिवशीं सायंकाळीं चिंतामण गणेशमंदिराकडे गेलों. मंदिराच्या सभोंवार एक जुना तट आहे. आसपासचा प्रदेश अगदीं निर्जन असून तेथें चिंचेचीं झाडें आहेत. आम्हीं गेलों त्या दिवशीं पौर्णिमा होती त्यामुळें आम्हीं मंदिराजवळ गेल्यावर चंद्रप्रकाशांत आजूबाजूचा प्रदेश मोठा शांत व मनोहर दिसूं लागला. आम्हां तिघांखेरीज त्या रानांत त्यावेळीं कोणीहि मनुष्य नव्हतें. आम्हीं इकडल्या तिकडल्या गोष्टी सांगत चाललों होतों, तथापि गोष्टींचा मुख्य विषय म्हणजे मनकामनेश्वराबद्दलचें पुराण होय. अगदीं आरंभापासून आतांपर्यंत काय काय झालें, कसें कसें होत गेलें व अद्याप काय काय व्हावयाचें उरलें याबद्दल सिंहावलोकन झालें. राजपुत्र भीमसिंग व त्याजबरोबर स्वार्थत्याग करून आलेले त्याचे विजयसिंगादि आप्तवर्ग व नीलकंठशास्त्री चितोडवाले वगैरे पुरोहित वर्ग यांच्या संबंधानें चर्चा झाली, तेव्हां एका गोष्टीबद्दल अद्याप आपणांस कांहींच माहिती

नसल्यानें आपल्या कार्यांत एक मोठेंच वैगुण्य रहातें याबद्दल आम्हांला कसेसेंच वाटलें व ती गोष्ट ह्मणजे विजयसिंगाच्या वंशजाबद्दलची माहिती ही होय. राजपुत्र भीमसिंगानें स्थापन केलेला मनकामनेश्वर व त्याच्या संबंधाचा खरा व विश्वसनीय इतिहास आम्हांला सांपडला व नंतर थोड्या बहुत प्रयत्नानें नीलकंठशास्त्री यांचा विद्यमान व शेवटचा औरस वंशज कन्हय्यालाल याचा पत्ता लागला. भीमसिंगाच्या सूचने-प्रमाणें अतिशय काळजीपूर्वक जतन केलेल्या महत्त्वाच्या कागदाचा शोध लागून तो अगदीं अकस्मिक रीतीनें नाहींसा झाला, हेंहि निश्चितपणें ठरलें. भीमसिंगानें कांहीं द्रव्य पुरून ठेविलें व तें आमच्या पूर्वीच्या तर्काप्रमाणें मनकामनेश्वराच्या आवारांतच ठेविलेलें होतें याबद्दल निःसंशय पुरावा सांपडला. हें सर्व ठीक झालें. सांखळीचे दुवे सांपडत चालले होते, पण त्यांपैकींच एक मुख्य दुवा म्हणजे विजयसिंगाच्या वंशजांची हकीगत ही होय. तिचा आतांपर्यंत आम्हांला मागमूसहि लागला नव्हता व तो लागण्याचा संभवहि दिसत नव्हता. पण सांकेतिक लिपींत लिहिलेल्या त्या तिसऱ्या गुंडाळीचा अगदीं अचानक उलगडा झाल्यामुळें विजयसिंग व त्याचे वंशज बहुत दिवसांपासून मनकामनेश्वराच्या आवारांतील आपलें घर कायमचें सोडून चिंतामण गणेशाच्या मंदिरापासून दक्षिणेस अर्ध्या मैलावर असलेल्या जवाशिया नांवाच्या गांवीं रहावयास गेले असें समजलें, तेव्हां अर्थातच त्यांचा पत्ता लागण्याची थोडी तरी आशा वाटूं लागली. आणि भीमसिंगानें ठेवलेल्या गुप्त ठेवीचा जर कदाचित शोध लागला तर त्याचे अगोदर निदान त्याबरोबरच विजयसिंगाच्या वंशजांचा पत्ता लावणें अत्यंत जरूरीचें होतें. नाहीं-पेक्षां इतका 'खटाटोपो भयंकरः' करून व्हायचें काय? तर सगळें

सांपडलेलें द्रव्य यस्य कस्यांच्या ताब्यांत जाऊन आमची सर्व मेहेनत व खटपट पाण्यांत जावयाची आणि तसें आह्मांस नको होतें.

चिंतामण गणेशाचें मंदिर रानांत अगदींच एकीकडे आहे. तें कोणी व कधीं स्थापन केलें याबद्दलची माहिती ही जवळजवळ दंतकथेच्या सदरांत गेली आहे. देवी अहिल्याबाई होळकर यानीं त्या मंदिराचा जीर्णोद्धार केला एवढी मात्र हकीगत देवळांतला पुजारी सांगतो. देवळाचा कोट आतां अगदीं जीर्ण झाला आहे. देवळाचे आंत पूर्वेकडे एक प्रशस्त पायऱ्या असलेली व मोटांची सोय असलेली बावडी आहे, पण हल्लीं मोटा नेहमीं चालत नसल्यानें व स्वच्छ पाणी ठेवल्यानें काय फायदे होतात याची मंदिराच्या आवारांत रहाणाऱ्यांना कल्पना नसल्यानें पाण्यांत घाण सांचून त्याला एक प्रकारचा दुर्गंध येतो. मंदिराच्या आवारांत पुजारी व त्याचें कुटुंब, व इतर दोन तीन बिऱ्हाडें आहेत, व त्यांच्या शेतकीच्या व इतर सामानानें मंदिराचें आंवार भरून गेलेलें असतें. मंदिराचा बहिर्भाग काय किंवा अंतर्भाग काय ओसाड व उदास भासतो. देवळाच्या आवाराचा मुख्य रस्ता उत्तराभिमुख आहे; मुख्य दार आतां अगदीं मोडकळीला आलें असल्यानें तें हल्लीं निरुपयोगी झालें आहे. दारांतून आंत गेल्यावर पूर्वेकडे व पश्चिमेकडे दोन दोन बिऱ्हाडें असून त्यापैकीं एकांत पूजारी रहातो. पूर्वेच्या बाजूला वर सांगितलेली मोठी बावडी आहे. मुख्य मंदिर आवारांत पश्चिमेला आहे. एक जीर्ण मंदिर, व सभामंडपांत दोन फुटके नगारे हा बाहेरचा देखावा व आंतल्या बाजूला गाभाऱ्यांत चिंतामण गणेशाची स्वयंभू मूर्ति हा आंतला देखावा. ही मूर्ति ह्मणजे दोन ओबडधोबड पाषाण असून त्यांवर शेंदूर लावून कवड्यांच्या दोन जोड्या डोळ्यांच्या खुणा-

साठीं बसविल्या आहेत. देवाच्या समोर, दर्शन करणाऱ्यांचा हात सहसा लागूं नये यासाठीं, लांब व जाड तुळई लावलेली आहे. असो.

चिंतामणगणेशाचें दर्शन घेतल्यावर आम्हीं प्रदक्षिणा करून क्षणभर टेकलों. शहरांतून त्या मंदिराकडे जाणारे लोक अगदीं हातांच्या बोटांवर मोजण्याइतके, त्यांतून तशा वेळीं ह्मणजे रात्र पडल्यावर तर तेथें कोणीच जात नाहीं, तेव्हां आम्हीं तिघेजण तेथें तशा वेळीं पाहून मंदिराच्या पुजाऱ्याला व चांदण्यांत हुतुतु घालीत असलेल्या मुलांना थोडें आश्चर्य वाटलें. आह्मीं यथाशक्ति त्या पुजाऱ्याला कांहीं दिलें व आमच्याबरोबर कांहीं थोडेंबहुत जें च्याऊम्याऊ होतें तें त्या मुलांना वाटून दिलें तेव्हां थोड्या वेळांत आम्हीं त्या सर्वांचे मित्र बनलों. मग ‘ आम्हीं आतां थोडेसे बाहेर फिरून येतों; रात्रीं येथेंच मंदिरांत पडूं ’ असें सांगून आम्हीं मंदिराच्या आवाराबाहेर पडून पूर्वेकडे चालूं लागलों.

मंदिराच्या बाहेर पूर्वेला, आगगाडीचा एक फांटा दक्षिणोत्तर जातो. मंदिराच्या व आगगाडीच्या रस्त्यामध्यें सुमारें एक फर्लांग अंतर आहे. श्री चिंतामण गणेशाच्या मूर्तीपासून मंदिराचा तट सुमारें ५० पावलें दूर आहे. त्या तटाजवळ उभे राहून आम्हीं पावलें मोजण्यास प्रारंभ केला. अडीचशें पावलें मोजून तेथें आम्हीं थांबलों. तेथें एक भंगलेली मूर्ती पडली होती. ती तेथें भीमसिंग राजपुत्रानें कदाचित मुद्दाम ठेविली असावी, अगर आणखी कोणीतरी टाकून दिली असावी. पण आमचा पहिला तर्क जास्त संभवनीय असावा, कारण तेथून पुनः तीनशें पावलें मोजून आम्हीं थांबलों, तों सती व तिचा पती या उभयतांचीं चित्रें कोरलेला एक जुना दगड तेथें चिंचेच्या एका झाडाला टेकून ठेवलेला दिसला. खरें काय तें

ईश्वर जाणें. तेथून तीनशें पावलें चालून गेल्यावर एक चबूतरा बांधलेला असलेला आह्मांला आढळला. त्या चबूतऱ्यावर शेंदूर फासलेले तीन दगड मांडलेले होते. तो चबूतरा खरोखरीच तीन हात लांब, तीन हात रुंद व तितकाच उंच होता असें आमच्या दृष्टीस पडलें. सांकेतिक भाषेंतील माहिती आकस्मिक रीतीनें लागल्यामुळें आतां आमचें काम आह्मांला फार हलकें वाटूं लागलें. त्यांतून कागदांत वर्णिलेला तो चबूतरा पाहून तर आम्हीं फार आनंदित झालों. ह्मसोबा किंवा सटवाई किंवा इतर देवतांच्या नांवानें खेडेगांवांतून दगड मांडलेले असतात तसे तीन मोठे ओबडधोबड दगड त्या चबूतऱ्यावर पुरलेले असून त्यांस शेंदूर फांसलेला होता. शेंदूर ओलसर व तकतकीत असून त्याचीं त्या दगडांवर पुटें चढलेलीं होतीं त्यावरून भीमसिंग राजपुत्रानें पहिल्यानें त्यांस शेंदूर लावल्यानंतर कोणीतरी त्या दगडांची देवतांमध्यें गणना करून नेहमीं शेंदूर लावीत असे, असें दिसलें. त्या दगडांसभोंवतीं मातीचा एक गोल बांध असून, फुलें, बांगड्या, धूप, उदबत्तीचे तुकडे, तांबडे सुती दोरे, नारळाची शेंडी व करवंट्या वगैरे पदार्थ त्या दगडांवर व सभोंवतीं होते. सारांश, भीमसिंग राजपुत्राच्या त्या संकेत—चिन्हात्मक कागदांत जर त्या चबूत्र्याचा स्पष्ट उल्लेख केलेला नसता तर इतर लोकांप्रमाणें आम्हींहि त्या दगडांना देव समजलों असतों, इतकें हुबेहूब सोंग त्या धूर्त भीमसिंगानें त्या चबूत्र्याला दिलें होतें.

चबूतऱ्याची याप्रमाणें पहाणी झाल्यावर, आम्हीं मंदिराकडे परत फिरलों. रात्रभर मंदिरांत राहून, दुसरे दिवशीं सकाळीं तेथून जवळच असलेल्या जवाशिया गांवीं आह्मांला जावयाचें होतें. विजयसिंगाच्या वंशजांचा कांहीं पत्ता लागल्यास पहावयाचा होता. आम्हीं मंदिरांत परतलों तेव्हां, पुजारीबुवानीं मंदिरांतच आमच्यासाठीं एक जाजम

पसरलें होतें त्यांवर बसलों, पाणी प्यालों, व सर्व मुलांना आमच्या भोंवतीं बसवून त्यांजबरोबर बोलत बसलों.

'बालानामपि सुभाषितं ग्राह्यं,'

असें ह्मणतात. लहान मुलांना पुष्कळ माहिती असते व कोणी विचारणाराच भेटला पाहिजे, कीं तीं त्याला अगदीं निष्कपट बुद्धीनें सर्व माहिती पुरवितात. चबूत्रा व त्यावरचे ते तीन दगड यांजसंबंधीं लोकांमध्यें काय काॅय समजुती प्रचलित आहेत तें समजणें फार जरूरीचें होतें, नाहींपेक्षां 'विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम्' या गोष्टीप्रमाणें कांहीं भलतेंच व्हावयाचें.

तीं मुलें व त्यांचे इतर आप्त यांनीं त्या रात्रीं आम्हांला पुष्कळ माहिती दिली. उज्जयिनीच्या संबंधाच्या अनेक दंतकथा आह्मांला त्या रात्रीं कळल्या. त्या व इतर दंतकथांचा जर एके ठिकाणीं संग्रह केला तर उज्जयिनी नगरी व तिला भूषणभूत होऊन गेलेले अनेक साधू, कवि, राजे, व इतर दिगंतकीर्ती जन यांचा इतिहास आपणास संग्रहित करितां येईल. 'कोणत्याहि राष्ट्राच्या प्राचीन इतिहासलेखनाचें आद्य-साधन दंतकथाच असतात. या दंतकथांच्या मुळाशीं सत्याचा थोडा बहुत अंश असतोच. परंतु तो सत्याचा अंश शोधून काढणें हें फार कठिण, जवळजवळ अशक्यच आहे.'

जवाशिया येथें एक वृद्ध साधु रहात असे. तो नित्य त्या चबूतऱ्यावर असणाऱ्या देवतांची पूजा करी व आपल्या गांवीं परत जाई. तो कोणाशीं फारसें बोलत नसे. त्याला एकांत फार आवडे, इत्यादि गोष्टी आह्मांला नवीन कळल्या.

अपरात्र झाली होती. मुलांना झोंपा येऊं लागल्या त्यामुळें उज्जयिनीच्या त्या रम्य कथा तितक्याच राहिल्या.

० उज्जयिनीच्या प्राचीन वैभवाची आठवण करून, रा. रा. केशव नारायण डांगे नांवाचे एक कवी तिला विचारतात, कीं,

**कोठें ऐश्वर्य तुझें ? कोठें सत्ता ? कुठें वसे शील ? ॥**
**कां सर्व लोपलें हें ? आला तुज वीट काय वदशील ? ॥ १ ॥**
**कोठें इतिहास तुझा ? दिगंत कीर्ती, सुभव्ययश नृपती ॥**
**कवि कोठें ? काव्य कुठें ? उरले रसिकहि अतर्क्य दैवगती ॥ २ ॥**

---

## प्रकरण सदतिसावें

## प्रियकारण्यांत !

**वास उसीमें हैं विभुवरका, है बस सच्चा साधु वही ।**
**जिसनें दुखियोंको अपनाया, बढकर उनकी बांह गही ॥**
**आत्मस्थिति जानी उसनेही, परहित जिसने व्यथा सही ।**
**परहितार्थ जिनका वैभव है, है उनसेही धन्य मही ॥**

—मैथिलीशरण गुप्त.

उषःकाल झाला होता. आम्हीं पहाटेंसच नित्यविधी उरकून जवाशियाकडे जाण्याला सिद्ध झालों होतों. इष्ट कार्य सिद्धीस जावी ह्मणून देव व दैत्य ज्याचें पूजन करितात त्या सर्वविघ्ननिवारक गणपतीला आम्हीं वंदन केलें, आणि मग मंदिराबाहेर पडलों. आदल्या रात्रीच्या हकीकती ऐकून आमचीं मनें प्रसन्न झालीं होतीं, राजपुत्र भीमसिंगानें वर्णन केलेला चबुतरा आह्मांला सांपडला होता, अर्थात् त्याच्याखालीं ठेवलेल्या द्रव्याचा पत्ता लागला असल्यासारखाच झाला होता. विजयसिंहाच्या वंशजासंबंधानें आह्मांला कांहींच माहिती लागली नव्हती. तथापि 'मनीं वसे तें स्वप्नीं दिसे' अशासारखें, जवाशियाहून त्या चबूतऱ्यावरच्या पाषाणांची नित्य पूजा करावयासाठीं जो साधू येत असे त्याजकडून आपणाला थोडीतरी माहिती मिळेल असें वाटत

होतें, आणि त्याचीं कारणेंहि उघड होतीं. भीमसिंगानें आपल्या सांकेतिक लिपींत लिहिलेल्या कागदांत विजयसिंग जवाशिया येथें रहावयास गेल्याचा उल्लेख केला होता व कोणी तरी एक साधू दररोज नियमानें त्या चबूतऱ्यावर, आपलें ठिकाण सोडून मुद्दाम अर्धा कोस जमीन तुडवीत रोज येई, त्यांवरून जवाशिया येथें रहाणारा तो साधू, तो चबूतरा व मनकामनेश्वराचा एकंदर इतिहास यांचा परस्परसंबंध कोठेंतरी असावा असें मनांत येणें अगदीं साहजिक होतें.

अरुणोदयाच्या सुमाराला आम्हीं जवाशिया येथें गेलों. हवा थंड होती. दिशा प्रसन्न दिसत होत्या. बहुधा प्रत्येक झोंपडींतून गाणीं ह्मणत ह्मणत बायका दळीत होत्या त्यांचा कर्णमधुर आवाज कानावर येत होता. कांहीं स्त्रिया व क्वचित् पुरुष नित्यविधीसाठीं घरांतून बाहेर पडत होते. आम्हीं त्या गांवांतल्या मुख्य मुख्य रस्त्यानें जवळजवळ शेवटच्या घरापर्यंत गेलों होतों. त्या घरांत असलेला शेतकरी त्याचे बैल वैरण खात होते तेथें उभा होता त्याला आह्मीं चिंतामणगणेशाच्या मंदिरांकडे नियमानें जाणाऱ्या त्या साधूचा पत्ता विचारला व तो कळल्यावर आह्मीं त्याच्या आश्रमाकडे जावयाला निघालों.

जवाशिया गांवापासून एका हांकेच्या अंतरावर दक्षिणेला एक आंब-राई आहे, त्यांत एक पडून झडून गेलेली विहीर व अगदीं मोडकळीस आलेली एक धर्मशाळा आहे. त्या धर्मशाळेंत ते साधू रहात असत. आम्हीं त्या स्थळीं पोचलों त्या वेळीं ते स्नान करून उच्चःस्वरानें प्रातःस्मरण करीत होते. त्यांचें शरीर मोठें तेजःपुंज दिसत होतें. वय सुमारें ६० चे सुमारास असावें. आम्हीं जाऊन त्यांना नमस्कार केल्यावर त्यांनीं आमचे स्मितवदनानें स्वागत केलें व आह्मांला बसावयाची खूण

केली. त्यांचें प्रात:स्मरण आटोपल्यावर त्यांनीं पक्ष्यांच्या उपयोगासाठीं एक स्वच्छ परळांत पाणी भरून ठेविलें व एका मडक्यांतून एक ओंझळभर धान्य काढून तें आंगणांत चोहोंकडे विखुरलें, तेव्हां थोड्याच वेळांत त्यांचे परमस्नेही—राघू, चिमण्या, व इतर रानांतले पक्षी तेथें जमले व आनंदानें नानाप्रकारचे मधुर शब्द करीत तेथें आहारविहार करूं लागले. त्यांच्या दयार्द्र हृदयाविषयीं त्या पक्ष्यांची इतकी खात्री झालेली दिसली की, ते नि:शंकपणें त्यांच्या अगदीं जवळ येऊन धान्य टिपूं लागले. तो प्रकार प्रत्यक्ष पाहून त्या वेळीं मला रघुवंशांतल्या दिलीप राजाची आठवण झाली. या सूर्यवंशांतील राजास नंदिनी नामक वशिष्ठधेनूच्या प्रसादानें रघु या नांवाचा पुत्र झाला. वसिष्ठ ऋषीनीं राजाला नंदिनीची सेवा करण्यास सांगितलें होतें त्याप्रमाणें राजा—

**"व्रतार्थ गोसेवक जाहला स्वतां; तो सेवकां देखिल धाडि मागुता।**
**रक्षार्थ त्याला नलगेचि दूसरा; स्वयें प्रतापी मनुवंश तो खरा.॥"**

त्यावेळीं

**"हातीं शस्त्र तरी दयार्द्र हृदयीं हा, हें तया सांगती ।**
**नि:शंके हृदयें, ह्मणोनि हरिणी विश्वासुनी वागती॥"**

साधूंचीं आपल्या आश्रमांतील सर्व नित्यकृत्यें यथाविधी आटोपल्यावर ते आश्रमाबाहेर पडले. हातांत गंधाक्षता पुष्पें वगैरे पूजनसामग्री होती. अंगावर लंगोटीशिवाय दुसरें कांहीं नव्हतें.

**"भांडें सोन्यारुप्याचें जवळ नचि असे एकही भूपतीच्या, ।**
**यासाठीं घालुनीयां विमल जल, फुलें भाजनीं मृत्तिकेच्या ॥**

अशा रघुराजाच्या वर्णनाप्रमाणें त्याजपाशीं सोन्यारुप्याचें तर राहोच पण तांब्यापितळेचें देखील भांडें नव्हतें. 'मला परत यावयाला एक घटकाभर लागेल, तोपर्यंत फुरसत असेल तर बसा' असें त्यांनीं मोठ्या

गोड शब्दांनीं आह्मांला सांगितलें, पण त्यांच्या पाठोपाठ जाणें आह्मांला अधिक इष्ट होतें ह्मणून ‘ आम्हीं आपणाबरोबर येतों ’ असें सांगून आम्हीं त्यांच्या मागोमाग चालूं लागलों. त्यानींहि आह्मांला तसें करण्याला आनंदानें संमति दिली. आपल्या मनांत एखादी गोष्ट अमुक प्रकारानें व्हावी असें यावें व तसें लागलीच घडावें हें एक शुभचिन्ह होय असें माझ्या मनाला वाटलें. राजा दिलीप व राणी सुदक्षिणा यांच्या मनांत नंदिनीचें पूजन करण्याची इच्छा उत्पन्न झाली. सायंकाळ झाली होती. त्या प्रसंगाचें वर्णन करतांना आमचा उज्जयिनीनिवासी कविश्रेष्ठ कालिदास ह्मणतो कीं

**‘ वत्साच्या विषयीं समुत्सुक जरी, ती होउनी सुस्थिरा**
**घे पूजा, अतएव हर्ष उभयां अत्यंत झाला खरा; ।**
**भक्तांचे हितकारि धेनुपरि जे त्यांचा प्रसाद स्वयें**
**होतां सत्वर अर्थसिद्धि घडते, हें जाणिजे निश्चयें ’** ॥ *

ते साधु हळुहळूं चिंतामण गणेश मंदिराच्या समोर पूर्वेला असणाऱ्या, भीमसिंग राजपुत्रानें बांधलेल्या त्या चबुतऱ्याकडे जाऊं लागले. तोंडानें मोठ्यानें प्रातःस्मरण, व इतर स्तोत्रपाठ चालला होता. चबुतऱ्यावर गेल्यानंतर त्या साधूनीं त्या तीन दगडांवर गंधपुष्पें वाहून त्यांस तीन प्रदक्षिणा घातल्या व नंतर ते आपल्या आश्रमाकडे परत वळले.

परत जातांना ते आमच्याबरोबर पुष्कळ बोलले, त्यावरून ते आपल्या पूर्वाश्रमीं संसारांत पडलेले गृहस्थ असून अलीकडे त्यांनीं हा वानप्रस्थाश्रम स्वीकारिला असें दिसलें. ते स्वभावानें मोठे गोड व स्पष्टवक्ते दिसले ह्मणून आम्हीं त्यांजबरोबर पुष्कळ गोष्टी बोललों त्यावरून आम्हाला असें कळलें कीं प्राचीन काळीं चिंतामण गणेश व

* रघुवंश सर्ग २ श्लोक २२ कवी लेले शास्त्री त्र्यंबककर.

त्याच्या आसपासचा प्रदेश याठिकाणीं एक मोठी विस्तीर्ण बाग असून त्या प्रदेशाला ' प्रियकारण्य ' असें ह्मणत असत: महाभारत काळीं भारतीय आर्यांस बागा लावण्याचा विशेष शोक होता. हिंदुस्थानाच्या अतिशय उष्ण हवेमध्यें व निर्वृक्ष मैदानांत बागा लावण्याचें खरोखर पुण्य आहे आणि अशा बागेंत गांवांतील लोक फिरावयास स्त्रीपुरुष सुद्धां जात असत. कित्येक देशांतील बागा भारतीकाळांत प्रसिद्ध होत्या. अंग देशांतील चंपारण्य व उज्जयिनींतील प्रियकारण्य हीं फार प्रसिद्ध होतीं असें श्रीमहाभारताच्या उपसंहारांत श्री. चिंतामणराव वैद्यानीं लिहिलें आहे. ( पृ. २७६ )

कालांतरानें तें प्रियकारण्य नाहींसें होऊन तेथें जवाशिया हें खेडें वसलें व त्या जवळच चिंतामण गणेशाच्या मंदिराची स्थापना झाली. ते साधु उदेपूरच्या अत्युच्च क्षत्रिय घराण्यांतले असून त्यांच्या पूर्वजांनीं सुमारें दोनशें वर्षांपासून अवंतिका क्षेत्रीं येऊन कायमचें घरदार केलें होतें, असें ऐकून आम्हीं त्यांस अनेक प्रश्न केले व त्यांचीं उत्तरेंहि त्यांनीं मोकळ्या मनानें दिलीं त्यांवरून आह्मांला असें कळलें कीं भीमसिंग राजपुत्राचा भाचा, कुमार विजयसिंग हा मनकामनेश्वर मंदिराच्या आवारांतून आपलें बिऱ्हाड कायमचें उचलून जो निघाला तो जवाशिया गांवीं येऊन राहिला, व त्याच्याच वंशांतील शेवटचा विद्यमान पुरुष ह्मणजे तो साधु पुरुष असून त्याचें मूळनांव किसनसिंगजी ( कृष्णसिंहजी ) असें होतें.

किसनसिंगजीनीं आपला जो वृत्तांत सांगितला तो मोठा मजेदार होता. किसनसिंगजीचा धाकटा भाऊ गुलाबसिंग लहानपणापासून मोठा पराक्रमी व शूर असे. जवाशिया येथें लहानपणीं रहात असतांना त्याचा बहुतेक वेळ शिकारींत जाई. पुढें त्याचें उज्जयिनींत लग्न

झाल्यावर तो राजपुतान्यांत व माळव्यांत पुष्कळ ठिकाणीं नोकरीनिमित्त हिंडला. किसनसिंगजी लहानपणापासूनच विरक्त होते. त्यांचा सर्व वेळ भजन, पूजन व नित्यपाठ यांतच जात असे. कुटुंब वारल्यानंतर हिंदुस्थानांतली बहुतेक सर्व तीर्थें पाहून नंतर ते पुनः जवाशिया येथें परत आले. तेव्हां त्यांना असें कळलें कीं त्यांच्या पश्चात् गुलाबसिंग जवाशिया येथें आला होता. सिंहस्थाच्या सुमाराला गुलाबसिंग व त्याची स्त्री आपल्या एकुलत्या एका लहान मुलीला घेऊन पंचक्रोशीच्या यात्रेला निघालीं होतीं. वैशाखांतले दिवस होते. उन्हाळा फार कडक पडलेला होता. उष्ण वारा वहात होता. अशा संधीला दुर्दैवानें गुलाबसिंग पंचक्रोशीच्या रस्त्याला * उंडाशाच्या तलावानजीक वारला, आणि रजपुतांच्या चालीप्रमाणें त्याची स्त्री आपल्याबरोबर येत असलेल्या एका ओळखीच्या बाईच्या स्वाधीन आपल्या एकुलत्या एका मुलीला करून सती गेली !

---

## प्रकरण अडतिसावें

## हरिकीर्तन

मनुवाँ ! श्रीहरि भक्ति करे ।  
मुनि—मानस—सर सरस—प्रेमकी  
उपजावति लहरें ।  
कूर काम—करि कांपत,  
जो हरि भक्त— हिये विहरें ।  
गंगातनय—विनयसों प्रण तज,  
हर कर चक्र धरें ।  
व्है नत कोमल कमल 'ललित' पद  
गहि भवदलित तरे ॥

---

* प्राचीन नांव रत्नसागर.

साधू महाराजांच्या आयुष्यांतील त्या मनोवेधक आठवणी ऐकतां ऐकतां बराच वेळ लोटला. सकाळचा रम्य देखावा नाहींसा होऊन आश्रमाच्या बाहेर कडक ऊन पडलेलें दिसूं लागलें, म्हणून आम्हीं आमची उत्कंठा दाबून ठेवून घरीं परतण्यासाठीं उठलों.

वाटेनें आम्हीं एकमेकाशीं विशेष कांहीं बोललों नाहीं. प्रत्येकजण आपआपल्या विचारांतच चालला होता. ज्या आशेच्या जोरावर मी मनकामनेश्वराच्या संबंधानें खटपटी करीत होतो ती आशा आतां मला यश देणार असें स्पष्ट दिसूं लागलें. मनकामनेश्वर सांपडला. राजपुत्र भीमसिंगानें द्रव्याची केलेली व्यवस्था माझ्या नीट समजण्यांत आली. नीलकंठशास्त्री चितोडवाले, वंशपरंपरेचे पुजारी, यांचा जिवंत वारसदार कन्हय्यालाल याचा पत्ता लागला. आतांपर्यंत गूढ असलेली विजयसिंगाच्या वंशजाची माहिती आतां स्पष्टपणें उपलब्ध होऊन मैनाबाई ऊर्फ सीताबाई व तिचा चुलता साधू किसनसिंग हींच दोघे आतां विद्यमान आहेत असें निश्चित झालें. याप्रमाणें राजपुत्र भीमसिंगानें कालपटावर लिहिलेल्या नाटकाचे चार अंक आपण पाहिले. आतां पांचव्या व शेवटच्या अंकांत साधु किसनसिंग व त्याची पुतणी साध्वी सीताबाई यांच्या प्रत्यक्ष भेटीची खटपट करून भीमसिंग राजपुत्रानें अत्यंत चातुर्यानें ठेवलेलें द्रव्य आपण प्रत्यक्ष पाहूं व मग भरतवाक्य म्हणूं असे मोठ्या उत्साहाचे, उमेदीचे व आनंदाचे विचार करित मी पावलें टाकीत होतों, त्यामुळें स्टेशनावर येईपर्यंतचा कंटाळवाणा रस्ता किती लवकर आपण आक्रमण केला हें माझ्या लक्षांतच आलें नाहीं. स्टेशनावर पोंचल्यावर आम्हीं टांग्यांत बसून आपआपल्या ठिकाणीं गेलों.

त्या रात्रीं हरसिद्धी देवीच्या मंदिरांत कीर्तन होतें तें ऐकण्यास मी गेलों होतों. उज्जयिनी नगरीच्या संरक्षणासाठीं ६४ देवींचा पहारा



श्रीहरसिद्धिदेवीचें मंदिर.

आहे. त्यांना ६४ योगिनी असें म्हणतात. हरसिद्धीच्या मंदिराला चारी बाजूनीं भक्कम कोटं असून मंदिराच्या आवारांत एक बावडी आहे. मुख्य मंदिरासमोर दोन उंच व भव्य दीपमालिका आहेत. हें मंदिर व ते दीपस्तंभ फार प्राचीन असून विक्रमराजा या मंदिरांत नित्य येत असे अशी दंतकथा आहे. देवीच्या समोरचा सभामंडप चांगला आहे. हरसिद्धी ही योगिनी व स्वयंभू आहे असें ह्मणतात. त्या देवीच्या पाठीमागें श्री अन्नपूर्णा देवीची एक सुंदर मूर्ति आहे. असो.

हरिदास बोवा मोठे वैराग्यशील, समयज्ञ, मार्मिक व विद्वान् होते. कीर्तनाच्या प्रारंभीं हरसिद्धी देवीला प्रणिपात करून त्यांनीं पुढील श्लोक ह्मटला.

'न मंत्रं नो तंत्रं तदपि च न जाने स्तुतिमहो
न चाव्हानं ध्यानं तदपि च न जाने स्तुतिकथाः ।
न जाने मुद्रास्ते तदपि न च जाने विलपनम्
परं जाने मातः त्वदनुसरणं क्लेशहरणम् ॥ १ ॥+

**अर्थः**—हे माते, मला मंत्र ठाऊक नाहीं, तंत्र माहीत नाहीं, स्तुती येत नाहीं, आव्हान किंवा ध्यान कसें करावें हेंहि समजत नाहीं, स्तुतिपर गोष्टीचें ज्ञान नाहीं, मुद्रांची माहिती नाहीं, फार काय ? नीट रडतांसुद्धां येत नाहीं, तरीपण एवढें ठाऊक आहे कीं, तुझ्या सेवेपासून दुःख लयास जातें.

---

+ नाहीं जाणत मंत्र तंत्र अथवा कैसी करावी स्तुती ॥
कोणाला ह्मणतात वा तव कसी मुद्रा जिला बोलती ॥
आहे मी अगदीं अजाण नुमजे आव्हान कैसें करूं ॥
पुत्रातें करूनी क्षमा समजवी, तूं माय मी लेंकरूं ॥ १ ॥

सी. वी. सरवटे.

याप्रमाणें मंगलाचरण झाल्यावर इतर कांहीं पदें ह्मणून हरदास बोवांनीं माझ्या आवडीचें पुढील पद्य ह्मटलें—

पद–राग काफी ( वाहवा थोर तूं भूपाला ) या चालीवर.

**संगत संतन की करले। जनमका सार्थक कछु करले ॥ध्रु०॥ उत्तम नरदेह पाया प्रानी, इसका हित कछु करले ॥ सद्गुरु शरण जाके बाबा, जनममरन दुर करले ॥ संगत ॥ १ ॥ कहांसे आया कांहां जावेगा, ये कछु मालुम करना ॥ दो दिनकी जिनगानी बंदे, हुशार होकर रहना ॥ संगत ॥ २ ॥ कोन किसीके जोरू लरके, कोन किसीके साले ॥ जबलग अपना पल्लव वाढत, तबलग मीठा बोले ॥ संगत ॥ ३ ॥ कहत कबीरा सुन भाई साधू बार बार नहिं आना ॥ आपना हित कुच करले प्यारे, आखेर एकेला जाना ॥ संगत ॥ ४ ॥**

त्या मधुर पदाच्या सेवनांत श्रोते गुंग असतांना सुभेसाहेब आल्याची वर्दी आली. त्या सरशीं कांहीं लांगूलचालक उठले व लोढाशीं टेकून बसलेल्या व झोंपीं गेलेल्या लहान मुलांस तेथून उठवून त्यांनीं इतर श्रोत्यांच्या घोळक्यांत सरकावून लोढाच्या मध्यभागीं त्या लक्ष्मीधराला जागा करून दिली. तो प्रकार हरिदासबोवांना आवडला नाहीं असें दिसलें. कारण त्यांनीं विद्यारण्य स्वामींचा पुढील मार्मिक श्लोक ह्मणून शहाण्यांना शब्दांचा मार दिला. तो श्लोक असा:—

**आदरेण यथा स्तौति धनवंतं धनेच्छया।**
**तथा चेत् विश्वकर्तारं को न मुच्येत बंधनात् ? ॥**

जीवन्मुक्तिविवेक

**अर्थ**—धनप्राप्तीच्या इच्छेनें एखादा मनुष्य जसा श्रीमंताची आदरपूर्वक स्तुती करितो, तसा जर तो ईश्वराची करील तर तो जन्ममरणाच्या बंधनापासून त्याची कायमची मुक्तता करणार नाहीं काय ?

हरिदास बोवांनीं पूर्वरंगांत मनुष्यानें जगांत कसें वागलें असतां सुख होईल त्याचें प्रतिपादन केलें. नंतर ब्रह्मविद्येचें व भक्तीचें जें मूलतत्व तेंच नीतीचा व सत्कर्माचाहि पाया आहे असें दाखवून, ज्ञान, संन्यास, कर्म व भक्ती यांच्या योग्य मिलाफानें इहलोकीं आयुष्यक्रमणाचा कोणता मार्ग मनुष्यानें पत्करावा याचाहि उहापोह केला, व नंतर श्रीमद्भगवद्गीतेचा नित्य पाठ करावा असें सांगून ते म्हणाले कीं "गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रविस्तरैः ?"

एकट्या गीतेचें पुरें अध्ययन केलें म्हणजे बस्स आहे; बाकीच्या शास्त्रांचा फोलकट पसारा काय करावयाचा ? पूर्वरंगांत वेदांताचें निरूपण चालू असतांना त्यांनीं उज्जयिनींत प्राचीनकाळीं प्रसिद्धीला आलेल्या अनेक स्त्री पुरुषांचीं रम्य चरित्रें सांगितलीं. बाणभट्टानें आपल्या प्रसिद्ध कादंबरींत वर्णिलेल्या चंद्रापीडाचें वर्णन व त्याच्या उज्जयिनी राजधानीच्या प्रवेश समारंभाचें वर्णन त्यांनीं फार मनोरंजक केलें. कथासरित्सागरांत वर्णिलेला उदयन राजा, अवंतिका खंडांत वर्णन केलेले राजे व उज्जयिनीचें ऐश्वर्य यांचें वर्णन करून ते नंतर मत्स्येंद्रनाथ, भर्तृहरी वगैरे नरश्रेष्ठांच्या वर्णनाकडे वळले. वेताळ पंचविशी व सिंहासन बत्तिशी यांतीलहि कांहीं गोष्टी त्यांनीं सांगितल्या.

उत्तर रंगांत त्यांनीं भर्तृहरीचें आख्यान लावलें. भर्तृहरी राजासारखे पुरुष केवळ महद्भाग्यानेंच अवंतिकेला लाधले, कारण असे पुरुष हिंदुस्थान देशांतच काय, पण सर्व भूमंडळाचा इतिहास धुंडाळून पाहिला तरी, फारच थोडे सांपडतील. लक्ष्मी आणि सरस्वती ह्या दोन्ही एकत्र वास करीत नाहींत, अशी म्हण आहे, तिला भर्तृहरी हा मोठाच अपवाद होय. व्याकरण शास्त्रासारख्या गहन विषयावरचेहि ज्याचे ग्रंथ ऋषिप्रणीत ग्रंथासारखे प्रमाणभूत झाले आहेत, अशा पुरुषाची

विद्वत्ता किती वर्णावी ! भर्तृहरि जसा उत्तम शास्त्रज्ञ तसा पहिल्या प्रतीचा कविहि होता. त्याचा व कालिदासाचा फार स्नेह असे. त्यानें केलेले काव्यग्रंथ बहुतेक नाहींतसे झाले. शृंगार, नीति आणि वैराग्य या नांवांचीं तीन शतकें मात्र लोकप्रसिद्ध आहेत. या शतकांनीं या राजकवीचें नांव अमर केलें आहे ह्मटलें तरी चालेल. अशा प्रकारची माहिती सांगून भर्तृहरी विषयीं सर्व लोकांस ठाऊक असलेली एक चमत्कारिक गोष्ट त्यांनीं सांगितली. एका समयीं एका तपस्व्यानें भर्तृहरी राजास एक प्रासादिक फळ आणून दिलें. तें त्यानें आपल्या राणीला दिलें. तें दुर्दैवानें अन्यमार्गानें पुन्हां राजाच्या हातीं आलें. तेव्हां राजा खिन्न होऊन सर्वसंगपरित्याग करून वैराग्य धारण करून मोक्षमार्गाचें साधन करूं लागला.

या प्रकारच्या अनेक कथा सांगून हरिदासबोवा ह्मणाले कीं आतां आरतीची वेळ होत आली आहे यासाठीं संसाराचें खरें सार काय आहे तें सांगून नंतर 'हेंचि दान देगा देवा' करूं. श्रीमत् शंकराचार्य ह्मणतात कीं

**मूढ जहीहि धनागम तृष्णां कुरु तनुबुद्धे मनसि वितृष्णां ।**
**यल्लभसे निजकर्मोपात्तं वित्तं तेन विनोदय चित्तम् ॥ १ ॥**
**अर्थमनर्थं भावय नित्यं, नास्ति ततः सुखलेशः सत्यम् ।**
**पुत्रादपि धनभाजां भीतिः सर्वत्रैषा कथिता नीतिः ॥ २ ॥**

**अर्थः**—अरे मूढा, धनतृष्णा सोड कशी ! नेहमीं आनंदवृत्ति धारण कर. आपल्या कर्मानुसार जें प्राप्त होईल तितक्यांत समाधान मान. धन हें अनर्थकारक आहे, हें मनांत नित्य वागीव. खरोखरच, तुला त्यापासून लेशभरहि सुख नाहीं. फार काय ? श्रीमंतास आपल्या पुत्रापासूनहि भीति आहे, व सर्वजण हेंच सांगत आले आहेत.

नंतर उपक्रमाप्रमाणें उपसंहार करून बोवांनीं आपलें कीर्तन आटोपलें व आरतीला सुरवात होऊन बोवांच्या भोंवतीं एकच गर्दी उडाली. सर्वजण टाळ्या वाजवीत उठून उभे राहिले. मी उठून बोवांना प्रदक्षिणा घालून आरतीच्या ताह्मनांत कांहीं टाकून परत आपल्या जागेवर आलों; इतक्यांत एकजण जवळ येऊन मला ह्मणाला कीं, 'डॉक्टरसाहेब, 'कथा ऐकावयाला आल्यापैकीं एक बाई घाबरल्यासारखें करीत आहे. आपण येऊन पहाल तर बरें होईल.'

मी झटकन् त्या गृहस्थाचे मागोमाग गेलों व पहातों तो मैनाबाई ऊर्फ सीताबाई बेशुद्ध पडलेली होती !

---

## प्रकरण एकोणचाळिसावें

# कांहीं संस्मरणीय गोष्टी

**सुटलासी दीन अनाथा। धरलेंसी मृत्यूपंथा; शेवटीं ॥**

—दत्तात्रय कोंडो घाटे.

गुरुवर्य परशुरामपंत वैद्य मास्तर साहेब सीताबाईच्या डोळ्यांना पाणी लावून तिला शुद्धीवर आणण्याचा यत्न करीत होते; त्यांनीं मला पहातांच त्या बाईचा थोडासा इतिहास सांगितला. तिच्या अंगांत जीर्णज्वर होता तरी हरीकीर्तन ऐकण्याच्या हेतूनें ती नदीच्या पलीकडून चालत चालत आली, पण कथा चालू असतांना अशक्ततेमुळें तिला बसवेना, ह्मणून कांहीं बायकांनीं तिला करकोटेश्वर महादेवाच्या ओट्यावर निजविलें. ( हा महादेव ८४ लिंगांपैकीं दहावा असून हा हरसिद्धीच्या आवारांत आहे. ) तेथें ती अशक्ततेमुळें अगदीं निश्चेष्ट पडली. परशुरामपंत मास्तर साहेबांच्या प्रयत्नानें ती शुद्धीवर आल्यावर त्यांनीं तिला प्रवाळभस्म दिलें. त्यायोगानें तिला जरा हुषारी आल्यावर

तिला तिच्या घरापर्यंत पोंहचविण्याचें मी पतकरिलें तेव्हां मास्तरसाहेब घरीं जाण्याला निघाले.

सीताबाईला तिच्या घरापावेतों पोंहचविण्याची संधी मला प्राप्त झाली याबद्दल मला मोठा आनंद झाला.

**“ जे कां रंजले गांजले । त्यांसि ह्मणे जो आपुलें ॥ ”**

ह्या कोटींतल्या ज्या विभूति आजपर्यंत होऊन गेल्या त्यांपैकींच सीताबाई ही एक होय असें माझें मत होत चाललें होतें. ती मोठी विदुषी होती असें नाहीं. तथापि सद्वासना, सच्छील, आणि सदाचरण या त्रयीच्या जोरावर हिरालाल, भैरूसिंग, ठाकुरसिंग वगैरे तिच्या एका प्रकारच्या शत्रूंना देखील तिनें गप्प बसविलें होतें. त्यांच्या दुष्ट स्वभावाची यथार्थ कल्पना होईपर्यंत ती स्त्रीस्वभावानुसार त्यांच्या सांगण्याप्रमाणें वागे. तिची पालनकर्ती आई तिला हिरालालाच्या स्वाधीन करून निवर्तली होती, म्हणूनच केवळ ती हिरालालाच्या देखरेखीखालीं राही. तथापि त्याच्या साथीदारांनीं केवळ दुष्ट हेतूनें तिच्या मानलेल्या भावाचा प्राण घेऊन, तिला छळलेल्या दिवसापासून तिनें त्या चांडाळ चौकडीशीं बोलणें वर्ज्य केलें. ती अबला, निःसहाय्य असल्यामुळें तिला एकटें राहतां येईना; म्हणूनच ती हिरालालच्या देखरेखींखालीं राही, पण दत्ताच्या आखाड्यांतल्या उदासी साधूच्या प्रत्यक्ष देखरेखीखालीं रहाण्यांत आपणांस जास्त स्वतंत्रता व सुख आहे असें तिच्या लक्षांत येतांच ती दत्ताच्या आखाड्यांत येऊन राहिली. तेथील साधु जें काम सांगतील तें करावें व तेथेंच ईश्वराचें नामस्मरण करीत पडावें असा तिचा नित्यक्रम सुरू झाला होता. तेथें तिची समाधानवृत्ति, शांत चित्त, ईश्वरभक्ति, ध्यान, पूजन, अर्चन वगैरे पाहून तेथल्या साधूंनीं तिला प्रत्यक्ष मुलीप्रमाणें वागविली. कण्व-

ऋषींच्या आश्रमांतील शकुंतलेप्रमाणें ती सर्वांना प्रिय झाली, पण तिला त्या सर्वांपासून खरा आनंद वाटेना. ती दिवसानुदिवस क्षीण होत चालली. गरीब बिचारी ! ती उपजल्याबरोबर तिच्या दुःखांना प्रारंभ झाला. दरिद्री मुलांना निदान आईबापांच्या सहवासाचें तरी सुख असतें; पण विधात्यानें मैनाबाईच्या नशीबीं तेंहि लिहिलेलें नव्हतें. बाळपणीं आईबाप निवर्तले, व त्यामुळें जो पोरकेपणा आला, त्यांत लहानपणीं लग्न झाल्यानंतर तरी कांहीं सुख मिळावें, पण दुर्दैवानें सासरचें वाटोळें झालें, सासूचें वर्तन एखाद्या डाकिणीलाहि लाजवील इतकें कठोर झालें; बरें पालनकर्ती आई तीहि मेली, हिरालालप्रभृति दुष्ट धनलोभ्यांची गांठ पडली व ज्याच्यावर ती जीव ठेऊन होती तो तिचा मानलेला भाऊ रामलाल, अत्यंत क्रूरपणानें मारला गेला, त्यामुळें तिच्या चित्तांत जो उदासीनपणा शिरला त्यानें कायमचेंच बिऱ्हाड केलें. शरीरानें अशक्त, मनानें उदासीन व सांपत्तिकदृष्ट्या निर्धन असल्यामुळें तिचे खाण्यापिण्याचे हाल होत असत, त्यामुळें ती दिवसानुदिवस खंगत चालली होती.

मी सीताबाईला घेऊन दत्ताच्या आखाड्यांत पोचलों तेव्हां मध्यरात्र उलटून गेली होती. चांदणें स्वच्छ पडलें होतें. आम्हीं आखाड्यांत पोचलों त्यावेळीं कांहीं साधू जागे होते. हरसिद्धीच्या मंदिरांतून निघाल्यावर मी इकडल्या तिकडल्या गोष्टी बोलून आखाड्यापर्यंतचा रस्ता सुधारला होता. पण सीताबाईची सर्व व्यवस्था नीट लागून ती आपल्या अंथरुणांवर निजल्यानंतर मी तेथल्या साधूंना हरसिद्धीच्या मंदिरांत ती बेशुद्ध होऊन पडल्याची गोष्ट सांगून तिची प्रकृति किती क्षीण झाली आहे तें सांगत बसलों. तेव्हां अर्थातच तिच्या संबंधानें पुढें काय करावयाचें त्याची वाटाघाट सुरू झाली. जवाशिया

येथें तिचा चुलता साधु कृष्णसिंह हा रहात असे ही गोष्ट त्यांपैकीं कोणासच माहीत नव्हती. ती त्यांना सांगितल्यावर त्यांस आनंद वाटला व नंतर सर्वांच्या सल्लयानें असें ठरलें कीं साधू कृष्णसिंह यांस अगोदर भेटून, त्यांस सीताबाईच्या प्रकृतीसंबंधानें सर्व हकीकत कळवावी व त्यांच्या सल्लयानें सीताबाईला त्यांचे जवळ ठेवण्याची व्यवस्था करावी. त्या योगानें दोन गोष्टी साधतील. हवा, पाणी व एकंदर परिस्थिती बदलल्यामुळें शरीरावर व मनावर चांगला परिणाम होऊन त्यायोगानें प्रकृति सुधारण्यास मदत होईल व अगदीं जवळचा आप्त भेटल्यामुळें त्याच्या सहवासापासून सीताबाईला जास्त मोकळेपणा वाटेल. हें सर्व ठरवीपर्यंत बराच वेळ गेला. पहांटेची वेळ झाल्यामुळें सर्व साधु उठले होते. त्यांपैकीं ज्यांना विचारणें अगदीं जरूर होतें त्यांस विचारतां त्यांचेंहि मत आम्हांला अनुकूल असें मिळालें. सीताबाई जागी झाल्यावर तिला आम्हीं आमचा विचार कळविला, व तिनेंहि नीट विचार करून शेवटीं आमच्या म्हणण्याला अनुमति दिली.

जवाशिया येथें जाऊन साधु कृष्णसिंह यांस सर्व हकीकत सांगून त्यांच्या परवानगीनें सीताबाईला त्यांचेकडे नेऊन पोंचविणें हें महत्वाचें काम आतां मजकडे आलें. तें लवकर करणें जरूर होतें, म्हणून मी दत्ताच्या आखाड्यांतील सर्व मंडळींचा निरोप घेऊन घरीं आलों व स्नानसंध्यादिक नित्यकर्मे आटोपून जवाशियाकडे जाण्याला निघालों. मी निघालो तो हरसिद्धी देवीच्या मागच्या बाजूच्या रस्त्यानें रेलवे पुलावरून शिप्रा नदी ओलांडून जावें या विचारानें चाललो होतों. शिप्रानदीच्या किनाऱ्याजवळ व रेलवेपुलापासून जवळच एक विस्तीर्ण आंबराई आहे त्याठिकाणीं नेहमीं पुष्कळ साधुसंत उतरतात. सिंहस्थासारख्या प्रसंगीं तर तेथें साधूंची पुष्कळच गर्दी असते. त्या

आंबराईखालीं एक साधू बसलेले मला आढळले. त्यांच्या समोर कांहीं मंडळी बसली होतीं. मी त्यांस लांबूनच पाहून तसा पुढें आपल्या कामाला जाणार होतों इतक्यांत उज्जयिनीचे एक लोकप्रिय वकील आतां कै. राजश्री सच्चिदानंद व त्यांचे पूज्य वडील हेहि तेथें बसलेले मला दिसले. मला पहातांच सच्चिदानंदानीं मला हांक मारली तेव्हां कोण साधू बसलेले आहेत त्यांस नमस्कार करून मग पुढें जावें असा विचार करून मी ती सर्व मंडळी बसली होती त्यांजकडे गेलों व साधूंना नमस्कार करून सच्चिदानंद वकील व त्यांचे वडील बसले होते त्यांजजवळ जाऊन बसलों. तेथें बसून पाहतों तों तेथें बसलेल्या मंडळीमध्यें हिरालाल, भैरूसिंग, ठाकुरसिंग व इतर त्यांची मंडळी होती. त्यांची व माझी चांगली दृष्टादृष्ट झाली. मी नंतर सच्चिदानंद वकीलसाहेबांना त्या साधूंच्या बद्दलची माहिती विचारली. तेव्हां मला असें कळलें कीं त्या साधूचें नांव श्रीसरस्वतीनंदन महाराज असें असून ते एक लोकोत्तर सिद्ध पुरुष आहेत. योगाभ्यासानें त्यांना अनेक सिद्धी प्राप्त झाल्या आहेत. ते आपल्या सिद्धींचा गाजावाजा करीत नाहींत. तथापि आकाशगमन, परकायाप्रवेश वगैरे चमत्कारहि त्यानीं केल्याचें सांगतात. ते ब्रह्मचारी आहेत. त्यांना सहा महिन्यापर्यंतचा कुंभक सिद्ध झाला आहे. त्यांनीं श्रीमत् भागवतावर एक टीका लिहिली आहे व ती मुंबईच्या श्री व्यंकटेश्वर छापखान्यांत छापून खेमराज श्रीकृष्णदास यांनीं प्रसिद्ध केली आहे. शिवाय त्यांनीं अनेक स्तोत्रेंहि केलीं आहेत. ते थोर विद्वान् आहेत. बहुधा श्रीमहाशिवरात्रीस उज्जयिनीस त्यांचें दर्शन होतें. त्यांचा एरवींचा ठिकाणा ते गुप्त ठेवतात.

सच्चिदानंदांनीं मला ती हकीकत सांगितल्यामुळें मला त्या साधूंच्या संबंधानें मोठा आदर उत्पन्न झाला व मी बराच वेळ त्यांजपाशीं

बसलों. प्रपंच व परमार्थ यांचें विवेचन चाललें होतें. तें उत्तम होतें, पण मला बऱ्याच अंतरावर जावयाचें होतें, तेव्हां जवाशियाहून परत येतांना येथें क्षणभर टेकून मग घरीं जाऊं अशा इराद्यानें, मी सच्चिदानंदांचा निरोप घेतला, साधूंना नमस्कार घातला व मार्गस्थ झालो. हिरालाल व त्याचे सर्व साथीदार त्या साधूंच्या आसपास बसलेले पाहून मला विस्मय वाटला होता. त्या नंतर तर्कानें मला असें वाटलें कीं भीमसिंग राजपुत्रानें ठेवलेल्या धनाचा अद्यापपर्यंत थांग न लागल्यामुळें ती मंडळी आतां साधुसंतांच्या मागें लागून कांहीं आशिर्वाद किंवा सिद्धी मिळविण्याच्या प्रयत्नाला लागलेली असावींत.

मी चिंतामण गणेशाच्या मंदिराकडे जातांना भीमसिंगानें स्थापन केलेल्या चौथऱ्यावरच्या पाषाणेश्वरांचें दर्शन घ्यावयास विसरलों नाहीं. त्यांची नित्याप्रमाणें सकाळीं पूजा झालेली होती. फुलें अगदीं ताजीतवानी दिसत होतीं, नेवेद्याच्या गुळावर मुंगळ्यांचा व मुंग्यांचा हल्ला चालू होता. अंतकाल समीप आलेल्या त्या चौथऱ्याकडे व पाषाणेश्वरांकडे पहात पहात मी चिंतामण गणेशाचे मंदिरांत गेलों व

**प्रणम्य शिरसा देवं गौरीपुत्रं विनायकं ।**

जवाशिया येथें कृष्णसिंह साधूंना जाऊन भेटलो.

साधू कृष्णसिंह आश्रमांत एकटेच बसलेले होते. मी गेल्यावर त्यांनीं माझें स्वागत करून एक दर्भासन बसावयास दिलें. मी माझा त्यांना भेटण्याचा उद्देश कळविला व सीताबाईचीहि संमति असल्याचें कळविलें तेव्हां त्यांनीं मोठ्या संतोषानें सीताबाईची योग्य व्यवस्था करण्याचें आश्वासन देऊन तिला शक्य तितक्या लवकर त्यांचे आश्रमांत घेऊन येण्यास सांगितलें व मला उज्जयिनीकडे परत जाण्यास सांगून आपण सीताबाई आश्रमांत आल्यावर तिला ज्या ज्या पदार्थांची आवश्यकता भासेल त्या त्या वस्तु आणण्यासाठीं ते आश्रमाबाहेर पडले.

# प्रकरण चाळिसावें

## प्राचीन इतिहास

**कः स्नेहः ? सद्भावः ।**

मी परत येतांना श्रीसरस्वतीनंदन महाराजांचें दर्शन घेण्यासाठीं आंबराईकडे गेलों. पण तेथें कोणी चिटपांखरूंहि नव्हतें. तेव्हां सखेदाश्चर्यानें मी घरीं गेलों. नंतर भोजनोत्तर उज्जयिनीमधील एक महाजन जयरामदास सनईराम यांच्याकडे जाऊन व त्यांच्या परवानगीनें त्यांची मोठी बैलगाडी—धमनी—जोडवून मी दत्ताच्या आखाड्याकडे गेलो. विष्णूशर्मा घरीं होता त्यालाहि मजबरोबर घेतलें. नंतर दत्ताच्या आखाड्यांत जाऊन तेथल्या साधूंना सर्व हकीकत सांगितल्यावर त्यांनीं मोठ्या जड अंतःकरणानें सीताबाईला जाण्यास परवानगी दिली. सीताबाई गाडींत बसल्यावर गाडी हळूंहळू चालू लागली तेव्हां तिला पोहोंचविण्यासाठीं दत्ताच्या आखाड्यांतले पुष्कळ साधू तिच्या गाडीमागून चालले होते. सर्वांच्या चेहेऱ्यावर दुःखाची छाया दिसत होती. सीताबाईनें आपल्या गुणांनीं त्या सर्व साधूसंतांची अत्यंत प्रीती संपादिली होती, त्या कारणानें ती कायमची दुसरीकडे जाणार ह्मणून त्यांस फार वाईट वाटलें. तो देखावा पाहून मलाहि गहिंवरून आलें. “ सुमंत्र प्रधानानें रथ आणविला. त्यांत बसून राम, लक्ष्मण व सीता हीं वनास निघालीं. रामावर सर्व जनांची अत्यंत प्रीती होती. या कारणानें सर्व लोकांस राम वनवासास जाणार म्हणून फार वाईट वाटलें. राम रथांत बसून निघाल्याबरोबर सर्व नगरांतील स्त्रीपुरुष त्यांचेबरोबरच नगराबाहेर पडले.”

**रुदिताश्रुपरिद्यूनं हाहाकृतमचेतनम् ।**
**प्रयाणे राघवस्यासीत् पुरं परमपीडितम् ॥**

असें रामचंद्राच्या वनगमनाचें वर्णन महाकवी वाल्मीकि ऋषींनीं केलें आहे त्याची मला आठवण झाली. व कण्वऋषींच्या आश्रमांतून दुष्यंताच्या घरीं निघणाऱ्या शकुंतलेचीहि आठवण झाली. कण्वासारखे पवित्र व पोक्त ऋषी सीताबाईला पोंहोंचविण्यास निघाले होते, तेव्हां त्याच ऋषीप्रमाणें त्यांनाहि वाटत असल्यास त्यांत आश्चर्य तें कोणतें ? कन्याविरहासंबंधाचें उत्तम वर्णन कालिदासानें केलें आहे. तें असें.

**यास्यत्यद्य शकुंतलेति हृदयं संस्पृष्टमुत्कंठया**
**कंठःस्तंभितबाष्पवृत्तिकलुषश्चिंताजडं दर्शनम् ।**
**वैक्लव्यं मम तावदीदृशमपि स्नेहादरण्यौकसः ।**
**पीड्यते गृहिणः कथं नु तनया विश्लेषदुःखैर्नवैः ***

दत्ताचा अखाडा दृष्टीआड झाल्यानंतर सीताबाईनें गाडी थांबविली व त्या पोहोंचविण्यास आलेल्या सर्व साधूसंतांना नमस्कार करून त्यांस परत फिरण्यास आग्रह केला. तेव्हां चार साधूंच्या खेरीज बाकी सर्व परतले. प्रकृति बरी झाल्यावर भेटावयास येण्यासाठीं मोठ्या प्रेमपुरःसर सांगून त्यांनीं सीताबाईचा निरोप घेतला. गाडी नंतर चालू झाली. गाडीमागून ते चार साधू, विष्णुशर्मा व मी असे बोलत बोलत चाललों होतों. हळूहळूं उज्जयिनीच्या सर्व खाणाखुणा अदृश्य होऊन आम्हीं प्रियकारण्यांत आलों; चिंतामण गणेशाचें मंदिर

---

राग जोगी, असावरी, ताल धुमाळी.

*** जाते कीं मम शकुंतला ही. आजचि पतिसदना ।**
**उत्कंठेनें काळिज तुटतें, हुरहुर लागे मना ॥ धृ० ॥**
**गहिंवर दाटे कंठिं कसा ये बाष्पपूर नयनां ।**
**चिंतेनें जड दृष्टी झाल्या कांहींच वदवेना ॥**
**मी वनवासी, स्नेहि हिचा पण वियोग साहवेना ।**
**न कळे कैसे गृहस्थ सोसिति कन्याविरहांना ॥ १ ॥**

—अण्णा किर्लोस्कर.

दिसूं लागलें; श्रीगणपतीला रस्त्यावरूनच नमस्कार करून आम्हीं निघालों तों सूर्यास्ताच्या सुमाराला जवाशिया येथें पोचलों.

कृष्णसिंह साधूच्या आश्रमाजवळ आम्हीं पोहोंचतों तों काय गंमत सांगावी! जवाशिया गांवचीं बहुतेक स्त्रीपुरुषें व मुलेंबाळें साधू महाराजांच्या कन्येचें प्रेमपुरःसर स्वागत करण्यासाठीं उभी होतीं. आश्रमाच्या द्वारापाशीं सीताबाईवरून निंबलोण उतरून टाकण्यासाठीं खेड्यांतल्या स्त्रिया व मुली जमल्या असून त्याच्यापासून थोड्याच अंतरावर लहान मोठे पुरुष बसले होते. तो देखावा इतका हृदयंगम होता कीं कांहीं सांगावयाची सोय नाहीं. मोठमोठ्या सुप्रसिद्ध लोकनायकांचे स्वागतसमारंभ पहाण्याचें भाग्य या लेखकाला लाधलेलें आहे, पण त्यावेळींहि सीताबाईचा स्वागतसमारंभ पाहून माझा हृदयसागर आनंदानें जसा उचंबळला तसा उसळला नसेल असें वाटतें. गुढ्या नव्हत्या, तोरणें नव्हतीं, ‘ स्वागतम्, सुस्वागतम्,’ अशीं वचनें कोठेंहि लिहिलेलीं नव्हतीं, गाड्या, घोडीं, मोटारी, स्वयंसेवक, यांपैकीं कांहीं कांहीं नव्हतें, इतकेंच नव्हे, पण त्या पौरजनांपैकीं कोणीहि सीताबाईला पाहिलें नव्हतें—नव्हे तिचें नांवहि त्यांनीं कधीं ऐकिलें नव्हतें; पण त्या साधूची कन्या—अर्थात् त्यांच्याप्रमाणेंच सात्त्विक, व पुण्यवान् असणार अशा दृढ समजुतीनेंच ते सीताबाईचा व पर्यायानें त्या साधूचा सन्मान करण्यासाठीं तेथें एकत्र झाले होते.

सीताबाई गाडींतून खालीं उतरल्यावर तिचें रीतीप्रमाणें स्वागत झालें. साधू कृष्णसिंह—तिचे चुलते—तर सजल नेत्रांनीं तिजकडे पाहूं लागले. सीताबाईनें त्यांना नमस्कार केला तेव्हां तिच्या मस्तकावर हात ठेऊन त्यांनीं तिला दर्भासनावर बसण्यास सांगितलें. व आम्हां सर्वांस बसावयास सांगून मग आपण बसले. त्या दिवशीं कृष्णसिंहजींच्या

आग्रहावरून आम्हीं तेथेंच मुक्काम केला. दत्ताच्या आखाड्यांतून आलेले साधुजनहि रात्रीं तेथेंच राहिले. रात्रीं भोजनोत्तर सगळे साधु मोठ्या आनंदानें नाना प्रकारच्या विषयांवर बोलत बसले त्यांत उज्जयिनीच्या प्राचीन इतिहासाविषयीं चर्चा झाली. * त्यांत मला ठाऊक नसलेली

---

* हें हल्लींचें क्षेत्र उत्तर अक्षांश २३°/१०' व ग्रीनिचपासून पूर्व रेखांश ७५°/५२' या ठिकाणीं वसलेलें आहे. प्राचीन काळचें क्षेत्र येथून थोड्याशाच अंतरावर होतें. गडाची कालिका व भर्तृहरीची गुंफा म्हणून जो भाग हल्लींच्या शहराच्या उत्तरेकडे नदीच्या काठीं आसपास दाखविला जातो तेथें मूळची उज्जयिनी असावी. या शहराच्या बाजूनें वाहणारी क्षिप्रा नदी १२० मैल वाहत जाऊन सिपावर या गांवाजवळ चंबल नदीस मिळत आहे, या स्थानावरून तिला सिप्रा हें नांव मिळालें असावें. अत्यंत पुरातन कालापासून कालज्ञानज्योतिषाच्या अभ्यासाचें हें क्षेत्र केंद्र असावें. येथील महाज्योतिर्लिंगाचे स्थान अनादि आहे. या लिंगाला महाकाल हें नांव कालज्ञान या शब्दावरून किंवा त्या विषयाचे दर्शक असें मिळालें आहे. तैत्तिरीय ब्राह्मणांत "अवंती" हें एका देवतेचें नांव आहे. बौधायन सूत्रें, रामायण, महाभारत, यांत अवंतिकेचा उल्लेख आहे. अवंती हें मूळचें या देशाचें नांव होतें. अवंती या शब्दाचा अर्थ रक्षण करणारी असा आहे. या अवंती ऊर्फ मालव देशाची उज्जयिनी ही मुख्य राजधानी होय. पुढें अवंती व उज्जयिनी या दोन्ही नांवांनीं या क्षेत्राचा उल्लेख होऊं लागला. ही नगरी फार पुरातन कालापासून वैभवशाली म्हणून प्रसिद्ध आहे. मृच्छकटिक, कथासरित्सागर, मेघदूत, बाणभट्ट, कादंबरी, पंचसिद्धांतिका, बृहत्संहिता इत्यादि जगन्मान्य ग्रंथांची रचना येथेंच जाहली. उज्जयिनीचा प्राचीन इतिहास अतिशय मनोरंजक असला तरी फार गुंतागुंतीचा आहे. मौर्य, शुंग, मालव, शक इत्यादि निरनिराळ्या राजवंशांनीं या ठिकाणीं राज्य केलें. मालविकाग्निमित्र नाटकांतील कथाभाग येथलाच आहे. विक्रमानें विक्रम-शक सुरू केला. या विक्रमाचे राज्यांत विद्या, वित्त, विक्रम हे फार उत्कर्षास पावले होते. पुढें विक्रमसंवत् १३५ मध्यें पश्चिमेकडून अथवा दक्षिणेकडील पैठणाकडून येणाऱ्या शकांच्या दुसऱ्या टोळीनें मालववंशांतल्या शेवटच्या राजाचा पराभव करून आपलें राज्य स्थापिलें व आपले नांवाचा शक चालू केला. या राजांनीच बांधलेली वेधशाळा पुढें प्रख्यात ज्योतिषी

पुष्कळ माहिती होती. पतंजली ऋषींचा शिष्य ब्रह्मराक्षस यानें चंद्रगुप्त नांवाच्या एका कुमारास व्याकरणशास्त्र शिकविलें. चंद्रगुप्त गुरूपासून जें जें शिकत असे तें तें कोंवळ्या वडाच्या पानांवर नखांनीं लिहून ठेवी. अशा रीतीनें सर्व महाभाष्य लिहिलेलीं वडाचीं पानें एका फडक्यांत बांधून तो उज्जयिनीस चालला. वाटेनें जातांना उन्हाच्या तापानें त्याला त्रास झाला व फार तहान लागली. तेव्हां एका ओढ्याच्या कांठीं असलेल्या वृक्षाच्या सांवलींत तो विश्रांती घेण्यासाठीं बसला. नंतर स्नानसंध्यादि नित्यकर्में आटोपून व थोडेसें पाणी पिऊन त्या वृक्षाखालीं भाष्याची पोथी उशास घेऊन तो निजला. त्यास गाढ झोंप लागली असतां एक वासरूं तेथें आलें, त्यास तीं पानें खाण्याची इच्छा झाली, व त्यानें कांहीं पानें उपसून काढलीं. इतक्यांत चंद्रगुप्त जागा झाला. व वासराच्या तोंडांतून शक्य तितकीं पानें त्यानें ओढून काढलीं. पण कांहीं पानें वासरानें खाल्ल्यामुळें तीं मिळणें अशक्य होतें. आपल्या या हयगयीबद्दल चंद्रगुप्तास फार वाईट वाटलें; व आतां हरवलेला मजकूर कसा मिळवावा याचा विचार करीत तो खिन्न मनानें त्या ओढ्याच्या कांठीं बसून राहिला. अशा वेळीं एक शूद्राची मुलगी चंद्रगुप्तास नमस्कार करून म्हणाली—" महाराज, आपण फार

---

वराहमिहिर याचे निरीक्षणाखालीं होती. ज्योतिषांतील सर्व गणित हल्लीं शालिवाहन शकाच्या आधारानेंच होत असतें, व त्यांतील पहिला श्रीगणेशायनमः वराहमिहिरानेंच शक ४२७ मध्यें घालून दिला.

यानंतरच्या काळांत गुप्त, प्रतिहार, परमार, या वंशांनीं येथें राज्य केलें. तेराव्या शतकांत मुसलमानांची वक्रदृष्टि उज्जयिनीकडे वळली. इ. स. १७२० च्या सुमारास जयपूरचा राजा जयसिंह यानें हल्लीची वेधशाळा बांधली.

या नगरींत कालिदास, शूद्रक, हर्ष, भास हे कवि होऊन गेले. विक्रम, भोज, यांचे वेळच्या नवरत्नांच्या कविसंमेलनांचें हें माहेरघरच होतें.

**प्रि० गोविंद सदाशिव आपटे.**

थकलां आहां; तेव्हां हें मी आणलेलें लोणी कृपा करून खावें. हें मी तुह्मांस अर्पण करण्याकरितांच आणलें आहे. या वाटेनें जे जे तपस्वी अभीष्ट वर प्राप्त करून घेऊन गेले त्यांना त्यांना मी आजपर्यंत फळें देऊन संतुष्ट केलें. तेव्हां त्यांनीं मला असा आशिर्वाद दिला आहे कीं कोणी एक तरुण—पतंजलीचा शिष्य ब्रह्मराक्षस यांजकडून महाभाष्य शिकून जगांत त्याचा प्रसार करण्याकरितां या वाटेनें जाईल त्याची तूं सेवा कर. ह्मणजे तो प्रसन्न होऊन तुझ्याशीं लग्न लावील, तेंव्हां-पासून मी तुमचें ध्यान करीत राहिलें आहे. तुमच्या तेजस्वी मुख-चर्येवरून, तुम्हींच महाभाष्याचे ज्ञाते आहांत, याबद्दल संशय राहिला नाहीं.” इतकें बोलून ती स्तब्ध राहिली. नंतर चंद्रगुप्तानें समाधी लावून सर्व गोष्टींचा विचार केला. त्या मुलीनें सांगितलेली हकीकत खरी आहे अशी त्याची खात्री झाली तेव्हां तें लोणी भक्षण करून तो तिला ह्मणाला, “मी प्रथम तीन स्त्रिया करून येऊन नंतर तुज-बरोबर लग्न लावीन.” नंतर उज्जयिनीस जाऊन त्यानें प्रथम ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांच्या तीन बायका करून घेऊन नंतर त्या शूद्राच्या मुलीशीं लग्न केलें. नंतर त्यानें पुष्कळ विचार करून गुरूनें शिकविलेला मजकूर आठविण्याचा पराकाष्ठेचा प्रयत्न करून बहुतेक महाभाष्य पूर्ण केलें, तथापि जीं थोडीं शंकास्थानें राहिलीं तीं त्यानें कुंडलीचें चिन्ह ( ० ) करून लिहिलीं. हें महाभाष्य, चंद्रगुप्त अनेक विद्यार्थ्यांना आस्थापूर्वक शिकवीत असे. त्याला चौघी स्त्रियां-पासून चार मुलगे झाले. ते अनुक्रमें वररुचि, विक्रमादित्य, भट्टि आणि भर्तृहरि हे होत. पैकीं पहिले तिघे द्विजवर्णाचे मुलगे होत. ते योग्य वयाचे होतांच त्यांची मुंज करून त्यांना चारहि वेद व महा-भाष्य त्यानें शिकविलें.

नंतर शूद्र–स्त्री–पासून झालेला जो भर्तृहरि त्यास महाभाष्य शिकण्याची इच्छा झाली. तो शूद्र असल्यामुळें त्याचे भाऊ त्याला शिकण्याचे वेळीं जवळ बसूं देत नसत. तेव्हां तो एके दिवशीं रात्रीं बापाकडे एकांतीं जाऊन पायां पडून ह्मणाला, "बाबा! एखाद्या ठिकाणीं गुहेंत वगैरे माझी रहाण्याची सोय करून, तुम्हीं मला महाभाष्य शिकवा, ह्मणजे लोकांत बोभाटा न होतां माझी इच्छा पूर्ण होईल." मुलाची उत्कट इच्छा पाहून बापानें त्यास महाभाष्य शिकविलें. नंतर चंद्रगुप्त संन्यासाश्रम स्वीकारून काशीयात्रेस गेला. चौघां मुलांपैकीं पहिला वररुचि. यानें गणितशास्त्रावर अनेक ग्रंथ लिहिले. दुसरा विक्रमादित्य उर्फ विक्रम. तो नाट्यशास्त्रांत प्रवीण असून राज्य चालवीत असे. राज्य चालविण्याकरितां त्यानें आपला भाऊ जो भट्टि त्यास मुख्य प्रधानाच्या जागेवर नेमलें होतें. नंतर विक्रम राज्यकारभाराविषयीं उदासीन झाल्यामुळें भट्टीच त्याच्या नांवानें राज्य चालवीत असे. अशा वेळीं भर्तृहरीनें आपल्या वडील भावाच्या नांवानें 'भट्टिकाव्य' नांवाचा व्याकरणशास्त्राच्या अध्ययनास अत्यंत उपयोगी असा ग्रन्थ केला. त्यांत दाशरथी रामाचें चरित्र सांगितलें आहे. याच भर्तृहरीनें 'शतकत्रय' रचिलें आहे.

नंतर महाभाष्याचे स्पष्टीकरणार्थ त्यानें 'वाक्यपदीय' नांवाचा विस्तृत ग्रन्थ लिहिला. तो अति उत्तम वठला; त्यामुळें त्यास गर्व होऊन तो म्हणाला

**"अहो भाष्यं, अहो भाष्यं। अहो वयम्, अहो वयम्! ॥**
**मामदृष्ट्वा गतः स्वर्गं। अकृतार्थ पतंजलिः ॥"**

**अर्थः**—काय हें भाष्य, आणि काय पण अस्मादिकांची स्वारी! मला न पहातां पतञ्जलि स्वर्गवासी झाला, हें बिचाऱ्याचें दुर्दैवच ह्मणावयाचें!

• हें गर्विष्ठपणाचें भाषण ऐकून त्याचा ग्रंथ अध्ययनास घ्यावयाचा नाहीं असा तत्कालीन विद्वानांनीं ठराव केला, यामुळें तो ग्रंथ आज सांपडत नाहीं.*

अष्टाध्यायीवर भट्टोजी दीक्षित नांवाच्या ब्राह्मणानें 'सिद्धांतकौमुदी' नांवाची सुंदर टीका लिहिली; ती सध्यां प्रचारांत आहे."

*　　*　　*　　*

दुसऱ्या दिवशीं पहाटें सर्व मंडळींचा निरोप घेऊन व कृष्णसिंहजी व सीताबाई यांस वारंवार भेटण्याचें वचन देऊन विष्णुशर्मा व मी उज्जयिनीस परत गेलों.

---

## प्रकरण एकेचाळिसावें

# साधूंचा उपदेश

**समानी व आकूतिः समाना हृदयानि वः ।**
**समानमस्तु वो मनो यथा वःसुसहासति ×**

ऋग्वेद. १०, १९१, ४.

मनकामनेश्वराच्या मंदिराकडे आम्हीं फार दिवसांत गेलों नव्हतों. नारायणराव बऱ्याच दिवसांनीं परगांवाहून आले होते व ते आतां

---

* भर्तृहरि यानें बौद्धधर्म स्वीकारला होता असें कित्येक ग्रंथांत लिहिलेलें आढळतें. ई. स. च्या ७ व्या शतकाचे शेवटीं बौद्धधर्मी चिनी यात्रेकरी इत्सिंग हा हिंदुस्थानांत आला होता. त्यानें भर्तृहरि हा बौद्ध होता असें ह्मटलें आहे. प्रसिद्ध विद्वान् ग्रंथकार वाचस्पतिमिश्र ह्यांनीं आपल्या 'तत्वबिंदु' नांवाच्या ग्रंथांत भर्तृहरीस बाह्य ( धर्मबाह्य, बौद्ध ) असें ह्मटलें आहे.

बाणभट्ट—**पां. गो. शा. पारखी.**

× हा मंत्र ऋग्वेद संहितेच्या शेवटीं आलेला आहे. यज्ञमंडपांत जमलेल्या लोकांस उद्देशून हें भाषण आहे. "तुमचा अभिप्राय एकसारखा, तुमचीं अंतःकरणें एकसारखीं व तुमचें मन एकसारखें असो; जेणें करून तुमचें सुसाह्य ह्मणजे संघशक्तीची बळकटी होईल."　**—गीता रहस्य.**

कांहीं महिने उज्जयिनीसच मुक्काम करणार होते. तेव्हां ते आल्यावर त्यांना आम्हीं त्यांच्या पश्चात घडलेली सर्व हकीकत कळविली.

एके दिवशीं पुरुषोत्तम, नारायणराव, विष्णुशर्मा व मी असे चवघे-जण मनकामनेश्वराचे दर्शनास निघालों. विष्णूला अलीकडे एकेरी नावानें हाका न मारितां आम्ही विष्णुशर्मा असें ह्मणत असूं. आमचा वाटेनें बोलण्याचा विषय ठरलेलाच होता. आम्हीं मनकामनेश्वराचें दर्शन प्रथम घेऊन नंतर विजयासिंहाच्या वाड्याकडे आलों, पण तेथें आतां कांहीं वेगळाच प्रकार घडून आल्याचे आह्मांला दिसलें. सुरुंग लावून सबंध घरच्या घर पाडलेलें असून जिकडे तिकडे माती, चुना, विटा व दगड यांचे ढिगारेच्या ढिगारे पडलेले होते. घराजवळ असलेल्या महादेवाच्या ओट्याचा कांहीं मागमूस सुद्धां उरूं दिला नव्हता. अमुक ठिकाणीं अमुक होतें अशी खूण देखील उरलेली नव्हती.

हिरालाल, भैरूसिंग, ठाकुरसिंग प्रभृति मंडळींचें तें कृत्य होय याविषयीं तर कांहीं शंकाच नव्हती. तथापि त्यांनीं केलेला तो विध्वंस पाहून त्यांचा राग येण्याचे ऐवजीं आम्हांला त्यांच्या त्या निष्फळ प्रयत्नाचें हसूं आलें. द्रव्याबद्दल जेथें जेथें ह्मणून प्रयत्न करून पहा-वयाचे होते ते ते सर्व करून आतां हताश होऊन ते स्वस्थ बसले. आतां तरी निदान त्यांच्यापासून आपणांला उपद्रव होण्याची भीति नाहीं असें आह्मांला वाटलें, आणि हें समाधान काय थोडें होतें ?

विजयसिंगाच्या नामशेष झालेल्या घराची ती धूळधाण झालेली पाहून आम्हीं दत्ताच्या आखाड्याकडे जावयास निघालों. तेथल्या साधूलोकांची सीताबाईच्या संबंधानें आमची थोडी ओळख झाली होती, तेव्हां त्यांना भेटून मग घरीं परतावें असा आमचा विचार ठरला होता.

दत्ताच्या आखाड्यांत त्या दिवशीं पुष्कळसे साधूसंत एकत्र झालेले दिसले. तेव्हां साहजिकच त्यांचें काय संभाषण चालतें तें ऐकावें या इच्छेनें आम्हीं त्यांच्या समुदायांत जाऊन बसलों.

त्या दिवशीं सुमारें २०० साधूंचा समाज तेथें जमला होता. आम्हीं जाऊन बसल्यावर घटकाभरानें सभेच्या कामाला सुरवात झाली. वडाच्या झाडाखालीं ओट्यावर एक मृगासन आंथरलें असून तें रिकामेंच होतें. कामाला सुरवात होण्याचे सुमारास पुष्कळशा साधूंनीं आग्रह केल्यावरून त्यांच्यामधून एक वयोवृद्ध साधु उठले व ओट्यावरच्या मृगासनावर जाऊन बसले. चिंतामण गणेशाच्या रस्त्याला आंबराईखालीं मी त्या सत्पुरुषाला एकदां पाहिलें होतें. तेव्हां ते उज्जयिनींत फार क्वचित दिसणारे सरस्वतीनंदनमहाराज म्हणून मी लागलीच ओळखलें. सच्चिदानंद वकिलांनीं त्यांच्या महानुभावत्वाबद्दल मला सांगितलें होतें व त्यांच्यापाशीं हात जोडून हिरालाल, भैरूसिंग प्रभृति मंडळी त्या दिवशीं बसलेली होती तेव्हां आतां त्यांचें काय भाषण होतें व ते काय सांगतात तें ऐकण्याचा अनायासें प्रसंग आल्याबद्दल मला मौज वाटली.

त्या दिवशीं कांहीं साधूंच्या अपराधांबद्दलचा विचार करावयाचा होता. साधुसंघांत जर अशा कांहीं भानगडी उपस्थित झाल्या तर त्या बहुधां आपसांतच मिटविल्या जातात, शक्य तोंपर्यंत साधुलोक न्यायकचेरींत जाऊन न्याय मागत नाहींत. काम सुरू झाल्यावर चार साधुलोकांना अध्यक्षांच्या जवळ ओट्यावर बसविण्यांत आले. ते सर्व आरोपी होते. हे चारहि साधु बरेच दिवस अ-साधुवृत्तीनें वागत असल्याचें शाबीत झालें होतें. ते मादक पदार्थांचें—मद्याचें—सेवन करीत, त्यामुळें आपण ब्रह्मचारी आहोंत ही गोष्ट त्यांनीं लक्ष्यांतच बाळगली नव्हती. ते चवघेहि निरक्षर होते, व ह्यामुळें खाणें, पिणें, व

चैन करणें हेंच त्यांचें कर्तव्य होऊन बसलें होतें. तथापि अजून त्यांनीं माणूसपणा सोडला नव्हता त्यामुळें त्यांच्या जमातींतून त्यांना बोलावणें जातांच ते मुकाट्यानें येऊन दाखल झाले. साधूसंतांच्या जमातींत जरी निरनिराळ्या वर्णांचे व भिन्नभिन्न जातींचे लोक असतात तरी प्रत्ये- कानें ऐकदा एकां महंताचे अनुयायी झाल्यावर त्यानें घालून दिलेल्या नियमानुसार वागणें अगदीं अपरिहार्य असतें.

त्या साधूंच्या संबंधीं जें कांहीं कोणास सांगावयाचें होतें तें सांगून झाल्यावर त्यांना काय शिक्षा द्यावी त्याची चर्चा झाली. शेवटीं न्याय देण्याचा अधिकार श्रीसरस्वतीनंदन महाराज यांचा होता. त्यांनीं सर्व- जणांचें ( फिर्यादी व आरोपी ) ह्मणणें शांतपणें ऐकून घेतलें. या साधुलोकांत शिक्षा देण्याचे वेगवेगळे प्रकार आहेत. जमातीशीं कायमचा संबंध तोडणें अगर कांहीं दिवसांकरितां सोडणें, भेरी, तुतारी, शंख अगर शिंग कांहीं दिवस वाजविण्याची मनाई करणें, जटा काढून टाकविणें वगैरे पुष्कळ प्रकार असतात व असल्या शिक्षा त्यांच्या दृष्टीनें कडक समजल्या जातात; व असल्या शिक्षा मिळालेले आरोपी कोण हें साधूंच्या जमातींत--पुष्कळ निरनिराळ्या गांवीं देखील बहुतेक साधूंना ठाऊक असतें. त्यांचें एक स्वतंत्र टपालखातेंच असतें असें ह्मटलें तरी चालेल.

श्रीसरस्वतीनंदन महाराज काय निकाल सांगतात, इकडे सर्वांचें लक्ष लागलें. ते तपोवृद्ध, ज्ञानवृद्ध व वयोवृद्ध असे असून त्यांना सर्व साधुलोक अत्यंत मान देत असत. बराच वेळ विचार केल्यावर महा- राज बोलूं लागले, व त्यांचें भाषण सर्वत्रांनीं शांतपणें ऐकून घेतलें. वक्ता या शब्दानें ज्या गुणांचा बोध होतो त्यांपैकीं एकहि गुण महाराजांजवळ दिसला नाहीं. वक्तृत्वशास्त्रदृष्ट्या त्यांचें व्याख्यान तोलून पहाण्यासारखें नव्हतें, इतकें असूनहि त्यांनीं आपल्या भाषणानें

श्रोत्यांवर अलौकिक छाप बसविली. त्यांचें त्या दिवसाचें भाषण साधें, सोपें, स्वातंत्र्यपूर्ण, निस्पृहतेचें असून मोठें गोड व विनयपूर्ण होतें. त्यांच्या ह्मणण्याचा सारांश पुढें दिला आहे—

ते ह्मणाले—'सज्जन हो, भरतखंडाच्या सर्व भागांतून मी नुकतांच जाऊन आलों आहे, आणि माझ्या पहाण्यांत व ऐकण्यांत असें आलें आहे कीं समाजकल्याणाच्या दृष्टीनें आपल्या साधुवर्गाचें अस्तित्व नसल्यासारखेंच आहे. अज्ञानी लोकांना ज्ञानवान करणें, हें आपलें मुख्य कर्तव्य होय. कामक्रोधादि शत्रूंस ताब्यांत कसें घ्यावें, ऐषआरामाकडे असलेल्या प्रवृत्तींस आळा कसा घालावा, प्रापंचिकांचीं कर्तव्यें कोणतीं व तीं त्यांनीं कशीं करावींत, हल्लींच्या काळींहि त्यांचा पोषाख व खानपान कसें असावें, त्यांनीं आपलें मानसिक व शारीरिक श्रमांचें प्रमाण कसें कायम करावें, श्रमपरिहारार्थ त्यांनीं कोणता व्यायाम करावा व तो किती वेळ करावा, जनसेवा व समाजसेवा कोणती व कशा प्रकारें करावीं, असामान्य धैर्य, स्वार्थत्याग, कर्तव्यतत्परता, स्वाभिमान हीं आतां नाहींशीं होत चाललेलीं वीरत्वाचीं लक्षणें पुन्हां कशीं जागृत करावींत व भरतखंडाचें प्राचीन साम्राज्य व वैभव मिळवून तें कायमचें कसें राखावें हें सर्वांना आपण शिकविलें पाहिजे. सर्व देश उजाड झाला आहे, जिकडेतिकडे दुष्काळ, रोगराई व दारिद्य हिंडत आहेत. अधर्माचें साम्राज्य चोहोकडे पसरलें आहे. पूर्वींच्या राजधान्या व त्यांमधील संपत्ति हीं दोन्हीं नाहींशी झालीं आहेत. असाच क्रम चालल्यास हा देश कायमचा दरिद्री होईल अशी धास्ती वाटूं लागली आहे. ही उज्जयिनीच पहा. हल्लींच्या हिच्या भेसूर देखाव्याकडे पाहून ही प्राचीन काळीं अत्यंत ऐश्वर्यसंपन्न असे, असें कोणास वाटेल तरी काय ?'

# प्रकरण बेचाळिसावें

## राजधानी उज्जयिनी

**धन्य आमुचा मातृदेश हा कलिजा हिंदुस्थान।**

—दत्तात्रय गणेश जयवंत

श्री सरस्वतीनंदन महाराज पुढें ह्मणाले कीं संस्कृत भाषेंत बाणभट्ट कवीनें कादंबरी या नांवाचा एक सुंदर ग्रंथ लिहिला आहे. त्यांत तो ह्मणतो कीं—

अवंति देशांत उज्जयिनी नांवाची एक नगरी आहे. सर्व त्रैलोक्यांत अशी दुसरी नगरी नाहीं, इतकी ती उत्तम आहे. तिच्या सभोंवती मोठा खंदक आहे. त्रिभुवनाची उत्पत्ति, स्थिति आणि नाश करणाऱ्या महाकाल नामक शंकरानें आपल्याला रहाण्याकरितां दुसरी पृथ्वीच निर्माण केली आहे काय! असें समजून तिच्या सभोंवतीं हा गंभीर समुद्रच पसरला आहे काय असा त्या ठिकाणीं खंदक दिसत आहे. भगवान महाकाल येथें वास करीत असल्यामुळें त्याच्या सेवेकरितां उंच उंच शिखरांनीं विराजित असा कैलास पर्वतच येऊन तेथें राहिला आहे काय! असा त्या नगरी सभोवतीं कोट आहे. त्या नगरींत मोठ मोठे बाज़ार भरतात त्यांत शंख मोत्यें, पोंवळीं, पाचू इत्यादि रत्नांचें ढिगांचे ढीग लागलेले असतात. तेथील विस्तीर्ण बाजार दृष्टीस पडले ह्मणजे अगस्त्य ऋषीनें जलप्राशन केल्यामुळें कोरडे पडलेले हे समुद्रच आहेत काय असें वाटतें. त्या नगरींत पुष्कळ चित्रशाळा आहेत. त्यांत देव, दैत्य, सिद्ध, गंधर्व व विद्याधर यांचीं हुबेहूब चित्रें काढलेलीं आहेत. त्या मुळें ह्या नगरींत नेहमीं महोत्सव चालू असतो, तो पहाण्याकरितां स्वर्गांतूनच हे सर्व आले आहेत काय! असें वाटतें. तेथील देवालयांचे कळस सुवर्णाचे आहेत, व त्यांवर शुभ्र ध्वज उभारलेले

असून ते वायूच्या योगानें हालत असल्यामुळें ज्यावर गंगेचे प्रवाह चालले आहेत अशीं हीं हिमालयाचीं शिखरेंच आहेत काय ! असें भासतें. बगीच्यांत विहिरीजवळ चुनेगच्ची ओटे बांधलेले असून त्यां जवळ राहाट गाडगीं चालत असल्यामुळें झाडांच्या मुळाशीं पाणी खेळत असतें, त्यामुळें त्या नगरीच्या बाहेरचे प्रदेश सुशोभित दिसतात. घरोघरहि लहान लहान बगीचे आहेत, व त्यांवर भ्रमरांचे गुंजारव चालू असतात; पुष्पांतील सुगंध घेऊन वारा वाहत असतो. घंटांनीं व मत्स्यचिन्हांनीं युक्त अशा पताका उभारलेल्या असून त्या वाऱ्यानें उडत असतात, त्यामुळें देवांच्या सन्मानाकरितांच ह्या पताका उभारल्या आहेत काय ! असें दिसतें. त्या ठिकाणच्या जलमंदिरांत गानकाळीं मेघगर्जनेप्रमाणें मृदंग वाजत असल्यामुळें पर्जन्याप्रमाणें कारंजाचे फवारे उडत असल्यामुळें आणि फवाऱ्यांत सूर्यकिरण इंद्रधनुष्याप्रमाणें अनेक रंगी दिसत असल्यामुळें, पर्जन्यकालचा भास होऊन मोर आपले पिसारे पसरून शब्द करीत असतात ! तेथील सरोवरें हजारों कमलांनीं सुशोभित असल्यामुळें सहस्रनेत्र इंद्र जसा दिसतो तशीं तीं दिसतात. उदकावरील फेंसाप्रमाणें शुभ्र अशीं ठिकठिकाणीं मंदिरें असून तीं चोहींकडून केळीच्या मळ्यांनीं शोभायमान दिसतात. त्या उज्जयिनीनगरीस ठेंपूनच शिप्रा नदी वाहते. तिच्या प्रवाहांत उंच उंच लाटा मिसळतात, तेणें करून महाकालशंकराच्या मस्तकावर बसलेल्या गंगेस पाहून ईर्षेनें तरंगरूप भुवया वांकड्या करून आकाशापर्यंत ती उसळतेच आहे काय असें दिसतें ! त्या ठिकाणचे लोक मैनाकाप्रमाणें पक्षपातरहित, गंगेप्रमाणें सुवर्णपद्मयुक्त, शूर असून नम्र, मधुर भाषण करणारे असून सत्यप्रिय, परलोकाचें—स्वर्गाचें—भय बाळगणारे असून परलोकाचें—

शत्रूचें–भय बाळगणारे, वसंत वायुप्रमाणें दक्षिण–उदार, हिमालयाप्रमाणें अंतःसत्त्व, लक्ष्मणाप्रमाणें रामासक्त, शत्रुघ्नाप्रमाणें भरतयुक्त–नाट्याचार्य, दिवसाप्रमाणें सन्मित्र विराजित, सांख्यशास्त्राप्रमाणें प्रधान-पुरुषगुणयुक्त–प्रकृति, ईश्वर, सत्व, रज, तमोगुण असे होते. तशी ती नगरी गरुडाप्रमाणें अच्युतस्थितीभ्रष्ट न होणारी,–गौरीप्रमाणें सिंहासनयुक्त, अनुरक्तवर्ण–प्रेमानें युक्त असे वर्ण, ब्राह्मणादि–असून सुधाधवल, मुक्तालंकृत असून विहारभूमी–क्रीडाभुवन, अशी होती. त्याठिकाणीं वाड्यावरच्या उंच उंच मंदिरांत बसून गायन करणाऱ्या स्त्रियांच्या गायनास मोहित होऊन सूर्याच्या रथाचे घोडे खालीं ओढ घेताहेत असें दिसतें, व सूर्य दररोज महाकालेश्वरास नमस्कार करतोसें वाटतें. त्या नगरींतल्या माणकाच्या फरसबंदीवर सूर्याचे किरण पडले ह्मणजे संध्याकाळच्या लालीप्रमाणें ते दिसतात! ते पाचूच्या ओट्यावर पडतात तेव्हां कमलिनीशीं संगत झाल्यासारखे दिसतात! कृष्णागरु धूपावर पडतात तेव्हां अंधकाराचा नाश करण्याकरितां झटत आहेत काय असें दिसतात! मौक्तिकहारांवर पडल्यामुळें नक्षत्रमंडळाचा पराभव करीत आहेत काय? स्फटिकांच्या भिंतीवर पडल्यामुळें चंद्रिकेशीं संलग्न झाले आहेत काय? शुभ्र पताकांवर पडल्यामुळें भागीरथीच्या तरंगांत पोहतच आहेत काय? सूर्यकांतमण्यांवर पडल्यामुळें जसें काय त्यांस पल्लवयुक्तच करीत आहेत काय! इंद्रनीलमण्यांच्या खिडक्यांत शिरल्यामुळें राहूच्या मुखांतच शिरले आहेत काय? असे दिसतात. त्या नगरींत नेहमीं प्रकाश असल्यामुळें रात्रीं दिवे व्यर्थ लावले आहेत असें वाटतें! अत्युच्च देवालयाच्या शिखरांवरील स्वच्छ पताका आकाशांत वाऱ्यानें हालत असल्यामुळें त्या चंद्राचा कलंक झाडूनच टाकीत आहेत काय

असें भासतें ! ज्यानें आपल्या शूळानें अंधकासुराचें विदारण करून टाकलें, ज्यानें आपल्या मस्तकावर चंद्र धारण केला, ज्यानें मदनास जाळून भस्म केलें व ज्याच्या जटजूटांत गंगा भ्रांत होऊन फिरत राहिली, असा भगवान् महाकालेश्वर कैलासपर्वतावर रहाण्याचें सोडून ज्या ठिकाणी वास करीत आहे, तेथील महिमा किती सांगावा ?"*.

पूर्वींच्या व आतांच्या स्थितींत किती अंतर पडलें तें पहा. आपलें कर्तव्य करावयास जर आपण यावेळीं चुकलों तर आपला देश जास्त दरिद्री होईल, लोक अन्नपाण्याविणें तडफडून मरूं लागतील, त्या योगानें सनातन कुलधर्म नष्ट होतील व अधर्म माजेल. अधर्म माजला ह्मणजे आपल्या भारतकन्या बिघडतील व त्यामुळें वर्णसंकर होईल. हें सर्व लक्षांत घेऊन भरतखंडांत आपलें साम्राज्य स्थापन करा. ही उज्जयिनी समग्र भरतखंडाची राजधानी करण्याची प्रतिज्ञा करा. गांजा तंबाखू वगैरे व्यसनांत काळ घालवून पंचाग्निसाधन करण्याचें वाजूला ठेऊन उच्च हेतूनें प्रेरित व्हा. धैर्यानें संकटांस तोंड द्या. स्वार्थावर लाथ मारा. वीर व्हा.

---

## प्रकरण त्रेचाळिसावें

## केवळ स्वदेशासाठीं !

**उपार्जितानां वित्तानां त्याग एव हि रक्षणम् ।**

साधु महाराज पुढें ह्मणाले कीं, वीरत्व दाखविण्यास रणांगणाचीच जरूरी आहे असें नाहीं. दुःखाचे डोंगरच्या डोंगर कोसळले तरी ब्रीद न सोडणें, कोणी सोन्याच्या राशी ओतल्या तरी कर्तव्यापासून न ढळणें, प्राण जाण्याचा प्रसंग आला तरी निंद्य कर्म न करणें; दुर्बलांचें बलिष्ठां-

---

* कादंबरीसार, कै. पां. गो. शा. पारखीकृत.

पासून रक्षण करणें; अन्याय, जुलूम, अनीति, अधर्म ह्यांचा प्रतिकार करणें, समाजहिताकरितां किंवा देश हिताकरितां स्वार्थावर व प्राणांवर पाणी सोडणें, अशीं कृत्यें ज्यांच्या हातून होतात, ते सर्व वीरच होत. असे करा ह्मणजे आपल्या साधुलोकांविषयीं लोकांची जी अश्रद्धा होत चालली आहे ती नाहींशी होऊन आपणांविषयीं त्यांची पूज्यबुद्धि होईल. दाशरथी राम, भीष्माचार्य हे पौराणिक वीर व राणा प्रतापसिंह कृष्णाकुमारी, पन्नादाई वगैरे माणसें ह्यांच्या नामोच्चाराबरोबर मनांत आदर उत्पन्न होतो ह्याचे कारण हेंच होय. वचनभंगाचा दोष पित्यास लागूं नये ह्मणून रामचंद्रानें राज्यलक्ष्मीचा त्याग करून वनवासहि पत्करला. भीष्मानें बापाचें दुःख नाहींसें करण्याकरितां राज्यसुखाचा व गृहसुखाचाही त्याग केला. तसेंच मेवाडचा राणा प्रतापसिंह, दक्षिणचा राजा शिवाजी वगैरे विभूतींनीं देशहितार्थ अनेक विपत्ती व अनंत शारीरिक क्लेश सोशिले. कृष्णाकुमारी, पन्नादाई ह्या स्त्रिया खऱ्या, परंतु एकीनें स्वकुलरक्षणार्थ विषप्राशन केलें तर दुसरीनें स्वामिकार्याकरितां प्रत्यक्ष पोटचा मुलगा बळी दिला! अशा प्रकारें ह्या माणसांनीं स्वकर्तव्य करण्यांत स्वार्थाची व जीविताची ही उपेक्षा करून अलौकिक धैर्य दाखविलें म्हणून तीं "वीर विभूति" ह्या पदवीस प्राप्त झालीं आहेत.

स्वार्थत्याग ही वीरत्वाची खरी कसोटी आहे. ही कसोटी लावून पाहिली असतां पूर्वी राजस्थानांत प्रसिद्ध झालेले राणा हमीर व कुमार भीमसिंग व अलीकडे हिंदुस्थानांत सुप्रसिद्ध असलेले टिळक व गांधी यांचीं चरित्रें वीरत्वाचें बावनकशी सोनें आहे, असें आढळून येतें. राजस्थानावरचा जुलूम बंद व्हावा व मेवाड स्वतंत्र व्हावा ह्मणून हमीर राण्यानें स्वताचा जीव अनेक वार धोक्यांत घातला; बापाची इच्छा पूर्ण व्हावी

म्हणून गादीवरचा आपला हक्क कायमचा सोडून राजपुत्र भीमसिंग मेवाड सोडून उज्जयिनीस—येथें—येऊन राहिला. आपल्या लोकांचें दुःख नाहींसें व्हावें एतदर्थ व त्यांना पूर्वीप्रमाणें स्वातंत्र्यसुख मिळावें या इच्छेनें टिळक व गांधी आपलें सर्व आयुष्य वेंचीत आहेत व अनेक भयंकर संकटें निर्भयपणें सोशीत आहेत! केवढा हा लोकोत्तर स्वार्थत्याग!!

कांहीं वीर पुरुष देशाकरितां आपला देह ठेवण्यास तयार होतात तर कांहीं आपणास सत्य वाटतें तेंच प्रतिपादण्यांत आपलें आयुष्य वेंचितात. ह्या कामीं ते ऐश्वर्याला व संसाराला लाथ मारितात इतकेंच नाहीं तर आपल्या जिवाचीहि पर्वा करीत नाहींत! नवीन धर्माची ज्यांनीं स्थापना केली त्या थोर पुरुषांचीं चरित्रें ह्या प्रकारच्या गुणांनींच पूज्य झालीं आहेत. गौतमबुद्धानें आपली तरुण आणि सुशील भार्या, गोजिरवाणें मूल व राज्यवैभव ह्यांचा त्याग करून व आमरण भिक्षाव्रत स्वीकारून लोकांच्या कल्याणाकरितां नवीन धर्म प्रचलित केला.

भारतपुत्रांसाठीं भरतखंडाचें साम्राज्य स्थापन करून उज्जयिनी ही भरतखंडाची राजधानी करणें या गोष्टी सोप्या नाहींत. तेविसशें वर्षांपूर्वीं मगधदेशांत राज्य करणाऱ्या नन्दकुलाचा उत्खात एका निष्कांचन ब्राह्मणानें आपल्या पुरुषार्थानें केला व नंतर पाटलीपुत्राच्या गादीवर आपल्या शिष्याची—चंद्रगुप्ताची—स्थापना करून तो ब्राह्मण—आर्य चाणक्य—तपश्चर्येला निघून गेला. आज आपणाला आर्य चाणक्यासारखीं माणसें—पुरुषार्थ संपादन करणारीं माणसें—तयार करावयाचीं आहेत. हें सार्वजनिक काम आहे. सार्वजनिक कामीं केवळ कार्यावर दृष्टी ठेवणें ही मनोवृत्ति नेहमीं असावी लागते. आपणामध्यें निर-

निराळ्या मनोवृत्तींचीं पण प्रसंग विशेषीं कांहीं कांहीं विशिष्ट कामीं उपयोगीं पडणारीं माणसें आहेत, त्यांमध्यें मजजवळ बसलेले हे चार साधु आहेत. या सर्वांस यांच्या अपराधाबद्दल आपण क्षमा करूं या, ह्मणजे आपल्या कार्याला त्यांचा उपयोग करून घेतां येईल. प्रत्येक कार्यकर्त्या मनुष्याचा त्याच्या मगदुराप्रमाणें आपणांस उपयोग करून घेतला पाहिजे. आणखी चार माणसें आपणास येऊन मिळालीं आहेत. कांहीं दिवसांपूर्वीं हिरालाल, भैरूसिंग, ठाकूरसिंग व गुलाबसिंग ही मंडळी मजकडे आली. त्या कोपऱ्यांत ते चवघेजण बसले आहेत पहा. परंतु आतां त्यांनीं आपला पूर्वीचा व्यवसाय सोडून देऊन आमच्या मठांत येऊन राहण्याचा कृतसंकल्प केलेला आहे. यासाठीं यापुढें तीं मनुष्यें कशीं होतीं, त्यांचे दोष काय होते, याकडे लक्ष न देतां त्यांचे गुण काय आहेत व आपण हातीं घेणार आहोंत त्या लोककार्यांत त्यांचा संग्रह कसा होईल हें आपणांस आतां पाहिलें पाहिजे.

आपल्या कार्यांसाठीं आपणांस एक मठ स्थापन केला पाहिजे. नुसती पूजाअर्चा करून बाकीचा वेळ स्वस्थ घालविण्याचा उपक्रम आपणांस इतउत्तर टाकला पाहिजे. नुसतें ध्यान कसलें फल देणार ? मंत्र आणि तंत्र यांनीं तुम्हीं काय संपादन करणार ? तुम्हीं आतां स्वावलंबी झालें पाहिजे. आतां नव्या पद्धतीचा स्वीकार करून तुम्हीं पुरुषार्थ संपादन केला पाहिजे. प्रत्यक्ष शक्तीइतका जो समर्थ असतो, तोच खरा पुरुष होय. पण एवढ्या सामर्थ्याबरोबरच तुमचें अंतःकरण कोमल असलें पाहिजे हेंहि विसरूं नका. आपल्या भोंवतालच्या लक्षावधी जीवांसाठीं तुमचें अंतःकरण तीळतीळ तुटत राहिलें पाहिजे, आणि त्याचवेळीं तुम्ही सामर्थ्यवान् असले पाहिजे. तसेंच तुह्मांपाशीं

आज्ञाधारकतेचाहि गुण असला पाहिजे. तुमच्या गुरूनें नदींत उडी घेऊन सुसर पकडण्यास तुह्मांस सांगितलें, तर ती आज्ञा प्रथम पाळून नंतर वाटल्यास तिच्या बऱ्यावाईटपणाबद्दल वादविवाद करा. हुकूम चुकीचा असला तरी आज्ञापालन प्रथम आणि वादविवाद नंतर असा क्रम तुम्हीं स्वीकारिला पाहिजे. तुह्मांला आपल्या संघाबद्दल फार अभिमान असला पाहिजे. आज्ञेचें उल्लंघन केव्हांहि करावयाचें नाहीं असा निश्चय तुम्हीं करा. कोणी यत्किंचित्‌हि आज्ञेचें उल्लंघन केलें, तर ताबडतोब त्याला तुमच्यांतून हांकून बाहेर काढा. आपणामध्यें असले हितशत्रु क्षणभरहि राहूं देऊं नका. तुमच्या वृत्तींत वायूचें स्वातंत्र्य आणि कुत्र्याची आज्ञाधारकता यांचा संगम असला पाहिजे. इतकी तयारी झाली ह्मणजे आपलें कार्य फार लवकर होईल अशी खात्री बाळगा.

या कामाला अर्थात्‌च द्रव्याचीहि गरज लागेल. पण याचकवृत्ति आपणांस करावयास नको. आपणांमध्यें या कार्याला चालन देण्यासाठीं द्रव्य अर्पण करणारे कोण आहेत, त्यांनीं तसें सांगावें."

असें बोलून ते साधू स्तब्ध होऊन श्रोतृमंडळाकडे पाहूं लागले.

त्या साधूंच्या समुदायामधून बरेच लोक उठून उभे राहिले. त्यांपैकीं एक कृष्णसिंहजी होते ते सर्वांस ऐकूं जाईल एवढ्या आवाजानें ह्मणाले की 'सज्जन हो, मजजवळ जें काय आहे तें सर्व मी या पवित्र कार्यास अर्पण करीत आहे.'

* * * *

कै. नारायण वामन टिळक ह्मणतातः—

"माते! महात्मे तुझे, तत्त्ववेत्ते,
तुझे शूर योद्धे, तुझे सत्कवि,।

श्रेणी ययांची सदा माझियागे, ।
मना पूजनीं आपुल्या वांकवी ! ।
यांचीं यशें ज्या नव्या सद्गुणांनां ।
मला अर्पिती ध्येय ते गे जरी, ॥
सामर्थ्य नामीं तुझ्या आर्यभूमी ! ।
तसें पाहिलें मी न कोठें तरी ! ॥"

---

## प्रकरण चव्वेचाळिसावें

# उपसंहार

आश्वास्य पर्वतकुलं तपनोपतप्तम्
उद्दामदाव विधुराणि च काननानि ।
नानानदीनदशतानि च पूरयित्वा
रिक्तोऽसि यत् जलद ! सैव तवोत्तमश्रीः ॥*

—भोजप्रबंध

साधुसंतांच्या वागणूकीसंबंधानें आह्मीं आजपर्यंत कधीं नीट विचारहि केलेला नव्हता. प्राचीन कालच्या साधुसंतांच्या गोष्टी ऐकून आह्मांला आनंद होतो, पण अर्वाचीन कालीं तसे साधुसंत उरलेले नाहींत, उरले असले तर ते हातांच्या बोटांवर मोजण्यासारखे असतील नसतील. इतर साधूंचा वेष परिधान केलेले सगळे लोक आळशी, फुकटे, व्यसनी, परान्नपुष्ट व खायाला काळ व भुईला भार असे आहेत असा समज—नव्हे गैरसमज—आम्हीं करून घेतला होता, पण त्या दिवशींची त्या साधूंची ती सभा पाहून व त्यांचे विचार ऐकून आह्मांला सानंदाश्चर्य

---

* हे मेघा, सूर्यतापानें तप्त झालेले पर्वत आणि प्रचंड दावानलानें दग्ध झालेलीं अरण्यें धारावर्षावानें शीतल करून आणि अनेक नदनदींनां आपल्या जलानें परिपूरित करून तूं शेवटीं रिक्त झालास, हीच तुझी अपूर्व शोभा होय !

वाटलें. श्रीसरस्वतीनंदन महाराज यांजपाशीं प्रत्येक साधूनें कांहींना कांहीं तरी आणून ठेविलें.

सभा विसर्जन होण्याचे सुमारास त्या साधूंनीं हिरालालप्रभृति मंडळींनां भगवीं वस्त्रें देऊन आपल्या पंथांत घेतलें. क्रूरकर्मा भैरूसिंग हा देखील बिनबोभाट स्वामींचा शिष्य बनला, तेव्हां त्या साधूंची तपश्चर्या किती थोर ह्मणून वर्णावी ?

दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं विष्णुशर्मा, नारायणराव, पुरुषोत्तम, व मी असे चवघेजण जवाशिया येथें गेलों. कृष्णसिंहांच्या आश्रमांत रात्रभर राहण्याच्या उद्देशानेंच आम्हीं गेलों होतों. कृष्णसिंहांनीं व सीताबाईनीं आम्हांला पहातांच अत्यंत संतोष प्रदर्शित केला. त्या रात्रींचा आमचा आनंद काय वर्णावा ? त्या रात्रीं आम्हीं सर्वजण अगदीं मोकळ्या मनानें बोलत होतों. साधूच्या सहवासांत जो एक विशेष असतो तो हा कीं त्याचें भाषण अगदीं सत्य व मधुर असतें. आधल्या दिवशीं कृष्णसिंहजी सभेमध्यें आपणाजवळचें सर्वस्व देण्यास सिद्ध झाले होते, ते देणार काय ? त्यांची झोंपडी सर्व सामानासह विकली तर तिची दहावीस रुपये तरी किंमत होईल कीं नाहीं याची शंकाच होती तेव्हां आम्हीं त्यांना सरळच प्रश्न केला कीं " महाराज, आपण किती व काय देणार ! व तें आहे कोठें ?"

कृष्णसिंहजी आमचा प्रश्न ऐकून हंसले व 'सांगेन' असें ह्मणून त्यांनीं अगोदर मनकामनेश्वराची सगळी गोष्ट इत्थंभूत सांगण्यास आम्हांला सांगितलें. तेव्हां नारायणरावांच्या मेहेरबानगीनें आह्मांला चितोडगडचा प्रवास कसा घडला, सज्जनसिंहांनीं आह्मांला ती इतिहासप्रसिद्ध गुहा दाखविण्यास केल्यामुळें आह्मांला मनकामनेश्वराचे कागदपत्र व पुरुषोत्तम हे हातीं कसे लागले वगैरे हकीकत आम्हीं वर्णिली. त्यानंतर ठाकुरसिंगानें

मध्यरात्रीं ते कागद वाचले व नंतर तो पळाला, नारायणजी ज्योतिषांनीं ते कागद वाचण्यास मदत केली त्यामुळें भीमसिंगासारख्या सज्जन राजपुत्रास मेवाड सोडून उज्जयिनीस यावें लागलें ती हकीकत समजली व त्यानें मनकामनेश्वराची स्थापना करून 'मंदिराशेजारीं, पूजाऱ्याची व आपल्या भाचाच्या राहण्याची सोय करून देऊन कांहीं द्रव्य पुरून ठेविलें व त्याची सर्व माहिती असलेले कागदपत्र तयार करून ठेविले, ह्या गोष्टी समजल्या. पुढें त्या द्रव्याचा शोध करावयास प्रारंभ केल्यावर मनकामनेश्वराचें दर्शन, कन्हय्यालालाची भेट व प्राचीन उज्जयिनींतील बरींच स्थळें कशीं पाहिलीं त्याचें वर्णन करून कन्हय्यालालाच्या घरीं असलेला कागद ठाकुरसिंगाच्या सांगण्यावरून त्याच्या एका मित्रानें कन्हय्यालालापासून युक्तीनें काढून घेतला व नंतर आह्मांला ठाकुरसिंग, हिरालाल प्रभृति मंडळींनीं द्रव्यलोभानें कसा त्रास दिला त्याची हकीकत आली. हिरालालाच्या आश्रयानें सीताबाई रहात असे, तिला आपल्या बेतांचा सुगावा लागू न देतां रामलालाला पहाण्यासाठीं डॉक्टरांला रात्रीं घेऊन यावयास त्यांनीं कसें तयार केलें व त्याप्रमाणें मी तिच्याबरोबर गेलो असतां, रस्त्यामध्यें, हिरालाल प्रभृति मंडळींचा बेत अमुक अमुक असावा असा विचार मनांमध्यें उद्भवतांच ती मला अंधेरांत तसाच सोडून, हिरालालाच्या बेताची परिस्फुटता केल्यास कदाचित् मला तें फार जड जाईल ह्मणून तिनें आपल्यावर येणारा विश्वासघाताचा आरोप सहन करूनहि मला वांचविण्याविषयीं ती कशी झटली ती हकीकत आली. पुढें हिरालाल प्रभृति मंडळींच्या दुष्ट कटांत सामील होऊन तिनें आह्मांला त्रास द्यावा व गोत्यांत आणावें अशी भैरुसिंगानें तिची पाठ पुरविली तरी जेव्हां ती ऐकेना तेव्हां तिचा छळ करून तिला वठणीवर आणण्यासाठीं त्या

पाषाण—हृदयी भामट्यांनीं तिच्या मानलेल्या भावाचा जीव घेऊन तिला कसा त्रास दिला याचें वर्णन विष्णुशर्म्यानें केलें. मनकामनेश्वराच्या मंदिराच्या जवळ विजयसिंग रहात असलेलें घर आम्हीं खरेदी केलें, व तें खोदून पहात असतां हिरालाल प्रभृति मंडळींनींहि आपला उद्योग कसा चालू ठेविला व त्यामुळें एका भूयाराचा शोध लागला व त्यांतल्या खळग्यांत मी पडलों ती हकीकत, मुक्या पुरुषोत्तमाची हकीकत, हिरालाल व भैरूसिंगाची हकीकत नारायणरावांनीं सांगितली. द्रव्य सांपडावें ह्मणून केलेले आमचे व आमच्या शत्रूंचे नानाप्रकारचे प्रयत्न सर्व फसल्यावर पुरुषोत्तमाच्या ज्ञानामुळें, आजपर्यंत आह्मांला न वाचतां आलेला कागद कसा वाचतां आला तें पुरुषोत्तमानें सविस्तर सांगितलें व त्या ज्ञानाच्या योगानें मनकामनेश्वराच्या आवारांत पूर्वीं पुरून ठेवलेलें द्रव्य राजपुत्र भीमसिंगानें चिंतामणगणेशाच्या समोर असलेल्या पाषाणेश्वराच्या ओट्याखालीं पुरून ठेविलेलें आहे याचा बोध झाला, व त्याच्या पुढची गोष्ट ह्मणजे कृष्णसिंहजींचा पत्ता लागून विजयसिंहाच्या वंशजाबद्दलच्या सांखळींतील शेवटचा दुवा सांपडून सीताबाई व कृष्णसिंह यांचें अगदीं जवळचें नातें असल्याचें उघडकीला आलें.

आम्हीं चवघेजण ही गोष्ट सांगत होतों व कृष्णसिंहजी मधून मधून कांहीं प्रश्न विचारीत होते तथापि सीताबाई कांहींएक बोलली नाहीं. ती अगदीं स्वस्थ पडून सर्व गोष्ट ऐकत होती. आमची हकीकत सर्व ऐकून झाल्यावर कृष्णसिंहजी ह्मणाले:—

‘ शाबास, मुलांनों, शाबास. तुम्हीं पुष्कळ उद्योग केलात. पाषाणेश्वराच्या चबूतऱ्याखालीं भीमसिंग राजपुत्रानें द्रव्य ठेवल्यावर तयार केलेल्या कागदांची एक प्रत त्यानें विजयसिंगाच्या हवालीं केली ती

अद्याप मजजवळ आहे व पाषाणेश्वराच्या चबूतऱ्याखालीं तें द्रव्य पुरून ठेविलें आहे व वर खुणेसाठीं तीन शेंदूर फांसलेले दगड मांडलेले आहेत, ते देव नव्हेत ही गोष्ट मला पुष्कळ वर्षांपासून माहिती आहे. तथापि मला त्या द्रव्याची कधींहि गरज भासली नाहीं. त्या ओट्याकडे दुर्लक्ष्य केल्यास तो पडून झडून जाईल किंवा तो कोणीतरी मोडून टाकतील या विचारानेंच राजपुत्र भीमसिंगानें त्याच्यावर तीन धोंडे ठेऊन, त्यांना शेंदूर फांसून देवकळा आणली. विजयसिंगजीपासून, माझ्यापर्यंत प्रत्येकानें ती परंपरा तशीच चालविली व माझ्या मरणोत्तरहि यापुढें ती कोणीतरी तसाच चालविता. पण आतां या पुढें तें द्रव्य त्याठिकाणीं ठेवण्यापेक्षां त्याचा जास्त चांगला उपयोग करण्याचा प्रसंग आला आहे. काल श्री सरस्वतीनंदन महाराजांच्या आज्ञेप्रमाणें देशकार्यासाठीं तन मन व धन अर्पण करावयाचें ठरलें आहे. भरतखंडाचा उदयकाळ जवळ येत चालला आहे. सात्विक व पराक्रमी वीर पुरुष उत्पन्न होणार अशीं चिन्हें दिसूं लागलीं आहेत. तामसी जग नष्ट होणार. त्याच्या पापाचे घडे भरत आले आहेत असें स्पष्ट निदर्शनास येऊं लागलें आहे. श्रीकृष्णाच्या प्रतिज्ञेप्रमाणें हातांत शस्त्र धारण केल्याखेरीज साधुसंत भरतखंडाचा उद्धार करणार आहेत. आजपर्यंत अज्ञानाच्या झोपेंत लोळत पडलेलें भरतखंड बलवंतानें खडबडून जागें केलें आहे व त्याला आता मोहनदास सत्कार्य–प्रवृत्त करीत आहे. श्रीसरस्वतीनंदन महाराजांच्या नेतृत्वाखालीं कार्य सुरू झालें आहे व भरतखंडाचें समृद्ध सौभाग्यसंपन्न साम्राज्य स्थापून उज्जयिनी हें मुख्य राजधानीचें नगर करावें असा प्रयत्न चालू आहे. यासाठीं राजपुत्र भीमसिंगासारख्या पुण्यपुरुषानें ठेवलेलें द्रव्य आपण पुण्यकार्यांत खर्च करूं या. 'परित्राणाय साधूनाम्, विनाशायच

दुष्कृताम्, राज्यसंस्थापनार्थाय ' त्या द्रव्याचा उपयोग करावयाचा आहे, तर त्यापेक्षां अधिक योग्य प्रसंग तो कोणता आढळावयाचा आहे ?

---

दुसऱ्या दिवशीं पहांटे कृष्णसिंहजींच्या बरोबर आम्हीं सर्वजण पाषाणेश्वराच्या दर्शनास गेलों. सीताबाईहि आमच्या बरोबर आली होती. प्रारंभीं श्री चिंतामण गणेशाचें दर्शन करून व तेथें 'संकट-नाशनं महागणपतीस्तोत्रम्' ह्मणून उद्दिष्ट कार्यांत यश यावें अशी गजाननाची प्रार्थना करून नंतर आम्हीं पाषाणेश्वराच्या चबूतऱ्यापाशीं गेलों. पाषाणेश्वर ह्मणजे शेंदूर फांसलेले शुद्ध तीन दगड होते, त्यांची प्राणप्रतिष्ठा झालेली नव्हती, तथापि आज शेकडों वर्षें त्यांच्यावर देवकळा आलेली होती, तेव्हां त्यांना स्थानभ्रष्ट करावयाचेवेळीं आम्हांला कसेसेंच वाटलें यांत कांहीं आश्चर्य नाहीं. आम्हीं देवाचें नांव घेऊन कामाला सुरवात केली व थोड्याच वेळांत चबूतऱ्याचे सर्व दगड काढून एकीकडे टाकून दिले.

चबूतऱ्याखालची जमीन तीन हात खणल्यावर एक चुनेगच्ची खळगा आह्मांला आढळला. त्यावर एक मजबूत लोखंडी पत्रा घातलेला होता. तो काढून टाकल्यावर त्या खळग्यांत भीमसिंग राजपुत्रानें सांगितल्याप्रमाणें तीन पेट्या होत्या त्या आमच्या दृष्टीस पडल्या. त्या पेट्या खूप मजबूत व जड असून खिळे ठोकून अगदीं बंद केलेल्या होत्या. ती एकएक पेटी उचलावयास आम्हीं चौघेजण लागलों होतों, तरीसुद्धां कृष्णसिंहजींच्या आश्रमांत त्या नेऊन ठेवीपर्यंत आम्हीं अगदीं घामाघूम होऊन गेलों, इतक्या त्या जड होत्या.

आश्रमांत आल्यावर आम्हीं त्या पेट्या उघडल्या. जाड कापडांच्या थैल्यांत मजबूत रीतीनें शिवून, चांगल्या बंदोबस्तानें ठेवलेले तें द्रव्य पाहून

आम्हीं अगदीं आश्चर्यचकित झालों. त्या थैल्यांत एकजात बावनकशी सोन्याच्या मोहरा भरलेल्या होत्या! आजपर्यंत इतक्या मोहरा आमच्या दृष्टीस कधींहि पडल्या नव्हत्या. आम्हीं नंतर त्या सर्व मोजून पुन्हां थैल्यांत भरून पेट्यांतून ठेवून दिल्या. द्रव्य आणि आयुष्य यांच्या संबंधानें तिऱ्हाइतांजवळ कधींहि सांगूं नये अशी नीति असल्यामुळें व विशेषतः सर्वस्वीं देशकार्यार्थच त्या द्रव्याचा विनियोग करावयाचा असल्यामुळें, कृष्णसिंहजीनीं आज्ञा केल्यामुळें आह्मांला त्या द्रव्याबद्दल जास्त कांहीं सांगतां येत नाहीं. त्याचा सद्व्यय होत आहे व होईल येवढें सांगितलें ह्मणजे पुरे. राजनीतिशास्त्राप्रमाणें योग्य त्या ठिकाणीं कृष्णसिंहजीनीं त्याचा विनियोग व्हावा अशी कायमची व्यवस्था करून ठेविली आहे. आम्हीं आह्मांजवळचे सर्व कागदपत्र व मोहोर कृष्णसिंहजींच्या स्वाधीन केली व त्यांनीं ती अग्निनारायणाच्या स्वाधीन केली!

* * * *

सीताबाईंची प्रकृति दिवसानुदिवस क्षीण होत गेली व एके दिवशीं एकादशीच्या शुभमुहूर्तावर त्या कैलासवासी झाल्या. त्यांच्या अंतकालीं मी त्यांजपाशीं होतो. कृष्णसिंहांचें त्यांजवर फार प्रेम असे. सीताबाई वारल्यावर त्यांच्या अस्थि बरोबर घेऊन कृष्णसिंहजी प्रयागाकडे गेले. ते अद्यापपर्यंत आह्मांस उज्जयिनीस दृष्टीस पडले नाहींत. ते जिवंत असल्यास श्रीसरस्वतीनंदन महाराजांच्या सांप्रदायांत राहून देशसेवा करीत असतील हें खचित.

* * * *

नारायणजी ज्योतिषी यांना मनकामनेश्वराची गोष्ट ऐकून आनंद झाला. त्याच सुमारास जयपुराहून चि. व्हाइस प्रिन्सिपॉल माधव भय्या आला होता त्यालाही ती सर्व गोष्ट ऐकून फार गम्मत वाटली.

* * * *

सज्जनसिंहजींचा मुलगा प्रतापसिंह युरोपखंडांतील महायुद्धांत गेला होता तो बरेच दिवस बेपत्ता होता. तो शेवटीं तुर्कांच्या छावणींत लढाईतला कैदी असल्याचा पत्ता लागला. लढाई संपल्यानंतर तो हिंदुस्थानांत परत येऊन आपल्या सर्व मंडळीस भेटला. तुर्कांनीं त्यास फार चांगल्या रीतीनें वागविलें होतें. लढाईत पकडलेल्या सर्वच हिंदी लोकांस तुर्कांनीं चांगल्या रीतीनें वागविलें हें प्रसिद्धच आहे. उदेपूरच्या महाराण्यांनीं प्रतापसिंहाचा योग्य सन्मान करून त्यास एक गांव जहागीर दिला. सज्जनसिंहजींच्याकडून मोठ्या आग्रहाचें निमंत्रण आह्मांला आलें आहे. नारायणराव व मी लवकरच त्यांच्याकडे जाणार आहोंत.

*　　*　　*　　*

विष्णुशर्मा व पुरुषोत्तम यांनीं उज्जयिनीला भरतखंडाच्या साम्राज्याची राजधानी करण्याचा प्रयत्न चालविण्याचा संकल्प केला आहे. त्यांचे बेत व कार्यक्रमाची दिशा कांहीं कालपर्यंत अर्थात्‌च गुप्त रहाणार. त्यांना द्रव्यबल आहे. मनुष्यबल पाहिजे. ज्यांची या कामाला सहानुभूति असेल त्यांनीं आह्मांला भेटावें म्हणजे जास्त खुलासा समजेल.

*　　*　　*　　*

उज्जयिनीची अंतर्बाह्य सुधारणा करण्याचें व्रत नारायणरावांनीं घेतलें आहे. उज्जयिनीच्या लोकांना नारायणरावांच्या कर्तृत्वाविषयीं मोठा अभिमान आहे.

*　　*　　*　　*

'विक्रमाच्या उज्जयिनींतील' ही कल्पित कथा प्रसिद्ध करण्याची बुद्धि ज्यानें दिली, त्या परम दयाळु श्रीमनकामनेश्वरास साष्टांग नमस्कार असो.

॥ ॐ तत्सद्‌ब्रह्मार्पणमस्तु ॥

# विक्रमाच्या उज्जयिनींत !

## परिशिष्ट नंबर १

### अवंतिकेस

कवि—श्री. **नरहर शंकर रहाळकर** बी. ए. इंदूर.

**पद**—( चाल—प्रिये ! पहा. )*

अवंतिके ! वैभव तव पूर्व सर्व आज नष्ट जाहलें ।। धृ० ।।
कालिदास, भवभूति, । भर्तृहरी विमलमति,
दण्डि, बाण चण्डकृति । तव कवि तुज हरपले ! ।। १ ।।
वाग्देवी कंठमणी । तव कवि ते मावळुनी ।
त्या जागीं अल्पगुणी । मजसम तुज लाधले ! ।। २ ।।
शक कर्ता विबुधमान्य । विक्रम नृप, भोज धन्य, ।
शूर, रसिक नृपति अन्य । आज कुठें राहिले ? ।। ३ ।।
म्हणती सौंदर्यखनी । तुज, न आज परी कुणी ।
रूपें दे मोह मनीं । कोठें कोठें लोपलें ? ।। ४ ।।
अस्तातें विधु जातां । तेज येइ खद्योतां ।
खुलति तशा पुरवनिता । रूप खरें मावळे ! ।। ५ ।।
" मोर पुढें नृत्य करी । प्रमदा करताल धरी " ।
पूर्वींचें सर्व परी । स्वप्न आतां जाहलें ! ।। ६ ।।
विस्तृत आरामतति । विविध रम्य पुष्पपंक्ति ।
आज सर्व लोपे ती । उलट हाय ! जाहलें ! ।। ७ ।।

---

* पृष्ठ ८६ पहा.

वर–गृहास वधु जातां । वधु–गृहास भेसुरता ।
अवन्ति ! तूं तशी आतां । तेज तुझे नष्टलें ! ॥ ८ ॥
वेदशास्त्रपूर्ण निपुण । जाउनि तो ब्राह्मणगण ।
चंगि–भंगि मूढ पूर्ण । तुजसि आज लाधले ! ॥ ९ ॥
नृत्यकला गानकला । हाय ! जाति अस्ताला ।
फाटे नभ तरि त्याला । ठिगळ कुणी लाविलें ? ॥ १० ॥
पूर्व कविग्रंथांनीं । परिचय तव होवोनी ।
पाहिन तुज लागोनी–कधीं ? असें जाहले ॥ ११ ॥
होतां परि भेट हाय । विपरित हे होय काय ।
रम्य रूप तुझें जाय । विद्रुप हें दीसलें ॥ १२ ॥
प्रेरावी दृष्टि जिथें । अश्रूतें कारण तें ।
अवंतिके दुर्दिन ते । तुजसि केंवि पातले ? ॥ १३ ॥
स्थिति ऐशी जरि झाली । स्थळें दोन या कालीं ।
चित्तवृत्ति मम धाली–बघुनि हृदय तोषलें ॥ १४ ॥
देखावा क्षिप्रेचा । पांग फेडि नयनांचा ।
वर्णाया नच वाचा–शक्य, शब्द खुंटले ॥ १५ ॥
दुरितदहन सुखनिधान । पतित–अधम–जनपावन ।
महाकाल मोक्षभुवन ।–हृदय मम भासलें ॥ १६ ॥
क्षणभंगुर वैभव तें । नव गेलें, जावो तें ।
अक्षय परि हें तूतें । वैभव बघ लाभलें ॥ १७ ॥



कवि—श्री. नरहर शंकर रहाळकर, बी. ए.
मशीर बहादुर, इंदूर.
जन्म २० डिसेंबर सन १८८२

कवि-कै. वासुदेव वामनशास्त्री खरे (मिरज)



इ. स. १८५८-१९२४
उज्जयिनी या कवितेचे कर्ते व इतिहास संशोधक.

# परिशिष्ट नंबर २

## उज्जयिनी

कविः—कै. **वासुदेव शास्त्री खरे**, मिरज. +

उज्जयिनीपासून कोस दीडकोस अंतरावर एक विस्तीर्ण मैदान आहे; त्या स्थळीं प्राचीन काळीं प्रख्यात असलेलें उज्जयिनी नगर वसलें होतें. कोणी सहृदय व देशाभिमानी पुरुष हें स्थळ पाहण्यास गेला असतां, त्याला उज्जयिनीच्या प्राचीन वैभवाची आठवण होऊन त्याच्या मनांत जे विचार येण्यासारखे आहेत त्यांचें पद्यरूपानें वर्णन खालीं केलें आहे.

श्लोक

**स्रग्धरा**—जातां अस्ताहि तेजें दिपवि रवि जसा संकटीं थोर लोक ।
क्षिप्रेच्या[1] पृष्ठभागीं चमकति किरणें पीत त्याचीं सुरेख ।
ऐशा वेळीं तिथें मी भटकत असतां फार झालों उदास ।
तेव्हां नाना विचार प्रकटुन करिती क्षुब्ध माझ्या मनास ॥१॥

**मंदाक्रांता**—शास्त्रें, विद्या, ललित, कविता, धर्मनिष्ठा, प्रताप, ।
होतीं जेव्हां करित वसती आर्यलोकीं अमूप, ।
जेव्हां होता विलसत जगीं विक्रमादित्य राया ।
तेव्हां नांदे प्रथित[2] भुवनीं ती पुरी ह्याच ठायां ॥ २ ॥

**शिखरिणी**—पुरी[3] पूर्वीं गर्वें निरुपम निजैश्वर्य मिरवी, ।
जिला वर्णूं जातां थकति सुकृती[4] संस्कृत कवी; ।
तिच्या स्थानीं आतां पसरत असे निर्जन वन ।
बघोनी हें, झालें बहु समयिं या दुःखित मन ॥ ३ ॥

---

१ क्षिप्रा नदीच्या. २ प्रख्यात. ३ नगरी ( उज्जयिनी ) ४ धन्य
+ प्रकरणें ७ व ८ पहा.

**स्रग्धरा**—कोठें ते कांचनाचे कळस चमकती उंच देवालयांचे ? ।
हर्म्यं[1] प्रासाद[2] कोठें असति ? विलसले थोर ऐश्वर्य ज्यांचें ।
कोठें त्या नाट्यशाला[3]? न दिसती नयना चंद्रशाला[4] विशाला ।
रत्नांनीं पूर्ण गेले विपणि[5] तळ जणो अब्धिचे ते लयाला ॥ ४ ॥

**मंदाक्रांता**—प्रातःकाळीं नगरवनिता कुंकुमाच्या[6] सड्यांनीं,
रांगोळ्यांनीं, अधिकच जयां देति शोभा झटोनी;
नाना यानीं[7] बसुन गमना पौर जेथें करीत ।
नाना वेषीं फुलतिच कुठें जाति ते राजपंथ ? ॥ ५ ॥

**शा. वि.**—जेथें नाचती मोर, मंजुळरवें गातात जेथें पिक[8], ।
वापींच्या तटिं खेळती सुखभरें चक्रांग[9] हंसादिक ।
पुष्पांनीं लवल्या लता तरुवरां जेथें मिठी घालिती, ।
उद्यानें दिसतीं न तीं, वसत जीं क्षिप्रानदीच्या तटीं ॥ ६ ॥

विद्या—धर्म—सुकर्म—तत्पर असे होते इथें ब्राह्मण; ।
तैसे क्षत्रिय शूर मानधन ते, ज्यां जीव वाटे तृण; ।
अर्थोत्पादक वैश्य; शूद्र खंपले[10] सेवावया भूमिला; ।
कोठे उज्जयिनीमधील जन ते गेले कळेना मला ! ॥ ७ ॥

**रथोद्धता**—जीस विक्रम पराक्रमी गुणी । तोषवी झटुन नित्य रक्षुनी ॥
राजभक्ति—वश धन्य लोक ते । होति या नगरिं पूर्वि नांदते ८

**शा. वि.**—लोकीं पावसि तूंच विक्रमनृपा धन्यत्व या जन्मुनी; ।
काव्यभिज्ञजनांत[11] तूंच पहिला, दात्यांमध्यें अग्रणी ।

---

१ श्रीमंत लोकांचे वाडे. २ राजवाडे. ३ नाटकगृहें. ४ गच्च्या. ५ दुकानें. ६ केशराच्या. ७ वाहनांत. ८ कोकिल. ९ चक्रवाक. १० श्रम करिते झाले. ११ कवितांचे मर्म जाणणाऱ्या लोकांमध्यें.

वाणी–कंठमणी[1] कवीश्वर गुणी शाकुंतलाचा पिता[2]।
होता आश्रय पूर्ण पावत तुझा ! विद्वत्सभासंमता[3] ! ॥ ९ ॥

**वसंततिलका**–शृंगार–वीर–करुणा–रस पूर्ण काव्यें ।
जीं कालिदास तुज ऐकवि नित्य नव्यें ।
गंभीर, सुस्वर रसाळ अशी सुवाणी ।
त्याची नृपा परिसली असशील कानीं ! ॥ १० ॥

**शा. वि.**–सांगाया निजवल्लभेस[4] वदला तो यक्ष[5] जे जे घनीं[6] ।
सीतेचा पतिला[7] निरोप, रतिचा तो शोक, भेदी[8] मना[9]
ज्यातें ही कविता मुखेंच कविच्या ऐकावया सांपडे,
त्याचें भाग्य विशेष, दुर्लभ जगीं तो लाभ त्यातें घडे ! ॥११॥

**शा. वि.**–ज्यांनीं गर्वभरें शिरें उचललीं आकाश भेदावया ।
जाती पर्वत उंच थोरहि असे ज्याच्या प्रभावें लया।
किंवा घोर अपार सागर–जळें ज्यानें बळें शोषिलीं।
तो हा धन्य अचिंत्य काल महिमा स्वच्छंदचारी बळी ॥१२॥

**भुजंगप्रयात**–महाकाल रक्षावया सिद्ध नित्य ।
अवंतीस हे बोलती लोक सत्य ।
कसा काल नाशावया तीस पाहे ।
अहो थोर आश्चर्य हे वाटताहे ! ॥ १३ ॥

---

१ सरस्वतीच्या गळ्यांतला ताईत. २ शाकुंतल नाटकाचा कर्ता कालिदास. ३ विद्वज्जनांच्या सभेंत सन्मान पावणाऱ्या. ४ आपल्या प्रियेला. ५ मेघदूत काव्यांतला यक्ष. ६ मेघाला. ७ सीतेचा वनांत त्याग केल्यावर तिनें रामाला पाठविलेला निरोप ( रघुवंश सर्ग १४ ). ८ मदनाला जाळल्यां नंतरचा रतीचा शोक ( कुमार संभव ). ९ खेद देई, फोडी, टोची.

**मालिनी**–कविवर चिर गाती कीर्ति ज्याची अमूप ।
त्यजुन भुवन गेला विक्रमादित्य भूप ।
कवण रसिक भोक्ता आपणा होय आतां ।
ह्मणुन सुकविता ही पावली स्वर्गपंथा ॥ १४ ॥

**वसंततिलका**–श्री विक्रमानुज नृपाल उदार शुद्ध ।
राज्यें प्रजा सुखवि भर्तृहरि प्रसिद्ध ।
तो आपुल्या प्रियपुरास विनाश–काल ।
येणार जाणून असें वदला असेल ॥ १५ ॥

**शा. वि.**–"ती रम्या नगरी महानृपति तो सामंतचक्रावृत ।
त्याची राजसभा विशाल जवळी चंद्रानना त्या स्थित ।
शौर्ये गर्वित राजपुत्रगण तो, ते भाट, तीं भाषणें ।
ज्या काळें सगळे लया दवडिलें, माझीं तया वंदनें" ॥ १६ ॥

गेली उज्जयिनी ! ! ! तिच्या धरितसे नांवास जें लोकीं या ।
आहे सांप्रत उज्जयिनी नगर तें राज्यांत शिंद्याचिया ।
आहे नांव परंतु वैभव दिसे कोठें न तें त्यापरी ।
नामैक्यें समता चुन्यास[1] अमृता येईल कैशीतरी ॥ १७ ॥

कोठें उज्जयिनी पुराण नगरी संपन्न राजन्वती[2],
ज्ञानी, शूर, सुखी, स्वधर्म-निरता जेथें प्रजा नांदती ।
कोठें उज्जयिनी नवी ? जन जिथें दारिद्र्य-चिंताकुल ।
राजे दुर्मद दुष्ट जीस छळिती, होतीं रणें तुंबळ ॥ १८ ॥

---

१ चुना व अमृत या दोनहि अर्थी " सुधा " हा शब्द आहे. २ उत्तम राजानें रक्षिलेली.

मूळ भर्तृहरीचा श्लोक असा आहे:—

सा रम्या नगरी महान् स नृपतिः सामंतचक्रं च तत् ।
पार्श्वे तस्य च सैव राजपरिषत् ताश्चंद्र–बिंबाननाः ।
उन्मतः स च राजपुत्रनिवहस्ते बंदिनस्ताः कथाः ।
सर्वं यस्य वशात् अगात् स्मृतिपथं कालाय तस्मै नमः ॥ १ ॥

वामन पंडितांचें भाषांतर:—

गेला तो नृप, ते प्रधान अवघे, ते पंडितांची सभा, ।
गेली ते नगरी, तशा शशिमुखी, ज्या तप्त हेम प्रभा, ।
गेला तो नृपपुत्र, त्या शुभ कथा, म्या देखिलें सर्व जें ।
तें जेणें स्मरणास योग्य रचिलें कालासि त्या वंदिजे ॥ १ ॥

---

## परिशिष्ट नंबर ३

## उज्जयिनी

कवि–श्री. **केशव नारायण डांगे**, एम्. ए., बी. टी. उज्जयिनी

आर्या +

कोठें ऐश्वर्य तुझें ? कोठें सत्ता ? कुठें वसे शील ?
कां सर्व लोपलें हें ? आला तुज वीट काय वदशील ॥ १ ॥
कोठें इतिहास तुझा ? दिगंत कीर्ती, सुभव्ययश नृपती ॥
कवि कोठें ? काव्य कुठें ? नुरले रसिकहि अतर्क्य दैवगती ॥२॥
लक्ष्मी सरस्वतींचा, कालीचा मूर्तिमान जिथें वास ॥
तेथेंच श्वान जंबुक, उच्चस्वरें करिति नित्य काव्यास ॥ ३ ॥
विस्तीर्ण राजमार्ग, प्रासादावलि विराजल्या जेथें ॥
काय वदूं ! काला ! रे ! नांगरही फिरविलास तूं तेथें ॥ ४ ॥

---

+ प्रकरण ३६ वें पहा.

कविकुलमुकुटमणीला, जी होती स्तव्य तीच गंधवती ॥
कोठें आज असे ती, दुर्गंधा नामशेष नष्टस्मृती ॥ ५ ॥
जें मत्तगजस्नानें, क्षिप्राजल गंधयुक्त होत असे ॥
होणार काय तद्वत् ? तें स्वप्नींहि पुन्हां न भासतसे ॥ ६ ॥
'मार्गांत जरी नाहीं, तरी जावें पाहण्या विशाला ही' ॥
ऐसें यक्ष वदे तो मेघां, साहुन विलंब कार्यींहीं ॥ ७ ॥
आतां यक्षमुखें हें, वच ऐसे बोलणार कोण कवी ? ॥
गेला तो काल, कवि, प्रेक्षक; कोणा पुरीहि नच भुलवी॥ ॥८॥
वर्षर्तूंचे जाती, सजल जलद बहुत त्या पुरी वरुन ॥
परि यक्षाचा नेला नाहीं संदेश कोणिहि फिरुन ॥ ९ ॥
कीं भौतिक युग आतां, जड मेघां कोण सूज्ञ वदणार ॥
संदेश, यक्षसम, हें मज मंदातें कशास सुचणार ? ॥ १० ॥
शकघूकां दिपवाया विक्रम—आदित्य तळपला जेव्हां ॥
कोणी बघूं न शकले शत्रू तुज वक्र दृष्टिनें तेव्हां ॥ ११ ॥
होतीस एक कालीं भारतगौरवप्रभावकेंद्रस्थली ॥
तें ऐश्वर्य कुठें तव ? झालें स्मृतिविषय, कीर्ति लव नुरली॥१२॥
कैसा हारविला तूं नवरत्नांचा महार्ह तो हार ? ॥
झाली भारत माता कष्टी, कर तूंच दुःखपरिहार ॥ १३ ॥
कीं श्रम अपार झाले, त्याचा आळस अजून नच गेला ॥
जाणार तो कधीं मग ? निद्रेंतच काळ काय घालविला ॥१४॥
गेलीं कितेक राष्ट्रें येउन मागून तुजपुढें, जाती ॥
चिंता कुणा तयाची ? असती तर वेळ ही कशी येती ? ॥१५॥
कव्युक्त चक्रनेमिक्रम दावाया समस्त जगतास ॥
स्वीकारिली अधोगति काय ? परि ज्ञात तेंहि सर्वांस ॥ १६ ॥

स्वकवीवचन कराया सत्यच उत्कर्षमार्ग अनुसरती ॥
हो कीर्तिपुंजशालिनि ! जन मार्गीं हें पुढें पुढें सरती ॥ १७ ॥
श्रीकृष्णे गीतेची असेल येथेंच घेतली संथा ।
अधिकार सहज आला तुज, जन लावावया बऱ्या पंथा ॥१८॥
धीर न धरवे आतां कोठवरी वाट पाहणें आम्हीं ? ॥
झाल्यावरी निराश, न गौरव येणार आमुच्या कामीं ॥ १९ ॥
गेल्याचा शोक पुरे, अससी तूं कां उदास बाळकशी ? ॥
अर्वाचीन स्वरूपें सत्वर गतवैभवास दाव कशी ॥ २० ॥
नूतनपुराणसंगम घडतां, अज्ञानबंध तुटतील ॥
गे मोक्षदायिके ! जन मज्जन होतांच स्वर्ग चढतील ॥ २१ ॥

---

## परिशिष्ट नंबर ४

### उज्जैन की शान

[ १ ]

सम्वत चलाया वे शकारि सार्वभौम भूप,
यहीं थे, महत्ता इतिहास में महान है,
यहीं कालिदास रहे, कवि गुरु कहाये जो,
विश्व व्यापी जिनका विशुद्ध यशोगान है ।
प्रकटित बेताल की हुई थी पच्चीसी यहीं,
सिंहासन बतीसी यहीं का तो बखान है,
है यह पुरातन-प्रसिद्ध पुरी विक्रम की,
इस से उज्जैन की अनोखी एक शान है ॥

[ २ ]

भारत विख्यात अति उर्वरा यहां की भूमि,
समयानुसार सदा देती सब धान है,
मौजी महादेव है विराजे महाकाल यहां,
जिनका पुराणों में प्रसिद्ध वरदान है।
होता है पुनीत कुम्भ पर्व पै चढ़ाव यहां,
क्षिप्र पाप ताप हारी क्षिप्रा का नहान है,
सप्त पुरियों में है, अवन्तिका इसी का नाम,
इस से उज्जैन की अनोखी एक शान है ॥

**—मुन्शी अजमेरी जी**

( माधव कॉलेज, ( उज्जयिनी ) मॅगझीन. )

## परिशिष्ट नंबर ९
## भारतीयांची वेधशाला उज्जयिनीसच कां ?

अहो उज्जनी उज्जयीनी अवंती ।
विराजे सदा भारती वैजयंती ॥
हिनें उच्चभागीं गुडी होउनीयां ।
जगीं पाडवा आद्य शृंगारिला या ॥ १ ॥

पठारावरी मालवाख्यात भागीं ।
पुरी ही पुराणस्थिता उच्च जागीं ॥
दुजी ना तशी ही जयश्री विराजे ।
यथानाम या उज्जयीनीस साजे ॥ २ ।

नोट—अर्थाकरितां टीपा पुढें दिल्या आहेत.

क्षिप्रा नदीचे घाट





प्रि. गोविंद सदाशिव आपटे, एम्. ए. बी. एस्सी.

गणकचूडामणि. सुपरिंटेंडंट, श्रीशिवाजी वेधशाळा, उज्जयिनी. ( पृष्ठ ३६९ )

प्रकाशूनि अत्युच्च आकाशिं तारे ।
जगा देति सौख्यासि दुःखासि सारे ॥
तयांचीहि मानें इथें वेधशाला ।
गणी यंत्रयोगें पुरी ही विशाला ॥ ३ ॥
अहो पापभीचा मना त्रास ज्यांच्या ।
असे ही पुरी रक्षणीं दक्ष त्यांच्या ॥
म्हणोनी अवंती असें नाम सार्थ ।
जनां भाविका देइ जी धर्म अर्थ ॥ ४ ॥
कवि ज्ञान–विज्ञान–विद्याधिकारी ।
इथें जन्मले राहिले कीर्ति भारी ॥
पहा देशचित्रांत ही मुख्य जागीं ।
असे पश्चिमीं पाहते सर्व भागीं ॥ ५ ॥
क्षितीजावरी नील आकाश दाट ।
दिसे भूमि वेधानुकूला सपाट ॥
जलापूर्ण वाहे सुरम्या धुनी ही ।
इथें नेत्रकंटाळवाणें न कांहीं ॥ ६ ॥
असे बर्लिन ग्रीनवुइच् पारिसाख्य ।
तसे होय वॉशिंग्टन–स्थान मुख्य ॥
तया आद्यरेखा कुणी मानिताती ।
अवंती तशी भारतां शोभवी ती ॥ ७ ॥
ज्योतिःशास्त्रा वेदवेदांगकालीं ।
संज्ञा कालज्ञान ही प्राप्त झाली ॥
ज्योतिर्लिंगा श्रीमहाकालनाम ।
तेणें झालें प्राप्त सौभाग्यधाम ॥ ८ ॥

एवं येथें कालसंस्थाप्रणाली ।
होती लिंगस्थापनापूर्वकालीं ॥
ज्योतिःशास्त्री केंद्र शिक्षाप्रदानीं ।
पूर्वाचार्यीं स्थापिलें सत्कर्त्रींनीं ॥ ९ ॥

षण्मासाच्या मेरुभागीं दिनाच्या ।
ये मध्यान्हीं उर्ध्वभागीं कुजाच्या ॥
अत्युच्चीं जें सूर्य तें दे पुरीला ।
उच्चत्वाचीं संस्थिती उज्जनीला ॥ १० ॥

देहीं केंद्रस्थानिं नाभी असे ती ।
चारीधामीं उज्जनी मध्यवर्ती ॥
तस्मात् नाभी अमृताची असोनी ।
मातृस्थानीं वर्णिली ही ऋषींनीं ॥ ११ ॥

ज्योतीषैतीहास–भूगोलसंस्था ।
साधूनीया उज्जनीची महत्ता ॥
येथें जी ही बांधिली वेधशाळा ।
ती या स्थानीं मापिते सर्वकाळा ॥ १२ ॥

---

## अर्थाच्या टीपा.

(पद्य) १ उज्जनीला प्रतिकल्पा म्हणजे प्रत्येक कल्पाच्या प्रारंभीं असणारी नगरी अशी एक संज्ञा आहे. कल्पारंभहि चैत्र शु. १ ला झाला. माळव्याच्या पठारावर उज्जयिनीची उंची इतर नगरांपेक्षां अधिक म्हणजे समुद्रसपाटीपासून १६७९ फूट आहे. चैत्री पाडव्याचे दिवशीं आपण सर्वांत उंच जागीं गुढी उभारितों. त्याप्रमाणें जगन्निर्माणदिवशींच उंच जागेवर खुद्द उज्जयिनीची स्थापना झाली म्हणून ती भारत देशाची जणूं काय गुढीच जाहली.

२ माळव्यांत उच्चस्थानीं ही नगरी वसली आहे. म्हणून हिचा उत् म्हणजे वरच्या स्थानीं असून•जगतांत ज्योतिःशास्त्रांत विजय संपादन करणारी, असा अर्थ आहे.

३ विशालापुरी म्हणजे उज्जनी. उज्जयिनीची अवंतीखंडांत जीं आठ नांवें सांगितलीं आहेत त्यांत विशाला हें एक आहे.

४ अवन्ती या संस्कृत शब्दाचा अर्थ रक्षण करणारी असा आहे.

५ भर्तृहरी, वराहमिहिर, बाणभट्ट, कालिदास इत्यादींचा संबंध उज्जयिनीशीं असल्याचा इतिहास व कथा आहेत.

हिंदुस्थानच्या नकाशांत हिंदुस्थानचे चित्रास जर एक वर्गाची खोली मानली व जर शिक्षक कलकत्त्याकडे तोंड करून उज्जयिनीच्या ठिकाणीं खुर्चीवर बसला आहे असें मानिलें तर उजवीकडे रामेश्वरापर्यंत, डावीकडे काश्मीरापर्यंत, समोर ढाकापर्यंत त्या शिक्षकाला वर्गावर दाब ठेवितां येईल. मागें द्वारकेपर्यंत तो बघूं शकेल. याप्रमाणें उज्जयिनीचें स्थान शिक्षक या नात्यानें भारतांत एक प्रकारें मध्यावर आहे

६ धुनी म्हणजे नदी क्षिप्रा.

७ उज्जयिनी ही हिंदुस्थानची ग्रीनवुइच आहे. ही गोष्ट जगप्रसिद्ध आहे. भारताचें शून्यरेखशांवृत्त उज्जनीवरून जातें असें आपल्या ज्योतिषग्रंथांत वर्णिलें आहे.

८ वेदवेदांगकालीं ज्योतिःशास्त्रास कालज्ञान म्हणत. त्याचा अभ्यास येथें अनादि कालापासून होत असे म्हणून श्रीमहाकालेश्वरास उज्जयिनीच्या त्याच महत्वावरून महाकाल असें नांव पडलें.

९ अर्थात् येथें ज्योतिषाचा अभ्यास महाकालेश्वराचे स्थापनेच्या पूर्वीपासून होत होता.

१० मेरुस्थान म्हणजे उत्तर ध्रुव. येथें ता. २१ मार्चपासून सहा महिन्याचा दिवस असतो. यापैकीं तीन महिने होतात तेव्हां सूर्य दक्षिण क्षितीजापासून अति दूर उंचीवर ( अंतरावर ) येतो व त्यावेळीं तो सूर्य वराहमिहिराच्या पंचसिद्धांतिका ग्रंथाप्रमाणें उज्जयिनीच्या थेट मस्तकावर येतो. त्या ग्रंथांत उज्जयिनीचे अक्षांश व सूर्याची परमक्रांति हीं दोन्ही २४ अंश मानलीं

आहेत. उज्जनीशिवाय इतर अक्षांशांना हें सौभाग्य प्राप्त होत नाहीं. म्हणून हें उज्जयिनीचें विशेष महत्त्व होय.

११ आपल्या धार्मिक कल्पनांप्रमाणें जगन्नाथ, रामेश्वर, द्वारका व बद्रीकेदार या चारी क्षेत्रांची यात्रा केली म्हणजे चारी धाम केले किंवा चारी द्वारांची यात्रा केली असें म्हणतात. या चारी द्वारांच्या मध्यवर्ती उज्जयिनी हें मुख्य क्षेत्र मंदीर असून त्याचें महाकालेश्वर हे क्षेत्रपति आहेत शरीराच्या चारी बाजूंच्या मानानें नाभी (बेंबी) जशी मध्यभागी असते त्याप्रमाणें हें स्थान आहे. या नाभीला "अमृतस्य नाभिः" अमृताची ग्रंथी म्हणतात. हें जगदुत्पत्तीचें स्थान असल्या कारणानें यास मातृकास्थानहि म्हणतात.

१२ वर सांगितल्याप्रमाणें सर्व प्रकारें उज्जयिनीचें श्रेष्ठत्व स्थापित होत असल्यामुळें हें स्थान वेधशाळेकरितां पसंत केलें गेलें.

**गोविंद सदाशिव आपटे.**
सुपरिंटेंडेंट, श्रीशिवाजी वेधशाळा,
उज्जयिनी.

ता. २९-१२-३३

---

## परिशिष्ट नंबर ६

## या ग्रंथांतील पद्यांच्या प्रथम चरणांची सूची.

१ पुरुषें आरंभावें कर्म, न पौरुष कदापि सोडावें। —मोरोपंत

२ रुचिर स्वर-वर्ण-पदा, रसभाववती जगन्मनो हरति। —धर्मदास

३ नारायणं नमस्कृत्य नरं चैव नरोत्तमम्। —व्यास

४ ताराकी जोतमें चंद्र छुपे नहीं। —गंगदास

५ काळाच्या घोर फेरीं गवसुनी तुझीगे काय झाली दशा ही?
—सौ. इंदुमती राजवाडे

६ मातें भव्य अशी इमारत पुढें विच्छिन्न झाली दिसे। —माधवानुज

७ विधिरहो बलवान् इति मे मतिः। —हितोपदेश

८ नमामि जगदुत्पत्तिस्थितिसंहारकारणम्। —माधव

९ क्षुत्क्षामोपि जराकृशोपि शिथिलप्रायोपि कष्टां दशां। —भर्तृहरि
१० खाण्यावांचुनि रोडला, जरि जरायोगें बहू वाळला। कृ. चिपळुणकर
११ झाला क्षीण बहू क्षुधेस्तव जरी कीं व्यापिला वार्धकें। —वामन
१२ सोनाने शुभ पांजरे पकडिने राख्यो कदि कागडो। —केशव
१३ काकाची तनुयष्टि वा रचियली, जांबूनदें सर्व ती। —सी. वि. सरवटे
१४ मोहन मदन गोपाल की बांसुरी।
१५ नाभिषेको न संस्कारः सिंहस्य क्रियते वने। —हितोपदेश-सुहृम्देद
१६ शास्त्रे विद्या, ललित, कविता, धर्मनिष्ठा प्रताप। —वा. वा. खरे
१७ अब्धिर्लंघित एव वानरभटैः किं त्वस्य गंभीरताम्। —मुरारि
१८ नर—रूप—रत्नोंसे सजीथी वीर विक्रम की सभा। —मैथिली. गुप्त
१९ कोठें उज्जयिनी पुराण नगरी संपन्न राजन्वती ?। —वा. वा. खरे
२० गेली उज्जयिनी !!! तिच्या धरितसें नांवास जें लोकिं या। वा.वा.खरे
२१ कोठें धारानगरिहि तशी उज्जनी विक्रमाची। —वि. कृ. मुळ्ये
२२ कोठें ते कांचनाचे कळस चमकती उंच देवालयाचे ?। वा. वा. खरे
२३ प्रातःकाळीं नगरवनिता कुंकुमाच्या सड्यानीं। —वा. वा. खरे
२४ या•राहुंद्या गत कथा स्मृतिबाह्य आतां। —अनंत वामन बर्वे
२५ आकाशे तारकालिंगं पातले हाटकेश्वरम्। —स्कंदपुराण
२६ मार्कंडेय मुनिवरी करुनि कृपा हांकिला जयें काळ। —प. ना. बेहेरे
२७ अवंतिके ! वैभव तव पूर्व सर्व आज नष्ट जाहलें !।—न. शं. रहाळकर
२८ कालारंभार्थ जेव्हां गगनिं पसरले सर्व हे ब्रह्मगोल।—केरळकोकिळ
२९ होईना लेश सृष्टिप्रलय बघुनि ही गे तुझा धैर्यनाश।—केरळकोकिळ
३० केला या परि पूर्ण नाशहि तरी वाचोनि शाकुंतल।—भा. रा. तांबे
३१ प्रिये अवंतिके ! नयनहृदयरंजिके। —विनायक.
३२ प्राप्यावन्तीन् उदयनकथाकोविद ग्रामवृद्धान्। —कालिदास

३३ जाऊनीयां पुढति जलदा ! तूं अवंती विशाला । —गं. गो. दामले
३४ भवन्ति नम्राः तरवः फलागमैः । —कालिदास व भर्तृहरि
३५ वृक्ष फार लवती फलभारें । —वामन
३६ अनाघ्रातं पुष्पं किसलयमलूनं कररुहैः । —कालिदास व भर्तृहरि
३७ न हुंगिलें पुष्प न तोडिलें फळ । —वामन
३८ जातां उत्तरपथें वांकडी उज्जयिनी जरी आहे । —कृ. चिपळुणकर
३९ ख्याता जेथें उदयनकथा गांठुनी तो अवंती । —बा. ल. अंतरकर
४० पुष्पांचा ज्यामधिं मधुरसा दाटला फार वास ।—लक्ष्मणशास्त्री लेले
४१ संध्याकालाविण जलधारा ! अन्यकालीं हि जासीं । भा. शं. देवस्थळी
४२ देखे सुंदरि हा अवंतिपति गे विस्तीर्ण वक्षस्थळ ।—गणेशशास्त्री लेले
४३ श्री चन्द्रमौलि भगवान् शिव तत्समीप । —गणेश शास्त्री लेले
४४ येतो शिप्रा नदीला झगडुनि ह्मणुनी वायु जो शीत वाहे । —ग.शा लेले
४५ अवन्ती नगरीची रचना । पहातां आश्चर्य वाटे मना । —श्रीधरस्वामी
४६ तमास पसरी निशा मग जगांत जातां रवी । —गोविंदाग्रज
४७ गडात् च सास्वडं चैव, सास्वडात् च गडं पुनः ।
४८ विस्तीर्णा पृथिवी, जनोऽपि विविधः किं किं न संभाव्यते ।
४९ जाईल रात्र, मग होइल ती सकाळ । —ह. ना. आपटे
५० आहे जें अपुलेंच तें त्रिधिबलें व्हावें परासारखें । —रेंदाळकर
५१ तस्मात् असक्तः सततं कार्यं कर्म समाचर । —श्रीकृष्ण
५२ न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन । —श्रीकृष्ण
५३ त्रैलोक्यांतहि पार्था ! मजला कर्तव्य हें न अणुमात्र । —कृ. ना. आठल्ये
५४ सत्कृत्यांचीं पुष्पें तोडीतची जावें, सुवासा सोडावें, चोहींकडे ।
—म. शा. कोल्हटकर
५५ मुक्त होता परी, बळें झाला बद्ध । —तुकाराम

५६ मी वीर मातें अनुकंप्य सारे । —तारानाथ
५७ क्वचित् वीणावाद्यं, क्वचिदपिच हा हे ति रुदितम् ।
५८ उज्जयिनी स्याद्विशालाऽवन्ती पुष्पकरंडिनी । —हेमचंद्र
५९ उपेक्षावें लज्जा त्यजुनि जननिन्देसचि अतां । —ग. शा. लेले
६० केव्हां गोड वदे, वदे अनृत ही, केव्हां वदे सत्य ही । —वामन
६१ धरणीगर्भसंभूतं मंगलं प्रणमाम्यहम् ।
६२ उत्तमाहुनी उत्तमतर, होत जावें निरंतर ।—गुणाजी व कालेलकर
६३ बंधमुक्त मी होईन केव्हां ? । जेव्हां होई 'मी पण' नष्ट। —गु.व.का
६४ प्रेमसूत्रदोरी । नेतो तिकडे जातो हरी । —तुकाराम
६५ है सृष्टिकर्ता एक ही, तुमसे जुदा वह है नही । —अद्वैतानंद
६६ अनुकूल काल होतो तेव्हां बळ, बुद्धि, तेज, यश देतो।—मोरोपंत
६७ त्याच्या इच्छामात्रें अघटित तें सर्व घटित होणार । —शं. रा. ओक
६८ जय जगदीश हरे । जय जगदीश हरे !
६९ अग्रे व्याधः, करधृतशरः पार्श्वतो जालमाला ।
७० स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं, देवो न जानाति कुतो मनुष्यः ।
७१ दैवं निहत्य कुरु पौरुषमात्मशक्त्या ।
७२ मन मेला तन उजला, बगला कपटी अंग ।
७३ साकर तजे न गळपणू । सोमल तजे न झेर ।
७४ क्षुधातुराणां न रुचिर्न पक्वं चिंतातुराणां न सुखं न निद्रा ।
७५ सर्वचि कारागिर दैवाचे कालतट्टाभीतरीं । —भालचंद्र
७६ मारुति कर जोडुनियां सीतेसि ह्मणे नको धरूं शंका ।
७७ जेव्हां जीव थकूनि पाहत परी विश्रांति ही घ्यावया ।—गोविंदाग्रज
७८ ये, ये, लक्ष्मण, धर्मशील बगळा पंपातटीं तो पहा ।—वि. ना. रेडे
७९ ईशकृपेचें कवच तदंगीं सत्यनीतितें जो वरितो । —किरात

८० अंतरीं निर्मळ,वाचेचा रसाळ,त्याच्या गळां माळ असो नसो। तुकाराम
८१ गुरुं वा बालवृद्धौ वा ब्राह्मणं वा बहुश्रुतम् । —मनु
८२ हरिगुण गावत नाचूंगी । —मीराबाई
८३ अपमान होय तेथें योग्य न वास्तव्य हें मनीं आणा ।चिं.मा.पिंपळसकर
८४ न भूतपूर्वं न कदापि वार्ता ।
८५ असंभवं हेममृगस्य जन्म, तथापि रामो लुलुभे मृगाय ।
८६ पौलस्त्यः कथमन्यदारहरणे दोषं न विज्ञातवान् ? ।
८७ अन्यस्त्रीहरणीं कसा दशमुखें स्वान्याय ना जाणिला? ।—सी.वि.सरवटे
८८ देवास काय करुणा अगदींच नाहीं ? । —किर्लोस्कर
८९ कारज धीरे होत है । काहे होत अधीर ? ॥ —तुलसीदास
९० करालभालपट्टिका धगत् धगत् धगत् ज्वलत् । —रावण
९१ त्रिगुणं च त्रितत्वं च त्रयो देवास्त्रयोग्नयः ।
९२ अर्कौ खगौ घङश्चैव चटौ तपौ परस्परम् ।
९३ उमा देवी यस्य माता, पिता यस्य च शंकरः ।
९४ कोठें ऐश्वर्य तुझें ? कोठें सत्ता ? कुठें वसे शील ? ।—के. ना. डांगे
९५ तुझ्यारे दिव्य रूपाचा ! मनाला लागला ध्यास ।—वि. ज. कामत
९६ कोठें इतिहास तुझा ? दिगंत कीर्ति, सुभव्ययश नृपती ।—के. ना. डांगे
९७ वास उसीमें है प्रभुवरका, है बस सच्चा साधु वही । —मै. शरण गुप्त
९८ व्रतार्थ गोसेवक जाहला स्वतां, तो सेवकादेखिल धाडि मागुता ।
ग. शा. लेले
९९ हातीं शस्त्र तरी दयार्द्र हृदयीं हा, हे तया सांगती । ग. शा. लेले
१०० भांडें सोन्यारुप्याचें जवळ नच्चि असे एकही भूपतीच्या । ग.शा.लेले
१०१ वत्साच्या विषयीं समुत्सुक जरी, ती होउनी सुस्थिरा । ग. शा.लेले
१०२ मनुवाँ ! श्रीहरि भक्ति करे । —वि. न. ललित

१०३ न मंत्रं नो तंत्रं तदपि च न जाने स्तुतिमहो ।

१०४ नाहीं जाणत मंत्रतंत्र अथवा कैसी करावी स्तुती । –सी. वि. सरवटे

१०५ संगत संतनकी करले, जनमका सार्थक कछु करले । –कबीर

१०६ आदरेण यथास्तौति धनवन्तं धनेच्छया । विद्यारण्य

१०७ गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रविस्तरैः ? ।

१०८ मूढ जहीहि धनागमतृष्णाम् । शंकराचार्य

१०९ अर्थमनर्थं भावय नित्यं । ,,

११० सुटलासी दीन अनाथा । –द. कों. घाटे

१११ जे कां रंजले गांजले । त्यांसि ह्मणे जो आपुले । –तुकाराम

११२ प्रणम्य शिरसा देवं गौरीपुत्रं विनायकम् ।

११३ कः स्नेहः ? सद्भावः ।

११४ रुदिताश्रुपरिद्यूनं हाहाकृतमचेतनम् । –वाल्मिकी

११५ यास्यत्यद्य शकुंतलेति हृदयं संस्पृष्टमुत्कंठया । –कालिदास

११६ जाते कीं मम शकुंतला ही आजचि पतिसदना ।–अण्णा किर्लोस्कर

११७ अहो भाष्यम्, अहो भाष्यम् । अहो वयम्, अहो वयम् ।-भर्तृहरी

११८ समानी व आकूतिः समाना हृदयानि वः । ऋग्वेद

११९ धन्य आमुचा मातृदेश हा, कलिजा हिंदुस्थान ।–द. ग. जयवंत

१२० उपार्जितानां वित्तानां त्याग एव हि रक्षणम् ।

१२१ माते महात्मे तुझे तत्ववेत्ते, तुझे शूर योद्धे सत्कवी ।–ना.वा.टिळक


१२२ आश्वास्य पर्वतकुलं तपनोपतप्तम् । भोजप्रबंध

5293

# साधन एक पण उपयोग अनेक

थोड्या साधनांचा अधिकांत अधिक उपयोग करून घेणें हा सध्याचा युगधर्म आहे. तुमच्या सर्व सोयी व्हाव्यात, पण घरांत सामानाचा पसारा माजू नये अशी तुमची इच्छा आहे ना? मग घरांत

पलंग
कॉटस्
खुर्ची
टेबल



शेल्फ
कपाटें
तिपाई
पाळणे

## किर्लोस्कर पोलादी फर्निचर

मागवा. विविध उपयुक्तता, आकर्षक रचना, व मजबूत टिकाऊपणा यांचा त्रिवेणी संगम या फर्निचरमध्यें झाला आहे.

**सविस्तर माहिती मागवा**

**किर्लोस्कर बंधू लिमिटेड, किर्लोस्कर वाडी, [जि. सातारा]**